CC-0. In Public Domain. Digitized by Saray... eGangotri

प. पू. सिध्दांत चक्रवर्ती
श्वेतपिच्छाचार्य आचार्यश्री
१०८ विद्यानंदजी मुनी महाराज
विरचित

पिंछी-कमंडलू

...Ganesh Varni Digambar Jain ... Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सुमेरू प्रकाशन
मराठीचा पहिला शिलालेख

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0. In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

12.4

सुमेरु प्रकाशन
मराठीचा पहिला शिलालेख

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प.पू. सिद्धांत चक्रवर्ती श्वेतपिच्छाचार्य
आचार्यश्री १०८ विद्यानंदजी मुनी महाराज
विरचित

पिंछी-कमंडलू

णिप्पिच्छे णत्थि णिव्वाणं

- आचार्य कुंदकुंद, मूलाचार - १०/२५

◆

अनुवाद
सौ. उषा जैनेंद्रकुमार तुपकर

◆

सुमेरू प्रकाशन
डोंबिवली (पूर्व) - ४२१ २०१

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

- **पिंछी-कमंडलू**
  आचार्य विद्यानंद मुनी

- **पहिली आवृत्ती : हिंदी १९६४ : द्वारा - श्री वीर निर्वाण ग्रंथ प्रकाशन समिती, इंदौर (उपरांत पाच आवृत्त्या)**

- **प्रस्तुत आवृत्ती : मराठी-दशलक्षणपर्व : सप्टेंबर २०१६**

- **अनुवाद : उषा जैनेंद्रकुमार तुपकर, सोलापूर**

- **© प्रकाशक :**
  सुमेरू प्रकाशन
  डी-६, राजहंस सोसायटी,
  टिळकनगर, डोंबिवली (पू.) - ४२१ २०१
  दूरध्वनी : (०२५१) २४३५९६८
  भ्रमणध्वनी : ९८६७५०८८१४ / ९७६९१३४००३

- **अनुवादाचे विधी दायित्व - संयोजक :**
  श्रमण जैन ग्रंथ प्रकाशन समिती, सोलापूर
  द्वारा : चंद्रमोहन र. शहा
  ६,वर्धमान अपार्टमेंट,१०३, रेल्वेलाईन,सोलापूर-४१३००१
  भ्रमणध्वनी : ९४२३३३५३००

- **अक्षरांकन :**
  सुरेश पैठणकर
  रेणुका प्रिंटस्, डोंबिवली
  भ्रमणध्वनी : ८०९७८८५२२९

- **मुखपृष्ठ : डिझाईन अ‍ॅन्ड प्रिंट**
  भ्रमणध्वनी : ९९२०४८५४३९

- **मुद्रक :**
  सायली प्रिंटर्स
  डी-६, राजहंस सोसायटी,
  टिळकनगर, डोंबिवली (पू.) - ४२१ २०१
  दूरध्वनी : (०२५१) २४३५९८६
  भ्रमणध्वनी : ९७६९१३४००३/९९६९४२९७४१

सुमेरु

- **किंमत : रु. ४५०-००**

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आशीर्वचन

पूज्य पुरुषाचे सांसारिक मोहजालातून बाहेर पडणे
समस्त जन, पृथ्वी-चैतन्य यासाठी प्रेरणास्रोत बनून
लोकजीवनात अभिनव संकल्प-परिवर्तन-प्रकाश
देण्यास सज्ज झाले आहे.
म्हणून आज...
निद्रिस्त अर्धोन्मीलित संपूर्ण चेतनांनी
प्रफुल्लित होण्यासाठी तयार व्हावे.
आणि आता या क्षणी आपली कवाडे उघडावीत.
वाजणाऱ्या सूक्ष्म हृदयवीणेला ताल, लयीची सोबत करावी
जन्मजयंतीची परंपरागत रुळलेली वाट सोडून
प.पू. आचार्य मुनिश्री विद्यानंद
महाराजांचा दीक्षादिवस
विद्यावर्द्धनोत्सव म्हणून उल्हासाने
संपन्न करण्यासाठी
असामान्य-अनुपम साहसी पावले उचलावीत.

या देशातील त्या समस्त लहानमोठ्या सर्वांना,
श्रीमान-बुद्धिमंतांना अमर संदेश मिळेल की,
जेव्हा मानव पंचपापातून मुक्त होऊन
सम्यग्दर्शन-ज्ञान-चरित्र्याच्या आराधनेसाठी सज्ज होतो;
त्याच क्षणी मानव महामानवाच्या कक्षेत येऊन
मंदिराप्रमाणे लोकपूज्य होतो.
कारण स्पष्टच आहे की, जन्मापासून या दुखमा काळात
जीव मिथ्या दृग-ज्ञान-चरित्र घेऊन येतो,
असो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जैन दर्शनाला डोळ्यांसमोर ठेवत
मिथ्यात्वाला जाणीवपूर्वक टाळून
रत्नत्रयाची पूजा-उपासना करून त्यांना जीवनात उतरवायचे आहे.
...म्हणजेच दीक्षा दिवस
गुरुंसारखाच आमचाही संपन्न करायचा आहे.
हो, खरेतर तोच क्षण
आमचा-स्वतःचा क्षण आहे व असेल;
ज्या क्षणी मानव निर्ग्रंथ होऊन
आत्मारूपी ईश्वराच्या उपासनेसाठी स्वतःच स्वतःमध्ये लीन होऊन जाईल.
हे आदिम प्रभो! तीर्थंकर आदिनाथ भगवान,
तो सोनेरी क्षण...
प्रत्येक प्राण्याला प्राप्त होवो, ही माझी भावना आहे.
यावे... आपण सगळे
आचार्य भगवंतांचा दीक्षा दिवस साजरा करू आणि
या अनमोल जीवनात काही शिकू या, समजून घेऊन या!
जीवनातल्या या मौल्यवान क्षणी
हाच आपल्यासारख्या भव्य मुमुक्षूजनांसाठी
आमचा आशीर्वाद आहे.

- उपाध्याय मुनी गुप्ति

स्वाध्याय

अज्ञानरूपी हत्तीवर स्वाध्याय हाच अंकुश आहे.
पावित्र्याच्या प्रांतात प्रवेश करण्यासाठी स्वाध्याय हा राजमार्ग आहे.
स्वाध्याय न करणारे आपल्या योग्यतेची बढाई मारतात.
परंतु, खरे स्वाध्यायपरायण मात्र स्वाध्यायाला गुप्त खजिना
मानून आत्मोद्धारासाठी त्याचा उपयोग करतात.
त्यांच्या मौन व्यक्तिमत्त्वावर स्वाध्यायाचे अक्षर वरदा विलसत असते.

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रकाशकीय

पिंछी-कमंडलू ग्रंथाची पहिली आवृत्ती १९६४ साली जयपूर येथे प्रकाशित झाली होती. प्रकाशनानंतर संपूर्ण एक दशक उलटल्यावर श्री वीर निर्वाण ग्रंथ प्रकाशन समिती, इंदूर यांना या ग्रंथाच्या परिवर्धित आवृत्तीच्या मुद्रणाची सुवर्णसंधी मिळाली. परमपूज्य उपाध्याय मुनिश्री विद्यानंद महाराजांची ही साहित्यरचना एक लोकोपयोगी व महत्त्वपूर्ण अशी कृती आहे. या साहित्यकृतीसंदर्भात थोडे काही लिहू म्हटले तर तो वाढ खुरटलेल्या खुज्या माणसाने आकाशाला स्पर्श करू पाहण्याचा वेडेपणाच ठरेल. पूज्य मुनिश्री मानवी मनाचे उत्तम पारखी आहेत. जैन विद्येचे मर्मस्पर्शी, निरंतर स्वाध्यायी संत आहेत. अलीकडच्या काही वर्षांत त्यांनी भारतातील ग्रामीण व शहरी अशा दोन्ही भागांमध्ये आत्मानुशासनाचे रणशिंग फुंकले आहे. अपरिग्रह व अहिंसा हे सिद्धान्त त्यांनी अत्यंत सोप्या, सुबोध भाषेद्वारे जनताजनार्दनापर्यंत पोहोचवले आहेत. ते सद्ययुगाचे लोकपुरुष आहेत आणि जिथेजिथे त्यांचा चातुर्मास होतो किंवा जिथे अल्पकाळासाठीही त्यांचा विहार होतो, तिथेतिथे लोकांमध्ये ते तीर्थंकरप्रणीत जैन धर्माचा प्रसार करतात आणि सामान्य जनतेच्या विचारांना, बुद्धीला एक उदात्त बैठक प्रदान करतात.

आज संपूर्ण देश आत्मानुशासनाच्या कठीण पर्वातून यशस्वीपणे जात आहे. आत्मानुशासनाचे विवेचन करणाऱ्या या कृतीचे मूल्य आणि महत्त्व त्यामुळे आपोआपच वाढले आहे. खरे पाहता, पूज्य मुनिश्रींनी आत्मानुशासनाच्या या महापर्वाचे सूतोवाच बऱ्याच वर्षांआधी केले होते. 'समय का मूल्य', 'अहिंसा विश्वधर्म', 'सप्तव्यसन', 'अभीक्ष्ण ज्ञानोपयोग' या त्यांच्या मंगलमय साहित्यरचना याच महापर्वाची नांदी ठरणाऱ्या आहेत.

'पिंछी-कमंडलू'तील सगळेच निबंध आत्मनिष्ठ बैठक लाभलेले आहेत. त्यातून अध्यात्मविषयक स्थितीचे स्पंदन जाणवत राहते. त्यामध्ये मुनिश्रींच्या पारदर्शी ज्ञानदृष्टीचे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सहजतेने दर्शन घडते. या लेखनकृतीत एकाच वेळी वस्तू आणि भाषा, लक्ष्य आणि माध्यम या दोन्हींविषयीची त्यांची निष्ठा व दृढता-प्रखरता अनुभवास येते. याच कारणामुळे 'पिंछी-कमंडलू'तील निबंध जीवनातील बहुतेक सर्व व महत्त्वपूर्ण क्षितिजांना स्पर्श करणारे, असे आहेत. ते वाचकांच्या अंत:करणात वेगळ्याच उष:कालाला जन्म देतात. या निबंधांची भाषा सामासिक शब्दयुक्त आहे, अलंकृत आहे, कठीणही आहे. परंतु शब्दांचे संयोजन, शब्दांची रचना इतकी सहज-सोपी आहे, प्रवाही आहे की, वाचकांचे मन नकळत अनुभवांच्या सखोलतेत उतरू लागते. आणखी एक गोष्ट तेवढीच महत्त्वाची आहे. ती म्हणजे, सर्व स्तरांतील वाचकांसाठी विशेष सामान्य अशी वाचनसामग्री 'पिंछी-कमंडलू' मध्ये आहे. वरकरणी यातील निबंध प्रवचनरूप वाटतात; पण वर्णनशैली आणि विषयवस्तू इतकी सरस, आकर्षक आहे की, या ग्रंथापासून हजारो प्रयत्न केले तरी वाचक दूर जाऊ शकत नाही. यातील बरेच निबंध ललित निबंध आहेत. एकूणच, सगळेच निबंध रोचक, ज्ञानात भर घालणारे, विषयदृष्ट्या समृद्ध व ललित लेखाच्या धाटणीचे आहेत; पण गंभीरही आहेत. व्यक्तीच्या-समाजाच्या मनावर संस्कार करणारे आहेत.

भाषालेखन, वक्तृत्व, वाङ्मय, स्वाध्याय इत्यादी निबंध जीवनावर भाष्य करणारे आहेत. मुनिश्रींची 'अमोघ विद्वत्ता' या सर्व निबंधांतील वाक्यावाक्यांतून प्रतिबिंबित होताना दिसते. निबंधांची विवेचनशैली ही अनेकान्तमूलक आहे. त्यामुळेच मुनिश्रींनी सखोल चिंतनसागरातून तथ्याचे मोती मिळवून आपल्या हाती ठेवले आहेत. जणू, लोकप्रज्ञेच्या शिंपल्यात स्वत:च्या साधनेचे अनुभवबिंदू ठेवून त्यांच्या माध्यमातून त्यांनी शब्दरूपी मोत्यांची निर्मितीच केली आहे. मुनिश्री साधनारत तपस्वी आहेत. त्यांच्या चातुर्मास काळात अनेक विद्यासत्रे संपन्न झाली आहेत.

ही साहित्यरचना म्हणजे त्यांच्या प्रारंभीच्या अनुभवमंथनातून निघालेले नवनीत आहे. 'पिंछी-कमंडलू' ही महाराजांच्या व्यक्तित्वाचे अनोखे प्रतिनिधित्व करणारी कृती आहे, असेही आपण म्हणू शकतो. ही कृती श्रावक आणि श्रमण दोन्ही वर्गांना ग्रांथिक/पारिभाषिक संदर्भ उपलब्ध करून देणारी आहे. श्रावकांना तर ती दिशाबोध करून देतेच देते, पण त्याचबरोबर श्रमणांनाही नवे-जुने संदर्भ प्रदान करते. नवदीक्षितांना ही केवळ अमोघ अमृतवृष्टीच आहे. यामध्ये, 'गुरुसंस्थेचे महत्त्व', 'पिंछी कमण्डलू', 'वर्षायोग', 'दीक्षाग्रहण', 'सल्लेखना' हे शास्त्रसंमत निबंध आहेत. परंतु, विशेष हे की ते अत्याधुनिक संदर्भासह तथ्य प्रस्तुत करतात. त्यांची शास्त्रदृष्टीने श्रेष्ठता पूर्णत: असंदिग्ध अशीच आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पण त्याचबरोबर लोकजीवनातील त्यांच्या उपयोगाकडे दुर्लक्ष करता येणार नाही.

'वक्तृत्वकला', 'लेखनकला', 'शब्द और भाषा' पूज्य मुनिश्रींच्या उत्कृष्ट, महान ज्ञानसाधनेचे जिवंत पुरावे आहेत. 'नरजन्म की सार्थकता', 'जैन धर्म में नारी' हे वेगळ्या प्रकारचे निबंध आहेत. त्या निबंधांमध्ये क्रांतीचे बीज दडलेले आहे. यामध्ये मुनिश्रींनी कुठे परंपरांमधील अग्राह्य गोष्टी अधोरेखित केल्या आहेत; तर कुठे आधुनिकतेच्या हव्यासाच्या बाबतीत कडक इशारेही दिले आहेत. अशा प्रकारे हा ग्रंथ म्हणजे आत्मशोध, बोध व आत्मानुशासन यांचा एक विशिष्ट संदर्भग्रंथच आहे.

शेवटी आम्ही एवढेच सांगू इच्छितो की, वीर निर्वाण ग्रंथ प्रकाशन समितीला आपल्या या बहुमूल्य कृतीच्या प्रकाशनाची जी संधी मुनिश्रींनी दिली; त्याबद्दल आम्ही अत्यंत कृतज्ञ आहोत. हल्ली असे झाले की, 'पिंछी कमंडलू'ची एकही प्रत शिल्लक नाही आणि चहूबाजूंनी वाचक वारंवार त्यासाठी मागणी करीत आहेत. म्हणूनच, आम्हाला असे वाटते की, याची कलापूर्ण, लोकोपयोगी आवृत्ती लवकरात लवकर प्रकाशित व्हावी.

ही आवृत्ती कमीतकमी किमतीत आणि उत्कृष्ट मुखपृष्ठमांडणीसह आमच्या सहृदय वाचकांसमोर आम्ही ठेवत आहोत. आम्हाला विश्वास आहे की, जीवनात योग्य क्रांतीचे बीजारोपण करणाऱ्या या कृतीचे मोठ्या प्रमाणावर अभिनंदन केले जाईल आणि हिंदी-साहित्यजगातही मोलाची भर पडेल. लवकरच इतर भारतीय भाषांमध्येही हे पुस्तक अनुवादित होईल. एवढेच नव्हे तर, या पुस्तकाची व्यापक उपयोगिता आणि महत्त्व या कारणांमुळेही जगातल्या प्रमुख भाषांमध्येही याचा अनुवाद केला जाईल आणि त्या भाषा अधिक समृद्ध होतील. प्रस्तावनेसाठी आ.पं. नाथुलालजी, मुखपृष्ठसाठी श्री. विष्णू चिंचाळकर, निर्दोष कलात्मक मुद्रणासाठी श्री. हिरालाल झांझरी आणि व्यवस्थापनासाठी बंधू श्री. माणकचंद पांड्या या सर्वांविषयी समिती अंतःकरणपूर्वक कृतज्ञता व्यक्त करीत आहे. परमपूज्य आचार्यश्री विद्यानंद मुनिश्रींच्या अठ्ठाविसाव्या दीक्षा प्रसंगी आणि विद्यावर्धनोत्सव प्रसंगी १९९१ च्या लोककल्याणकारी संदर्भात पुनर्मुद्रित करण्यात आलेली ही आवृत्ती आवडीने वाचली जाईल, याबद्दल आम्हाला विश्वास वाटतो. तसे झाले तर, व्यक्ती आणि समाजात ज्ञान व सदाचाराचे जे उत्तम संस्कार करण्यासाठी परमपूज्य एलाचार्य मुनिश्रींचे सगळे जीवन समर्पित आहे; ते संस्कार रुजवण्यात आम्ही यशस्वी झालो, असे वाटेल.

- बाबुलाल पाटोदी, मंत्री

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रस्तुत निबंध

प्रस्तुत पुस्तकात सगळे मिळून १८ निबंध आहेत आणि ते परिश्रमपूर्वक लिहिलेले आहेत. निबंधांची भाषा प्रांजळ, उदात्त व प्रवाही आहे. मला तर असे वाटते की, हे निबंध विशेषत्वाने विद्वानांसाठी उपयुक्त आहेत. तेच या निबंधांची भाषा व्यवस्थितपणे समजू शकतील. पण, तसे पाहिले तर कोणतीही सुशिक्षित व्यक्ती यांचा उपयोग ज्ञानवृद्धीसाठी करू शकते.

'पिंछी कमण्डलू' नावाच्या निबंधावरून या पुस्तकास तेच नाव दिले गेले. कोणताही एखादा मुख्य निबंध किंवा एखादी कथा यांच्या आधारे आपल्या संग्रहाचे नाव निश्चित करण्याची परंपरा आज चालू आहे. हीच परंपरा या पुस्तकाच्या नावनिश्चिती संदर्भात औचित्यपूर्ण वाटते. नाहीतर, याचे दुसरे कोणतेही नाव असू शकले असते. या संग्रहातील उपरोक्त निबंधात व 'निर्ग्रंथ मुनी' नावाच्या प्रबंधामध्ये मुनींच्या आचरणावर आवश्यक तेवढा प्रकाश टाकण्यात आला आहे. या दृष्टीने पाहता 'मुनींची आचारसंहिता' असे नावही दिले तर चालले असते. कारण, यात 'दीक्षाग्रहण-क्रिया' नावाचा निबंधसुद्धा समाविष्ट आहे.

या ग्रंथाचे लेखक/निर्माते श्री मुनी विद्यानंद महाराज हे अध्ययन आणि स्वाध्याय यात खूप रस घेतात आणि अभीक्ष्ण ज्ञानोपयोगास पुरेसे महत्त्व देतात. ज्ञानाराधनेच्या विषयीची त्यांची जागरूकता अन्य मुनींसाठी खरेच अनुकरणीय अशीच आहे. साधू जोपर्यंत विद्वान आणि वक्ता म्हणून सिद्ध होत नाही; तोपर्यंत तो आपल्या व्यक्तित्वाचा प्रभाव दुसऱ्यावर टाकू शकत नाही आणि दुसऱ्यांना त्याचा काही उपयोगही होत नाही. मला असे वाटते की, या पुस्तकातील 'वक्तृत्वकला' हा निबंध याच गोष्टीकडे इशारा करतो. जगातले असामान्य तार्किक आचार्य समंतभद्र व भट्टाङ्कलंकदेव हे आपल्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अमोघ व वैशिष्ट्यपूर्ण वक्तृत्वशैलीनेच जिनशासनाचे महत्त्व पटवून देऊ शकले होते. आजच्या त्यागी, तपस्वींनी जर हे तथ्य अंगीकारले व ज्ञानार्जनात स्वतःला गुंतवून घेतले आणि कुठल्याही वादविवादात पडणार नाही; असे ठरवले तर ते फक्त स्वतःचेच कल्याण साधू शकतील, असे नाही तर लोकोद्धारांच्या पुण्यकार्यातही त्यांचा सहभाग उल्लेखनीय असाच ठरेल. आचार्य कुंदकुंदांच्या 'आगम चक्खु साहू' आणि 'अज्झयणमेव झाणं' याकडे एखाद्या संन्यस्त व्यक्तीचे आणि तपस्वी व्यक्तीचे लक्ष जाणे आवश्यक आहे. निष्कलंक चारित्र्य हे जसे साधूला आवश्यक असते तसेच त्याने विद्वान होणेही तेवढेच गरजेचे आहे.

या संग्रहातील 'धर्म आणि पंथ', 'नरजन्म आणि त्याची सार्थकता', 'समाज, संस्कृती आणि सभ्यता', 'चारित्र्याशिवाय मुक्ती नाही' इत्यादी अनेक निबंध सर्वांसाठी वाचनीय असेच आहेत. त्यांच्या अध्ययनामुळे सर्वांना प्रेरणा मिळेल; कारण हे सर्व एका तपस्वीच्या लेखणीतून जन्माला आले आहेत.

काहीकाही निबंधांवर पुनश्च चर्चा, ऊहापोह व्हायला पाहिजे. त्या साधकबाधक चर्चेनंतरच या पुस्तकाची दुसरी आवृत्ती निघावी. त्यामुळे हा निबंधसंग्रह आणखी परिष्कृततर, परिष्कृततम होईल. एखाद्या कृतीला परिपूर्णता येण्यासाठी ती अधिक समृद्ध व्हावी, यासाठी तिच्यातील उणिवा जाणून घेतल्या पाहिजेत आणि शक्य झाल्यास त्या कृतीचा कायाकल्पही घडवून आणला पाहिजे.

पूज्य महाराजांचा हा पवित्र प्रयत्न सगळ्याच दृष्टीने प्रशंसनीय व हवाहवासा वाटणारा आहे. हा निबंधसंग्रह जनमानसाला विशेष ज्ञानी बनवेल.

- चैनसुखदास

दिगंबर जैन संस्कृत कॉलेज, जयपूर

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

निवेदन

सदर ग्रंथाच्या पाचव्या आवृत्तीत एकूण १८ निबंध आहेत. ते बव्हंशी जैन धर्माशी संबंधित आहेत. ते निबंध चारित्र्यनिर्मितीसाठी सहायक व ज्ञानवर्धक असून सर्वांना आवडतील, असेच आहेत.

आधुनिक गद्य विविध रूपांतून व शैलींतून विकसित होत आहे. त्या गद्यरूपांमध्ये निबंधाचे महत्त्वपूर्ण स्थान आहे. निबंध म्हणजे विशिष्ट प्रकारची शब्दरचना होय. पण, त्यामध्ये एखादी भावना किंवा विचार व्यक्त केलेला असतो. निबंध ही गद्याची कसोटी असते. त्यामध्ये प्रतिपाद्य विषय अत्यंत जिव्हाळ्याने मांडलेला असतो. साहित्याच्या दृष्टीने व्यक्तिनिष्ठ (निर्बंध/स्वतंत्र) निबंध व विषयनिष्ठ (परिबंध/मर्यादा) निबंध असे निबंधांचे दोन प्रकार मानले जातात. पहिल्या प्रकारच्या निबंधात आत्मनिष्ठ आणि अनुभवावर आधारित कृतींचा; तर दुसऱ्यात बाह्य गोष्टींच्या वर्णनाचा व बौद्धिक लेखनाचा समावेश होतो.

अनेक विषयांवर अत्यंत सांगोपांग बौद्धिक विवेचन केल्यामुळे हा ग्रंथ विषयनिष्ठ निबंध प्रकारात मोडतो. या निबंधांतील मानसशास्त्रीय मीमांसा, शब्द-भाषा आणि समाज, संस्कृती व सभ्यतेवर आधारित शीर्षके या सर्व गोष्टींमुळे हे निबंध विषयनिष्ठ निबंधाची उत्तम उदाहरणे सिद्ध होतात. त्याचप्रमाणे, विषयप्रधान लेखांमध्ये विपुल विविधता आल्याने हा ग्रंथ अन्य मतानुसार 'प्रबंध' या प्रकारात येतो. भाषा प्रौढ, परिष्कृत/परिपक्व व प्रभाव टाकणारी आहे. या निबंधांमध्ये अनेक ठिकाणी संस्कृत, प्राकृत विविध बोधपूर्ण सूत्रांचा समर्थनासाठी वापर केला आहे.

या निबंधांचे लेखक पूज्य उपाध्याय (आता श्वेतपिच्छाचार्य) मुनिश्री विद्यानंदजी यांचे व्यक्तिमत्त्व तर सर्वोदयी व सर्वतोभद्र-कल्याणकारी आहे. त्यांनी आपल्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

समन्वयात्मक अनेकान्त-वाणीने भगवान महावीरांची लोकाभिमुख परंपरा जनमानसाशी जोडण्याची मंगलमय भूमिका निभावण्याचा अथक प्रयत्न केला आहे, करीत आहेत. पवित्र गंगा नदीप्रमाणे ते सर्वांचेच समानरूपातील दोषहर्ता आहेत. मुनिश्रींनी या विराट विश्वासमोर सर्वोदय तीर्थ-जैन धर्मास शाश्वत विश्व धर्म (जन धर्म) म्हणून उद्घोषित केले आहे आणि पंचविसाव्या महावीर निर्वाण शताब्दीला सफल केले आहे. मुनिश्रींच्या ज्या अनेक साहित्यकृती प्रकाशित झालेल्या आहेत; त्यातील 'निर्मल आत्मा ही समयसार है' ही एक बहुमोल कृती आहे. त्या ग्रंथातील त्यांच्या आध्यात्मिक प्रवचनांवरून त्यांची साधना व ज्ञानाची सखोलता लक्षात येते. समाजजीवनाला प्रबुद्ध करणारी त्यांची प्रवचने, लेखन आणि अपरिग्रही जीवन या तिन्हींचे एकापेक्षाएक वरचढ रूप त्यातून दिसते. वर्तमानकाळात महान पुण्योदयामुळे आपल्याला लाभलेल्या या असामान्य श्रमणनिधीचा लाभ घेऊन जनताजनार्दन आपले मानवी जीवन सार्थक करील हीच आशा!

१८ जुलै, १९९१

नाथुलाल शास्त्री
प्राचार्य
सर हुकूमचंद संस्कृत महाविद्यालय, इंदूर.

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अंतरंग

"परसमयतिमिरतरणिं भवसागरवारितरणवरतरणिम् ।
रागपरागसमीरं वन्दे देवं महावीरम् ।।"

'पिंछी-कमंडलू' हा ग्रंथ म्हणजे इहलोक-परलोकाशी संबंधित असलेल्या अनेक निबंधांचे संकलन आहे. हा प्रबंध केवळ मार्गोपदेशक आहे. मार्गाचे जिथे पर्यवसान होते; तेथून गंतव्य ध्रुवप्रदेशाकडे-आत्मप्रदेशाकडे मार्गक्रमण सुरू होते. तो ध्रुवप्रदेश पुद्गल अक्षरांनी बनलेल्या शब्दांच्या पलीकडची अत्यंत उच्च पातळीवरची गोष्ट आहे. कारण, आत्मप्रदेश स्वत: इतरांपेक्षा भिन्न आणि स्वत:त असणारा आहे. तिथे कसे जाता येईल; त्यास कसे प्राप्त करून घेता येईल, याविषयीच्या प्रकारांची, मार्गांची अनेकानेक निरूपणे झाली. त्यांचा सारांश किंवा विस्तार हा ग्रंथांचा, प्रवचनांचा, विचारविमर्शचा व बुद्धीला चालना देणारा विषय आहे. हे निरूपण एखादा पंडित, एखादा त्यागी, एखादे शास्त्र अनादिपरंपरेपासून यथाशक्ती करीत आले आहे. मूलस्रोताच्या रूपातील याचे निरूपण केवली भगवंतांनी केले आहे. 'केवलीपण्णत्तो धम्मो मंगलं'... हा धर्म केवलीप्रणीत आहे, केवलीप्रज्ञप्त आहे आणि मंगलात्मा आहे. म्हणून, द्रव्यश्रुतानुबंधानुसार याचे लोकांमध्ये प्रसिद्ध झालेले महत्त्व व्यवहाराचे एक अनिवार्य अंग म्हणून स्वीकारले गेले आहे.

हे स्पष्ट करण्यासाठी 'श्लोकवार्तिक'मध्ये घटाचे सुंदर उदाहरण देताना म्हटले आहे की, घडा बनवायचा असतो तेव्हा कुंभाराला माती, चाक, वस्त्र आणि दोरा यांची आवश्यकता असते. परंतु, जेव्हा अग्निसंस्कार होऊन तो घडा पक्का होतो; तेव्हा कोणत्याही जलाशयातून पाणी काढतेवेळी वरील कोणत्याच साधनांची गरज पडत नाही.*

---

* मतृपिंडदंडचक्रादि घटो जन्मन्यपेक्षते।
उदकाहरणे तस्य तदपेक्षा न विद्यते।। - श्लोकवार्तिक

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

भगवान वीतरागांच्या परमधर्म मोक्षाच्या बाबतीतही तसेच आहे. सोन्याला शुद्धता प्राप्त होण्याआधी सोन्याला बडवणे, तुकडे करणे, तापवणे, कुटणे इत्यादी स्थितींतून, परीक्षेतून जावे लागते; तेव्हाच ते शुद्ध होते. त्याप्रमाणे, हा आत्मा अनादिकालापासून कर्मफळानुसार पुण्यपापआस्रव यामुळे उत्पन्न होणाऱ्या शरीराशी संयोग होऊन अनेक योनींमध्ये भटकत राहतो आणि प्रत्येक वेळी बहिर्भावांच्या अधीन होऊन त्या भावांच्या दोषाबरोबर तोही दूषित होतो, अशुद्ध होतो आणि जन्मजरामृत्यूच्या चक्राच्या दाट काळोखात स्वत:चे तेज, ओळख हरवून बसतो.

'स्व'ला जाणून स्वस्वरूपस्थानी पोहोचणे, हीच त्याची- आत्म्याची अग्निविशुद्धी आहे. जिनवाणी त्या स्वउपलब्धीच्या वैज्ञानिक सोपानाची स्वानुभवातून सामान्यजनांना त्यांच्या कल्याणासाठी ओळख करून देते. म्हणून, असे म्हटले पाहिजे की, शास्त्र आणि पिंछी-कमंडलू आत्म्यासाठी सोपानमार्गाची निर्मिती करतात, अनुकूलता निर्माण करतात. तिथून पुढे मात्र आत्म्याला स्वत:लाच ऊर्ध्वगामी होणे, व्हायचे आहे. वेगळ्या शब्दांत असेही सांगता येईल की, पिंछी-कमंडलू वगैरे आत्म्याची असद्‌भुत लक्षणे आहेत, सद्‌भुत नाहीत, हे जास्त बरोबर ठरेल. 'दण्डी देवदत्त' म्हणजे देवदत्ताचे लक्षण विचारल्यावर जर म्हटले की, जो हातात दंड धरतो तो देवदत्त आहे; तर हे त्याचे सर्वकाळासाठी योग्य असे लक्षण मानले जाऊ शकणार नाही. कारण, दंड धारण केलेला असला तरी तो त्याच्या स्वत:च्या अंगाचा भाग नाही. कोणत्या तरी शारीरिक दुर्बलतेमुळे जाण्यायेण्यासाठी त्याला दंडाचा उपयोग करावा लागतो, आधार घ्यावा लागतो; त्यानंतर नाही. तद्वत शुद्ध, निर्विकल्प आत्मस्थितीच्या आधी साधनेच्या काळात संस्कारस्थितीमध्ये शौच-संयम-स्वाध्याय इत्यादी उपकरण अपेक्षित आहे; त्यानंतर नाही.

घराच्या गच्चीवर जाण्यासाठी पायऱ्या तयार करतात, शिडी लावली जाते. बाळाने चालणे शिकावे म्हणून लाकडी त्रिचक्रिका (तीन चाकांचा पांगुळगाडा) वापरतात. या संसारात जेवढी म्हणून वाहने वापरली जातात; ती फक्त इच्छित स्थानापर्यंत पोहोचवणारी साधने आहेत. स्वत: साधक साधन नाहीच. शिडीच्या किंवा जिन्याच्या पायऱ्या चढून जेव्हा शेवटच्या पायरीवर आपण पोहोचतो; तेव्हा त्या अंतिम पायरीचा त्याग करून गच्चीवर पाय तर स्वत: व्यक्तीलाच ठेवावा लागतो. तो जर त्या जिन्याच्या पायऱ्यांवरच थांबला; तर तो गच्चीवर पोहोचणारच नाही. मोरपिसांच्या साहाय्याने जर एखादा सिद्धालयाकडे उड्डाण करू पाहत असेल, कमंडलूच्या मदतीने जर भवसागर तरून जाऊ

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पाहत असेल, जिनवाणीचे पाठ, स्तोत्र इत्यादी कंठस्थ करून मुक्तिरमणीच्या पाणिग्रहणाची अभिलाषा करीत असेल; तर ही सगळी कामे कधीच तडीस जाणार नाहीत. तो केवळ शंखनादच ठरेल. कारण-

''नुडिवुदु पुद्गल केळुवदु पुद्गल, कडेगे पुद्गल स्नेहकोपा।
जडदेहनुं कि नन्नेदेयोळिरय्या, बानोला चिदम्बर पुरुषा।।''

(महाकवी रत्नाकर, ९९)

जिव्हेच्या रथावर आरूढ होऊन श्रोत्यांच्या सभेत प्रवेश करणारे शब्द पुद्गल आहेत. त्याला ध्वनिरूप देणारे दात, ओठ, कंठ, टाळू इ.सुद्धा पुद्गल आहेत. रचना विशेषरूप प्रदेशातील जीभ आणि कानसुद्धा पुद्गल आहेत. वाणीच्या द्वारे शब्दमाध्यमातून जन्मणारा स्नेह, कोप हेही पुद्गलच! देहसुद्धा जड पुद्गल आहे. चिदम्बर आत्मपुरुष यापलीकडचा आहे, पुद्गलापासून भिन्न आहे. ज्याला जीभ, कान, मुख, स्नेह-कोप नाही व शरीरही नाही, जो आत्मा पुद्गलाच्या जातीचाच नाही; तो आत्मा पुद्गलाने सांगितलेल्या राग-द्वेषाच्या कथनास कशा प्रकारे ग्रहण करेल? आणि जर यामध्ये त्याचे 'स्वत्व' नाही तर ते तो का ग्रहण करील? म्हणून तर याच्या इंद्रियरहित, निर्देह/अशरीरी, मुक्त स्वरूपाला जाणून घेऊन आ. कुंदकुंदांनी 'समयसार'मध्ये म्हटले आहे- ''हा एकत्वनिश्चयगत समय (आत्मा) लोकांमध्ये सर्वत्र सुंदर आहे. म्हणूनच, तो जेव्हा बंधनात अडकतो; तेव्हा तो आपले सहजसौंदर्य हरवून बसतो.[१] आत्म्याच्या ज्ञान-दर्शनरूप स्वलक्षणाचे वर्णन आगमशास्त्रात आचार्यांनी ठायीठायी केलेले आहे. कथन करताना वृत्तांची रचना बदलली आहे; तत्त्वार्थाची एकरूपता मात्र कुठेच बदलली नाही. त्यांनी वारंवार याच अर्थाचे मंथन केले आहे की- ''ज्ञानदर्शन माझ्या आत्म्याचे सद्भूत लक्षण आहे. हे शाश्वत आहे, शेष संयोगी भाव हा विभाव आहे, बहिर्भाव आहे[२].''

आत्म्याच्या व्यतिरिक्त संयोगाने उत्पन्न होणारे बहिर्भाव हे लाकडात स्थित असणाऱ्या जंतूप्रमाणे आहेत. कमंडलू आणि पाणी यांच्यात आधार आदेय संबंध असला तरी कमळाच्या पानावर पडणाऱ्या दवबिंदूप्रमाणे ते अन्योन्य-भिन्न आहेत. उडीद वेगळे

---

१. 'एकत्तणिच्छयगओ समओ सव्यत्थ सुंदरो लोए।
बंधकहा एयत्ते तेण विसंवादिणी होई।' - समयसार, ३

२. 'एको मे शाश्वतश्चात्मा ज्ञानदर्शनलक्षणः।
शेषा बहिर्भवा भावाःसर्वे संयोगलक्षणाः।। - सामायिकपाठ, १२

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

व त्याची टरफले वेगळी, हे उदाहरण भेदविज्ञानाचे समर्थन करते. जोपर्यंत व्रत आदी शुद्ध नाहीत; तोपर्यंत या भेदविज्ञानाची खऱ्या अर्थाने वा पूर्णत्वाने प्राप्ती होत नाही. गव्हाची पोळी जेव्हा विस्तवावर शेकली जाते; तेव्हा तिचा वरचा, खालचा असे दोन्ही भाग स्पष्ट दिसू लागतात. त्यालाच आपण पोळी 'फुगली' असे म्हणतो. परंतु, विस्तवावर भाजण्यापूर्वी त्या दोन पापुद्र्यांचे अस्तित्व कळून येत नाही. त्या शेकलेल्या पोळीला विस्तवावरून आपण मग खाली उतरवतो. कारण, ते सिद्धान्न बनलेले असते. त्याचप्रमाणे, सुरुवातीला व्रत वगैरे, पिंछी-कमंडलू-शास्त्र इत्यादी आदेय आहेत आणि सिद्धावस्थेमध्ये मात्र आपला आत्माच उपादेय आहे. गीतेमध्ये हाच आशय थोडाफार शब्दफरक करून निरूपण करताना म्हटले आहे- 'जेव्हा मुनी योगाभ्यासी असेल तेव्हा त्याने स्वचारित्र्यादी कर्तव्यांचे पालन करावे. परंतु, तो जर गंतव्यापर्यंत पोहोचला तर त्यापासून त्याने विरक्त व्हावे, शांतवृत्ती धारण करावी.''*

वरील चर्चेचा आशय हाच आहे की, राजमार्गाला सोडून देण्यायोग्य समजून जे त्यागाच्या मार्गावरून चालत आहेत, त्यांनी पिंछी-कमंडलू धारण करणे योग्य आहे. कारण, ती जैन धर्माच्या मार्गाला लागलेल्यांची मुद्रा आहे. शौच-संयमासाठी निश्चित केलेली शास्त्रसंमत अशी उपकरणे आहेत. अपरिग्रहाची ती सूचक चिन्हे आहेत. कुठलीही अडचण-बाधा येऊ न देता विहार करता यावा, यासाठी असलेली ती सुविधासहायक उपकरणे आहेत. शरीराच्या ग्राह्य मानल्या गेलेल्या अपेक्षा पूर्ण करणारी ती कमीतकमी साधने आहेत. पवित्र आहेत. ती याचनादोषापासून मुक्त आहेत आणि मुनिवृत्तीची प्रत्येक क्षणाला आठवण करून देणारी आहेत. पण, आत्म्यापेक्षा त्यांना जास्त महत्त्व नाहीच. आत्म्याचे ते सर्वस्व नाहीच.

आत्म्याचे सर्वस्व तर आत्माच आहे. म्हणून, साधनेत तल्लीन राहून हळूहळू सगळ्या परभावांपासून, परद्रव्यांपासून, नयवादांपासून मुक्त होण्याचा प्रयत्न करीत राहिले पाहिजे. 'समयसारकलश' या आपल्या ग्रंथात आचार्य अमृतचंद्रांनी या सगळ्या बाह्य वादकोलाहलाचा विरोध करताना मार्मिकपणे म्हटले आहे- ''हे जीवात्मन्! काय करतो आहेस तू? प्रवचन, शास्त्रपाठ, पिंछी-कमंडलूचा सांभाळ? फारच झाले तर 'कालें पाठः स्तवो ध्यानम्' (योग्य समयी स्वाध्याय, स्तवन, ध्यान?) हे केल्यावर तू स्वतःला

---

* आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्म कारणमुच्यते।
योगारूढस्य तस्यैव शमः कारणमुच्यते।। - गीता

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कृतकृत्य समजतोस. अरे, एवढ्या कमी शुल्कात आत्मोपलब्धी होऊ शकेल काय? ही तर अत्यल्प धार्मिक क्रिया आहे. माझा सल्ला ऐक. एक षण्मासिक योग धारण कर. सोडून दे हे सगळे वाद, व्याख्याने! काय आहे हे शेवटी? केवळ एक शब्दपरंपरा! एक कोलाहल! कोलाहलात लोक आत्मस्थ नाही होऊ शकत. माघनंदींचे नाव ऐकलेस? त्यांनी ध्यानसूत्रांची रचना केली आहे. ही सूत्रे आत्मस्थ/अंतर्मुख होण्यास मदत करतात. परंतु, त्यासाठी प्रशस्त, प्रशांत एकान्ताची गरज आहे. 'यात्रा करतेवेळी दोघे जण असणे चांगले; पण चिंतनासाठी मात्र एकच चांगला' ही एक अनुभव आधारित म्हण आहे. म्हणून, सर्वांपासून वेगळा हो आणि ध्यानमग्न हो! चमत्कार होईल... आत्मोपलब्धी होईल. यापेक्षा अधिक काय हवे? आपल्या स्वरूपबोधासाठी त्वरता, तत्परता आणि विकलतेची अपेक्षा असते. त्यांची परिणती आत्मसाक्षात्कारात होईल.''*

आचार्यांचा हा उपदेश नितांत आचरणात आणण्यासारखा-हृदयग्राही आहे. एवढेच नव्हे तर परद्रव्याला पराङ्मुख होऊन स्वात्म्यामध्ये येण्यासाठी दिलेले ते उत्कृष्ट-मधुर असे निमंत्रणपत्रच आहे. जर आयुष्य प्रवचनांमध्ये, कोलाहलामध्येच गुंतले-रमले तर आत्मोपलब्धीसाठी दुसरा उपाय तरी कोणता? महाव्रती तपस्व्यांचे परमलक्ष्य तर आत्मसाक्षात्कार आणि केवलज्ञानाची प्राप्ती हेच आहे. त्यासाठी पुरेसा वेळ देऊन प्रयत्नशील असणे योग्य आहे. 'अह्ना प्रत्यङ् व्रात्यो रात्र्या प्राक्'... अथर्ववेदातील या अमृतओळी हेच सांगतात की, व्रतशील तोच आहे जो रात्रीच्या आगमनाआधी दिवसेंदिवस आत्माभिमुख होत जातो. कारण, दिवस जीवनाचा पर्याय आहे तर रात्र मृत्यूचा! विजेता त्यालाच म्हणतात जो जिवंतपणी आपल्या मृत्यूवर विजय मिळवितो. स्वतःच्या इच्छेने मोक्षाच्या मार्गावर चालत राहून जो जीवनाची इतिश्री करतो, तोच भाग्यवान पुरुष असतो. तो असे म्हणून शकतो- ''आपुले मरण पाहिले म्यां डोळा।''

हा अनुपम आनंदाचा विषय आहे. ही दुष्कर तपश्चर्येतून मिळणारी समाधी माझे श्रेष्ठ व अंतिम मरण आहे. आता ना पुन्हा मृत्यू होणार ना जन्म! 'नास्ति जन्म कुतो मृत्युर्नास्ति मृत्युः कुतो भयम्'- जन्म होणार नाही तर मृत्यू कसा आणि मृत्यूच होणार

---

* विरम किमपरेणाकार्यकोलाहलेन
स्वयमपि निभृतः सन् पश्य षण्मासमेकम्।
हृदयसरसि पुंसः पुद्गलाद् भिन्नधाम्नो
ननु किमनुपलब्धिर्भाति किं चोपलब्धिः।। - समयसारकलश - ३४

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नसेल तर भय कुठले? याची खरी प्राप्ती इच्छित असाल तर एकान्तात साधना करा. तीर्थंकर, सिद्ध, केवली यांनी जन्म-मृत्यूच्या चक्रातून सुटका करून घेतली; हे खूप वाचले, खूप ऐकले आणि इतरांना ऐकवलेसुद्धा! पण, या अनन्यसाधारण सत्याचा स्वतःला साक्षात्कार घडू द्या. त्याच सत्याची तुम्हालाही प्रचीती येईल; ज्या सत्याच्या अमृताचा स्वाद ध्रुव, अचल, अनुपम-गतिप्राप्त सिद्धांनी घेतला आहे.

कारण, या विषयाचे आगमशास्त्रात वर्णन केले असले तरी त्याची प्रत्यक्षप्राप्ती करून घेणे, हे शब्दांच्या पलीकडचे आहे. म्हणून तर त्यास 'स्वयमपि निभृत सन्'! म्हटलेले आहे. ही सिद्धी सत्य असूनही प्रत्येकाला येणारा तिचा अनुभव भिन्न आहे. एखाद्या तीर्थंकराच्या सिद्धीतून कोण्या दुसऱ्यासाठी विनंती करूनसुद्धा अनुदान मिळू शकत नाही. इथे तर स्वपुरुषार्थच बलवान पाहिजे. या मार्गोपदेशरूपाला कृतीत उतरवण्यासाठी प्रत्यक्ष स्वाध्यायच उपयुक्त आहे. त्यासाठी खालील चिंतन-निष्कर्ष उपयुक्त ठरेल.

राग आणि त्याग हे दोन मार्ग आहेत. रागाचा मार्ग बंधकारक आहे; तर त्यागाचा मार्ग मुक्ती देणारा आहे. त्यास इंद्रियवृत्ती आणि आत्मवृत्ती (अनिन्द्रियवृत्ती) असेही म्हणता येईल. पराङ्मुखता हा इंद्रियांचा स्वभाव आहे; तर आत्म्याचा स्वभाव प्रत्यङ्मुखता म्हणजेच 'स्व'कडे पाहण्याचा आहे. सर्वांचा हाच स्वभाव असतो की, ते आपापल्या-सजातीयांच्या संपन्नतेने प्रसन्न होतात. संगीताचे स्वर कानांना प्रसन्न करतात, सौंदर्य/रूप डोळ्यांना आल्हादित करते. सुगंधाने घ्राणेंद्रिय प्रफुल्लित होते. या इंद्रियांचे आवडते विषय म्हणजे त्याची 'तन्मात्रा' होत. हे सगळे त्यांच्यात्यांच्या पुद्गल प्रदेशातून प्राप्त होतात. कारण, इंद्रियांचे विषय हे ठरावीक काळापुरते रमणीय आहेत; म्हणून अधिकांश लोक इंद्रियस्वादापर्यंतच पोहोचतात, त्याच्यावर ते येऊ शकत नाहीत.

हजारो माणसांमधून कोणी एखादाच धैर्यवान परुष इंद्रियांकडे दुर्लक्ष करून आत्मार्थी होतो. तोच रागाचा त्याग करू शकतो आणि त्यागभावना स्वीकारतो. अशीच व्यक्ती आत्म्याच्या साक्षात्काराची धनी होते. कठोपनिषदात असे वर्णन आहे की- "इंद्रिये बहिर्मुख असल्याने ती बाहेरबाहेरचेच बघतात. परंतु, एखादा धैर्यवान पुरुष अमृतत्वाची इच्छा बाळगतो आणि अंतर्मुख-स्वाभिमुख होऊन जातो."[१] शेवटी, दुर्लभ उपलब्धीचे

---

१. परांचि खानि व्यतृणत् स्वयम्भूस्तस्मात् पराङ् पश्यति नान्तरात्मन्।
कश्चिद्धीरः प्रत्यक्षात्मानमैक्षदावृत्तचक्षुरमृतत्वमिच्छन् कठोपानिषद।। २/१

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्रोत जर अमृतमय असतील तर व्रत, तप, संयम, आचार इत्यादी प्रायश्चित्त साधनांचा अवलंबही ते करू इच्छितात. उंच फांदीवर लागलेली फळे ज्याचे हात लांब आहेत, त्यालाच मिळतात; वामन (ठेंगू) मूर्तीला नाही. स्वतः अंतर्मुख होणे किंवा आत्मलक्ष्यी होण्याचा आत्यंतिक आग्रह हा आत्मोपलब्धीमधले स्वपुरुषार्थाच्या घोषणेचे उद्गान आहे. आचार्य अमृतचंद्र, भर्तृहरी, पद्मनंदी आणि अन्य आचार्य महानुभाव आत्मोपलब्धीच्या प्राप्तीसाठी स्वानुभूती हेच एकमेव प्रमाण मानत आले आहेत.[२] द्रव्यश्रुत हे काठीच्या/यष्टीच्या आधारासारखे आहे. त्याच्या मदतीने भावश्रुताचे अधिग्रहण करता येते.

'ब्रह्मसिद्धांत समुच्चय'मध्ये हरिभद्रसुरींनी जैन दीक्षेला 'स्वसमयदीक्षा' असे म्हटले आहे. 'समयाख्यात्र दीक्षा'- आत्म्याच्या स्थितीला सामायिक व सामायिकाला मोक्षाचे अंग मानलेले आहे. 'सामायिकं च मोक्षांगम्' - आत्म्याच्या आपल्या गुणाचा, ज्ञानाचा अभीक्ष्ण उपयोग स्वाध्यायमुखाने कदाचित होतो. म्हणून, स्वाध्यायहेतूच्या प्रेरणेने 'पिंछी-कमंडलू'कडे पाहणे आवश्यक आहे. त्याचबरोबर, 'न निमित्तेद्वेषिणां क्षेमः' आणि 'शेषाः बहिर्भवा भावाः'च्या प्रसंगोचित अर्थांचा समन्वय स्वतःच्या अंतरंग भाभवाने लावला पाहिजे. । किमतिपल्लवितेन । 'आत्मार्थे पृथिवीं त्यजेत्।

- विद्यानंद मुनी

मुनिदीक्षा : २५ जुलै १९६३
नवी दिल्ली

❖❖❖

२. 'नमः समयसारय स्वानुभूत्या चकासते' - अमृतचंद्र
'स्वानुभूत्या भवेद् गम्यम्' - पद्मनंदी
'स्वानुभूत्येक मानाय' - भर्तृहरि

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मनोगत

फेब्रुवारी २०१० मध्ये सोलापूर येथे महाराष्ट्र जैन इतिहास परिषदेचे सहावे अधिवेशन यशस्वीपणे पार पडले. परिषदेचे संस्थापक व त्यासाठी आत्मीयतेने काम करणारे श्री. श्रेणिक अन्नदाते यांच्याकडे या चळवळीचे श्रेय सर्वस्वीपणे जाते. या अधिवेशनाचा बोलबाला व वेगळेपण आचार्यश्री विद्यानंदजीपर्यंत पोहोचले. त्यांनी आम्हा संयोजकांना म्हणजे - श्री. चंद्रमोहन शहा, श्री. संतोष भंडारी, श्री. तिलोकचंद निमाणी, डॉ. पंडित महावीर शास्त्री, श्री. दीपक आहेरकर, सौ. सुरेखा शहा व आमचे मार्गदर्शक आदरणीय श्री. श्रेणिक अन्नदाते यांना दिल्लीस येण्याचे व चर्चा करण्याचे आमंत्रण दिले. आम्ही आचार्यश्रींना भेटलो-वृत्तान्त सादर केला व त्यांचा बहुमूल्य आशीर्वाद व प्रेरणा मिळाली.

आचार्यश्रींचे जीवन व व्यक्तिमत्त्व सर्वार्थाने या जैनजगतात अत्यंत भव्यपणे व्यापून राहिलेले आहे. ते अत्यंत अभ्यासू असून जैन इतिहास, जैन आगम, जैन साहित्य, अन्य धर्मांचा सर्वांगीण अभ्यास महाराजांनी जीवनभर केला आहे. आज जैन साधूजगतांत एवढे उत्तुंग स्थान कोणीही ग्रहण करू शकणार नाही. ते खऱ्या अर्थाने 'सिद्धान्त चक्रवर्ती' आहेत. जैनांचे ते वयोवृद्ध व ज्येष्ठ-श्रेष्ठ आचार्य आहेत.

या भेटीत माझ्या वाचनात सिद्धान्त चक्रवर्ती श्वेतपिच्छाचार्य मुनी विद्यानंद महाराजांच्या प्रवचनांचा ५३ वर्षांपूर्वीचा ग्रंथ पिंछी-कमंडलू वाचनात आला. आचार्यश्री यांनी सर्वच विषय आपल्या अभ्यासपूर्ण दृष्टीने हाताळले आहेत. सौ. उषा जैनेंद्र तुपकर यांनी हिंदीमधून मराठीत भावपूर्ण अनुवाद करून जैन श्रावकश्राविकांना याचा आनंद देऊ केला आहे. त्यांचे अत्यंत ऋणी आहोत. या निमित्ताने मनात असलेले हे जैन साहित्यसेवेचे कार्य पूर्ण होत असल्याचा आनंद द्विगुणित होत आहे. अगणित दातारांचे आम्ही ऋणी आहोत.

चंद्रमोहन र. शहा - सोलापूर
भ्रमणध्वनी : ९४२३३३५३००

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मराठी अनुवादाचे प्रकाशकीय

धर्म-संस्कृती-तत्त्वज्ञानाने आणि जीवनस्पर्शी चिंतनाने परिपूर्ण अशा पुस्तकाचे अर्धशतकभर पुनर्मुद्रण होत राहणे, हे जसे त्या पुस्तकाची लोकप्रियता सिद्ध करते, तसेच त्याची मौलिकताही उजागर करते.

परमपूज्य आचार्यश्री विद्यानंद महाराज (आता श्वेतपिच्छाचार्य) यांचे 'पिंछी - कमंडलू' हे हिंदी भाषेतील पुस्तक गेल्या ५० वर्षांत पाच वेळा पुनर्मुद्रित झाले. मूळ हिंदी पुस्तकातील काही लेखांचा मराठी अनुवाद एका छोट्या पुस्तकाच्या स्वरूपात सांगली-कोल्हापूर भागात प्रसिद्ध झाल्याचे आढळून आले होते. आचार्यश्रींचे काही लेख 'तीर्थंकर'मधूनही प्रकाशित झाले होते. आचार्यश्री विद्यानंद महाराजांच्या सखोल-गहन-मूलगामी-प्रेरक आणि विचारप्रवर्तक लेखनाचा परिचय महाराष्ट्राला आणि मराठी भाषक जैन समाजाला करून देण्याचे श्रेय निश्चितपणे 'तीर्थंकर' मासिकास जाते. त्यांच्या धर्मप्रभावनेच्या अनेकविध योजनापूर्वक उपक्रमांना 'तीर्थंकर'ने प्रथम प्रसिद्धी दिली आहे.

...आणि आता योगायोग असा की, त्यांच्या या बहुमोल पुस्तकाचा मराठी अनुवाद - जो धर्मानुरागी सौ. उषाताई जैनेंद्रकुमार तुपकर, सोलापूर यांनी केला आहे, त्याचे प्रकाशन सुमेरू प्रकाशनतर्फे होत आहे. याचे 'अधिकतर' श्रेय श्री. चंद्रमोहन रतनचंद शहा यांना आणि 'अधिकतम' श्रेय या पुस्तकासाठी विपुल प्रमाणात उत्स्फूर्तपणे योगदान देणाऱ्या स्वाध्याय आणि साहित्यप्रेमी श्रावकवर्गाकडे जाते.

तसे 'पिंछी-कमंडलू' हे असामान्य चिंतन-विचारांचे भांडार आहे. जीवनाचा अनेक अंगांनी विचार करण्याची प्रेरणा या संग्रहातून मिळते. तत्त्वानुसार आचरणाला गतिमानता येते. मन-विचारांचे संतुलन साधण्यात वाचक प्रयत्नशील बनतो. श्रावकजीवन आणि मुनिजीवन या दोन्हींसाठी त्यात दिग्दर्शन आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अनुक्रमणिकेतील लेखांच्या शीर्षकांवरून नजर टाकली तर या पुस्तकाची मानवी जीवन व्यापणारी असीम कक्षा लक्षात येते आणि वाचक झपाटल्यासारखा विचारमग्न होतो, होऊन जातो. हा अनुभव एकदा घेण्यासारखा आहे.

...असेच एकदा श्री. चंद्रमोहन रतनचंद शहा (मूळ आळंद, जि. गुलबर्गा, नंतर मुंबई आणि आता सोलापूर) यांच्या हाती दिल्लीत - कुंदकुंदभारतीत गेल्यावर या पुस्तकाची एक प्रत हातात पडली आणि त्यांनी हे पुस्तक दोन-तीन वेळा झपाटल्यासारखे वाचून काढले. एका अभूतपूर्व, सात्त्विक आनंदाची अनुभूती त्यांनाही आली.

मग, त्यांच्या मनात विचार आला की, हे जीवन उन्नत करणारे विचारधन, ही उच्चतम साहित्यकृती मराठीतून महाराष्ट्रातील जैन समाजात सर्वदूर पोहोचली पाहिजे. निरंतरच्या चिंतनातून त्यांचा विचार पक्का झाला. मग, सुरू झाला पुस्तकाच्या प्रतीचा शोध! ती मिळवण्यासाठी दूरध्वनी, भ्रमणध्वनींचा खणखणाट होऊ लागला. सर्व शक्यतांची चाचपणी झाली... आणि शेवटी इंदूरचे धर्मानुरागी आणि प.पू. विद्यानंद महाराजांचे निस्सीम, निष्ठावान भक्त धर्मानुरागी श्री. गुलाबचंदजी बाकलीवाल यांच्या संग्रही मिळाली. त्यांनी ती अगत्यपूर्वक डोंबिवलीला पाठवली. अनुवादकाचा प्रश्न नव्हताच. 'जैनबोधका'तून सातत्याने विद्यानंद महाराजांचे लेख अनुवाद करणाऱ्या सौ. उषाताई तुपकर यांनी ते काम स्वीकारले. श्री. जैनेंद्रकुमार तुपकरांचा त्यांना सहयोग होताच. दोघांचाही या बृहत्कार्यात महत्त्वाचा सहभाग आहे; म्हणून त्यांचे ऋण मान्य केलेच पाहिजेत.

जैन धर्म-तत्त्वज्ञानाच्या विविध ग्रंथांचे विपुल प्रमाणात संदर्भ हे या पुस्तकाचे वैशिष्ट्य तर आहेच... पण इतके की, वाचताना दमछाक व्हावी. म्हणूनच, आचार्यश्रींची ही साहित्यकृती केवळ वाचनीय नाही तर अभ्यासनीय आहे. अनेक मराठी भाषक परिवारातून आता मौल्यवान ठेवा पोहोचेल आणि किमान विद्यमान दोन पिढ्या आणि भावी पिढ्यांना स्फूर्ती देत राहील. म्हणूनच हे कार्य हाती घेऊन अक्षरश: झपाटल्यासारखे करणारे-पूर्ण करणारे श्री. चंद्रमोहन शहा आणि त्यांचे सहयोगी यांना अभिवादन केले पाहिजे.

या पुस्तकाचे परिशिष्टही वैशिष्ट्यपूर्ण आहे. त्याचेही दोन भाग करता येतील. एक लेखांचा, दुसरा छायाचित्रांचा!

आपल्या जीवन-चिंतनातील मौक्तिके मुक्तपणे भारतातील जैन समाजावर उधळणाऱ्या आचार्यश्रींचा अल्पसा परिचय यात असावा असा विचार झाला आणि

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अलीकडेच प्रसिद्ध झालेले आचार्यांसंबंधीचे दोन लेख यात समाविष्ट करण्यात आले आहेत. एक जयसिंगपूरचे डॉ. महावीर अक्कोळे यांचा आणि दुसरा श्रेणिक अन्नदाते यांचा! हे दोन्ही लेख अलीकडेच प्रकाशित झालेल्या 'जैन ऐतिहासिक भाग-३' मध्ये समाविष्ट असून आचार्यांच्या विविधांगी कार्यांचा अल्पसा परिचय करून देणारे आहेत.

दिल्लीतील भगवान महावीरांची भव्य मूर्ती हटविण्याचा स्वतंत्र भारत देशाच्या पंतप्रधानांचा हुकूम विद्यानंद महाराजांनी कसा 'विफल' केला, याची त्रोटक हकिगत परिशिष्टातील लेखात आहे. लेखात म्हटल्याप्रमाणे ते एक प्रकारे 'थंडे संगरच' आहेत. अतिप्राचीन परंपरा असलेला, धर्म-तत्त्वज्ञान-संस्कृतीही उच्चतम असणारा जैन समाज, शांततापूर्ण सहजीवन, शैक्षणिक क्षेत्र, अहिंसामय आचरण, समृद्ध आर्थिक व्यवहारात सहभाग इत्यादीइत्यादींमधून देशाला योगदान देणाऱ्या समाजाविरुद्ध देशाचे पंतप्रधान असे त्या 'संगराचे' स्वरूप होते. यात एका आयएएस अधिकाऱ्याला नोकरी गमवावी लागली. पण, आचार्य विद्यानंद महाराजांनी नितांत दूरदर्शीपणाने, थंड मनाने हे प्रकरण हाताळले आणि आपल्या राजकारणाच्या अभ्यासाची आणि राजकीय कौशल्याची उचित ओळख करून दिली. आम्ही स्वत: या प्रकरणाचे एक साक्षीदार आहोत.

या जैन धर्मावरील अरिष्टाला दूर करण्याच्या आचार्यांच्या या 'कार्यसिद्धी'ची नोंद करताना एका गोष्टीची दखल इथे घेणे क्रमप्राप्त ठरते. भारतभर, किमान महाराष्ट्रात दिगंबर जैन मुनींचा एक 'कल्ट' निर्माण होतोय की काय! अशी शंका निर्माण होण्यासारखी परिस्थिती आढळते आहे. काहीकाही ठिकाणांहून यासंदर्भात तक्रारी येऊ लागल्या आहेत. परंपराभंग तसेच काही उलटसुलट, उलथापालथ आणि इतिहास पुसण्याचा जाणीवपूर्वक प्रयत्न होतोय की काय? असे अनेक शंकास्पद प्रयत्न घडत असल्याचे कळते. उदाहरणार्थ:

एका दिगंबर जैन मुनींनी लिहिलेल्या डबल क्राउन साइजच्या २५०-३०० पानांच्या पुस्तकात 'आजचे प्रमुख दिगंबर जैन मुनी' या शीर्षकाखाली अर्धा पान मजकूर आहे. त्यात, गेल्या १०० वर्षांत जैन समाजाला सर्वांगांनी 'तारक' ठरलेल्या तीन परमपूज्य मुनिवर्यांचा उल्लेख हेतुपूर्वक टाळलेला दिसतो. त्यात :

❋ गुरुकुल परंपरेचे पुनरुज्जीवन करून महाराष्ट्र-कर्नाटकात गेल्या अर्धशतकाहून अधिक काळ हजारो विद्यार्थ्यांना सुशिक्षित, सुसंस्कृत, जैन संस्कृतीचे संरक्षक आणि उत्तम नागरिक बनविणारे आणि त्यासाठी आत्मसाधनेबरोबरच आपले संपूर्ण जीवन समर्पित करणारे प.पू. गुरुदेव स्व. समंतभद्र महाराज!

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

⁕ भारतभरच्या अनेक सिद्ध क्षेत्रांचे-अतिशय क्षेत्रांचे नीट संरक्षण-संवर्धन व्हावे म्हणून देशभर १२००० किलोमिटरचा विहार करून, समाजाला प्रेरणा देऊन एक कोटीवर रुपयांचा अभूतपूर्व निधी 'भारतवर्षीय दिगंबर जैन तीर्थक्षेत्र कमेटीत उपलब्ध करून देणारे **प.पू. स्व. आर्यनंदी महाराज** आणि

⁕ दिल्लीत-भारताच्या राजधानीत विहार करून आपले पूर्ण आयुष्य स्वकल्याणाबरोबरच, जैन धर्माची विश्वस्तरावर प्रभावना करणारे, जैन संस्कृतीला जागतिक पातळीवर मान्यता मिळवून देणारे आणि भारतभरच्या जैन समाजाभोवती राजकीय-शासकीयस्तरावर संरक्षणाचा भक्कम तट उभा करणारे **प.पू. श्वेतपिच्छाचार्य विद्यानंद महाराज!**

जैन समाजाचा इतिहास या तीन मुनिवर्यांच्या उल्लेखाशिवाय अपूर्णच आहे. त्यांचा उल्लेख उपरोल्लिखित पुस्तकात नसावा, ही खेदाची बाब आहे. दिगंबर मुनींच्या विविध मूलभूत वैशिष्ट्यांपैकी समताभाव किंवा समत्व हे महत्त्वपूर्ण आहे. इथे तर, जाणीवपूर्वक 'विषमता' जोपासली जात आहे. म्हणूनच, 'दक्ष' राहण्याची आवश्यकता भासते. कारण, हा 'कल्ट' ठिकठिकाणी कार्यरत असताना आढळतो आहे.

परिशिष्टाचा दुसरा भाग छायाचित्रांचा! या पुस्तकात ६४ पृष्ठे छायाचित्रांची आहेत आणि योगायोगाने ते आचार्यश्री विद्यानंद महाराजांचे छायाचित्रयुक्त चरित्र आणि कार्यचरित्रही झाले आहे. ही ऐतिहासिक छायाचित्रे मिळविण्यासाठी चंद्रमोहन यांनी भरपूर श्रम घेतले आणि त्यांना 'जैनबोधक'चे तरुण संपादक प्रा. महावीर शास्त्री आणि श्री. अनिल तांदळे यांनी तसेच समाजानेही मनापासून सहयोग दिला, त्याचीही इथे नोंद करणे जरुरीचे आहे.

'पिंछी-कमंडलू'चे जेव्हा मराठीमध्ये भाषांतर करायचे ठरले; तेव्हा सौ. उषाताई जैनेंद्र तुपकर हे नाव प्रामुख्याने पुढे आले. तशी सौ. उषाताईंची ओळख होतीच. परंतु, या एवढ्या विनयशील-तत्पर-सेवाभावी व विविध भाषांतरांवर प्रभुत्व असलेल्या विदुषी हे या निमित्ताने अनुभवता आले. भाषांतर करताना त्यांना हृदयविकाराचा त्रास झाला, बायपास करावी लागली. तीन-चार महिन्यांच्या विश्रांतीनंतर त्यांनी मुनिभक्तीने प्रेरित होऊन-सेवाभावाने हे असिधाराव्रत पूर्ण केले. त्यांचे कौतुक करण्यास आम्हा संयोजकांजवळ शब्द अपुरेच आहेत. त्यांना अशी सेवा करण्यास दीर्घायुष्य लाभो, हे शुभभाव आम्ही व्यक्त करतो.

आपल्या कुमारवयात प.पू. आचार्य पायसागर महाराजांचे कमंडलू हातात घेऊन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कर्नाटकातील त्यांच्या विहारात त्यांच्याबरोबर बराच काळ चालणारा हा 'चंद्रमोहन' नामक 'युवक' एका (खरे तर तीन) साहित्यकृतीचा संयोजक होतो, ही दिगंबर जैन मुनींच्या सान्निध्याची म्हटले तर पुण्यमय फलश्रुती म्हणावी लागेल. आचार्य पायसागर महाराज या युवकाला सेक्रेटरी म्हणत... त्याचा गौरवही करीत.

याच पुस्तकाच्या पाचव्या हिंदी आवृत्तीला गोरेगाव-मुंबईच्या धर्मानुरागी साकेरलाल बुलाकीदास शहा परिवाराने अर्थसहयोग दिला होता. त्या परिवारानेच महाराजांसंबंधीचा 'णमोत्थु' नामक ग्रंथ प्रकाशित केला होता.

पुनश्च एकदा हा मौलिक, दूरगामी मार्गदर्शक, मानस उन्नत करणारा साहित्य ठेवा ज्या अनेकानेक 'अर्थसहयोगींच्या' वात्सल्यभावाने साकार झाला; त्यांचा ऋणनिर्देश मन:पूर्वक करीत आहोत. यासाठी जी प्रकाशन समिती गठित करण्यात आली होती; त्यातील सर्व सदस्यांनाही धन्यवाद! **'तुम्ही जैन धर्म प्रभावना करीत राहा! समाज तुमच्या पाठीशी खंबीरपणे उभा आहे!'** ही आगळी अनुभूती, हा परमविश्वासही यानिमित्ताने प्रकाशन समितीला अनुभवास आला.

ही श्रमण जैन संस्कृती अशीच प्रवाहित होत राहून अहिंसेचा आविष्कार विश्वभर करीत राहो, या शुभभावासहित विराम!

- श्रेणिक अन्नदाते

संचालक : सुमेरू प्रकाशन, डोंबिवली

भ्रमणध्वनी : ९८६७५०८८१४

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आनंद... अनुवादाच्या आविष्काराचा!

खरोखर, आयुष्यात काही चांगल्या गोष्टी योगायोगानेच घडतात.

जैन राजकवी द.भि. रणदिवे यांच्या आशीर्वादानं लेखनाचा वारसा लाभला. अनुवादाचीही गोडी लागली. 'जैनबोधक'साठी आदरणीय सौ. शरयूताई दफ्तरी यांनी १९९७ मध्ये उत्कृष्ट, दर्जेदार हिंदी व इंग्लिश लेखांचे मराठी अनुवाद करण्याचे काम सोपवले. अत्यंत निष्ठेने ते काम केले. त्यानंतर, मग सहासात पुस्तकांचे व हिंदी कवी सूर्यभानजी गुप्त यांच्या कवितांचाही अनुवाद केला. पसंतीची, प्रशंसेची पत्रंही मिळत गेली.

त्यानंतर अनुवादाचा एक सुंदर योग आला. सामाजिक व धार्मिक कार्यास वाहून घेतलेल्या श्री. चंद्रमोहनभाई शहा यांनी मुनिश्रेष्ठ आचार्य विद्यानंदजी यांच्या 'पिंछी कमंडलू' या हिंदी ग्रंथाचा मराठी अनुवाद करण्यासाठी विचारले. मुळात महाराजांचे लेखन म्हणजे शंभरनंबरी सोनं! त्यांचं प्रत्येक लेखन, ग्रंथ सखोल अभ्यासाचं प्रतिबिंब असतं. नवे विचार, नवी दिशा देणारं असतं. 'पिंछी कमंडलू'चा अनुवाद करताना ज्ञानात भर तर पडलीच; परंतु आचार्य महाराजांच्या विद्वत्तेचा आश्चर्यकारक प्रत्यय दर लेखात येत गेला. सामाजिक, धार्मिक, साहित्यिक इत्यादी विषयांवरील लेखांना महाराजांच्या लेखणीचा दिव्य स्पर्श झालेला जाणवला.

आदरणीय महाराजांचे विचार हिंदीतून मराठीत संपूर्ण योग्यतेनेच उतरायला हवेत, ही जाणीव शब्दशब्दागणिक होती. कारण, अनुवाद म्हणजे एका पात्रातलं पाणी दुसऱ्या पात्रात ओतणं नव्हे. एका अत्तराच्या कुपीतून दुसऱ्या अत्तराच्या कुपीत अत्तर भरण्यासारखं आहे ते! सुगंध उडून जायला नको. हिंदी भाषा ही अत्यंत दर्जेदार, धार्मिक पारिभाषिक शब्दही विपुल आहेत. त्यामुळं अभ्यास करून, पूर्ण आशय जाणून घेऊनच अनुवाद

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

करण्याचा प्रयत्न केलाय. तो व्यवस्थित झाला किंवा नाही, हे वाचकच ठरवतील.

या कामात काही जाणकार व्यक्तींचे, 'सुमेरू प्रकाशन'चे श्री. श्रेणिक अन्नदाते यांचे व माझे पती श्री. जैनेंद्र तुपकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे.

परमवंदनीय मुनिवर्य आचार्य श्री विद्यानंद महाराजांच्या या ग्रंथाचा अनुवाद मला करायला मिळाला, हे मी माझे महद्‌भाग्यच समजते.

जयजिनेंद्र!

सौ. उषा जैनेंद्रकुमार तुपकर, सोलापूर
भ्रमणध्वनि : ९८९०८४६०२१ / ०२१७-२३२८८७४

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अनुक्रमणिका

प्रकरण	पृष्ठ	प्रकरण	पृष्ठ
आशीर्वचन	३	१० लेखनकला	१५४
प्रकाशकीय	६	११ वक्तृत्वकला	१६३
प्रस्तुत निबंध	९	१२ जैन धर्मातील स्त्रीचे स्थान	१९३
निवेदन	११	१३ निर्ग्रंथ मुनी	२०६
अंतरंग	१३	१४ पिंछी-कमंडलू	२२३
मनोगत	२०	१५ दीक्षा-ग्रहण-विधी	२३६
मराठी आवृत्ती... प्रकाशकीय	२१	१६ वर्षायोग	२४७
आनंद अनुवादाच्या	२६	१७ सल्लेखना	२५७
१ भक्ती	२९	१८ परिशिष्ट	२६९
२ नरजन्माची सार्थकता	४१	१९ विद्यानंद वाणी	२७०
३ गुरुसंस्थेचे महत्त्व	५८	२० भावांजली	२७८
४ चरित्र्याशिवाय मुक्ती नाही	७४	२१ मोरपंख प्रतिबंध विधेयक...	२८३
५ धर्म आणि पंथ	८७	२२ नारायण श्रीकृष्ण और मयूरपिच्छ	२८६
६ मोह आणि मोक्ष	१०१	२३ दि. जैन समाज की कृतज्ञता	२८८
७ मानसशास्त्रीय-मीमांस	११९	२४ श्वेतपिच्छाचार्य विद्यानंद...	२८९
८ साहित्य व स्वाध्याय	१३४	२५ प.पू. आचार्यश्री विद्यानंदजी	२९४
९ शब्द आणि भाषा	१४४	२६ अर्थसहयोगींची नावे	२९८

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

भक्ती

भक्तीचा अर्थ आहे तन्मयता! आपल्या उपास्याच्या स्वरूपाशी एकरूप होणे, ही भक्तीची सिद्ध उपलब्धी आहे. उपास्याच्या स्वरूपाशिवाय आणि त्या उपास्याच्या गुणाशी साम्य राखण्याच्या प्रयत्नाशिवाय भक्ती अपूर्ण आहे. आपल्या इष्ट दैवतास जेजे आवडते तेते ग्रहण करणे आणि ते ज्याचा निषेध करते, जे त्याज्य समजते; त्या गोष्टींचा मन-वचन-कायेने अस्वीकार करणे, हे भक्तीचे लक्षण आहे. 'तद्द्वेष्ये विरागस्तत्स्पृहणीये चानुरागः' आपल्या प्रभूला जे योग्य वाटत नाही; त्या विषयांबद्दल विरक्ती आणि त्यांना ज्या गोष्टींची स्पृहा-इच्छा आहे, त्या पदार्थांबद्दल अनुरागभाव दर्शवतादर्शवता त्याच राग-विरागमय प्रवृत्ती एकरूप होतात आणि त्या साधक भक्ताचा स्वभाव बनून जातात.

जर प्रभूंना अहिंसा, सत्य, अचौर्य, ब्रह्मचर्य व अपरिग्रह आवडत असेल; तर त्यांचा भक्तसुद्धा तीच व्रते धारण करणे पसंत करेल. जर भगवंतांना हिंसा, असत्य, अचौर्य, अब्रह्म आणि परिग्रह प्रिय नाही तर भक्त त्यामध्ये रुची कशी दाखवेल? अशा प्रकारे आपली सगळी आवड आणि स्वभाव दोन्ही रूपाने जो आपल्या आराध्याशी तन्मय होतो; त्यालाच भक्तिरसाच्या मुळापर्यंत जाता येते. 'वन्दे तद्गुणलब्धये' या एकाच सूत्रात भक्तीविषयीच्या विशाल प्रबंधाचे सार, भक्तीच्या फलश्रुतीचे वर्णन करणाऱ्यांनी सांगितले आहे.

वर्षानुवर्षे देवाजवळ दिवा लावला, घंटानाद करीत पूजा-प्रक्षालन केले आणि तरीही जर भगवंताच्या गुणांची प्राप्ती झाली नाही तर भक्ती या शब्दाचा अर्थसद्धा साधकाला समजला नाही, असेच म्हणावे लागेल. मग, भावांचे अधिग्रहण तर दूरच राहिले. 'जिनचतुर्विंशतिका' मध्ये म्हटले आहे- 'हे जिनेंद्र! या संसारात जो सर्वश्रेष्ठ बुद्धिमान विद्वान आहे; तोच श्रुतस्कंधरूपी सागर सहजपणे तरून जाऊ शकतो. संसाररूपी सापाच्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विषाचे अपहरण करणाऱ्या आपल्या गुणरत्नांना श्रोत्यांचे व स्वत:चे अलंकार तोच बनवतो. मणिसमान आपल्या गुणांचे श्रवण करतो, त्यावर श्रद्धा ठेवतो. तो गुणरूपी रत्नांनी विभूषित आहे आणि प्रशंसनीयही आहे.[१]

तद्‌गुणउपलब्धी - सर्वज्ञाच्या गुणांची प्राप्ती करून घेण्याचा प्रयत्न एक असामान्य कार्य आहे. सिद्धालयाची उंची सहजासहजी नाही गाठली जाऊ शकत. मन-वचन आणि कायेचे जे विविध व्यापार आहेत; त्यांना ध्येयाच्या एका बिंदूवर आणून ठेवणे, ही 'जहँ ध्यान, ध्याता, ध्येय को लय' हे गाणे गाण्याइतकी सोपी, सहज गोष्ट नाही. गुणप्राप्तीसाठी आचरण आवश्यक असते. विचारांमध्ये अनेकान्त-सप्तभंगीचे व चारित्र्यात अहिंसेचे अदम्य आत्मवृत्तीने ध्यान, चिंतन व मनापासून अगदी सहजपणे चारित्र्यप्रवर्तन करणेही तेवढेच महत्त्वाचे असते. तेव्हा कुठे साधनेच्या मार्गावर सिद्धीच्या दूरगामी पाऊलखुणा दिसू लागतात.

बांबूच्या साहाय्याने एखादा कलाकार उंचउंच चढण्यात सफल होतो; त्याप्रमाणे भक्तीच्या रत्नजडित पायऱ्यांवरून मनुष्यभव उन्नतावस्था प्राप्त करण्यात सफल होतो. कारण, स्तुती करताकरता त्याला जी तन्मयता प्राप्त होत राहते; त्या तन्मयतेमुळे त्याला शारीरिक विषय-विकारांवर मात करता येते, इच्छांवर विजय मिळविता येतो आणि त्यामुळे शुभोपयोगात वृद्धी होते. अत्यंत एकरूपतेने तो गाऊ लागतो.

हे जिनेंद्र! हे तेज:पुंज अधिपती! मी तुमच्यावरील श्रद्धेत कायम बुडालेला राहू दे. फक्त तुमची भक्तीच तेवढी माझ्या आठवणीत राहावी. बाकी सगळ्या गोष्टी मी विसरून जाव्यात. माझ्या हाताच्या ओंजळीतून तुमच्यासमोर मी अविचल भक्तीचा नैवेद्य अर्पण करीत राहावे. माझ्या कानांना सदैव तुमचीच पवित्र कथा ऐकू येत राहावी. त्राटक ध्यानाने पापणी जराही न हलविता माझ्या डोळ्यांनी तुमच्याच दर्शनाचा लाभ घ्यावा. इंद्राच्या सहस्र डोळ्यांचे तेजसुद्धा ज्यांच्यासमोर फिके पडेल, असे तेज मग माझ्या डोळ्यांना लाभेल! हे देवा, मला कुठले व्यसन लागू नये. पण, जर व्यसन शब्दाचा अर्थ अतिसेवन असा असेल तर आपली स्तुती करण्याचे व्यसन मला लागू दे. हे माझे मस्तक

---

१. 'प्रज्ञापारमितः स एव भगवन्- पारं स एव श्रुत-
स्कन्धाब्धेर्गुणरत्नभूषण इति श्लाध्यः स एव ध्रुवम्।
नीयन्ते जिन! येन कर्ण हृदयालंकारतां त्वद्‌गुणाः
संसाराहिविषापहारमणयस्त्रैलोक्यचूडामणेः।' - जिन चतुर्विंशतिका, ७

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आपल्याविषयीच्या अतीव श्रद्धेने निरंतर नत राहू दे. पूजेतील नारळासारखे ते सदैव आपल्या चरणाशी राहू दे. तुमच्याच कृपाप्रसादाने मला लाभलेले हे अमृतमय जीवन जगत असताना मी आणखी तेजस्वी, उत्तम मानव व पुण्यशील बनत राहो.''

अशा प्रकारचे उद्‌गार जर आनंदमय वाणीतून प्रस्फुटित होऊ लागले तर स्थाणूप्रमाणे शरीरवृक्षावर दैवी वरदानाचा अमृतवसंत फुललाच पाहिजे. या भक्तिरूपी फुलांनी हसऱ्या वसंताला प्राप्त करून घ्यायचे असेल तर मनातले जाड्य दूर करणे मात्र आवश्यक आहे. तसे केले तर मग 'शक्तिस्तस्य हि तादृशी'... त्या परमदयाळू, क्षमामूर्ती परमात्म्याचे करुणेचे स्रोत नवीन आकाशगंगा प्रवाहित करू लागतात. अशी आकाशगंगा की, जिच्यामध्ये अवगाहन करून भक्त भुक्तीच्या अवर्णनीय रसाला प्राप्त करतो. भक्तीमुळेच मुक्ती आहे आणि भक्तीसुद्धा भक्तीमुळेच आहे. भुक्ती आणि मुक्तीसाठी जिनचरणरूपी कमळातील भ्रमर होणे अपरिहार्य आहे. भगवान जिनेंद्रांनी आपले सर्व दोष शांत केले आहेत, म्हणून त्यांना आत्मशांती प्राप्त झाली आहे; आणि हे तर नक्कीच आहे की, ज्याला जी वस्तू प्राप्त झालेली आहे; तो ती दुसऱ्यांनाही वाटू शकतो. म्हणूनच शरण आलेल्यांना प्रभू शांती प्रदान करतात[२].

श्रद्धा आणि विश्वास या नेत्रद्वयांनी जो भगवंतांची भक्ती करतो, त्याला निश्चितच परमकृतार्थता मिळते. अन्यथा, या बाह्य द्विचक्षूनी फक्त त्या श्रद्धामूर्तीचे दर्शन होणेसुद्धा कठीण आहे. भगवंतांची स्तुती करताना एकीभाव प्राप्त करणे, हे भक्ताचे ध्येय असले पाहिजे. 'मम परमविशुद्धिः' असे उद्‌गार त्यांच्यासमोर तोंडून निघाले पाहिजेत. भगवंताकडे मुले-नातू, धन-संपत्ती आणि क्षुद्र लौकिक सामान्य पदार्थांची याचना केली; तर मग ते केशराच्या शेतीत गेल्यावर दुर्वा/गवत मागितल्यासारखे होईल. मुक्तीसाठी केलेल्या आणि कराव्या लागणाऱ्या प्रयत्नांच्या तुलनेत हे लौकिक वैभव कःपदार्थच आहेत. जर याचना करावीशीच वाटली तर सर्व संप्रदायांना आदर्श असलेल्या जिनेंद्र भगवंताजवळ मुक्तिलक्ष्मीची याचना करणेच योग्य आहे किंवा मुक्तियाचना तरी कशासाठी? ते तर भक्तीचे शुल्क (फी) आहे. म्हणजे, जेव्हा शुल्करूपात भक्ती भेट दिली, तेव्हाच

---

२. 'सुश्रद्धा मम ते मते स्मृतिरपि त्वय्यर्चनं चापि ते
हस्तावंजलये कथाश्रुतिरतः कर्णोऽक्षि सम्प्रेक्षते।
सुस्तुत्यां व्यसनं शिरोनतिपरं सेवेदृशी येन मे
तेजस्वी सुजनोऽहमेव सुकृती तेनैव तेजः पते-! ॥' - स्तुतिविद्या, आ. समन्तभद्र

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मुक्तीही मिळाली. म्हणून परिणामविशुद्धीसाठी पहिल्यांना भक्तीची याचना करणेच महत्त्वाचे आहे[३].

जिनेंद्रांच्या चरणकमळातला भुंगा कधी जन्म जरा-मृत्यूच्या बाधेने ग्रस्त अशा अधोगतीला येतो का? किंवा हिमालयाच्या अत्युच्च, अजिंक्य शिखरावर उभा असलेला कोणी खालच्या जमिनीवरच्या मूठभर दगडांची अपेक्षा कधी करेल काय? जिनेंद्रबिंब केवळ पाहताच अशाश्वत विषयादी परिग्रहाचा तीव्र मोह असणाऱ्या सुखाची त्यास विरक्ती होते आणि तो केवलज्ञानरूप अग्नीमध्ये आपल्या पुण्याची आहुती देण्यासाठी, त्यांचे विसर्जन करण्यासाठी व्याकूळ होतो. देवासमक्ष आपले पाप जाळून टाकण्यासाठी तर अनेकानेक येतात. परंतु, पुण्यसद्धा बंधच आहेत, असे मानून त्यांचेही पुष्पांजलीप्रमाणे विसर्जन करणारे किती वीतरागी असतील, हे केवळ अनुभवानेच जाणता येते[४].

'विषापहार' स्तोत्रकारांनी भक्ती आणि तिची फलश्रुती यांचे अतिशय सुंदर वर्णन करताना म्हटलेले आहे- ''हे भगवन! मी आपली स्तुती केली आहे म्हणून तुम्ही मला स्तुतिदक्षिणा द्यावी, असे मी म्हणणार नाही. कारण, मी स्तुती केली आहे तर ती माझ्या मनाने केली आहे. माझ्या इच्छेने केली आहे. माझ्या परिणामविशुध्दीसाठी केली आहे. तुम्ही मला स्तुतिपाठक म्हणून नियुक्त केलेले नाही. करणार तरी कसे? कारण, तुम्ही तर वीतराग आहात! आणि स्तुती करण्यासाठी जरी स्वर्गाधिपती इंद्रालाही नियुक्त केले गेले तरी त्यामुळे आपल्या अनंतगुणसंपन्न अतिशयामध्ये अशी कोणती वाढ होणार आहे? हे तर इंद्रादी देवांचे सौभाग्य म्हणावे की, ते आपल्या सेवेमध्ये आहेत'[५].

स्तुतीसंबंधी बोलायचे झाले तर स्तुतीसाठी अतिशयोक्ती नावाचा अलंकार वापरला जातो. म्हणजे, एखाद्या व्यक्तीत तिळाएवढा गुण असला व एखाद्या शब्दप्रभूने त्याचे मेरू पर्वताएवढे वर्णन केले तर ती स्तुती होईल; आणि जर मेरूचे वर्णन करताना त्याच्या तिळाएवढ्या भागाचे वर्णन करताना त्याची मती कुंठीत होऊ लागली तर त्या हीन उक्तीला

---

३. 'स्वदोषशान्त्या विहितात्मशान्तिः शान्तेर्विधाता शरणं गतानाम्।
भूयाद् भवक्लेशभयोपशान्त्यै शान्तिर्जिनो मे भगवान् शरण्यः।। - शान्तिजिनस्तोत्र, ८०

४. 'श्रीपतिर्भगवान् पुष्याद् भक्तानां वः समीहितम्।
यद्भक्तिः शुल्कतामेति मुक्ति कन्याकरग्रहे।' - क्षत्रचूडामणि, १/१

५. 'अर्हत्पुराण पुरुषोत्तम पावनानि वस्तून्यनूनमखिलान्ययमेक एव।
अस्मिन् ज्वलद्विमलकेवलबोधवह्नौ पुण्यं समग्रमहमेकमना जुहोमि।।' - नित्यपूजा, १२

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अतिशयोक्तीमूलक 'स्तुती' म्हणायचे का?[६] परंतु, लहान मूल आपले बोबडे बोल वडिलांच्या विद्वत्तेसमोर तुच्छ समजून सोडून तर नाही ना देत? तुच्छ असतीलही; पण ते चांगले आणि स्वच्छ तर आहेत. कारण, त्यात मनाची शुद्धता मिसळलेली आहे. स्तुतिकर्तासुद्धा स्वत:ला अगदीच सुमार मानत नाही. तोसुद्धा थोडेफार समजेल, अशा सप्तसुरात गाऊ शकतो. जगात अनेक सूर आहेत. त्यांची गुंफण करणे त्याला जमणार नाही. तो आपल्या दुष्टांचा दुरितांजन नाश करण्यासाठी, पवित्र होण्यासाठी स्तुतीलाच माध्यम समजतो. वीतराग जिनेंद्र तर स्तुती आणि निंदेच्या पलीकडे गेले आहेत[७].

नदीवर न जाणो किती लोक येत असतात आणि किती कारणांनी येतात. एखादा पाणी पिण्यासाठी येतो, दुसरा नदीच्या पात्रात दगड टाकून पाणी उडवतो. तिसरा अंघोळ करतो; तर चौथा गळ टाकून मासे पकडतो आणि एखादा पाचवा असाही येऊ शकतो; जो पोहतपोहत किंवा नावेने प्रवाहाच्या पलीकडे जाऊ इच्छितो. अशा विविध हेतूंनी येणाऱ्या लोकांशी नदीचे काहीच देणेघेणे नसते. तिची कुठलीच लाट, तिच्या वाहण्याचा ताल कोणाच्या येण्याजाण्याने बिघडत नाही. तहानलेल्याला पाणी प्यायचे असेल तर परिसरातल्या जलसाठ्यावर जावे, वाकावे, ओंजळीत पाणी भरून घ्यावे आणि यथेच्छ पाणी पिऊन तृप्त व्हावे... त्याचा हात धरणारा कोणी आहे? की जो म्हणेल 'आता बस कर!' त्याला पाणी प्यायचे नसेल तर त्याने आयुष्यभर तिथेच उभे राहावे... कुठली नदी आपला स्तर उंचावून त्याच्या मुखात शिरेल?

हीच वीतरागता आहे. भगवान परमवीतरागी आहेत. म्हणून, कोणी स्तुती करो वा निंदा; त्यांच्या समभावात फरक पडतच नाही. पारिजातकाचे हार त्यांना मुग्ध करू शकत नाहीत की, त्यांच्या गळ्यात साप टाकून त्यांना विचलित वा क्रोधाविष्ट करू शकत नाही[८].

---

६. 'इन्द्र: सेवा तव सुकुरुता किं तया श्लाघनं ते, तस्यैवेयं भवलयकरी श्लाघ्यतामातनोति।
त्व निस्तारी जननजलधे: सिद्धिकान्तापतिस्त्वं
त्वं लोकानां प्रभूरिति तव श्लाघ्यते स्तोत्रमित्थम्।'' - एकीभाव स्तोत्र, २०

७. 'गुणस्तोकं सदुल्लघ्यं तद्‌बहुत्वकथा स्तुति:।
आनन्त्यात्ते गुणा वक्तुमशक्यास्त्वयि सा कथम्।' - स्वयम्भू, ८६

८. 'न पूजयार्थंस्त्वयि वीतरागे न निन्दया नाथ! विवान्तवैरे।
तथापि ते पुण्यगुणस्मृतिर्न: पुनाति चित्तं दुरितांजनेभ्य:।।' - स्वयम्भू, ५७
'तथापि ते मुनीन्द्रस्य यतो नामापि कीर्तितम्।।
पुनाति पुण्यकीर्तेर्नस्ततो बूयाम किंचना।।' - स्वयंम्भू, ८७

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्यांच्या स्वभावतःच समत्व भावनेला आव्हान दिले जाऊ शकत नाही.[८] हे हर्ष-विषाद, क्रोध-मोह आणि वासना-कषाय तर संसारी माणसाच्या अनुभवाचे विषय आहेत. समत्व ज्यांना व्यापून राहिले आहे; त्या मुनींद्रांवर त्याचा प्रभाव पडणे व्यर्थ आहे. ज्याप्रमाणे तेलाने चिकट झालेल्या कलशावर पाण्याचा परिणाम होत नाही तसे! पण, तरीही जशी नदीत डुबकी मारणाऱ्याला पाण्याच्या शीतलतेचा, नदीचे पाणी पिणाऱ्याला तृषाशांतीचा स्वतःला अनुभव येतो; तसाच प्रभूपदी शरण आलेल्याला आत्मिक शांतीचा अनुभव अवश्य मिळतो. यासच 'शक्तिस्तस्य हि तादृशी' म्हटलेले आहे.[९]

नदीत डुबकी तर मारायची आहे आणि शीतल स्पर्श तर व्हायला नको, अशी इच्छा करणे हे वस्तुस्वभावाच्या विरुद्ध आहे. म्हणूनच, तर 'कश्छायया याचितयाऽत्मलाभः'- झाडाच्या खाली बसून सावली मागणे, हे सातत्याने वाहत असलेल्या झऱ्याला 'तू आता वाहत राहा' असे सांगण्यासारखे आहे; आणि असे आहे की, झाडाला याचना केली तर फळे, फुले मिळू शकतील; पण सावली मिळणार नाही. जर अशा रीतीने सावलीही मिळाली असती तर लोकांनी तिलाही दगड मारून फळासारखी झाडावरून उतरवून घेतली असती. म्हणून, हा विशिष्ट आधार चरणाशी बसलेल्या भक्तिदीनालाच-भक्तीचा याचक असलेल्याला मिळू शकतो. वरील संस्कृत वचनात 'आत्मलाभ' शब्द आला आहे, तो अत्यंत महत्त्वपूर्ण असा आहे. आत्मलाभ तर आत्मप्रकृतीतच आत्म्याच्या स्वभावातच स्थित असतो. जो दीन, याचक नसलेला म्हणजेच परिपूर्ण आत्मा आहे; तो कशाची याचना करणार? तो तर 'तुला पाहू दे आणि तुझ्यासारखाच होऊन जाऊ दे' असा महावाक्यरूप आहे. त्यात ना याचना, ना कुठली इच्छा! म्हणून, वीतरागाकडून वीतरागत्व प्राप्त करणे, हेच 'जिनेंद्र-वृक्षाखाली' (चरणांशी) बसण्याचे एकमेव उद्दिष्ट आहे.

भगवान जिनेंद्रांना शरण आल्यावरही एखादे दुःख शिल्लक राहतच असेल तर भक्ती करण्यातच काही तरी त्रुटी राहिली आहे, असे मानून अधिक तन्मयतेने, अधिक निरपेक्ष भावना ठेवून भक्तीत रमून गेले पाहिजे. कारण, एखादी वस्तू जर दहा हात उंचीवर ठेवली असेल तर नऊ हातांच्या उंचीवरून कितीही प्रयत्न केला तरी ती प्राप्त होऊ शकत नाही.

---

९. 'एकः पूजा रचयति नरः पारिजातप्रसूनैः
क्रुद्धः कण्ठे क्षिपति भुजंग हन्तुकामस्ततोऽन्य।
तुल्या वृत्तिर्भवति च तयोर्यस्य नित्यं स योगी
साम्यारामं विशति परमज्ञानदत्तावकाशम्।। - ज्ञानार्णव

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मग खिन्नता, निराशा, अपयशाची भावना मनात का यावी? एक हाताची उंची कमी पडते ना, त्याची भरपाई करणे हा पुरुषार्थ आहे. स्टेशन दूर आहे, आपण त्या मार्गाने जाताना मध्येच थकलो, दमलो म्हणून ते काय जवळ येणार आहे थोडेच? स्टेशन जवळ यावे असे वाटत असेल तर आपल्याला चालतच राहावे लागेल आणि हे तर निश्चित आहे की, जेवढी पावले ते दूर आहे, त्यापेक्षा जास्त चालावे लागणार नाही. हा! परंतु जे मार्गावर भरकटले आहेत; त्यांना मात्र किती आणखी चालावे लागेल, हे सांगता येणार नाही. त्यामुळेच तर 'याद्वतेऽपवर्गः' आणि 'जिनेर्भक्तिभवे' असे म्हटले गेले आहे. हे सूत्र आस्थेचे बल एकाग्र करणारे आहे; तिला हतबल करण्याकरिता नाही. कर्माचा एवढा गुंता आहे की, त्यांना सोडवताना एक क्षणही पुरेसा होऊ शकतो किंवा अनेक जन्मही घ्यावे लागतात. सगळे काय त्याच भवात मोक्षास जातात? अनंतानुबंधी कर्मरज्जू इतके पक्के असू शकतात की, त्यांना तोडतातोडता, संवर-निर्जरा करताकरता अनेक जन्मांतला पुरुषार्थसुद्धा लागू शकतो. म्हणून, भक्ताने हे ध्यानात घ्यावे की, 'श्रुत स्वाध्यायाने, वंदनेने, दर्शनाने जर दुःखे दूर होत नसतील तर आपल्याच अनंतानुबंधी कर्मांचे आधिक्य आहे किंवा आपली भावप्रवणता कमी पडत आहे'[१०]. भावशून्य क्रिया फलिभूत होत नाहीत.

भावात्मक एकता संपादित करण्यासाठीच मूर्तिविद्येचा आश्रय घेतला जातो आणि म्हणून प्रतिमेला वंदन करणे, पूजा-प्रक्षालन करणे, या आगमसंमत क्रिया आहेत. अन्यथा, 'न काष्ठे विद्यते देवो न पाषाणे न मृण्मये' असे म्हणून भक्तीसाठी मूर्तीची काहीही आवश्यकता जाणून न घेता ती अनावश्यक आहे, निरुपयोगी आहे, असे ठामपणे म्हणता येणार नाही. स्थूलाकडून सूक्ष्माकडे किंवा द्रव्याकडून भावाकडे परतणे, हा जीवाच्या कल्याणाचा मार्ग आहे. उपास्य देवाची भक्ती करीत असताना भक्ताचा हाच प्रयत्न असला पाहिजे. श्रमण-संस्कृतीत वीतरागतेला महत्त्वपूर्ण स्थान आहे. मोह, मूर्च्छा आणि परिग्रह यांना बंध म्हटलेले आहे; म्हणूनच श्रमण मुनी/जैन साधू दिगंबर व निर्ग्रंथ असतात. त्यांचे उपास्यदैवत जिनेंद्र भगवंतांच्या सम्यगाचरित मार्गावर अग्रेसर होण्यासाठी ही दीक्षा घेतात. रागादिक्लेशामध्ये राहणाऱ्या चित्ताचा संसार-विनाशासाठी विरोध करतात.

---

१०. 'आकर्णितोऽपि महितोऽपि निरीक्षितोऽपि
नूनं न चेतसि मया विधृतोऽसि भक्त्या।
जातोऽस्मि तेन जनबान्धव! दुःखपात्रं
यस्मात् क्रियाः प्रतिफलन्ति न भावशून्याः।। - कल्याणमन्दिरस्तोत्र, ३८

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

या मार्गात ज्ञानाचे फार महत्त्व आहे. ज्ञानच नसेल तर सम्यक्त्वाच्या प्राप्तीचा डंका कोण पिटू शकेल? सम्यक्त्वासहित ज्ञानही मोक्षमार्ग-साधकांसाठी एखाद्या सोपानाप्रमाणे, जिन्याप्रमाणे सहायक आहे.[११]

या ज्ञान आणि मोक्षाच्या मध्ये जे तत्त्वश्रद्धान उत्पन्न होते; तेच स्तुती करणाऱ्याच्या रूपातून व्यक्त होते. आचार्य समंतभद्र श्रमण संस्कृतीचे युगद्रष्टा आचार्य होऊन गेले. ते महान दार्शनिक होते. त्यामुळे खरे तर ते शुष्क आणि अत्यंत बुद्धिनिष्ठ असेच असायला हवे होते. परंतु, ते उच्चकोटीचे भक्तही होते. स्तुतीपर कवने अप्रतिम लिहीत. त्यांची ज्ञानधारा भक्तीने ओथंबलेली असे. म्हणून, त्यांना 'आद्य स्तुतिकार' या बिरुदाने अलंकृत केले गेले आहे. पण, परम/श्रेष्ठ दार्शनिक, वादिराट्, आचार्य असूनही का बरे त्यांनी भक्तिरसाने ओतप्रोत भरलेल्या स्तुतिकवनांची रचना केली असेल? यामागे रहस्य अत्यंत रोचक आहे. भक्ती किंवा भावना उचंबळून येतात. त्यांचा जणू उद्रेक होतो आणि त्या उद्रेकातून काव्याचा जन्म होतो. परंतु, आचार्यांच्या बाबतीत सांगायचे तर त्यांचे काव्य परिणामविशुद्धी करणारे होते. खरे पाहता, स्तुती पुण्यप्रद परिणामांची कामधेनूच आहे. अचिंत्य, उत्कृष्ट फळ देणारे ते चिंतामणी रत्न आहे. हा स्तुतिस्तोत्राचा मार्ग भक्तीच्या धारेत न्हावून, शद्ध होऊन मोक्षलक्ष्मीच्या निवासाप्रत जातो. असंख्यात प्रदेश दूर असणारा सूर्य एवढ्या सुदूर अंतरावरूनही आपल्या किरणस्पर्शाने कमळाचे वन फुलवतो, त्याच प्रकारे सिद्धालयात विराजमान असलेल्या परमात्म्याच्या गुणांच्या केवळ स्मरणाने हृदयरूपी कमळ फुलून येते आणि कर्मांचा नाश होतो.[१२]

या दुर्लभ मनुष्यगतीत ज्याला जिनेंद्रभक्ती लाभली, त्याला आणखी काही मिळवण्यासारखे शिल्लकच उरले नाही. त्याला दानाचे फळ मिळाले. त्याने कठोर तपश्चर्या केली. पूजा-प्रक्षालनाची शतके त्याने पूर्ण केली. समस्त पवित्र गुणांसह त्याने शीलाचे

---

११. 'आस्तां तव स्तवनमस्तसमस्तदोषं त्वत्संकथापि जगतां दुरितानि हन्ति।
दूरे दहत्त्रकिरण: कुरुते प्रभैव पद्माकरेषु जनजानि विकासभांजि।।' - भक्तामर, ९

१२. 'दानं ज्ञानधनाय दत्तमसकृत् पात्राय सद्वृत्तये
चीर्णान्युग्रत पांसि तेन सुचिरं पूजाश्च बह्व्य: कृता:।
शीलानां निचय: सहामलगुणै: सर्व: समासादितो
दृष्टस्त्वं जिन! येन दृष्टिसुभग: श्रद्धापरेण क्षणम्।' - जिनचतुर्विंशतिका, ६

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सर्वग्राही रूप प्राप्त केले.[१३] तद्रूपतेच्या एका क्षणात त्याला अनेक भवांचे वरदान प्राप्त झाले. जगाने त्याला गुणभूषण म्हटले, शास्त्रांचा परिपूर्ण अभ्यास केलेला प्रखर प्रज्ञावंत म्हटले. सगळेच सद्‌गुण आणि भलेपणा त्याला सुवर्णकमळाप्रमाणे प्राप्त झाला. कारण, त्याने भक्तिसरोवरात स्नान करून भगवंतांकडून एकाग्र, तन्मयवृत्ती स्वत:त बाणली.[१४]

भगवंतांच्या चरणकमलाची सेवा सुलभ नाही. इंद्र, अन्य देवगण, गंधर्व, किन्नर आणि अप्सरा हे सेवेचे सौभाग्य क्षणापुरतेसुद्धा सोडू इच्छित नाहीत. 'जिनचतुर्विंशतिका' मध्ये लिहिले आहे की, 'जिनेंद्र भगवंतांना देवेंद्रांनी तर स्नान घातलेच आहे, देवांगनांनी मंगलगीते म्हटली आहेत, शरद ऋतूतील चंद्राप्रमाणे शीतल, निर्मल आणि आल्हाददायक यशोगीते गंधर्वदेवांनी गायिली आहेत आणि उर्वरित इतर देवांनी आपआपल्या भाग्यात आलेली सेवा पूर्ण केलेली आहे. अशा तऱ्हेने हे भगवन! स्नान, मंगल यशोगीत आणि अन्य पूजा... प्रक्षालनाची उचित सर्व कामे पुण्यकार्याने शोभून दिसणाऱ्यांनी आधीच करून टाकलीत. आम्ही आता सेवा करण्यासाठी इथे हजर झालो खरे; पण आम्ही कोणती सेवा करणार? कोणत्याच प्रकारची सेवा करण्याची संधी न मिळाल्याने आमची द्विधा मन:स्थिती झाली आहे. अहो! 'देवांनी आमच्यासाठी कोणतीच सेवा शिल्लक ठेवलीच नाही.'[१५] हे भक्ताचे उद्‌गार आहेत.

सेवा करण्यासाठी उपास्याच्या चरणी जोपर्यंत आत्मसंवेदना, उत्कंठा, एकीभाव आणि अनन्यचिंतन नसेल तर भक्तीचा अर्थ पल्लवित होत नाही, फुलत-फळत नाही. 'क्षत्रचूडामणी'मध्ये एक वचन आहे की, 'जन्म आणि मरण यांचे एक जीर्णशीर्ण जंगल म्हणजेच हा संसार! मनुष्य या जंगलात भटकतो आहे; कारण विषयांनी त्याला पुरते

---

१३. 'प्रज्ञापारमितः स एव भगवन्! पारं स एव श्रुत-
स्कन्धाब्धेर्गुणरत्नभूषण इति श्लाघ्यः स एव ध्रुवम्।
नीयन्ते जिन! येन कर्णहृदयालंकारतां ते गुणाः
संसाराहिविषापहारमणयस्त्रैलोक्यचूडामणेः।' - जिनचतुर्विंशतिका, ७

१४. 'देवेद्रास्तव मज्जनानि विदधुर्देवांगना मंगला-
न्यापेठुः शरदिन्दुनिर्मलयशो गन्धर्वदेवा जगुः।
शेषाश्चापि यथानियोगमखिलाः सेवां सुराश्चक्रिरे
तत् किं देव! वयं विदध्म इति नश्चित्तंतु दोलायते।'' - जिनचतुर्विंशतिका, २२

१५. 'जन्मजीर्णाटवीमध्ये जनुषान्धस्य मे सती।
सन्मार्गे भगवद्भक्तिर्भवतान् मुक्तिदायिनी।। - क्षत्रचूडामणि, ६/३३

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आंधळे करून टाकले आहे. त्या विषयांधाला मार्गदर्शन करणारी दिव्यनेत्रे म्हणजे जिनेंद्रपदकमलांची भक्ती हीच आहेत. तीच मुक्ती देणारी आहे आणि मोक्षमार्गाची प्रेरणा देणारीही आहे. मनुष्याने स्वतःच्या इष्ट सिद्धीसाठी कोणता तरी एक मार्ग निश्चित करणे, हे योग्य आहे. क्षणाक्षणाला मार्ग बदलणारा इच्छित स्थळी कसा पोहोचू शकतो? प्रत्येक अन्य मार्ग बदलताना, पूर्वीच्या पथाला निवडताना त्याने जे श्रम घेतलेले असतात, जो वेळ घातलेला असतो, ते दोन्ही तो व्यर्थच घालवतो. म्हणून, जिनेंद्रपदकमली सर्व चित्तीवृत्ती समर्पित केल्या तर ते समर्पण भक्ताला लाभदायी मार्ग प्रदान करते आणि त्यामध्ये येणाऱ्या अंतरायांचा नाश करते. आपल्या सर्व इच्छा पूर्ण करण्यासाठी जिनभक्तीपेक्षा दुसरे वरचढ साधन नाही.[१६] जो भव्य जीव ही गोष्ट लक्षात ठेवून भगवंताचा आपल्या भक्तिरसाने अभिषेक करतो; त्याची सर्व दुःखे दूर होतात. मनुष्य आपल्या दुःखमुक्तीसाठीच भगवंतांना शरण जातो.

याविषयी 'शान्तिभक्ति'मध्ये एक श्लोक आहे. त्याचा अर्थ असा की- ''हे भगवन! आपल्या चरणयुगुलाशी श्रद्धाळू निरंतर लीन असतात. त्यामुळे असे वाटते की, लोकांची आपल्यावर खूपच भक्ती आहे. परंतु हे प्रभो! प्रत्येक क्रियेमध्ये लेशमात्र/थोडातरी स्वार्थ असतोच. म्हणून, आपल्यावर भक्ती असणाऱ्यांच्या स्वार्थाचा शोध घेतल्यावर असे कळले की, आपले बहुतेक भक्त संसारातील उणीवांमुळे आणि वेदनांमुळे दुःखी आहेत, त्रस्त आहेत. संसाराचा हा महासागर तरून जाणे त्यांच्या आवाक्यातली गोष्ट नाही आणि त्या वेदनांपासून, दुःखांपासून रक्षण व्हावे म्हणून ते आपल्या चरणाशी येऊन विनम्रपणे स्तुतिरूपी सुमनांची ओंजळ तुम्हास अर्पण करीत आहेत. कारण, आपण तारून नेणारे आहात, तारणहार आहात, या भवसिंधूतील जहाज आहात. ग्रीष्म ऋतूमध्ये लोक दिवसा सावली देणाऱ्या वृक्षांचा आश्रय घेतात, थंड पाण्याच्या सरोवरात डुंबत राहून उष्णतेपासून स्वतःचे संरक्षण करतात, थंड पेये प्राशन करतात आणि रात्री खुल्या आकाशाखाली बसून चंद्राच्या शीतल किरणांना अंगावर घेत शांतशांत होतात. याचा अर्थ कोणी असाही लावेल की, त्यांचे वृक्षांवर, सावलीवर, थंड पाण्यावर, शीतल पेयपदार्थावर किंवा चंद्रावर फार प्रेम आहे, स्नेह आहे. पण, ही गोष्ट खरी नाही. खरे तर हे आहे की, पाणी-जमीन व इतरत्रही असणाऱ्या सूर्याच्या अतितप्त किरणांच्या प्रभावामुळे त्यापासून सुटका करण्याच्या

१६. 'एकैवास्तु जिने भक्तिः किमन्यैः स्वेष्टसाधनैः।
या दोग्धि काममुच्छिद्य सद्योऽपायानशेषतः।।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हेतूने त्यात्या विशिष्ट शीतल पदार्थांचे सेवन लोक करतात.

त्याचप्रमाणे आपल्याला शरण येऊन जे स्तुती-स्तोत्र रचतात, म्हणतात त्यांनासुद्धा आपापल्या संतापाचे निवारणच करायचे असते.[१७] आणि हे भगवन! जो समर्थ आहे, त्याच्याकडेच भिक्षेची याचना करतात ना? हे आशापूर्तिकारक ना! आपल्या भक्तीचा वारा भव्यजनांच्या नावेच्या शिडात पूर्ण भरला की, मग भव्यजन अगदी लीलया हा भवार्णव, हा संसारसागर पार करून जातात.[१८] त्या भक्तीमुळे येणाऱ्या आनंदाश्रूंच्या पुरात जे अवगाहन करतात, भक्तिस्तुती म्हणत असताना ज्यांचा कंठ सद्गदित होतो; त्या शरणागतांच्या देहातून सगळ्या आधिव्याधी वारुळातून एखादा साप निघून जावा,[१९] तशा निघून जातात. म्हणून, भगवान जिनेंद्रांचे रोज पूजन-वंदन-स्तवन करणे म्हणजे आपल्या पापांपासून सुटका करून घेणे होय.

परंतु, जो गृहस्थ असून षट्आवश्यक क्रियांमधील अत्यंत आवश्यक असे जिनेंद्रदर्शन करीत नाही, त्याचे जीवन व्यर्थ आहे आणि त्याचा गृहस्थाश्रमही धिक्कारणीय आहे.[२०] ही भक्ती परमात्मभाव स्वतःमध्ये प्रतिष्ठित करणारी आहे. तो कर्मनिर्जरेचा संकेत आहे. मोक्षमार्गाच्या दिशेने पडणारी ती पावले आहेत. हिंसा, असत्य, चौर्य, अब्रह्म आणि परिग्रह या पाच पापांचे ते प्रायश्चित्त आहे. आपल्या आत्मज्ञानाला शुचिर्भूत करणारे ते

---

१७. 'न स्नेहाच्छरणं प्रयान्ति भगवन्! पादद्वयं ते प्रजा
हेतुस्तत्रविचित्रदुःखनिचय संसारघोरार्णव।
अत्यन्तस्फुरदुग्ररश्मिनिकरव्याकीर्णभूमण्डलो
ग्रैष्मः कारयतीन्दुपादसलिलच्छायानुरागं रविः। - शान्तिभक्तिः

१८. 'त्वं तारको जिन! कथं भविनां त एव
त्वामुद्वहन्ति हृदयेन यदुत्तरन्तः।
यद्वा दृतिस्तरति यज्जलमेष नून-
मन्तर्गतस्य मरुतः स किलानुभावः।।' - कल्याणमुन्दर, १०

१९. 'आनन्दाश्रुस्नपितवदनं गद्गदं चाभिजल्पन्
यश्चायेत त्वयि दृढमनाः स्तोत्रमंत्रैर्भवन्तम्।
तस्याभ्यस्तादपि च सुचिरं देहवल्मीकमध्या-
न्निष्कास्यन्ते विविधविषमव्याधयः काद्रवेयाः।।' - एकीभाव स्तोत्र

२०. 'ये जिनेन्द्रं न पश्यति पूजयन्ति स्तुवन्ति ना।
निष्फलं जीवितं तेषां, धिक् च तेषां गृहाश्रमम्।।' - पद्मनन्दी, अ. ६, श्लोक १५

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पवित्र जल आहे. विवेक-सागरातून निघालेला तो एक दिव्यमणी आहे; आणि भगवंतांच्या चरणांपर्यंत पोहोचण्यासाठी मिळालेले ते अनुमतीपत्र आहे. ज्याच्या अंत:करणात भक्तीच्या प्रमत्त लाटा उचंबळत आहेत, त्याला पापरूपी पंख कधी स्पर्श करीत नाही. भगवंतांचे चरण भक्ताचा मोहरूपी अंधकार नष्ट करणारे आहेत. जगातील समस्त पदार्थांना तत्त्वार्थरूपात प्रकट करणारे आहेत. समृद्धीमुळे दीप्तिमान व तेज:पुंज असल्याने समृद्ध आहेत. सन्मार्ग दाखवणारे आहेत. देवगणांना अमृतप्राशन करायला देणारे आहेत. भव्यजनांच्या भक्तीचे ते चरणकेंद्र आहेत आणि शांती तसेच अभय देणारे आहेत. भगवंतांच्या या स्वरूपाचे अभीक्ष्ण तापहारी चिंतन पुन:पुन्हा होत राहावे, यातच जीवनाची सार्थकता आहे.[२१] हे भगवन! मुनीश! आपण आपल्या चरणाशी असलेल्या भक्तांच्या हृदयप्रदेशात अंधाराचा नाश करणाऱ्या दीपकासमान आहात. भिंतीत ठोकलेल्या एखाद्या खिळ्याप्रमाणे स्थिर आणि प्रतिबिंबाप्रमाणे नेहमीकरिता विराजमान असावे.[२२] आपण समस्त विश्वाला वंदनीय आहात. सगळ्यांपासून विरक्त आहात. संपूर्णत: निर्दोष आहात. मुक्तिवैभव प्राप्त करून देणारे आहात म्हणून आपल्या पुण्यपदकमली सहस्र सहस्र वंदन!

उपसंहार :- हे परमात्मन! आपली स्तुती केली तर आमच्या वचनगुप्तीची हानी होते. आपले स्मरण करताना मनोगुप्तीस बाधा येते आणि आपल्याला नमस्कार करतेवेळी कायगुप्तीचा दोष लागतो. ते काहीही होऊ दे, त्याची आम्हा चिंता नाही. आम्ही नेहमीच आपली स्तुती करू. आपले स्मरणही करू आणि आपणास नमस्कारही करू.[२३]

❖❖❖

---

२१. 'मोहध्वान्तविदारणं विशद विश्वोद्भासि दीप्तिश्रियं
सन्मार्गप्रतिभासकं विबुधसन्दोहामृताऽपादकम्।
श्रीपादं जिनचन्द्र! शान्तिशरणं सद्भक्तिमानौमि ते
भूयस्तापहरस्य देव! भवतो भूयात् पुनर्दर्शनम्।' - क्षमापन, पंचांग प्रणाम

२२. 'मुनीश! लीनाविव कीलिताविव
स्थिरौ निखाताविव बिंबिताविव।
पादौ त्वदायौ मम तिष्ठतां सदा
तमोधुनानौ हृदि दीपकाविव।।' - अमित. द्वात्रिंशिका, ४

२३. 'वाग्गुप्तेस्त्वत्स्तुतौ हानिर्मनोगुप्तेस्तव स्मृतौ।
कायगुप्तेः प्रणामे ते काममस्तु सदापि नः।।' - आचार्य जिनसेन, आदिपुराण, २/७७

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नरजन्माची सार्थकता

श्रमण संस्कृतीचे अमर गायक आचार्य अमितगती यांनी संसारातील ८४ लक्ष योनींमध्ये मनुष्यभव हा सर्वात प्रमुख आणि सर्वात श्रेष्ठ म्हणून सांगितले आहे. 'भवेषु मानुष्यभवः प्रधानम्' ही त्यांची घोषणा आहे. खरे पाहता, मनुष्याइतका दुसरा कोणताच जीवपर्याय उत्कृष्ट नाही. कारण या पर्यायातच सिद्धालयाची उंची त्यास सुलभ आहे. साधारणतः क्षुद्र योनींमध्ये भटकत राहणारा जीव 'काल अनन्त निगोद मँझार, बीत्यो एकेन्द्रिय तन धार' आणि 'एक श्वास में अठदश बार, जन्म्यो, मऱ्यो, भऱ्यो दुखभार'. छहढालेतील ओळींनुसार अनंत काळपर्यंत निगोदातच जन्मतो, मरतो व दुःखभार सहन करीत राहतो. जर त्या एकेंद्रिय जीवाला त्रसपर्याय लाभला, तर त्याच्या दृष्टीने ती दुर्लभ चिंतामणी रत्नाचीच प्राप्ती असते. अशा प्रकारे क्षुद्र कीटक-मुंग्या, सिंहादी क्रूर पापानुबंधी पर्यायांच्या हत्या (मरणे-जन्मणे) किंवा वधबंधमय दारुण व्यथेचा अनुभव घेत हा जीव शुभ्रसागरात पडून राहतो.

अनेक सागर प्रमाणसमयापर्यंत त्या मनुष्येतर योनींमध्ये जन्ममृत्यूच्या जात्यात तो भरडला जातो. मेरूएवढ्या उंच अशा लोहाला वितळवून टाकणारी उष्णता, अत्यंत थंडी हे त्यास सहन करावे लागते. जीवाच्या अनंतानुबंधिनी दयनीय अवस्थेमुळे व्यथित होऊन पं. दौलतराम म्हणतात- 'करम जोगतै नरगति है।' एखाद्या शुभकर्माचे निमित्त मिळाले की, मग मनुष्यगती प्राप्त होते. हे वचन हेच सांगते की, मनुष्यजन्म अत्यंत दुर्लभ आहे आणि या जगात जे जेवढे दुर्लभ असते, ते तेवढेच मौल्यवान असते. उपलब्धी, उपयोगिता आणि त्यात्या वस्तूची आवश्यकता त्या विशिष्ट वस्तूचे मूल्य निर्धारित करीत असतात.

विक्रम संवत १९५६ मध्ये दुष्काळ पडला; तेव्हा दुष्काळग्रस्त लोकांनी सोन्याच्या मोहरा देऊन मूठमूठ धान्य खरेदी केले. अनेकांनी तर झाडाची पाने, साली खाऊन स्वतःला

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तारले. स्वातंत्र्यासाठी संघर्ष करणाऱ्या राणा प्रतापाला गवताच्या भाकरी गिळाव्या लागल्या. अशा वेळी एकेका रोटीचे मूल्य सोन्याच्या एकेका ताटाएवढे होते. म्हणून, वस्तूचे मूल्य सांगता येत नाही. दक्षिणेकडे भारतात जिथे चंदनाची झाडे विपुल प्रमाणात आहेत; तेथील लोक चंदनाच्या अमूल्य लाकडाचा उपयोग इंधनासारखा करतात. तेच चंदनी लाकूड इतरत्र बाजारात खूप मोठ्या किमतीने विकले जाते. अशा प्रकारे वस्तूंचे मूल्य हे तिच्या सुलभ प्राप्तीवर किंवा दुर्लभतेवर खूपच अवलंबून असते.

हा मनुष्यभव म्हणजे चंदनाचे लाकूडच आहे. क्षुद्र कामोपभोगाच्या, वासनांच्या कुंडात ते क्षुल्लक हेतूसाठी जाळणे, हे आत्मसर्वस्वाला नष्ट करण्यासारखे आहे. माणसाचे शारीरिक बळ त्याच्या बौद्धिक बळाच्या संयोगाने अतुलनीय होऊन जाते. इहलोकात निसर्गाच्या सौंदर्याव्यतिरिक्त जी काही नगरे, गावे, बाजारहाट, रत्ने, वस्त्रे, धनधान्य याद्वारे जे आकर्षक, समृद्ध भौतिक रूप माणसाने दिले आहे; ते अन्य गतीत जन्मलेले जीव देऊ शकत नाहीत. हे संस्कृती व सभ्यतेचे अंतर्बाह्य विशाल क्षेत्र म्हणजे मनुष्याच्या सुपीक, बुद्धिमान मेंदूची निर्मिती आहे. जर माणसाच्या बुद्धीचे मूल्यमापन करायचे ठरविले तर त्याने स्वतः बनवलेल्या वस्तूंच्या नमुन्यांचे पृथ्वीच्या एका टोकापासून तर दुसऱ्या टोकापर्यंत एक विशाल संग्रहालयच तयार होईल आणि ते बघायलासुद्धा अनेक युगे लागतील. इतर प्राणिजगताशी तुलना केली तर त्याचे हेच सर्वश्रेष्ठ वैशिष्ट्य मनुष्यजन्म किती महान आहे, हे सूचित करतो.

आजही अन्य प्राणी त्यांच्या त्याच अनादिकालापासूनच्या जन्मस्थितीतच आहेत. त्यांचे जीवनव्यापार पूर्वयुगाइतकेच आजही सीमित आहेत. मनुष्याबरोबरच राहणाऱ्या, मनुष्यवस्तीत राहणाऱ्या पशुपक्ष्यांनी माणसाइतकी प्रगती कुठे साधली आहे? वानरे आजही झाडांच्या फांद्यांवरच राहतात. अनेक युगांपूर्वीचा 'शाखा-मृग' हा शब्द त्यांना आजही लागू पडतो. परंतु, माणसाने केवळ दगडविटांचीच घरे बांधली असे नाही तर न पडणारी, न तुटणारी प्लास्टिकची घरे वैज्ञानिक शोधांच्या मदतीने बांधली आहेत. बैलगाडीपासून त्याची सुरू झालेली संथयात्रा रेल्वे, मोटारींना मागे टाकून सुपरसॉनिक विमानातून वेगावर स्वार झाली आहे. सुती कापडाऐवजी टेरलिन आले. चुलीतून लाकडाचा धूर आता निघत नाही. तिथे विजेवर चालणारे कुकर आले आहे, तात्पर्य हेच की, मनुष्य क्षणाक्षणाला नवीन होऊन जगत आहे. मनुष्यजन्माच्या वैशिष्ट्याचे हे अर्धेच दर्शन आहे.

कारण, जीवाची ही परिणती भौतिक आहे. आध्यात्मिक पूर्णताच यास पूर्णत्व देऊ

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शकते. अध्यात्मातून मिळणारा विवेक ही मनुष्यभवातील अशी संपत्ती आहे; जी क्षीरसागरातील १४ रत्ने देऊन अमृतकलशांनी आणि कुबेराच्या धनकोषानेही खरेदी केली जाऊ शकत नाही. ती तर अमूल्य आहे. पृथ्वीतलावरील सगळी उपादाने तराजूच्या एका पारड्यात ठेवली व दुसऱ्या पारड्यात आत्मसंपत्ती ठेवली तरी आत्मवैभवाचे पारडे जडच राहणार आहे. भौतिक विज्ञानाने, शोधांनी माणसाने जेवढे काही प्राप्त केले आहे; त्या सर्वांपेक्षाही आध्यात्मिक विज्ञानाचा शोध सर्वात श्रेष्ठ आहे किंवा आपण असेही म्हणू शकतो की, भौतिक परमाणुवादाच्या मदतीने कालपरवावर जिथे विज्ञान पोहोचू शकेल; त्याच्याही पुढच्या अलक्षित क्षेत्रात सुरक्षित असलेल्या स्व-पर विज्ञानाला ज्ञानाने जाणले आहे. आध्यात्मिकतेची ही आत्मदर्शी निष्कलंक/निरभ्र प्रेरणा फक्त भारतीयांनाच मिळाली आहे आणि अशा प्रकारचे स्फुरण जगात कुठे असलेच तर ते स्फुरण, ती प्रेरणा म्हणजे केवळ भारतीय भूमीवरचे तिथे उडून पडलेले बीज आहे, असे नि:शंकपणे म्हणावे लागेल.

भारतीय लोक मृताला जाळून टाकतात. हीच त्यांची अध्यात्मसिद्धी आहे. 'ममी' तयार करून त्या नश्वरावर मोह करणे आणि ज्या पृथ्वीवर प्रत्यक्ष जीवन, चैतन्य स्वतंत्रपणे विहार करते; त्या पृथ्वीवर मृत्यूनंतरही त्या विद्रूप शवांना सजवून त्यांचे जतन करणे, दुर्गंध पसरवणे, हे सगळे एखाद्या आत्मवादी व्यक्तीच्या कल्पनेत न बसणारे आहे. या दृष्टीने विचार करता भारतीय दर्शनातील भौतिकतावादी दार्शनिक चार्वाकसुद्धा त्या ममीघरांपेक्षा/पिरॅमिडपेक्षा बराच म्हणावा लागेल. कारण, तो म्हणतो- 'भस्मान्तं शरीरम्'- शरीराची एकदा राख झाली की, सारे काही संपले. याचा अर्थ असा की, जिवंत असेतोपर्यंत शरीराबद्दल अत्यंत मोह बाळगणारा आणि भौतिक आनंदसुखाचीच प्रेरणा देणारा मृत्यूनंतर त्याच्या शवाबद्दल यत्किंचितही आसक्त नाही. निर्जीव शरीर तत्काळ भस्मसात करावे, असे त्याचे दर्शनही सांगते.

भारतीय अध्यात्मधारेचे अनुचिंतक/विचारवंत वैदिक आणि श्रमण यांनी समान पातळीवरून जर कशाला मान्यता दिली असेल तर ती दिली आहे आत्म्याच्या अमरत्वाला! त्यांनी जीवाला जन्म घेताना, वाढताना, स्थिर होताना, ऱ्हासाकडे जाताना आणि मृत्युअवस्था प्राप्त करताना सगळ्या अवस्थांकडे सूक्ष्मदृष्टीने पाहिले आहे. या जीवनाबरोबर राहताना शरीरात अभिन्नपणे वास करणाऱ्या आत्म्याला ओळखण्यासाठी त्यांचा हजारो वर्षांचा स्वाध्याय व तपश्चर्या खर्च झाली आहे. 'मी कोण आहे?' या प्रश्नाबाबत ते युगानुयुगे कुतूहल बाळगून होते. त्यांच्या आत्मसिद्धींचे क्षणही असे होते की, तो क्षण प्राप्त होताच

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दार्शनिकाला, त्या जीवाला मुक्ती प्राप्त झाली. आपल्या भौतिक शरीरात एक असे वेगळे शरीर त्याला दिसले. त्यालाच त्याने अविनाशी आत्मा ही संज्ञा दिली. त्याच्या प्राप्तीने त्याचा सारा दृष्टिकोनच बदलून गेला.

कर्मपरिणामांनी गुंफले गेलेले हजारो योनींतील जन्ममृत्यू पाहून त्यातील नारकी जीवांना होणाऱ्या यातनांचा अनुभव घेऊन जीवाच्या विवेकाने त्यास प्रश्न केला-

''हे जीवा! नाम, रूप आणि गंध, स्पर्शयुक्त या पुद्‌गलांना तू किती वेळा भोगलेस? आयुकर्माप्रमाणेच शेष उरूनही ते निःशेष झाले नाही. वारंवार कापल्या जाणाऱ्या केसांप्रमाणे, काढून टाकलेल्या नखांसारखे पुनःपुन्हा ते जन्मजन्मांतरात वाढतच जातात आणि अजूनही तुझी पुन्हा इच्छा आहेच? कशी आहे ही तहान, ही भूक? भोगत राहण्याची कधीही न संपणारी लालसा? एखादा जेवून उठल्यानंतर त्याच्या उष्ट्या ताटातील उरलेले अन्न खाण्यासाठी ज्ञानी मनुष्य कधी तयार असतो का?[१] हे भव्य! हे बाहेर तुझ्या नजरेला पडणारे जग आणि पत्नी-पुत्र-कुटुंब-मित्र इ. रूपात दिसून येणारे त्याचे अनंत पुद्‌गलस्कंध आहेत. हे तुझे कोणीही नाहीत, हे साररहित आहे. मृगजळ आहे, ते एखाद्या विशाल सरोवराप्रमाणे! नारळाच्या भुशापासून बनवलेल्या लाडवांमध्ये ना गोडी असते ना त्यामुळे भूक शांत होते. तूही त्यांच्यासाठी कुणीच नाही. हा विचार मनात पक्का कर आणि मोक्ष मिळवण्यासाठी मनःस्वास्थ्य मिळव.[२] आत्म्याशी आत्म्याची दर्शन अनुभूती करीत दर्शन-ज्ञानमय होऊन समाधीत लीन हो.[३] हे जे डोळ्यांना मोहित करणारे सर्व पदार्थ आहेत; ते निश्चितच मायानगरीचे ठग आहेत. ते फसणाऱ्यांसाठी मनोहर बाह्यरूपाचा बाजार मांडतात आणि तुला तुझ्या ध्येयपथापासून दूर नेतात.''

ही आत्मदृष्टी प्राप्त करून घेऊन श्रमण संस्कृतीने वैराग्यवृत्तीचा स्वीकार केला. त्यांच्या तपतेजाने, संयमी आचाराने त्यांना भ्रांतिरहित दर्शनाची प्राप्ती झाली. त्यासच

१. 'अहो! मुहुर्मुहुः भुक्ता मया सर्वेऽपि पुद्‌गलाः ।
तेष्वेव भुक्तशेषेषु मम विज्ञस्य का स्पृहा ॥'

२. 'न सन्ति बाह्या मम केचनार्था भवामि तेषां न कदाचनाहम् ।
इत्थं विनिश्चित्य विमुच्य बाह्यं स्वस्थः सदा त्वं भव भद्रमुक्त्यै ॥'

- अमितगती द्वात्रिंशतिका, २४

३. 'आत्मानमात्मन्यवलोकमानस्त्वं दर्शनज्ञानमयो विशुद्धः
एकाग्रचित्तः खलु यत्रतत्र स्थितोऽपि साधुर्लभते समाधिम् ॥'

- अमितगती द्वात्रिंशतिका, २५

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्यांनी सम्यग्दर्शन संबोधले आहे. मिथ्यात्वाचा नाश केल्यामुळे त्यांच्यासमोर आत्मपरिणामांना विशुद्ध करणारे ज्ञान आणि चारित्र्य प्रकट झाले. श्रमणश्रेष्ठांनी भगवंतांच्या दिव्यध्वनीतून प्रसृत झालेल्या 'सम्यग्दर्शन ज्ञान चारित्राणि मोक्षमार्ग:' हे सूत्र प्राप्त केले; जणू त्यांना अनंतानुबंधी कर्मरूपी हत्तीला काबूत ठेवणारा अंकुशच मिळाला. डाळीवरचा छिलका निघावा, तसे मोहाचे बाह्य आवरण निघून गेले. असंख्य रोम छिद्रांनी आच्छादित आणि त्वचेने आवृत्त शरीराला त्यांनी भेदविज्ञानाने जाणले. रक्तमांसयुक्त रूपाला ओळखले. त्यामुळे भोग-बुद्धीपासून त्याची तृष्णा विरक्त झाली. मग, मानव संयमपालन शिकला. अहिंसेचे आचरण त्याने स्वीकारले. लोकांना हिंसेपासून परावृत्त केले. मिथ्याभाषण, ब्रह्मचर्याचा भंग, परिग्रह-परायणता जीवनापासून दूर गेली आणि खोलगट भूमीवर जसे पर्वतांचे पाणी वाहत येऊन एकत्र व्हावे; तसे महाव्रत, मूलगुण व दैनिक आवश्यक कर्तव्ये एकत्र येत गेली आणि आत्मपरिणामांना शुद्धोपयोगात लावू लागले.

पूर्वीचे जीवन हे वासनेचे दास होते. ते आता आत्मरती झाल्यामुळे वासनांवर विजय मिळवणारे प्रभू बनून गेले. हे परिवर्तन माणसाने आपल्या तपश्चर्येने घडवले. चिखलाने भरलेल्या नाल्यात एखादा रथ फसून बसला तर बैलांची जोडी लावून तो रथ बाहेर काढला जातो; त्याप्रमाणे वासनेच्या चिखलात रुतून बसलेल्या जीवनाच्या अध्यात्म-रथाला सम्यग्दर्शन-ज्ञान-चारित्र्य यांनी मिळून बाहेर काढले. तो दिवस महान विजय-दिन होता, मानवाच्या इतिहासातला! आता नरजन्माचे सार्थक झाले होते. अधोगामी वृत्तींचे निर्मूलन करून ऊर्ध्वगामी पथाची ओळख आत्म्याने, आत्म्याच्या सहयोगाने, आत्म्यासाठीच करून घेतली होती. तीर्थंकरांचे तप सफल झाले होते. त्यांच्या दिव्यध्वनीने कोट्यवधी जन्म-जरा-व्याधींनी ग्रस्त असलेल्या लोकांना मुक्तीचा मार्ग दाखवला. महान व्यक्तींचे तप स्व-कल्याणाबरोबरच लोककल्याणही करणारे असते. हा उत्तम तपाचाच स्वाभाविक परिणाम आहे. ज्या वस्तू दुर्लभ आहेत; त्यांच्यासाठी तपश्चर्या करणे आवश्यकच आहे. तपाचे उल्लंघन कोणी करू शकत नाही.[४]

आध्यात्मिक संपदेमुळे मनुष्यात ज्ञान-वैराग्याचा उदय होतो. सत्-असत् यांची व विवेक निश्चयतेची प्राप्ती होते. श्रम आणि तप या दोन्ही संज्ञा अनुक्रमे भौतिक आणि आत्मिक प्रयत्नांचा निर्देश करतात. जेवढे भौतिक-साधनजन्य सुख आहे; त्यासाठी

---

४. 'यद् दुर्गं यद् दुरापंच यच्च दुर्धरतास्थितम् ।
तत् सर्वं तपसा साध्यं तपो हि दुरतिक्रमम् ।।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्रमाची आवश्यकता आहे आणि आत्मसुखाची प्राप्ती करून घ्यायची असेल तर तपश्चर्येची गरज आहे. श्रमाचा परिणाम म्हणजे थकवा, क्लांत होणे तर तपाचा परिणाम आहे, आत्म्याचा उद्धार! म्हणून तप या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द आहे 'पत' (पतन)! जो शारीरिक कष्ट/तप करीत नाही, त्याचे पतन निश्चित आहे. श्रम केल्याने इहलोकीची अस्थायी सुखे मिळू शकतात. परंतु, तपाच्या श्रमाचे परिणाम शुभ होतात. 'विद्यातपभ्यां भूतात्मा'- या भूतपिंड, पुद्‌गलस्कंध शरीराची शुद्धी विद्या व तपानेच होते.

ही विद्या म्हणजे सम्यग्ज्ञान; आणि सम्यक्‌चारित्र्य हे तपाचेच दुसरे नाव आहे. जीवनात जेव्हा सम्यग्ज्ञान आणि सम्यक्‌चारित्र्य सुप्रतिष्ठित होतात; तेव्हाच मांगल्याची, कल्याणाची प्राप्ती होते. बुद्धिमान, चैतन्यशील व्यक्ती हा कल्याण पथ स्वीकारतात आणि नरजन्म सार्थ करतात. जैन तीर्थंकरांच्या या सम्यग्दर्शन ज्ञान चारित्र्यमूलक अध्यात्मसंपत्तीला आचारविचारांच्या नावांनी भाषित केले आहे. विचारपूर्वक सम्यक्‌अध्ययन करून ज्ञानचारित्र्या (दोघांचा समन्वय) ला श्रेयोमार्ग सांगत म्हटले गेले आहे की, 'एकटे ज्ञान पांगळे (पदहीन) असते आणि एकटी क्रिया आंधळी असते.' श्रद्धा नसेल तेव्हा ज्ञान व क्रिया समन्वित असूनही त्याला अर्थ नसतो. मोक्षपदासाठी तर ज्ञान, क्रिया आणि श्रद्धा तिन्ही एकत्रित रूपात असतील तरच प्रयत्न सफल ठरतात.[५] या तिघांचा समन्वय म्हणजे मन-वचन-काया यांचे अनन्यस्थान होय. कारण, कार्य लौकिक असो की पारलौकिक, त्यामध्ये त्रिकरणशुद्धी अपेक्षित आहे. जर, मन-वचन-काया या तिन्हींचा संयोग नसेल तर वारंवार, खूप प्रयत्न करूनही जी कार्ये होतात; त्यामध्ये विलायचीच्या दाण्याचा सुगंध नसतो. विलायचीमधले तीन पापुद्रे आतल्या सुगंधाचे रक्षण करतात. म्हणून, ज्ञानाला क्रियेने सिद्ध करण्यासाठी आणि क्रियेला ज्ञानसहित ठेवण्यासाठी विद्वान या ज्ञान-क्रिया यांच्या उभयसंयोगास आवश्यक मानतात. कारण, अशा संयोगामुळेच एखादा आंधळा व एखादा पांगळा घनदाट अरण्यात जरी भटकत राहिले तरी एकमेकांच्या सहकार्याने गावाकडे जाणारी एखादी पाऊलवाट पकडू शकतात.[६]

---

५. 'ज्ञानं पंगु क्रिया चान्धा निःश्रद्धे नार्थकृद्द्वयम् । ततो ज्ञानक्रियाश्रद्धात्रयं तत्पदकारणम् ।।'

६. 'हतंज्ञानं क्रियाहीनं हता चाज्ञानिनां क्रिया ।
धावन् किलान्धको दग्धः पश्यन्नपि च पंगुलः ।।' - राजवार्तिक
'संयोगमेवेह वदन्ति तज्ज्ञा नह्येकचक्रेण रथः प्रयाति ।
अन्धश्च पंगुश्च वने प्रविष्टौ तौ सम्प्रयुक्तौ नगरं प्रविष्टौ ।।'। - राजवार्तिक

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नाहीतर, मग संसारात वासना वगैरेंनी ग्रस्त झालेल्या मनुष्याची दुर्दशा त्या हरिणीसारखी होईल; जिच्यासमोर हातात बाण घेऊन पारधी/शिकारी उभा आहे. आजूबाजूला जाळे पसरवलेले आहे. मागे धगधगत्या अग्निज्वाला आहेत. डावीकडून एकदम झेप घेणारे शिकारी कुत्रे तिला घेरून आहेत आणि जिच्या पायांमध्ये मरणाच्या भीतीने लपतछपत, अडखळतअडखळत चालणारी तिची छोटी पाडसे आहेत. अशा स्थितीत 'किंकरोमि क्वयामि' - काय करू व कुठे जाऊ... ही पश्चात्तापाची भावनाच तेवढी शिल्लक राहते.

कारण, 'प्रोद्दीप्ते भवने तु कूपखननं प्रत्युद्यम्: कीदृश:'- घराला आग लागलेली आहे आणि तेव्हाच जर विहीर खणायला सुरुवात केली तर घराला आगीपासून कसे वाचवता येईल?[७] ज्ञानपूर्वक क्रिया करणे व ज्ञानाशिवाय क्रिया करणे, यामध्ये हेच महत्त्वाचे अंतर आहे. अशी माणसे क्षमा, त्याग, तप आणि ध्यान तर करतात; पण त्या क्रिया करण्यामागे त्या दृष्टीचा मात्र अभाव आहे, जिला 'सम्यकत्व' म्हटले जाते. त्यांना केलेल्या कर्माचा कोणताच लाभ मिळत नाही. त्यांची क्षमा, त्याग, तप व ध्यान सगळेच निर्बलतेत, नाशात, क्लेशात व अकर्मण्यतेमध्ये परावर्तित होऊन जाते. अशा वृथा - मिथ्या प्रयत्न करणाऱ्यांना उद्देशून भर्तृहरींनी एक सूक्त म्हटले आहे ते असे- 'क्षमा आम्ही केली, पण ती धर्माला अनुसरून, त्या विचाराने केली नाही. घराच्या ऐशआरामाला रामराम ठोकला तरी तो समाधानाने नाही ठोकला. थंडी-ऊन-पाऊस-क्लेश सहन तर केले, पण, त्या मागे तपाची भावना नव्हती. गरिबीमुळे ते सहन केले. आम्ही पण ध्यान केले; परंतु ते धनाचे केले, शिव (मुक्ती) चरणाचे नाही. ज्या जिन आचरणांचे पालन मुनी करतात; ते आम्हीसुद्धा केले. परंतु, आम्हाला त्याचे फळ मात्र मिळाले नाही.[८] कारण, आमची क्षमा आणि मुनींची क्षमा भिन्नभिन्न होती. आम्ही तर...

---

७. 'अग्रेव्याध: करधृतशर: पार्श्वतो जालमाला
पृष्ठे वह्निर्दहति नितरां वामत: सारमेया: ।
एणी गर्भादलसगमना बालकं रुद्धपादा ।
चिन्ताविष्टा वदति हरिणं कि करोमि क्व यामि? ।।'

८. 'क्षान्तं न क्षमया गृहोचितंसुखं त्यक्तं न सन्तोषत:,
सोढा दु:सहशीतवाततपनक्लेशा न तप्तं तप:
ध्यातं वित्तमहर्निशं नियमितप्राणैर्न शम्भो: पदं
तत्तत् कर्म कृतं यदेव मुनिभिस्तैस्तै: फलैर्वंचितम् ।।' - भर्तृहरी वैराग्य, १३

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

'क्षमा क्षमाबिन कीन, बिना सन्तोष तजे सुख ।
सहे शीततप धाम, विना तप पाय महासुख ।।
धरयो विषय को ध्यान, मुक्ति को पथ नहिं ध्यायो ।
तज्यो सकल संसार, प्यार जब उन बिसरायो ।।'

म्हणूनच, शास्त्रकारांनी सम्यक्चारित्र्य-पालनात ज्ञाना (सम्यक्ज्ञान) चा अंतर्भाव असणे आवश्यक मानले आहे. 'कलश' काव्यामध्ये आचार्य अमृतचंद्र लिहितात- 'ज्या व्यक्ती मोक्षप्राप्तीचे साधन असणाऱ्या कर्मांचे दु:खद कष्ट उठवत आहेत; त्यांनी ते करीत राहून आपल्या कष्टाबाबतच्या सहनशीलतेचा परिचय द्यावा आणि जे महाव्रतामुळे व तपाच्या भारामुळे मोडून पडत आहेत; तेही तसेच मोडत राहणार. कारण, ज्ञानाच्या प्रामाण्याविना केलेले कष्टमय प्रयत्न मोक्षप्राप्तीला सहायक ठरत नाहीत. कारण, मोक्षप्राप्तीचे मूळ कारण तर सम्यग्ज्ञानविशिष्ट सम्यक्चारित्र्य हेच आहे. म्हणून ज्ञानगुणवर्जित, ज्ञानाविना आचरलेल्या चारित्र्याने मोक्षप्राप्ती नाही. म्हणून चारित्र्याबरोबर ज्ञानमय दृष्टी आवश्यक आहे. ज्ञान स्व-परप्रत्ययकारक आहे आणि चारित्र्य ही स्वप्रत्ययाने प्राप्त होणारी (दर्शन) दृष्टी सार्थक करण्याचा कल्याणकारी मार्ग आहे, असे म्हणणे जास्त उचित ठरेल. जगाच्या प्रत्येक कार्य-व्यापारात त्याचे सतत होणारे ध्येयाचे दर्शन मूळ आहे. जोपर्यंत कोणते लक्ष्य डोळ्यांसमोर नसते; तोपर्यंत दृष्टी विशिष्ट बिंदूवर स्थिर होत नाही; आणि कुठे जायचे आहे, ते गन्तव्यस्थान निश्चित होत नाही, तोपर्यंत चारित्र्याची संधी मिळत नाही. चारित्र्याचे पूर्ण ज्ञान होत नाही; तोपर्यंत मनुष्य आपल्या नरभवाचे सार्थक करू शकत नाही. मग, अशा सामान्य अवस्थेत 'आहारनिद्रा भयमैथुनानि सामान्यभूतानि पशोर्नराणाम्। म्हणजे, आहार, निद्रा, भय, अब्रह्म इत्यादी मनुष्याच्या सर्व क्रिया पशुवत असतील. मनुष्य दिवस आणि रात्री खाणे, पिणे, झोपणे व मैथुनी सृष्टी उत्पन्न करण्यातच व्यतीत करेल. घोर अंधाराने व्यापलेल्या या रात्रीनंतर पहाट होता होता, काळाच्या उन्मुक्त आकाशात भरारी मारण्याचे निमंत्रण एक दिवस प्राणरूपी पक्ष्याला येईल, त्या दिवशी - 'जब यह मन पंछी उडि जैहें। ता दिन तेरे तन-तरुवर के सबै पात, झरि जैहे।' आणि 'घर के कहें वेगि ही काढो, भूतभये केहि खैहें'- म्हणजे, ज्या दिवशी हा प्राणपक्षी देहरूपी पिंजरा सोडून उडून जाईल तेव्हा या शरीर-वृक्षाची सारी पाने गळून पडतील. ते निष्प्राण शरीर पाहून घरचे लोक म्हणतील- 'अरे, हे प्रेत लवकरात लवकर घराबाहेर काढा. स्मशानात घेऊन जा ते! भूत झाले एखाद्या वेळी तर खाऊन टाकायचे.' आता? आता

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मुक्काम बदलला. मऊ गादी-तक्क्यावर लोळणारा टोचणाऱ्या लाकडावर (सरणावर) आता झोपेल. पत्नीच्या आलिंगनाऐवजी अग्निज्वालांनाच त्याला कवेत घ्यावे लागेल. जळणाऱ्या शरीरातली हाडे निखळून पडतील आणि हसत्या-खेळत्या जीवनाचे थोड्या राखेत, थोडे विस्तवात रूपांतर होऊन जाईल. गर्व, घरदार, धनसंपत्ती, पत्नी, पुत्र, वैभव इथेच या धरेवर राहिले आणि जीव निघून गेला. अनंतानुबंधी कर्मांच्या साखळीत आणखी थोडी वाढ करून गेला. योगी ज्या गोष्टींचा स्वेच्छेने त्याग करतो; त्याच गोष्टींचा त्याग भोगीला विवश होऊन करावा लागतो. एकाने त्याग केला व तो दीन बनला. विषय तर संपणारच होते. विषयसुखाची रात्र लांब/दीर्घ असू शकते, पण शाश्वत नाही. परंतु, जेव्हा ही रात्र संपते, तेव्हा विषयाधीन माणसाच्या मनात अंधार पसरतो. त्या इंद्रियसुखांची पुन्हा प्राप्ती व्हावी म्हणून तो संसाररूपी रात्रीची उरलेली, उष्टी मदिरा पुनःपुन्हा पित राहतो. अहो! त्याग आणि त्यक्त यामध्ये केवढा फरक आहे! वेळ येण्याआधीच जो स्वतःच स्वेच्छेने विषयसुखाचा त्याग करतो, तो अनंतसुखशांतीचा धनी होतो.[१] खरे पाहता, विषयांच्या भोवऱ्यात गटांगळ्या खाणारा जीव नरभवाचे सार्थक करण्यास असमर्थच आहे. कारण बालपण खेळण्या-बागडण्यात अज्ञान अवस्थेत जाते. यौवन विषयासक्तीत जाते आणि वृद्धावस्था तर अशी स्थिती आहे की एक पाय स्मशानात व दुसरा रोग-वृद्धत्वानं शिथिल, गलितगात्र झाला तरी संसारात आत्मरूप दर्शनाच्या संधीवर आवरण पडले आहे. या पंकपथावर चालणारा मनुष्य जेव्हा यमराजाचा पाहुणा होतो तेव्हा असे वाटते की, माणकासारखे मौल्यवान रत्न गमावलेली एखादी थकलेली-दमलेली, लुटली गेलेली व्यक्ती शवांची शांती भंग करण्यासाठी स्मशानात येऊन पोहोचली आहे. अनंत निराशेचे कफन ओढून त्याने ही यात्रा पार पाडली आहे. संसारतपाच्या आगीत पार होरपळून गेलेले धगधगते निखारेच चितेचे रूप घेऊन इथे पोहोचले आहेत. जन्मभर कुद्रप धान्याची शेती करताना तिच्या चारही बाजूंनी चंदन-कापुराचे कुंपण लावणारा, चिखल धुण्यासाठी केशराची शेती मलिन करणारा एखादा दुर्भाग्यशाली अविवेकी जणू आयुष्यभर मिथ्यात्वाच्या पाऊलवाटेवरून चालत राहिला आहे. नक्कीच हा कधीतरी विषयांच्या मागे वेड्यासारखा

---

१. 'क्लिश्यन्तां स्वयमेव दुष्करतरैर्मोक्षोन्मुखैः कर्मभिः,
क्लिश्यन्तां च परे महाव्रततपो भारेण भग्नाश्चिरम् ।
साक्षान्मोक्ष इदं निरामयपदं संवेद्यमानं स्वयं,
ज्ञानं ज्ञानगुणं बिना कथमपि प्राप्तुं क्षमन्ते न हि ।।' - समयसार कलश, १४२

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

धावत राहिला असेल. परंतु, म्हातारपणाने त्याला भेदज्ञान नाही, पण कमीतकमी शरीर भेदज्ञान/शारीरिक स्थितीतला फरक नक्कीच जाणवला असेल. कोणे एके काळी तन-मन एक होत होते, मनाच्या आज्ञेनुसार शरीर धावत होते. परंतु, काळाच्या प्रभावाने शरीर जर्जर झाले; तेव्हा मनाच्या तृष्णेचे अंकुशही बोथट झाले.

तनामनात द्वंद्व सुरू झाले. शरीर मेलेल्या मांसपेशी बनले; पण तरुण मन मात्र विषयांच्या चिंतनातच बुडून गेले. तृष्णेचा हा मित्र, वासनेचा सहचर, कुमार्ग-व्यसनी, मिथ्यात्वाचा दास असलेले मन मृगतृष्णेच्या जंगलात भटकतच राहिले.[१०] तेच तर सौंदर्याच्या जाळ्यात भरकटत जाते. मायेच्या महालात पोहोचते. भिंतीवर टांगलेल्या घड्याळाच्या लंबकाप्रमाणे इकडेतिकडे दोलायमान होत राहते. ते आपल्या स्वरूपाकडे स्थितप्रज्ञतेने पाहूच देत नाही.

हजारो छिद्र असलेल्या चाळणीतून पाणी पडून जावे; तसे इंद्रियवश माणसाचे आयुष्य संपून जाते. अशी व्यक्ती नवीननवीन विचार तर करीत राहते; पण ते विचार प्रत्यक्ष कृतीत आणू शकत नाहीत. करेन... करेन... आज करू शकलो नाही, उद्या करेन, उद्या नाही तर परवा नक्की करेन... नंतर, मग इतक्या लवकर करायची काय गरज आहे? अजून किती आयुष्य पडले आहे, असा विचार करीत तो मृत्यूला विसरतो.[११] परंतु, हे एकतर्फी विस्मरण झाले. मृत्यू थोडाच अनंतकाळासाठी त्याला विसरणार आहे? नाही! मृत्यू शरीरधारीमध्ये समाविष्ट आहेच आणि हा प्राण धारण करणारा क्षणाक्षणाला मरतो आणि जिवंतही होतो. प्रत्येक श्वासोच्छ्वासात जीवन-मरण सामावलेले आहे. निघालेला श्वास पुन्हा परतून आला नाही तर त्याच क्षणी मरण ठरलेलेच! श्वास तर शरीरातून निघतात, पुन्हा प्रवेश करतात. मग, काय भरवसा की, पुढचा श्वास परत येईलच याचा? म्हणून, एका समंजस व्यक्तीने म्हटले आहे- 'श्वः कार्यमद्य कुर्वीत'- उद्याचे काम आजच करा, कारण उद्या कोणाचे काय होईल, हे कुणालाच माहीत नसते. बुद्धिमान तर

---

१०. 'अवश्यं यातारश्चिरतरमुषित्वापि विषया,
वियोगे को भेदस्त्यजति न जनो यत्स्वयममून् ।
व्रजन्तः स्वातंत्र्यादतुलपरितापाय मनसः,
स्वयं त्यक्त्वा ह्येते शमसुखमनन्तं विदधति ।' - भर्तृहरी बैरा. १६

११. 'बालपने में ज्ञान न लह्यो, तरुण समय तरुणीरत रह्यो ।
अर्धमृतकसम बूढ़ापनो कैसे रूप लखै आपनो ।।' - छहढाला १४

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तोच आहे, जो उद्याचे काम आजच करून टाकतो.[१२] सागराच्या मध्यभागातून चालणारी नौका आणि आकाशात अधांतरी उडणाऱ्या विमानाचा काय भरवसा? कुठली लाट त्याला बुडवेल किंवा कुठले तुफात त्या विमानाला घेरून टाकेल?

शेवटी, हे तर निश्चित आहे की, एक दिवस जन्माचा आहे तर तसाच एक दिवस मृत्यूचाही येणारच! त्याचे येणे कोणी रोखू शकत नाही. मोठमोठे शूरवीर, धनिक आणि धर्मात्मा काळासमोर पराजितच झाले आहेत. कबीराचे पद आहे- 'आसपास जोधा खडे बहुरि बजावें गाल। मंझ महल से ले चला ऐसा काल कराल'... एका राजाचा मृत्यू जवळ आला होता. खूप औषधोपचार झाले. फायदा झाला नाही. जे पूर्णतः तुटले आहे, ते पुन्हा सांधता येईल का? 'रज्जुच्छेदे के घटं धारयंति' पाण्याने भरलेली घागर विहिरीतून ओढून घेताना मध्येच दोर तुटला आणि घागर विहिरीत जाऊन पडली. अशा वेळी घागरीला विहिरीत पडण्यापासून कोण वाचवू शकत होता? हीच राजाची अवस्था होती; आसन्नमरण होता तो! मृत्यूच्या अगदी जवळ जाऊन ठेपला होता. राजाचे स्वामिभक्त, वीर सैनिकांनी भोवती उभे राहून राजाला घेरून टाकले. असे कडे त्यांनी राजाभोवती केले होते की, आता काळ कसा येईल, कुठून येईल आणि राजाला स्पर्श करेल कसा, असे वाटत होते. परंतु, ते सगळे मंदबुद्धी बघतच राहिले. काळ आला व राजाचे प्राण हरण करून गेलासुद्धा! सारे शूर योद्धे दिंडोरा पिटत राहिले, वल्गना करीत राहिले आणि हे खरेच आहे की, पैसा दिल्याने, औषध घेतल्याने आणि शिपायांची फौज उभी केल्याने जर मृत्यूला थांबवता आले तर कमीतकमी श्रीमंत, वैद्य आणि राजेलोक तर जिवंतच राहिल्याचे दिसले असते. परंतु, मृत्यू सगळ्यांसाठी समान आहे. म्हणून-'मणिमंत्र तंत्र बहु होई। मरते न बचावे कोई।' मरणाऱ्याला कुणीच वाचवू शकत नाही.

एका कवीने म्हटले आहे- 'बोटाच्या अग्रभागी अगदी थोडेथोडे काजळ घेतल्याने काजळाची डबी रिकामी होते, एकेक कण वाहून नेत मुंग्या एखादे वारूळ उभे करतात.' यातले मर्म जाणणाऱ्याने वेळ व्यर्थ घालवता कामा नये.[१३] दान, अध्ययन, तप काही ना काही केले पाहिजे. अहो! संचयाचे खूप महत्त्व आहे. कणाकणानेच कोठार पूर्ण भरते

---

१२. 'जीर्यन्ति वर्णितः केशा दन्ता जीर्यन्ति जीर्यतः ।
जीर्यतीन्द्रियसंघातस्तृष्णैका तरुणायते ।।'

१३. 'करिष्यामि करिष्यामि करिष्यामीति चिन्तया
मरिष्यामि मरिष्यामि मरिष्यामीति विस्मृतम् ।।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आणि क्षणाक्षणाचा केलेला उपयोग माणसाला बृहस्पती बनवतो. 'कुरल' काव्यातील एक सूक्त असे सांगते की, असा विचार करू नका की, जीवनाची संध्याकाळ हीच शुभकार्याला उत्तम/योग्य आहे. (कारण, एका श्वासाच्या तारेवर वाजणाऱ्या जीवनसंगीताचा आरोह-अवरोहाचाच जिथे पत्ता नाही, त्या जीवनाचा अंतिम स्वर कोणता असेल... म्हणजेच जीवनाची सायंकाळ कधी होईल, हे कसे सांगता येईल?) जेव्हा कधी वेळ मिळेल तेव्हा तो धर्मासाठी खर्च करायला पाहिजे.[१४] मृत्यूनंतर हा धर्मच जीवाबरोबर जाणार आहे.

वस्तुतः चांगल्या संकल्पांची पूर्तता करायची असेल तर काळाची प्रतीक्षासुद्धा करायला नको. एक दंतकथा आहे- धर्मराज युधिष्ठिर एकदा देवपूजा आटेपून मंदिरातून परत येत होते. तेव्हा, एका याचकाने त्यांच्यासमोर हात पसरला. धर्मराजाच्या उजव्या हातात पूजेचे पात्र होते. म्हणून, त्यांनी डाव्या हाताने याचकाला काही द्यायचे ठरवले. तेव्हा, तो हुशार याचक म्हणाला- 'दान उजव्या हातानेच द्यायला हवे.' युधिष्ठिर म्हणाले, 'दान घेणाऱ्याने हात बदलण्यास लागणाऱ्या वेळेची उपेक्षा करू नये. कारण, या क्षणाला मी दान देऊ इच्छितो; पण हात बदलताबदलता माझे परिणाम बदलू शकतात. मग, हात तर दक्षिण (उदार) होईल आणि मनाचे परिणाम मात्र वाम (प्रतिकूल) होतील. म्हणून, 'शुभस्य शीघ्रम्!' शुभकार्यात घाई करावी. कारण, 'श्रेयांसि बहुविघ्नानि'- शुभकार्यात विघ्ने खूप येतात. म्हणून, 'गृहीत इव केशेषु मृत्युना धर्ममाचरेत्' मृत्यूने केस हातात पकडूनच ठेवले आहेत, असे समजूनच धर्माचरण करावे. याचे कारण असे की, ज्या जीवाचे ज्या देश, काळात, ज्या विधानाने जन्म-मरण, सुख-दुःख, रोग-शोक, हर्ष-विषाद इत्यादी श्री जिनेंद्र भगवंतांनी पाहिले आहेत; ते सर्व त्याच क्षेत्रात व त्याच काळात, त्याच विधानानुसार होणार आहेत. त्यांना नष्ट करण्याची शक्ती कोणातच नाही. मग, तो इंद्र असो की तीर्थंकर! कोणतीच शक्ती जन्म-मरणाचे परिवर्धन-नियोजन करण्यास समर्थ नाही.[१५] इथे तर, 'एक उत्पद्यते तनुमानेक एव विपद्यते। एक एव हि कर्म करुते ह्येकलः फलमश्नुते।' हा देहधारी जीवात्मा एकटाच उत्पन्न होतो, एकटाच मरतो. एकटाच कर्म करतो व एकटाच फळ भोगतो. यात कोणाचा दुसऱ्याचा वाटा नाही. हां, आपल्याच

---

१४. 'न कश्चित् कस्य जानाति किं कस्य श्वो भविष्यति ।
अतः श्वः करणीयानि कुर्यादद्यैव बुद्धिमान् ।।'

१५. 'अंजनस्य क्षयं दृष्टवा वल्मिकस्य च संचयम् ।
अवन्ध्यं दिवसं कुर्याद् दानाध्ययनकर्मभिः ।।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पुरुषार्थाने, तपत्यागाने आपल्या कर्मांचा क्षय केला जाऊ शकतो. हे शरीर अनित्य आहे. वैभव शाश्वत नाही आणि मृत्यू तर सदैव पाठीशी आहे. हा विचार न विसरता धर्मसंग्रह केला पाहिजे.[१६] संसाराची अनित्यता जाणून योगी बनलेले विरक्त मनुष्ये इंद्राप्रमाणे वैभवाचा त्याग करून मुक्तीसाठी तप करतात.[१७] कारण, तत्त्वज्ञान हेच असे एक साधन आहे; जे लोकपरलोकात सुख देणारे आहे.[१८]

हे भेदमूलक तत्त्वज्ञान जाणून न घेतल्याने मनुष्य संसारातील परपदार्थांच्या मोहात अडकतो आणि स्वतःला भाग्यवान समजतो. परंतु, विषयभोगांची प्राप्ती ही मनुष्याचे दुर्भाग्य आहे आणि त्यांपासून विरक्त होणे, हे त्याच्या भाग्योदयाचे सूचक आहे.[१९] हेच सत्य आहे. कारण, जर मनुष्याला विषयादी सुखासारख्या दुष्कर्मबंधनांनी जखडून टाकले; तर अनेक जन्मांतरांची भवशृंखलाच त्याच्यासाठी तयार झालीच म्हणून समजावे. यापरते, दुसरे दुर्भाग्य कोणते असू शकते? परंतु, उपदेशाचा परिणाम सर्वांवरच होतो, असे नाही. सगळ्या जगाला प्रकाशाचा संदेश देणारा सूर्य घुबडासाठी अंधार उत्पन्न करतोच ना! कोणाला वैराग्याची सुमधुर अमृतफळेसुद्धा आंबट लागतात आणि कोणी विषयांच्या कटू रसातच मधुरतेचा आस्वाद घेतो. म्हणून, तर आजतागायत २४ तीर्थंकरांची दिव्यध्वनी सगळ्याच संसाराला मिथ्यात्वापासून विमुक्त करू शकली नाही. आजही एखादा वैराग्यशतकात न्हातो आहे; तर एखादा शृंगारशतकाची पारायणे करूनही तृप्त होतच नाही. यालाच म्हणतात- 'काहू के शृंगार रूचि, काहू के रूचि नीति। काहू के वैराग्यरुचि, जुदी-जुदी परतीति'- कोणी सरळसरळ राजमार्गावरून चालतो; तर कोणाला सापाची वाकडी चाल आवडते. एखादा कांचन-कामिनीत रती होतो, तर कोणी वनातील-पर्वतांमधील

---

१६. 'अण्डु अविरम एन्नादु अरम सेय्य मद्र अदु । पोण्डु गाल पोण्डुत्तणे ।।' - कुरल ३६/४

१७. 'जं जस्स जम्हि देमे जेण विहाणेण जम्हि कालम्हि ।
णाद जिणेणणियदं जम्मं वा अहव मरणं वा ।।
तं तस्स तम्हि देसे तेण विहाणेण तम्हि कालम्हि ।
को सक्कइ वारेंदु इंदोवा अह जिणिंदो वा ।।' १२-१३

१८. 'अनित्यानि शरीराणि विभवो नैव शाश्वतः ।
नित्यं सन्निहितो मृत्युः कर्तव्यो धर्मसंग्रहः ।।'

१९. 'अत एव हि योगीन्द्रा अपीन्द्रत्वार्हसम्पदम् ।
त्यक्त्वा तपांसि तप्यन्ते मुक्त्यै तेभ्यो नमोनमः ।।' - क्षत्रचुडा, ३-२५

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गुहेत निर्ग्रंथ होऊन राहतो. कोणी एकान्तप्रिय असतो, तर कोणाला चारचौघांत बसायला-बोलायला आवडते. रागी असो की विरागी... ते आपापल्या स्वभावानुसार निवडलेल्या मार्गावर चालत राहतात. अशा स्थितीत तेच धन्य आहेत; जे शुभपरिणामात राहतात आणि संसाराच्या वारंवार परिक्रमणातून स्वत:ला वाचवण्याचा मार्ग शोधून काढतात.

'स्वामिकार्तिकेयानुप्रेक्षा'मध्ये लिहिले आहे- जो उत्तम गुण ग्रहण करण्यास तत्पर आहे, उत्तम साधूंच्याबद्दल विनयशील आहे, सहधर्मीविषयी अनुरागभाव ठेवतो; तो उत्कृष्ट सम्यग्दृष्टी जीव भव्य आहे.[२०] नरभवाचे सार्थक करायचे असेल तर सम्यग्दृष्टीची अत्यंत आवश्यकता आहे. 'सौभाग्यं हि दुर्लभम्'- सौभाग्याची प्राप्ती अत्यंत दुर्लभ आहे आणि सम्यग्दृष्टी असणेही अतिशय सौभाग्याचीच गोष्ट आहे. ज्या जगात आपण राहतो; त्या जगात जितके परिग्रहाचे पदार्थ आहेत, त्यांच्याशी आपला संपर्क येणे आणि त्यांच्याबद्दल मोह वाटणे, ही काही असाधारण गोष्ट नाही. ते स्वाभाविकच आहे; पण विचारी जीवाला जर गुरुकृपेने सम्यक्त्व प्राप्त झाले तर साळी आणि टरफले ही जशी भिन्न आहेत; त्याप्रमाणे त्याला देह व आत्मा भिन्न आहेत, याचे ज्ञान व्हावे व त्याने वैराग्य धारण करावे. वैराग्यधारणा हा काही कृत्रिम मार्ग नाही तर तो ज्ञानाचा सहज असा परिणाम आहे. एखादी वस्तू विषारी आहे, हे ज्ञान ज्याला होते, तो ती वस्तू कधीच ग्रहण करेल काय? अशाच प्रकारे ज्याला शरीराविषयी, संसार, विषयादीसंबंधात त्याची क्षुद्रता, अनित्यता, दुःखमूलकता आदींचे ज्ञान झाले, तो पुन्हा त्याच स्थितीत राहणे पसंत करेल का? भौतिक सुखाच्या रंगीबेरंगी रूपाचे वर्णन करताना कविवर्य पं. बनारसीदास यांनी लिहिले आहे की-

'नानीमरण, सुताजनम, पुत्रवधू आगौन।
तीनों कारज एक दिन भये एक ही भौन।।
यह संसार विडंबना देख प्रकट दुख-भेद।
चतुर चित्त त्यागी भये, मूढ न जानहि भेद।।'

अर्थात, हा संसार किती विचित्र आहे आणि दयनीयसुद्धा! याचेच चित्रण वरील पद्यांशात पुरेसे केलेले आहे. कोण्या एका घरात आजी (आईची आई-नानी) मरण पावली. घरातले सगळेच शोकमग्न होते. त्याच वेळी त्या घराच्या कर्त्या पुरुषाच्या पत्नीने कन्येला जन्म दिला आणि ज्या वेळी मृत नानीची तिरडी बांधली जात होती, त्याच वेळी घराबाहेर

---

२०. 'तत्वज्ञानं हि लोकानां (जीवानं) लोकद्वयसुखावहम्' - ३-१८.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सुनेची वरात येऊन थांबली. आनंद, दुःख, कन्याजन्माचा चिंतनीय प्रसंग... एकाच दिवशी तीनतीन सुख-दुःखाने संमिश्र प्रसंग समोर आले. किती आश्चर्यकारक विडंबन म्हणावे याला? जसे क्षणाक्षणाला नाट्यमंचावरची पात्रे, दृश्ये व अंक बदलू लागले आहेत, हे पाहून चतुर मनामध्ये वैराग्याचे भाव उत्पन्न होतात. पण, मूर्खाला त्याचे काही नाही. त्याला काही फरक पडत नाही. वारंवार मूर्ख सुखदुःखातून बाहेर पडतात व पुन्हा त्यातच शिरत राहतात. म्हणून, 'शोकस्थान सहस्राणि'[२१] हा श्लोक त्याच मूर्ख-बुद्धीच्या लोकांना लागू होतो. या श्लोकाचा अर्थ असा की, शोकाचे व भयाचे शेकडो-हजारो प्रसंग मूर्ख लोकांच्या जीवनात दररोज येत राहतात. परंतु, विवेकशील मनुष्यांसमोर येण्याची त्यांची हिंमत नसते. संसारातील कृत्रिम सुखात हरवून गेलेल्यांची हीच परिणती होते. ते क्षणात सुखी तर क्षणात दुःखसंतप्त होतात, राहतात. रहाटाची पाण्याची पिंपे क्षणाक्षणाला भरतात व रिकामी होतात, त्याप्रमाणे! तन-मनाने अस्वस्थ असणारी व्यक्ती एकाच भवात असंख्य भवांची दुर्गती एकत्र करूनच जगते. ते एवढेच बघतात की, फुललेली फुले शिळी झाली आहेत, हिरवेगार वृक्ष निष्पर्ण होत आहेत, वृद्ध होत चाललेल्या मानवी-पिढ्या कालाच्या विक्राळ जबड्यात सामावून जात आहेत आणि प्रत्येक श्वास मृत्यूच्या अधिकाधिक जवळ चालला आहे. तरीही, त्यांच्या मनात अमर होण्याची कल्पना आहेच. या जीवनाचा कुठे शेवट नसेल तर फार चांगले, हीच चिंता त्यांना सतावते आहे. कुठून तरी एखादे अमरफळ मिळावे आणि नेहमीकरिता मृत्यूपासून सुटका व्हावी, असे त्यांना वाटते. पण, हे अमरफळ त्यांना कोठून आणि कसे मिळेल? आंबे खाण्याची इच्छा करून बाभळीच्या झाडाकडे गेले तर रसाळ फळे कशी मिळतील? आगीसाठी ओंजळ धरली असेल तर पाण्याची शीतल धार कशी मिळेल? जे रात्रंदिवस विषयरूपी विषाचे भक्षण करीत आहेत, त्यांना अमृत नाही प्राप्त होणार! संयमाचे अमृतपात्र ज्यांच्याजवळ नाही, ते बिचारे अल्पजीवी असणार! महाप्राण आणि दीर्घायुषी होणे, त्यांच्या नशिबी नसते.

पाण्याच्या लाटेवर नाचणाऱ्या बुडबुड्यांची उपमा देत अशा दयनीय प्राण्यांविषयी लिहिले गेले आहे की- 'माणसाने जर आपल्या पूर्ण आयुष्यापर्यंत जगायचे ठरवले तर तो १०० वर्षे जगू शकतो. त्यातील झोपेचा रात्रीचा कालावधी अर्धा वजा केला तर उरली ५० वर्षे! बालपण अपरिपक्व व वृद्धावस्था दुर्बल म्हणून ५० वर्षांतले दोन भाग आणखी कमी

---

२१. 'न विषयभोगो भाग्यं, भाग्यं विषयेषु वैराग्यम् ।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

झाले. तारुण्यात काही करण्याची क्षमता असते; पण अधिकांश लोक 'तरुण समय तरुणीरत रह्यो' या उक्तीनुसारच आपले तारुण्य घालवतात. उत्कट पुरुषार्थ करून विषयसुखांना दुरूनच नमस्कार करणारे महात्मा फार विरळ असतात. याशिवाय, युवावस्थेचा हा काळ संयोग-वियोग आणि उद्योग, अर्थार्जन, आधि-व्याधी यामध्येही व्यतीत होतो. हे दिवस म्हणजे पाण्यावरच्या तरंगांसारखे, जे निरंतर अस्थिर असतात.[२२] एक क्षणभरसुद्धा थांबून विचार करायला वेळ नसतो. जणू ही एक गर्दीच! त्या गर्दीत सतत धक्केच धक्के बसताहेत. - जन्मानंतरचे शैशव, वर्धमान यौवन आणि क्षयाची वाटचाल करणारे वार्धक्य... एकामागून एक विनाशकारी लाटा येत आहेत. थांबण्यासाठी वेळ नाही व कोणी थांबूही देत नाही. झाडाला कळीच्या रूपाने फूल येते, तेव्हाच पायाशी काटे उगवतात. नंतर, जेव्हा पूर्ण उमलून कळीचे फूल होते, ते फूल काही करू इच्छिते. आपल्या सुवासाने गल्ली सुगंधित करण्यास समर्थ बनते, तेव्हाच काळ माळ्याच्या वेशात येतो आणि ते फूल फांदीवरून तोडून घेतो. पाकळ्यांचे सौरभ-स्वप्न धुळीला मिळते. ही कथा केवळ एका फुलाची नाही. एका मनुष्याचीही नाही; तर विश्व-उद्यानात फुलणाऱ्या सगळ्याच फुलांची आहे. यौवन-धनसंपत्ती प्राप्त असलेल्या मनुष्याच्या वंशानुवंशांची ही गाथा आहे. याला सतत विकासाचे व सतत मिलनाचे वरदान मिळत आले आहे आणि मिळतच राहणार. तोपर्यंत हे मिळेल जोपर्यंत हा आत्मस्वरूपाला जाणून घेऊन दु:खक्षय, कर्मक्षय, बोधिलाभ, सुगतिगमन, समाधिमरण आणि जिनगुणसंपत्ती आत्मसात करण्यास समर्थ होत नाही, तोपर्यंत! दुर्बलता, बंधने उत्पन्न करणाऱ्या परिग्रहापासून मुक्त होऊन सर्वथैव शक्तिमान व तत्पर होत नाही तोपर्यंत! या तत्परतेसाठी त्याला धावत कुठेतरी दूर जायचे नाही. हे सगळे तर त्याच्या आतच विद्यमान आहे. जसे तिळात तेल, दह्यात तूप, नदीप्रवाहात पाणी व लाकडामध्ये अग्नी तसे! एखाद्याने इंद्रियातीत होऊन या अपार विक्रमाचा परिचय करून तर बघावे.[२३] उगीचच सागरकिनारी बसून मी समुद्रात डुबकी मारायला गेलो तर? या भीतीचा विचार करणारे काय प्राप्त करू शकतात? एकाने खूप छान म्हटले आहे- 'जिन खोजा तिन पाईयाँ गहरे पानी पैठ। मैं बोरी डूबन डरी रही किनारे बैठ।' तर, जो डुबकी मारायला घाबरतो, त्याला जलाच्या तळाशी असलेले मोती मिळत नाहीत. ते तर

---

२२. 'उत्तमगुण गहणरओ उत्तम साहूणविणयसंजुतो ।
साहम्मिय अणुराई सो सद्दिट्ठी हवे परमो ।।' - स्वामिकार्ती, १२/१३५

२३. 'शोकस्थानसहस्राणि भयस्थानशतानि च । दिवसे दिवसे मूढमाविशन्ति न पण्डितम् ।।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तपोमय अवघड जीवनापासून दूर पळतात व संसार वाढवत राहतात. कारण, तपाने तापण्यासाठी निर्ग्रंथ होणे, मूलाचाराचे पालन करणे, महाव्रतधारी होणे आवश्यक आहे. मऊमऊ गाद्यागिरद्यांवर लोळण्याचा आनंद घेणाऱ्यांना दर्भशय्या कशी काय आवडेल? 'अरि मित्र महल मसान कंचन, कांच निन्दन थुतिकरन। अर्घावतारन असिप्रहारन में सदा समता धरन। तप तपै द्वादश धरै वृषदश रतनत्रय सेवै सदा' - या ओळींचा अर्थ जेवढा ऐकायला कर्णमधुर आहे; तेवढेच त्याचे पालनसुद्धा कठीण आहे. परंतु 'रक्तेन दूषितं वस्त्रं न हि रक्तेन शुद्धयति'- रक्ताने घाण झालेले वस्त्र रक्तानेच धुता येत नाही, हेसुद्धा लक्षात ठेवले पाहिजे. आत्म्याची चादर विषयरूपी चिखलाने घाण होत आहे; ती विषयांनीच स्वच्छ करू शकत नाही. वासनापंकाला धुऊन काढण्यासाठी संयमाचा साबणच समर्थ आहे. विषयांच्या उग्र अग्नीला विरक्तीच्या जलानेच विझवता येते. जोपर्यंत समदृष्टी प्राप्त होत नाही, तोपर्यंत रत्न आणि काच भिन्नभिन्न दिसतात. समताभाव/दृष्टी आली की, दु:खाची चीड/वैताग येत नाही. सुखाबद्दलची इच्छा, हाव वाढत नाही. राग-भय-क्रोध मग जवळ फिरकतसुद्धा नाहीत. त्याला मुनित्व प्राप्त होऊन जाते.[२४] ही बोधिलाभाची स्थिती आहे. रत्नत्रयाची दुर्लभ आराधना आहे. मुनिदीक्षा धारण करणे आहे. यापेक्षा त्रैलोक्यात श्रेष्ठ/सरस अशी दुसरी संपत्ती नाही.[२५] ज्यांना कर्माचा क्षय करायचा आहे ते याच मार्गावर येतात, जिनवाणीचे श्रवण करतात. भोगांना रोगांप्रमाणे मानून त्यापासून विरक्त होतात. उत्तम गृहस्थ किंवा उत्तम श्रमण होऊन तीर्थंकर परमदेवांच्या चरणांचा प्रसाद प्राप्त करून घेऊन नरभवाचे सार्थक करतात. पं. दौलतराम म्हणतात-

'यह मानुषपर्याय, सुकुल सुनिनो जिनवानी।
इह विधि गये, न मिले, सुमणि ज्यों उद्‌धिसमानी।।'

(छहढाला ४-५)

❖❖❖

---

२४. 'आयुर्वर्षशतं नृणां परिमितं रात्रौ तदर्धं गतं,
तस्यार्द्धस्य परस्य चार्धमपरं बालत्ववृद्धत्वयोः ।
शेषं व्याधिवियोगदुःखसहितं सेवादिभिर्नीयते
जीवे वारितरंगचंचलतरे सौख्यं कुतः प्राणिनाम् ।।' - भर्तृहरी, वैराग्य, १०७

२५. 'तिलेषु तैलं दध्नीव सर्पिरापः स्रोतःसु अरणीषु चाग्निः ।
एवमात्मनि गह्यतेऽसौ सत्येनैनं तपसा योऽनुपश्यति ।।' - उपनिषद

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गुरुसंस्थेचे महत्त्व

समाज आपल्या आदर्शांच्या आधारावर उभारलेला आहे. आदर्श चारित्र्याच्या वज्रलेपामुळे त्यास चिरंजीवत्व लाभते. ज्या समाजाजवळ अपार भौतिक व लौकिक विभूती आहेत; परंतु अध्यात्माने अत्यंत उन्नत असा पारलौकिक उद्देशच नसेल तर, असा समाज म्हणजे चैतन्याचा संपूर्ण अभाव असलेला निष्प्राण देह होय. आणि त्या शवरूपात उरलेल्या देहाचे रक्षणही होऊ शकत नाही. अनेक कुरूप व्यक्ती आत्म्याच्या उन्नत सौंदर्य-लोकात अप्रशस्त वाटत नाहीत. कारण, त्यांच्या शारीरिक कुरूपतेवर आत्मिक सौंदर्याने मात केलेली असते. ही आध्यात्मिक श्रीमंती मनुष्याच्या महान प्रभावी पुण्याची देणगी आहे. अध्यात्मभावाने वागणाऱ्या मनुष्याच्या मनात नेहमीच अवंचक म्हणजे प्रामाणिकपणाचे, सचोटीचे भाव असतात. ते गुण त्याला अखंडपणे परिणामविशुद्धीकडेच नेतात. परिणामांची पवित्रता हीच धर्माची प्रसवभूमी आहे. धर्म म्हणजे सम्यक्त्वविशुद्ध आत्म्यामध्ये प्रतिफलित झालेली कृतीयोग्य अशी व्यवहारसंहिता आहे. लोकांमधील अशा प्रकारच्या व्यावहारिक आचरणास चारित्र्य ही संज्ञा आहे. म्हणून, असे म्हटले पाहिजे की, सम्यक्त्वाने प्रक्षालित केलेले चारित्र्य हाच धर्म आहे.

स्वामी कार्तिकेयानुप्रेक्षाच्या ४७८ व्या गाथेत[१] धर्माचे वस्तुस्वभाव, जीवस्वभाव, मोक्षमार्गनिरूपक स्वभाव आणि अहिंसा परमस्वभावाच्या रूपात निरूपण केले गेले आहे. 'चारित्तं खलु धम्मो' असे सांगून धर्माचार्यांनी धर्म म्हणजे आचरणरूपी शेतीतील अमृतफल असे म्हटले आहे. अशा प्रकारे धर्माचा पाया चारित्र्यावर आणि चारित्र्याची बैठक ही तीर्थंकर परमदेवांची वीतरागमुद्रा धारण करणाऱ्या निर्ग्रंथ मुनींवर आधारलेली आहे.

---

१. 'धम्मो वत्थुसहावो खमादि भावो य दसविहो धम्मो।
रयणत्तय च धम्मो जीवाणं रक्खणं च धम्मो ।।' - स्वा. कार्ति. ४७८

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सम्यक्चारित्र्याच्या दृष्टीने पाहता २८ मूल गुणांचे पालन करणारे दिगंबर मुनी म्हणजे धर्माचे मूर्तिमंत रूप आहे. ते स्वत: त्या सम्यक्चारित्राचे पालन करतात आणि भव्यजनांच्या मनात व व्यवहारात त्या आचरणाबद्दल आस्था, अनुकरणाच्या भावांना जागृत करतात. मन-वचन-कायेने एकरूप असणारे निर्ग्रंथ मुनी हेच खरे गुरू आहेत.

'पंच-वि-गुरवे' असे म्हणत आचार्य कुंदकुंदांनी मुनींच्या महानतेचे वर्णन केले आहे. निर्ग्रंथ मुनीच्या गुरूपदाची प्रतिष्ठा दृढ व संवर्धित करणारे, आचार्यकल्प पंडितप्रवर श्री टोडरमलजी यांनी 'मोक्षमार्ग प्रकाशक'मध्ये एक सूक्तीवजा वाक्यरचना केली आहे. त्यात ते म्हणतात- 'निर्ग्रंथ दिगंबर मुनीव्यतिरिक्त दुसऱ्या कोणास गुरु मानले तर त्यात नुकसात ते कोणते - अशी शंका एखाद्याने उपस्थित केली तर?' सर्वांची मने जिंकणारे आणि हजरजबाबी असे पंडितजी यावर म्हणतात- 'हंस पक्षालाच हंस म्हटले जाते. जर एखाद्या सरोवरात हंस दिसला नाही तर बगळ्याला हंस मानणार का?' हा त्यांचा युक्तिवाद सडेतोड आहे आणि तो गुरुत्वपदासाठी हपापलेल्या बगळ्यांचे प्रतिनिधित्व अमान्य करणारा आहे.

हे साधू जनलोकात उत्तम असल्याने शरण जाण्यास योग्य आहेत. सम्यक्आचाराचे पालन करणारे असल्याने मार्गदर्शन, उपदेश करण्यास योग्य आहेत. पंडित आशाधरजींनी लिहिले आहे- कल्याण करून घेण्याची इच्छा बाळगणाऱ्यांनी गुरूंची उपासना निर्दोषपणे केली पाहिजे.[२] गुरूच्या गरुडपंखाखाली राहून वाटचाल करणाऱ्यांना विघ्नरूपी सर्प कधीच बाधा आणू शकत नाही. निर्ग्रंथ गुरू त्यागी असतात. त्यागमार्गाचा उपदेश करणारे असतात. याच कारणामुळे ते विश्वसनीय आधारसुद्धा आहेत. जगात राग आणि त्याग अशा दोनच तर प्रवृत्ती आहेत. यापैकी राग ही बंधनमूल प्रवृत्ती आहे आणि त्याग ही निवृत्तीतून येणारी प्रवृत्ती आहे. सगळे संसारी जीव रागाच्या असीम चिखलात रुतून बसले आहेत. त्यांना मार्ग दाखवणारा जर स्वत:च रागाच्या सागरात खोल गटांगळ्या खात असेल; तर मार्गदर्शनाच्या नावाखाली तो आपल्या अनुयायांना रागाच्या दलदलीत फसवणार नाही तर मग काय त्यागाच्या सिद्धशिलेवर बसवणार?

या मतानुसार जो स्वत: निंदामुक्त मार्गावर प्रवृत्त आहे, तसेच अन्य जनांनाही जो निंदेपासून मुक्त असलेल्या मार्गावर प्रवृत्त करतो, कोणत्याही प्रकारची इच्छा ठेवत नाही;

---

२. 'उपास्या गुरवो नित्यमप्रमत्तैः शिवार्थिभिः ।
तत्पक्षताक्ष्यर्पक्षान्तश्चरा विघ्नोरगोत्तराः ।।' - सागार, २/४५

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तोच वास्तविक गुरू आहे आणि आत्मकल्याण इच्छिणाऱ्या व्यक्तीने त्याच्याच सेवेमध्ये स्वतःला मग्न ठेवावे. कारण, असा गुरूच स्वतःसुद्धा हा भवसागर पार करतो आणि लोकांनाही तारून नेण्यास समर्थ असतो.[३]

गुरू शब्दाचा अर्थ स्पष्ट करण्यासाठी गुरू आणि लघू या दोन परस्परविरोधी शब्दांद्वारे गुरू शब्दाच्या गुरुत्वाकडे इशारा केला आहे. तराजूचे जे भारी पारडे असते; ते आपल्या वजनामुळे दुसऱ्या पारड्यापेक्षा भारी ठरते. त्यात नक्कीच काहीतरी जास्त असते. आपले विशिष्ट गुण, धर्म आणि ज्ञान यामुळेच ही गुरूता लघुतेपेक्षा भिन्न असल्याचे मला दिसून येते. महाकवी कालिदासाने म्हटले आहे- 'रिक्तः सर्वो भवति हि लघुः पूर्णता गौरवाय' म्हणजे, जो रिकामा आहे तो लघू आहे व जो पूर्ण (भरलेला) आहे तो गुरू आहे, भारी आहे. इथे 'पूर्णता' हा एकच शब्द गुरूच्या ज्ञानगंभीर परिपूर्ण महत्त्वाला सूचित करीत आहे. संबंधदर्शक गुरुशिष्य या जोडशब्दात गुरू उपदेशक, आचार्य या अर्थाने रूढ आहे. कलिकालसर्वज्ञ या पदवीने विभूषित आचार्य हेमचंद्र यांनी 'गुरू' या शब्दाचा प्रयोग महान, बृहस्पती, पिता, धर्मोपदेशक, भारी व जरारहित या अर्थाने केला आहे.[४] ज्ञानवृद्ध, चारित्रवृद्ध व्यक्तीला गुरू म्हणणाऱ्यांचा अभिप्राय असा आहे की, आत्मतत्त्व स्वरूप निकषातून उत्पन्न झालेल्या भेदज्ञानाने ज्यांना ज्ञानचक्षू प्राप्त झाले आहेत; त्यांनाच विद्वानांनी वृद्ध (विकसित) म्हटले आहे. याच प्रकारे जे तप, शास्त्र-अध्ययन, धैर्य, ध्यान, विवेक यमसंयमाने परिपक्व आहेत; तेच 'वृद्ध' या संज्ञेस पात्र आहेत.[५] केवळ वयाने मोठा असल्याने किंवा ज्याचे केस पांढरे झाले आहेत, अशास वृद्ध म्हणता येत नाही.

तरुण असूनही जो ज्ञानाने वृद्ध आहे; तोच गुरू आहे.[६] यास्तव, गुरुत्व हे द्रव्यलिंगीमध्ये कमी व भावलिंगी अर्थाने अधिक श्रेष्ठ आहे. सम्यक्त्वपूर्ण दर्शनज्ञान

---

३. 'अवद्यमुक्ते पथि यः प्रवर्तते प्रवर्तयत्यन्यजनं च निःस्पृहः ।
स एव सेव्यः स्वहितैषिणा गुरुः स्वयं तरंस्तारयितुं क्षमः परान् ।।' - सक्ती मुक्तावली

४. 'गुरुर्महत्यांगिरसे पित्रादौ धर्मदेशके । अलघौ दुजरि चापिं' - अभिघानचिन्तामणी

५. 'स्वतत्वनिकषोद्भूतं विवेकालोकवर्धितम् ।
येषां बोधमयं चक्षुस्ते वृद्धा विदुषां मताः ।।
तपः श्रुतधृतिध्यानविवेकयमसंयमैः ।
ये वृद्धास्तेऽत्र शस्यन्ते न पुनः पलितांकुरैः ।।' - ज्ञानार्णव. १५/४-५

६. 'न तेन वृद्धो भवति येनास्य पलितं शिरः ।
यो वै युवाप्यधीयानस्तं देवाः स्थविरं विदुः ।।' - महाभारत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चारित्र्याने, आरंभपरिहारपूर्वक संपूर्ण कर्मांच्या गाठी सोडवल्याने, ज्ञानसहित केलेल्या आगम स्वाध्यायाने, कठीण तपश्चर्येने आणि रागादिपरिग्रहत्यागाने प्राप्त झालेल्या स्व-पर भेदज्ञानाने व्यक्तीमध्ये गुरुत्व दृश्यमान होते आणि हेच गुरुत्व त्यास पूजनीय, वंदनीय असे स्थान बहाल करते.

ज्याप्रमाणे शुक्ल पक्षात चंद्र एकेक कलेला साठवत पौर्णिमेला उज्ज्वलता देणारे संपूर्ण प्रकाशबिंब प्राप्त करून घेतो; त्याच प्रमाणे संपूर्ण ज्ञानावरणीय कर्मांचे उन्मूलन करून, मोहनीय कर्मांचा नाश करून गुरू स्वतःमध्ये स्थित असलेल्या शुद्धात्म्याला जाणून घेऊन खऱ्या अर्थाने गुरुत्व संपादित करतो आणि तेव्हाच तो लोकामध्ये उच्च आसनावर सूर्यासमान विराजमान होऊ शकतो. नाहीतर, मग द्वितीयेची क्षीण चंद्रकोर जशी पश्चिम क्षितिजावर थोडा वेळ आपले प्रकाशित रूप दाखवते आणि लगेच अस्ताला जाते; त्याप्रमाणे शास्त्राचे अध्ययन न करणे, कोणत्याही प्रकारचे तप न करणे, संयमाने न वागणे/संयमरहित जगणे, हे सर्व करणारी व्यक्ती आपल्या वाट्याला आलेले आयुष्य भोगून सामान्य स्थितीत मृत्यू पावते. मग, ती व्यक्ती नभोमंडळात कितीही उंचीवर आसीन असली तरी तिची ही गत होते.

परंतु, विशिष्ट गुरूंची महानता कायमच स्थिर असते आणि सम्यग्ज्ञान, भक्ती आणि वैराग्याची प्रकाशकिरणे प्रस्फुटित करीत राहते. रत्नदीपाला प्रकाशण्यासाठी पहाटेची वाट बघावी लागत नाही; तद्वत स्वयंज्ञानी गुरू सूर्याप्रमाणे रोजरोज मावळत नाही. ते सदासर्वदा समभावाच्या व्यासपीठावर स्थित राहून अबाधितपणे ज्ञान-चारित्र्य प्रदान करीत राहतात. कधीच अस्तंगत हात नाहीत. बाहेरच्या व आतल्या संपूर्ण दोषरूपी अंधाराचे ते निवारण करतात आणि शिष्यांसाठी कधीही कमी न होणारा प्रकाश प्रदान करतात. गुरूच्या याच महतीला नमस्कार करणाऱ्यांनी म्हटले आहे की- 'ज्ञानरूपी अंजनशलाकेने ज्यांनी अज्ञानाच्या अंधारात भटकणाऱ्या लोकांचे डोळे उघडले, त्या सद्गुरुंना नमोस्तु!'[७]

जे भाग्यशाली आहेत, त्यांना गुरूचा कृपाप्रसाद लाभतो.[८] जिनेंद्र-भगवंतांची

---

७. 'अज्ञानान्धस्य लोकस्य ज्ञानांजनशलाकया ।
चक्षुरुन्मीलितं येन तस्मै श्रीगुरवे नमः ।।'

८. 'जैनो धर्मः प्रकटविभवः संगतिः साधुलोके, विद्वद्गोष्ठी वचनपटुता कौशलं सत्क्रियासु ।
साध्वी लक्ष्मीश्चरणकमलोपासनासद्गुरुणां, शुद्धं शीलं मतिविमलता प्राप्यते भाग्यवद्भिः ।।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

भक्ती, साधूंची संगती, विद्वानांसोबत बसून काही वेळ शास्त्रचर्चा, वाणीमध्ये वाक्पटुत्व असणे, कार्य करण्याच्या हेतूने उत्तम व्यवस्थापनाचे चातुर्य, उत्तम मार्गाने मिळवलेले धन, शुद्ध शील, बुद्धीचे पावित्र्य आणि सद्गुरुंच्या चरणकमलाची उपासना, कमळात भ्रमर जसा अहर्निश रमतो; तशी गुरूपदाची भक्तिरुची हे सगळे पुण्याच्या फळाशिवाय कसे शक्य आहे? शकुनाचा विचार करणाऱ्यांच्या मते भारद्वाज, हंस आणि सोनेरी जलपक्षी यांचे दर्शन शुभसूचक आहे. उषाची लाली ज्याप्रमाणे उगवत्या नवीन सूर्याचा संकेत देते; त्याप्रमाणे महाव्रती निर्ग्रंथ मुनींचे दर्शन आणि सान्निध्याचा लाभ हे शुभोदयाचा संकेत देतात. अशा सच्चारित्र्य साधूंना पाहून सुभाषितकार 'कुलं पवित्रं जननी कृतार्था वसुन्धरा पुण्यवती बभूव' किंवा 'धन्य जननी, धन्य भूमि, धन्य नगरी, धन्य देश, धन्य करणी, धन्य सुकुल, धन्य जहाँ साधुप्रवेश' असे म्हणू लागतात. खरेच, जे सर्व निंद्य गोष्टीपासून विरक्त आहेत, जे दुसऱ्यांचे हित करण्यामध्ये मग्न आहेत, सर्वस्वत्यागी, परमविरागी आहेत, ज्यांनी मोह ममतेवर विजय मिळवला आहे, कामवासनेवर काबू ठेवला आहे, जे तपत्याग संयमाचे आदर्श आहेत, जे महाव्रतधारी व दिगंबर आहेत; त्यांच्यासाठी 'धन्य' शब्दाव्यतिरिक्त दुसरा कोणता शब्द आपण योजू शकतो?

असे गुरू जिथे विराजमान आहेत; तिथे प्रत्यक्ष धर्म स्थिर झालेला आहे, असे मानावे. अशा गुरूंच्या विहारमार्गात ऋतुक्रमाचे भान न ठेवता निसर्ग फुलतो, पल्लवित होतो, फळतोही. दुर्भिक्ष दूर पळून जाते. उत्तम/योग्य वृष्टी, धनधान्याचा सुकाळ होतो. सोमदेवसुरी यांनी 'यशस्तिलक चम्पू'मध्ये याच आशयाचे एक हृद्य पद्य लिहिले आहे[१] सूर्याचा उदय ही अंधाराच्या विनाशाची अबाधित घोषणा असते; त्याप्रमाणे पिंछी कमंडलू हाती घेतलेले, जिनेंद्रमुद्रा धारण केलेले, सम्यक्चारित्र्यनिष्ठ, २८ मूलगुणांचे पालन करणारे, संयम - स्वाध्यायपरायण अशा मुनींचा विहार हासुद्धा प्रजेच्या कल्याणाचा संकेत आहे. सोमदेवसुरींचे हे सूक्त म्हणजे फक्त वाणीच्या रोचकतेचे उदाहरण नाही; तर त्यामध्ये अनुभवाचा अमृतस्पर्शही जाणवतो.

एक मराठी कवी लिहितात- 'साधु संत येती घरा, तोचि दिवाळी दसरा' - दसरा आणि दिवाळी हे दोन्ही उत्सव एका दिवशी, बरोबर येत नाहीत. काही दिवसांचे अंतर त्या दोहोत असते. परंतु, तो दिवस मात्र नक्कीच महद्भाग्याचा की, ज्या दिवशी तपस्वी

---

१. 'पद्मिनी राजहंसाश्च निर्ग्रन्थाश्च तपोधनाः ।।
यं देशमुपसर्पन्ति सुभिक्षंतत्र निर्दिशेत् ।।' - यशस्तिलकचम्पू

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मुनी एखाद्याच्या घराचे अंगण पवित्र करतात. मग, त्या दिवशी काळातले अंतर विसरून दसरा-दिवाळी या दोन्ही सणांचा जेवढा उल्हास, आनंद असतो; तो त्या एकाच दिवसात एकवटला जातो. धन्य होत ते कवी लोक ज्यांना गरूच्या वंदनेसाठी असे काव्य सुचते आणि जे आपल्या कवित्व सामर्थ्याला सत्य दिशेकडे नेऊन कृतार्थतेचा अनुभव घेतात.

जीवनाच्या संस्कारशाळेचा आरंभ गुरूच्या चरणांच्या भक्तीने होतो. अंक आणि अक्षर यांच्या अभ्यासासाठी जसे एखादे बालक लौकिक शिक्षण देणाऱ्या शाळेत जाते; त्याप्रमाणे सम्यक्चारित्र्याचे मूळ अहिंसा परमधर्माचे शिक्षण घेण्यासाठी भव्य जीवांना गुरुचरणांची धूळ सदोदित कपाळी लावून अभ्यास केला पाहिजे. गृहस्थाच्या दैनिक षट्आवश्यक क्रियांमध्ये गुरुपास्ती (गुरूची उपासना) अंतर्भूत आहे. गुरूंच्या सतत सान्निध्यात राहिल्याने मन, वचन, कायेची विशुद्धी आपोआप व्हायला लागते. वाक्संयम, इंद्रियसंयम व आहारसंयम यांचे सहजपणे पालन होऊ लागते. नीतिकारकाचे एक अनुभवसिद्ध वचन याचा पुरावाच देते- 'यादृशै सेव्यते पुम्भिस्तादृग भवति पुरुषः' म्हणजे, मनुष्य ज्या प्रकारच्या संगतीत उठतो, बसतो तसाच तो बनतो. पाणी एकच-पण समुद्रात ते खारट, गायीच्या स्तनात दूध, नद्यांमध्ये पाणी आणि हिमालयात बर्फ बनून जाते. हा संगतीचा सिद्धान्त आहे.

उत्तम गुरुभक्तीमुळे प्राणिमात्रास काय करावे व काय करू नये, यासंबंधीचा विवेक प्राप्त होतो. स्व-पराचा प्रत्यय देणारी भेददृष्टी लाभते. जीवनाचे मार्गक्रमण उत्तम रीतीने कसे करावे, हे सांगणारे आत्मिक विचार प्राप्त होतात. 'गुरु स्नेहो हि कामसूः' गुरूचा शिष्यावर असणारा स्नेह गुरूच्या आंतरिक इच्छेचा पूरक आहे. परंतु, त्या स्नेहाच्या अंतर्बाह्य स्वरूपांमध्ये कधीकधी मार्दव तर कधी कठोरता यांचे द्विधा दर्शन घडते. कारण, गुरू शिष्याला योग्य आणि निर्दोष बनवू इच्छितात. म्हणून, कुंभ बनवणाऱ्या कुंभारासारखी गुरूंना निर्मितीसाठी कठोर आणि मृदू प्रवृत्ती स्वीकारावी लागते. चाकावर मडके बनवताना कुंभार एक हात मडक्याच्या आत ठेवतो आणि त्यास नीट आकार देता यावा; म्हणून बाहेरून थापटी मारतो. कुंभाराशिवाय दुसरा कोणी मडक्याला थापटी मारेल तर, त्यावर आघात करेल तर ते मडके तुटून जाईल. कारण, आघाताने वस्तू तुटतेच, ते स्वाभाविक आहे. परंतु, कुंभाराचा आघात असा असतो की, तो कलशाला/घड्याला सुंदर, सुडौल आकार देतो. याचे कारण असे की, घड्याला थापटताना, आघात करताना त्याचे भाव कलशनिर्मितीचे असतात, मोडतोडीचे/विध्वंसाचे नसतात आणि घड्याचे रक्षण करणारा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हात आतून लावलेलाच असतो.

अगदी याचप्रमाणे अंतरात सदैव करुणाजलाला धारण करणाऱ्या गुरुंची बाह्य शुष्कता किंवा कोरडेपणा कलशाला पूर्णत: घडवणाऱ्या आव्यासारखा शिष्याची बुद्धी व चारित्र्य यांचे पोषण करणाराच असतो. त्यामुळेच शिष्य जीवन कौशल्याने व्यतीत करू शकतो. याच आशयाचे एक हिंदी सूक्त आहे-

'गुरु कुलाल, शिशु कुम्भ है, धडधड काढत खोट ।
अन्दर हाथ पसार के, बाहर मारत चोट ।।'

कवी भूधरदास यांनी संसाराला समुद्र व गुरुला जहाजाची उपमा देत लिहिले आहे- 'ते गुरु मेरे मन बसो, जे भव जलधि जहाज। आप तिरे पर क्तारहि ऐसे श्रीगुरुराज।।' आणि खरेच या संसारसागरात उन्मत्तपणे उसळणाऱ्या विषयवासनांच्या, कषायांच्या विपुल तरंगप्रहारांनी शिष्यरूपी जहाज छिन्न-विच्छिन्न होऊ पाहते. परंतु एखाद्या कुशल खलाशाप्रमाणे जहाज वल्हवित पार पोहोचवणारे फक्त गुरूच असतात. नाहीतर मग अज्ञानशिळेवर बसलेला मनुष्य बुडून जातो.

गुरूच ज्ञानरूपी चिंतामणी देतो आणि त्या चिंतामणीच्या कधीही नष्ट न होणाऱ्या प्रकाशात सन्मार्ग-कुमार्ग यांना जाणून घेऊन शिष्य स्व-परविवेक अंगी बाणतो. गुरूच्या सहवासाशिवाय मिळवलेले ज्ञान संदिग्ध असते. गुरुमुखातूनच शास्त्र ऐकण्याची जी परंपरा आहे, ती याचेच द्योतक आहे. ज्ञानरूपी नेत्रवान गुरूचे कोणीही उल्लंघन करीत नाही. सम्यग्दर्शनज्ञानचारित्र्याचे प्रतीक असलेल्या गुरूंच्या कृपेने लोक-परलोकात जे काही प्राप्त करण्यास योग्य आहे; ते मिळवण्याचा मार्ग उपलब्ध होतो. 'रत्नकरंडश्रावकाचार'मध्ये अत्युत्तम तपोनिधी साधूंची थोरवी गाताना त्यांना प्रणाम (नमोऽस्तु) करणारे, दान (आहारदान) करणारे, उपासना, भक्ती, स्तुती करणारे श्रावक हे उच्च गोत्र, भोगैश्वर्य, लोकप्रतिष्ठा, सुंदर रूप व कीर्तिसंपन्न असण्याचा उल्लेख केला[१०] आहे. साधूंच्या केवळ दर्शनानेही पुण्याचा बंध होतो. साधू तीर्थरूप आहेत. तीर्थाटन केल्याचे पुण्य तर वेळ आल्यावरच फलदायी ठरते. परंतु, साधुदर्शनाचे पुण्यफळ तर अगदी तत्क्षणी मिळते.[११] यासंदर्भात सहेतुक प्राप्तीही होते. गुरू आत्महितात रात्रंदिन लीन असतात आणि त्यांच्या

---

१०. 'उच्चैर्गोत्रं प्रणतेर्भोगो दानादुपासनात् पूजा ।।
भक्तेः सुन्दररूपं स्तवनात् कीर्तिस्तपोनिधिषु ।।' - रत्नकरंड. ११५

११. 'साधूनां दर्शनं पुण्यं तीर्थभूता हि साधवः कालेन फलते तीर्थ सद्यः साधुसमागमः ।।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सान्निध्यात राहणाऱ्यांनाही ते आत्मकल्याणाकडे प्रवृत्त करतात. हेच आत्म-हित-अहित परिज्ञान प्राप्त करणे जीवनात सर्वश्रेष्ठ समजले जाते. 'बुद्धः फलं ह्यात्महित प्रवृत्तिः' एखादा बुद्धिमान असेलही; पण आत्मपरिणती-रहित असेल तर त्याची कीवच करायला हवी. तपधारी असल्याने गुरुजन हितमितभाषी असतात. आत्मपरिणामाच्या विशुद्धीसाठी ते जास्तीतजास्त मौन पाळतात. उपवास, ध्यान, सामायिक यात निमग्न असतात. अशा अवस्थेतही ते वाणीने उपदेश करू शकत नाहीत. तरीपण, केवळ मुद्रेवरून आगमाचे रहस्य, मोक्षमार्ग यांचे मौन निरूपण करण्यास ते समर्थ असतात.

मूर्तमिव मोक्षमार्गमवाग्विसर्गं वपुषा निरूपयन्तं' असे लिहीत आचार्यांनी त्यांच्या महाफलदायी तप:साधनेस अर्घ्यांजली वाहिली आहे. एका नीतिज्ञाने म्हटले आहे की, साधुजन उपदेश देतात तेव्हाच नव्हे तर ते जेव्हा सामान्यपणे संवाद करीत असतात; तेव्हाही अमूल्य अशी उपदेशवाणी त्यांच्या मुखातून प्रवाहमान होत राहते.[१२] हा विचार अत्यंत सुंदर तऱ्हेने 'छहढालाकार' मांडतात-

'जग सुहितकर सब अहितकर श्रुतिसुखद सब संशय हरैं ।
भ्रमरोगहर जिनके वचन, मुखचन्द्र तैं अमृत झरैं ।।'

भले ऊस गोडीशिवाय काय देऊ शकतो? फुलाकडून सुगंध आणि मधाशिवाय दुसरे काय मिळणार? कापराच्या डबीचे झाकण जितक्या वेळा उघडाल; तेवढ्या वेळा सुगंधाने प्राण तृप्त होऊन जातील. शुष्क वाळलेले वन-वृक्ष हिरवेगार करून सोडणे हेच तर वसंताचे काम आहे. गुरुजन सहजपणे उद्विग्नतारूपी गजाचा अंकुश बनून तिच्यावर मात करतात. ते स्वतः समभावी तर असतातच आणि संसारी जीवांमध्येही समभाव निर्माण करतात. धर्माची अमृतवाणी, पद्ये लोकांच्या मनामध्ये रुजवत राहतात, पसरवत राहतात. हेच त्याचे महत्त्व आहे; जे दिगंबरत्वानंतर त्यांना जास्तच वेढून टाकते.

'वे गुरुचरण जहाँ धरे जग में तीरथ तेह । सो रज मम मस्तक चढ़ो भूधर माँगे ये ह।' त्या गुरुचरणांची धूळ मस्तकी घेण्यास सारा संसारच भूधरांच्या बरोबर आहे. कातंत्रकारांनी त्या अडीच द्वीपात विद्यमान असलेल्या तीन कमी नऊ कोटी मुनिश्वरांना गुरुभक्तिपूर्वक 'नमोऽस्तु' म्हटले आहे.[१३] युगानुयगे भव्य जीवांनी गुरूची उपासना करून स्वर्ग प्राप्त केला आहे. संपूर्ण पापांचा नाश करणारा, सर्व कामना पूर्ण करणारा आणि सर्व मंगलांचे मंगल

---

१२. 'परिचरितव्याः सन्तो यद्यपि नोपदिशन्ति ते । तेषां स्वैरकथालापा उपदेशा भवन्ति हि ।।'

१३. 'गुरु भक्त्या वयं सार्धद्वीपद्वितयवर्तिनः । वन्दामहे त्रिसंख्योननवकोटिमुनीश्वरान् ।।'' - कातंत्र

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असणारा प्रथम मंगल 'पंचनमस्कार मंत्र' वरील पंचगुरुंचाच अचिंत्य चिंतामणी असा प्रभावी मंत्र आहे.

तप, ज्ञान आणि चारित्र्यसंपन्न असणे गुरूंसाठी आवश्यक आहे. या भवरूपी जंगलातील दुर्गम, खडतर मार्गावर पथदर्शक होऊन संपूर्ण श्रावक समाजाला अनुशासित करीत अग्रगामी चालण्याचे निरूपण गुरूमहाराजांसाठी केले गेले आहे. त्यामध्ये शब्दाद्वारे व्यक्त न करताना असे सूचित केले आहे की, समाज ज्या गुरूंचे वैयावृत्य करतो, ते गुरू धर्माचे साक्षात रूप असावेत. तप-ज्ञान व सम्यक्चारित्र्यावर त्यांची अढळ श्रद्धा असावी. त्यांचे आचरण आणि तप पाहून समाज स्वतःच नतमस्तक व्हावा. कारण, काळाच्या प्रभावामुळे आज फक्त भारतीयांमध्येच नाही तर सगळ्या विश्वाच्याच नागरिकांमध्ये भौतिकतेने प्रवेश करून घर केले आहे. त्यागवृत्तीकडे आश्चर्य, उपेक्षा, कुतूहल या दृष्टीने पाहिले जात आहे. नवे युग, नवीन पिढीचे लोक जर धर्मासंबंधी आस्था बाळगणारे असतील; तर धर्माच्या दृष्टीने ही मोठीच जमेची बाजू आहे आणि जर ती थोडी असेल किंवा कमी होणारी असेल तर तिचे पुनश्च संवर्धन करणे, हे कर्तव्यच आहे.

संवर्धनाची ही जबाबदारी चतुःसंघाचीच आहे. तथापि श्रावकाहून जास्त त्यागी असणाऱ्यांचा सहभाग यात अधिक आहे. नव्या युगाचे श्रावक नव्या वातावरणात वाढत आहेत. अत्यंत भौतिक, सुखसोयींनी युक्त, वातानुकूलित घरात सहजपणे शिरू शकणाऱ्या विविध वैचित्र्यपूर्ण गोष्टींच्या सावलीत जगत आहेत. आजच्या श्रावकाला जर धर्माबद्दल आस्था नसेल, गुरूंकडे बघून जर त्यांच्या मनात संशय निर्माण होत असेल, तर त्यात केवळ त्याचा दोष आहे, असे मानता येणार नाही. तो देशविदेशांत शिक्षण घेण्यासाठी, पर्यटनासाठी येत-जात असतो. जगातील वेगवेगळ्या धर्मगुरूंना पाहण्याची, त्यांना ऐकण्याची संधी त्याला मिळते. अशा परिस्थितीत वेशासंबंधी आस्था असूनही तो (गुरू) गुणसहितही असला पाहिजे, ही विशेष अपेक्षा त्याने केली तर ते सुसंगतच आहे. या आधुनिक युवकास जबरदस्तीने श्रद्धावान बनवणे बृहस्पतीलासुद्धा शक्य नाही. मग, दुसरा उपाय हाच एक शिल्लक उरतो की, ज्ञानचरित्र्याच्या मार्गदर्शनाने गुरूंनी त्यांचा भौतिक अहंकार नष्ट करावा व आत्मिक चेतनेचा प्रत्यय आणून द्यावा. जर ते तसे करू शकत नसतील तर लोकविमुखतेसाठी त्यांना सज्ज व्हावे लागेल.

कारण, 'न धर्मो धार्मिकैर्विना'- आत्मकल्याणार्थ साधना करणाऱ्या साधूला हे तसे पाहता अनिवार्य समजले जात नसले तरी जेव्हा धर्मनाशाची शक्यता उद्‌भवते; त्या वेळी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मात्र लोकांशी संपर्क/संवाद साधून त्यांना आस्थावान बनवून आणि धर्मासंबंधीचे अज्ञान, अल्पज्ञता, शंका, भ्रम आणि अनिश्चितता यांचे निर्मूलन करणेच हितकारक आहे. प्राचीन काळी ज्यांनी अखंडितपणे विहार केला, विविध प्रकारच्या लोकांच्या मनातील कट्टरता, आग्रह, हट्टाग्रही वृत्ती जाणून घेण्यासाठी अनेक वेष परिवर्तनसुद्धा केले; त्यांना समकालीनांनी, वारसदारांनी वादिराज आणि सिद्धसारस्वत म्हटले. पण, त्यांची मूळ आत्मप्रवृत्ती लोकोन्मुख नव्हती. तथापि, देश, काल आणि जिन धर्माच्या संरक्षणासाठी, संवर्धनासाठी त्यांना तसे करणे भाग पडले.[१४] आज विविध धर्मांमध्ये पुरातन काळासारखी सरळ/थेट टक्कर द्यावी लागत नाही. धर्मचर्चेसाठी त्या काळी असणारी 'आखाडा पद्धती' जिला शास्त्रार्थ असेही म्हणत; ती कुठे दिसत नाही. परंतु, धर्माप्रति सगळीकडेच एक तटस्थता, उदासीनता आणि उपेक्षावृत्ती पसरत चालली आहे. ही स्थिती त्या शास्त्रार्थ-काळापेक्षाही जास्त भयावह आहे. त्यांना वीतराग असूनसुद्धा स्वतःला कवी, वादिराज, पंडित, भविष्यवेत्ता/ज्योतिषी, दैवज्ञ, भिषक (वैद्य), मांत्रिक-तांत्रिक आणि आज्ञासिद्ध सिद्धसारस्वत[१५] या रूपात स्वतःला प्रस्तुत करणे भाग पडले... तर, याचा अर्थ हाच आहे की, जैन धर्मासाठी तसे करण्याला परिस्थिती त्यांना भाग पाडत नव्हती. म्हणून, ही वेशभूषेतील, नेपथ्यातील विविधतासुद्धा त्यांचे एक तपच असे. कारण, तसे त्यांना अनिच्छेनेच करावे लागे.

'इच्छानिरोधस्तपः' इच्छांचा निरोध करणे हेसुद्धा तप आहे. म्हणूनच, आचारांगधारी असण्याबरोबरच धर्माचे रक्षण करण्याची जबाबदारी ज्याच्यावर आहे तो, जिनागम व जैनेतर वाङ्मयातला अभ्यासू विद्वान असणे, मेरुपर्वताप्रमाणे तो अकंप-स्थिर असणे, पृथ्वीप्रमाणे क्षमाशील असणे, सागराची मल-दोष वेगाने वाहून नेण्याची क्षमता त्याच्या अंगी असणे आणि सात प्रकारच्या भयापासून तो विमुक्त असणे, या गोष्टी त्याच्यासाठी

---

१४. 'कांच्यां नग्नाटकोऽहं मलमलिनतनुर्लाम्बुशे पाण्डुपिण्डः
पुण्ड्रोड्रे शाक्यभिक्षुर्दशपुरनगरे मिष्टभोजी परिव्राट् ।
वाराणस्यामभूवं शशधरधवलः पाण्डुरागस्तपस्वी
राजन्! यस्यास्ति शक्तिः स वदतु पुरतो जैननिर्ग्रन्थवादी ।।' - आ. समंतभद्र

१५. 'आचार्योऽहं कविरहमहं वादिराट् पंडितोऽहम्
दैवज्ञोऽहं भिषगहमहं मांत्रिकस्तांत्रिकोऽहम् ।
राजन्नस्यां जलधिवलयामेखलामिलाया-
मात्रासिद्धः किमिति बहुना सिद्धसारस्वतोऽहम् ।।' - आ. समंतभद्र

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आवश्यक मानल्या गेल्या आहेत.[१६] एवढेच नव्हे तर ज्ञान व तपाला धारण न करणाऱ्यांना साधुसंघात 'गणपूरक' (फक्त जैन साधूंच्या संख्येत वाढ करणारा) म्हटले आहे.[१७] जर साधूला ज्ञान आहे व तप नाही, तप आहे पण ज्ञान नाही किंवा तप आणि ज्ञान दोन्हीही आहेत, अशा तिन्ही शक्यतांबद्दल समाधान व्यक्त केले गेले आहे. परंतु, ज्ञान-तप दोन्ही नसतील तर मात्र त्याला कोणतेच स्थान नाही.

गुरू शब्दाचा अर्थ लावणाऱ्यांनी 'गु' आणि 'रू' या दोन्ही अक्षरांचा क्रमशः अर्थ अंधार आणि त्याचे निवारण करणारा असा घेतला. अंधाराचा (अज्ञानरूपी तिमिर) नाश करणारा तो 'गुरू' असे म्हटले आहे.[१८] या योग्यतेस धारण करणाऱ्यांची 'भवाब्धितारक' असे संबोधून स्तुती केलेली आहे. प्राचीन काळापासून तर आतापर्यंत अशा प्रभावशाली गुरूंची एक परंपरा चालत आलेली आहे. त्या परंपरेने धर्म आणि समाज जे एकमेकांना उपकृत करणारे आहेत; त्यांना अन्यान्याश्रयसंबंधात बांधून ठेवले आहे. आचार्य समंतभद्र, आचार्य अकलंकदेव, आचार्य शांतिसागर महाराज आणि पूज्य गणेशप्रसादजी वर्णी त्याच परंपरेचे विशेष ख्यातनाम असे आधारस्तंभ म्हटले जातात. यापैकी आचार्य समंतभद्रांना तर धर्मप्रभावनेच्या क्षेत्रात अखंडितपणे लेखन व वादभिक्षा अशा दोनदोन प्रांतांत एकाच वेळी काम करावे लागले. कधी ते पाटलीपुत्र, मालव, सिंधू, ढाका (प. बंगाल), कांचीपूर, विदिशा (भेलसा) मध्ये वाददुंदुभी करीत. विद्वानांनी भरलेल्या विद्धतापूर्ण, सोन्यासमान तेजस्वी किरणांनी आभूषित अशा राजसभांमध्ये ते जाऊन पोहोचतात,[१९] तर कधी रत्नकरंडक, युक्त्यनुशासन, देवागम, स्तुतिविद्या आणि स्वयंभूस्तोत्राच्या अमृताने चिंब अशा पद्यरचनेच्या निर्मितीत मग्न असत. साधारणपणे असेच भाग्य आ. अकलंकदेवांनाही प्राप्त झाले होते.

---

१६. 'आचारांगधरो वा तात्कालिकस्वसमयपारगो वा, मेरुरिव निश्चलः क्षितिरिव सहिष्णुः
सागर इव बहिः क्षिप्तमलः, सप्तभयविप्रमुक्त आचार्यः ।' - आ. वीरसेनस्वामी

१७. 'ज्ञानं पूज्यं तपोहीनं ज्ञानहीनं तपोहितम् ।
यत्र द्वयं स देवः स्याद् द्विहीनो गणपूरणः ।।'

१८. 'गु-शब्दस्त्वन्धकारे च रू-शब्दस्तन्निवर्तकः ।
अन्धकारविनाशित्वाद् 'गुरु' रित्यभिधीयते ।।'

१९. 'पूर्व पाटलिपुत्रमध्यनगरे भेरी मया ताडिता
पश्चान् मालवसिन्धुठक्क विषये कांचीपुरे वैदिशे ।
प्राप्तोऽहं करहाटकं बहुभटं विद्योत्कटं संकटम्
वादार्थी विचराम्यहं नरपते! शार्दूलविक्रीडितम् ।।' - श्रमणबेलगोला, ५४ व्या शिलालेखाचे पद्य

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्यांनाही वैदिक व बौद्ध यांच्याशी वाक्युद्धात सामना करावा लागला. आपल्याच एका सुविख्यात शास्त्रार्थाची चर्चा करताना ते म्हणतात-

''मी बौद्धाचा नैरात्मवाद, क्षणिकवादामध्ये अडकलेल्या जनसमुदायाचा विनाश होताना पाहिले. तेव्हा त्या आत्मवंचितांच्या विषयी माझे अंतःकरण करुणेने पल्लवित झाले. त्यांचा उद्धार कसा करता येईल, या चिंतेने मला बेचैन केले, अधीर केले. याच कारणामुळे बौद्ध आणि जैनांमध्ये हिमशीतल राजाच्या त्या सभेत जेव्हा बहुतेक सगळा विद्वत समाज बहुसंख्येने उपस्थित होता; तेव्हा मी जैन आणि बौद्ध दर्शनावरील निर्णायक सभेत भाग घेतला आणि नैरात्म्यवादींच्या त्या तांत्रिक घटाला व त्यांच्या अभिमानरूपी घटाला पायाच्या एका ठोकरीने उलथवून टाकले. हे मी अहंकाराने, द्वेषाने सांगत नाही.[२०] अशा प्रकारे वादविवाद करताना त्यांनाही आगमशास्त्राचे परिशीलन करावे लागले. त्यामध्ये राजवार्तिक, सिद्धिविनिश्चय, न्यायविनिश्चय व लघीयस्त्रय या ग्रंथांचा समावेश होता.

'हिंदू मंदिरांमध्ये हरिजनप्रवेशा'संबंधीचा कायदा जेव्हा अस्तित्वात आला; तेव्हा त्या कायद्यांतर्गत जैन मंदिरांमध्येही हरिजनांना प्रवेश मान्य केला गेला. जैनही हिंदूच आहेत आणि जैन मंदिर हिंदू मंदिर समान आहेत, असे समजण्याचा तो परिणाम होता. त्या वेळी आचार्य शांतिसागर महाराजांनी हे विधेयक जैन मंदिरांना लागू करू नये, यासाठी कठोर पावले उचलली. त्यांनी अन्नत्याग केला आणि देशभरातील श्रावक समाजाला सक्रिय बनवले. परिणामी, जैन आणि हिंदू हे वेगवेगळे जाती, धर्म आहेत, हे शासनाला मान्य करावे लागले आणि जैन मंदिरांत हरिजनांना प्रवेश देणे अस्वीकार करावे लागले. या प्रकरणी २५ जानेवारी १९५० रोजी एक शिष्टमंडळ भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरू यांना भेटले. त्यांना परिस्थितीची संपूर्ण माहिती देण्यात आली. त्यामुळे ३१ जानेवारी १९५० रोजी भारताच्या प्रधानमंत्र्यांच्या वतीने त्यांचे मुख्य सचिव श्री. ए.बी. पाई यांनी एक पत्र लिहून शिष्टमंडळाचा दावा मान्य केला.

त्यात लिहिले की- ''बौद्ध हिंदू नाहीत, ही गोष्ट तर स्पष्टच आहे. त्याचप्रमाणे जैन

---

२०. 'नाहंकारवशीकृतेन मनसा न द्वेषिणा केवलं
नैरात्म्यं प्रतिपद्य नश्यति जने कारुण्यबुद्ध्या मया ।
राज्ञः श्रीहिमशीतलस्य सदसि विदग्धात्मनो
बौद्धौधान् सकलान् विजित्य स घटः पादेन विस्फालितः ।।' - आ. अकलंकदेव

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

धर्माच्या अनुयायांनाही हिंदू मानले जाऊ शकत नाही."[२१] याच मंदिरप्रवेश प्रकरणात अकलूजच्या दिगंबर जैन मंदिरातील ती मुख्य घटना समाविष्ट आहे. या घटनेने जैन मंदिरात हरिजनांना प्रवेश करू द्यावा, या आव्हानास कायमचेच पराभूत केले. काही हरिजनांना घेऊन सोलापूरचे कलेक्टर अकलूजच्या दिगंबर जैन मंदिरात पोहोचले. मंदिराला कुलूप होते. ते जिल्हाधिकाऱ्यांनी तोडले आणि अशा प्रकारे आपला अधिकार गाजवत त्यांनी हरिजनांना मंदिरात प्रवेश दिला. हा खटला मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश (चीफ जज्ज) श्री. अब्दुलकरीम छागला यांच्यासमोर चालला आणि वाद-प्रतिवादानंतर २४ जुलै १९५१ रोजी श्री. छागला व श्री. गजेंद्रगडकर यांनी 'Harijans have no right to entry in Jain temples as they are not hindu temples'. म्हणजे, हरिजनांना जैन मंदिरात प्रवेश करण्याचा अधिकार नाही. कारण, जैन मंदिर हिंदू मंदिर नाही (सिव्हिल ॲप्लिकेशन नं. (९१ ऑफ १९५१) या आशयाचा निकाल दिला. तात्पर्य हेच आहे की, धर्माचे वर्चस्व जेव्हा संकटात सापडते, तेव्हा धर्मगुरूंना गप्प बसता येणार नाही. कारण, जैन धर्मामध्ये श्रावक आणि श्रमण यांचे एक संयुक्त संगठन/संघटन आहे; त्यासच चतुःसंघ म्हणतात.

जैन साधू, साध्वी, श्रावक आणि श्राविकांच्या समुदायाला जैन संघ म्हणतात. यामध्ये साधू व साध्वी हा त्यागीवर्ग आहे आणि श्रावक, श्राविका हा संसारीवर्ग आहे. हे दोन्ही वर्ग मिळून चतुःसंघ म्हटले जाते आणि जैन धर्माचे अस्तित्व टिकून राहावे म्हणून वरील चारही वर्ग विद्यमान असणे आवश्यक आहे. त्यागी आणि गृहस्थ तसे दिसण्यास वेगवेगळे असले तरी दोन्ही परस्परांवर अवलंबून आहेत; आणि एक दुसऱ्यावर नियंत्रण ठेवल्याप्रमाणे त्यांचा प्रभाव आहे.

त्यागीवर्गास संघात गुरूपद प्राप्त असल्याने मार्गदर्शन करण्याची जबाबदारी त्यांच्यावर आहे. चारित्र्य व ज्ञान यांचा समन्वय नसेल तर ही जबाबदारी सांभाळणे कठीण होऊन जाते. म्हणून, तर 'द्विहीनो: गणपूरण:' म्हटले आहे. जर गुरूच वास्तवतः ज्ञान-चारित्र्यसंपन्न नसतील तर गृहस्थांना ते चांगले मार्गदर्शक कसे बनवू शकतील?

एक म्हण आहे की- 'छिन्नहस्तो विहतस्य कथं बध्नातु कंकणम्' ज्याचे हात

---

२१. 'श्री. एस.जी. पाटील, प्रतिनिधी, जैन शिष्ट मंडळ, १० सेंट्रल कोर्ट, नवी दिल्ली, सचिवालयाकडून प्राप्त प्रधानमंत्र्यांचे मुख्य सचिव श्री. ए.व्ही. पाईचे पत्र संख्या ३३/९४/५०-पी.एम.एस. दिनांक ३१-१-५०.'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तुटलेले आहेत; तो दुसऱ्या हात नसलेल्या व्यक्तीस कंकण कसे बांधेल? किंवा असे म्हणता येईल की, 'न शिला तारयेत् शिलाम्' पाषाणशिळा दुसऱ्या तिच्यासारख्याच शिळेला कशी पार करेल? बुद्धिपरामर्शनुसार ते अयोग्य होणार नाही. आपल्या सम्यक्चारित्र्याने उदित आणि सम्यग्ज्ञानाने प्रकाशित सूर्यासमान गुरूंच्या संगतीनेच आत्मकल्याणाचा मार्ग मिळू शकतो.

हीन वृत्तीच्या लोकांच्या संगतीत राहिल्याने बुद्धी समताहीन होते.

समान वय आणि शील असलेल्यांच्या सहवासाने समता तर प्राप्त होते, परंतु त्यामध्ये वैशिष्ट्य, तरतमता आणि गुणांचा उत्कर्ष हे सगळे आपल्यापेक्षा वैशिष्ट्यपूर्ण असलेल्या गुरूंच्या सेवेत राहिल्यानेच प्राप्त होतात.[२२] हा संसार म्हणजे एक घनदाट जंगल आहे. लोकांना वाट सापडत नाही. जंगलातून बाहेर पडणे अत्यंत कठीण आहे. परंतु, गुरूजन त्यातून योग्य मार्ग दाखवू शकतात. भवरूपी अरण्यातून, त्या भूलभुलैयातून बाहेर निघण्याचा मार्ग तेच दर्शवू शकतात. म्हणून, तर गुरूंचे स्मरण केले जाते. 'बडा बिकट यमघाट, गुरु बिन कौन बतावे वाट' - वाट (मार्ग) तर गुरूच दाखवतील. गुरूंच्या संगतीशिवाय दुसरी संगती करण्यायोग्य नाही. कारण, सामान्यांची संगती धरण्याने दोष निर्माण होण्याची शक्यता असते. म्हणून, 'संगः सर्वात्मना त्याज्यः।'[२३] संगाचा सर्वथा त्याग करणे श्रेष्ठ आहे. परंतु, स्वभावामुळे सामान्य लोकांची संगत सोडणे जर जमलेच नाही; तर साधूंना त्याबद्दल सांगितले पाहिजे. कारण गुरू, संत सत्संगाच्या दिव्य विभूती आहेत. त्यांच्या संगतीमुळे निःसंग होण्याची शिकवण मिळते आणि इतर लौकिक जनांच्या संगतीत राहिल्याने निःसंग झालेल्यांनाही पुन्हा संगतीची इच्छा होते. 'जनेभ्यो वाक् ततः स्पन्दो'[२४] हे एक सुप्रसिद्ध वचन आहे. त्याचा आशय असा की, त्यागी जेव्हा जास्तीतजास्त लोकांच्या संपर्कात येतो; तेव्हा त्याला सगळ्या लोकांशीच बोलून संवाद साधावा लागतो. मनाच्या प्रेरणेतूनच वाणी उत्पन्न होते. या मनःप्रेरणेतून वाणी आणि वाक्/प्रतिवाक् यांनी

---

२२. 'हीयते हि मतिस्तात! हीनैः सह समागमात् ।
समैश्च समतामेति विशिष्टैश्च विशिष्टताम् ।।'

२३. संगः सर्वात्मना त्याज्यः स चेत्यक्तुं न शक्यते।
स एव सद्भिः कर्तव्यः सन्तः सत्संगभेषजम्।।

२४. जनेभ्यो वाक् ततः स्पन्दो मनसश्चित्तविभ्रमः।
भवन्ति तस्मात् संसर्ग जनैर्योगी विवर्जयेत्।। - समाधिशतक, ७२

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मनात गोंधळ होऊ लागतो. लोक संपर्काच्या अनुषंगाने मनात आर्तरौद्र परिणाम होऊ लागतात. त्यामुळे उद्देश्यभूत पुरुषार्थाची हानी होते. त्यामुळे त्यागाने संगाचा सर्वथैव त्याग करणेच हितावह आहे. तरीपण, स्वतःचे हित साधण्यासाठी लोक गुरूंच्या चरणछायेत राहू इच्छितात आणि यासाठीच स्वतःच्या फायद्यासाठी एकान्तात घोर तपश्चर्येत मग्न अशा गुरूच्या सेवेची संधी जर त्याने प्राप्त करून घेतली तर तो त्याच्यासाठी कल्याणाचाच मार्ग ठरेल.

रात्र झाली की, अंधारमय झालेल्या खोल्यांमध्ये दिवे लावून त्यामध्ये लोक उजेड निर्माण करतात. नदीचा प्रवाह पार करताना तिच्या पात्राची खोली/थांग जाणून घेण्यासाठी हातात लाकडी वल्हे घेऊन पुढे जातात आणि प्रखर सूर्यकिरणांच्या तापापासून सुटका करून घेण्यासाठी डोक्यावर छत्री घेतात. असे करताना ते काही दिवा, काठी/वल्हे आणि छत्री यावर कृपा नाहीत करत. उलट, स्वतःसाठी प्रकाश, सुरक्षितता व शीतलता प्राप्त करून घेतात. श्रेष्ठ गुरूंची सेवा, त्यांचे वैयावृत्य करताना समाजही स्वतःच्याच कल्याणाच्या मार्गाचे क्रमण करीत असतो.

क्षत्रचूडामणीकारांनी आपल्या एका सूक्तिमणीत म्हटले आहे- 'रत्नत्रयाने विशुद्ध होतहोत भव्य जीवरूपी पात्रांवर (धर्मसंवर्धनासाठी) स्नेहभाव ठेवणारा, मोक्षाच्या परमपुरुषार्थ मार्गाशी संलग्न आणि दशलक्षण अहिंसा परमधर्माचे पालन करणारा गुरूच भवसागरात बुडून जाऊ पाहणाऱ्या भव्यजीवांना तारून नेतो.[२५] ते गुरू सम्यक्-ज्ञान-दर्शन-चारित्राचे नायक असतात. गंभीर चारित्र्यसागरासंबंधीचे व मोक्षमार्गाचे उपदेशक असतात.[२६] त्यांच्या त्यागाचे वर्णन करताना, कवी भूधरदास लिहितात- 'कदलि तरु संसार त्याग्यो यह सब जान'- संसाराच्या निरर्थकपणाची तुलना त्यांनी कदली वृक्षाशी, केळीच्या झाडाशी केली आहे आणि नेहमीकरिता संसाराचा परित्याग केला आहे. केळीचे झाड संसाराच्या असारतेचे प्रतीक आहे. त्याला सोलत राहिले तर, एका सालीनंतर दुसरी असे सोलत राहिले तर शेवटीही एक साल (छिलकाच) हातात येतो. अशा प्रकारे जसे केळीचे झाड एकावर एक सालीचे पापुद्रे धारण करून उभे असते; तसे नश्वर विषयांचे लेप लावून मनुष्य आपल्या

---

२५. रत्नत्रयविशुद्धःसन् पात्रस्नेही परार्थकृत।
परिपालितधर्मो ही भवाब्धेस्तारको गुरुः।। - क्षत्रचूडामणिः

२६. गुरवः पान्तु वो नित्यं ज्ञानदर्शननायका।
चारित्रार्णवगम्भीरा मोक्षमार्गोपदेशकाः।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तुच्छ जीवनाला सम्राट समजत आहे. भौतिक रेलचेल एवढी आहे की, भाराखाली तो दबूनदबून चालला आहे, भरडला जात आहे, तुडवला जात आहे. आत्मधर्माच्या अपार संपत्तीने बहरलेल्या कल्पवृक्षापासून तो वंचित आहे आणि कडुलिंबाच्या कडू फळांना द्राक्ष समजून बसला आहे. देवांचा इंद्रसुद्धा ज्या नरभवाच्या प्राप्तीसाठी तळमळत राहतो; त्या नरभवास तो असा मातीमोलाने उधळून टाकत आहे. समुद्रात पडलेले एखादे रत्न पुन्हा हाती येणे अत्यंत दुर्लभ आहे तसेच मनुष्यभव पुनःपुन्हा हाती येणे अत्यंत दुर्लभ आहे; तसेच मनुष्यभव पुनःपुन्हा प्राप्त होणेही अतिकठीण आहे. अनेक सागरपर्यंत अळी, मुंगी आदी योनींमध्ये पक्षी, पशुसारख्या योनींमध्ये पापाचा धनी असलेला हा जीव- 'करम योगतें नरगतिलहे' म्हणजे, कर्मयोग-प्राप्तीनंतर मनुष्यगतीचा बंध करू शकतो. त्या जीवासाठी हा संयोग म्हणजे रत्नवृष्टीच होय किंवा कल्पवृक्षाची प्राप्तीच होय. रत्नत्रयाच्या पालनाची ती सुवर्णसंधीच होय. म्हणून, मनुष्यजन्माच्या प्राप्तीचे सार्थक करण्यासाठी देहात जोपर्यंत प्राणांची स्थिती मजबूत आहे; तोपर्यंत प्रयत्नशील राहिले पाहिजे. कारण, लाकूड जळून गेल्यावर त्याचे अंगारे (कोळसे) भस्मरूपातच उरतात आणि हातातून वेळ निघून गेली की, वेळेचा न केलेला उपयोग पश्चात्तापरूपानेच उरतो.

वेळेच्या या सदुपयोगाचे कर्णधार सद्गुरू आहेत. म्हणून, या गुरुसंस्थेचे सातत्य टिकवायचे असेल तर आपल्या वंशरक्षणासाठी श्रावक जेवढे दक्ष राहतात; तेवढेच दक्ष यासंदर्भात श्रावकांनी राहिले पाहिजे. जर आपला औरस पुत्र नसेल तर श्रावक सगोत्रबांधवाच्या एखाद्या अपत्याला दत्तक घेतात आणि आपली वंशवेल विच्छिन्न होऊ देत नाहीत.[२७] ही झाली त्यांच्या भौतिक संसाराची रक्षा! याच तऱ्हेने आपल्या अध्यात्मलोकाच्या संरक्षणासाठी त्याने साधुसंस्थेचे रक्षण केले पाहिजे. गरूचे वैयावृत्य, त्यांच्या गुणांचा उत्कर्ष संवर्धित करण्यासाठी श्रावकांनी आपले योगदान दिले पाहिजे. त्यामुळेच श्रमण संस्कृतीचा हा चतुःसंघ जिवंत राहील आणि जिनरूप धारण करणारी 'गुरुसंस्था' अखंड चालू राहून ध्रुवताऱ्याप्रमाणे दिशादर्शनाचे काम निरंतर करीत राहिल.

❖❖❖

---

२७. जिनधर्म जगद्बन्धुमनुद्धुमपत्यवत्।
यतीन् जनयितुं यस्येत्तथोत्कर्षयितुं गुणैः — पं. आशाधर सूरि

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चरित्र्याशिवाय मुक्ती नाही

मुक्ती शब्दाचा अर्थ आहे मोक्ष, बंधने गळून पडणे, निर्बंध होणे, सुटका होणे! बंधनातीत होणे कोणाला नको असते? स्वातंत्र्य, मुक्ती कोणाला प्रिय नसते? मुक्ती हा सगळ्यांचाच आवडता विषय आहे आणि तिची प्राप्ती होणे, हा तर परमानंद आहे. पण, एखादी गोष्ट आवडत असली म्हणून काही त्या प्रिय वस्तूची प्राप्ती होत नाही. ज्ञान आणि प्राप्तीमध्ये हाच तर फरक आहे. जगातले कोट्यवधी लोक विविध वस्तूंचे, विषयांचे ज्ञान बाळगून असतात. डोक्यावरून नुकत्याच उडत गेलेल्या वस्तूला ते जाणतात. त्यांना कळते की, ते विमान आहे. परंतु, हे कळत नाही की, जे त्यात बसून उडत आहेत, त्यांनी पुरुषार्थ करून आपले स्थान त्या यानामध्ये आरक्षित केले आहे. ज्यांना कोणाला त्यात बसण्याची उत्सुकता आहे; त्यांना रीतीप्रमाणे आपले 'सीट' बुक करण्यासाठी प्रयत्न करावे लागणार आहेत. नाहीतर, गावाच्या शहराच्या मैदानांवरून अशी वायुयाने उडतच राहतील आणि त्या यानाची उडती सावली पकडण्याच्या निष्फळ प्रयत्नात आणि हवेत त्यांचा आवाज ऐकत राहण्यात शतके उलटून जातील.

उड्डाणाची इच्छा बाळगणाऱ्या परंतु प्रयत्न न करणाऱ्यांचे अनेक जन्मही, अनेक शतकेही उलटतील; पण त्यांची इच्छा मात्र अपुरीच राहील. पुरुषार्थ केल्याशिवाय याने आणि त्यात बसू इच्छिणारे यातले अंतर कधीच कमी होणार नाही. नव्या पिढीची बालके प्राचीन भग्नावशेष बनून जणू झोपून जातील आणि माती निरंतरपणे नवी निर्मिती करीतच राहील. एका पंखाने पक्षी उडू शकत नाही; तसे चारित्र्याशिवाय ज्ञान-दर्शनरूपी रथाचे चाकही फिरू शकणार नाही. चाकांना गती आणण्यासाठी स्नेहाची (वंगणाची) गरज असते आणि बंधनरहित होण्याचा संकल्प पूर्ण करण्यासाठी पुरुषार्थ करण्याची गरज असते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चारित्र्य, सम्यक्‌चारित्र्य हेच ते पुरुषार्थ आहेत. त्याचे परमत्व, श्रेष्ठत्व प्रत्येकाच्या आवाक्यात असतेच असे नाही. तसे तर लोक मोठे वीर, धैर्यशील व प्रत्यक्षात पराक्रम गाजवणारे असतीलही. परंतु शील, संयम, तप, त्यागाच्या प्रदेशावर एकछत्री अंमल गाजवणारे, चारित्र्यरूप कुशल योद्ध्याला वश करणारे क्वचितच आढळतात. एक सूक्तिकार म्हणतो- मदोन्मत्त हत्तीचे गंडस्थळ फोडणारे शूर असू शकतात, पशूंच्या राजाची-सिंहाची आयाळ ओढून त्याच्या दाताला बोटांनी स्पर्श करीत मोजणारेही असतील; पण कोपलेल्या, खवळलेल्या व मनात उत्पन्न होणाऱ्या कामदेवाच्या इंद्रियक्षोभाला नेस्तनाबूत करणारे अत्यंत दुर्लभ आहेत. हे काही अतिशयोक्तीपूर्ण कथन नाही; सत्यच आहे. कामिनी, कांचन, परिग्रह, मोह ही संसाराची धोकादायक परंतु रमणीय रूपे आहेत. विषयोपभोगाचे बहिरंग-माधुर्य हे बलिष्ठानांसुद्धा धक्का देऊन आडवे पाडते. अशा स्थितीत सम्यक्‌चारित्र्य म्हणजे तीक्ष्ण धारेची तलवार आहे. त्या असिधारेवरून संतुलन साधत चालणे फक्त कठोर साधनांचे अत्युच्च शिखर गाठणाऱ्यालाच जमू शकते.

तसे तर, दोन खाटांएवढ्या लांबरुंद परकोटावरून घोडे पळवणारे खूप असतात. तेसुद्धा उभ्या भिंतीवरून घोडे पळवण्याच्या वल्गना करतात. परंतु, त्यांच्याबरोबर आम्हास वाद घालायचा नाही. त्यांना धावायचे तेवढे धावू देत. आध्यात्मिक संपत्तीने समृद्ध होण्याची इच्छा ठेवली की, धर्मासंबंधीची रुची जागी होते. अशी धर्मरुची असणारी व्यक्ती व्यवहारातील धार्मिक तत्त्वे म्हणजे अहिंसा, सत्य, अचौर्य, ब्रह्म, अपरिग्रह, क्षमा, मार्दव, आर्जव इत्यादी आचरणात आणण्याचे प्रयत्न करते आणि त्यांचा अभ्यास/सराव करीत हळूहळू ती व्यक्ती व्रतीच बनून जाते.

व्रतांचे केलेले नियम-निष्ठापूर्वक पालन, त्या व्यक्तीमध्ये शुचिता, सम्यकत्व, आत्मोद्धाराची भावना उत्कटपणे आणण्यास मदत करते. अशा प्रकारे सातत्याने धर्माला अनुसरून त्याने केलेला आहार, विहार, शयन, आसन, मौन, भाषण इ. समस्त क्रियांचा जीवन-व्यवहार त्याला चारित्र्याच्या जवळ घेऊन जातो. चारित्र्याचे बहिरंग व्यवहाररूप आहे तर अंतरंग निश्चयपरक आहे. या सम्यक्‌चारित्र्याच्या प्राप्तीपूर्वी मनुष्य प्रलोभनांच्या पहाऱ्यात कैद असतो. चकवा असणाऱ्या अरण्यात भटकत राहतो. मोहात टाकणाऱ्या नित्य नवीन गोष्टी शोधत राहतो. कामपूर्तीसाठी नव्यानव्या साधनांचा आश्रय घेत राहतो. आपल्या जन्मजयंत्या/वाढदिवस साजरे करीत बसतो आणि शुभेच्छा स्वत:वर उधळून घेत राहतो. रोगाला मात्र 'पेपरमिंट'च्या गोळ्या चोखत राहून दूर ठेवण्याचा प्रयत्न करतो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्याच्या आजूबाजूचे लोक मृत्यूच्या अधीन होतात, कायमचे निघून जात राहतात; पण तो हाय तोबाच्या कल्लोळात, हास्यविनोदात मग्न राहतो. कधी गेलाच स्मशानात तर तेथून निघून येतो आणि नाचगाणी चालणाऱ्या क्लबमध्ये, थिएटर्समध्ये रममाण होतो. एक सत्य, एक धडधडणारी चिता जी तो नुकताच बघून आलेला असतो. तिचा रोख त्याच्याकडेच असतो. त्या चितेतून निघणारा धूर श्वास घुसमटून टाकत असतो, त्याच्या चहाच्या कपात साखर नसते; तर राख मिसळलेली असते. सिगारेटच्या धूम्रवलयातून जणू प्रेते नाचत असतात. आता तर हातातली सिगारेटही गायब झाली आहे. पाहिले तर तिच्याजागी एखादे पांढरे हाड बोटांमध्ये अडकलेले आहे आणि ते जळते आहे. पण कसे? जणू चितेतून ते उडून आले आहे. एकदम दचकून तो ते फेकून देत आहे. त्या ठिणगीने सगळे थिएटर पेटून उठले आहे. पडदे, खुर्च्या, प्रेक्षकांची वस्त्रे, भिंतींवरचे रंगलेपन सगळेच अग्निशिखांच्या जाळ्यात सापडले आहे. तो गुपचूप बाहेर पडतो. परंतु, आता तर बाहेरूनही अग्नीच्या जिव्हा लपलप करीत येताहेत. आकाशात उंच उडणाऱ्या घारी आणखीनच उंच गेल्या आहेत. एवढी आग? जी सिगारेटच्या तोंडाद्वारे प्यायली जाऊ शकते; ती एवढी विस्फोटक? थिएटरचे पडदे, खुर्च्या, बाके, भिंती, लेपन सर्वांना आगीने वेढून टाकले आहे आणि लोक असह्य उष्णतेचे निवारण करण्यासाठी इथे बसत आहेत. कोकाकोला पित आहेत. स्फोटकाच्या ढिगाऱ्याला फरसबंद जमीन किंवा गालिचाही म्हणतो आहे. तो विचारात पडला आहे. या घंटांचा कर्कश आवाज वाढतो आहे. अग्निशामक दलही पोहोचले आहे. ही आग विझवली जाईल. उद्या थिएटरमध्ये पुन्हा नवे पडदे, खुर्च्या लावल्या जातील. पुन्हा नवा अभिनय सादर होईल.

जीवनाच्या रंगमंचाचीही अशीच तर स्थिती आहे. विनाशाची सदोदित चालणारी भट्टी राख पसरवत जाते आणि नित्य नव्याने येणारी उषा त्यावर कुंकवाचा सडा घालत राहते. अज्ञानाने आंधळा झालेला मनुष्य जन्म आणि पुनर्जन्मांच्या थिएटर्समध्ये बसून धुराची वलये सोडत राहतो. या धुराच्या वलयांतून तो गंधर्वलोकाची सृष्टी निर्माण करतो. परंतु, त्या धुराच्या, जमिनीच्या आणि पाण्याच्या भिंतींच्या आश्रयाने कोण बरे टिकू शकला आहे? मिथ्यात्वाचा आश्रय घेणे म्हणजे स्वत:ला छळणे होय. भोगांची लालसा एका विशाल मृगजळासारखी आहे. यामागे जो धावत सुटला त्याला पाणी मिळतच नाही. माणसाने या मृगतृष्णेच्या प्रदेशातून शक्य तेवढ्या लवकर बाहेर पडले पाहिजे आणि निर्मळ जळाने युक्त सरोवराचा शोध घेतला पाहिजे. विचारी, विवेकी माणसांचे असे मत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आहे की, ज्ञानी पुरुष आपल्या ज्ञानाच्या बळाने कर्मांना नष्ट करतो. त्यांचा क्षय करतो. परंतु, त्याच्याचबरोबर ज्ञानानुकूल वर्तन (चारित्र्य) करणेही अत्यंत आवश्यक आहे.

त्या वर्तनाशिवाय, सम्यक्‌आचरणाशिवाय कर्मांची निर्जरा केली जाऊ शकत नाही. एखादा रोगी जर त्यास झालेल्या रोगाला दूर करण्याचे उत्तम औषध जाणत असेल आणि ते फक्त समोर ठेवून त्या उत्तम औषधाचे गुण प्रमाणित करीत असेल; तर तेवढ्याने त्याचा रोग दूर होणार नाही. थंडगार पाणी नुसते पाहून किंवा हे पाणी खूप शीतल आहे, असे म्हणत राहिल्याने का तहान शांत होणार आहे? एखाद्या ठिकाणी पोहोचायचे आहे, त्यासाठी फक्त विशिष्ट वाहनाचे स्मरण करून काय उपयोग? त्यासाठी तसे आचरण करणे/चारित्र्य चर्या करणे आवश्यक आहे.[१] हा, ज्ञान असणे तर गरजेचेच आहे. ज्ञानाशिवाय वर्तन कसे होणार? ज्ञान असण्याचे फळ आचरणातूनच प्राप्त केले पाहिजे. ज्ञान झाल्यानंतर- 'हे पाणी आहे.' पाण्याशिवाय मरणे हा अपमृत्यू आहे. जीवनाबरोबर मुद्दाम केलेला तो खेळ आहे. ज्ञानसंपन्न तत्त्वदर्शी गुरूंच्या चरणी श्रध्दाभक्तिपूर्वक उपासना केल्यावरच ज्ञानाची प्राप्ती होते. 'उपदेक्ष्यन्ति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिन:' तत्त्वदर्शी ज्ञानी तुम्हाला उपदेश करतील, हे चिरंतन आहे. त्यांना विनम्रपणे प्रश्नाप्रश्नांच्या रूपात जिज्ञासाभाव मनात ठेवून विचारणे व सम्यग्ज्ञान प्राप्त करणे इष्ट आहे.

ज्ञान सम्यक्‌चारित्र्याचा सखा आहे. 'परीक्षामुख'मध्ये म्हटले आहे- 'हिताहित प्राप्तिपरिहारसमर्थ हि प्रमाणं ततो ज्ञानमेव तत'- जे हितप्राप्ती आणि अहिताचे निवारण करण्यास समर्थ आहे; तेच स्वापूर्वार्थ व्यवसायात्मक सम्यक्‌ज्ञान आहे. तेच 'प्रमाण' आहे.[२] हे सम्यक्त्वअनुमोदित सम्यक्‌ज्ञान प्राण्याच्या अनंतानुबंधी कर्मांचा क्षय करण्यास मदत करते. भव्यात्म्याला सम्यक्‌चारित्र्याकडे प्रवृत्त करते आणि मोक्षमार्गाकडे नेते. 'भव्यजन कण्ठाभरण' रचणाऱ्याने लिहिले आहे- 'सम्यग्ज्ञान भावी कर्मांचा क्षय करते, सम्यक्‌चारित्र्य पूर्वसंचित सर्वच कर्मांचा नाश करते आणि सम्यग्दर्शन या दोघांची पुष्टी करण्यासाठी असते.' अशा प्रकारे 'सम्यग्दर्शनज्ञानचारित्राणि मोक्षमार्ग:' हा सूत्रकाराचा

---

१. 'णाणी खवेई कम्मं णाणबलेण दि सुबोलए अण्णाणी ।
बिज्जो भेषज्जमहं जाणे इदि णस्सदे वाही ।।' -आ. कुन्दकुन्द

२. विशेषार्थ-'प्र'-प्रकृष्ट; 'मा'-अन्तरंग केवलज्ञान एवं बहिरंग समवसरणमूलक लक्ष्मी और 'अण' - दिव्यध्वनि । इस प्रकार प्रकृष्ट अंतरंग-बहिरंगलक्ष्मीसमन्वित 'दिव्यध्वनि' अर्थात जिनेन्द्र भगवान के वचनामृत ही सर्वोपरि प्रमाण हैं ।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आशय सर्वथैव सिद्ध होतो.[३]

म्हणूनच मुक्तिश्रीची-मोक्षाची अभिलाषा बाळगणाऱ्याने सम्यग्ज्ञान-दर्शनपूर्वक सम्यक्चारित्र्याची कास दृढपणे धरली पाहिजे. जो चारित्र्यरूपी नौकेवर आरूढ झाला आहे, सम्यग्ज्ञानदर्शनरूपी दोन नावाडी ज्यास लाभले आहेत, असा साधक सुखपूर्वक पैलतीरास पोहोचतो.[४] पूजकांची वाणी चारित्र्याची प्रशंसा करताना कधी थकली नाही. 'चारित्तं खलु धम्मो', न चारित्रात् परं तपः तपः यत् सम्यग्दर्शन यच्च सम्यग्ज्ञानमुभे अपि सम्यक्चारित्रमितः'- सम्यक्चारित्र्य हाच धर्म आहे. चारित्र्यापेक्षा दुसरे मोठे तप नाही. सम्यक्दर्शन, सम्यग्ज्ञान हे दोन्ही चारित्र्याचे मित्र आहेत. चारित्र्य हा पारसमणी- स्पर्शमणी आहे. ज्याला स्पर्श करतो, त्याचे सोने करतो. हे चारित्र्य त्यागी लोकांच्या पावलाबरोबर पाऊल टाकते. परंतु, रागी मात्र त्याच्या पाठीमागे धावूनही त्यास प्राप्त करून घेऊ शकत नाही.

ज्याने चारित्र्य धारण केले आहे; त्याने जर चारित्र्य हा आपला आत्मा, सर्वस्व आणि अंगच बनवले तरच त्याचे चारित्र्य सफल होते. वरवर ओढून घेतलेले चारित्र्य तर केव्हाही अंगावरून उतरवता येते. चारित्र्य नख बनून राहिले पाहिजे की, जे सोलले गेले तर प्राण व्याकूळ व्हावेत. अग्नीत जशी उष्णता अभिन्न असते, तसे चारित्र्य आणि चारित्र्यवान यांचे एकरूपत्व असावे. अग्नीतून उष्णता वेगळी काढता येत नाही; त्याप्रमाणे चारित्र्यही चारित्र्यवानापासून वेगळे काढता येऊ नये. अग्नी कुठेही जळेलच आणि चारित्र्य कुठेही प्रभावीच ठरेल आणि आपल्या स्वरूपाशी ते कधीच खेळ करणार नाही.

चारित्र्य हे सुगंधाचे भांडार आहे. सौंदर्याचे आगार आहे. त्याची रूपसुंदरता प्राशन करण्यासाठी, त्याच्या सुगंधात न्हाऊन निघण्यासाठी लोक दूर अंतरावरून धावत येतात. चारित्र्य हे सर्वात उत्तम प्रकारचे धन आहे. धनसंपदा-पैसा जर कमी झाला तर फार काही नुकसान होत नाही; परंतु जर चारित्र्य नष्ट झाले तर सारे काही संपले. मग, तिन्ही लोक बुडाले, सूर्याची राख झाली आणि चंद्राला कायमचेच खग्रास ग्रहण लागले, असे निःशंकपणे समजावे. कारण, चारित्र्यहिनास सूर्य प्रकाशित करू शकत नाही, चंद्र आल्हादित करू

---

३. 'सज्ज्ञानमत्र क्षतभाविकर्म सद्वृत्तमस्तार्जितकृत्स्नकर्म ।
सम्यक्त्वमेतद्द्वयपुष्टिहेतुरिति त्रयं स्यात् सफलं तदेव ।।' - २२०

४. 'आरुह्य चारित्रतरीमवाप्य सज्ज्ञानसद्दर्शनधीवरौ द्वौ ।
अक्लेशमेवोत्तरति प्रसन्नः पारे भवाब्धिं ननु वीतरागः ।।' - सुधानिधिसुभाषित

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शकत नाही आणि तिन्ही लोक त्याचा उद्धार करू शकत नाहीत. अमितगती आचार्य म्हणतात- 'पौर्णिमेच्या दिवशी उगवणाऱ्या पूर्ण चंद्रासारखे अनिंद्य-निर्दोष चारित्र्य ज्याच्याजवळ सुरक्षित आहे, तो वस्तुतः सन्मान करण्यास पात्र आहे. कुलीन आहे. जगत्पूज्य आहे. जन्म कृतार्थ करणारा आहे आणि श्रेष्ठ बुद्धीचा आहे.[४]

'सागार धर्मामृत'मध्ये लिहिले आहे- ''जास्त काय सांगावे? जे अनादिमिथ्या दृष्टी आहेत; त्यांनीसुद्धा या अनुपम सम्यक्चारित्र्याचे पालन करून क्षणात मुक्ती मिळवली आहे. म्हणून, चारित्र्य सर्वच दृष्टीने योग्य आहे.[५] धर्मप्राप्तीसाठी करीत असलेल्या चारित्र्यरहित सर्व क्रिया विफल आहेत. भस्मावर, राखेवर तूप ओतल्याने अग्नी प्रदीप्त होत नाही; तशा- 'सर्वास्तस्याफलाः क्रियाः'- त्याच्या सर्व क्रिया व्यर्थ, फळ न देणाऱ्या आहेत. कारण, धारकत्वगुण धर्मात आहे आणि धर्म चारित्र्यमय आहे. या कारणाने धर्म आणि चारित्र्य एकाच अर्थाचे शब्द आहेत. म्हणून, चारित्र्यापासून ढळणे म्हणजे धर्मभ्रष्ट होणे. शीलवान, कुलीन कधीच असा सदोष मार्ग स्वीकारीत नाहीत. चारित्र्यशील मनुष्य केवळ स्वतःसाठी जगत नाही; तर त्याच्या आचरणामुळे समाजाचे जीवनही सुरक्षित असते.

आपला आचरणाचा मार्ग निश्चित करताना लोक चारित्र्यरत्नपालकाकडे मोठ्या अपेक्षेने पाहत असतात. त्यांचे आचरण पाहून त्याद्वारे उत्साहित, प्रेरित होऊन तशाच प्रकारे वागू लागतात.[६] चारित्र्यवान लोकांचे तपःपूत जीवन पावलापावलाला जणू जीवनाच्या आदर्शांची पाठशाळाच स्थापन करतात. सूर्याचा उदय होताच सगळे जग प्रकाश ग्रहण करते आणि चारित्र्यसंपन्न महामानव आपल्या पदविन्यासाने लोकमंगलाच्या स्वस्तिकांची पवित्र रेखाटने करीत राहतात. त्यांच्याच प्रशस्त ललाटावरील तेज राष्ट्र आणि संस्कृतीचा स्वाभिमान ग्रहण करतो. सूर्य आणि सच्चारित्र्य व्यक्ती जशाजशा वर येतात; तशातशा त्या आपल्या तेजाने सत्प्रकाश सर्वत्र पसरवतात आणि जीवनाला चैतन्यशील होण्याचे मंत्रबळ प्रदान करतात. देश म्हणजे देशात राहणारे चारित्र्याच्या माध्यमानेच उच्च स्तर प्राप्त करतात. इतर सारी संपत्ती-वैभव खूप असेल आणि चारित्र्य नसेल तर 'सम्पदौ नैव

---

५. 'विनिर्मलं पार्वणचन्द्रकान्तं यस्यास्ति चारित्रमसौ गुणज्ञः ।
मानी कुलीनो जगतोऽभिगम्यः कृतार्थजन्मा महनीयबुद्धिः ।।' - अमितगती

६. 'आराध्यचरणमनुपममनादिमिथ्यादृशोऽपि यत् क्षणतः ।।
दृष्टा विमुक्तिभाजस्ततोऽपि चारित्रमत्रेष्टम् ।।' - सागारधर्मामृत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सम्पद:' - म्हणजे, ती सारी संपत्ती संपदा या संज्ञेस पात्र नाही. अशा प्रकारेच माणसाच्या आतील उत्कर्षबीजांना चारित्र्याद्वारेच वाव मिळून सन्मान प्राप्त होतो. संपूर्ण निर्मळ, शुद्ध चारित्र्य नसेल तर त्यागाचा मार्ग सुरूच होणार नाही.

इथे तर चारित्र्यपालन प्रथमस्थानी आहे. चारित्र्याच्या चौकटीत आदर्शांना मंडित करायला पाहिजे. जेव्हा आदर्श चारित्र्यमय असतील तेव्हा त्या आदर्शांमध्ये एक दिव्य तेज प्रस्फुरित होईल. अशा तऱ्हेने जेव्हा चारित्र्याचा मार्ग ऊर्ध्वगामी होईल; तेव्हा तो आदर्श निर्माण करेल. मैलाच्या दगडावर त्याच्या प्रवासाच्या आठवणी दैवी संहिता लिहीत पुढे जातील. आज अडीच हजार वर्षे होऊन गेली तरी दिव्यध्वनीच्या उपदेशकाची ती वाणी अक्षरांकित करणारी शाई अजूनही ओली (ताजी) आहे. चारित्र्याचे स्वर कधीही न पुसले जाणारे असतात. त्याची लिपी चिरतरुण असते. कारण, त्या स्वरांमध्ये आणि त्या अक्षरांमध्ये निष्कलंकता आणि निर्मळपणा मिसळलेला असतो. साधारणत: व्यवहारातील शाई कालिम्यातून तयार होते. परंतु, चारित्र्यशिरोमणी भगवंतांचे वचन तर अनुपम आहे. निष्कलंक आहे. जे स्वत:च कर्मरजापासून मुक्त आहेत; त्यांच्या संदेशांना धुळीचा स्पर्श कसा होऊ शकतो? त्यांच्या दिव्यध्वनीतून प्रसवलेल्या स्वरांना शीघ्रभाषी इंद्र 'त्रैकाल्यं द्रव्यषट्कं नवपदसहितंजीवषट्कायलेश्या' इत्यादी पदांच्या द्वारे स्वत: लोकांमध्ये निनादित करतो आणि गौतमांसारखे दिग्गज विद्वान त्यावर निरूपण करतात. अशा चारित्र्यचक्रवर्ती भगवंतांच्या चरणाशी नमस्कार असो.

जी वस्तू खूप सन्मानित आणि उत्कृष्ट आहे; तिच्याविषयी लोकांची दृष्टी अधिक चौकस व अधिक कठोर/तीक्ष्ण असते. रत्ने-माणके नेहमीच चढ्या भावाने विकली जातात. परंतु, सर्वात जास्त परीक्षाही त्यांनाच द्याव्या लागतात. सोन्याला आपली शुद्धतेची कसोटी कसोटीच्या दगडावरून नाही तर अग्नीद्वारे द्यावी लागते. वज्राला (हिरा) वज्रानेच पैलू पाडले जातात. जवाहिरे/जोहरी जेव्हा या हिऱ्याचे मूल्यांकन करू लागतात; तेव्हा आपली चौकस, तीक्ष्ण दृष्टी जी हजारो वर्षांच्या परंपरागत अनुभवांनी प्राप्त झालेली असते; ती हिऱ्याची पारख करण्यासाठी खर्ची घालतात. त्याची सावली, तेज, गुण, लेश्या, सामुद्रिक-इत्यादी सर्वांची कुंडली जोपर्यंत मांडून होत नाही; तोपर्यंत त्या हिऱ्याची किंमत ठरू शकत नाही. अशाच तऱ्हेने चारित्र्यवान माणसाकडेही लोक हजार दृष्टिकोनातून पाहतात.

रत्नाची पारख तर एकदाच होते; पण चारित्र्यरत्नाला मात्र पावलापावलांस अनेक

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कसोट्यांतून जावे लागते. रत्नाची पारख करणारे लोक निवडक व हातांच्या बोटांवर मोजता येतील इतकेच असतात. पण, चारित्र्यमण्यास पारखण्यासाठी सगळेच जण जोहरी बनून जातात. ज्यांचे स्वत:चे चारित्र्यज्ञान व चारित्र्य खालच्या दर्जाचे असते; तेसुद्धा परीक्षक म्हणून रांगेत अग्रक्रम लावत चारित्र्यवानाबद्दल विचार व्यक्त करतात. हिऱ्यामध्ये थोडेजरी न्यून आढळले तरी त्या न्यूनतेच्या प्रमाणात त्यांचे मूल्य कमी होऊ शकते. परंतु, चारित्र्याचा हिरा मात्र १०० टक्के परीक्षेत उतरला नाही तर त्याचे मूल्य एकदम शून्यावरच येते. 'वृत्ततस्तु हतो हत:' - चारित्र्याच्या दृष्टीने अनुत्तीर्ण म्हणजे मृतकच! मेलेल्या लसणाला वैद्य जसा औषध निर्माण शाळेतून काढून टाकून कचऱ्याच्या ढिगाऱ्यात फेकून देतो; तसे लोक दुश्चारित्र्यामुळे किंवा अचारित्र्यामुळे प्रतिष्ठेच्या उच्च आसनावरून खाली खेचतात. म्हणून, चरित्र्य खूपच जपणे श्रेयस्कर आहे. छिद्रान्वेषी असणे, ही लोकांची प्रवृत्तीच असते. मग, एखादा त्यागी किती का शुद्ध आचरणाचा असेना![७] म्हणून, मनाने सुद्धा लौकिक किंवा अलौकिक आचाराचे उल्लंघन करू नये.[८] परिपूर्ण, अभंग/एकसंध कुंभालाही ठोकून पाहण्याची परंपरागत लोकवृत्ती आहे. तसे पाहिले तर ही वृत्तीसद्धा काटेरी नागफणीसमान, निवडुंगाप्रमाणे आहे. ती न पेरतासुद्धा उगवते; पण निवडुंगाला घाबरून इतरत्र स्वच्छंद चरणारे पशू उपयुक्त क्षेत्राला हानी पोहोचवत नाहीत; तसे लोकवृत्तीही चारित्र्यपालकाच्या पक्षाचीच म्हणायला हवी. हा पक्ष स्तुत्यच म्हटला पाहिजे. राष्ट्राच्या संसदेला, सत्तारूढ पक्षाला विरोधी पक्ष नियंत्रणात ठेवतो. शत्रूचे आक्रमण सीमेवर सुरक्षेचे प्रयत्न निरंतर चालू ठेवण्यासाठी प्रवृत्त करते. म्हणून, ते जिवंत राहावेत, असाच त्यांना आशीर्वाद द्यावा. त्यांच्या कधीही न मिटणाऱ्या डोळ्यांच्या पहाऱ्यामुळे मी निश्चिंत होऊन झोपू शकतो. जेव्हाजेव्हा माझ्या हातून प्रमाद घडतो तेव्हातेव्हा ते मला सावधानतेचा इशारा देऊन माझा मार्ग प्रशस्त करण्यासाठी प्रयत्नशील होतात.[९] ही अत्यंत महत्त्वपूर्ण सूचना असते. 'निज कवित्त केहि लाग न नीका' - स्वत:ची कविता कोणाला चांगली वाटत नाही? स्वत:ला सर्वांगसुंदर कोण समजत नाही?

व्यक्ती दुसऱ्यांमधली उणीव चटकन हेरते; परंतु स्वत:ची समीक्षा करतेवेळी

---

७. 'यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जन: । स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्तते ।'

८. 'यद्यपि विमलो योगी छिद्रान् पश्यति मेदिनी। तथापि लौकिकाचारं मनसापि न लंघयेत् ।।'

९. 'जीवन्तु मे शत्रुगणा: सदैव येषां प्रसादाद् विगतज्वरोऽहम् ।
यदा यदा माँ भजते प्रमादस्तदा तदा ते प्रतिबोधयन्ति ।।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हमखास चुकते. म्हटलेच आहे की, आपल्या चुका बेलाच्या फळासारख्या मोठ्यामोठ्या असल्या तरी त्या दिसत नाहीत आणि दुसऱ्याची मोहरीच्या दाण्याएवढी जरी चूक असली तरी ती पर्वताएवढी समजून ती दाखवणे, सांगणे यात तो कधीच चुकत नाही.[१०] म्हणून, 'चरन्ति यत् शीलधनास्तपोधनास्तदस्ति चारित्रमिदं महाव्रतम्' - शील हेच श्रेष्ठ धन मानणारे तपोनिधी महाव्रती असतात आणि सम्यक्चारित्र्य तेच महाव्रत आहे. त्रियोग सांभाळून त्रिकरणशुद्धीपूर्वक ते चारित्र्याचे रक्षण करतात. ज्याप्रमाणे कंजूष आपल्या धनाचा एक अंशही खर्च करीत नाही; तसे महाव्रती चारित्र्याची अंशमात्र बाजूही खंडित होऊ देत नाहीत.

चारित्र्याचे उल्लंघन करणे, हा महान अपराध आहे. चारित्र्य म्हणजे नैतिक पुस्तकाचा प्रथम अध्याय, प्रथम वर्ण आणि प्रथम पद आहे. ज्याप्रमाणे गायीच्या आचळातील दूध काढल्यानंतरच त्यास कृतार्थता प्राप्त होते; तद्वत आदर्शसुद्धा चारित्र्यात भिनले की, ते उपयोगी होतात. तालवृक्षाला शुष्क बनवून निर्मिलेले हजारो पानांचे मोठमोठे ग्रंथ वाचून काय उपयोग? एकच अक्षर वाचा; पण ते अशा प्रकारचे की ते शिवपुरीचा, मोक्षाचा मार्ग प्राप्त करून देईल. ही वास्तविकता आहे. एखादे विशाल ग्रंथालय नुसतेच पाहून विद्या प्राप्त होत नाही. एखादे पान तन्मयतेने पाहणे, वाचणे, त्यास हृदयस्थ करणे; यामुळे आत्म्याला परमपुरुषार्थ प्राप्त होऊ शकतो. मर्मस्थळावर लागलेला एकच बाण मृत्यू येण्यास पुरेसा असतो. नेम/मर्म सोडून बाणांचा वर्षाव जरी केला तरी साधी जखमसुद्धा होत नाही. आत्मकल्याणाच्या केंद्राला मानवाने शोधून काढावे, त्यास समजून घ्यावे आणि सातत्याने प्रयत्न करीत त्या मार्गावरून चालत राहावे. कारण, 'मार्गस्थो नावसीदति' - मार्गावर चालणाऱ्याचे अवसान कधी गळत नाही. कधी ना कधी त्याला ध्येयप्राप्ती होतेच.

एक चिनी म्हण आहे - कोणत्याही महान यात्रेची, मग ती हजार मैलांची का असेना; तिची सुरुवात एक पाऊल पुढे टाकूनच होत असते. म्हणून, जो एका पदन्यासाचे महत्त्व जाणतो, तो पुढचे हजार मैल गाठण्यासाठी दुसरे पाऊल अगदी टाकतोच. वने, दुर्गम दऱ्या, पर्वत, नद्या यांना पार करीत आपल्या ध्येयाला गाठतोच. मग, मार्गातील इकडलीतिकडली आकर्षणे, चकवे, मनाला आवडणारी प्रलोभनरूपी विघ्ने यामध्ये तो

---

१०. 'नरः सर्षपमात्राणि परच्छिद्राणि पश्यति ।
आत्मनो विल्वमात्राणि पश्यन्नपि न पश्यति ।।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अडकून पडत नाही. अंतिम लक्ष्याप्रत पोहोचण्याचे त्याचे चिवट संकल्प त्याच्या पावलाबरोबर पाऊल टाकत चालत असतात. सूर्य याच गतीने तर चालतो. त्याला रोज पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत प्रदेश पार करावे लागतात. कधी दक्षिण तर कधी उत्तर दिशा त्याला थांबण्याचा आग्रह करते. चारित्र्यमार्गीच्या वाटेतही मोह आणि प्रलोभनांच्या दिशा येतातच. मुग्ध करणारे मीनाबाजारही येतात. परंतु, मुक्तिनगराकडे अश्वमेध यज्ञाच्या घोड्याप्रमाणे अकंप, स्थिर गतीने ते चालत राहतात. त्यातच त्यांचे यश आहे. स्वीकार केलेल्या व्रताला निभावून नेण्याविषयीची आस्था आहे.

एका नीतिज्ञाने म्हटले आहे- 'कार्याला प्रारंभ न करणे हे बद्धिवंतांचे पहिले लक्षण आहे आणि त्यांनी एखादे कार्य सुरू केलेच तर ते शेवटास नेणे हे त्यांचे दुसरे लक्षण आहे.[११] हाती घेतलेल्या कामात अखंडितपणे, कितीही विघ्ने आली तरी उत्तम व्यक्ती ते काम अर्ध्यावर सोडून देत नाही.[१२] असे भर्तृहरीने म्हटले आहे. मनात राग आणि बाहेरून त्याग ही भयंकर स्थिती आहे. लोक हिमालयात जातात ते हिमालय समजून जातात. तो जर ज्वालामुखी होऊन फुटला तर विश्वासाला तडा हा जाणारच! सगळे पर्यटन थांबेल, शंका वाढतील. 'बाह्यग्रन्थिविहीना':- या श्लोकात हाच आशय आहे. खरे पाहता, चारित्र्याची पदचिन्हे अगदी स्पष्ट प्रतीत व्हायला हवीत. धूसर, अर्धवट उमटलेली, पथविचलित अशी पदचिन्हे शिष्यवर्गाची दिशाभूल करतात. सर्वोदय तीर्थ सरोवरात सम्यक्चारित्र्याची सहस्र कमळे तरंगताना दिसतात आणि त्या कुंजवनात विश्वजनरूपी राजहंसांना आश्रय लाभतो. ही धर्मप्रभावना चारित्र्यशिरोमणी देऊ शकतात आणि ते देत आले आहेत.

चारित्र्य ही मनुष्याची स्वतःची संपत्ती आहे. चारित्र्यवान कुठेही जाऊ शकतो. त्याला परमविश्वसनीयता प्राप्त होते. प्राचीन काळी राजांच्या अंतःपुरांची रचना अत्यंत सुरक्षात्मक असे. इतकी की, सूर्यकिरणांनासुद्धा स्वेच्छेने अंतःपुरात प्रवेश मिळू शकत नव्हता. 'असूर्यम्पशा राजदाराः' राजाच्या पत्नींना सूर्यसुद्धा पाहू शकत नसे. परंतु, त्याच राजमहालात ऋषिमुनी विनाप्रतिबंध हिंडू-फिरू शकत. 'अवारित प्रवेशाहि तपोधनाः'- तपस्वी अवरितप्रवेश आहेत. त्यांना प्रवेश करतेवेळी कोणीही रोखू नये, अशी कठोर राजाज्ञा असे. ही आज्ञा त्यांच्या निर्दोष स्वच्छ चारित्र्याच्या कारणाने होती. सूर्यासमोरही

११. 'अनारम्भो हि कार्याणां प्रथमं बुद्धिलक्षणम् ।
प्रारब्धस्यान्तगमनं द्वितीयं बुद्धिलक्षणम् ।।'

१२. 'विघ्नैः पुनः पुनरपि प्रतिहन्यमानाः प्रारभ्य चोत्तमजना न परित्यजन्ति ।' - नीतिशतक

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

न येणाऱ्या त्या महाराण्या कुठलेही अवगुंठन न घेता, आडपडदा न ठेवता त्या लोकगुरूंना वंदन करीत. त्यांचा आशीर्वाद घेत. हे चारित्र्याच्या निष्कलंकतेचे प्रतीक आहे.

चारित्र्याचे भांडार सुगंधाने भरलेले आहे. चारित्र्यवानाचा यशोगंध कोसो दूर उडून पोहोचतो. हरणाच्या नाभीत जी कस्तुरी निर्माण होते; तिचे अणू-परमाणू बाहेरून मागवून तिथे ठेवले जात नाहीत. तसे, कोणाकडून कर्ज घेऊन चारित्र्य प्राप्त केले जात नाही. जलाची शीतलता, अग्नीची दाहकता, वाऱ्याचे वाहत राहणे - हा त्याचा त्याचा प्रत्येकाचा स्वभाव आहे, स्वचारित्र्य आहे. महासती सीतेत चारित्र्याचा अग्नी धगधगत होता; म्हणूनच बाहेरचा अग्नी तिला जाळू शकला नाही. 'नाग्निरग्नौ प्रवर्तते' - अग्नी अग्नीला जाळू शकत नाही. चारित्र्य म्हणजे अग्नीच! त्यात माणसाचे सगळे दोष, पाप इंधनासारखे जळून जातात. चारित्र्य म्हणजे पाण्याची निर्मळ धारच! आत्म्याच्या गहन प्रदेशांना त्यामुळेच शीतलता लाभते. वाऱ्याच्या वेगाने चारित्र्याची संपूर्ण लोकांमध्ये आपोआप ख्याती पसरते. यासच परमधर्म, तप, आचार आणि ज्ञान म्हटलेले आहे.[१३] 'सर्वे पदा हस्तिपदे निमग्नाः' - हत्तीच्या पायांची खूण सर्व प्राण्यांच्या पदचिन्हांपेक्षा मोठी असते. त्यात सगळीच पदचिन्हे सामावून जातात. चारित्र्य हे सुद्धा महान पदच आहे. धर्माची इतर सारी लक्षणे चारित्र्यसिंधूमध्ये सामावून जातात.

खरे पाहता, धर्माला अनुसरून वागणे म्हणजेच चारित्र्य होय. चारित्र्यधर्माविना चरितार्थ शक्य नाही. राहू अदृश्य असतो. तो केवळ चंद्राच्या बिंबावरच दिसून येतो. माणसाची स्वतःची सावली एखाद्या आधाराशिवाय दिसू शकत नाही. आभाळात उडणाऱ्या पक्ष्यांची सावली जमिनीवरच दिसते. कारण, आकाश पोकळीत त्यांची सावली असली तरी ती दिसू शकत नाही. याप्रमाणेच धर्माचे बिंब आचरणानेच ग्रहण करता येते. क्षमा, दया, करुणा, शांती, मैत्री, निर्वैरता, सहनशीलता इत्यादी चरित्रात्मकच गुण आहेत. त्यांना आचरणाद्वारेच प्रकट केले जाऊ शकते. चारित्र्य पुरुषार्थ आहे. प्राप्त करण्यास कठीण अशा उपलब्धींचा प्रदानकर्ता चारित्र्यच आहे. चारित्र्याला पवित्रतर, पवित्रतम बनवण्याचे प्रयत्न सतत करीत राहिले पाहिजेत. आचारातील शिथिलता अंतःकरणात दडलेली/लपलेली दुर्बलता दर्शवते. थर्मामीटरच्या पाऱ्यावरून जसा रोग्याचा ताप उतरलेला; चढलेला कळतो- त्याप्रमाणे मनुष्याच्या शिथिल किंवा कठोर आचारावरून अंतःकरणातील भाव/

---

१३. 'आचारः परमो धर्म आचारः परमं तपः ।
आचारः परमं ज्ञानमाचारात् किं न साध्यते ॥'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रवृत्ती कळायला मदत होते. चारित्र्यवान आपल्या तापमापक नाड्यांची गती वाढू देत नाही. नाडीवरून तापाचा संकेत मिळणे, हे त्याच्या शारीरिक अस्वास्थ्याचे सूचक आहे. चारित्र्यावरून मनुष्याची 'शलाकापरीक्षा' केली जाते.

जपमालेत सुमेरूमण्यांची संख्या १०८ च्या वर असते. जे चारित्र्यशील आहेत; त्यांच्या नावाआधी १०८ लिहिण्याचा प्रघात आहे. ते धर्ममालेचे सुमेरू (चारित्र्यसुमेरू) असतात आणि १०८ च्या वरच विराजमान असतात. हे उच्चासन त्यांना चारित्र्यवान असल्यामुळेच प्राप्त होते. चारित्र्यास प्राणांचा प्राण असेच समजले पाहिजे. कारण, चारित्र्याविना प्राण निष्प्राणच होय. आत्म्याच्या रत्नमंजूषेत चारित्र्यरत्न जपून ठेवले पाहिजे. हा चारित्र्यमणी जर पडला तर त्या नाशवंत घरट्यात सांभाळून ठेवण्यायोग्य असे काही उरतच नाही. त्याची जागा दुसऱ्या कोणत्याही उपादानाने भरून काढणे शक्य नाही. 'न हि रत्नानां बीजावापः कर्तुंशक्यते' - रत्नमाणकांची शेती करता येत नाही. म्हणजेच, धान्याच्या बी-बियाणांप्रमाणे रत्ने पेरता येत नाहीत. पाणी दिल्यानंतर त्याचे रोपटे बाहेर येईल आणि मग दुसऱ्या रत्नवेलीही उगवतील, असेही होत नाही. रत्न तर एकच असते. ते एकदा हरवले की, सापडत नाही.

संपूर्णतः निष्परिग्रह मुनी चारित्र्य-परिग्रह मात्र करतात. चारित्र्यहीन जीवन हत्तीने खाऊन टाकलेल्या कवठासारखे आहे. लोणी काढून घेतलेल्या ताकासारखे आहे. मणिरहित सापाप्रमाणे आहे आणि प्राण नसलेल्या पुतळ्यासारखे आहे. जसे मंत्रोच्चारासह अभिषिक्त प्रतिमेमध्ये देवतत्त्व येते, वसंत ऋतूतील वाऱ्याच्या संपर्काने वृक्षांना नवांकुर फुटतात, त्याप्रमाणे चारित्र्याची आत्मप्रतिष्ठा केल्याने प्राणांमध्ये महत्वाचे प्रकटीकरण होते. ती व्यक्ती महाप्राण होऊन जाते; जी चारित्र्यरत्न आत्म्यामध्ये समाविष्ट करून घेते.

मोक्षमार्गासंबंधी विचार करताना शास्त्रात 'सम्यग्दर्शनज्ञानचारित्राणि मोक्षमार्गः' असे म्हटले आहे. सम्यग्दर्शन आणि ज्ञान सम्यक्चारित्र्याचे दोन डोळे आहेत. चारित्र्यास श्रद्धा किंवा श्रद्धान, असेही म्हटले गेले आहे. सम्यक्ज्ञानदर्शनाने निज-पराचा विवेक प्राप्त होतो. मिथ्यात्वाचा नाश होऊन तत्त्वार्थाचा लाभ होतो. या संसारातील क्षणभंगुर पदार्थांबद्दल विरक्ती निर्माण होऊन आत्मरतीची ओढ लागते. इंद्रियविषय बीभत्स, मलिन आणि त्याज्य (हेय) वाटू लागतात. 'कृमिकुलचितं लालाक्लिन्नं विगन्धि जुगुप्सितम्' इत्यादी शब्दांमध्ये कविजन (भर्तृहरी) त्या मोहमयी आकर्षणांची निंदा करू लागतात. कुणीतरी ठीकच म्हटले आहे की, हे शरीर जर त्वचेने झाकलेले नसते तर गिधाडांच्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

समूहाने ते खाऊन टाकले असते, कुत्र्या-कोल्ह्यांनी सहभोजन केले असते आणि कावळ्यांना भोजनाच्या शोधासाठी दूर जावे लागले नसते.

सम्यग्दर्शन आणि ज्ञानामुळे प्राण्याला सम्यग्विवेक प्राप्त होतो आणि मग उदासीन, विरक्त, तत्त्ववेत्ता अशी व्यक्ती आत्मकल्याणासाठी सगळ्या मोहपाशांना तोडून टाकून चारित्र्य व तपाच्या मार्गावर प्रवृत्त होते. खऱ्या वैराग्याच्या उदयामुळे त्यास मग संवर व निर्जरेची स्थिती प्राप्त होते. मन, वचन व काया समाधिदशा ग्रहण करतात. बाह्यदृष्टी अंतर्मुख होते आणि आत्मचिंतनात ती मग्न होते.

'इच्छा निरोधस्तपः'- यासाठी शक्तिप्रयोगाच्या अभ्यासाची गरज भासत नाही. ते 'तप' स्वयंसिद्ध असते; एखाद्या सापाने कात उतरून टाकावी तसे. अधोगतीचा मार्ग त्यागून एखाद्याने ऊर्ध्वगतीच्या मार्गावर यावे तसे! सम्यक्चारित्र्याची सगळी रहस्ये त्याच्यासमोर प्रकट होतात आणि त्यास मार्गदर्शन करीत पुढे जात राहतात. त्याच्या ज्ञान, ऐश्वर्य आणि वीर्यामध्ये सातिशयाचा उद्रेक होतो. दुःख, दुर्गती, भीती, कष्ट, अभाव आणि अपूर्णता यांचा क्षय होतो. 'शिवः केवलोऽहम् शिवः केवलोऽहम्' - 'मीच शिव आहे, मुक्तिपती आहे...' असे बोल त्याच्या प्राणांतून उमटत राहतात. ज्ञान, भक्ती व आनंद त्याचे श्वासोच्छ्वास बनून जातात. चारित्र्यमय होऊन तो संसारसागरातील लाटांच्या प्रचंड तडाख्यातून वाचतो; शुद्ध मुक्तात्म्याच्या रूपात! मोक्षाला प्राप्त करून पाण्यातील तरंगाप्रमाणे पाण्याशी एकरूप व्हावे; तद्वत आत्मरूप होऊन अक्षय आनंदाचा धनी होतो.

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

धर्म आणि पंथ

धर्माची चर्चा अनादिकाळापासून चाललेली आहे. अनेक संप्रदाय, वर्ग, व्यक्ती आणि महानुभावांनी विविध रूपांत धर्माचे दर्शन केले आहे आणि त्यांच्या निश्चित व्याख्याही केलेल्या आहेत. त्यातले कित्येक धर्माला जीवनाचे अभिन्न अंग समजतात; तर कित्येक असेही मानतात की, जीवनाशी धर्माचा काहीएक संबंध नाही. एक नको असलेले बंधन म्हणूनही काही जण धर्माकडे पाहतात; तर मोक्षधामी पोहोचवणारा एक रत्नजडित जिना म्हणून धर्माचा आदर करणारेही खूप लोक आहेत. धर्म म्हणजे सामाजिक संघटन करण्याचे एक प्रबळ कारण आहे, असे काही मानतात, तर याविरुद्ध मत असणाऱ्यांना धर्म हे हिंसा, वैर, कलह, युद्ध, युद्धोन्माद आणि विनाशाच्या ऐतिहासिक द्वंद्वाचे माध्यम वाटते. बुद्धिवादाच्या तराजूने धर्माला तोलणारेही असंख्य आहेत; पण काहींना मात्र श्रद्धेच्या रत्नांकित मुकुटात धर्माचे दर्शन घडते. काहींना धर्म हे परमार्थ साधण्याचे अमोघ साधन वाटते.

अशा प्रकारे अनेक लोक एकाच धर्माला आपापल्या विविध दृष्टींनी पारखतात. त्याला लक्षपूर्वक बघतात. त्याचे आचरणही करतात आणि स्वतःला धन्य समजतात. थोडक्यात सांगायचे झाले तर जगात आजवर बहुतांश लोकमानसाला विविध भाषा-विभाषांनी ज्याने मथित केले (घुसळून काढले) तो धर्म आहे, असे म्हटले तर ती अतिशयोक्ती होणार नाही. प्रत्येक व्यंजनाला जशी बाराखडी संलग्न झालेली आहे; त्याच प्रकारे प्रत्येक व्यक्ती धर्मबंधनाशीही जोडलेली आहे. अनादिकाळापासून मनुष्य-समाज धर्माला कोणत्या ना कोणत्या रूपात जाणत आला आहे आणि मानतही आला आहे.

ज्याच्यामुळे विविध विचारांचा हा अनादि क्रम, मंथन जगात चालत आलेले आहे; तो 'धर्म' म्हणजे नेमके काय, हा प्रश्न पडतो. एवढे मात्र निर्विवाद सत्य आहे की, धर्म

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बहुचर्चित आहे आणि आजच नव्हे तर चिरंतन काळापासून धर्म या विषयावर सिद्धांत ग्रंथांची निर्मिती केली जात आहे. कोणी धर्माला तलवार म्हणतो; तर काहींनी त्यास आत्मसाधनेचा अमृतबिंदू म्हटले आहे. मतमतांतरे असली तरी धर्माची चर्चा निश्चित होत आहे. त्यामुळे त्याची व्यापकता, त्याचे वैशिष्ट्य, बहुचर्चितता, मान्यता आणि त्याचे वेगळेपण स्वीकार करण्यास नकार दिला जाऊ शकत नाही. त्याचबरोबर त्याची व्याख्याही एवढी सोपी-सरळ नाही की, ताबडतोब उपरोक्त गुंत्यातून, त्या जाळ्यातून बाहेर काढून पाहिली किंवा वाचली जाऊ शकेल. मग, धर्मासंबंधी बोलावे की नाही? तो अनिर्वाच्य आहे की नाही?

धर्माचे साद्यंत/विश्लेषणात्मक ज्ञान मिळवण्यासाठी सामान्यत: धर्मशास्त्रांनी केलेले प्रतिपादन आणि त्यांच्या मान्यता जास्त मदत करू शकतात. आमच्या इहलोक व परलोक जीवनात धर्म आणि अधर्माचे विभाजन करणाऱ्या रेषांनीच माणसाला द्विधा मन:स्थितीत लोटले आहे. असे म्हणत असताना अधर्म-द्रव्याकडे संकेत नाही; तर धर्माविरुद्ध किंवा धर्मरहित जीवनासंबंधीचे विचार व्यक्त करायचे आहेत.

चार पुरुषार्थ सांगताना त्यात धर्माला पहिले स्थान आहे. धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष असे ते चार पुरुषार्थ आहेत. पुरुषार्थाचा अर्थ असा की, माणसाने प्राप्त करून घेण्याचा श्रेष्ठ उद्योग (कार्य). आणि सगळ्या उद्योगांचे मूळ धर्म हे आहे. धर्माशिवाय उर्वरित तीन पुरुषार्थांची सिद्धी/प्राप्ती होत नाही. धर्मपूर्वकच अर्थ, काम आणि मोक्ष साध्य होऊ शकतात. धर्माचा द्वेष केला तर ना अर्थ साधता येत ना काम! धर्मरहित 'अर्थ' हा उपार्जन-साधनेच्या पावित्र्याने रहित असणार आणि धर्मरहित 'काम' तर व्यभिचार श्रेणीतच मोडला जाईल. मोक्ष हा तर परमोच्च पुरुषार्थ आहे आणि तो प्राप्त करून घ्यायचा तर अहिंसा धर्मच मदत करतो.

अहिंसेमुळे प्राणिमात्रांत वैरविशुद्धी येते. मग, वैरविशुद्धीतून समभाव, समभावातून रागपरिणतीचा नाश, रागनाशातून मनाच्या चंचलतेला प्रतिबंध आणि मनाच्या स्थिरतेतून आत्मध्यान आणि मग मोक्षप्राप्ती, असा हा प्रवास आहे.

अशा प्रकारे चारही पुरुषार्थांचे अंतिम साध्य मोक्ष हेच आहे आणि ते धर्मसाधनही आहे. साध्याची प्राप्ती साधनाविना होत नाही, म्हणूनच पावित्र्याने सुरू होणाऱ्या साधनांचा धर्म हा जनक आहे. संपूर्ण कार्यक्षेत्रांमध्ये निर्दोषपणे आणि उत्तम नियमांचे पालन होत असेल तर ते धर्म अंगीकारल्यामुळेच होते. इक्ष्वाकुवंशीयांच्या धर्ममूलक चारित्र्याचे वर्णन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

करताना कालिदासाने म्हटले आहे- 'प्रजा यै गृहमेधिनाम्'- उत्तम वंशाच्या पवित्र अपत्य-परंपरेच्या रक्षणासाठी इक्ष्वाकूंनी गृहस्थधर्माचे पालन केले. कामवासनांची पूर्तता हे त्यांचे उद्दिष्ट नव्हते. अत्यंत संयमित असे त्या वंशाच्या पती-पत्नीचे वैवाहिक जीवन होते. असंयमाला अत्यंत वाईट समजले जात असे. केवळ वासनातृप्तीसाठीच आपल्या स्त्रीबरोबर सहवास करणे, हासुद्धा व्यभिचार मानला जाई. हा असा संयम केवळ धर्मामुळेच शक्य आहे. कारण, 'धर्मेण हीनाः पशुभिः समानाः' 'जो धर्मरहित आहे, तो पशूसारखा आहे.' पशुजीवनातून स्वतःला वर खेचायचे असेल तर धर्मदंडाचा आश्रय घ्यावा लागेल. धर्म नसेल तर कौटुंबिक स्नेहसंबंध यथास्थित चालू ठेवणेही अशक्य होईल. आजच्या युगात कालिदासाच्या 'प्रजा यै गृहमेधिनाम्' या वचनाला 'कामाय गृहमेधिनाम्' असे बदलून वाचणाऱ्यांची संख्या वाढत चालली आहे. उत्तम भांड्यात ठेवलेल्या वस्तूत/पदार्थात दोष निर्माण होत नाही; तद्वत धर्मपात्रात ठेवून अर्थ आणि काम यांना विकृतीपासून वाचवले जाऊ शकते.

व्यवहार आणि निश्चय दोन्ही रूपांत धर्म समजून घेतला तर मनुष्याला सगळ्या पापातून मुक्तता लाभते. व्यवहाराचा मार्ग हा लोक-संरक्षणाचे निमित्त आहे आणि निश्चय मार्ग हा आत्मसिद्धीचे! आत्म्याला निर्ग्रंथ, शुद्ध, बुद्ध, सर्वउपाधिरहित व ज्ञानस्वरूप जाणणे, हा निश्चय धर्म आहे; तर त्यासाठी वस्त्राचा त्याग करून जिनमुद्रा धारण करणे, हा व्यवहारधर्म आहे. वस्तूच्या ध्रौव्य स्वरूपाचा अनुभव निश्चय करून देतो आणि व्यवहार मात्र त्याच्या कंकण, कुंडल इत्यादींवर अवलंबून राहतो. माता-पिता, भाऊ इत्यादि लोकव्यवहार आहे. निश्चयरूपाने पाहता हे केवळ कर्मानुबंधी अनंत पुद्गल पर्याय आहेत.

जनकल्याणकारक रूपाला डोळ्यांसमोर ठेवून धर्माच्या ज्या व्याख्या रूढ करण्यात आल्या आहेत; त्यांच्यामुळे आत्म्याला मोक्षमार्गाकडे प्रवृत्त करण्यासाठी बळ लाभते. अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह इत्यादींचे पालन जोपर्यंत केले जात नाही, जोपर्यंत सम्यक्चारित्र्य मार्गावरून चालायला जमत नाही; तोपर्यंत मोक्ष मिळू शकणार आहे का? यामुळेच धर्म हा मोक्षाचा मार्ग दाखवणारा परमसहायक आहे. धर्माचे हेच रूप जाणून घेऊन, त्याचे पालन करून आत्मा परमात्म भावाच्या प्राप्तीसाठी समर्थ होतो. धर्माच्या या रूपात धर्म एकमेव सखा आहे, निर्माता आहे आणि जीवनाला सर्वोच्च पुरुषार्थाची विभूती प्रदान करणारा आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जो धर्माला आपला मार्गदर्शक मानतो, तो कधीच वाट चुकत नाही. धर्माचे तेज अधर्म-मार्गावर पडत नाही. म्हणूनच, धर्माच्या प्रकाशात चालण्याचे व्रत ज्याने घेतले आहे, तो कधी अंधारात चाचपडत बसत नाही. जीवनातील सर्व कलांना धर्म एक विशिष्ट सौंदर्य प्राप्त करून देतो. जे मनापासून धर्माचे पालन करतात; त्यांच्या चेहऱ्यावर एक अपूर्व सात्त्विक तेज झळकत असते आणि तो त्याच्याकडे बघणाऱ्यांना अगदी सहजपणे आकर्षित करून घेतो. अधर्माने वागणाऱ्या व विकारांनी ग्रस्त असलेल्या व्यक्तीचे विचार त्याच्या चेहऱ्यावर उमटलेले दिसतात. धार्मिक मनुष्याला नमस्कार करण्यासाठी जणू लोकांचे मन:प्राण उचंबळून येतात. एका निर्हेतूक श्रद्धेचे भाव त्या धार्मिक माणसाविषयी त्यांच्या मनात उत्पन्न होतात. ज्याप्रमाणे आगीच्या संपर्कात आल्यावर दूध ऊतू जाते त्याप्रमाणे धर्मज्ञ, धर्मवृद्धांच्या उपस्थितीत त्यांना वंदन करण्यासाठी मन जणू उठून उभे होते. त्यांना वंदन करून, त्यांच्या आशीर्वादाचे अमृत प्राप्त करून घेऊन पुन्हा स्थित होते.

एखादा मनुष्य ७२ कलांमध्ये निपुण असेल; परंतु धर्मकलेत जर तो अकुशल असेल तर तो पंडित-विद्वान असला काय, नसला काय; त्याच्या सर्व कला व्यर्थ, अर्थहीन आहेत[१]- असे कोणीतरी म्हटले आहे. कारण, कला हे तर उज्ज्वलता, अमृतमयता आणि रसिकतेचे नाव आहे. त्यांच्या समृद्धीत चंद्र अमृतमय होऊन जातो. 'आत्मानुशासन'मध्ये एक सूक्त आहे. ते असे की कल्पवृक्ष, चिंतामणीरत्न यांच्यामुळे मनातल्या संकल्पित इच्छा पूर्ण होतात. परंतु, धर्माचे पालन केले तर कुठलीही गोष्ट न मागताही धर्म अचिंत्य फळ देतो.[२] -'याचे कल्पतरू देय सुख चिन्तत चिन्तारैन । बिन याचे विन चिंतवे धर्म सकल सुख देन ।' या दोह्यामध्ये 'आत्मानुशासना'च्या वरील श्लोकाच्या आशयाचे प्रतिबिंब उमटले आहे.

धर्म हा विश्वशांती, विश्वप्रेम आणि परस्परसहिष्णुता यांना उन्नत करणारा आहे. अशांतता, शत्रुत्व आणि असहिष्णुता तेव्हाच फोफावते जेव्हा व्यक्ती, समाज व राष्ट्र अधर्माच्या व्यवहारात बुडतात. 'धर्मस्य सूक्ष्मा गतिः'- धर्माची गती मोठी सूक्ष्म आहे.

---

१. 'बावत्तरी कला कुसला पंडियपुरुसा अपंडिया चेव ।
सव्व कलाण विपरं जे धम्मकलं न जाणांति ।'

२. 'संकल्प्यं कल्पवृक्षस्य चिन्त्यं चिन्तामणेरपि ।
असंकल्प्यमसंचिन्त्यं फलं धर्मादवाप्यते ।।' - आत्मानुशासन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

उदबत्ती हळूहळू जळते आणि सगळ्या खोलीत सुगंध पसरवते. उमललेल्या फुलाचा सुवास अदृश्य रूपात उडतो आणि नाकपुड्यांमध्ये सुगंध भरून टाकतो. त्याचप्रमाणे, सत् किंवा असत् व्यवहारांच्या प्रक्रियेने सर्वव्याप्त परमाणूंमध्ये सूक्ष्म कंपने निर्माण होतात आणि ती आपल्या स्वत:सारखे वातावरण निर्माण करतात. पाण्यावर उठणारे तरंग आपण पाहतो; परंतु ते तरंग जो उठवतो त्या वाऱ्याला आपण पाहू शकत नाही. त्याच प्रकारे जगात पसरणारी अशांती तर आपण पाहू शकतो; पण तिच्या मुळाशी जी उत्पादक कारणे आहेत, त्याकडे आपण लक्ष देत नाही.

आकाशवाणी केंद्राकडून प्रसारित होणारे कार्यक्रम दूर अंतरावरूनसुद्धा 'रेडिओ'च्या साहाय्याने आपल्याला ऐकू येतात. त्या प्रकारे श्वासोच्छ्वासाबरोबरच मनातील विचारांचा प्रभावसुद्धा अव्यक्त रूपाने वायुमंडळात विषारी होऊन सगळ्यांवर परिणाम करतो. सामुदायिक रूपाने जर जग एखाद्या विचारासंबंधी अंतर्मुख होत असेल; तर त्याच्या मुळाशी ते दूषित वातावरणच कारणीभूत असते आणि ते वातावरण रात्रंदिवस नेते, वृत्तपत्रे, चर्चा यांच्या प्रसारणामुळे निर्माण होत असते. नकळतपणे ते वातावरण अज्ञात रूपात प्रजा आणि राष्ट्र यांच्या बेसावध मनावर क्रिया-प्रतिक्रियांचा मारा करीत राहते. परिणामी मग त्याच दिशेने विचार होतो; त्याच विचारांना बळकटी येत राहते. ही अशांती, तणाव आणि विरोधाची भावना व्यक्ती आणि राष्ट्रांना समान रूपाने प्रभावित करीत राहते. म्हणून, चिंतनाचा परिणामच जवळच्या किंवा दूरच्या वातावरणाच्या निर्मितीचे कारण आहे, असे म्हणणे तर्कसंगत आहे; आणि या दृष्टीने पाहता धर्मचिंतनाचा परिणाम हा जास्त बलवान असतो, हे स्पष्टच आहे.

जोपर्यंत धर्म त्याच्या वास्तविक रूपात जनमानसात विद्यमान असतो तोपर्यंत नेहमीच नवीनवी, उत्तम मंगलकार्ये, शुभकार्ये होत राहतात. उदात्त गुणांचा प्रसार होत राहतो. परंतु, ज्याप्रमाणे शरीराच्या अस्वच्छतेमुळे वेगवेगळ्या व्याधी उत्पन्न होतात, त्याप्रमाणे मनात अधर्म शिरला की, मनाला मलिनता येते. छळ, कपट, द्वेष, हिंसा, पापसमूहाची उत्पत्ती होते आणि सगळे जीवनच विषमय होऊन जाते. धर्महीन पापकर्म करताना जरासुद्धा मागेपुढे होत नाही तर पुण्यशील व्यक्ती धर्माविरुद्ध जाऊच शकत नाही. कारण, धर्म सात्त्विकतेकडे घेऊन जातो. विश्वाशी मित्रतेचे संबंध स्थापन करण्याचा आग्रह धरतो. 'वसुधैव कुटुंबकम्' हे धार्मिक लोकांची मनोभावना व्यक्त करणारे सूत्र आहे. 'हे माझे, हे परक्याचे' अशा क्लेशकारक संकुचित विचारधारेला धर्म पराभूत करून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विराट रूपातील वैजयंतीमाला धारण करतो.

धर्म निराकुलतेची जननी आहे. आनंदाचा जनक आहे. सुखांचा भ्राता आहे आणि शांतीची ती पवित्र भूमी आहे. धर्मात्मा मनुष्य संकुचित सीमारेषा ओलांडून विशालतेच्या शिखरावर विहार करतो. तो दुःख, गरिबी, ग्लानी, तुच्छता इत्यादी मूढतांना सोडून देऊन आनंद, संपन्नता, प्रसन्नता व उदात्त मनाच्या विशाल संसारात संचार करतो. दिशांची सगळीच दारे त्याच्यासाठी उघडी आहेत. सागराच्या लाटांचे जल त्याची स्तुती गाते आणि हिमालय मागे सरत त्याला मार्ग करून देतो. ही धर्माची महती आहे.

आत्म्यामध्ये निर्दोषभाव जागा करून धर्म वस्तुस्वभावाचे ज्ञान करून देतो. जो वस्तुस्वभावाला जाणून घेतो; तो धर्माला ओळखतो. 'वस्तुस्वभावो धर्मः' - वस्तूचा स्वभाव म्हणजेच धर्म आहे. उष्णता हा अग्नीचा स्वभाव आहे. तो त्याचा धर्म आहे. जर तुम्ही थंड अग्नी शोधू लागलात; तर जगभर हिंडूनही तो मिळणार नाही. कारण, आग थंड नसतेच. माणसाचा धर्म त्याचा खराखुरा विवेक आहे आणि विवेकाचा अर्थ आहे, विवेचनातून प्राप्त झालेले सत्य! तत्त्वार्थाचा परिणामच विवेक आहे. स्व-पर भेदविज्ञान हाच विवेक आहे. रत्नत्रयाच्या प्राप्तीशिवाय विवेक लाभत नाही. विवेकानेच सम्यक्त्व प्राप्त होते. विवेकामुळेच दर्शन, ज्ञान, चारित्र्य उत्पन्न होतात. अप्रमत्तगुणाच्या स्थापनेसाठी विवेक उत्कृष्ट सहायक आहे. 'तुष-माष'चे भेदज्ञान विवेकाच्या स्फुरणाचेच निदर्शक आहे. विवेक मनुष्याला सम्यक्त्वामध्ये प्रतिष्ठित करणारा आहे. हिरा कोणता व काच कोणती, यातला फरक विवेकानेच कळतो. उत्कृष्ट मार्गाची निवड विवेकाशिवाय करताच येत नाही. विवेक अनंतानुबंधी कर्माचा क्षय करतो. माझा आत्मा अत्यंत वीर्यसंपन्न आहे, विराट आहे, हे मनुष्याला विवेकानेच कळते. तिरस्कृतता हा शरीरधर्म आहे, प्रभुता हा आत्म्याचा धर्म आहे. शरीर नाशवंत आहे तर आत्मा अविनाशी! म्हणून, जे अविनाशी आहे, त्याच्यासाठी विवेकाचा उपयोग करणे हितावह आहे. कारण, जी व्यक्ती अनित्य वस्तूंच्या मोहापायी नित्य वस्तूंचा त्याग करते, तिला पश्चात्तापाखेरीज काहीच मिळत नाही. कारण, असे की जे जे नाशवंत/नश्वर आहे, ते तर नष्ट होऊन जाणारच आणि जे अनश्वर आहे; त्याच्याशी त्याची ओळखसुद्धा होणार नाही. हे जाणून घेतल्यामुळेच बुद्धिमान चिरंतन सुखाची अपेक्षा करतात.

धारणात धर्ममित्याहुः धर्मो धारयते प्रजाः -जी शक्ती धारणा करते ती शक्ती म्हणजे धर्म! प्रजेला धर्मच धारण करतो. अग्नीला त्याची उष्णताच धारण करते. आपल्या दाहक

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शक्तीच्या बळावरच अग्नी अनुल्लंघनीय आहे. जेव्हा ज्वाला विझून केवळ भस्मस्वरूप राहतात, तेव्हा त्यावर कोणीही पाय ठेवू शकतो. तथापि प्रज्वलित अग्नीवर पाऊल ठेवण्याची शक्ती कुणातच नाही. धर्मनिष्ठ व्यक्तीकडे सर्वच जण आदराने पाहतात; परंतु धर्महीनांचा कोणी आदर करत नाहीत. धर्मपरायण व्यक्ती पूर्णतः स्वतंत्र नसते. ती धर्मबंधनात बांधलेली असते. धर्म त्या व्यक्तीत योग्य-अयोग्य मार्गाचे दिग्दर्शन करीत असतो. धर्माची बंधने मुक्तिप्रद असतात आणि रागाची बंधने भवबंध करीत असतात. धर्मबंधने चारित्र्याचे सहयोगी असतात. स्वैराचाराचे मित्र नसतात. ते गतीला गौरव देणारी असतात. दिशा-भ्रमीत करणारे नसतात. या बंधनात जीवन-तुलाचे संतुलन आहे. दिवसाचा प्रकाश आहे. उषेची अरुण-लालिमा आहे. ही बंधने तर संयमाची प्रतीके आहेत. लोहशृंखलेची बंधने नाहीत. ज्याप्रमाणे ऊस पेरापेरांवर परिपक्व असतो; त्याचप्रमाणे धर्माचरणी माणसाचे जीवन तप-त्याग, शीलसंयम, चारित्र्य इत्यादींच्या बाबतीत ऊर्ध्वगामी बनत जाते. धर्म प्राणिमात्रांच्या त्या गुणांना आविष्कारित करून नराचा नारायण बनविणाऱ्या मार्गाचा उपदेशक आहे.

निषेधात्मक भाषेतच धर्माची व्याख्या करायची म्हटले तर म्हणता येईल की, सप्तव्यसनांचा त्याग करणे हाच धर्म होय. मायाचार न करणे म्हणजे धर्म होय. काय आहे धर्म? भगवंतांच्या पदकमली एकाग्रचित्त होऊन भक्तिभाव ठेवणे म्हणजे धर्म आहे. देव, गुरू, अतिथी यांचा यथाशक्ती भक्तिपूर्वक सत्कार करणे, हा धर्मच आहे. सर्वांबद्दल समताभाव ठेवणे, हाही धर्मच! जो सदाचारी आहे, नम्र/विनयशील आहे, सत्यवचनी आहे. त्याच्यामध्ये धर्म स्थित असतो. क्रोध, मान, माया, लोभ त्याने वर्ज्य केलेले असतात. तो इंद्रियांना ताब्यात ठेवतो. अभिमान त्याला नसतोच. तो मृदुता धारण करतो. तो शीलाचा जणू सागरच असतो. सद्गुणांचे आगार भांडार असतो. दुसऱ्याचा तिळाएवढा जरी लहान गुण त्याला दिसला; तरी तो त्यास पर्वताएवढा सांगतो आणि प्रसन्न होतो. एखाद्या व्यक्तीमध्ये त्याला उत्तम गुण दिसले तर त्याच्या मनात ईर्षा-असूया उत्पन्न होत नाही. जिनेंद्रभगवंतांच्या चरणकमलाचा तो भ्रमर आहे.

याउलट कपटी, रागीट, खोटे बोलणारा, फसवणूक करण्यात पटाईत, देव-गुरू यांच्याविषयी विनय न बाळगणारा, फक्त संसारालाच आपले मानणारा आणि 'तन उपजत अपनी उपज जान, तन नशत आपनो नाश मान' या वृत्तीला अनुसरणारा असा मनुष्य नक्कीच आत्मधर्मापासून वंचित असतो. अशी दिशाभ्रम झालेली व्यक्ती आत्मज्ञानालाही

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पारखी असते. त्याची भयंकर फसवणूक झाली आहे. जगाच्या या मीनाबाजारात तो लुटला गेला आहे, काम-क्रोधरूपी डाकूंद्वारे! त्याला ज्ञानावरणीय कर्मांनी अकिंचन करून टाकले आहे. दुःख-क्लेशाच्या भिंतींवर तो श्वासोच्छ्वासाची दारुण, क्षणभंगुर चित्रे काढतो आहे. पुसून टाकतो आहे आणि त्यातच त्याने आपल्या मनुष्यपर्यायाचे दुर्लभ क्षण नष्ट करून टाकले आहेत. तो अधार्मिक आहे. धर्माला जो पारखा झाला आहे, तो अमृतालासुद्धा पारखा झाला आहे, असे म्हटले तरी ती अतिशयोक्ती नाही ठरणार! धर्म आत्मज्ञान प्राप्त करून देणारा सहयोगी आहे. परलोक यात्रेची ती शिदोरी आहे आणि धर्मराजाच्या वहीखात्यात नोंद करण्यास योग्य असे श्रेष्ठ भांडवल आहे, पुंजी आहे.

हा धर्म त्रिकालाबाधित आहे. सत्यरूप आणि अहिंसामय आहे. हा ज्ञातव्य, जाणून घेण्यायोग्य आहे. दर्शनीय आणि आचरणीय आहे. धर्मरूपी नौकेवर स्वार होऊन भवसागर तरून जाऊ पाहणारा कधी बुडत नाही. संसारातील प्रयत्नपूर्वक मिळवलेल्या भासमान भोगांचा, सुखांचा परिणाम दुःख हाच आहे. ती मिळाली असता जेवढा आनंद होतो; तेवढाच त्यांच्या वियोगाने शोकही होतो. धर्म आत्मदृष्टी देतो आणि त्यामुळे प्राप्ती आणि नाश याबद्दलचा हर्ष-विषाद, सुख-दुःख माणसाला होत नाही. कारण, खरे पाहता दोन्हीही मिथ्याच आहेत. धर्मदृष्टी प्राप्त झाली नाही तर सुखदुःखाचा अनुभव येतो. अशा प्रकारे धर्म एक शांतिकवच आहे. जो मनुष्य धर्माचरण तर करतो पण मनातून मात्र मायाचारी वर्तन करतो तो धर्माला फसवतो. परंतु ज्याने धर्माला आतूनबाहेरून पूर्णतः ग्रहण केले आहे, तेच धर्माचे खरे उपासक आहेत. या जगाचे संतुलन बिघडवण्यात अधार्मिक लोकांचाच मोठा हात आहे. धर्माच्या उत्तमतेला जे जाणत नाही, ते त्याला पाखंड, दंभ/ढोंग म्हणतात आणि परमात्म्याची भक्ती करणाऱ्यांना देवांचे गुलाम म्हणतात. परंतु, विचारांती असे निदर्शनास येते की, अधार्मिक लोकांचे जीवनदर्शनच जगासाठी भीतिदायक आहे. पाप-पुण्याबद्दल अयोग्य दृष्टिकोन बाळगणारे हे लोकच जगाला महाविनाशाच्या गर्तेत लोटत असतात.

'न धर्मो धार्मिकेविना' धार्मिकांशिवाय धर्माची क्रियाशक्ती पांगळी होऊन जाते. जसे अग्नी लाकडाच्या माध्यमातूनच व्यक्त होतो. तद्वत, धार्मिक लोकच धर्माला लोकव्यवहाराचे रूप देतात. मनुष्याच्या आवश्यक वैशिष्ट्यांपैकी धर्म प्रमुख आहे. ते वैशिष्ट्यच जीवनाची आत्मशक्ती आहे. ती नसेल तर शिव 'शव' आहे, आग राखेचा ढीग आहे. राष्ट्राचे जनपथ शून्याचेच विस्तार आहेत. धर्म संरक्षणाने मनुष्य प्राण्यांमध्ये औदार्य,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सौंदर्य व पवित्र चारित्र्याची स्थापना होते. 'मनुष्यजाति रेकैव' - उदार मनाने धर्माची सेवा करणारे जे आहेत, त्यांची मनोभावना संपूर्ण मनुष्यजातीला एकतेच्या बंधनात बांधून ठेवते. मनुष्य स्वधर्मासहितच जन्मतो. अहिंसा, क्षमा इत्यादी त्याचे अकृत्रिम/स्वाभाविक धर्म आहेत.

मूल जन्मल्याबरोबर आईकडे वात्सल्याची मागणी करते. तो प्रत्येक जीवाचा जन्मजात अधिकारच आहे. आई बाळाला दूध पाजते आणि स्वत:ला शैशवाच्या पहिल्या क्षणी मिळालेल्या दुधाचे ती जणू प्रतिदानच करते. अशा प्रकारे वात्सल्याच्या परंपरेचे रक्षण केले जाते. 'परस्परोपग्रहो जीवानाम्'चा हाच तर अर्थ आहे. या वात्सल्याची देवाणघेवाण केल्यामुळेच तर जगातला मानव जिवंत आहे. 'मत्स्यन्यायाने' तर मानवजात नष्टच होऊन जाईल. वात्सल्यात पोषणाची भावना आहे. तीच अहिंसा आहे. जन्मल्याबरोबर अर्भक आपल्या आईकडून 'अहिंसा'च प्राप्त करते. दुधाच्या धारेतून आई त्याला अहिंसाच पाजत असते. मनुष्यप्राणी चारही दिशांतील अहिंसेमुळेच जगतो. 'अहिंसा' पिऊनच तो पुष्ट होतो. या दृष्टीने अहिंसेच्या व्यापक स्वरूपाचा विचार करताना आचार्यांनी म्हटले आहे, 'अहिंसा भूतानां जगति विदितं ब्रह्म परमम्।' हेच श्रेष्ठ ब्रह्म आहे. मानवजातीच्या सुखाची आधारभूमी 'अहिंसा' आहे. 'आत्मन: प्रतिकूलानि परेषां न समाचारेत्' - आपल्याला जे प्रतिकूल, नकोसे वाटते तेच दुसऱ्यांसाठी करू नये, हे अहिंसापालनाचे मार्गदर्शक सूत्र आहे. जो अहिंसक आहे, त्याच्याशी सगळेच स्नेह जोडतात. हिंसकापासून मात्र जग सदैव दक्ष व सावधान असते. त्यांच्याकडे विश्वसनीय म्हणून पाहता येत नाही.

धर्माचरण करतेवेळी चूक होऊ देता कामा नये. जर तुम्ही खाणे-पिणे, झोपणे-उठणे आणि आपल्या दैनिक विरंगुळ्यांसाठी वेळ काढत असाल तर धर्मासाठीही वेळ द्यायला पाहिजे. आपण केलेल्या कामांना धर्माच्या तराजूने तोलून बघा. माळेचे सर्व मणी जसे दोऱ्यात गुंफलेले असतात; तशी आपली सर्व कार्ये धर्मसूत्रात ओवलेली असू द्यात. जे मणी किंवा जी फुले धाग्यात गुंफलेली नसतात, ती देवतांना भेट म्हणून चढवता येत नाहीत. अशा प्रकारे जे कार्य धर्मानुरूप नाही, ते आपल्या आत्म्यासाठी स्वीकारू नये. खरेदी करताना प्रत्येक वस्तू जशी तोलूनमापूनच घेतो; तसे जीवनात क्रियाकर्म करतानासुद्धा ती धर्मकाट्यावर तोलूनच करावी. धर्माला डावलून केलेले कार्य पावित्र्याबाबत शंकास्पद ठरते. सोने जसे कसोटीवर पारखले जाते; तशी आपली सगळी कार्ये 'धर्मनिकषग्रावे'वर म्हणजे धर्मरूपी पाषाण-तुकड्यावर निकष लावूनच करावीत. जो मनुष्य आपली प्रत्येक

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कार्यप्रणाली स्वत:च्या धार्मिक व्यक्तित्वानुसार करतो; त्याच्या वाट्याला दु:ख येत नाही. भल्या पहाटे उठून दिवसभर जी कामे करायची आहेत; त्याबद्दल धर्मबुद्धीनुसार विचार करणे आणि रात्री झोपण्यापूर्वी दिवसभरातील त्या कामांचा समीक्षात्मक आत्मदृष्टीने पुनर्विचार करणे, हे सन्मार्गावर कायम चालत राहण्याचे साधन आहे.

प्रत्येक व्यक्तीने विचार केला पाहिजे की, माझा आजचा दिवस शुभ कामात गेला की व्यर्थच गेला? धार्मिक माणसाने तर आपला वेळ, दिवस आणि क्षणसुद्धा व्यर्थ कार्यांमध्ये किंवा निष्क्रियतेत घालवून हिंसा करायला नको. वेळेचा दुरुपयोग ही खूप मोठी हिंसा आहे. मनुष्य पर्यायात मिळालेल्या दुर्लभ क्षणांचा तो अपमान आहे. कारण, कितीही किंमत मोजली तरी गेलेले क्षण पुन्हा जिवंत करता येत नाहीत.

जर आपल्या दिनचर्येत काही चूक झाली तर त्याची शुद्धी करण्यासाठी प्रायश्चित्त घेतले पाहिजे. ही चूक पुन्हा होणार नाही असा संकल्प मनाशी केला पाहिजे. कारण छोट्याछोट्या सवयींनीच स्वभाव बनून जातो. स्वभाव धार्मिक व्हावा म्हणून खूप मोठीमोठी व्रतेच घेतली पाहिजे, असे नाही. उलट, जीवनातील लहानसहान गौण गोष्टीचे पालनही एखाद्या महत्त्वपूर्ण कार्यासंबंधीच्या निष्ठेने करण्याचा सराव व स्वभाव बनला पाहिजे. रस्त्यात पडलेला दगड लाथेने ठोकरून द्यायला नको. ते योग्य नाही; तर त्याला चुकवून बाजूने जावे अथवा उचलून एका बाजूला ठेवावे. जो त्या दगडाला ठोकर मारून दूर फेकतो; त्याचे मन काही अंशाने प्रमादवश आहे, हे लक्षात येते. धर्म आणि धर्मी जोपर्यंत एकरूप नाहीत, तोपर्यंत समरसता उत्पन्न होत नाही. आंब्याचे फळ व त्यातील गोडी दोन्ही गोष्टी एकजीव होऊनच आपल्यातले माधुर्य व्यक्त करतात. फळातून गोडी बाजूला काढता येत नाही. जोपर्यंत लाकडे अर्धवट जळत असतात; तोपर्यंत त्यातून धूर निघत राहतो. परंतु, ती पूर्ण जळाल्यानंतर फक्त लाल लाल निखारे शिल्लक राहतात. तेथे लाकूडही दिसत नाही व धूरही दिसत नाही. ते निखारे अग्नीचे पूर्ण स्वरूप बनवतात. त्यावेळी तेथे परिपूर्ण अग्नीचेच स्वरूप, अस्तित्व दिसून येते. धर्म हाच ज्याचा प्राण आहे; त्या व्यक्तीचे जीवनही अशा प्रकारे चारित्र्याने सर्वांगपूर्ण असले पाहिजे. त्या चारित्र्यचंद्राची एक कला/कोरसुद्धा अचारित्र्याने मलिन होऊ नये. लोकोक्ती आहे की, 'स्याद् वपुः सुन्दरमपि श्वित्रेणैकेन दुर्भगम्'। शरीराच्या एखाद्या भागावर कुष्ठाचा डाग उमटतो, तेव्हा संपूर्ण अंगच विद्रूप झाल्यासारखे वाटते. हीच गोष्ट धर्मजीवी माणसाच्या चर्येबाबत आहे. त्याच्या चर्येत यत्किंचितही विकृती आली तर त्याच्या संपूर्ण धार्मिकतेबाबत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

चंद्रावर मृगखूण दिसावी तसे घडते. त्या डागापासून स्वतःचे रक्षण करणे, हा अप्रमत्त योग आहे, असे म्हणतात. 'त्रपु सहस्रक्षालितमपि रंग न जहाति'- 'रंग' नावाचा धातू हजार वेळा धुतला तरी त्याचा नैसर्गिक मळ तो सोडत नाही. आपल्या विचारांना 'रंग' बनवू नका.

कायम आठवण ठेवा की, एखादा कुशल शेतकरी जसा शेतात पिकलेल्या धान्यावर निर्दयपणे विळा चालवतो; तसा आयुकर्म संपले की, काळसुद्धा एका क्षणाचीही सवलत न देता प्राणिमात्राचा संहार करतो. म्हणून, जीवनाचा अस्त होण्याआधीच स्वतःसाठी कल्याणाची साधने उपयोगात आणा. धर्मपालनासाठी विशिष्ट काळवेळेची वाट पाहू नये. कारण, जो प्रतीक्षा करीत राहतो, त्याच्याकडे संधी आपणहून येत नाही. जे साहसी असतात, ते संधीला स्वतःकडे खेचून आणतात. जेथे जायचे आहे; तिथे जाण्यासाठी आवश्यक ती धर्माची शिदोरी तयार ठेवा. धर्माचे यान ऊर्ध्वमुखी आहे आणि अधर्माच्या रथाची चाके नरकाच्या चिखलात रुतून बसली आहेत. तीर्थंकरांच्या दिव्य स्फटिकाच्या तेजाने धर्म प्रकाशमान आहे आणि अधर्माने तर स्वतःला अंधाराने लपेटून घेतले आहे. धर्मविन्मुखाला त्याच गहन गर्तेत ओढून घेण्यास तो तयारच आहे. धर्माचरणाने शुभबंध होतो. 'समीचिनं धम्मं देसयामि' असे म्हणत आचार्यांनी, शास्त्रकारांनी धर्माला समीचिन म्हटले आहे. ही समीचिनता जणू एक दिव्य वरदानच आहे. डेरेदार, गर्द सावली देणाऱ्या, उत्तम फळ देणाऱ्या या धर्मवृक्षाखाली बसून साधना करणारा धर्मात्मा अनंताकाशाच्याही वर स्थित असणाऱ्या आनंदलोकाचा मार्ग खुला करतो. धर्माचे पालन केल्याने आत्मबल वाढते आणि आत्मबळाच्या वृद्धीपेक्षा अन्य महान गोष्ट कोणती आहे?

धार्मिक आचरण राष्ट्रीय चरित्र उन्नत करणारे आहे. व्यक्तीव्यक्ती मिळून राष्ट्र बनते आणि त्यांच्या आचरणामुळे राष्ट्राचा स्तर-दर्जा बनतो. जसा धागा तसे वस्त्र! जर राष्ट्रातील लोक धर्ममय असतील तर राष्ट्रसुद्धा धर्ममयच होईल. शेवटी, राष्ट्र व्यक्तींमुळेच तर बनते. व्यक्ती आणि सत्ता यांच्याशिवाय एखादा भूखंड राष्ट्र या संज्ञेस पात्र ठरत नाही. हे सिद्ध करायला जास्त उदाहरणे देण्याची गरज नाही. एखाद्या पार्टीत सामूहिक खाण्यापिण्यासाठी जेवढी व्यवस्था केलेली असते; त्यात खाण्यापेक्षाही उष्टेच जास्त टाकले जाते. असे उष्टे टाकताना लोकांच्या मनात थोडासुद्धा विचार येत नाही की, अशा प्रकारे अन्नाची नासाडी करणे ही केवढी मोठी हिंसा आहे. फेकून देण्याइतके अन्न जर बनवलेच नसते तर त्या अतिरिक्त अन्नाने कितीतरी लोकांची भूक भागवता आली असती. असे उष्टे टाकणे बऱ्याच

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

लोकांमध्ये तर एक आवश्यक आत्मप्रतिष्ठेचे लक्षण समजले जाते. परंतु, राष्ट्राचा विचार केला तर हे महागाईचे कारण आहे आणि आमच्या अस्थिर, चंचल मनोवृत्तीचे दर्शन घडवणारे आहे, असे वाटू लागते. जेव्हा अन्न दुर्लभ असेल तेव्हा तर हा पराकोटीचा अपराध ठरतो.

कारण, रुपया-पैशाने धान्याचे दाणे बनत नाहीत. निसर्ग-शेतकऱ्याच्या कठीण परिश्रमाचे फळ असते. अन्नधान्य नोटांप्रमाणे उत्पन्न करू पाहणे हे दिवास्वप्नच आहे. म्हणून, जी वस्तू नाण्यांनी तयार होऊ शकत नाही ती अशी पैशांवर उधळणे म्हणजे मनुष्यजातीला संकटात टाकणे होय. सर्वच व्यावसायिक क्षेत्राला हे विचार लागू पडतात. धर्मबुद्धीनेच या प्रकारची विचारधारा निर्माण होते आणि धार्मिकच तिचे पालन करण्यात अग्रेसर असतात. या दृष्टीने धर्म हाच राष्ट्राच्या नैतिक उन्नतीचा सशक्त आधार आहे. धर्महीन असल्याने अविचारांच्या जाळ्यात फसलेला मानव स्वतःच्या आणि राष्ट्राच्या जीवनाला पतनाच्या गर्तेतच लोटतो.

...आणि पंथ धर्माचे हे क्षेत्र विशाल आहे. यात सगळ्याच उत्तम व चांगल्याच गोष्टींचा समावेश आहे. परंतु, कधीकधी व्यक्तिवाद धर्माला घेरून टाकतो आणि त्याला मर्यादित करतो. तसे सीमित झाल्यामुळे त्याच्या गुणावलीत त्याच्याच न्यूनतेबरोबर अनेक विकृतीही निर्माण होतात. कारण, धर्मासारख्या अमर्याद गोष्टीला मर्यादित बांधून टाकणाऱ्याचा वैयक्तिक आग्रहही त्यात मिसळलेला असतो. हा वैयक्तिक आग्रह सामूहिक दृष्टिकोनातून प्रांजळ भाग ग्रहण करू शकत नाही. तो धर्मापासून वेगळा होतो व 'पंथ'वादाचे पोषण करतो. जगात आज अनेक पंथ आहेत. त्या पंथांमधील एका विशिष्ट वर्गाने आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे. पंथाचे कार्यक्षेत्र त्यांच्यापुरतेच सीमित आहे. मर्यादित क्षेत्रात राहिल्यामुळे त्यांना ते दुसऱ्या सीमांना आपल्यापेक्षा लहान समजतात आणि असे मानत राहिल्याने त्यांच्यामध्ये एक अनुदार पक्षपाती भावनेचा उदय होतो. पक्षपातामुळे कलह वाढतच जातो आणि त्या त्या पक्षाचे लोक धर्माचे मंगलस्वरूप विसरून जाऊन अहोरात्र आर्त, रौद्र ध्यानात फसतात.

भगवान महावीरांनी 'समीचिनं धम्मं देसयामि' असे सांगून मानवजातीला हितकारक अशा धर्माचे निरूपण केले आहे. परंतु, त्यांना मानणाऱ्यांनी त्यांचा आदेश अंशतः ग्रहण केला व अनेक पंथांची नावे त्यास दिली. हिंदूंमध्येसुद्धा कबीर पंथ, दादू पंथ, द्वैत मत, अद्वैतवाद, शैववाद, शाक्त पंथ, वैष्णव पंथ इत्यादी अनेक पंथ प्रचलित आहेत. असे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वाटते की, धर्माच्या या अथांग गंभीर सागरातून आपल्या क्षमतेनुसार पंथ-निर्माणकर्त्यांनी आपलेआपले बुद्धिपात्र भरले आणि त्यांना वेगवेगळी नावे दिली. त्या पंथांच्या भक्तांनी व अनुयायांनी आपापल्या नेत्यांच्या नावाने पुढेही तो पंथ जिवंत ठेवला. 'शीख' शब्दाचा प्रयोग आज एका विशिष्ट जातीपुरता मर्यादित झाला आहे. परंतु, एकेकाळी शीख हिंदू होते. मोगल आणि भारतीयांच्या संघर्षकाळात ज्यांनी केस, कंघी (कंगवा) कच्छ, कडे व कृपाण धारण करून गुरूंचे शिष्यत्व पत्करले व युद्धात सहभागी झाले; ते गुरूचे शिष्य बनले व कालांतराने शिष्य (शीख) एक वेगळा पंथ निर्माण झाला. शिखांच्या 'ग्रंथसाहेब'मध्ये हिंदूंच्या भगवान रामाचे वर्णन आहे आणि नानकांची भजने तर रामभक्तीने ओथंबलेली आहेत. परंतु, आज तो पंथ वेगळा झाला व एक वेगळी जातही निर्माण झाली आहे.

धर्म आणि पंथात महत्त्वाचा फरक कोणता? तर पंथाची रचना ही धर्मासाठी व्यक्तिवादी विचारसरणी निर्माण करते. धर्म वस्तुस्वभावाला प्राधान्य देतो तर पंथ व्यक्तीने प्रतिपादन केलेल्या एखाद्या सत्यांशाबाबत किंवा सत्याच्या आभासाबाबत मान्यतेचा आग्रह धरतो. धर्म त्रिकालाबाधित असल्याने तो एकरूप आहे. परंतु पंथांची स्वरूपे भिन्नभिन्न व अनेक आहेत. कोणी उभ्याआडव्या गंधरेषांत, कोणी उत्तरीयाच्या विशिष्ट रंगछटात, कोणी रुद्राक्ष आणि पोवळे-तुळशी इत्यादींच्या माळा धारण करण्यात किंवा अशाच कोणत्या तरी बाह्य कल्पनांमध्ये, प्रतीकांमध्येच धर्म मानत आपल्या पंथाची विशिष्ट ओळख धारण करताना दिसतात. बिंदुजीवी असूनही सिंधुजीवी असल्याचा अभिमान, आभास ते निर्माण करतात.

धर्माच्या सच्चेपणाला पंथामुळे हानी पोहोचते. पंथामुळे संधिसाधूंना फायदा मिळतो. मतमतांतरांचा जन्म आणि त्यांच्यामध्ये आपापसांतील संघर्ष पंथवादाचे समर्थक उत्पन्न करतात. वेळ आली तर ते हिंसाचारही करतात. क्रोध, मान, मायाचार करण्यास ते कचरत नाहीत. खूपसे लोक या वादविवादात अडकलेले राहतात. शास्त्रार्थाची चर्चा करीत राहतात की, पूजेच्या वेळी देवाला फुले चढवावीत की सुका मेवा चढवावा? यात विजयी झाले की, मग ते स्वतःला श्रेष्ठ मानतात. भगवंतांची स्तुतीमधले 'न पूजयार्थस्त्वयि वीतरागे, न निन्दया नाथ! विवान्तवैरे!' अशी वीतरागपदे गातांनासुद्धा जर ते आपले कषाय मंद करू शकले नाहीत तर त्यांचा पूजाविधीही विशिष्ट 'पंथा'चाच आहे, असे म्हणावे लागेल. धर्म तर असेच सांगतो की, भगवंतांची पूजा फुलांनी करा किंवा सुक्या-बदामांनी करा अथवा तांदुळानी करा... त्यात वाद घालण्यासारखे काय आहे? वीतराग जिनदेवांना ना पारिजात

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हवा आहे ना तांदूळ! तुम्ही तुमची श्रद्धासुमने अर्पण करणार की, वादाला जन्म देत राहणार?

जो पूजा करतो, त्याने देवाला आत्मनिवेदनाचीच खरी भेट दिली पाहिजे. 'वन्दे तद्गुणलब्धये' हे भाव मनात ठेवून उच्च पातळी गाठण्यासाठीच पूजा करावी. व्यवहाराचे पालन करताना निश्चयाला विसरू नये. पंथांचे दिशाभ्रम म्हणजे साधनामार्गातील भटकत ठेवणाऱ्या पायवाटा आहेत. मोक्षाची मनस्वी इच्छा असणाऱ्याने या भुलभुलैयापासून, या संभ्रमित करणाऱ्या पाऊलवाटांपासून स्वतःला वाचवावे आणि तीर्थंकरांच्या पाऊलखुणा ज्या विराट, महान राजपथावर उमटलेल्या आहेत, तोच मार्ग शोधून काढावा.

अहिंसा परम धर्माचा सम्यक्त्वमूलक चारित्र्यमार्ग हाच एक महान जनायन मंडप आहे. ज्याच्या दोन्ही दिशांनी अनेकान्ताची सौरभ-वने डोलत आहेत. तेथे विराजमान द्वादशांगाची स्तुती करणारे, द्वादशांग-वैतालिक बिरुदावली वाचत आहेत, दिव्यध्वनीतून प्रकट झालेल्या उपदेशांना गणधरांनी स्पष्ट केले. तेच अध्याय पानावर लिहिले गेले.

पंथ व्यक्तींनी निर्माण केलेल्या मूढलीला यापासून भगवंतांना दूर ठेवणेच हितावह आहे. जे उपास्य आहे, त्यासमोर विनम्र होऊन श्रद्धाभक्ती त्यांना अर्पण कारणे, हाच उपासकांचा धर्म आहे. शुद्ध धार्मिकतेने वीतरागचरणांची सेवा करून जो स्वतःला कृतार्थ समजतो, तो महद्भाग्याचा धनी असतो. निर्दोषचर्येचे पालन करणारे साधू पंथवादापासून दूरच राहतात. त्यांचे जीवन धर्मस्वरूप असते. आत्मध्यानात स्थित असल्याकारणाने ते संपूर्ण संसारासाठी व आत्म्यासाठीही हित चिंतणारे असतात. नदीच्या किनाऱ्यासारखे त्यांचे मन विशाल असते. कुलाचलांची (पर्वताचे नाव) उंची साधूंच्या मनाच्या भावभूमीत सामावलेली असते. त्यांच्या चरणापाशी राहून संसार क्षुद्रतांचे विसर्जन करतो. औदार्याचा स्वीकार करून श्रेष्ठत्वाला, पोहोचण्याचा प्रयत्न करतो. ते गुरु असल्याकारणाने स्वभावतःच लघुतेपासून, क्षुद्रतेपासून दूरच असतात. मुनी असल्यामुळे तत्त्वज्ञान त्यांच्या व्यक्तिमत्त्वात झळकत असते.

त्या सम्यक्चारित्र्याचा उपदेश देणाऱ्यांचे दर्शन म्हणजे साक्षात धर्मच होय.

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मोह आणि मोक्ष

'मुह्' धातूपासून मोह शब्द निर्माण झाला आहे. व्याकरणाच्या नियमाप्रमाणे या धातूचे पद तयार करताना 'अ' प्रत्यक्षपणे लागतो आणि सामान्य लोकांच्या दृष्टीने पाहता मोह अप्रत्यक्षा (अविश्वास) च्या योग्यतेचा आहे. जी व्यक्ती मोहाला हितकारक समजते आणि त्यावर विश्वास ठेवून बसते, तिचा हा भव व परभव दोन्हीही बिघडतात. अज्ञानाचे जेवढे म्हणून पर्याय आहेत, त्या सर्वांचा जनक मोह हाच आहे. मोहामुळे दृष्टीत विकार उत्पन्न होतो. विकार निर्माण झाला की, सत् आणि असत् याविषयीचा विवेक बाळगणारी ज्ञानमय दृष्टी आंधळी होऊन जाते. परिणामी, मोहरूपी अंधाराने घेरलेल्या माणसाला सगळेच परपदार्थ मोहनीयच दिसू लागतात. कावीळ झालेल्याला जसे सगळे रंग पिवळेच दिसतात तसे. मोहाला बळी पडलेल्या व्यक्तीलासुद्धा या जगातली सप्तरंगी चित्रेही आकर्षक व मन मोहून घेणारी वाटू लागतात.

ज्यांचे खरे स्वरूप पृथ्वी, जल, अग्नी व वायुकायिक आहे; ते परपदार्थ मोहावरण कर्माच्या छायेत त्याला मूळ रूपापासून भिन्न व तत्काळ सुख देणारे वाटतात. एखाद्या भिंतीला रंग दिल्यावर कोणतेही चित्र काढले तर पाहणारा त्या चित्राकडेच पाहत राहतो. भिंतीला तो बघत नाही. त्याचप्रमाणे मांस, रक्त, पीडाकारक शरीराची वास्तविक स्थिती न जाणता हा संसार वरवरच्या त्वचासौंदर्याला भुलतो व बेभान होतो. हेच मोहाचे पहिले लक्षण आहे. याच्या प्रादुर्भावामुळे प्रथम डोळ्यांत राग (प्रेम, लालिमा) उत्पन्न होतो; मग नंतर अंतःकरणात अनुराग निर्माण होतो. राग आणि अनुराग यांच्यात बुडालेली व्यक्ती कर्मबंधनांना स्वतःच आमंत्रण देते. रहाटाची गाडगी ज्याप्रमाणे दोराला बांधून घेऊन विहिरीत उतरण्यासाठी व पाणी भरुन घेऊन पुन्हा वर येण्यासाठी विवश असतात आणि वारंवार भरत राहतात, रिकामे होत राहतात; त्याप्रमाणे कर्माला वश झालेल्या व मोहाकडून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पराजित झालेल्या व्यक्तीलाही खाली जाऊन जलाशयात (जड+आशयात) उतरून स्वतःची तहान शमवण्याचा प्रयत्न करावा लागतो. परंतु, विषयपानाने तहान भागत नाही.

पाण्याऐवजी मद्य पिणाऱ्यांचा घसा सुकून जातो; पण ते तृप्त होत नाहीत. अशाच प्रकारे अनादिकाळापासून मोहरूपी मद्य पिणाऱ्यांची अवस्थाही मृगजळामागे भटकत राहिल्यासारखी होते. कर्मतृष्णेच्या परिणामामुळे नीच गतीत बांधल्या गेलेल्या जीवाने कर्मक्षय केल्याशिवाय संसारातून त्याची सुटका नाही.

'द्वादशानुप्रेक्षा'मध्ये आचार्य कुंदकुंदांनी म्हटले आहे की, हा जीव मोहाने इतका आंधळा झाला आहे की, रात्रंदिवस विषयाच्या निमित्ताने होणारे पाप, अपराध अगदी धडपडून न थकता करीतच राहतो. परिणामी, तो सदैव भटकतच राहतो.[१] सार्वजनिक रस्त्यावर चौकात पडलेल्या एखाद्या शंखासारखी मोहाला बळी पडणाऱ्या मनुष्याची दशा असते. कोणीही येतो, त्याला उचलतो, जोरात फुंकतो आणि सत्त्वहीन/सारहीन असा तो शंख त्याच्या फुंकरीने वाजू लागतो. मोहाने अंध झालेल्या माणसाला पाचही इंद्रिये आपल्या अधीन करून घेतात व आपापला राग आळवत राहतात. स्व-परविवेक शून्य असलेल्या त्या शंखाप्रमाणे त्या व्यक्तीजवळसुद्धा स्वतःचा असा कोणता राग ध्वनी नाही की, जेणेकरून तो काही बोलू शकेल. जोपर्यंत तो शंख एखाद्या सक्षम व्यक्तीच्या तोंडी लागत नाही; तोपर्यंत त्यातून दिव्यध्वनी निघणारच नाही. परंतु, अशा परभक्ताला तर कोणीही नाचवू शकतो, वाजवू शकतो आणि विकारांनी त्याला वश करू शकतो.

मोक्ष आणि मोह छत्तीस (३६) च्या आकड्याप्रमाणे परस्पर, विरुद्ध-धर्मी आहेत. पाणिनीच्या व्याकरणातील 'येषां च विरोधः शाश्वतिकः'च्या 'अहिनकुलम' सारखे आहेत. जर मोक्षाची व्याख्या सर्व कर्मविप्रमोक्षं (सर्व कर्मांपासून मुक्ती) अशी असेल तर मोह सर्वकर्म सन्दोह आहे. म्हणजेच सर्व कर्मांचा समूह आहे. हे दोघेही वीर सैनिक आहेत. एक निवृत्तिमार्गाचा द्रष्टा आहे; तर दुसरा प्रवृत्तिमार्गाचा निर्माता आहे. एकाच्या मुठीत स्वर्ग आणि अनंत सुख आहे; तर दुसऱ्याच्या तीव्र क्रोधामध्ये नरक आहे. एक उत्तम नीतीचे व्यवस्थापन करतो; तर दुसरा अनीतीला प्रोत्साहन देणारा आहे. एक सुष्ट तर दुसरा दुष्ट! एक प्राणिमात्रांचा सखा तर दुसरा जिंकण्यास कठीण भयंकर असा शत्रू आहे. एक रत्नमाणकांचे भांडार तर दुसरा खारट लावणसमुद्र! एकाच्या तळहातावर जगातील सगळे

---

१. 'जत्तेण कुणइ पापं विसयणिमित्तं च अहणिसंजीवो ।
मोहान्धकारसहियो तेन दुःपडंदि संसारे ॥' - द्वादशानुप्रेक्षा, ३४

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ऐश्वर्य आहे; तर दुसऱ्यामध्ये ते सर्व भोगण्याची अदम्य लालसा! एक आनंदाच्या लाटांनी उसळणारा अथांग क्षीरसागर; तर दुसरा भीषण वडवानल!

जणू दोन मल्ल शड्डू ठोकून संसाराच्या या विशाल अंगणात, नव्हे आखाड्यात कुस्ती करीत आहेत. दोघेही कामदेवासमान अनंग-अंगरहित आहेत आणि तरीही संसाराच्या या क्रीडांगणात प्रत्येक क्षणाला त्यांच्या बळाची परीक्षा होत आलेली आहे. या झटापटीत कधी मोह विजयी होतो; तर कधी मोक्ष सव्वाशेर ठरतो. सत् आणि असत्‌चे प्रतीक असलेल्या या परस्परांमधला संघर्ष कधी संपतच नाही. आश्चर्य तर याचे वाटते की, हे दोघेही एकमेकांचे शत्रू असूनही परस्परांच्या महतीचे आधार आहेत. मोहासारख्या सहज जिंकल्या न जाणाऱ्या शत्रूला पराभूत करू शकल्यानंतर मोक्षाला महत्त्व प्राप्त होईल आणि मोह जेवढ्या सामर्थ्यानिशी मोक्षमार्गाला मूर्च्छित करेल; तेवढा तो अधिक बलवान ठरणार. जर मोहाला दुर्बळ मानले तर मोक्षासाठी जो कोटीचा पुरुषार्थ करावा लागतो, तो अर्थहीन ठरेल.

वस्तुस्थिती ही आहे की उत्कट, परमोच्च मोहावर विजय मिळवल्याने मोक्ष बलवान आहे. मोक्षाच्या अनंत-आनंदमय अनुभवाला विस्मरणात टाकायला लावून मिथ्या विकाररूपी चिखलात मोह रुतवतो; त्यावरून त्याच्या अतुल शक्तीचाही अंदाज बांधला जातो. परंतु, राम आणि रावणासारखी किंवा महावीर आणि घातिया कर्मांसारखी... हे सर्व समान प्रतिमल्ल असूनही मोक्ष आणि मोह हे समान आहेत, असे म्हणता येत नाही. मोक्ष तर आत्म्यातून उत्पन्न झालेले अपूर्व आनंदाचे भांडार आहे. याउलट, मोह उष्टे खाणारा आहे. एकदाच नव्हे तर वारंवार ज्या पुद्‌गलांचा भोग जीव घेऊन चुकला आहे; त्यांनाच तो मोहबुद्धीने पुन: पुन्हा भोगत राहतो. जन्मोजन्मी काम, क्रोध, लोभ, मान, माया इत्यादी विकारांना भोगत राहणे, हे उष्टे भोजन तोंडात घालण्यासारखे नाही तर मग दुसरे काय आहे? या दृष्टीने पाहता मोक्ष महान आहे आणि मोह तिरस्करणीय आहे.

डांबर अगदी पुसटसे जरी कपड्याला लागले तरी ते लगेच चिकटून बसते; त्याप्रमाणे मोह हासुद्धा एक दुर्जय शत्रूच आहे. त्याला वैराग्यभावनेच्या, द्वादशानुप्रेक्षांच्या तीव्र आम्लाने (तेजाबाने) दूर करणे विद्वानांचा एक सात्त्विक पराक्रमच आहे. ज्ञानी लोक म्हणतात- 'अरे! मी गेले अनेक जन्म मोहाला वश झालो आणि सगळ्या पुद्‌गल-पर्यायांचा भोग घेतला आहे. ते सगळे मी उष्टे केलेले आहेत. भुक्तोज्झित म्हणजे खाऊन टाकलेले आहेत. आता मला ज्ञान प्राप्त झाले आहे. माझे अज्ञान, माझा मोह गळून पडला

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आहे. मग, आता मला त्या उष्ट्या पदार्थांची, भांड्यांची इच्छा कशी होईल?[२] काय कोणी आपले 'वमन' गिळतो? धीर वीर विद्वतजनांनी जो पदार्थ टाकून दिला आहे; तो गजेंद्राच्या दातांसारखा पुनश्च तोंडात घेता येत नाही. ज्ञानाचा सूर्योदय झाला की, मोहांधकार शिल्लक उरतच नाही.

मोह दुःखमय आहे. कारण, रागादिपरिग्रहाच्या रूपातले त्याचे कुटुंब मोठे आहे. मोक्ष सुखमय आहे. कारण, सर्वस्वत्यागामुळे त्यात कोणत्या अभावाची, वियोगाची अनुभूतीच नाही. थंडगार लोखंडाला दुसरा लोखंडाचा तुकडा जोडता येत नाही, तो एकरूप होत नाही (तप्त लोखंडच तापलेल्या लोखंडाशी एकरूप होते.) त्याप्रमाणे स्वमग्न आत्म्यास जड (शीतल) पुद्गलपर्यायाचा स्पर्श होत नाही. जर हा आत्मा स्वभावाला प्राप्त करू शकत नसेल तर त्यामागे मोहाची आसक्ती/तत्परता हेच एकमेव बाधक कारण आहे. धोतऱ्याचे किंवा तत्सम मादक बी खाल्ले की, मनुष्य उन्मत्त होतो, तशीच अवस्था मोहाने मूर्च्छित झाल्यावर होते.[३] हिंदी संतकवी तुलसीदास म्हणतात- 'भूमि परत भो डाबर पानी । जिमिजीवहि माया लिपटानि ।।' पावसाचे पाणी जमिनीवर पडताच मलिन, गढूळ होऊन जाते. कारण, त्याचा धूळ, घाण, गवत इत्यादींशी लगेच संपर्क येतो. तसाच हा जीवसुद्धा उत्पन्न झाला की, लगेच माया-मोहाच्या बंधनात अडकतो. या मोहाला राजाच म्हटले पाहिजे. तो पराभूत तर इतर सारे विषयकषाय ही त्याची प्रजा आपोआपच निस्तेज होईल. कारण, एखाद्या वृक्षाचे मूळच जर पकडले तर त्या वृक्षाचे खोड, फांद्या, पाने आपोआपच हाती येतात. तद्वत मोहाला वश करणे याचा अर्थ आहे की, संपूर्ण रागात्मक मनोवृत्तींवर नियंत्रण ठेवणे. सगळ्या विकारांचे मूळ मोह हेच आहे.

छहढालाकारांनी म्हटले आहे- 'मोह महामद पियो अनादि । भूल आपको भरमत बादि । आपल्या मूळ स्वरूपाचा विसर पडण्याचे कारण म्हणजे मोहरूप महामद्य! कविश्रेष्ठ पं. दौलतरामजींनी मोहाला मद्य म्हटले आहे आणि त्याचे सेवन भव्य जनांसाठी सर्वथा त्याज्य/निषिद्ध आहे, हे सहजरीत्या सांगितले आहे. कविवर्य बनारसीदासांनी मोह

---

२. 'भुक्तोज्झिता मुहुर्मोहान् मया सर्वेऽपि पुद्गलाः ।
उच्छिष्टेष्विव मय विज्ञस्य का स्पृहा? ।।'

३. 'मोहेन संवृतं ज्ञानं स्वभावं लभते न हि ।
मत्तः पुमान् पदार्थानां यथा मदनकोद्रवैः ।।' - इष्टोपदेश, ७

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

म्हणजे धोतऱ्याचे रसपान म्हटले आहे. ते म्हणतात- 'मोहकर्म परहेतु पाय चेतन पर रच्चय। ज्यो धत्तूर-रसपान करत नर बहुविध नच्चय ।' धत्तुऱ्याचे रसपान करून उन्मादी व्यक्ती नाचते. तिची तुलना मोह-व्याकूळ व्यक्तीशी करणे योग्यच आहे. कारण, चंचलतेची जेवढी सगळी उदाहरणे आहेत; ती मोहजन्यच आहेत. राग-परिणतीमुळे विविध प्रकारचे अभिनय मनुष्य करतो.

विरक्त तर प्रशांत आत्मा असल्याने वेशवैविध्य, सौंदर्यप्रसाधने आणि आकर्षणाच्या उपायांचा विचारही करीत नाही आणि आत्मलीन होतो. म्हणून, जीवाला उद्देशून मोक्षमार्गाचे निरूपण करणाऱ्या शास्त्रकारांनी म्हटले आहे की, ही काही मोठी कठीण गोष्ट नाही. ममतापाशाने बांधला गेलेला जीव संसारात परिभ्रमण करीत राहतो आणि ममत्वातून मुक्त झालेला तर मुक्त होण्यासाठी अनुकूल भूमीची रचना करतो.[४] असा विचार करून ज्ञानपूर्वक निर्ममत्व, वीतरागता यांचे चिंतन केले पाहिजे.

मोह धर्माचा द्वेष्टा, अधर्माचा मित्र आणि रत्नत्रयाचे विस्मरण करायला लावणारा आहे. मोहाच्याच प्रभावामुळे प्राण्याने आत्मस्वरूपास विसरून दु:खांच्या पाशात स्वत:ला बांधून घेतले आहे.

मोहनीय कर्माच्या उदयाने मनुष्य लाभ-मार्गाचा त्याग करतो आणि अहितमार्गाकडे प्रवृत्त होतो. त्याची विवेकदृष्टी मूढ बनल्याने उत्तम-अधम यातला फरकच समजू शकत नाही. असे मूढ लोक विपरीत कामे करताना दिसतात. जे पूज्य नाही, त्याची तो पूजा करतो आणि पूजनीयांचा तिरस्कार करतो. कोळशाच्या वखारीला कुलूप लावून कोळशाचे संरक्षण करतो आणि सोन्याच्या मोहरांना लुटू देतो. डोळ्यांमध्ये शृंगाराच्या उद्देशाने काजळ घालून डोळे अधिक काळेभोर करतात, त्याप्रमाणे मोहाच्या आहारी गेलेली व्यक्ती पाप-कलुषाची काळिमा हृदयात धारण करते. क्षत्रचूडामणिकार म्हणतात- मोह समस्त कर्मांचा निर्माता आहे, हा धर्माचा वैरी आहे. याच्याचमुळे प्राणी बंधनात अडकले आहेत. तसे पाहता जागतिक प्रपंचाच्या प्रवृत्तिमार्गावर मोहाच्या पाऊलखुणा या अग्रगामी आहेत. मोहाचा विध्वंस म्हणजेच प्रवृत्ती मार्ग तिथेच संपुष्टात येणे, असा आहे.

जर मनात मोह उत्पन्न होतच राहिला आणि बाह्यत: उपवासाचे वगैरे व्रताचरण केले तर ते अस्वच्छ भांड्याला केवळ वरवरून स्वच्छ केल्यासारखे-धुतल्यासारखे होईल. मग,

---

४. 'बध्यते मुच्यते जीवः सममो निर्ममः क्रमात् ४
तस्मात् सर्वप्रयत्नेन निर्ममत्वं विचिन्तयेत् ॥' - इष्टोपदेश, २६

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्या भांड्यात जेव्हा आपण एखादी वस्तू ठेवू तेव्हा ती अस्वच्छ, मलिनच होऊन जाणार. कारण, पात्राचा विशुद्ध-भाव हा केवळ बाह्यशुद्धीवर अवलंबून नाही. त्याची आभ्यन्तर शुद्धी (अंतर्भागातील शुद्धी) ही जास्त आवश्यक आहे. 'स्वामिकार्तिकेयानुप्रेक्षा'चे असे मत आहे की, लोकांच्या दृष्टीने विचार केला तर उपवास करणाराही जर मोहपाशाने जखडलेला असेल तर तो उपवास त्याच्या शरीराला कष्टदायक तर ठरेलच; परंतु अपेक्षित कर्मनिर्जराही त्याच्याकडून होणार नाही.[५] खरे पाहता, 'नीतधावन्त्यनूत्पथम्'- इंद्रिये उन्मार्गाच्या शर्यतीत धावू नयेत, या निमित्ताने/हेतूने उपवास केला जातो. इंद्रियसंयम ठेवला तर त्यामुळे परिणामविशुद्धी व परिणामविशुद्धीमुळे परमपदाचा/मोक्षाचा मार्ग मोकळा होतो. अशा प्रकारे उपवास हे इंद्रियदमनाचे कारण असून मोक्षमार्गाकडे साधनेची पावले टाकायला प्रवृत्त करणारा आहे.[६] जर उपवास आणि इतर कायक्लेशप्रद व्रते-अनुष्ठाने आत्म्याला सशक्त व अनात्म्याला (परपदार्थाला) क्षीण करू शकत नसतील तर 'किन्तेन किम्पाकफलास्वादि तेन?' ते कडू फळ खाण्यात कोणता फायदा? कारण, ते ना व्याधी दूर करू शकते उलट तोंड कडू होऊन चव जाते, ते वेगळेच.

मन, मदन, मूर्च्छा, मलिनता हे शब्द मोहाच्या पहिल्या अक्षरापासून बनतात. हा मोह मोठा फसवणूक करणारा आहे. याच्यासारखा ठग ना झाला ना होणार! प्रत्येक क्षणाला कोट्यवधी जीवांचे ज्ञान-विज्ञान, तप-संयमाचार आणि विवेकाचे अपहरण करताना हा थकत नाही. कोणत्यातरी गूढ अदृश्य सिद्धीमुळे हा प्राण्यांच्या मनात प्रवेश करतो. त्यांना काजळाप्रमाणे लिंपून टाकतो. तो असा जादूगार आहे की हाडामांसाच्या देहामध्ये गुलाब पुष्पेच आहेत, असा भ्रम निर्माण करतो. श्वासात दक्षिणेकडच्या वाऱ्याचा सुगंध भरून टाकतो आणि डोळ्यांच्या विभ्रमातून कामदेवाचे अचूक शरसंधान साधतो.

जगातले जादूविद्येतले सगळे तज्ज्ञ याच्यापुढे रंकासमान आहेत. त्याने राजप्रासाद लुटले. गरिबांच्या झोपड्यांना आग लावली, विवेकाचे अधःपतन केले, गणिकेच्या बाजारात ज्ञानाला पाहिजे तसे विकले. शांततेच्या पवित्र धारेला मळवून टाकून ती चिखलासारखी करून टाकली. एक हलकीशी ठोकर काय मारली अन् वज्रासारख्या कठोर तपस्वीचे

---

५. 'मुह्यन्ति देहिनो मोहान् मोहनीयेन कर्मणा ।
निर्मितान्निर्मिताशेषकर्मणा धर्मवैरिणा ।।' - क्षत्रचूडामणी, ७६

६. 'उपवासं कुव्वाणो आरंभं जो करेदि मोहादो ।
तस्स किल सो अपरं कम्माणं णैव णिज्जरणं ।।' - स्वा. का. अनु., ४४२

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मेनका-विश्वामित्राच्या कथेत रूपांतर करून टाकले. भर्तृहरीचा अनुभव तर आणखीनच पुढचा आहे. 'शुनीमन्वेतिश्वा'- असे लिहून त्यांनी ज्या कृश, कावळा, खंजिरी व कुत्र्याचे वर्णन केले आहे, ते ज्याला हरवले जाणार नाही; त्या मोहाचे प्रतीक आहे. शृंगार-शतकात ते लिहितात- 'जे लोक वारा पिऊन, पाने खाऊन, पाण्याचे घोट घेऊन अत्यंत कठोर असे व्रताचरण करीत होते, ते विश्वामित्र मेनकेच्या रूपाला भुलून, पराशर मत्स्यगंधेच्या देहसौंदर्याला भुलून त्यांच्यावर मोहित झाले आणि तपश्च्युत झाले. जे लोक दररोज दूध-तूप-साखरयुक्त मेवा-मिठाई, दूधभात खातात, ते जर इंद्रियनिग्रह करू शकले तर ते विंध्याचल व सागरही तरून जातील'[७] मोह आणि त्याची उत्पत्ती यांचे वर्णन यापेक्षा अधिक चांगले आणखी काय होणार? म्हणूनच शरीर कृश ठेवणे, जिव्हालौल्याचे निर्मूलन करणे आणि स्त्रीजातीबद्दल विरक्त भाव बाळगणे, म्हणजे मोहावर मुसळाचे घाव घालणेच होय.

'हाड जले ज्यो लाकडी चाम जले ज्यों चीर' अशा प्रकारच्या अनित्यस्वरूप अनुप्रेक्षांमुळे विरक्तीचा उदय होतो. स्मशानात जळत असलेली चिता पाहून जर मोहाचे चिताभस्म केले नाही तर बुद्धीचा उपयोग तरी काय? कपिलवस्तूचा राजपुत्र सिद्धार्थाला अत्यंत गरीब, विकलांग व प्रेत पाहून वैराग्य उत्पन्न झाले होते. त्रिशलानंदन, भगवान महावीरांनाही संसार असार असल्याचे भान आरंभीच आले होते. या जगात क्षणोक्षणी जन्ममृत्यूचे चक्र फिरत आहे. लोक प्रेताला खांदा देत स्मशानात घेऊन जातात आणि तरीही पापाचरण सोडत नाहीत. अनित्य भावना मनात रुजवून घेऊन आत्मकल्याणाकडे प्रवृत्त होत नाहीत. ही किती आश्चर्याची गोष्ट आहे.[८] सर्वच जिवंत प्राण्यांचा आपण अनंतकाळापर्यंत या जगात टिकणार आहोत, असा विश्वास असतो आणि ते ऐश्वर्याचा अभिमानही बाळगतात.

महाभारतात दुर्योधन श्रीकृष्णाला म्हणतो- 'सूच्चग्रं नैव दास्यामि बिना युद्धेन केशव!' 'हे श्रीकृष्ण! युद्ध केल्याशिवाय सुईच्या टोकावर मावेल एवढी भूमीसुद्धा मी

---

७. 'विश्वामित्रपराशरप्रभृतयो वाताम्बुपर्णाशना-
स्तेऽपि स्त्रीमुखपंकजं सुललितं दृष्ट्वैव मोहं गताः ।
ये ह्यश्नन्ति घृतान्वितं प्रतिदिनं शाल्योदनं पायसं
तेषामिन्द्रियनिग्रहो यदि भवेत् विन्ध्यस्तरेत् सागरम् ।।' - शृंगारशतक ८०

८. 'अहन्यहनि गच्छन्ति भूतानि यममन्दिरम् ।
शेषाणि स्थातुमिच्छन्ति क्रिमाश्चर्यमतः परम् ।।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पांडवांना देणार नाही.' तो दुर्योधन, ते पांडव मागे-पुढे नष्ट झाले आणि ही भूमी मात्र 'अचला' बनून तिथेच पडून आहे. मुंजाने (भोजाचा पिता) अगदी बालपणीच भोजाला मारून टाकण्याचा प्रयत्न केला. कारण, त्याला वाटले की, मोठा झाल्यावर भोज राज्य मागणार. कारण आपल्या स्वर्गीय पित्याच्या राजसिंहासनावर त्याचाच हक्क असणार होता. मुंजाने आपल्या मंत्र्यांना आज्ञा केली की, भोजास मारून टाका आणि त्याचे डोळे काढून ते माझ्यासमोर आणून दाखवा. मंत्र्यांनी युक्तीने भोजाला वाचवले व हरिणाचे डोळे मुंजासमोर सादर केले. परंतु, आपल्याच वडिलांच्या या क्रूर व्यवहाराने भोज खूपच व्यथित झाला होता. त्या दुःखामुळेच त्याने एक श्लोक लिहिला. तो श्लोक आणि डोळे दोन्ही मंत्र्यांनी राजासमोर ठेवले. श्लोकाचे शेवटचे चरण असे होते- 'नैकेनापि समं गता वसुमती मुंज! त्वया यास्यति'- 'हे मुंज! मांधातापासून आजपर्यंत मोठमोठे चक्रवर्ती राजे होऊन गेले; परंतु, आपला काळ संपल्यावर ते सगळे निघून गेले. ही पृथ्वी म्हणून काही विधवा झाली नाही. नवीननवीन राजे येत गेले, जात राहिले. पण, ती काही त्यांच्याबरोबर गेली नाही. आता मात्र असे वाटते की, ती तुमच्याबरोबर नक्कीच जाणार.[१]

या अनित्य संसाराचा एवढा असीम दारुण मोह करून लोक आपला विवेक, धर्म, ज्ञान सगळे काही हरवून बसतात. फक्त मोह, मोह आणि मोहच! मोहाच्या मृगतृष्णेशिवाय जगण्यासारखे या जीवनात त्यांच्याजवळ काहीच नाही. अहो! माणसाच्या मोहाला नष्ट करण्यात काळाचा खूप मोठा हात आहे. जर काळ नसता तर मोहांध मनुष्याने आपल्या परिग्रहाचा विस्तार किती केला असता सांगणे कठीण आहे. १०० वर्षे जगण्याचा भरवसा नाही तरी ही कथा! मग, अनंत-समयापर्यंत जिवंत राहू, असा विश्वास त्याला असता तर समस्त जगातली संपत्ती एकच मनुष्य आपल्या स्वतःच्या नावे करून घेण्यासाठी संपूर्ण मानवजातीशी द्वेषाने युद्ध करीत राहिला असता आणि मग प्रत्येक मनुष्य संघर्षाच्या शरशय्येवर झोपला असता, त्यावरच उठला, बसला, फिरला असता. परंतु, काळाच्या बाधेमुळे असे होऊ शकत नाही. या दृष्टीने पाहता मृत्युदेवता यमराज हा स्तुती करण्यास योग्यच ठरतो. काळाचे नियंत्रण नसते तर अख्खे विश्व कल्पनेपलीकडच्या दुःखांमध्ये,

---

१. 'मान्धाता स महिपतिः कृतयुगालंकारभूतो गतः
सेतुर्येन महोदधौ विरचितः क्वांसौ दशास्यान्तकः ।
अन्ये चापि युधिष्ठिर प्रभृतयो यता दिवं भूपते-
नैकेनापि समं गता वसुमती मुंज! त्वया यास्यति ।।" - भोजप्रबंध

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

भोगांमध्ये व आसक्तींमध्ये बुडून जाऊन व्याकूळ झाले असते. कोणी एकाने म्हटले आहे-

'कालबली सबको डसे क्या राजा क्या रंक ।
ज्ञानी चले खुशी-खुशी मूर्ख होय बद रंग ।।

परंतु, एखाद्याचा बेरंग होण्याची पर्वा काळ करीत नाही. तो आपल्याआपल्या गतीने चालत राहतो. ना तो थकत ना तो बसत! एका क्रमबद्ध, आखीव योजनेप्रमाणे शेतकरी धान्यावर जसा विळा चालवतो; तसा काळसुद्धा लोकजीवनाच्या संहारात कार्यरत आहे. जे ज्ञानी आहेत; ते आपला मृत्यू निश्चित आहे, हे समजून घेऊन अमर होण्याच्या आध्यात्मिक प्रयत्नात मग्न होतात. म्हणूनच, मोहाच्या साम्राज्याची, मृगजळाची कल्पना समजून घेऊन मोहाचा नाश करण्याच्या प्रयत्नात कायमच मनुष्याने राहिले पाहिजे. कारण, ज्याचा राग क्षीण झाला आहे, तोच मुक्तीची वाटचाल करतो.[१०]

बंधनात अडकणे व मोक्षास जाणे, हे दोन्ही मनुष्याच्या हाती आहे. तो स्वतःच स्वतःला बंधनात टाकतो व स्वतःच मुक्तही होतो. हेच मुक्तीचे रहस्य आहे. जो आपल्या शुद्ध आत्म्यामध्ये रागद्वेष व मोहरहित शुद्ध उपयोग धारण करतो; तोच शुद्धीस प्राप्त होतो. या प्रयत्नात मोहच बाधा आणतो. सर्वप्रथम तर मोहवृक्ष सुकवला पाहिजे. त्याच्या मुळाशी होणारे सिंचन त्याकरिता बंद करायला पाहिजे. मुळे सुकली तर झाड हिरवे राहू शकत नाही; तसे जीवाने पण कर्मच उत्पन्न होऊ द्यायचे नाहीत. मोहनीय कर्माचा क्षयच कर्मरूपी वृक्षाला सुकवून टाकतो.[११] त्याचा क्षय झाला की जन्म-मरणाची सहस्त्र आरे असलेल्या चक्राची धुराच तुटून जाते.

मोहाला पराभूत करायचे असेल तर विषयांच्या क्षणभंगुरतेचे विस्मरण व्हायला नको. निर्विषय म्हणजेच विषयांनी रहित, असे मनच उत्तम सुखाची प्राप्ती करून द्यायला मदत करते.[१२] सराव आणि वैराग्याने मन जेव्हा निर्विषय होईल आणि आपल्या ताब्यात

---

१०. 'तदमुं मोहमेवाहमुच्छेत्तुं नित्यमुत्सहे ।
मुच्येतैतत्-क्षये क्षीणरागद्वेषः स्वयं हि नाः ।।' - सागारधर्मा.

११. 'सुक्कमूले जहा रुक्खे सिंचमाणे ण रोहति ।
एवं कम्मा ण रोहंति मोहणिज्जे खयं गते ।।'

१२. 'चइऊण महामोहं विसए मुणिऊण भंगुरे सव्वे ।
णिव्विसयं कुणहमणं जेण सुहं उत्तमं लहहि ।।' - कार्तिकेयानुप्रेक्षा, २२

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असेल, तरीही त्यावर कठोर नियंत्रण ठेवणे अत्यावश्यक आहे. कारण, इंद्रिये तर अश्वाप्रमाणे आहेत. जरा लगाम सैल झाला की, ती नियंत्रणाबाहेर जातात, चौखुर उधळतात. म्हणून, प्रत्येक वेळीच वश झालेल्या मनावरही पूर्ण विश्वास ठेवून चालत नाही. 'ज्ञानार्णव'मध्ये या विषयावर स्पष्टच लिहिले आहे की, मुनीचे मन जर कदाचित राग-चेतनेच्या अधीन आहे वा असेल तर आत्मतत्त्वाकडे त्यास वळवणे, हेच योग्य आहे. त्यामुळे रागादी पराभूत होतात.[१३] रागादी शत्रूंना पराभूत करणे, हे योगी पुरुषांचे वैशिष्ट्यच आहे. सामान्य लौकिक माणसे ज्या राग-बंधनांमुळे पराजित होत राहतात; ती रागादी बंधनेच मुनींकडून सदैव पराजित होत असतात. ज्याप्रमाणे गारुड्याच्या मंत्रामुळे वशीभूत झालेला महाविषधर नाग फणा काढू शकत नाही; त्याप्रमाणे वीतराग मुनींच्या मनात विषय-विकाररूपी सर्प प्रवेश करू शकत नाही. हा सगळा संसार विभ्रमांच्या चक्रीवादळात फसला आहे. मोहनिद्रेमुळे त्याची चेतना अस्तंगत होत आहे. परंतु, तरीही या विषम, अत्यंत कठीण परिस्थितीत योगी विजेत्याप्रमाणे अप्रमत्त व धैर्याने सदैव जागृत राहतो.[१४]

जैन परंपरेनुसार मोक्ष हा फक्त ज्ञानाने प्राप्त होत नाही, हे मोक्षासंबंधीच्या या प्रकरणात सांगणे आवश्यक आहे. सम्यग्ज्ञानदर्शनाच्या बरोबरच सम्यक्चारित्र्यही असणे तेवढेच आवश्यक आहे. पाहणे, जाणणे आणि प्रवृत्त होणे, या तीन क्रिया मनुष्यामध्ये स्वाभाविक आहेत. यांचीच दुसरी नावे म्हणजे दर्शन, ज्ञान व चारित्र्य होय. अनादिकाळापासून मनुष्य पाहत आला, जाणत आला व पाहिलेल्या ज्ञात पदार्थात प्रवृत्ती करीत आला आहे. जोपर्यंत त्याच्या तीन प्रकारच्या प्रवृत्तींना सम्यक्त्वाचा स्पर्श नाही तोपर्यंत पाहून, जाणून व प्रवृत्त होऊन तो मुक्त होऊ शकत नाही. सम्यक्त्वानेच पदार्थाचे खरे रूप प्रतिभासित होते आणि जीव अनंतानुबंधी कर्मांपासून सुटका करून घेऊ शकतो. या दृष्टीने पाहता सामान्य दर्शन व विशेष दर्शन यामध्ये अंतर पडते. सामान्यरूपात पाहणारा सोने आणि माती यातील भेद तर जाणेलेच; परंतु, तो भेद व्यावहारिक उपयोगितेच्या स्तरावरून त्याने केलेला असतो. असे म्हणू शकतो आपण की, त्याची भेदमूलक दृष्टी, जी स्वार्थाने युक्त असते, ती रागाने बाधित असते. मातीबद्दल त्याच्या मनात विराग आणि सोन्याबद्दल राग

---

१३. 'मुनेर्यदि मनो मोहाद् रागाद्यैरभिभूयते ।
तन्नियोज्यात्मनस्तत्वे तान्येव क्षिपति क्षणात् ।।' - ज्ञानार्णव, ५२

१४. 'भवभ्रमणविभ्रान्ते मोहनिद्रास्तचेतने ।
एक एव जगत्यस्मिन् योगी जागर्त्यहर्निशम् ।।' - ज्ञानार्णव, ४०

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

(प्रेम) आहे. जर या राग-विरागाच्या भावना नसत्या तर त्याला सोने काय आणि माती काय दोन्हीही गोष्ट उपेक्षणीयच वाटल्या असत्या. परंतु, दोन किंवा दोनपेक्षा जास्त द्रव्यांपैकी कोणत्यातरी एकाविषयी आसक्ती व अन्य कोणाबद्दल उदासीनता/उपेक्षा असेल तर, दोन्ही त्याच्या वीतरागभावाला निषिद्ध करतात आणि एकाला रागाचे कारण तर, दुसऱ्याला विरागाचे कारण मानतो. असे विचारात घेता जीवांची प्रवृत्ती-निवृत्ती दिसून येते, ती राग-द्वेषाला जन्म देते आणि ज्याला ज्या वस्तूबद्दल राग आहे; तो तिला कुरूप, हेय किंवा त्याज्य मानणारच नाही. एक डोळा नसलेला माणूससुद्धा आपल्या शरीराचा शृंगार करतोच.

तात्पर्य हेच की, ती व्यक्ती स्वत:ला रूपहीन न समजता रूपवान मानते. रागानुबंधी व्यक्ती आपल्या रागाच्या कारणाला सुंदर मानूनच प्रवृत्त होते. विषयाचे जे स्वरूप एखाद्या रागीसमोर असते; त्याच्या अगदी विरुद्ध भिन्न असे ते विरागीला वाटत असते. गणिकेकडे जाणाऱ्याला जोपर्यंत गणिकागमन अनिष्ट, वाईट आहे, असे वाटत नाही; तोपर्यंत तो तेथे जातच राहणार. ज्या दिवशी त्याला कळून चुकेल की, वास्तवात गणिकागमन हे अत्यंत नीच कर्म आहे, त्या दिवसापासून त्याच्या मनात त्या गोष्टीबद्दल घृणा किंवा वैराग्यही उत्पन्न होईल.

भर्तृहरीला अमरफळाद्वारे आपल्या पत्नीच्या वाईट चारित्र्याबद्दल कळाले, आणि तो त्याच क्षणी विरक्त झाला. विरक्त व्यक्ती वस्तूच्या दोन्ही बाजूचा विचार करते. एखादा कामातुर आपल्या वासनातृप्तीचे लक्ष्य ठेवून त्यात बलपूर्वक/जबरीने प्रवृत्त होतो; तर वासनारहित व्यक्ती कामप्रवृत्तीमुळे निष्पन्न होणारे दु:खपरिणाम, बंध, आसक्ती, शरीरपीडा यांनाही जाणते तसेच शांती, निराकुलता, प्रसन्नता यांनाही तेवढेच जाणते. राग-भावनेच्या संपर्कात आल्यावर जे दु:ख वाट्याला येते, त्याची माहिती तो कोणालाही देऊ शकतो. या तटस्थ दृष्टीलाच सम्यक्‌दृष्टी म्हणतात. वादी आणि प्रतिवादी सोडून तिसरी जी व्यक्ती असते, तीच निर्णायक असते. रागद्वेषाच्या द्वंद्वातून जो वर आला आहे; तोच रागद्वेषाचे योग्य विवेचन करू शकतो.

म्हणून, साररूपाने असे सांगता येईल की, लोकांमध्ये दर्शन, ज्ञान, चारित्र्य यांचे जे सामान्यरूप प्रचलित आहे, ते वास्तविकत: वेगळे आहे, विपरीत आहे. बाजारात रंग टाकलेली मिठाई ठेवलेली असते. तिचे आकर्षक रूप पाहून बालकाला ती खाण्याचा मोह होतो. पण, प्रौढ माणसाला समजत असते की, ती जरी डोळ्यांना सुखद वाटली तरी पोटात

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रोग उत्पन्न करणारी आहे. सम्यग्दृष्टीही हेच समजावून सांगत असतो की, 'आपातृरम्या विषयोपभोगा:'- विषयांचा उपभोग सुरुवातीला फार रमणीय वाटतो. पण, त्याचा परिणाम मात्र विषासारखा आहे. याच नजरेने तो मग संसारातील सर्वच नाशवंत पदार्थांकडे बघतो. आत्म्यापासून भिन्न असलेले हे परपदार्थ खऱ्या कसोटीवर पारखून बघितले तर मिथ्या सिद्ध होतात - हे जाणून घेऊन तो आत्मरती आत्म्याबरोबरच स्नेहशील होऊन, मित्रत्व जोडून इतर सगळ्या मोहासक्तीला ताब्यात घेतो.

त्याचे दर्शन, ज्ञान चारित्र्य सामान्य जाणिवेपेक्षा वर जाऊन सम्यक्त्वामुळे परिदर्शित, परिज्ञापित व परिपालित होतात. समताभावाला तो प्राप्त करतो व रत्ने, मातीचे ढेकूळ, महाल, स्मशान यांच्याबाबत समदृष्टी ठेवतो. शास्त्रकारांनी पदार्थात उत्पाद, व्यय आणि ध्रौव्य अशा स्थिती ठरवून दिल्या आहेत. वस्तू आहे आणि ती मातीपासून कुंभाचे रूप धारण करते. पुन्हा कुंभ फुटला की, माती शिल्लक राहते. अशाप्रकारे मातीचा कुंभ बनतो, तो फुटल्यावर मातीच उरते. त्याच्या तिन्ही स्थितीत त्याचे मर्त्य रूप नश्वर आहे. कुंभ असतांनाही त्यात माती आहेच व फुटलेल्या कुंभाच्या किंवा घड्याच्या विखुरलेल्या तुकड्यांतही माती आहेच आणि मृत्तिकाकारांवरही (कुंभारावरही) मातीची सत्ता अक्षयरूपात आहे. हे ज्ञानदर्शनच सम्यक् आहे. याउलट उदाहरण- खेळत असलेल्या मुलाच्या हातून पडून मातीचा हत्ती फुटतो. ते मूल रडू लागते - माझा हत्ती तुटला. परंतु, त्याचे वडील किंवा घरातली मोठी मंडळी त्याला गप्प करीत म्हणतात- हा तर हत्ती नाहीच. ही माती आहे. म्हणजे, साधारणत: हे मोठे- मुलाच्या अजाण विचारापेक्षा काहीतरी वेगळा विचार करतात. परंतु, हत्ती मोडल्याचे दु:ख त्यांनाही होतेच. तेव्हा सम्यग्ज्ञानी त्यांना समजावून सांगतात की, हा तर आधीच माती होता, आताही मातीतच रूपांतरित झाला. त्यांचे ज्ञान हे खरे ज्ञान आहे सम्यग्ज्ञान आणि मिथ्याज्ञानात हाच तर फरक आहे.

संसारी लोक सामान्यपणे नाव रूप असलेल्या जगावर विश्वास ठेवतात. त्या नाम-रूप जगामध्ये आपल्या आसक्तींना पाहतात आणि त्यांची ही आकर्षणाची/मोहाची कारणे जशीजशी नष्ट होतात; तसेतसे त्यांना शोक, दु:ख, काळजी व क्लेश होऊ लागतात. हे समजून घेऊन एकाने म्हटले आहे की, 'मूर्ख, अज्ञानी माणसाला एकेका दिवशी शेकडो दु:खे, शेकडो भयग्रस्त करतात. परंतु, स्थितप्रज्ञ विद्वानाला आयुष्यात एकदाही शोकाने व भयाने पीडित होण्याची वेळ येत नाही. खरे पाहिले तर जो स्वत: शोचनीय आहे; त्याने दुसऱ्यासाठी दु:ख का करावे? जो स्वत: मृत्यूच्या कराल जबड्यात सापडलेला आहे;

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्याने कोण्या दुसऱ्याच्या मृत्यूबद्दल शोक का करावा? का नवल करावे? हा विवेक पदार्थाच्या उत्पाद, व्यय आणि ध्रौव्य यांना जाणणाऱ्या सम्यग्दृष्टी जीवाला प्राप्त होतो. त्यामुळेच तो संसाराच्या विषयादीतून उत्पन्न होणाऱ्या रागादी क्लेशापासून स्वतःची सुटका करून घेतो व सर्वश्रेष्ठ आनंद प्राप्त करून घेतो. मिथ्यात्वातून उत्पन्न होणारी दृष्टी-विचार जीवाला संसारातील अत्यंत नीच पंकात फसवून टाकतात आणि सम्यक्त्वातून जन्मलेले दर्शन-ज्ञान आणि चारित्र भेद हे त्याला मोक्षमार्गाकडे घेऊन जातात. सम्यग्दर्शनज्ञानचारित्राणिमोक्षमार्गः या सूत्रातील शब्दावली याच क्रमाचा संकेत देते.

सारांश, मोहयुक्त अज्ञानाने बंध होतो. मोहरहित अज्ञान बंधाचा विषयच नाही. जर स्वल्प ज्ञान असेल व मोह नसेल तर मुक्ती मिळू शकते. परंतु, मोहासह असलेल्या ज्ञानामुळे मोक्ष मिळत नाही. लोकवचन प्रसिद्धच आहे की, 'क्रिया हि वस्तुपहिता प्रसीदति'- वस्तूच्या वैशिष्ट्यामुळे क्रियेचे परिणामही वैशिष्ट्यपूर्णच होतात. तूप चांदीच्या पात्रात ठेवले तर त्याची शुद्धता कायम राहील आणि पितळेच्या भांड्यात ठेवले तर त्यात दोष उत्पन्न होईल. ज्ञान जर निर्मोहाच्या पात्रात ठेवले तर ते मोक्षपरिणामीच ठरेल आणि विपरीत अवस्थेत ते बंधनकारक सिद्ध होईल. ज्ञानी मोहलालसेच्या पलीकडे जातो व शरीराला आत्म्यापेक्षा भिन्नच समजतो. तो हा विचार करतो की, जर माझा (आत्म्याचा) मृत्यू होणार नाही तर मला भय कोठले? जर माझा आत्मा रोगमुक्त आहे, मला रोग होणारच नाही, तर मग दुःख कोणाला होणार? वस्तुतः मी बालकही नाही आणि म्हाताराही नाही. हा सगळा पुद्‌गलांचा खेळ आहे.[१५] असा विचार करणारा परिपक्व ज्ञानी आपल्या ज्ञानसंपदेबद्दल अभिमान बाळगत नसेल तर तो अल्पज्ञानी असूनही आपल्या भेदज्ञानामुळे हा संसारसागर पार करतो. त्यालाच उद्देशून म्हटले आहे की, 'याद करत तुष-माष उतर गये भवपार.' कारण मोक्षप्राप्तीमध्ये वीतरागता हीच सर्वश्रेष्ठ आहे. या देहरूपी पिंजऱ्यात आत्मा एखाद्या पोपटाप्रमाणे बंदिस्त झाला आहे, तो कर्मपरिणामांमुळेच! आत्मज्ञानी मुनी कर्मनिर्जरा करून स्वतःला अनंतानुबंधातून मुक्त करतात. जो जितका मोहाच्या अधीन झालेला आहे, तेवढा तो मृत्युला घाबरतो. मुनी तर स्वयं/स्वतःच मृत्युदेवतेला वरण्यासाठी सल्लेखनाव्रत घेतात. जे जन्मभर सिंहासारखे निर्भयपणे जगले, ते मृत्यूच्या दारीही सिंहाच्या निडर वृत्तीनेच जाणार!

---

१५. 'न मे मृत्युः कुतो भीतिर्न मे व्याधिः कुतो व्यथा?
नाहं बालो न वृद्धोऽहं न युवैतानि पुद्‌गले ।।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मृत्यू कामासक्त, विषयांध लोकांनाच घाबरवू शकतो, विरक्तांना नाही. आत्म्याला अमृताने न्हाऊ घालणाऱ्या आत्मधर्मी मुनीचा मृत्यू होतच नाही. म्हटलेच आहे- 'ममेति द्वयक्षरो मृत्युरमितं न ममेति च'। मम (माझे), हे ममत्व मृत्यूला जन्म देणारे आहे आणि ममत्वरहित होणे म्हणजे अमर होणे आहे. अमरता हा वीतरागतेचा परिणाम आहे. जो खरा वीतरागी आहे, तो कोणत्याच पदार्थावर राग करीत नाही. तो मोक्षाचीसुद्धा आसक्ती बाळगत नाही. सर्व त्यागींना भौतिक-अभौतिक सगळ्याच मोहाचा त्याग असतो.

हीच खरी वीतरागता लक्षात घेऊन आचार्य अकलंकदेवांनी म्हटले आहे- 'यस्यमोक्षेऽप्यनाकांक्षा स मोक्षमधिगच्छति'। ज्याला मोक्षाचीही 'इच्छाच' नाही, त्यालाच मोक्ष प्राप्त होतो. वीतरागतेची केवढी मोठी झलक आचार्यांनी यातून दाखवली आहे. म्हणून, वीतराग भावच आपले लक्ष्य असावे. तोच मुक्तिसोपान आहे. खूप शिकणे, कठोर तप करणे, हे स्वत:मध्ये कर्तृत्वाविषयी अभिमान उत्पन्न करणारे आहे. रात्रंदिवस घोकत-वाचत राहिल्याने घसा सुकण्यापलीकडे काय होणार आहे? त्यापेक्षा ज्यामुळे शिवपुरी मोक्ष गाठता येणे शक्य होईल, असे एक अक्षर शिकले तरी पुरेसे आहे.[१६] केवळ शब्दपंडितांना उद्देशून नीतिकार म्हणतात- 'शास्त्राण्याधी त्यापि भवन्तिमूर्खा:, यस्तु क्रियावान पुरुषः स विद्वान्' -शास्त्रांचा खूप अभ्यास करूनही लोक मूर्खच राहतात. पण, जो शास्त्राच्या स्वाध्याय-परिणामांना क्रियेमध्ये आणतो, तो केवळ शास्त्रवादी न राहता चर्यावादी होतो आणि तोच विवेकी असतो. भेदज्ञानी मुनी चारित्र्याचे पालन करीत शास्त्र स्वाध्यायाच्या परिणामांना शुद्धोपयोगात परिणत करतात आणि पोपटपंची करणारे जन्मभर शास्त्रांच्या ओळींच्या परीक्षणामध्येच अडकून पडतात आणि शास्त्राचे अध्ययन केल्यानंतर उत्पन्न होणाऱ्या परिणामांपासून वंचित राहतात. - एक कोळसा जाळून त्याची राख करतो. परंतु, दुसरा त्याला कुटतच राहतो. कोळशाची राख तर दोघांनीही केली. परंतु, एकाने कोळशात अग्नी प्रज्वलित केला आणि त्याच्या उष्णतेचा पुरेपूर उपयोग करून घेतला, परंतु, दुसऱ्याने ना अग्नीचे दर्शन घेतले ना उष्णतेचा अनुभव घेतला. अशी व्यक्ती 'विदग्ध' कशी होऊ शकते?

ज्ञान वितंडवादासाठी नसून मोहाचा क्षय करण्यासाठी आहे म्हणून एखादा ज्ञानोपासकही जर मोहाचा पराभव करू शकला नाही तर मग ती 'कोळसा कुटण्याचीच'

---

१६. 'बहुयइं पढियइं मूढ पर तालू सुक्कइ जेण ।
एक्कुजि अक्खर तं पढहु शिवपुर गम्मइ जेण ।।''

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गोष्ट झाली. भ्रम, ज्ञान तर दूर झालेच नाही आणि शास्त्राचा भार वहावा लागला, ते वेगळेच! अशा दिशा संभ्रमात पडलेल्या बालीश व्यक्तींना आचार्यांनी मोक्षाचा अधिकारी म्हटलेले नाही. ज्या व्यक्ती अज्ञानाच्या अंधकाराने पूर्णतः झाकल्या गेल्या आहेत आणि ज्या स्वकर्तृत्वाविषयी अभिमान बाळगून आहेत आणि विचारही असा करतात की- 'अमुक एका व्यक्तीला दुःख देण्यास मी समर्थ आहे. मी मनात आणले तर सागराला वाळवंटात व वाळवंटाला समुद्रात परिवर्तित करू शकतो तर, ते त्यांचे अज्ञान आहे. त्यांना मोक्षाची प्राप्ती होत नाही.[१७] तो स्वतःला परपरिणतीत अडकवून घेतो आणि आत्मचिंतनापासून दूर जातो. कर्तृत्वाबद्दल अभिमानही मोहातूनच उगम पावतो आणि मार्गापासून दूर नेणे, हा तर मोहाचा नैसर्गिक स्वभावच आहे. भगवंतासमोर बसून जाप्य तर देत आहेत. पण मनातून मात्र नृत्यांगनेचे नृत्य पाहू शकत नसल्याच्या विवशतेने जे खिन्न झालेले आहेत, अशा लोकांसारखी अवस्था मोहवश पण मोक्षाची इच्छा धरणाऱ्या लोकांची होते. शास्त्रकारांचे असे मत आहे की, जर एखादा मोहरहित गृहस्थ श्रावक मोह-पराभूत केलेल्या एखाद्या त्यागीपेक्षाही श्रेष्ठ आहे. मोहमग्न मुनी शिथिलाचारी असेल तर हे त्याच्या श्रेष्ठतेतील न्यून आहे.

मोक्षप्राप्तीसाठी कषायनाश आवश्यक आहे. कषाय कमी केल्याशिवाय शरीर कितीही क्षीण केले तरी ते व्यर्थ आहे. शुद्धोपयोगाविना शास्त्राध्ययनाचे कष्ट विफल आहेत. मनात मोह ठेवून ज्ञानी म्हणवून घेणे म्हणजे ज्ञानाचा दंभ करणे होय. विद्येची उपासना मुक्तीसाठी केली जाते. जी विद्या मोक्षाप्रत पोहोचवण्यास असमर्थ आहे; ती विद्या नसून अविद्या आहे. जिथे दर्शनमोहाची मर्यादा संपते; तेथून मोक्षपुरीची सुरुवात होते.

सारांश असा की, मोह आणि मोक्षासंबंधी विचार करताना ही वास्तविकता लक्षात घ्यायला हवी की, हा संसार अनादि आहे. हे दृष्टीस पडणारे सगळे जीव आजच उत्पन्न झाले नाहीत आणि ज्यांचा मृत्यू झाला आहे, ते काही प्रथमच कालवश झालेले नाहीत. 'पुनरपि जननं पुनरपि मरणं, पुनरपि जननी जठरे शयनम्।' - पुनर्जन्म आणि पुनर्मृत्यू गर्भवास आणि चिताग्नी आणि अनंत भवांमध्ये भ्रमण यांची ही अतूट शृंखला! एक निरुद्देश्य प्रवास! त्यांचा अंतच नाही. वेदनांना खंड/शेवट नाही आणि जन्म परंपरेला

१७. 'ये तु कर्तारमात्मानं पश्यन्ति तमसा ततः ।
सामान्य जनवत्तेषां न मोक्षोऽपि मुमुक्षताम् ।।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विश्राम नाही. माणसासाठी ही स्थिती फारच दुःखदायक अशी आहे. कारण तो मती, मेधा व बुद्धी यांचा धनी आहे. मनन करणे, धारण करणे आणि त्यावर विवेचन-चिंतन करणे, केवळ मनुष्य पर्यायातच शक्य आहे. अज्ञानाच्या कारणामुळे होणाऱ्या अकाली मृत्यूपासून मनुष्याने स्वतःस वाचवण्यासाठी प्रयत्नशील राहिले पाहिजे.

यासंदर्भात धर्म, अर्थ, काम आणि मोक्ष या चार पुरुषार्थांचा प्राधान्यक्रम, उपयोग आणि उन्नती यांच्याविषयी मिळणाऱ्या प्रेरणांना पारखून घेत राहणे, हे माणसासाठी हितावह आहे. पुरुषार्थाचे मूळ धर्ममय आहे, धर्म आहे आणि पुरुषार्थाचे अंतिम फळ मोक्ष म्हणजेच मुक्ती हे आहे. अर्थ आणि काम हे जरी लौकिक विषय असले तरी त्यांचा पाया धर्मावरच आधारित आहे आणि परिणामी मोक्षगामी होणे, हेच अपेक्षित आहे. जो धर्माला समोर ठेवून पैसा मिळवण्यास उद्युक्त होतो, तो पुण्यबंध करतो. परंतु, जो पैसा कमावताना धर्माचा तिरस्कार करीत 'येनकेन प्रकारेण' म्हणजे कोणत्याही मार्गाने अर्थार्जन करतो; तेव्हा तो पैशाबरोबरच पापसुद्धा अर्जित करतो. फक्त पैसा मिळवणे, हेच ज्यांचे उद्दिष्ट आहे, ते पैशांसाठी कोणाची हत्याही करतात. म्हणूनच अर्थव्यवसाय हासुद्धा शुद्ध व धर्माला स्मरून करावा. कारण, तो आत्मकल्याण व वृत्तीच्या पावित्र्यासाठी अत्यंत अनिवार्य आहे.

'काम' पुरुषार्थ का म्हटला जातो? जर काम म्हणजे निंद्य वासनाच फक्त असेल तर त्याला 'पुरुषार्थाच्या' पंक्तीत का बसवले? म्हणून, याच्या धर्ममूलक रूपाला समजून घेणे आवश्यक आहे. संसार त्यागानेच जिंकता येतो आणि रागामुळे बंधन-परिणाम भोगावे लागतात- हे चिरंतन सत्य आहे. परंतु, समस्त संसार त्यागाचा मार्ग अवलंबू शकत नाही आणि बहुसंख्य लोक संसारी गृहस्थ आहेत. जरी या संसाराचे मूळ वासना असले तरी माणसाने आपल्या विवेकाच्या बळावर वासनेला पशुतुल्य पातळीवरून उचलून मानवीय रूप दिले आहे. त्या हीन पातळीवरील पशुधर्माला सामाजिक व सांस्कृतिक रूप देण्यात तो यशस्वी ठरला आहे. समाजाच्या रूपात त्याने पत्नी, आई, मुलगी, बहीण अशा विविध संबंधांची निर्मिती करीत वासनेला मर्यादित केले आहे आणि पुत्र-परंपरेला निसर्गाचा स्वाभाविक परिणाम समजून पिता-पुत्राच्या पवित्र संबंधात त्यास गुंफले आहे. अनिवार्य अशा यौन संबंधाला देव, गुरू आणि होमहवन आणि मंत्रांच्या सान्निध्यात साक्ष देऊन, संपन्न करून त्यास सामाजिक संस्कृतीच्या पवित्र प्रथेचे रूप दिले आहे. विवाहानंतर पुरुष आणि स्त्री दोघांनाही जगातले सर्व पुरुष व स्त्रीजात यौनसंबंधबाह्य ठरतात आणि हे मनात

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रुजवणे हे पती आणि पत्नीच्या शारीरिक, मानसिक व आत्मिक आचारनियमांचा अनिवार्य भाग होऊन जातो. अशाप्रकारे वासनेवर संपूर्ण ताबा जरी मिळवता आला नाही तरी प्रतिबंध करू न शकणाऱ्या तिच्या सुसाट गतीवर समाज आणि संस्कृतीच्या मर्यादेचे गतिरोधक तर नक्कीच निर्माण होतात.

एका पुरुषाने एकपत्निव्रत पाळावे व एका स्त्रीने एकपतिव्रत धारण करावे. आजन्म तसेच राहण्याची शपथ त्यांनी घ्यावी. हा पवित्र जीवन आरंभ करण्याचा पहिला पाठ आहे. ज्या व्यक्तीने समस्त स्त्री-पुरुषांच्या परिवारामध्ये आपल्या वासनाविषयक संबंधांना तिलांजली दिली आहे आणि फक्त एक दम्पतीच्या रूपातच त्या संबंधाला सीमित केले आहे; त्या व्यक्तीकडून आशा करता येते की, कालांतराने संपूर्ण विषयवासनेवर विजय मिळवेल आणि त्यागमार्गाकडील वाटचालीसाठी ती समर्थ होईल. कारण, मनाचा स्वभावच असा चंचल आहे की, ते एका स्त्रीमुळे तसेच एका पुरुषामुळे तृप्त होऊ शकत नाही. स्वैर, स्वच्छंदी राहणे त्याला फार आवडते. मानवी समाजाचे कठोर नियम त्याला विवश करतात आणि सत्शास्त्र स्वाध्यायामुळे वासनेचे रूप किती मलिन आहे, हेही त्याला हळूहळू समजू लागते. या दृष्टिकोनातून कामसुद्धा पुरुषार्थ आहे. तो पवित्र अपत्यांची परंपरा चालवणारा आहे. पत्नीव्यतिरिक्त सर्व स्त्रियांबद्दल भगिनीचे-आईचे नाते जपणारा आहे. उद्दाम मानसिक विकृतीला नियंत्रित करण्याबाबत 'कामा'ची ही व्याख्या फारच महत्त्वपूर्ण अशी आहे. मोहनीय सिद्धी प्राप्त करणे, हेच ग्रहणीय आहे. इच्छा वासनांची पूर्ती केली तरी काम शांत होत नाही. कितीही तूप टाकले तरी त्यामुळे अग्नी विझवला जात नाही. म्हणून कामवासनेचा त्याग करून मोक्षमार्गाचा स्वीकार करणे हीच मनुष्यभवाची श्रेष्ठ परिणती आहे. जो आपल्या जीवनात अर्थ आणि काम यांच्या बाहेर येऊ शकला नाही; त्याने 'नराचा नारायण' बनवण्याची क्षमता असलेल्या मनुष्यपर्यायाला हीन-दीन व तुच्छ बनवले. कावळ्याला उडवून लावण्यासाठी मौल्यवान मणिरत्ने फेकून मारावीत तसे! अर्थ आणि काम यांच्यावर रती करणे/प्रेम करणे म्हणजे तर परपदार्थावर आसक्ती करण्यासारखे आहे.

अनेक जन्म परपदार्थावर रती करणे, त्यातच मृत्यू येणे, परपदार्थ रती नष्ट करण्याचे प्रयत्न न करणे, ही अज्ञता नव्हे तर काय आहे? खरे पाहता धर्म हा अर्थ व काम यांच्यात नाहीच, तो तर सम्यक्चारित्र्यात आहे आणि वीतराग-तपस्येविना चारित्र्यपालन शक्य नाही. जिथे एक लंगोटी धारण करणारे ऐलकसुद्धा प्रतिलेखनशुद्धीला वेळ दिल्यामुळे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आपल्या सक्षमतेचा पूर्ण उपयोग करू शकत नाहीत. तेथे सागार, गृहस्थधर्मपालन करणारे कितीसे सक्षम होऊ शकतात? हा मोक्ष 'मोक्षमार्ग प्रकाश' किंवा मोक्षाचे प्रतिपादन करणाऱ्या आगम-स्वाध्यायाने प्राप्त होत नाही. यासाठी तर कर्मांचे पहाड फोडावे लागतात. आत्म्याहून भिन्न असणाऱ्या समस्त सांसारिक विकारी पदार्थांबद्दल वैराग्य निर्माण व्हावे लागते आणि सर्वारंभ परित्यागपूर्वक महाव्रतांचे काटेकोर पालनही करावे लागते. विशुद्ध आत्मतत्त्वामध्ये ध्यानावस्थित होऊन जे मुनी ध्यान, ध्याता व ध्येय यांच्या एकात्मतेचा साक्षात्कार प्राप्त करतात; त्यांनाच मोक्ष प्राप्त होतो. हे सामर्थ्य अंतर्बाह्य परिग्रह हाणपूर्वक निर्ग्रंथचर्येच्या पालनातूनच निर्माण होते. जेव्हा संसाराच्या आकुलतेपासून आत्मा मुक्ती प्राप्त करेल; तेव्हाच तो निराकुल होऊन परलोकाच्या दुर्गम मार्गावर संचार करेल. स्वकल्याणासाठी आत्मनिष्ठा प्राप्त करा. परपदार्थावरील रतीचा/मोहाचा त्याग करा आणि वैशिष्ट्यपूर्ण अत्यंत आनंदाला, ज्ञान-ऐश्वर्याला, वीर्य आणि परमसूक्ष्मतेला आत्मसात करून मोक्षगामी बना. संसारातील आनंद, ज्ञान, ऐश्वर्य, व वीर्य इ. क्षुद्र आहेत, नाशवंत आहेत, अल्प आहेत, क्षणभंगुर आहेत आणि आत्म्याचे अध:पतन करणारे आहेत. म्हणून, निर्वीर्यतेच्या स्तरावरून उठा, ब्रह्मपदाच्या प्राप्तीचा पुरुषार्थ करा.

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मानसशास्त्रीय-मीमांसा

मन म्हणजे मानवी ज्ञानाला अभिप्रायासह व्यक्त करणारे चिंतनात्मक उपादान! मन मनुष्याचा सर्वांत मोठा मित्र आणि शत्रूही आहे. रागाला वश होऊन संसारातील अनंत विषयात, कषायात आणि प्रपंचात ते अहर्निश चूर असणारे! विरक्त झाले की, एका झटक्यात आत्म्याच्या स्वरूपात, चिंतनात तन्मय-तल्लीन होऊन जाणारे, असे हे मन! राग-विरक्ती या दोन्ही क्षेत्रांमध्ये कुठलीही बाधा येऊ न देता संचार करणारे, दाही दिशांमध्ये ज्याला कोणी रोखू शकणार नाही, अशा सम्राटाप्रमाणे हे मन आहे. याच मनाने भर्तृहरीकडून शृंगार-शतक लिहून घेतले; तर दुसऱ्या क्षणी 'धिक् तां च 'तं च मदनं च इमां च मां च' या उद्गारांसह त्याला अरण्यात पाठवले.

मन म्हणजे एक निरंकुश गजेंद्र जो मनाला येईल तेव्हा कमळाचे देठ तोडावे त्याप्रमाणे संयमाचे अपहरण करू शकतो आणि चांगलेपणाची अंबारी घेऊन निघाला तर माणसाला सर्वोच्च प्रतिष्ठेच्या भूमीवर पोहोचवतो. हे मन अत्यंत दुर्दम्य आहे. ते डोळ्यांनी पाहते, कानांनी ऐकते आणि संपूर्ण इंद्रियांनी आपले इच्छित पूर्ण करून घेते. म्हणून तर इच्छेला मनीषा म्हणजे मनाची इच्छा म्हटले जाते. 'मनो हि हेतुः सर्वेषामिन्द्रियाणाम् प्रवर्तने.' इंद्रियांच्या वागण्यामागे, प्रवृत्तीमागे मनच असते. जेव्हा त्याला गाणे छान वाटते तेव्हा ते कानांच्या खिडक्या उघडून गाणे ऐकते. एखादे रूपसौंदर्य बघावेसे वाटले तर ते डोळ्यांनी पिऊन टाकते. एखाद्या चविष्ट पदार्थाचा आस्वाद त्याला घ्यायचा असेल तर ते स्वतःला जिभेच्या स्वाधीन करून टाकते. अशा प्रकारे अरूप, अदृश्य असूनही इंद्रियांच्या द्वारे ते सगळ्यांचा आस्वाद घेते.

मनुष्य जेव्हा स्व-पर भेदज्ञानामुळे संसार-विषयांबाबत उदासीन, विरक्त, कोरडा बनतो; तेव्हा हेच मन शृंगार अवस्थेपासून परावृत्त होते, अप्रिय बोलू लागते आणि

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वैराग्याचा पक्ष घेऊन विरुद्ध साक्ष द्यायला लागते. एकदा जे मन स्त्रीच्या मुखाला पद्मगंधा म्हणायचे; त्यास तेच स्त्रीमुख दात व हाडांचे घर वाटते. पूर्वी जे मन शृंगारकथा कान लांब करून ऐकायचे आणि रूपसौंदर्याला एकटक नजरेने पाहत राहायचे; तेज आज म्हणते- 'अन्धवत् पश्य रूपाणि शृणु शब्दमकर्णवत्'-रूपाकडे आंधळ्यासारखे पाहा व पायातील पैंजणांची रुणझुण बहिऱ्याप्रमाणे ऐका. भले, आंधळा काय पाहील आणि बहिरा काय ऐकेल? परंतु गोष्ट चालू होती मनाच्या अप्रिय बोलण्याची!

अशा प्रकारे एखाद्या गोष्टीकडे संपूर्णपणे एकदम पाठ फिरविणे, हा मनाचा स्वभाव आहे. परंतु, मनाची मीमांसा एवढ्यावरच संपत नाही. त्याला केवळ 'चंचल' असे म्हणून त्याच्या सामर्थ्याला नाकारता येणार नाही. कारण, या मनानेच तर तीर्थंकर घडवले, त्यानेच तर चक्रवर्तींच्या मस्तकावर मुकुट ठेवले. या जगात मनुष्याच्या विकासाचा जेवढा इतिहास आहे; तो सगळा मनाचाच तर क्रीडाविलास आहे. तसेच निवृत्तिमार्गाच्या जेवढ्या म्हणून पायऱ्या आहेत, त्यावर मार्गदर्शक रूपात अग्रगामी असलेल्या पाऊलखुणा मनाच्याच तर आहेत. म्हणून अशी आवश्यकता आहे ती मानवी-मनाच्या अनेकानेक शक्तींना कोणत्या तरी एका कार्यासाठी केंद्रबिंदूच्या स्थानी एकत्रित आणण्याची! जर, अनेक व्यवसायांत गुंतलेले व त्यामुळे मंदशक्ती बनलेले मन कोणी एकाग्र केले तर ते करण्यास योग्य व विधायक अशा कार्यातील ५० टक्के बाधा नष्ट करते.

कारण, कार्याचे दोन भाग असतात. एक म्हणजे मनाची एकाग्रता किंवा दत्तचित्तता आणि दुसरा आवश्यक भाग म्हणजे अपेक्षित श्रम! यापैकी श्रमापेक्षा एकाग्रतेला जास्त महत्त्व आहे. हे समजून घेण्यासाठी काचेच्या बहिर्गोल भिंगाचे उदाहरण उपयुक्त आहे. सूर्यकिरणांमध्ये दाहकशक्ती असते, हे जाणून जर एखाद्याने त्या बहिर्गोल भिंगावर सूर्यकिरणे एकत्रित केली आणि त्या भिंगाखाली जर एखादे कापड ठेवले तर त्या किरणांतून अग्नी उत्पन्न होतो. किरणे जोपर्यंत त्या काचेवर एकत्रित आणली जात नाहीत; तोपर्यंत किरणांत आग दडलेली असली तरी ती अग्नी उत्पन्न करू शकत नाहीत. कारण हेच की, कोणत्याही शक्तीची संपन्नता तिच्या एकत्रीकरणावर, एकाग्रतेवर अवलंबून असते.

जे लोक जगात कोणता तरी उद्योग, व्यवसाय, कला, शिल्प, काव्य किंवा शास्त्रलेखन यामध्ये यशस्वी झालेले आहेत, होत आहेत; त्यांना दिवसरात्रीचे २४ तास कधी मोठे, लांबलचक वाटले नाहीत आणि जे आळशी कर्तृत्वहीन आहेत; त्यांना वेळेची न्यूनता भासलीच नाही. तरीही परिणाम असा की उद्योगी लोकांनी आपल्या जगाला जास्त

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सौंदर्य दिले. शालीनता, सुखसोयी आणि विकास प्राप्त करून दिला आणि आळशी व्यक्तीच्या संसाराचे क्षेत्रफळ पहिल्यापेक्षाही आकुंचित झाले. या मनानेच एकाला तपस्वी, महामना या नावांनी प्रसिद्धीस आणले; तर दुसऱ्याला मनाच्या शक्तींची ओळखही पटू शकली नाही. म्हणून, ज्यांची हे जाणले की, मनाला सुनियोजित रीत्या कार्यान्वित केले तर मग सिद्धींची प्राप्ती होते... अशा व्यक्तींनाच सर्वार्थ चिंतामणी रत्न प्राप्त झाले आहे.

जे मनाचे नोकर-दास आहेत; त्यांना सदैव पराभवच स्वीकारावा लागला आहे, ठेचा खाव्या लागल्या आहेत. पण, ज्यांनी मनालाच दास बनवले आहे; त्यांना मन खांद्यावर घेऊन फिरते. या विवेचनात जय आणि पराजय ही मनाने पराजित किंवा मनावर प्राप्त केलेला विजय यांची दुसरी नावे आहेत. 'मनस्वी कार्यार्थी गणयति न दुःखं च सुखम्' दृढ मनोनिश्चय ज्याचा आहे, असा मनुष्य जेव्हा कार्य हाती घेतो; तेव्हा मार्गात येणाऱ्या सुख, दुःखांना तो मोजन नाही, त्यांची तमा बाळगत नाही. खरी गोष्ट तर हीच आहे की, ज्यांना नृत्य करायचे असते; ते जंगलातील काटेरी-खडकाळ जमिनीवर नृत्य करतात. परंतु, ज्यांना नाचताच येत नाही ते भव्य, सपाट अंगणालाच दोष देतात, अंगणालाच वाकडे म्हणतात. काम करण्याचे वेड ज्यांना असते; ते आपला मार्ग आपणच बनवतात 'जहाँ चाह-वहाँ राह' - या उक्तीवर त्यांचा विश्वास असतो.

परंतु, ज्यांचे मनोबल अगदीच कमी/हीन आहे; ते पुढे जाणाऱ्यांची पदचिन्हे असलेल्या मार्गावरूनसुद्धा चालू शकत नाहीत. कारण, स्वतःच्या मनोबलाची त्यांना ओळखच नसते. ते काय करू शकतात, त्यांच्यात किती सामर्थ्य आहे, हेसुद्धा त्यांना ठाऊक नसते. परिणाम हाच होतो मग की, आपल्या असमर्थतेबद्दल दीर्घ उसासे टाकतच त्यांचे जीवन संपून जाते आणि ते काहीच करू शकत नाहीत. त्यांचे 'करिष्यामि'चे संकल्प 'मरिष्यामि'च्या कफनात लपेटून जाऊन निष्प्राण/शव बनून जातात.

म्हणूनच आत्मकल्याणासाठी, आत्मज्ञानासाठी, ऐहिक आणि पारलौकिक सुखासाठी मनाला जाणून घेणे अत्यंत आवश्यक आहे. जो मनाला उमजून घेतो, तो जणू या संसारात एक सर्वोत्तम मित्र आपल्याजवळ बाळगून असतो. त्याला एकटेपणाचा अनुभव कधी येत नाही. संकटकाळात त्याच्याजवळ एक असा उत्साह देणारा मित्र सतत असतो की, ज्याच्यामुळे संकटांचे रौद्र रूप त्याला व्याकूळ करीत नाही. मनाला अशा मित्ररूपात प्राप्त केले की, मनुष्य साहसी आणि धोकादायक कार्यामध्येही निःशंकपणे उडी घेतो. त्याला यशच लाभत जाते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

एक सूक्त आहे- 'क्रियासिद्धिः सत्त्वे वसति महतां नोपकरणे' - यशस्वी होण्यामागे मनुष्याच्या मनातील संकल्पांची दृढता हेच कारण आहे. नुसत्या साधनांची विपुलता असून काय उपयोग? अशक्यतांनी भरलेल्या अक्षुण्ण मार्गावरून चालण्याचे व सफल साहसी यात्रिक होण्याचे बळ व्यक्तीला मनःशक्तीच देते. मनाची बलवान संकल्पशक्ती कार्यसिद्धीस मदत करते. हे मन मनुष्याचे सत्त्व, प्राण, शक्ती आणि पराक्रम सारेच आहे. ज्याने आपल्या मनाला अनुरूप कार्यासाठी प्रवृत्त केले; त्यालाच कर्मठ म्हणता येईल. स्वतःचे मनोबल न जाणणारे-लोक भेकडपणाचे शिकार होत राहतात. त्यांच्यात विश्वास, स्थैर्य, साहस, चिकाटी आणि संकटांशी लढण्याची शक्ती नसते. त्यांच्या देहबोलीवरून-शरीराकृतीवरून त्यांची दीनता स्पष्टपणे प्रतीत होते. आत्मविश्वासाचे तेज नसलेले त्यांचे रोगी शरीर सदैव पराभवाच्या गराड्यात कैद झालेले असते. लहानातले लहान कार्यसुद्धा त्याला भारभूत आणि अशक्य वाटू लागते.

एकदा एक मनुष्य कापूस पिंजण्याच्या मिलमध्ये गेला. तिथे मैदानात कापसाचा भला मोठा ढीग होता; तो पहाडाप्रमाणे दिसत होता. एवढा प्रचंड ढीग बघून तो ओरडू लागला- 'कोण पिंजणार? कोण विणणार? ओरडताओरडता तो वेडा झाला. खूप औषधोपचार झाले, पण त्याचा उन्माद-रोग ठीक होईना. सरतेशेवटी, त्याला कुणीतरी एका उत्तम मानसशास्त्रज्ञाकडे नेले. त्याने सर्व घडलेला प्रसंग ऐकून घेतला. मग, बाजारातून काही रुपयांचा कापूस मागवला, त्याचा ढीग बनवला. ते पाहून पीडित माणूस पुन्हा 'कोण पिंजणार? कोण विणणार?' असे ओरडू लागला. डॉक्टरांनी त्या ढिगाला आग लावली. रोगी हे बघतच होता. सारा कापूस जळून खाक झाल्यावर त्याने एक दीर्घ श्वास घेतला व म्हणाला- 'चला सुटलो!' आणि त्याच क्षणी त्याचा उन्माद-रोग गेला.

अशा मनोदुर्बलतेने ग्रासलेल्या रोग्यांचे हे एकच उदाहरण नाही. खूप सारे आहेत. त्यातली माणसे आपल्यातील सुप्त शक्तींना जाणून न घेतल्याने पराभूत होत राहतात. सफलतेचे पहिले सूत्र आहे मनाला जाणून घेणे! एखाद्या कार्याला सुरुवात करण्याआधी जे-जे आपल्या मनःशक्तीला तोलून बघतात, आपल्या क्षमतांच्या मर्यादा जाणून घेऊन मगच काम हाती घेतात; त्यांना कामामध्ये यश मिळणे अवघड नसते. 'न हि सर्षपवाही पिपीलिकः सुमेरुं वोढुं क्षमः।' मोहरीचे दाणे वाहून नेणारी मुंगी सुमेरू पर्वताला उचलू शकत नाही. सामर्थ्यापलीकडचे काम केले जाऊ शकत नाही.

आत्मिक शक्ती बळकट बनवायची असेल तर त्यासाठी मनाचा निग्रह अत्यंत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आवश्यक आहे. ज्याप्रमाणे योग्य मंत्राच्या योग्य वापराने विषारी सापाला वश केले जाऊ शकते; त्याच प्रकारे ज्ञानभावनेने आणि निरंतर अभ्यासाने मनाला वश केले पाहिजे. जेव्हा ज्ञान समुच्चय असेल/होईल तेव्हा मन अशुभ परिणतीचा त्याग करू लागेल. मग, नियमाने जर मन शुभपरिणतीत राखले तर आत्म्याच्या विमल, विशुद्ध स्वरूपाची जास्तीतजास्त प्राप्ती होऊ शकते.[१] तत्त्वसार सांगते की, एखाद्या जलाशयात रत्न पडले आहे. परंतु, त्या जलाशयात वाऱ्याच्या वेगाने जर सातत्याने तरंग उठत असतील तर तळाशी पडून असलेले ते रत्न दिसणार नाही. हीच गोष्ट आत्म्यासंबंधीची आहे. जोपर्यंत मनाची चंचलता शांत होत नाही; तोपर्यंत आत्म्याचे दर्शन होणे कठीणच आहे. एखाद्या राजमहालाच्या दारात जोपर्यंत पहारेकरी पहारा देत आहे; तोपर्यंत त्याचा डोळा चुकवून कोण बरे आत प्रवेश करू शकेल? म्हणून, मनरूपी जल जेव्हा तरंगविरहित, स्थिर होईल तेव्हाच त्या आत्मरत्नाला पाहण्याचे सामर्थ्य लाभू शकेल.[२]

मिथ्यात्व आणि कषाय मनाला अस्थिर (करतात) ठेवतात. जेव्हा त्यांचा उपशम होतो; तेव्हा आत्मस्वरूपात जास्त काळपर्यंत स्थिर राहणे शक्य आहे. खरे पाहता मनःशुद्धीनेच प्राण्याला कलंकापासून मुक्ती मिळते.[३] मनात मिथ्यात्व आहे. क्रोध, मान, माया, लोभ, हास्य, रती, अरती, शोक, भय, कुतूहल, स्त्री-पुरुष-नपुंसक असे भाव आणि प्रमाद इत्यादी मनात अनादिकालापासून भरलेले आहेत. हे कलंक मनात असतील तर मनःशुद्धीची कल्पनाच करता येणार नाही. जेव्हा, आत्मदर्शनाची उत्कट इच्छा निर्माण होते; तेव्हा मनाला सर्वप्रथम रागद्वेषविरहित करणे आवश्यक आहे. तेव्हाच स्वार्थसिद्धी होते. मनोविकार शमले की समता प्राप्त होते व आत्माधिगम सोपा होतो. प्रबोधसारमध्ये याचेच विवेचन करताना असे सांगितले आहे की, शुद्ध पाऱ्याच्या संमिश्रणाने लोह रसायन (औषधी) बनून जाते आणि परिणामविशुद्ध मन अनंतधर्माच्या प्राप्तीसाठी सक्षम बनते.[४]

---

१. 'ज्ञानेन शम्यते दुष्टं नित्याभ्यस्तेन मानसम् ।
मंत्रेण शम्यते किंन सुप्रयुक्तेन पन्नगः ।।' - मुलाराधनादर्पण, ७९२

२. 'सरसलिले थिरभूये णिरुणिपडियं पि जह रयणं ।
मणसलिले थिरभूये दीसह अप्पा तहा विमले ।।' - तत्त्वसार, ४१

३. 'कलंकविलयः साक्षान् मनःशुद्ध्यैव देहिनाम् ।
तस्मिन्नविषयीभूते स्वार्थसिद्धिस्तदाहता ।।' - ज्ञानार्णव, ७

४. 'भावैः शुद्धैः मनः साधु धर्मानन्त्याय सम्मतम् ।
परांशुद्धिमवाप्नोति लोहंविद्धं रसैरिव ।।' - प्रबोधसार, ३२

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

याचा अर्थ हाच आहे की क्रोध, मान, माया इत्यादी विकार मनाचे विभाव आहेत; स्वभाव नाही. मन स्वभावतः कलंकित नाहीच. परंतु, संसर्गामुळे उत्पन्न दोषांनी ते दूषित भासू लागते. आकाशातून टपकणारा जलाचा थेंब जसा धुळीमुळे मलिन वाटतो, तसे! वस्तुतः मेघाच्या उदरातून पडताना त्या जलबिंदूत मालिन्य नसते. परंतु, 'भूमि परत भा डाबर पानी'- जमिनीवर पडताच त्यामध्ये धूळ आणि मलिनता मिसळते. हे मालिन्य पाण्याचे स्वतःचे नाही. म्हणून, जो मनुष्य रात्रंदिवस साबण लावूनलावून आपल्या वस्त्रप्रावरणांना स्वच्छ करतो, चकाचक करीत राहतो. स्वतःच्या शरीराला उटणे इत्यादींचे संस्कार करून त्याचे सौंदर्य वाढवत राहतो; तो जर विवेकचक्षूंच्या साहाय्याने आपल्या मनाला स्वच्छ करू शकत नसेल तर हे सगळे त्याचे मोठे नुकसानच आहे. नाशवंत देह व जीर्ण होणारी वस्त्रे यांनाच तो चमकवत राहिला तर ते सार सोडून टरफल ग्रहण करणेच ठरेल. यासच 'मूर्च्छा', वास्तवतेची ओळख नसणे व अवास्तवतेविषयीची आसक्ती असे म्हणतात. 'मूर्च्छा परिग्रहाः' या सूत्राचा हाच अर्थ आहे की जे कीटक, भुंगे, पशु-पक्षी कोणत्याच प्रकारचा परिग्रह करीत नाहीत; त्यांनाही अपरिग्रही व मूर्च्छारहित मानले जाईल. ज्या गरीब माणसाजवळ घर, दुकान, जमीनजुमला, धनसंपत्ती काहीच नाही व ज्यास लंगोटीचीसुद्धा चिंता आहे अशा दरिद्री माणसालाही मग त्यागी म्हटले जाईल. परंतु, खरे पाहता तो स्वतः वरील गोष्टींच्या अभावामुळे मनातल्या मनात अत्यंत अस्वस्थ, संतप्त आहे. 'पुत्रा मे कांस्यपात्रे बहुक्षीरमौदन भुंजीरन्' - 'माझी मुले मौल्यवान पात्रामधून दूध-भात खावोत' अशा इच्छेचा मनात जप करीत राहतो. जोपर्यंत मनात राग आहे, तोपर्यंत अनुपलब्धीस किंवा अभावास त्याग किंवा मूर्च्छा म्हणता येत नाही. आपापल्या पापाच्या उदयाने अशी दरिद्री माणसे तर खूप आहेत. परंतु, जो अगदी मनापासून मूर्च्छेचा त्याग करील, असा जीव दुर्लभ आहे.[५] असे त्यागमय मनस्वी जीवन, स्वेच्छेने जे विषयपराङ्मुख झाले आहेत, त्या त्यागींचेच आहे.' त्यांनी मनाला इंद्रियांद्वारे निःसंग बनवले आहे, मूर्च्छेचा त्याग केला आहे. आतल्याबाहेरच्या गाठी सोडवल्या आहेत; ज्या अत्यंत कठीण प्रहाराला अमरही (इंद्रही) मारू शकत नाही; त्यास मारून त्यांनी मारजित् (कामविजयी) पद प्राप्त केले आहे. म्हणूनच, 'मारयो कामखबीस को ऐसे श्रीगुरुराज' असे वर्णन करीत त्यागी आणि तपोधन गुरूंच्या वंदनेची स्तोत्रे लिहिली गेली आहेत.

---

५. 'बाह्य ग्रन्थिविहीना दरिद्रमनुजाः स्वपापतः सन्ति ।
किन्त्वभ्यन्तरसंगत्यागी लोकेषु दुर्लभो जीवः ।।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मन हे प्रेरणा व शक्तीचे उगमस्थान आहे. मन लावून केलेल्या कार्यात जे सौंदर्य दृश्यमान होते, ज्या पूर्णतेचे व कलात्मकतेचे दर्शन त्यातून होते; ते मनापासून न केलेल्या कामातून होत नाही. म्हणून, मनोयोग हा सुंदरता, पूर्णता व कलात्मकता यांचे प्रकटीकरण आहे. उत्तम तऱ्हेने कार्य पार पाडणारी व्यक्ती तन, मन व जीवन यांची शपथ घेते. हे मन कल्पवृक्षाचे प्रतीकात्मक नाव आहे. माणसाचे संकल्प हाच कल्पवृक्ष आहे. जो मानसशास्त्र जाणतो तो एखाद्याच्या बाह्यशरीराकृतीवरून त्याच्या अंतर्मनाची स्थिती जाणतो. त्याच्या अंतर्मनाचा थांग त्यास लागतो. क्षत्रचूडामणिकार म्हणतात- 'वक्त्रं वक्ति हि मानसम्'- चर्येवरचे/चेहऱ्यावरचे भाव-विकार मनात काय चालले आहे, ते सांगत असतात. 'मुख मस्तिष्क का परिचायक है'- या आशयाची एक इंग्रजी म्हण प्रसिद्ध आहे. ज्यांनी मानसशास्त्राचा अभ्यास केलेला आहे, अशा व्यक्तींना मनुष्याच्या चालण्याचा वेग, स्थिती, संभाषण, बोलत असतांना त्याने वापरलेले शब्द, व्यवहारात तो वापरत असलेली वस्त्र-प्रावरणे, त्याचे खाणेपिणे, त्याच्या वापराच्या वस्तू आणि त्याची निःशब्दता, यावरून त्यात्या माणसाची ओळख पटते.

भारतीय लक्षणशास्त्रात व्यक्तीचे शारीरिक अवयव, अंग-प्रत्यंगे, त्याच्यातील हीनता व उत्तमता यांचा अभ्यास करून त्यांच्या फलश्रुतीचे विवेचन केले आहे. हे निरूपण कर्मफलसिद्धान्ताला उचलून धरते. पूर्वभवाच्या कर्मपरिणामांमुळे मनुष्य किंवा दुसरी कुठली तरी योनी प्राप्त होते. त्यातही, पुन्हा कर्माच्या परिणामांमुळे उत्तमत्व आणि अधमत्व प्राप्त होते. शरीराची अंगे-उपांगे म्हणजेच अवयव पूर्ण, निर्दोष, अव्यंग असतील तर ते सुकर्माचेच चिन्ह आहे. भगवान वर्धमान महावीरांच्या शारीरिक सौंदर्याचे व निर्दोषपूर्ण अंगाचे वर्णन करताना म्हटले आहे की, त्यांना त्यात्या विशिष्ट शारीरलक्षणांवरून महापुरुष समजले जाई. हिंदीत एक वाक्प्रचार आहे- 'होनहार बिरवान के होत चीकने पात'- जे वृक्ष उत्तम फळे देणारे असतात, त्यांची पाने सतेज, मुलायम असतात. पाने कोमल असल्याने तसेच मृदु स्पर्शाचे असल्याने अमुक एक वृक्ष उच्च प्रकारची जातिवंत/दर्जेदार फळे देणारा आहे, हे समजते. तसेही एखादे सुंदर फळ, फुल किंवा मनुष्य पाहून मन प्रसन्न होते. तर, कुरूप व शरीरात काही कमीजास्त असलेल्याच्या दर्शनाने संकोच, ग्लानी आणि दुःख यांचा अनुभव येतो.

इथे मानसशास्त्रीयदृष्ट्या एक गोष्ट विचारात घेतली पाहिजे. ती ही की, निसर्गतः किंवा एखाद्या आघातामुळे, अपघातग्रस्त झाल्याने किंवा जन्मतःच जी व्यक्ती आपला

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

एखादा अवयव (डोळा, हात-पाय) गमावून बसते; त्या व्यक्तीने जर एखादी सर्वांगपरिपूर्ण व्यक्ती पाहिली की, तिच्यासमोर स्वत:बद्दलच्या हीनत्वाची भावना निर्माण होणे स्वाभाविक आहे. आंधळी व्यक्ती जेव्हा काठी घेऊन मार्ग चाचपडत असते, तेव्हा तिच्या मनात स्वत:बद्दल घृणा, करुणा व न्यूनगंडाचे भाव उत्पन्न होतात आणि जर एखादा तिच्या अंधत्वाबद्दल सहानुभूती दाखवत तिच्यापुढे निघून जातो तेव्हा तिच्या मनात त्या डोळस व्यक्तीबद्दल ईर्षा, राग व प्रतिकार या भावना जागृत होतात. अपक्व मनावर असे घात-प्रत्याघात नेहमीच होत राहतात आणि त्याला त्याची जाणही नसते. हळूहळू त्याचे मन आपल्या दुबळेपणाने व बोथटपणाने जर्जर होऊ लागते. आंधळ्याच्या संदर्भातील हीच गोष्ट इतर अपंगांच्या बाबतीतही लागू होते. आंधळा माणूस खूपच असहाय होऊन भीक मागू लागतो. कारण, लाजेचा अनुभव देणारे डोळे/दृष्टीच त्याच्याजवळ नसल्याने हळूहळू त्याच्या मनाला वाटणारी लाजही मृत होते. परंतु, हा सिद्धान्त काण्या किंवा तिरळ्या माणसाला लागू पडत नाही. कारण जरी त्याच्या डोळ्याचा अर्धा भाग निकामी झाला असला तरीही त्याची अवलोकनशक्ती विद्यमान असते. त्यामुळे तो पूर्ण आंधळ्या व्यक्तीएवढा दुर्बळ नसतो. म्हणून तो जेव्हा दोन्ही डोळ्यांची दृष्टी असणाऱ्या माणसाला बघतो तेव्हा एका डोळ्याचे तिरळेपणही त्याला खुपू लागते. म्हणजे हीनभावनेच्या बरोबरच त्याच्यामध्ये काहीशी कुटिलता, क्रूरता, वाकडेपणा आणि फसवेगिरी यासारख्या अवगुणांचा हळूहळू प्रादुर्भाव व्हायला लागतो. मनाला टोचणाऱ्या या शल्यातूनच-जे व्यंगामुळे निर्माण होते, त्यातून वरील दोष मनात निर्माण होतात आणि काही अपवाद वगळता अशा शेकडो व्यक्तींच्या निरीक्षणावरून, अभ्यासावरून लक्षणशास्त्राची रचना केली जाते.

'युक्तिकल्पतरू'मध्ये राजदूताची लक्षणे अशी सांगितली आहेत- 'वपुष्मान, वीतभीर्वाग्मी दूतो राज्ञः प्रशस्यते'- देखणा, सुडौल शरीराचा, निर्भय आणि वाक्पटू राजदूत प्रशंसनीय आहे. ज्या पुरुषाचे डोळे मधाप्रमाणे पिंगट असतात; तो श्रीमंत असतो. असे मधुपिंगल नेत्र साधारणत: राजांचे असतात.[६] परंतु, ज्याचे डोळे गडद पिंगट रंगाचे असतात; तो मात्र कुलनाशक असतो. महाभारतकारांनी धृतराष्ट्राच्या पुत्राचे-दुर्योधनाचे नेत्र गडद पिंगटवर्णी होते असे म्हटले आहे.

ज्यांचा आवाज मेघासारखा गंभीर आहे, चक्रवाक-क्रौंच पक्ष्यासारखा किंवा बुडू

६. 'न श्रीस्त्यजति सर्वत्र पुरुषं मधुपिंगलम् ।
आपिंगलाक्षा राजानः सर्वभोगसमन्विताः ।।' - भविष्यपुराण

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पाहणाऱ्या कुंभातून येणाऱ्या आवाजासारखा आहे; ते उच्चपदस्थ अधिकारी असतात. याउलट, ज्यांचा आवाज गाढवासारखा आहे, चिरलेल्या वेळूसारखा बेसूर आहे, ते गरीब व अविश्वसनीय असतात.

कासवाच्या पाठीसारखे कणखर व उन्नत चरण काही विशिष्ट व्यक्तींचेच असतात. ज्या व्यक्तींचे हात, पाय, कान, डोके, खांदे, वक्षःस्थल आणि कपाळ विशाल असते; ते पुरुष लोकपूजित पुरुष असतात.[७] इत्यादी. असे वर्णन जे लक्षणशास्त्रात येते; ते सगळे लक्षणांचा अभ्यास करणाऱ्या विद्वानांचे निष्कर्ष आहेत.

प्राचीन भारतात अशा प्रकारचे संशोधन करणारे विद्वान असायचे. त्यांच्या ग्रंथांकडे चेष्टेने, उपेक्षेने पाहिले जाऊ शकत नाही. आज 'थिसिस' (प्रबंध) लेखनाचा एक प्रकार रूढ होत आहे. त्यापेक्षा कितीतरी पटीने अधिक सारगर्भ असे हे संशोधनात्मक प्राचीन लेख लिहिण्याचा उत्कट प्रयत्न होता. एखाद्या व्यक्तीची जबाबदारीच्या पदावर नियुक्ती करतेवेळी त्या व्यक्तीचे तत्संबंधीचे शास्त्रोक्त ज्ञान हा तर निकष असायचाच; पण त्याचबरोबर त्याच्या व्यक्तिमत्त्वाकडेही लक्ष दिले जाई. सुदृढ, उंच बांध्याचे, सावळे सेनापती शत्रुपक्षाला कर्दनकाळाप्रमाणे वाटत. सुंदर, गौरवर्ण, हसतमुख, विचारवंत अशा 'वैद्यराजाचे' दर्शन होताच रोग्याचे निम्मे दुखणे पळून जाई. जर, शास्त्ररचनाकारांनी 'मूर्तमिव मोक्षमार्गम-वाग्विसर्गं वपुषा निरूपयन्तं' असे लिहिले; त्यामागचे रहस्य हेच आहे की, तपस्त्यागपरायण मुनिराजांच्या संपूर्ण शरीरयष्टीवर मनोवाक्कायत्रियोगसिद्धिजन्य विशिष्ट वीतरागभाव एवढे प्रस्फुटित होतात की, केवळ दर्शन केल्याने मन पुलकित होते आणि ज्या विषयस्वरूपाला इतर सामान्य लोक ओरडूनओरडूनही समजावून देऊ शकले नाहीत; ते न बोलता केवळ मुद्रेच्याद्वारे प्रकट करतात.

'वक्त्रं वक्ति हि मानसम्'चाच हा चमत्कार आहे.

जेव्हा मनुष्य आपल्या उत्कट तपाने, मनोबलाने आणि एकाग्र ध्यान-सामायिकाच्या बळाने समोरच्यावर अंतरात्म्याच्या सूक्ष्म भावांना मनाप्रमाणे प्रक्षेपित/रेखांकित करण्यास समर्थ होतो; तेव्हा त्यास सिद्धपरिश्रम किंवा अपेक्षित उद्दिष्टामध्ये सिद्धी प्राप्त करणे गरजेचे आहे. कारण, माणसाचे सारे प्रयत्न साधनेपासून सुरू होतात आणि सिद्धीत समाप्त होतात. यात्रेचा शेवट इच्छित स्थळी पोहोचण्यात असतो. उगीचच निर्हेतूकपणे इकडेतिकडे

---

७. 'पृथुपाणिः पृथुपादः पृथुकर्णः पृथुशिराः पृथुस्कन्धः ।
पृथुवक्षाः पृथुजठरः पृथुभालः पूजितः पुरुषः ।।' - सामुद्रतिलक

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

फिरण्याला यात्रा किंवा साधना म्हणत नाहीत. साधनेमध्ये निर्मितीचा भाव असतो. पाहिजे तसे कागद, पुस्तक दौत-टाक इ. साहित्य घेऊन बालक जेव्हा स्वर-व्यंजने शिकू लागते, तेव्हा त्याचे प्रयत्न भविष्यात त्याच्या ज्ञानप्राप्तीत परिवर्तित होतात.

हा परिणाम म्हणजेच त्याच्या साध्य प्रयत्नांची, अभ्यासाची सिद्धी होय. ही मनोबलानेच प्राप्त होते. समिधारूपी मनोबलाने अग्नीचे तेज आणखी प्रज्वलित होऊन जाते. विघ्नरूपी बाधांच्या जंगलास जाळून भस्म करण्याची शक्ती त्यास लाभते. मग, निर्मितीचे सप्तस्वर ताल देऊ लागतात. 'कार्यं वा साधयेयं देहं वा पातयेयम्'-एकतर, मी कार्यसिद्धी प्राप्त करेन, नाहीतर मग प्राणांचे विसर्जन करेन - असेच मनापासून साधना करणाऱ्याचे भाव असतात. कार्यसिद्धीसाठी प्रवृत्त झालेला असा मनस्वी साधक मग सुखदुःखाची पर्वा करीत नाही. 'मनस्वी कार्यार्थी गणयति न दुःखं न च सुखम्। खरे तेच आहे की, दुःखांनी-सुखांनी जो विचलित होतो; तो कार्यशूर होऊच शकत नाही. 'नो रिस्क, नो गेन.' जबाबदारी घेतल्याशिवाय पुढे जाता येत नाही, या म्हणीत सत्यता आहे. 'इस पार या उस पार'- मनस्वीला मधला मार्ग स्वीकारार्ह वाटत नाही आणि अशांच्याच गळ्यात विजयश्री माळ घालते.

लक्ष्मी म्हणते- मला त्याच लोकांबरोबर राहायला आवडते; जे उद्योगशील आहेत, प्रयत्नशील आहेत. गरज पडली तर ते अमृतच काय पण विषसुद्धा पिऊ शकतात. ते शिडीविना आकाशापर्यंत चढू शकतात आणि विवराशिवाय पाताळाचा तळ पाहू शकतात. परंतु, जे आळशी आहेत, अकर्तृत्ववान आहेत; त्यांना तर लक्ष्मीचे वाहनदेखील विचारत नाही.

मनोबल ही स्वयं एक खूप मोठी शक्ती आहे. शक्तींचे निरूपण करतांना भारतीय तत्त्वचिंतकांनी तिचे तीन प्रकार सांगितले आहेत - प्रभुशक्ती, मंत्रशक्ती व उत्साहशक्ती! यापैकी उत्साहशक्ती सर्वात महत्त्वाची आहे. उत्साह मनाचा धर्मच आहे. जर उत्साहच नसेल तर काहीही करण्याची शक्तीच उरत नाही. खिन्नतेची अक्षरे ज्याच्या हृदयरूपी पुस्तकावर लिहिलेली नसतात; ते कधीच पराभूत होत नाहीत. मनोबल असलेल्या व्यक्तीच्या स्वरात धैर्य व गतीमध्ये सिंहाचा पराक्रम प्रतीत होतो. शक्तीचा अक्षयस्रोत धष्टपुष्ट शरीर व धनवैभव हा नसून मनोबल हाच आहे. सर्वज्ञातच आहे की, सिंहाचे शरीर हत्तीपेक्षा लहान असते. परंतु, मनोबल- ज्याला सत्त्व असेही म्हणतात; ते मात्र सिंहात अधिक असते. म्हणून, तर तो महाकाय हत्तीला पराजित करू शकतो. कोणा कवीने म्हटले आहे-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

'मदोन्मत्त गजेंद्राचे गंडस्थळ फोडून टाकण्यासाठी सिंहाचे पिलू/शावक जरी धावून जात असेल तरी तो त्याचा स्वभावच आहे; सत्त्ववानांची ती उपजत प्रवृत्ती आहे. वयाने ज्येष्ठ असणे, ही खऱ्या अर्थाने ज्येष्ठता नाही.'[८]

एका राजसभेत कोणत्यातरी एका गहन प्रश्नावर खूप दिवसांपासून वादविवाद सुरू होता. मोठमोठे विद्वान, वादातील श्रेष्ठ, तर्कभूषण अत्यंत गंभीरपणे त्या प्रश्नासंबंधी विचार करीत होते. तेव्हाच एका व्यक्तीने, जिला बालकच म्हणता येईल, अशा अल्पवयीन व्यक्तीने तिथे प्रवेश केला. शास्त्रार्थात भाग घेण्यासाठी तो आला आहे हे समजताच राजा आणि पंडित मंडळी त्याचा उपहास करू लागले. परंतु बालकाने निर्भयपणे त्यांना आव्हान देत म्हटले- "तुम्ही का हसता आहात? मी लहान आहे म्हणून? पण काय झाले मी एक छोटा मुलगा असलो तरी? माझी बुद्धी मात्र बालकासारखी नाही. मोठा झाल्यावर तर मी तिन्ही लोकांचे वर्णन करण्याचे सामर्थ्य प्राप्त करून घेईन.[९] शरीराच्या अवस्थेवरून ज्येष्ठ-कनिष्ठ असण्याचा संबंध, जो मनाच्या बळाबाबत- ज्येष्ठ-कनिष्ठ असा लावत असतील; तर त्यांना भ्रमबाधितच म्हटले पाहिजे.

काही लोकांचे शरीर जसेजसे वाढते तसेतसे ते परिपक्व होत जातात. त्यांचा मानसिक विकास जास्तजास्त व्हायला लागतो. विचार परिपक्व व प्रौढ होत जातात. परंतु, काही लोकांचे वय वाढले, शरीराची वाढ झाली, तरीही ते मानसिक विकास व अनुभवाच्या बाबतीत मात्र खुजेच असतात. म्हणजे, त्यांचे शरीर असते ५० चे आणि मन मात्र २५ चेच असते. समाजाच्या एखाद्या संस्थेत-सभेत ते बसले तरी त्यांचे वागणे-बोलणे-हसणे लहान मुलासारखेच असते. काही काम, हेतू नसला तरी अशी माणसे गल्लीबोळांत हिंडत राहतात. शोकसभेत जरी बसले तरी तोंडात पान चघळत बसतात. एखाद्या नवरदेवाच्या वरातीत सामील झाले तरी सुरत मात्र मुहर्रमी म्हणजे शोकाकुल असते. अशा व्यक्तींची लोकांना कीव येते. प्रत्यक्ष तोंडावर नाही; परंतु अप्रत्यक्षपणे, पाठीमागे त्यांची चेष्टा केली जाते. त्यांच्यासाठी विनोद-उपहासपूर्ण सभाही घेतल्या जातात. त्यांच्यावर केलेले विनोद मग थंड, शांत वातावरणामध्ये चैतन्य आणतात. परंतु याच्या अगदी उलट अनेक लोक

---

८. 'सिंहः शिशुरपि निपतति मदमलिनकपोलभित्तिषु गजेषु ।
प्रकृतिरियं सत्ववतां न खलु वयोस्तेजसो हेतुः ।।'

९. 'राजन् ! यद्यपि बालोऽहं न मे बाला सरस्वती ।
प्राप्ते तु षोडशे वर्षे वर्णयामि जगत्त्रयम् ।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सरोवराप्रमाणे शांतशांत असतात आणि त्यांच्या मनात उठणाऱ्या हर्षशोकाचे किंवा क्षोभाचे तरंग त्यांच्या चेहऱ्यावर अजिबात उठताना दिसत नाहीत. सभेमध्ये वृद्धजनांपेक्षाही जास्त त्यांचा सन्मान होतो. लहानपणी तरुणांप्रमाणे, युवावस्थेत ते प्रबुद्ध-विद्वान लोकांकडून सन्मानित केले जातात, लोकांना ते पूजनीय वाटतात. हा त्यांच्या सर्व तऱ्हेने उन्नत झालेल्या मनाचा सन्मान असतो. म्हणतात ना, 'उन्नतं मानसं यस्य भाग्यं तस्य समुन्नतम्'। ज्याचे मन उच्च, त्याचे भाग्यही उच्चच असते.

मनाचा परिणाम हा संपूर्णपणे, अगदीच वैयक्तिक म्हणता येणार नाही. तो मानवसमूहावरून ठरतो आणि अशा प्रकारे मनाचे प्रभुत्व व्यक्ती, समाज, राष्ट्र व विश्व यावरून निश्चित होते.

परस्परांच्या सहवासात येणाऱ्या व्यक्तींचे मनोमिलन होते व आपले वैशिष्ट्य अथवा आपल्या वैगुण्याची छाप एकमेकांच्या मनावर पडते. त्यामुळे एका वातावरणाची निर्मिती होते. त्या वातावरणाचे परिणाम समाजातील व्यक्तींच्या मनाच्या स्थितीची जाणीव करून देत राहतात. जर एखाद्या समाजाचे नैतिक अध:पतन झालेले दिसून येत असेल; तर त्या समाजाच्या मनाचेही अध:पतन झाले आहे असे नि:शंकपणे समजावे. विश्वातली बहुतेक राष्ट्रे आज युद्धाचे निमित्तच शोधत आहेत. कारण वरवर शांत वाटणारे त्यांचे मन आतून मात्र भयभीत झालेले आहे. अविश्वासाने त्यांच्या मन:प्राणात घर केले आहे. हा मानसिक अविश्वास त्यांना एकमेकांशी मुक्तपणे भेटू देत नाही. आतल्या आत घुसमटत, विष-किल्मिष पेरत राहतो.

या कारणास्तवच एक नीतिज्ञ म्हणतो की- 'या पृथ्वीवर हे जे कोट्यवधी पुरुष फिरतांना दिसून येतात; ते सगळे पृथ्वीला भारभूत आहेत आणि ते जणू चालते-फिरते मांसवृक्षच आहेत. यांची उंचीपुरी शरीरे भार आहेत व त्यांचे मानसिक व्यवहार वेड्यासारखे आहेत.[१०] खरे पाहता, आत्म्यात स्थित असलेले विशुद्ध मन एक संस्था आहे. ती आपल्या संपर्कात येणाऱ्यालासुद्धा पवित्रतेने चिंब करते, श्रीमंत करून सोडते. 'साधू' या शब्दाचा अर्थ ज्याचे मन प्रशस्त/उदार आहे, अशी व्यक्ती हा आहे. केवळ, शरीराच्या सौंदर्याने साधुत्व नाही मिळत. जेव्हा मनात पावित्र्य, संस्कार, उच्च आशय आणि आत्मनिष्ठा जागृत होते; तेव्हाच त्या व्यक्तीस साधू म्हटले जाते. अशा साधूंच्या चरणाजवळ बसताच

---

१०. 'विपर्यस्तमनश्चेष्टै: शिलाशकलवर्ष्मभि: ।
मांसवृक्षैरियं मूर्खैर्भाराक्रान्ता वसुन्धरा ।।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मनात पावित्र्याचा संचार होऊ लागतो.

प्राचीन काळी समाज आणि राष्ट्राच्या जीवनाचा दर्जा खूप उच्च असा होता आणि परस्परांमध्ये विश्वास, प्रेम व स्नेहाचे वातावरण होते. त्यामागे सर्वत्र आपली शुचिता पसरवणाऱ्या साधूचे मन हेच कारण होते. परिणामी राष्ट्रजीवन सुखी होते. अशा प्रकारे मनातली सृष्टी जागतिक जीवनावर प्रभाव टाकते आणि मोठमोठ्या क्रांत्या घडवून आणते.

मन चंचलस्वरूपी आहे, असे सांगितले जाते. 'श्रुतस्कन्धे श्रीमान रमयतु मनोमर्कटममुम्' - असे म्हणत शास्त्रकारांनी मनाला 'मर्कट'- वानर म्हटले आहे. यावर बुद्धीचा अंकुश राहिला तर मनुष्य सहसा उपहासनीय होत नाही. अन्यथा, हे मन कधीकधी मोठमोठ्या व्यक्तींनाही लज्जेने लाल करते. असे म्हणतात- एक व्यक्ती एक गोपनीय पत्र लिहीत होती. त्याच वेळी शेजारी बसलेली व्यक्ती ते पत्र वाचू लागली. पत्र लिहिणाऱ्याने पत्र लिहिणे चालूच ठेवले आणि लिहिले - 'बाकी राहिलेले मी तुम्हाला दुसऱ्या वेळी लिहीन. कारण, यावेळी हे पत्र एक मूर्ख माणूस वाचत आहे.' पत्र वाचणारी व्यक्ती लज्जित झाली आणि ती तोंड फिरवून बसली.

याच तऱ्हेची एक घटना राजा भोज याच्यासंदर्भात सांगितली जाते. असे सांगतात की, भोज राजाच्या दोन्ही राण्या एकान्तात एकमेकींशी बोलत बसल्या होत्या. त्याच वेळी 'मी राजा आहे, पती आहे' ही गर्वभावना मनात ठेवून राजा भोज त्यांच्यामध्ये उपस्थित झाला. मोठी राणी म्हणाली, 'यावे मूर्ख!' याच शब्दात तिने पतिदेवाचे स्वागत केले. राजा उलटपावली परत गेला.

आपल्यासाठी योजल्या गेलेल्या 'मूर्ख' या शब्दावर तो विचार करू लागला आणि मनाला जरा शांती मिळावी म्हणून राजसभा-भवनात जाऊन बसला. तिथे जे कोणी विद्वान, सरदार, शूर येऊ लागले त्यांचे स्वागत तोही 'आओ, मूर्ख!' (यावे मूर्खांनो) या शब्दात करू लागला. लोकांना फार आश्चर्य वाटले की हा एवढा विद्वानांचा शिरोमणी, याला आज काय झाले आहे? तेवढ्यात कालिदासाने दरबारात प्रवेश केला. राजाने त्यालाही उद्देशून तेच शब्द वापरले. ते ऐकून कवीने राजाच्या मनातील अभिप्रायासंबंधी अंदाज केला व तो राजाला म्हणाला- 'हे राजन! मी खात असतांना मार्गावरून चालत नाही, हसत हसत बोलत नाही, घडलेल्या गोष्टीबद्दल विचार करीत बसत नाही, कुणावर उपकार केले तर त्यासंबंधी जास्त बोलत नाही, जिथे दोन व्यक्ती एकान्तात बोलत असतील तर त्या दोघात तिसरा म्हणून उपस्थित होत नाही. हे भोज राजा! असे कोणते

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कारण आहे की तुम्ही मला मूर्ख म्हणून संबोधिले?'[११] महाकवीचा श्लोक ऐकताच राजाला कळून चुकले की राणीने आपल्याला उद्देशून 'यावे मूर्ख' का म्हटले होते त्या बोलण्यातली खोच राजाला कळली.

मानसशास्त्र जाणून घेतले नाही म्हणूनच त्याला 'मूर्ख' शब्द ऐकून घ्यावा लागला. हे मानसशास्त्र जीवनशास्त्र आहे. ते जगण्याची कला शिकवते.

खूप गुंतागुंतीचे जटिल प्रश्न सोडवण्याची जबाबदारी जे घेतात; ते मानसशास्त्राचे प्रकांड पंडित असतात. प्रसंग पाहूनच ते बोलतात. नीतिज्ञ म्हणतात- 'कहिये समय विचारि' - वेळप्रसंगाचा विचार करूनच बोलले पाहिजे. 'अवसर पठिता वाणी गुणगुणरहितापि शोभते पुसाम्' - प्रसंग बघून बोललेली एखादी गोष्ट साधारण असूनही मोठे काम करून जाते. वेळ निघून गेल्यानंतर मोलाचे बोलही एखादा हेतू सिद्ध करण्यास कुचकामी ठरतात. वरात निघून गेल्यावर वाजंत्री वाजवण्याचा काय उपयोग? 'का बरसा जब कृषी सुखाने' - पावसाची वाट बघूनबघून शेती सुकून गेल्यावर मेघ आले तर तो पाऊस कोणत्या कामाचा?

ही सूत्रे मानसशास्त्रातीलच आहेत. 'बहुज्ञता व्युत्पत्तिरित्याचार्या:' मनुष्याने बहुज्ञ असले पाहिजे. केवळ, शास्त्रातील कोरडे सिद्धान्त तोंडपाठ केल्याने विद्वत्ता प्राप्त होत नाही. 'यो लोकवेदी वेदी स बहुवेदी'- जो लोकशास्त्र जाणतो, तो खूप काही जाणतो. व्यवहाराच्या कोणत्याही क्षेत्रात मनोविज्ञानाची अपरिहार्य आवश्यकता आहे. 'किं मे जन: पश्यति भावभाषिते'- माझ्या भावनासंबंधी, भाषणासंबंधी लोक काय विचार करतात; ही साधी, सोपी गोष्ट ज्याला कळत नाही; त्याला यश मिळत नाही.

वाऱ्याच्या हलक्याशा झुळकीने मोरपीस हलते, त्याप्रमाणे हे मनसुद्धा विषयादी भावनांच्या स्पर्शाने विचलित होते.[१२] पिंपळाचे पानही कधी स्थिर राहत नाही, म्हणून त्यास 'चलपल्लव' म्हणतात. मनाचेही तसेच आहे. त्याची चंचलता रोखण्यासाठी त्यास सदासर्वकाळ स्थिर राहणाऱ्या आत्मरूपी हंसात प्रतिष्ठित करणेच हितकर आहे.[१३] कारण,

---

११. 'खादन्न गच्छामि हसन्न भाषे, गतं न शोचामि कृतं न मन्ये ।
द्वाभ्यां तृतीयो न भवामि राजन्, किं कारणं भोज! भवामि मूर्ख:।।' - भोजप्रबध:

१२. 'वातान्त: पिच्छलववच्चेतश्चलति चञ्चलम्' - योगवासिष्ठ १६/१

१३. 'निर्व्यापारे मनोहंसे पुंहंसे सर्वदा स्थिरे ।
बोधहंस: प्रवर्तेत विश्वत्रयसरोवरे ।।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मनाचे चांचल्य थांबवल्याशिवाय आत्मकल्याणाच्या मार्गावर एक पाऊलही पुढे टाकता येणार नाही.

जे मोक्षगामी झाले, त्यांनी सर्वप्रथम मनाला रागादी परिणतीपासून मुक्त केले, त्यानंतरच, त्यांना मोक्ष मिळू शकला आणि जेव्हा बहिरंग व अंतरंग मोह, अज्ञान आणि कषाय यांची निवृत्ती होते, तेव्हाच मन स्थिर होते, वश होते. जेव्हा स्थैर्य प्राप्त होते; तेव्हाच ध्यान-समाधीकडे ते प्रवृत्त होऊ शकते.[१४] म्हणून, कर्मबंधाचा क्षय करण्यासाठी मनाला विभावावस्थेतून स्वभावास्थेत परत येणे आवश्यक आहे, कषाय आणि इंद्रियसंपर्कांने व्याकुल झालेले मन वारंवार भवभवांतरात फिरत ठेवते. म्हणून, मनामुळेच जे कर्मबंध निर्माण होतात; त्यांचा प्रबळ पुरुषार्थाच्या उदयाने मनाच्या द्वारेच क्षय केल्यावर हा जीव मोक्षगामी होतो.[१५] याच आशयाचे निरूपण करताना **'महापुराणात'** आचार्य जिनसेनांनी म्हटले आहे की- ज्ञानदर्शनात्मक उपयोगाच्या विशुद्धीने रागद्वेषाचा नाश होतो आणि संवरपूर्वक कर्मनिर्जरा होते.

हे रागद्वेषच कर्मबंधाचे कारण आहेत आणि त्यांच्यामुळेच मनाची विभावावस्था निर्माण होते. अशा प्रकारे कर्मबंध नष्ट केल्यानेच मुक्ती मिळते.[१६] लौकिक विज्ञानाच्या पलीकडचे असे हे आत्मविज्ञान प्राप्त करून घेणे, हीच खरी उपलब्धी आहे. कारण, मनाला वश करून घेणे, मन समुन्नत करणे व आत्म्यात प्रतिष्ठित करणे, हे प्रयत्न जोपर्यंत होतील तोपर्यंत कर्मनिर्जरा होईल व तीच मोक्षप्राप्ती आहे. या जगात वावरणाऱ्या लोकांसाठी जेवढी माहिती दिली गेली आहे, ती लौकिकार्थाने दिली गेली आहे. या ज्ञानाचा उत्तम आणि वास्तविक उपयोग तर आत्मोपलब्धी हाच आहे. म्हटलेच आहे- 'तस्मिन् सिद्धे कृते साक्षात स्वार्थ-सिद्धिर्भवेद ध्रुवम् ।'

❖❖❖

---

१४. 'बहिरन्तस्तमोवातैरस्पन्दं दीपवन् मनः
यस्य स्याद्वीतमोहस्य स ध्यानं ध्यातुमर्हति ।।' - महापुराण, २१/१९

१५. 'चित्तेन जनितं कर्म चित्तेन परिशुद्धयते ।'

१६. 'उपयोगविशुद्धौ च बन्धहेतूनुदस्यतः ।
संवरो निर्जरा चैव ततो मुक्तिरसंशयः ।।' - महापुराण, २१/१९

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

साहित्य व स्वाध्याय

'ण वि अत्थि ण वि य होहदि, सज्झायसमं तवो कम्मं ।'

- आचार्य कुंदकुंद

शब्दबद्ध केलेल्या हितकारक चिंतन परिणामाला साहित्य म्हणतात. साहित्याच्या या हितावह शाब्दिक भावनात्मकतेने मनुष्याच्या चिंतनाचे, सातत्याने होणाऱ्या आत्मपरीक्षणाच्या परिणामांचे-व्याकरण, काव्य, कोष, छंद, दर्शन आणि अन्य विविध प्रकारचे ज्ञान- विज्ञान इत्यादी विषयांद्वारे प्रकटीकरण केलेले आहे.

या अभिव्यक्तीसाठी माणसाची उदात्त बुद्धिमत्ता उपयोगात आणली गेली आहे. कठोर तपश्चर्येमुळे प्राप्त झालेल्या सत्याच्या साक्षात्काराला त्याने जाणून घेतले आहे आणि कितीतरी काळ त्यासाठी लागला आहे. जी पुस्तकालये, ग्रंथसंग्रहालये पूर्णत: भरलेली आपण पाहतो, त्यामध्ये अनेकानेक साहित्य-शिल्पकारांची साधना सफल होऊन जणू विराजमान झालेली आहे. मनुष्यजातीने ज्ञानसागराचे मंथन करून त्यातून ज्या रत्नराशी प्राप्त केल्या; त्या साहित्याच्या रूपाने रसिकांच्या गळ्यातील रत्नहार बनून हजारो प्रकाशकिरणांनी चमकत आहेत. विवेकाचा हा फरकच मनुष्याला चतुष्पाद प्राण्यांपेक्षा श्रेष्ठ ठरवतो. प्रत्येक पशूचे जीवन त्याच्या जातीप्रमाणे असते तर प्रत्येक माणसाचे व्यक्तिसापेक्ष असते. म्हणजेच पशूच्या संपूर्ण जातीत आहार, विहार सारखाच असतो. परंतु, एक मनुष्य दुसऱ्या माणसापेक्षा बौद्धिक, नैतिक व चारित्राच्या विकासक्रमाच्या दृष्टीने भिन्न असतो. माणूस स्वत:ची प्रगती किंवा अधोगती करण्यास समर्थ असतो; परंतु पशू मात्र 'यथा जातस्तथा गत:' - म्हणजे जसा जन्मतो, तसाच मरतो. त्याने समूहरूपाने किंवा व्यक्तिगत रूपाने कुठले वैशिष्ट्य प्राप्त केले किंवा प्रगती साधली असे होत नाही. परंतु विस्मय, जिज्ञासा, चिंतन इ. कारणांमुळे मनुष्याने मात्र जन्म-मृत्यूच्या विचित्र संसाररूपी वादळासंबंधी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्वतःला विचार करायला भाग पाडले. रहस्यांची उकल करून निष्कर्ष मिळवले.

मी कोण आहे? जन्म-मृत्यू काय आहेत? हा संसार म्हणजे काय? याच्याशी माझा काय संबंध? मी कोठून आलो? कोठे जाणार? इत्यादी प्रश्न त्याच्या मनात उभे राहतात आणि आपल्या तात्त्विक निष्कर्षातून तो स्वतःचे समाधान करून घेतो. चिंतनाची ही सहजवृत्ती साधारणपणे सगळ्याच मनुष्यांना प्राप्त झालेली असते; तरीही एखादाच सातत्याने होणारा (अनाहत) हा नाद ऐकू शकतो. हा ध्वनी ऐकणारे काही जण त्यावर विचार करतात. पण, त्या विचारपरायणांमध्येही फार थोडे असे असतात की, जे आपल्या चिंतनपरिणामाला चारित्र्याने व आचरणाने कृतार्थ करतात.

असे पवित्र, चारित्र्यधारी महापुरुष त्यांच्या चिंतनपरिणामाचा लाभ लोकांना मिळावा म्हणून स्वतःच्या अनुभवांना शब्दबद्ध करतात. तेच साहित्याच्या रूपाने आपल्याला प्राप्त होते. थेंबाथेंबाने कलश भरावा, तसा अनेक दार्शनिकांच्या, विचारवंत विद्वानांच्या व आचार्यांच्या अनुभवतथ्यांच्या शब्दाशब्दाने वाङ्मयकलश भरलेला आहे. कोणी एखादी व्यक्ती एखाद्या विषयावर जेवढे लिहू शकणार नाही, जेवढा विचारही करू शकणार नाही आणि आपल्या संपूर्ण आयुष्यात एक वेळसुद्धा पारायण करू शकणार नाही; एवढे अपरिमित ज्ञान (साहित्य) आपल्या पूर्वजांनी स्वपरंपरेच्या हितासाठी मागे ठेवलेले आहे.

मानव पिढीने जर त्या संग्रहित साहित्यवैभवाचा उपयोग करायचा म्हटले तर अनेक जन्मांपर्यंत ते धन संपणार नाही. त्यांचा एकएक शब्द, भाव, अर्थवैशिष्ट्य यांनी ग्रंथरूपाने जन्म घेतला आणि ज्ञानाच्या महत्तेला विकसित आणि श्रीमंत करून आत्मदर्शनाचा मार्ग आपल्यासाठी खुला केला आहे. त्या महान साहित्यिकांच्या असीम ऋणानुबंधातून मुक्त होणे अवघडच आहे.

जगात निर्माता आणि उपभोक्ता असे दोन वर्ग आहेत. साहित्यिक हा निर्माता आहे; तर वाचक उपभोक्ता आहे. एखादी साहित्यकृती तयार करायला साहित्यिकाला दिवस, महिने, वर्षे लागू शकतात. परंतु, त्यांच्या वर्षांच्या चिंतनश्रमाचे फळ वाचक काही तासांत प्राप्त करू शकतो. तयार केलेले पक्वान्न खाण्यास व रचनेतील शब्दसमूह वाचण्यास वेळ लागत नाही. जे साहित्य उत्तम असते, ते त्याच्या मौलिकतेमुळे हजारो वर्षे जिवंत राहते. परंतु असत् किंवा त्यात्या काळासाठी लिहिले गेलेले (तत्कालीन) साहित्य विशिष्ट ऋतूत गळून पडणाऱ्या फुलांसमान शीघ्र नष्ट होणारे असते. जगातले बुद्धिमान वाचक साहित्याचे समीक्षक असतात. कारण, आपल्याच साहित्यकृतीविषयी ममत्वबुद्धी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असल्याने साहित्यिक तिची योग्य समीक्षा करू शकत नाही.

एक वचन आहे की, 'एकः सूते कनकमुपलस्तत्परीक्षाक्षमोऽन्य' - एका खाणीतून सोने निघते व दुसऱ्या खाणीतून कसोटीचा दगड निघतो. दोन्हीही दगडच; पण सोने सोन्याची परीक्षा करू शकत नाही. त्याला पारखून पाहण्यासाठी तर कसोटीचा दगडच लागतो. कस्तुरीचा सुगंध वाहणारा वाराच आपल्याबरोबर नेतो व दूरवर दिशान्तात पसरवतो. तरी, 'आपरितोषाद् विदुषां न साधु मन्ये प्रयोगविज्ञानम्' - कालिदासाचे हे वचन अगदी सत्य आहे की, जोपर्यंत रसिक वाचक, विद्वान मंडळी एखाद्या साहित्यरचनेवर आपल्या प्रशंसेचे शिक्कामोर्तब करीत नाही; तोपर्यंत त्या साहित्यकाराचा प्रयोग/मेहनत सफल झाली, असे म्हणता येत नाही. जर वाचकाने रचनाकाराची रचना तद्रूप होऊन वाचली, त्याने प्रतिपादन केलेल्या विषयाचे औचित्य मान्य केले, तर संबंधित लेखक स्वर्गात गेल्यावरही, मृत्यूनंतरही अमर होतो.

खरे पाहता, लेखकाचे श्रम वाचकच सफल करतात. ज्या लेखकाला वाचकवर्गच लाभत नाही, त्याचे शब्द साहित्याचे रूप धारण करीत नाहीत. जोपर्यंत साहित्य वाचकांना आकर्षित करून घेत नाही; तोपर्यंत लेखकाचे श्रम निष्फळच आहेत. श्रेष्ठ कृतींचा अभ्यास केला तर नवीन शक्ती, चैतन्य आणि दिशाबोध यांचा आविष्कार झाल्यासारखे वाटते. नवी दिशा, नवे विचार व उदात्त चिंतनाचे राजमार्ग उत्तम साहित्यामुळेच मानवी समाजाला प्राप्त होतात. साहित्य व्यक्तीच्या चैतन्यात एका विशेष अंतःकरणाची निर्मिती करते. म्हणून, जीवनात साहित्याचे महत्त्व निःसंदिग्ध आहे.

जर, एखाद्या व्यक्तीला आपल्या आयुष्यातील भूतकाळात घडून गेलेल्या विशिष्ट गोष्टीबद्दल जिज्ञासा असेल, तर त्या कुतूहलाची पूर्ती साहित्यच करते. आपला इतिहास, संस्कृती व सभ्यता आणि जातीचे श्रेष्ठत्व कोणासमोर सादर करताना प्रतीक रूपाने आपण साहित्यच भेट देतो. अशा प्रकारे साहित्य आमचा एक मौल्यवान निधी आहे. ते म्हणजे आमचा कल्पवृक्षच आहे. त्याच्याखाली बसले की, मनातली इच्छा पूर्ण होते. जे पाहिजे ते प्राप्त करता येते. भूत, भविष्य आणि वर्तमानाच्या कृत, करिष्यमान व चालू असलेल्या सर्व क्रिया साहित्याकडून नियंत्रित होतात. आपली गती व स्थिती जाणून घेण्यासाठी आपले साहित्य पाहिले पाहिजे. संसाराच्या अनेकरूपतेची सुधारित व विकृत चित्रे आपल्याला साहित्यातच सापडतील.

साहित्य तथ्यांचे संकलन आहे आणि सत्याचे निरूपण आहे. अनंत कालावधीत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ज्यांना जे निर्मळ, प्रकाशदायी असे सुचले; ते त्यांनी लिहून काढले आणि ते साहित्याच्या सरोवरात प्रसन्न कमलपुष्पाप्रमाणे शोभून दिसत आहे. साहित्य वाचून आम्ही आपल्या ज्ञानतंतूंचा विस्तार करीत आहोत. आमच्या कूपमंडूकवृत्ती-संकुचितपणाला आम्ही सागराच्या विशालतेत परिवर्तित करतो. स्वत:ला ओळखू लागतो; जाणून घेऊ लागतो; मनुष्याच्या उत्तम जीवनामधल्या सर्वोच्चता प्राप्त-गोष्टींचे वर्णन साहित्याच्या अमर पानावर शब्दांकित झाले आहे. साहित्याला सतत पारखत राहिल्याने बुद्धीची धार तीक्ष्ण होते. सगळी बाधा, अडचणी नष्ट होऊन चिंतनाचे किरण प्रस्फुटित होऊ लागतात. केळीच्या पानाखाली दुसरे एक पान असते; तसे साहित्यातही विचारांची परंपरा जपलेली दिसून येते.

बुद्धीला आवश्यक ते खाद्य साहित्यामुळे मिळते. वाट चुकलेल्याला त्याचे गंतव्यस्थान मिळावे, बुडू पाहणाऱ्याला नावेचा आधार मिळावा, त्याप्रमाणे अविचाराच्या शून्याकाशात हरवलेल्याला उत्तम मार्ग हा उत्तम साहित्याद्वारेच मिळतो. म्हणून, उत्तम साहित्याची निर्मिती करणे, हे प्रत्येक विवेकशील माणसाचे कर्तव्यच आहे.

पण, म्हणून साहित्याची, पुस्तकांची कपाटे सजवून आपल्या चारही बाजूंनी लावली म्हणजे काही साहित्याचा अनमोल ठेवा आपल्या जीवनात अवतरतो, असे नाही. भोपळा पाण्यात बुडूनसुद्धा वरवर तरंगत राहतो, त्याप्रमाणे जो आपले मुख (मनोवृत्ती) त्या भोपळ्यासारखे पाण्यात बुडवत नाही, वरवरच तरंगतो; त्याला साहित्याचा फायदा मिळू शकत नाही. साहित्याचा फायदा घ्यायचा असेल तर स्वाध्याय अपेक्षित आहे. सिद्धी त्यालाच प्राप्त होते; जो पुरुषार्थ करतो. 'क्रियासिद्धि सत्वे वसति महतांनोपकरणे ।'- क्रियासिद्धी पुरुषार्थाचीच अपेक्षा करते. ती उपकरणांनी प्राप्त करून घेता येत नाही. जसे एक कुंभार आहे. त्याच्याजवळ माती, दंड, चाक ही सर्व उपादाने आहेत. परंतु, एवढ्या उपादानांच्या मदतीने तो जर कुंभ तयार करण्याची नुसती स्वप्नेच बघत राहिला तर ते त्याच्यासाठी 'आकाशपुष्प' (अशक्य गोष्ट) ठरेल. मडके तयार करायचे तर त्याला या सगळ्या उपकरणांचा क्रमश: व योग्यरीत्या वापर करायला हवा. कष्ट घ्यायला हवेत. चाक दंडाने फिरवायला हवे. त्याच प्रकारे उत्तम साहित्य-रचना ज्या आहेत त्या फक्त समोर टेबलावर ठेवून भागणार नाहीत, तर वाचनाद्वारे, स्वाध्यायाद्वारे त्या कृती आत्मसात केल्या पाहिजेत.

स्वाध्यायाचे व्रत प्रत्येक माणसाने घेतले पाहिजे. कारण, त्यामुळे ज्ञानात भरच पडते. पापाचे निराकरण करण्याचा मार्ग स्वाध्यायातूनच सापडतो. ग्रहणाचा अस्त

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

झाल्याबरोबर सूर्याची किरणे सगळ्या दिशांत निर्बंध संचार करू लागतात; तद्वत स्वाध्याय करणाऱ्यांची बुद्धीही अगदी सहजपणे शब्दामध्ये अभिप्रेत असलेली अर्थशक्ती ग्रहण करू लागते. स्वाध्यायाशिवाय विद्वत्तेचे सोंग आणणे म्हणजे वांझ स्त्रीच्या मुलाचे लाड केल्यासारखे आहे. म्हणून, असेच म्हणावे लागेल की, जो स्वाध्यायनिष्ठ आहे, तोच साहित्य जाणणारा आहे.

हा स्वाध्यायाचे व्रत घेणाऱ्याचा विशेष गुण आहे. स्वाध्यायाने बुद्धीचे बळ वाढते आणि बुद्धिबळ हे आत्मबळाला सहायक असते. आत्मा बलवान असेल तर साध्य मिळतेच. फक्त लौकिक ग्रंथसंपदेचा स्वाध्याय व्हावा, असे नाही तर धर्माचरणासंबंधीच्या साहित्याचाही स्वाध्याय झाला पाहिजे. स्वाध्यायामुळे संस्कारांत परिणाम-विशुद्धी येते आणि परिणामविशुद्धी मोठे फळ देणारी आहे. बुद्धी स्वाध्यायानेच प्राप्त होते. ज्ञानप्राप्तीचे माध्यमही स्वाध्यायच आहे. स्वाध्यायात मग्न असलेल्याच्या समोर अक्षरांच्या रूपात श्रेष्ठ, विशिष्ट ग्रंथकाराचे जीवन साकार होऊ लागते. त्यांच्या साहित्याच्या प्रांतातील यशरूपी शरीराला तो बघू शकतो. लेखकांच्या कृतींचे अध्ययन केले की, त्यांच्या प्रकांड पांडित्याची ओळख पटू लागते. वाचक त्यांच्या भावनांच्या सान्निध्याचा निकट अनुभव घेऊ लागतो. मनाला स्थिर ठेवण्याचे दिव्य औषध म्हणजे स्वाध्याय होय.

'श्रुतस्कन्धे धीमान् रमयतु मनोमर्कटममुम्' - वानरासारख्या चंचल असलेल्या या मनाला शास्त्ररूपी फांद्यावर हिंडण्यासाठी म्हणून सोडून दिले पाहिजे. स्वाध्याय-शिलेवर जो आपल्या मनाला निश्चलपणे प्रतिष्ठित करतो; तो धन्य होय. कारण, हेय-उपादेयासंबंधीचे ज्ञान शास्त्र-स्वाध्यायानेच होते. मृत्यूसारख्या अवघड किल्ल्याला उल्लंघून जाण्याचा पराक्रम स्वाध्यायीच करू शकतो. जर, स्वाध्याय करतेवेळी मन चंचल असेल, ज्ञानावरण अक्षीण असेल तर खरा स्वाध्याय झालेलाच नाही, असे म्हणावे लागेल. 'व्यर्थः श्रमः श्रुतौ' - शास्त्राध्ययनाचे सगळे श्रम फुकट गेले. 'पाणौ कृतेन दीपेन किं कूपे पततां फलम्' - हातात दिवा घेऊन चालणारा जर विहिरीत पडला, त्याला ठेच लागली तर दिवा हातात घेऊन फिरण्याचे श्रम तरी कशाला करायचे? केवळ, इहलोकापुरतेच नाही तर परलोकासाठी शास्त्राचा स्वाध्याय मार्गदर्शक मानला पाहिजे.

'आगमचक्खू साहू'- साधू तर शास्त्रालाच डोळे समजतात. त्यांचे विधिनिषेधाचे मार्ग शास्त्राच्या डोळ्यांनीच पाहिले जातात. सूर्याचा अस्त तर होत राहतो; पण ज्ञान हा अखंडदीप आहे. रात्रीच्या अंधारामुळे त्याच्या तेजाला काहीच धक्का पोहोचत नाही.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

एखाद्या उच्चशिक्षिताच्या आत्म्यामध्ये स्वाध्यायदीपाची स्थिर ज्योत प्रज्वलित असते. नियमितपणे स्वाध्याय करणारा जणू नेहमीच आपल्या ज्ञानपात्राला ज्ञानदीपाच्या प्रकाशकिरणांनी उजळून टाकत असतो. एक उत्तम अभ्यासक म्हणतो की, मी एक दिवस काही वाचले नाही तर स्वत:मध्ये काहीतरी कमी राहिले आहे, असे मला वाटते. जर, दोन दिवस वाचले नाही तर आजूबाजच्या शेजारच्या लोकांना ते समजते आणि एक आठवडा जर वाचले नाही तर एवढे रिकामेरिकामे वाटते; ते सगळे जग जाणते. खरेतर, अध्ययनशील व्यक्तींची ही सहज, स्वाभाविक मन:स्थिती आहे. त्यांची ज्ञानतृषा कधी शमतच नाही.

स्वाध्यायरूपी अमृत कितीही प्यायले तरी त्यांना ते कमीच वाटते. पोटाची भूक शांत करण्यासाठी त्यांना अन्न नाही मिळाले तरी चालेल; पण बुद्धीची भूक भागवण्यासाठी खाद्य म्हणजे ग्रंथ मिळायलाच हवेत. स्वाध्यायाविना त्यांची चेतना म्हणजे जणू रिकामा कुंभच! पोटासाठी मनुष्य नित्य प्रयत्नात गुंतलेलाच आहे. अनेक प्रकारच्या उपायांनी तो पोट भरू इच्छितो. एक जरी उपवास पडला तरी तो दु:खी व केविलवाणा होऊन जातो, शक्तिहीन होऊन जातो. परंतु, अध्ययनाच्या बाबतीत मात्र तो उपवासावर उपवास करीत राहतो. जणू, मेंदूच्या शक्तीला सल्लेखनच देण्याचा उपक्रम राबवत राहतो.

आहाराचा स्वादिष्टपणा, पौष्टिकता आणि नियमितपणा या गोष्टींसाठीच मनुष्य सारे श्रम करीत राहतो आणि मेंदूला जो खुराक द्यायला हवा, त्याबाबत मात्र त्याने उपेक्षांचे टाळे लावून टाकले आहे. एखाद्या स्वाध्यायप्रेमी माणसाला कोणत्यातरी एकान्त जागी बंद करा. पुस्तके हा त्याचा आवडता विषय; यापासून त्याला एकदम वंचित करा. काय होईल? तो काही दिवसातच वेडा होऊन जाईल. स्वाध्यायाच्या प्रेमापायी माया-ममता विसरून जाणाऱ्यांचा इतिहास दुर्मीळ नाही.

वैदिक न्यायदर्शनाचे प्रसिद्ध विद्वान 'अक्षपाद' यांच्याविषयी एक दंतकथा आहे. ते प्रत्येक क्षण स्वाध्याय करण्यात घालवत असत. रस्त्याने जातानाही त्यांची नजर पुस्तकाच्या पानावर खिळलेली असे. एक दिवस रस्त्याने वाचतवाचत ते चालले होते आणि वाटेत असलेल्या एका विहिरीत ते पडले. पडल्यानंतर थोडे सावरले की, लगेच त्यांनी पुस्तक उचलले आणि पुन्हा वाचायला सुरुवात केली. ती एक सुकलेली कोरडी विहीर होती. त्यांची स्वाध्यायाशी असलेली तद्रूपता पाहून सरस्वतीदेवीने प्रसन्न होऊन त्यांना दर्शन दिले आणि म्हटले- 'तू मला कुठलाही वर माग!' अक्षपाद, त्या वेळी त्यांना कणाद म्हणूनही ओळखत, म्हणाले- 'वाचताना चालण्यास फार त्रास होतो म्हणून कृपा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

करून माझ्या दोन्ही पायांना दोन डोळे द्या. मला दुसरे काही नको.

स्वाध्यायवेड्याचे एक अलीकडच्या काळातले उदाहरण जयपुरात आहे. विद्याभूषण पं. हरिनारायणजी पुरोहित यांना नवीनवी पुस्तके मिळवण्याचा व ती वाचण्याचा मोठाच छंद होता. एक दिवस ते बाजारपेठेतून जात होते. फूटपाथवर कोण्या एका पुस्तक विक्रेत्यासमोर काही उत्तम पुस्तके त्यांना दिसली. त्या वेळी त्या पुस्तकांची किंमत चुकवता येईल, एवढे पैसे त्यांच्याकडे नव्हते आणि घरी जाऊन पैसे घेऊन यावे म्हटले तर ती पुस्तके तोपर्यंत कोणालाही विकली गेली असती. म्हणून त्यांनी अंगातला सदरा काढला, तो विक्रेत्याकडे गहाण ठेवला व पुस्तके घरी घेऊन आले. खरेच, त्यांची 'विद्याभूषण' ही पदवी किती सार्थ होती!

भारतात स्वाध्यायाला खूप महत्त्व आहे. परंतु, आश्चर्याची गोष्ट अशीही आहे की, इथलेच लोक रोजचा पेपर/वृत्तपत्रही दुसऱ्याला मागून घेऊन वाचतात. तसे पाहिले तर पेपर वाचतावाचता ते एकदोन उंची सिगारेट ओढतील. परंतु, वृत्तपत्रासाठी पैसा खर्च करणे म्हणजे ते पैशांचा अपव्यय समजतात. परदेशात बव्हतांश व्यक्तींची स्वत:ची वाचनालये असतात आणि दर महिन्याच्या आपल्या उत्पन्नाचा काही भाग ते नवी पुस्तके खरेदी करण्यासाठी उपयोगात आणतात. आपल्या देशातले लोक एकतर वाचत नाहीत किंवा मग वाचत असले तर कोणत्यातरी कमी शुल्क असलेल्या वाचनालयाचे सदस्य होऊन वाचतात. कादंबरीसारखी 'टाइमपास' पुस्तके ते वाचतात. त्यांना कोणतेही महत्त्व नसते. असे वाचणे म्हणजे स्वाध्याय नव्हे.

'अज्झयणमेव झाणं' असे म्हणणाऱ्या आचार्य कुंदकुंदांसमोर स्वाध्यायाच्या उच्च सत्तेचा आदर्श होता. अध्ययन हेच ध्यान आहे. तीच अलौकिक स्थापना आहे. ध्यान तन्मयतेचा (आत्मस्वरूप स्थितीचा) वाचक आहे. कादंबरी वाचताना ध्यानाची किंवा तन्मयतेची प्राप्ती होत नाही. काही लोक त्या मताचे असले तरी ते सिद्ध होत नाही. कारण, तिथे केवळ कादंबरी वगैरेंतील पात्रांसंबंधीचा राग-तन्मयता तर आहे; पण आत्म-तन्मयता नसते. रागाविषयीच्या तन्मयतेने पतन होते आणि आत्मतन्मयतेने कल्याणाची आत्म्याची एकरूपता लाभते. लौकिक साहित्य वाचणाऱ्यांचे मन त्यात्या कादंबरीतील पात्रांविषयीच्या राग-भावात गुंतत जाते आणि त्या एका विशिष्ट दृष्टीनेच तो वाचत जातो; तर अध्यात्मनिष्ठ स्वाध्यायी आपल्या मनाला अत्यंत वाचनीय, आवश्यक असे ज्ञान असलेले साधनभूत शास्त्रग्रंथ वाचायला देतो. काय वाचावे, त्या साहित्याची निवड एकाचे मन करते, तर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दुसरा आपल्या मनाच्या विभाव-परिणतीला दूर घालवण्यासाठी अध्यात्म-साहित्याचे नियोजन करतो. हाच महत्त्वपूर्ण फरक स्वाध्याय आणि सामान्य वाचन यात आहे.

आचार्य कुंदकुंदांच्या मते उच्च आत्मज्ञानविषयक साहित्याचे वाचन म्हणजेच स्वाध्याय आहे. जगात जेवढे म्हणून श्रेष्ठ वक्ते, विचारवंत, लेखक किंवा उपदेशक होऊन गेले, त्यांच्या शिरोभागी पुस्तकेच पुस्तके असत.

सर्वतोमुखी, चौफेर ज्ञानाचा गुणमय कापूस त्यांनी डोळ्यांच्या टकळीवर ठेवून कातला. म्हणजे स्वाध्याय करतेवेळी सूक्ष्म व स्थिर दृष्टी ठेवली. अत्यंत एकाग्र होऊन त्याचे धागे/सूत काढले. त्या धाग्यांचे गुणमय गुच्छ बनवून अंत:करणात ठेवले आणि त्याला खजिन्याचे रूप दिले, ते समृद्ध केले. लेखनाचे अस्खलित सामर्थ्य प्राप्त करणारे रात्रंदिवस श्रेष्ठ साहित्याच्या स्वाध्यायात एकाग्रचित्त असतात. मोठमोठे संशोधक आणि दार्शनिक तहानभूक विसरून स्वाध्यायमग्न असतात. स्वाध्याय केल्याने ज्ञान सूर्याप्रमाणे तेज:पुंज होते. त्या ज्ञानाच्या आविष्कारकिरणांनी दशदिशा उजळून निघतात. स्वामी रामतीर्थ यांना जपानमध्ये शून्यावर(०) व्याख्यान द्यावे लागले. जेव्हा, ते सभास्थानी पोहोचले तेव्हा त्यांना हतप्रभ करण्यासाठी, त्यांचे अवमूल्यन करण्यासाठी संयोजकांनी फळ्यावर 'शून्य' असे लिहिले. परंतु, या भारतीय संन्याशाने अकिंचन वाटणाऱ्या त्या 'शून्य' विषयावर खूप वेळपर्यंत अत्यंत सारगर्भित असे भाषण केले की, श्रोते मंत्रमुग्ध तर झालेच. परंतु, रामतीर्थांच्या ज्ञानाची त्यांनी भरभरून प्रशंसा केली.

हा चमत्कार एका दिवसात घडत नाही. सतत स्वाध्याय हीच त्या ज्ञानाची किल्ली आहे. बहुज्ञ होणे, ज्ञानबाहुल्य असणे, हे अनेक वर्षांपासून मिळवलेल्या स्वाध्याय-संपत्तीचे सूचक आहे. गोस्वामी तुलसीदास म्हणतात की, जसे कामांध माणसाला स्त्री हवीशी वाटते, लोभी व्यक्तीला पैसा प्रिय वाटतो; तसे मला भगवंतांच्या चरणाची भक्ती प्रिय वाटू दे. खऱ्या स्वाध्यायासाठी आपणही असेच म्हणून शकतो. ज्याला स्वाध्याय केल्याशिवाय क्षणभरही चैन पडत नाही; तोच स्वाध्यायाच्या अमूल्य श्रीमंतीचा मालक असतो. प्राचीन काळी गरिबी असूनही लोक स्वाध्याय करीत होते. इकडूनतिकडून वाळलेले गवत, काड्या, गायीने अर्धवट खाऊन टाकलेले कडब्याचे तुकडे गोळा करून, ते सर्व एकत्रित करून ते आग पेटवत आणि त्या प्रकाशात पुस्तकातली सूत्रे, वचने पाठ करीत. आज प्रखर विजेचे दिवे उपलब्ध आहेत; पण तन्मयतेने वाचणारे मात्र सापडत नाहीत.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

'स्वाध्यायान् मा प्रमद' हा भारतीयांना शिकवला जाणारा पहिला धडा होता. धार्मिक स्वाध्याय केल्याशिवाय अन्नपाणी न घेणारे आजही आहेत. स्वाध्याय हा काही ऐच्छिक विषय नव्हता. ती तर दैनिक क्रियांमधली एक आवश्यक क्रिया होती. कुशाग्र बुद्धीचे लोक स्वाध्यायाचे ऋणी आहेत. स्वाध्याय हा अज्ञानरूपी हत्तीवरचा अंकुश आहे. पावित्र्याच्या नगरीत प्रवेश मिळवण्यासाठीचा तो राजमार्ग आहे. स्वाध्याय न करणारे आपल्या योग्यतेचे ढोल वाजवतात; परंतु खरे स्वाध्यायपरायण मात्र स्वाध्यायाला गुप्त धन समजून आत्म्याच्या कल्याणासाठी त्याचा उपयोग करतात. त्यांच्या मौन व्यक्तित्वावर स्वाध्यायाच्या अक्षय वरदानाचे हास्य विलसत असते. जेव्हा ते बोलू लागतात तेव्हा साक्षात सरस्वतीच त्यांच्या जिभेवर एखाद्या नर्तिकेप्रमाणे नाचू लागते. स्वाध्यायाच्या शुभाक्षरांचे प्रतिबिंब त्यांच्या डोळ्यांमध्ये दिसत असते. ज्ञानाच्या निर्मळ धारेखाली स्नान केलेल्या त्यांच्या वाङ्माधुरीने पवित्र होण्यासाठी सारस्वतांचे प्रवाह नेहमीच इच्छुक असतात. महान तत्त्ववेत्ते, यशस्वी राजकारणी किंवा उत्तम संत एखाद्या स्वाध्याय विद्यालयाचे विद्यार्थीच असू शकतात. स्वाध्याय एकान्तातील मित्र आहे. सभास्थानी सहायक आहे आणि विद्वानांच्या समूहात उच्चस्थान प्राप्त करून देणारा आहे. बिंदूबिंदूने विचारदोहन करणारा कालांतराने पंडित बनतो. शब्दांचे अर्थ शब्दकोशात नव्हे तर साहित्याच्या प्रयोगशाळेत लिहिलेले असतात. निरंतर स्वाध्याय करीत राहणारा शब्दांचे सर्व प्रकारचे अर्थ जाणतो. ते ज्ञान प्राप्त करून घेतो. राष्ट्रीय चरित्राच्या उत्थानासाठीसुद्धा उत्तम साहित्याची निर्मिती आणि स्वाध्यायशीलतेची गरज आहे. उत्तम साहित्याचा स्वाध्याय केल्याशिवाय नेतृत्वशक्ती प्राप्त होत नाही. उथळ तलावात हत्तीला अंघोळ घालण्याची जशी क्षमता नसते, तशी अध्ययन-चिंतन याकडे प्रवृत्ती नसणाऱ्याजवळही मोठ्या जबाबदाऱ्या सांभाळण्याची/पार पाडण्याची क्षमता नसते.

साहित्यामुळेच मानव आपल्या जीवनाला, इतिहासाला गौरव प्राप्त करून देतो आणि स्वाध्यायानेच तो कोणतेतरी विशिष्ट स्थानही मिळवतो. ज्या व्यक्ती ताड आणि खजुराच्या झाडासारखे उंचउंच वाढण्यातच स्वतःला धन्य समजतात; उंच आकाशाच्या उंचीपर्यंत जाण्यासाठी एकट्याच ऊन सहन करतात. पण, जे सावली आणि फळे देणाऱ्या महावृक्षांप्रमाणे अनेक जीवांचे आश्रयस्थान असतात; त्या जीवांचे श्रम-क्लेश दूर करण्यासाठी आपल्या फांद्यांचा उपयोग करतात. वास्तविक रीतीने त्यांचेच जीवन सफल आहे. नीतिकारांनी निरर्थक जगणारांसाठी उपहासाने म्हटले आहे- कावळासुद्धा दीर्घकाळ जिवंत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राहतो आणि पिंड भक्षण करतो. परंतु, केवळ बलिभक्षणासाठीच दीर्घकाळ जिवंत राहण्याचे वरदान प्राप्त झालेल्यांचे जीवन स्वत:चेही कल्याण करीत नाही आणि परहितही साधत नाही. अशा निरुपयोगी जीवनापेक्षा तर मृत्यूच श्रेयस्कर आहे.

लोहाराच्या भात्याप्रमाणे निखारे फुलवणे व राख उडवणे, यासाठीच जर श्वास घेत राहायचे असेल तर ते काय जीवन आहे? जीवन एक ना एक दिवस नक्कीच संपणार आहे. जो दिवा जळत आहे, तो कधीतरी विझणारच. परंतु, विझण्यापूर्वी जर तो रात्रीच्या अंधारात चालणाऱ्यांना वाट दाखवू शकला तर त्याच्या जळण्याचे सार्थक झाले, असेच म्हणायचे. तो नुसताच जळला, कोणाच्या उपयोगी पडला नाही; तर त्या दिव्याची स्थिती शोचनीयच आहे.

आकाशात एकएक मेघ जीवन (पाणी) घेऊन येतो आणि शुष्क व तहानलेली सृष्टी त्याच्याकडे मोठ्या आशेने पाहत असते. मेघ स्वत:ला नष्ट करतो पण सृष्टीचे सुकलेले, रुक्ष अंगण हिरवेगार, सुपीक करून टाकतो. हीच तर जीवनाची सार्थकता आहे. मृत्यू रोग, भीती हे तीन चोर जीवनाचा पाठलाग करीत असतात. जो बेसावधपणे झोपतो, तो लुटला जातो. परंतु, जो सावध राहून आपल्या पदरातली रत्ने सांभाळतो; तो कुणाला फसवत नाही. स्वाध्याय करीत राहिल्याने जीवन जगण्याची कला त्याला अवगत झालेली असते. अन्यथा, एखाद्या अनोळखी प्रवाशाप्रमाणे देहाच्या धर्मशाळेत जीवन काही काळ राहते आणि मुदत संपली की, निघून जाते. त्या प्रवाशाची ओळख करून घेणे आवश्यक आहे. आपल्या आध्यात्मिक गुरुजनांचा दिव्य संदेश स्वाध्यायाच्या रवीने घुसळून ते नवनीत/ लोणी जो चाखतो; त्यालाच जीवनाची खरी ओळख पटते. जीवनाच्या अमरतेचा स्वाद फक्त त्यालाच कळतो.

“सुई जहा ससुत्ता ण णस्सदि सा पुणो वि णट्ठावि ।
एवं ससुत्तपुरिसो ण वि णस्सदि सो पमादेणं ।।

- आचार्य कुंदकुंद

(दोऱ्यासह 'सुई' हरवली, कचऱ्यात कुठेतरी पडली तरीसुद्धा ती सापडतेच. त्याचप्रमाणे, आगम स्वाध्यायाच्या सूत्रात गुंतलेला स्वाध्यायशील पुरुष या अनंत संसाराच्या प्रमादांमुळे नष्टभ्रष्ट होत नाही. तो स्वत:ला सावरू शकतो, सांभाळू शकतो.)

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शब्द आणि भाषा

शब्दाचा अर्थ ध्वनी असा आहे आणि या व्युत्पत्तीनुसार शब्द ध्वन्यात्मक आहे. या ध्वनीला आपल्या व्यावहारिक स्थैर्यासाठी मानवाने आकृतीबद्ध केले आहे; म्हणून शब्द वर्णात्मक आहेत. याची व्याख्या करीत तर्कशास्त्रींनी लिहिले आहे- 'शब्दो द्विविध: । ध्वन्यात्मको वर्णात्मकश्च । तत्र ध्वन्यात्मको भेर्यादौ, वर्णात्मकश्च संस्कृत भाषादिरूप:'- खरे पाहता ध्वनी म्हणजे शब्दांचा स्फोट आहे आणि वर्ण त्याची आकृतीपर रचना आहे. मनुष्यजातीत व्यवहार एकमेकांशी बोलून व लिहून होतो. तो आपल्या विचारांना लिहून काढून स्थैर्य देऊ इच्छितो.

एक काळ होता की, तेव्हा प्रतिपादन केलेले किंवा चिंतन केलेले भाव कधीतरी विस्मृतीत जायचे. याच विचारातून लेखनप्रक्रियेचा आरंभ झाला. या लेखनप्रणालीमुळे जगाच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या माणसाला त्याचा संदेश खूप दूर असलेल्या ठिकाणीही पोहोचवता येऊ लागला. म्हणून म्हटले जाते की, लिपीबद्ध भाषेचा जर विकास झाला नसता तर, मनुष्य परस्पर संवाद तर साधू शकला असता; पण आपल्या विचारांना स्थिरता मात्र देऊ शकला नसता. अशा या महत्त्वपूर्ण शब्द-स्थैर्यकरण प्रक्रियेस जेव्हा लिखित रूप मिळाले, लिपीशक्ती प्राप्त झाली; तो दिवस अखिल मानवजातीसाठी सोन्याचा दिवस ठरला, यात शंकाच नाही.

आता मनुष्य आपल्या विचारांचे संकलन करू शकत होता, आपल्या वाणीला स्थैर्य देऊ शकत होता आणि दूरच्या, जवळच्या प्रदेशापर्यंत आपला आवाज पोहोचवू शकत होता. लिपीरचनेनंतर मग सिद्धान्त-वाक्यांचे विस्मरण होण्याची भीती उरली नाही. पण, पुढे झाले काय की, मौखिक भाषा व लिखित भाषा यांच्यात परस्पर प्रतिष्ठेच्या मुद्यावरून वाद उत्पन्न झाला. लिपीरचनेच्या आधीच्या काळात 'उक्ती'ला महत्त्व होते,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रतिष्ठा होती. महान उपदेशक, आचार्य यांच्या विचारांना उदाहरणाच्या रूपाने मांडताना **'उक्तम्'** म्हणजे हे अमक्याने म्हटले आहे- असे म्हणून आपल्या भाषणाचे समर्थन केले जायचे. परंतु, लिहिण्याची शक्ती प्राप्त झाली आणि मौखिकाचे महत्त्वच जवळजवळ नष्ट झाले. जिभेची प्रतिष्ठा हातांना प्राप्त झाली. हातांनी लिहिलेले प्रामाणिक मानले जाऊ लागले आणि तोंडाने म्हटलेले लिपीबद्ध रूपात प्रत्यक्ष डोळ्यांसमोर नसल्याने अविश्वसनीय मानले जाऊ लागले.

जैन मताप्रमाणे भगवान आदिनाथांनी आपल्या ब्राह्मी व सुंदरी नावाच्या दोन कन्यांना अनुक्रमे वर्ण आणि अंक यांचे ज्ञान दिले. म्हणून, भारतीय लिपी आणि भाषा यांना ब्राह्मी व भारती असे म्हटले जाते. वैदिक मतानुसार ब्रह्माने चिंतन केले- 'एकोऽहं बहुस्याम्' मी एक आहे आणि अनेक होईन'- याच इच्छाशक्तीने पहिल्यांदा शब्दरूपात जन्म घेतला. अशी ती ब्रह्मभाषित असल्याकारणाने तिला ब्राह्मी म्हटले गेले.

भाषाशास्त्रज्ञांचे मत असे आहे की, प्राथमिक अवस्थेत मनुष्य लहानलहान सामान्य ध्वनींच्या मदतीने आपले काम चालवून घ्यायचा. उदा. कोणाला हांक मारायची असेल, आवाहन करायचे असेल तर 'ए', 'ओ' म्हणायचा. पाणी प्यायचे झाले तर तो 'क' म्हणायचा. आकाशाचा निर्देश करायचा झाला तर 'ख' म्हणत असे. आश्चर्य व्यक्त करण्यासाठी 'ई', 'उ' हे ध्वनी त्याला पुरेसे वाटत. अशा प्रकारे कमीतकमी लहान वर्णध्वनींच्या द्वारे तो अभिव्यक्तीच्या मार्गावर वाटचाल करीत पुढे जात राहिला. हे एकाक्षरी शब्द आजही संस्कृत भाषेत मूळ अर्थासह सुरक्षित आहेत. त्या प्राचीन काळातला 'ए-ओ' अयि आणि अये बनला आहे. याच तऱ्हेने 'च', 'न', 'ह', 'ल' इत्यादी एकाक्षरांच्या बाबतीत सांगता येईल. कालांतराने शब्द एकाक्षरीचे द्विअक्षरी, तीनअक्षरी व बहुअक्षरी बनला. तेव्हा मिश्र, यौगिक इत्यादी अनेक ध्वनींचा विकास झाला.

आज माणसाकडे अभिव्यक्तीला मूर्त रूप देणाऱ्या कितीतरी भाषा आहेत. वरवर वेगळ्या दिसून येणाऱ्या भाषांची उत्पत्ती-स्थाने जास्तकरून मनुष्य-परिवाराच्या सान्निध्याची, सोबतीची सूचना देतात. भाषाभाषांतील हे साम्य त्यांच्या आंतरिक जीवनाशी संबंधित आहे. दिवस, वार, पंधरवडा, महिना, वर्ष, संख्या आणि असेच इतर प्रकारचे साम्य जगभर आढळून येते. सगळीकडेच वर्षगणनेच्या दिवसांत, महिन्यातील दिवसांच्या संख्येत, अंकांच्या शतक परंपरेत एखाद्या अत्यंत प्राचीन काळच्या एकानुबंधाचा संकेत आहे. हा जो अनुबंध आहे, हा सुरुवातीला कोणत्या भाषेचा ऋणी आहे, हे निश्चितपणे सांगता

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

येणार नाही. तरीपण, आधुनिक 'भाषाविज्ञाना'च्या विद्वान पंडितांनी असे स्वीकृत केले आहे की, 'ऋग्वेद' हा सर्वात प्राचीन उपलब्ध ग्रंथ आहे आणि त्याचीच भाषा प्राचीनतम आहे.

भाषाशास्त्रज्ञांचे असेही मत आहे की, पूर्वी कधीतरी संपूर्ण मानवजात एकच भाषा बोलणारी होती. ती आपल्या विविध कौटुंबिक चालीरीतींसह या पृथ्वीवर पसरत गेली. त्यांची ती मूळ भाषा त्यांच्याबरोबर संपूर्ण जगभर पसरत गेली आणि बराच काळ लोटल्यानंतर त्यात्या कुटुंबाच्या देश, काल संस्कार आणि परिस्थितींना स्वीकारत ती मूळ भाषा बदलत गेली. जसे आजचे भूगर्भतज्ज्ञ पृथ्वीच्या अंतर्भागाचे उत्खनन करीत आहेत, यातून प्राप्त होणाऱ्या वस्तूंवरून प्राचीन इतिहासाचा शोध घेत आहेत आणि खंडित झालेल्या ऐतिहासिक, सामाजिक आणि सांस्कृतिक परंपरांना पुन्हा जोडत आहेत तसेच भाषाशास्त्रज्ञही बनणाऱ्या, बदलणाऱ्या, क्षय होणाऱ्या, अपभ्रंश होणाऱ्या, विस्तारणाऱ्या शब्दांच्या मूळ आकृतींना जाणून घेण्यासाठी प्रयत्नशील आहेत. त्यांना त्या कामात यशही मिळाले आहे.

प्राकृत, पाली, अपभ्रंश, मागधी, अर्धमागधी, हिंदी, मराठी, गुजराती, राजस्थानी इत्यादी ज्या भारतातल्या प्रादेशिक भाषा आहेत; त्यामध्ये संस्कृत भाषेतील तद्भव रूपाची विपुलता आढळते आणि विदेशी भाषांमध्येही संस्कृतातील हजारोहजारो शब्द आढळून येतात. संस्कृत भाषेच्या व्याकरणानुसारच त्यांचेही व्याकरण चालते. जरी त्यात्या परदेशी भाषांचे साहित्य त्यांच्यात्यांच्या स्वतंत्र, मौलिक विचारांसह लिहिले गेले असले तरी त्यातील शब्द-विधान संस्कृतचे ऋणी आहे. मूळ प्रकृती-ठेवण आणि प्रत्यय यांच्या शैलीने संस्कृत भाषेला नवनिर्मितीची जी प्रचंड क्षमता प्रदान केली आहे, ती केवळ अद्भुत आहे. शब्दनिर्मितीची साभिप्राय प्रक्रिया संस्कृत व्याकरणात आढळून येते. स्पष्टच आहे की, भारतीय आणि भारतीयांपेक्षा इतर भाषांना संस्कृतीने पुरेसा जीवनरस पुरवला आहे. आज राष्ट्रभाषा म्हणून हिंदीला सन्मान मिळाला आहे. तीसुद्धा संस्कृतच्या आधारे इतर विश्व भाषांच्या तुलनेने पाहता स्वतःला सर्वाधिक संपन्न करू शकते.

संस्कृत भाषेची जी शब्दनिर्माणशक्ती आहे, तिची एक झलक पाहू या!

शब्द निर्माण करतांना त्यात्या निर्मात्यांचे लक्ष वस्तूचे गुण, स्वाद/चव, आकार, स्वभाव, वंश, स्थान, निसर्ग या अनेकविध घटकांकडे वेधले गेले होते आणि मग त्यांनी जी शब्दरचना केली; ती वस्तुविज्ञानाच्या इतिहासाच्या दृष्टीने आजही अपूर्वच आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्राचीन शब्दनिर्मात्यांच्या संशोधनबुद्धीचाही परिचय त्याद्वारे होतो. गुणाच्या आधारे 'धात्री' हा शब्द निर्माण झाला आहे. आवळ्याला धात्री म्हणतात. धात्रीचा दुसरा अर्थ आहे धाय (उपमातादाई). आई नसेल तर जी त्या तान्ह्या बाळाला स्वत:चे दूध पाजून जीवन-दान देते; तिला धात्री म्हणतात. आवळा मातेच्या दुधाचाच विकल्प आहे. तेवढाच जीवनदाता, शक्ती देणारा आणि पोषक आहे. या सगळ्या गुणांचा समुच्चय आवळ्यात असलेला पाहून आयुर्वेदाचार्यांनी आवळ्याला 'धात्री' म्हटलेले आहे. चविष्ट पदार्थांमध्ये 'मधुयष्टी' (दालचिनी किंवा कलमी) प्रसिद्ध आहे. मधुयष्टी म्हणजे गोड लाकूड! दालचिनी या नावाने सगळे त्याला ओळखतात. मंडुकपर्णी आणि कृष्णाक्षी यांना अनुक्रमे मंजिष्ठा व गुंजा म्हणतात. या शब्दांच्या निर्मितीमागे आकाराचा आधार आहे. बेडका (मंडुक) सारखी पाने असणारी ही मंडुकपर्णी आणि काळा डोळा असणारी ती कृष्णाक्षी! स्वभावाच्या निरूपणासाठी वापरल्या जाणाऱ्या शब्दांत 'चंदन' हे नाव येऊ शकते. चंदन शब्दाचा अर्थ आहे आल्हाद देणारा! चंद्र, कापूर आणि चंदन वृक्षाच्या संदर्भात याचा वापर होतो. चन्दनं शीतलम् लोके' अशी म्हणसुद्धा आहे. ती चंदनाचा शीतल स्वभाव सांगते. वंशाचा परिचय करून देणाऱ्या शब्दात 'राघव' शब्द येतो. 'राघव' म्हणजे रघुकुलात उत्पन्न श्रीरामचंद्र होय. स्थान किंवा क्षेत्राचा अर्थबोध करून देणाऱ्या शब्दांमध्ये कमळ या अर्थी 'नीरज' शब्दाचा विचार होऊ शकतो. निसर्गासंबंधी शब्द आहे 'पुनर्भू'! नखे आणि केस हे 'पुनर्भू'चे प्रतिपादन करतात. त्याचा शाब्दिक अर्थ आहे पुन:पुन्हा उत्पन्न होणारा! नखे कापली तरी पुन:पुन्हा उगवतातच. म्हणून, त्यांना 'पुनर्भू' म्हटले आहे. अशा प्रकारे विविध दृष्टीने शब्दांची रचनाप्रक्रिया तयार केली गेली. कुटुंबातील एकच व्यक्ती अपेक्षाभेदाने वडील, मुलगा असू शकते. त्याच प्रकारे शब्दसुद्धा आपल्या गुण-स्वभाव-प्रकृतीप्रमाणे उत्पन्न होतात. चंद्राचे किरण शीतल असल्याने शीतरश्मी असे त्यास म्हटले जाते. त्याच्या बिंबात डाग दिसतात म्हणून त्याची नावे 'कलंकी' व 'शशलक्ष्मा' आहेत. तो कधी क्षीण तर कधी पूर्ण होतो म्हणून 'क्षयी' असेही म्हणतात. चंद्राच्या उदयाने कुमुद फुलतात म्हणून त्याला कुमुदबांधवही नाव आहे.

अशाच प्रकारे भगवान महावीरांचीही वर्धमान, सन्मती, अतिवीर आणि वीर अशी नामरचना झाली आहे. शब्दरचनांच्या अनंत शक्यतांनी संस्कृत साहित्य भरलेले आहे. शब्दांच्या मुळाशी जाणारा हा परिचय केवळ दिशादर्शक आहे. तसेच शब्दरचनेच्या बाबतीत ज्यांना जिज्ञासा आहे; त्यांना प्रेरणा देणारा असा आहे. अन्यथा, यावर तर एक

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पुस्तक लिहिले जाऊ शकते. शब्दांच्या रहस्यमय रचनाकौशल्यासंबंधीचे अधिक कुतूहल व्याकरण व भाषाशास्त्राच्या मदतीने पूर्ण होऊ शकते.

भाषेने माणसाच्या अनेक समस्यांचे निराकरण केलेले आहे. भौतिक व आध्यात्मिक जगात भाषेच्या राजमार्गांनी क्षितिज गाठले आहे. भाषेच्या रथावर आरूढ होऊन भाव यात्रा करतात. भावनांचे अलंकार लेवून भाषा महासम्राज्ञीची प्रतिष्ठा धारण करते. भावांशिवाय भाषा विधवा आहे आणि भाषेविना भाव अमूर्त आहेत. त्यांचे परस्पर साहचर्य आहे. भावनांशिवाय भाषा पुढे जाणारच नाही. शेवटी, ती एखाद्या रिकाम्या गाडीसारखी आहे. यात्री तर भाव आहेत, ज्यांना घेऊन शब्दांची गाडी चालत राहते.

या विचारधारेप्रमाणे भाषांबरोबर समन्वय व समता भाव ठेवणाऱ्यांमध्ये श्रमण मुनी आणि जैन परंपरा विशेष आग्रही राहिली आहे. तहानलेली व्यक्ती दूरपर्यंत संपूर्ण भरलेल्या जलाशयाकडे, त्याच्या पाण्याच्या विस्ताराकडे नाही बघत. तर ती आपल्या ओंजळीत येणाऱ्या तेवढ्याच पाण्याने तहान भागवण्याकडेच लक्ष देते. त्याच प्रकारे त्यांनी भाषांमधील भावग्रहणाला माध्यम फक्त मानले. त्या भाषा संस्कृत आहेत की प्राकृत की अपभ्रंश, अशा जातींकडे त्यांनी लक्ष दिले नाही. लोकांमध्ये धर्मप्रभावना करणे, हाच त्यांचा उद्देश होता. त्यामुळेच लोकांना जी भाषा कळते, त्याच भाषेतून त्यांनी आपले धार्मिक भाव व्यक्त केले. मग, कधी ते संस्कृतच्या रत्नांकित पालखीत बसले, तर कधी प्राकृतच्या मंचावर! कधी धर्मप्रभावनेद्वारे त्यांनी अपभ्रंश भाषेची गल्ली धन्य केली; तर कधी प्रांतभाषांना समृद्ध केले.

याचे पुरावेच हवे असतील तर जैन साहित्याच्या जाणकारांनी दूरदृष्टी ठेवून इच्छुक लोकांसाठी तामिळमध्ये लिहिलेले जीवंधर चरित्र, कन्नड भाषेत पम्प कवीने लिहिलेले आदिपुराण, अपभ्रंशामध्ये लिखित स्वयंभू महाकवीचा पउमचरिउ, प्राकृतातील धवला, जयधवला व गोमटसार, मराठी कवी जनार्दनांचे श्रेणिकपुराण आणि इतर विविध भाषांमधील ग्रंथांचा अभ्यास केला पाहिजे. जैन श्रमण परंपरेने भारताच्या प्रांतीय भाषा आणि प्राचीन धार्मिक भाषा यांच्या समत्वयोगाने त्यांचा विकासच केला आहे. हा दृष्टिकोन असाधारण आहे आणि लोकांच्या भावनेचा सन्मान करणारा आहे. खरे पाहता ज्यांच्या धार्मिकतापूर्ण विश्वासावर भगवान महावीरांच्या सर्वोदय तीर्थाची संरक्षण व संवर्धन करण्याची जबाबदारी आहे; त्यांनी तर विविध भाषांची ओळख करून घेतलीच पाहिजे. त्यांना कुठल्याच भाषेबद्दल राग नाही, आग्रह नाही, हेच त्यांच्या वीतरागतेचे प्रमाण आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अनेक भाषा जाणण्याचा एक फायदा आणखी आहे की, त्यामुळे धर्मोपदेशक आपले विचार अनेकांपर्यंत पोहोचवू शकतो आणि अनेकांच्या मनातले विचार समजून-जाणून घेऊ शकतो. नित्य विहार करणाऱ्या मुनींसाठी तर ही बहुज्ञता अजूनच महत्त्वाची आहे.

प्रत्येक देशात वेगवेगळ्या भाषा आहेत. जो ज्या देशात राहतो; त्याच देशाची भाषा बोलतो, हे स्वाभाविक आहे. भाषेमध्ये आपापल्या संस्कृतीचा इतिहास अंकित झालेला असतो. आत्मीयतेची-आपलेपणाची सूत्रेही अंतर्भूत असतात. स्वत:च्या मातृभाषेविषयी आग्रह धरणे ही एक सहज गोष्ट आहे. पण, तो आग्रह वैर, कलह, वैमनस्य यामध्ये परिवर्तित होणारा हट्टाग्रह, दुरभिमान नसावा. जगातल्या समस्त मानवाचा व्यवहार भाषेच्या साहाय्यानेच होतो. ती व्यवहाराचे साधन फक्त आहे, साध्य नाही. जर एखादा कोणी तिला साध्य बनवून स्वत: साधन बनत असेल तर तो कलहाचा प्रारंभ ठरेल. एखाद्याला रेल्वेगाडी (बाष्पयान) पसंत असते; तर एखादा प्रवासासाठी विमान (वायुयान) निवडतो. दोघेही आपापल्या आवडीच्या वाहनातून प्रवास करतात. पोहोचायचे तिथे, त्या ठिकाणी पोहोचले की, दोन्ही वाहने सोडून देतात, विसरतातही. हेच भाषेच्या बाबतीत व्हायला पाहिजे.

भावना व्यक्त करून झाल्यावर भाषांची गरज संपुष्टात येते. म्हणून, भाषा या साधन आहेत आणि व्यक्ती त्यांचा उपयोग करून घेणारी आहे. वाहनावर स्वार झालेली व्यक्ती आपल्या गंतव्य स्थानापर्यंत पोहोचते. पण, जो वाहनालाच आपल्या डोक्यावर घेऊन चालतो; तो वाहनाच्या ओझ्यामुळे अर्ध्या वाटेतच थकून बसून जातो. एवढे सगळे असूनही भाषा हे राष्ट्रासाठी एक यशस्वी माध्यम आहे. भाषेच्या मदतीनेच राष्ट्र विस्तार करू शकते. एकच/समान भाषा बोलणाऱ्यांच्या मनात दुसऱ्या समान भाषिकाविषयी प्रेमभाव तर निर्माण होतोच, शिवाय व्यवहारही सोपा होतो. म्हणूनच, राष्ट्रीय पातळीवरून कोणती तरी एक भाषा ठरवणे, हे आवश्यक आहे. ही भाषा जास्तीतजास्त लोकांकडून बोलली जाणारी भाषा असावी. तिच्याद्वारे राष्ट्राच्या पूर्व-पश्चिम, उत्तर-दक्षिण प्रांतांतील लोक परस्परांच्या निकट येतील. एक सशक्त राष्ट्रभाषा असल्याशिवाय केंद्राचा राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय व्यवहार विकसित होऊ शकणार नाही. परदेशामध्ये राष्ट्रीय भाषेला एखाद्या विदेशी किंवा प्रादेशिक भाषेद्वारे सन्मानित केले जाऊ शकत नाही. 'संगच्छध्वं, संवदध्वम्, सं वो मनांसि'- या प्राचीन राष्ट्रीय सूक्तामध्ये बरोबर चालण्यास, बरोबर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बोलण्यास व त्याच बरोबरीने मानसिक समताभाव ठेवण्यास सांगितले आहे. राष्ट्रांच्या सहअस्तित्वासाठी तो अत्यंत उपयोगी आहे. स्वतःच्या वाकड्या चालण्याने, वक्रगतीने राष्ट्रीय राजमार्गाला विकृत करू नये. साधारणतः राष्ट्रभक्तीचा परिचय व्यक्तीच्या भाषेवरूनही होतो.

भाषा लोकव्यवहारात वापरली गेली की, तिचे परिमार्जनही व तिचा विकासही होतो. भाषेची समृद्धी ही तिचा वापर करणाऱ्यांवर अवलंबून असते. भाषेचा उपयोग करणारे ज्या क्षेत्रात प्रगतिशील असतील; त्या क्षेत्राच्या संदर्भात भाषा आणि तिच्यातील शब्दभांडार हे जास्त सभ्य व अधिकारसंपन्न अभिव्यक्तीने परिपूर्ण असेल. समाजजीवनात प्रविष्ट झाल्यावरच शब्द विविध रूपे धारण करतात. कधी ते शीर्षासन (उलट अर्थ) करायला लागतात व कालांतराने तसेच राहतात; तर कधी गव्हाबरोबर मिसळलेल्या यवा/ जवाप्रमाणे ते दुसऱ्या अर्थाचे होऊन जातात. मूळ अर्थ लोप पावतो. व्याकरणकारांनासुद्धा शब्दांचे हे परिवर्तित, विकृत किंवा वेगळ्याच अर्थात परिणत झालेले रूप फार आवडते. लोकव्यवहारातील असे शब्द ते शोध-शोधतात. त्यावर आपल्या मान्यतेची मोहर उमटवतात.

उदाहरणार्थ 'सिंह' शब्द हा 'हिंस' पासून बनला आहे. तो हिंसा करून आता जगतो. पण त्याआधी मात्र त्याला 'हिंस' असे म्हणत असतील. कालांतराने वर्णांची अदलाबदल (वर्णविपर्यय) झाला आणि हिंस शब्द सिंह असा उलटा झाला. 'देवानां प्रिय'चा अर्थ आहे 'देवांचा आवडता'! प्रियदर्शी सम्राट अशोकाला 'देवांना प्रिय' म्हणत असत. पण, काही काळानंतर मात्र त्याचा अर्थ 'मूर्ख' असा घेतला जाऊ लागला. शक्यता आहे की, अशोकाने बौद्ध धर्म स्वीकारल्यामुळे त्याच्या प्रशंसेचे रूपांतर निंदेत केले गेले असावे. पाणिनी व्याकरणाच्या 'षष्ठ्या चानादरे' सूत्राचे उदाहरण देताना 'देवानां प्रिय' इति च मूर्खे असे म्हटले आहे. खरे पाहता, देव आणि प्रिय या दोन्ही शब्दांचा अर्थ मूर्ख असा होत नाही.

तुलसीदासजी आपल्या एका दोह्यात लिहितात- 'रामचरण छहतीन रहु दुनियासे छत्तीस'- म्हणजे रामाची भक्ती करतेवेळी सहा आणि तीन अंकांसारखे राहा- ६३- त्रेसष्ठ रूप हे परस्पराला उन्मुख आहे. म्हणून, असा अर्थ घेतला जातो की, रामचरणाभिमुख राहा आणि संसारापासून ३६, म्हणजे तीन आणि सहा आकड्यांप्रमाणे सदैव विन्मुख राहा. हे रती व विरतीचे अर्थ भाषेची ऊर्जा सूचित करतात आणि तिच्या नित्यनूतनता ग्रहण करण्याच्या समर्थ प्राणशक्तीलाही सूचित करतात.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

व्याकरणकारांच्या एका प्रसिद्ध श्लोकात सांगितले आहे की, शब्दाचा अर्थ लावताना व्याकरण, उपमान, कोष, संबंधित वाक्य, व्यवहार, वाक्यांश, टीका आणि सिद्धपणाचे सामीप्य (सलग्नता) यांच्या संबंधाकडे लक्ष दिले पाहिजे. नाहीतर, उलटा/विपरीत अर्थही निघू शकतो. 'अर्थः प्रकरणं लिंगं वाक्यस्यान्यस्य सन्निधिः' असे वर्णन करताना एका दुसऱ्या श्लोकातही शब्दशक्तीचे निरूपण केले आहे.

एखादे प्रकरण जाणून न घेता केवळ शब्दावरून योग्य अर्थ काढला जाऊ शकत नाही. यासंदर्भातले उदाहरण आहे, सैंधव हा शब्द! सैंधव शब्दाचे दोन अर्थ आहेत. एक घोडा-अश्व व दुसरा लवण-मीठ! जर बोलणारा पंगतीत भोजन करण्यासाठी बसला आहे व त्याने 'सैन्धव' वाढा असे म्हटले तर प्रसंग पाहून त्यावेळी मीठ आणणेच उचित आहे आणि वस्त्र वगैरे धारण करून जेथे मालक यात्रेसाठी सज्ज आहे; तेथे सेवकाने अश्वच (सैन्धव) आणणे समयोचित आहे. प्रसंग जाणून न घेता जर उपरोक्त दोन्ही ठिकाणी विपरीत अर्थ घेतला तर शब्द आपल्या स्वाभाविक शक्तीचे दर्शन घडवू शकणार नाही.

असे पुष्कळ शब्द आहेत की, जे ज्यांच्या संस्कृत तत्सम रूपात मोठा विकास घडून ते विदेशी भाषांमध्ये बेमालूमपणे मिसळून गेले आहेत. उदा.- डॉटर (दुहितर), होम (हर्म्य), क्वार्टर (कोटर), मॅन (मनू), नियर (निकट), लोकेट (लोकित), थ्री (त्रि), डोअर (द्वार) वगैरे. अशाच पद्धतीने परदेशी भाषांची रूपेसुद्धा भारतीय भाषांमध्ये मिसळून गेली आहेत.

हे शब्द रूप, रस, गंध, वर्ण यांनी युक्त आहेत, पौद्गलिक म्हणजेच निर्जीव आहेत. परंतु, पुद्गलपर्यायी असूनही त्यांची स्थिती महत्त्वपूर्ण आहे. अपराजित मंत्र 'णमोकार' शब्दरूप आहे. भगवंतांच्या स्तुतिपर शब्दांची ती उद्देशपूर्ण रचना आहे. आशीर्वाद व अभिवादन यांचा शिष्टाचार शब्दमाध्यमातून पूर्णतः त्यातून प्रतिबिंबित होतो. कुटुंबाची वात्सल्यभावना शब्दांच्या सहयोगानेच अभिव्यक्त होते. पत्नी, माता, मुलगी इत्यादी शब्द नसते तर पारिवारिक संबंधांची अभिव्यक्ती होऊ शकली नसती. अर्थानुसार आगमशास्त्रात काही ठरावीक शब्दांनाच योग्य स्थान दिलेले आहे. विश्वातील संपूर्ण पदार्थांच्या व्याख्या/संज्ञा शब्दबद्ध आहेत.

दक्षतापूर्वक शब्दांची निवड आपण केली तर दुसऱ्यांच्या चेहऱ्यावर स्मितहास्य फुलवू शकतो, हास्यफुलांची पखरण करू शकतो आणि अपमानास्पद शब्द वापरून समोरच्या व्यक्तीच्या डोळ्यांत अग्निस्फुलिंगही निर्माण करू शकतो. कितीतरी प्रसंगी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तोंडून निघालेले चांगले शब्द आयुष्यभरासाठी मैत्रीच्या रेशीमबंधात बांधून टाकतात; तर अपशब्द, वाईट शब्द वैर-विरोध उत्पन्न करतात. अशा प्रकारे अमृत आणि विष जिभेवरच वसती करून आहेत. ज्यांचा आवाज गोड आहे, मधुर बोली आहे, असे पशुपक्षीसुद्धा मनुष्याला आवडतात. हे समजून घेऊन मधुरवाणीची शक्ती वाढवली पाहिजे. सदैव हसतमुखाने बोलणाऱ्याचे सगळेच मित्र होतात. जे अनेक लोकांच्या संपर्कात येत असतात; त्यांनी तर आपले शब्द लोण्यात घोळवूनच वापरले पाहिजेत.

एका सूक्तकाराने म्हटले आहे- 'बोलवो न सीख्यो, सब सीख्यो गयो धूल में।' एखाद्याने खूप काही शिकून घेतले; परंतु बोलावे कसे तेच शिकले नाही तर शिकलेले, वाचलेले सारेच धुळीला मिळते. बोलता येणाऱ्या शब्दांची/वागात्मक शब्दभारतीची विशिष्ट निवड करून लोकांना प्रसन्न व मुग्ध करणे, ही अवघड गोष्ट आहे. कावळा कडुलिंबाच्या झाडावर बसतो आणि कर्ण-कटू आवाजात बोलतो. कोकीळ रसाळ फळे देणाऱ्या आम्रवृक्षावर बसतो आणि मधुर-रसाळ बोलतो. शब्दांच्या उचित वापराने सुखी जीवनाची निर्मिती होते. जो नेहमी बाणासारखे तीक्ष्ण शब्द बोलतो; त्याच्यामुळे लोक त्रस्त होतात. कीर्तिजीवीला शब्दजीवी, अक्षरजीवी म्हणतात. नरजन्म संपला तरी ती दिवंगत व्यक्ती अक्षरांच्या रूपाने जिवंत राहते. 'कीर्तिर्यस्य स जीवति।' -ज्याची ख्याती लोकात सर्वश्रुत आहे; तो मरूनसुद्धा जिवंतच आहे. ज्याला शब्दांनी धिक्कारले आहे; त्याला तिन्ही लोकात यश मिळत नाही. सम्यक्चारित्र्यवान व्यक्तींना विद्वान, त्यागी या शब्दांनीच स्मरले जाते. शृंगार, वीर, करुण, अद्‌भुत, हास्य, भयानक, बीभत्स, रौद्र, शांत हे सगळे रस शब्दात सामावलेले आहेत. मंत्ररूपातील शब्द तर कल्पनातीत महत्त्वाचे असतात.

फार क्वचित लोक शब्दकोशाचे धनी असतात आणि पुष्कळसे तर एकेक शब्दासाठी तडफडतात. काही व्यक्ती शब्दांची उपासना करतात; तर काही व्यक्तींची स्वतः शब्द सेवा करीत राहतात. ज्याप्रमाणे महाप्रभावी तपस्वींच्या चरणस्पर्शाची सुसंधी सर्वांना लगेच मिळत नाही, त्याच प्रकारे असे काही समर्थ शब्दप्रभू असतात की, त्यांच्याजवळील अफाट शब्दसंपत्तीचा उपयोग त्यांना पूर्णतः करणे अवघड होते. कवी धनंजय यांनी यासंबंधात एका श्लोकात म्हटले आहे की, अतिशय चोखंदळपणे एकेक शब्द निवडत त्यांनी शब्दांना कोशबद्ध केलेले आहे. त्याच्या भीतीने पळालेले शब्द तिन्ही लोकात धावत सुटले आहेत. देववाणीच्या रूपात ते ब्रह्मदेवाजवळ गेले. गंगेच्या खळखळ आवाजाचे रूप

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

धारण करून ते हिमालयात शंकराकडे गेले; तर क्षीर-समुद्राच्या लाटांच्या कल्लोळ-हुंकाराच्या रूपाने केशवाकडे (विष्णू) कडे गेले. धनंजयाच्या भीतीने ग्रासलेले शब्द फूत्कार टाकीत आहेत.[१] तात्पर्य हे की, धनंजय कवीजवळ शब्दांची कमी नाही. ब्रह्मा, विष्णू व महेश यांच्याजवळ जी शब्दसंपत्ती आहे; त्यामधील सर्व शब्द तो जाणतो. जे मोत्याप्रमाणे प्रत्येक शब्द न् शब्द पारखून घेतात; तेच गहनगंभीर शास्त्रसमुद्रात खोलवर बुडी मारू शकणारे पाणबुडे असतात. तेच साहित्य-प्रासादाला सजवत राहतात. सरस्वतीच्या मंदिरात पूजेचे पुष्पहार समर्पित करीत राहतात.

भौतिक विज्ञानाच्या मदतीने आज शब्दशक्तीने नवीनवी रूपे धारण केली आहेत. लोकव्यवहाराची ती नवी साधने आहेत. पोस्ट खात्याच्या कृपेमुळे शब्द देश-परदेशांत प्रवास करीत आहेत. 'तारे'च्या रूपात उडत आहेत. टेलिप्रिंटरवर साकार होत आहेत. संगीताच्या तारांवर थिरकत आहेत. आतापर्यंत ते ज्वालामुखीच्या विस्फोट-ध्वनीपर्यंत मर्यादित होते. आता अण्वस्त्रांमध्ये बंदिस्त आहेत. मनुष्याच्या अविचाराने कोणत्याही क्षणी घडू पाहणाऱ्या विघातक कार्यवाहीच्या प्रतीक्षेत आहेत. क्राकातोआ व व्हेसुविअस यांच्यापेक्षाही जास्त भीषण विस्फोट करणारे 'धडाके' या शब्दरूपी बॉम्बमध्ये दडलेले आहेत.

'त्रेधा जिनेन्द्रवचोऽमृतम्' - जिनेंद्र भगवंतांच्या वाणीला अमृत असे संबोधले जाते. आपल्या अस्तित्वाने लोकांचे जीवन संचालित करते ते वाक्-अमृतच तर आहे. हे शब्द, शब्दमय बोलणे, प्राणिमात्रांमध्ये बंधुत्वाची भावना निर्माण करणारे आहेत. या भाषेच्या अमृतपात्रात, मधुर रसासाठी तहानलेले विश्वातील ओठ आकंठ बुडालेले आहेत.

❖❖❖

---

१. 'ब्रह्माणं समुपेत्य वेदनिनदव्याजात्तुषाराचल-
स्थानस्थवारमीश्वरं सुरनदीव्याजात्तथा केशवम् ।
अप्यम्भोनिधिशायिनं जलनिधेर्ध्वानोपदेशादहो
फूत्कुर्वन्ति धनंजयस्य च भिया शब्दाः समुत्पीडिताः ।।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प. पू. सिध्दांत चक्रवर्ती श्वेतपिच्छाचार्य
आचार्यश्री १०८ विद्यानंदजी मुनी महाराज

।। जीवन चित्रावली ।।



जैनधर्म प्रभावक आचार्यश्री विद्यानंद

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

।। श्री वीतरागाय नमः ।।

गुरु – शिष्य परंपरा



गुरु – शिष्य परंपरा

दिगंबर जैनाचार्यांची पुनर्स्थापित परंपरा







संकलक – चंद्रमोहन शहा, सोलापूर (९४२३३३५३००)

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आचार्यश्री विद्यानंदांच्या पूर्वाश्रमींचे आई-वडिल श्री. काळाप्पा उपाध्याय आणि सौ. सरस्वती

आचार्यश्रीं चे शेडबाळ, जिल्हा बेळगाव येथील घर - त्यांचे जन्मस्थान



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri





आचार्यश्री विद्यानंदांच्या हस्तरेषा, कुंडली आणि चरण-युगल

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आचार्यश्री शांतिसागर महाराज यांच्या निर्वाण यात्रेच्या वेळी (कुंथलगिरी) क्षुल्लक पार्श्वकीर्ति (आचार्यश्री विद्यानंद)

क्षुल्लक दीक्षागमनासाठी गमन दीक्षापूर्व शोभायात्रा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आचार्य रत्न श्री १०८ देश भुषण जी महाराज

[illegible]

मुनि विद्यानंद

समाधिवृद्धिरस्तु सहन्मंगल आशीर्वाद.

प्राचीन आचार्य परंपरा में श्रमणसंस्कृति संरक्षण एवं संवर्धन हेतु आचार्य पद का स्थान सर्वप्रथम हैं।

मेरे शरीर आयुकर्म के उदय से रत्नत्रय आराधना में सहयोग देने में शनैः शनैः कृश हो रहा है। अब मैं उचित समझता हूँ कि अपने परम शिष्य को नियुक्त करूँ, जो मेरे पश्चात् मेरे आसन पर पदासीन हो और धर्म प्रभावना प्रभावित करके श्री जिनशासन संवर्धन एवं श्रमणसंस्कृति का संरक्षण करें। मैंने निर्णय लिया है कि मेरे पश्चात् इस आचार्य पद को तुम धारण करोगे और इस पद की गरिमा को बनाकर ही नहीं रखोगे, अपितु समस्त समाज को ठीक दिशा निर्देश देकर और संघ को कुशलता पूर्वक संचालितकर अपना और मेरा नाम चारित्र चक्रवर्ती आचार्य श्री १०८ शांतिसागरजी महाराज की परंपरा के अनुरूप ही बनाकर रखोगे।

इत्याशीर्वाद

[illegible]

गुरुदेव आचार्यश्री १०८देशभूषण महाराज यांचे आचार्यपदासाठी
मुनी विद्यानंदजी यांना आदेश पत्र

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



मुनी दीक्षेच्या आधी (१९६३)
आचार्यश्री देशभूषण महाराज
यांच्याबरोबर क्षुल्लक पार्श्वकीर्ति



क्षुल्लक पार्श्वकीर्ति यांचा
ीक्षाविधी आणि केशलोच



गुरुदेव प.पू. आचार्यश्री देशभूषण महाराज यांच्या बरोबर



गुरुदेवांद्वारे उपाध्याय पद मंत्रसंस्कार

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri





आचार्यश्री विद्यानंद महाराजांच्या विविध [illegible]





Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अलिकडील इतिहासात प्रथमच घडलेला दिगंबर जैन मुनींचा हिमालयात विहार



आचार्यश्री विद्यानंद महाराजांचा हिमालयातील एके ठिकाणचा विश्राम (१९७०)

हिमालयातील एका नदीच्या खळखळणाऱ्या प्रवाहाकडे कुतूहलाने दृष्टिक्षेप



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आचार्यश्री विद्यानंद महाराज : हिमालय विहार प्रसंगी श्रा[illegible]बरो[illegible]

या विहारावर आधारित "हिमालय में दिगंबर जैन मुनी" नावाचे हिं[illegible]क प[illegible]द शास्त्रींनी लिहिले असून त्याचा मराठी अनुवाद श्री. मोहन जैन, धरणगाव यांनी के[illegible] आहे. ([illegible]स्तक उपलब्ध)

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



आचार्यश्री हिमालयातील विहार प्रसंगी (१९७०). एका शाळेतील विद्यार्थ्यांचे प्रबोधन

हिमालयातील अष्टापद आणि श्रीबद्रीनाथ धाम यात्रेवरून
परत येताना आचार्यश्री विद्यानंद महाराज

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

▲ हिमालयातील विहार प्रसंगी श्रीनगर शहरात एका प्रसंगी आचार्यश्री [illegible] ंद्र [illegible]ज

हिमालयातील गाव–शहरांतून मुनीश्रींना भक्तीभावपूर्वक आहारदान ▼

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आचार्यश्री ग्वाल्हेर किल्ला येथील मूर्ति बघून विहार करताना

आचार्यश्री विद्यानंद महाराज : भारतभरची विहार यात्रा

विहार करताना आचार्यश्रींची सावधानता! असेच एक विहार चित्र

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

▲ श्रवणबेळगोळ येथे (१९८१) मंगल प्रवेश करताना आचार्यश्री [illegible]

प.पू. आचार्यश्री विद्यानंद महाराजः गोमटेश्वर : श्रवणबेळगोळ : सहस्त्राब्दी महोत्सव प्रेरणा आणि उपस्थिती

आचार्यश्री गोमटेश्वराच्या अतिभव्य मूर्तीच्या दर्शनासाठी उत्सुकतेने पहाड चढताना ▼

सोबत प्रा. जी. के. पाटील, मध्ये श्रवणबेळगोळचे तरुण भट्टारक पट्टाचार्य चारुकीर्ती स्वामी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आचार्यश्री विद्यानंद भगवान बाहुबली गोमटेश्वराच्या ५८ फूटी
जगप्रसिध्द मूर्तीच्या चरणाशी वंदन करताना

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



श्री क्षेत्र बाहुबली, कुंभोज – कोल्हापूर : महाराष्ट्र–कर्नाटकात गुरुकुल पध्दत सुरू करून
हजारो विद्यार्थ्यांना सुसंस्कारीत करणारे महान मुनीवर्य आचार्यश्री संमंतभद्र महाराज,
“बाहुबली–कांड” समर्थपणे हाताळणारे आचार्यश्री विद्यानंद महाराज...
श्री क्षेत्र बाहुबलीच्या पार्श्वभूमीवर...

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



बाहुबलीतील ऐतिहासिक विहारातील क्षणचित्रे (सप्टेंबर १९८३)

प.पू. आचार्यश्री समंतभद्र महाराज यांच्या बरोबर विचारविनीमय करताना आचार्यश्री विद्यानंद महाराज बाहुबली येथील वास्तव्यात विविध प्रसंगी



प.पू. आचार्यश्री समंतभद्र महाराज यांच्या बरोबर विचारविनीमय करताना आचार्यश्री विद्यानंदजी आणि श्री तात्याजी चवरे



छायाचित्र सौजन्य : श्री. विजय जिवराज मेहता, अक्कलकोट

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



▲ आचार्यश्रींना आहारदान : श्रीमती चंचळबाई जिवराज मेहता, ...कोट

श्री क्षेत्र बाहुबली विहार – सप्टेंबर १...

धर्मानुरागी श्रीमती चंचळबाई जिवराज मेहता आचार्यश्रीं चा आशीर्वाद घेताना ▼



छायाचित्र सौजन्य : श्री. विजय जिवराज मेहता, अक्कलकोट

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



आचार्यश्री विद्यानंदांचा केशलोच (जयपूर)

मुनी जीवनातील एक आवश्यक क्रिया...
स्वहस्ते केशलोच



आचार्यश्री विमलसागर यांच्याबरोबर
विचार विमर्ष करताना



आचार्यश्री कडून जिनागम
समजून घेताना
उपाध्याय श्रुतसागरजी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

▲ बाहुबली कुंभोज – आचार्यश्री विद्यानंद यांच्याच प्रेरणेने संप...
गुरुकुल दिव्यावदान समारोहमध्ये आचार्यश्री समंतभद्र महा...

गुरुकुलमाता श्रीमती गजाबेन (वय १०४) बाहुबली यांच्याबरोबर चर्चा करताना आचार्यश्री ▼

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राष्ट्रीय स्तरावरील विविध उपक्रमांचे आयोजन – सहभाग

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जन्मशताब्दी समारोह प्रसंगी दिल्लीत लोकसभा अध्यक्ष मा. बलराम जाखड व सुश्री निर्मला देशपांडे, सौ. शरयूताई दफ्तरी, अशोक कुमार जैन

कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जन्मशताब्दी समारोह प्रसंगी भारताचे मुख्य न्यायाधीश श्री. पी. एन. भगवती आणि खासदार श्री. जे. के. जैन



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0 In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



▲ "अहिंसा विश्व धर्म" याचा सर्व ठिकाणी प्रसार–प्रचार करताना [illegible] सभेतील [illegible]

▼ धर्मस्थळ येथे भ. बाहुबली मूर्तीची प्रतिष्ठापना आणि महामस्त[illegible]काच्या [illegible]चे छायाचित्र



▼ एका समारोह प्रसंगी धर्मस्थळ येथील श्री. वीरेंद्र हेगडे, डॉ. बी. शंकरानंद, साहू श्रेयांसप्रसाद जैन आणि साहू अशोक कुमारजी जैन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



ार असोसिएशन, इंदोर येथे न्यायाधीश व वकिलांपुढे प्रवचन देताना



विहार करताना वालचंदनगर इंडस्ट्रीला भेट

दिल्लीत ऑल इंडिया संस्कृत संगोष्टी कार्यक्रमात प्रवचन देताना आचार्यश्री विद्यानंद महाराज

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0 In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri





▲ सोलापूर येथील गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन बोर्डिंग स्कूल च्या अमृत महोत्सव समारंभात आचार्यश्री विद्यानंद महाराज

◀ पंडीत दरबारीलालजी कोठिया आचार्यश्रीं कडून कुंदकुंद पुरस्कार स्वीकारताना

वीर निर्वाण भारती पुरस्कार समारोहात प्रवचन करताना आचार्यश्री विद्यानंद महाराज

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राष्ट्रीय स्तरावरील विविध उपक्रमांस प्रेरणा आणि सहभाग

आचार्यपद मिळाल्यानंतर श्री क्षेत्र शांतिगिरी, कोथळी येथे विहार करून क्षेत्राचा संपूर्ण विकास करण्यात आला. त्याप्रसंगी उद्घाटन समारोहात आचार्यश्री विद्यानंद महाराज



एका समारंभाकरीता विहार करताना लोकसमूहाबरोबर आचार्यश्री विद्यानंद

कोल्हापूर (१९८३)

गांधी नाथा रंगजी संस्थेद्वारा देण्यात आलेल्या आचार्य कुंदकुंद पुरस्कार समारोहात आचार्यश्री विद्यानंदजी आणि श्रीमान लालचंद हिराचंद व माजी उप-राष्ट्रपती श्री बी. डी. जत्ती

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

▲ आचार्यश्री कडून आशीर्वाद घेताना सपत्नीक
श्री. माणिकलाल शहा व सौ. विमलश्री (बारामती)

आचार्यश्री विद्यानंद :
जन्मदिनानिमित्त कार्यक्रम

आचार्यश्री विद्यानंदजी १९९२ ▶
आहार दान करताना शहा परिवार



आचार्यश्री सोबत आर्यिकाश्री
प्रज्ञमती माताजी, समवेत शहा परिवार

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



सोलापूर श्राविकाश्रम येथील महावीर मंदिरात आचार्यश्री विद्यानंद आणि पद्मश्री पं. सुमतीबाई शहा, कस्तुरचंद शहा, वैभव प्रेस, कांतीलाल अमीचंद गांधी, सोलापूर

आचार्यश्रींना आहार देताना पं. विद्युल्लता भून आणि सुरेखा पाटील

गांधी नाथा रंगजी दिगंबर जैन बोर्डिंग स्कूल, सोलापूर अमृत महोत्सव प्रसंगी श्री. कस्तुरचंद गुलाबचंद शहा, सोलापूर महाराजांसमवेत चर्चा करताना

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0 In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

अविरत प्रेरक, उत्साहवर्धक आणि विचारांना गतिमान करून धर्माचरणाकडे वळविणारी आचार्यश्री विद्यानंद यांची विपुल ग्रंथसंपदा

वाचन आणि संशोधन मग्न

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



▲ तत्कालीन प्रधानमंत्री मा. श्रीमती इंदिरा गांधी यांच्या बरोबर चर्चा करताना आचार्यश्री. सोबत श्रीमती ललिताबाई लालचंद आणि पद्मश्री, जैनरत्न शरयूताई दफ्तरी

भारतीय शासन-प्रमुखांद्वारा दर्शन

तत्कालीन राष्ट्रपती श्री ग्यानी झैलसिंगजी
▼ विद्यानंदजीं कडून आशीर्वाद घेताना



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



दिल्लीतील "कुंदकुंद भारती" या संस्थेचे शिल्पकार
आचार्यश्री विद्यानंद...

प्राकृत भवन, कुंदकुंद भारती,
नवी दिल्ली येथील बांधकामाचे
छायाचित्र - परिसरातील निवांत स्वाध्याय

तत्कालीन पंतप्रधान मा. श्री. राजीव गांधी यांना आशीर्वाद व मार्गदर्शन करताना आचार्यश्री

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तत्कालीन पंतप्रधान मा. श्री. राजीव गांधी यांच्या शुभहस्ते कुंदकुंद भारती मधील प्राकृत भवनचे उद्घाटन. सोबत पद्मश्री, जैनरत्न शरयूताई दफ्तरी आणि खासदार जे. के. जैन

तत्कालीन पंतप्रधान मा. श्री. राजीव गांधी यांना जैन समाजाकडून सद्भावना भेट देताना श्री. दरीजी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0 In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



▲ दिल्ली येथील एका समारंभात मुनीश्री सुशिलकुमारजी आणि [illegible] लक्ष्मीसेन महाराज, कोल्हापूर

पद्मविभूषण धर्माधिकारी श्री वीरेंद्र हेगडे आचार्यश्रीं समवेत पिच्छी परिवर्तन प्रसंगी ▼



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



मानव संसाधन विकास मंत्रालयाकडून आयोजित युनेस्को–आईएनसी शांति की संस्कृति या विषयावर प्रवचन देताना आचार्यश्री आणि मंत्री, मा. डॉ. मुरली मनोहर जोशी



प. पू. श्रीमद् दलाईलामा यांना आशीर्वाद देताना आचार्यश्री



माजी उपराष्ट्रपती श्री. भैरोसिंह शेखावत आचार्यश्रीं कडून आशीर्वाद घेताना

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0 In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



तेरापंथी मुनीश्री आचार्य महाप्रज्ञ यांच्या सोबत चर्चा-विनीमय

मुनी सुशीलकुमार सोबत चर्चा

विविध धर्मगुरूंची कुंदकुंद भारतीला भेट



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



भूतपूर्व राष्ट्रपती
श्री. शंकर दयाल शर्मा
आणि श्रीमती
विजयाराजे शिंदे
आचार्यश्रीं सोबत



भूतपूर्व पंतप्रधान
पी. नरसिम्हाराव
ार्यश्रीं च्या भेटीला.
बत अशोककुमारजी
जैन



पहिल्या आचार्य
कुंदकुंद पुरस्कार
समारंभाचे अध्यक्ष
माजी उपराष्ट्रपती
श्री. बी. डी. जत्ती,
सोबत डॉ.प्रा.मा.प.
मंगुडकर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0 In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



बावनगजा प्रतिष्ठा महोत्सवात आशीर्वाद घेताना भूतपूर्व राष्ट्रपती मा. श्री. डॉ. शंकर दयाल शर्मा आणि पं. नाथुलालजी शास्त्री

एका महिला सम्मेलनात उपस्थित श्रीमती नजमा हेपतुल्ला

मध्यप्रदेशचे मुख्यमंत्री श्री. मोतीलाल व्होरा आणि श्री व श्रीमती प्रकाशचंद्र सेठी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

महावीरजी येथील समारंभात इंदोर येथील पद्मश्री श्री बाबूलालजी पाटोदी आचार्यश्रीं चा आदेश स्विकारताना

एका समारंभ प्रसंगी श्री. अशोक कुमारजी जैन आणि डॉ.श्री. निर्मलकुमार फडकुले

साहू श्री. अशोक कुमार जैन, अध्यक्ष, तीर्थक्षेत्र कमेटी आणि शेठ श्री अरविंद रावजी दोशी, महामंत्री, तीर्थक्षेत्र कमेटी (भ.महावीर २५०० निर्वाण महोत्सव) आचार्यश्रीं सोबत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



तेरापंथी मुनी आचार्य महाश्रमण यांची कुंदकुंद भारतीला भेट

प्राकृत भवन कडे जाताना



वृषभविहार येथे आहारास जाताना सोबत श्री. चंद्रमोहन शहा व शरदचंद्र गांधी (२०१०)

छायाचित्र सौजन्य : श्री. चंद्रमोहन शहा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्री अशोक कुमार जैन आचार्यश्रींना
श्रीफळ अर्पण करताना

दीप प्रज्ज्वलन करताना
तत्कालीन प्रधानमंत्री पी. नरसिम्हाराव आणि
पद्मश्री जैनरत्न शरयूताई दफ्तरी

तत्कालीन प्रधानमंत्री मा. श्री. मोरारजी
देसाई आचार्यश्रीं समवेत



महावीरजी येथील एका कार्यक्रमात
कलाकाराचा सन्मान करताना आचार्यश्री

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



पुणे, सोलापूर येथील श्राविकांची कुंदकुंद भारतीला भेट
श्रीमती जिनमती कोठडिया
श्रीमती रतनबाई शहा
श्रीमती पं. विद्युल्लता शहा
श्रीमती डॉ. कंकुबाई शहा
श्रीमती प्रा. डॉ. मयूरा शहा
श्रीमती सुरेखा पाटील

श्रीमती रतनबाई रतनचंद शहा, पुणे यांना आचार्यश्रींचे आशीर्वादपर पत्र



कुंदकुंद भारती संस्थेच्या प्राकृत भवन येथील वस्तुसंग्रहालयात
पू. क्षु. सुमतिमती,
पू. क्षु. अजितमती,
पू. क्षु. भरतमती,
पू. क्षु. बाहुबलीमती
माताजी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



प्रा. नतालिया या रशियन विदुषीला ५ लाखाचा पुरस्कार प्रदान करताना श्रीमती सोनिया गांधी

खारवेल भवनचे उद्घाटन करताना काँग्रेसच्या अध्यक्षा श्रीमती सोनिया गांधी बाजूला दिल्लीच्या माजी मुख्यमंत्री श्रीमती शीला दीक्षित

त्याच समारंभात श्रीमती सोनिया गांधी द्वारा दीप प्रज्ज्वलन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0 In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



मा. श्रीमती सोनिया गांधी भ. महावीरांच्या मूर्तीला पुष्पांजली वाहताना

विद्वानांचा सत्कार...
विद्वानांना पुरस्कार...

श्री. धन्यकुमार जैनी, सोलापूर आणि श्री. सतिश जैन, आकाशवाणी, दिल्ली

प्रा. डॉ. निर्मलकुमार फडकुले यांचा दिल्लीत आचार्यांच्या प्रेरणेने पुरस्कार – सन्मान

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri





आचार्यश्रीं सोबत पद्मश्री जैनरत्न शरयूताई दफ्तरी, श्री. चंद्रमोहन शहा आणि श्री. शरदचंद्र गांधी, सोलापूर



छायाचित्र सौजन्य : श्री. चंद्रमोहन शहा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मध्यप्रदेशातील बडवानी येथील
भगवान आदिनाथांच्या प्रतिमेला
बीजमंत्र देताना आचार्यश्री



प्रतिमेच्या नूतनीकरण प्रसंगी इंदोरचे
राजकीय-सामाजिक नेते पद्मश्री
बाबुलालजी पाटोदी समवेत
विचार विमर्श



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



जयपूर – महावीरजी येथील विहार प्रसंगी
ध्यान केंद्राचे उद्घाटन आणि बीजमंत्र देताना



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0 In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मुनी जीवनातील आगळे-वेगळे विलक्षण प्रसंग - शिष्यांसाठी स्वाध्याय पाठशाळा







Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



ऐलाचार्य वसुनंदी यांना आचार्य पद प्रदान करताना आचार्यश्री



मुनी प्रज्ञसागर यांना ऐलाचार्य पद प्रदान करताना आचार्यश्री



श्रुतसागर व प्रज्ञसागर मुनी यांच्या बरोबर चर्चा करताना आचार्यश्री

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



गुरुपौर्णिमा
(२४ जुलै २०१०)
श्री. राकेश जैन,
दिल्ली, गुरुपूजन करताना

छायाचित्र सौजन्य : श्री. चंद्रमोहन शहा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



आचार्यश्री विद्यानंद : धर्म-प्रभावना आणि जीवन प्रेरक प्रव
प्रवचनातील तल्लीनता!

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri







आचार्यश्री विद्यानंद : अविरत प्रेरक दर्शन !





Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri







आचार्यश्री विद्यानंद : आशीर्वाद आणि स्फूर्तिदायक वचनांचा वर्षाव

आचार्यश्री विद्यानंद : विविध भावमुद्रा





Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



आचार्यश्री विद्यानंद :
भारतभरच्या जैन समाजाचे
हृदयस्थ श्रध्दास्थान

[illegible]ार्यश्री [illegible]ानंद :
विवि[illegible] [illegible]ावमुद्रा





Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



आचार्यश्री विद्यानंद

विविध भावमुद्रा





Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



श्वेतपिच्छी परिवर्तन आणि
श्वेतपिच्छाचार्य असे नामाभिधान
कुंदकुंदभारती, नवी दिल्ली (जुलै २०१०)

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



**दिगंबर जैन समाजाचा भारताची राजधानी दिल्लीतील मानबिंदू :
कुंदकुंद भारती आणि आचार्यश्री**

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



आचार्य जिनसेन रचित,
पं. निटवेशास्त्री द्वारा मराठी
अनुवादीत महापुराणम् चे
पुनर्मुद्रण करण्याचे आदेश
स्विकारताना
श्री. श्रेणिक अन्नदाते
संपादक - तीर्थंकर,
संस्थापक - सुमेरू प्रकाशन व
महाराष्ट्र जैन इतिहास परिषद



दानवीर सेठ माणिकचन्द्र झवेरी
१६० वा जन्म जयंती समारोह

महापुराणम् चे प्रकाशन
(ऑक्टोबर २०११)

छायाचित्र सौजन्य : चंद्रमोहन शहा, सोलापूर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आचार्य बालक भद्रबाऊ यांना धर्मसंस्कारासाठी घेऊन जाताना आचार्य गोवर्धन यांचे शिल्प, बंगाल प्रांत (इसवी सन पूर्व दुसरे शतक)

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



आचार्य कुंदकुंद यांचे समयसार वाचन : शिल्प

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

भगवान ऋषभदेव यांचे
१०० साधक पुत्र :
श्रवणबेळगोळ शिल्प.
आचार्यश्री विद्यानंदांचे
आवडते महान शिल्प

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कुंदकुंदभारती मधील
प.पू. आचार्यश्री शांतिसागर महाराज
यांची प्रतिमा



कुंदकुंद[illegible]ील
भगवान महावीर[illegible]क
[illegible]

कुंदकुंदभारती मधील भरतेश्वराचे मंदिर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विविध प्रतिकांद्वारा भारतीय जैन समाजात पुनर्जागरण







Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



दिल्लीतील कुतुबमिनार परिसरातील जगप्रसिध्द
ऐतिहासिक भगवान महावीर मूर्ती : अहिंसा स्थली

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ग्रंथ प्रकाशन समिती

श्री. विक्रम रावजी शहा
इंदापूर
संपर्क : ९९२२५२४९२३

श्री. विशाल बाहुबली मेहता
ग्रामपंचायत सदस्य मो[illegible]
संपर्क : ९९२१२२३[illegible]

डॉ. शरयू शरद शहा
मुंबई
संपर्क : ९६१९०२३३३०

सौ. उषा तुपकर
सोलापूर
संपर्क : ९८९०८४६०२१

डॉ. सरिता नलिन कोठाडिया
सोलापूर
संपर्क : ९८२२३४७१०७

श्री. श्रेणिक अन्नदाते
डोंबिवली
संपर्क : ९८६७५०८८१४



श्री. चंद्रमोहन रतनचंद शहा
सोलापूर
संपर्क : ९४२३३३५३००

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

लेखनकला

वाचेची दोन व्यावहारिक रूपे आहेत- एक ध्वनी व दुसरे लिपी! एक भाषित रूप आहे आणि दुसरे लिखित रूप आहे. 'वक्तृत्वकले'मध्ये वाचेच्या भाषित रूपाचा परिचय करून दिलेला आहे. प्रस्तुत लेखात वाचेच्या लेखनविषयक योग्यतेचा विचार-विमर्श केला जाणार आहे. लेखनकला छायाचित्रणकलेसारखी आहे. एखाद्या व्यक्तीची अनेक चित्रे फोटोद्वारे आपल्याला प्राप्त करता येतात. गरज पडली तर व्यक्तीच्या परिचयासाठी विविध ठिकाणी आपण ती पाठवूसुद्धा शकतो. व्यक्तीचा एखादा फोटो (आकृतीदर्शन) एकदा पाठवला गेला की, नंतर पुन:पुन्हा तो पाठविण्याची गरज नसते. त्या व्यक्तीस प्रत्येक ठिकाणी स्वत: जाण्याची गरज नसते. लेखनकलासुद्धा लिपी-विद्याच आहे. आणि लिपीबद्ध अक्षरांद्वारे व्यक्त झालेल्या विचारांना पुन:पुन्हा तोंडाने उच्चार करणे अपेक्षित नाही. जसे व्याख्यान ऐकले जाते, तसा लेख वाचला जातो. वाचेच्या श्राव्यरूपास वक्त्याची अपेक्षा असते. परंतु, तिच्या लिखित रूपाद्वारे वक्त्याच्या अनुपस्थितीतही त्याने मांडलेले विचार, भावना त्याच्याच शब्दांत जशाच्या तशा समजून घेतल्या जाऊ शकतात. अशा प्रकारे जास्तीतजास्त टिकून राहण्याच्या दृष्टीने विचार केल्यास वाचेचे लिखित रूप जास्त ग्रहण करण्यायोग्य आहे.

तसे पाहता लिपी श्राव्यरूपाच्या लहान भावाप्रमाणे आहे. वाक्/वाचा अग्रजन्मा, प्रथम जन्मली तर लेखनकला नंतर आल्यामुळे ती अनुजन्मा आहे. वक्त्याने जेव्हा आपल्या अभिव्यक्तीच्या संरक्षणाचा विचार केला; तेव्हा त्याने लिपी विद्येची निर्मिती केली. त्या लिपीविद्येने वक्त्याच्या वाणीला पुनर्जीवन दिले. त्याच्या विचारांना अक्षय यौवन बहाल केले. वाचेच्या मृत्यूला पराजित केले. अक्षरांकित झालेली त्याची कीर्ती कल्पकाळापर्यंत सुरक्षित झाली व लेखकाला अमरता लाभली.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्वर्गात राहणाऱ्या देवांचे नाव 'अमर' आहे. त्यांनी अमृत प्राशन करून अमरत्व प्राप्त केले आणि लेखनकलेमुळे यशस्वी झालेल्या कलावंतांना लिपीबद्ध अक्षरांनी 'अमर' केले. पृथ्वीवर अमर राहून जगणारे तेच आहेत; ज्यांनी लेखनकार्यात अखंड निमग्न राहून शाश्वत साहित्याची रचना केली. आपल्या तप-स्वाध्याय-चिंतनाने गहनगंभीर विचार त्यांनी शब्दबद्ध केले आणि बोलल्या जाणाऱ्या शब्दांसह वाऱ्याबरोबर शून्यात उडून जाण्यापासून त्यांना रोखून धरले. ही लेखनप्रणाली मानवजातीसाठी वरदानच आहे. कामधेनूप्रमाणे मनुष्य तिचे पाहिजे तेव्हा दोहन करू शकतो.

आजच्या काळात मुद्रणकलेमुळे लेखनकलेचा पुरेसा विकास झाला आहे. यांत्रिक छपाईच्या युगापूर्वी हाताने लिहिलेल्या पुस्तकांना फार आदर असे. एकेक ग्रंथ लिहून पूर्ण करण्यास वर्षे लागत. त्याची लिपी व प्रतिलिपी (प्रत) सांभाळून ठेवली जाई. प्राचीन हस्तलिखित संग्रहालयातील सुरक्षित ग्रंथांना पाहून त्या काळातील लेखनश्रेष्ठांच्या कष्टाची कल्पना येते. चित्रांना कुंकवाने, हळदीने रंगवण्याची प्रथा होती. कथानकातील पात्रांची पानांवर आत चित्रे रेखाटलेली असत. चित्रे साधारण प्रतीची पण विशिष्ट असत. सोन्यापासून बनवलेल्या शाईचा उपयोग चित्रांमध्ये केलेला असे. बरीचशी पुस्तके सोन्याच्या पाण्यानेच लिहिली जात. पुरातत्त्व संग्रहालयात आजही अशी काही पुस्तके उपलब्ध आहेत. ती पाहिल्यावर लेखकांच्या असीम धैर्याची ओळख पटते.

ताडपत्र, भुर्जपत्र यावरची आणि हातांनी बनवलेले देशी कागद यावरची बोलकी चित्रे, अक्षरलेखन आजपर्यंत धूसर होऊ शकले नाही. ज्या शाईने लिहिले आहे; ती एवढी पक्की आहे की, ते लिखाण बघून शाईच्या या अज्ञात मिश्रणाचे नवल वाटत राहते. आज मुद्रणसुविधा-सोयी उपलब्ध असल्याने ग्रंथांच्या सुरक्षिततेकडे एवढे लक्ष दिले जात नाही. एकेका ग्रंथाच्या हजारो प्रती छापल्या जातात आणि जुन्या काळाच्या तुलनेत खरेदीदार अल्प किमतीत मोठ्या संख्येने ते प्राप्त करतात. ग्रंथ/पुस्तक मिळणार नाही, अशी शक्यता फार कमी असल्याने ग्रंथांना काळजीपूर्वक जपून ठेवणे व त्यांची निवड करणे याबद्दलची रुची आजकाल कमी झाली आहे.

परंतु यंत्रयुगाच्या पूर्वी मात्र ग्रंथांना देवाच्या प्रतिमेसमान मानून मोठ्या आदर-सन्मानाने ठेवले जाई. जरीचे काठ लावलेल्या पिवळ्या वेष्टनांमध्ये व्यवस्थित गुंडाळून उच्च स्थानावर ग्रंथांना ठेवले जाई. ग्रंथांना काष्ठासनावर ठेवले जाई व जमिनीवर आसनाशिवाय ते ठेवणे वर्ज्य मानले जाई. 'देव, गुरू व शास्त्र यांचे एकाच दर्जाने स्मरण

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

केले जाई. शास्त्राला चुकून जरी पाय लागला तरी त्यावर डोके ठेवून नमस्कार केला जाई. हे असे आदरयुक्त वर्तन त्या ग्रंथासाठी घेतलेले श्रम किती अपार आहेत, हे समजूनच केले जाई. शिवाय, त्या ग्रंथामुळे जे ज्ञान प्राप्त होते; त्याबद्दल श्रद्धा व्यक्त करणे, हाही भाव त्यामागे असे. आज मुद्रित पुस्तकांचे युग आहे. प्राचीन काळासारखी कलात्मकता जरी सर्वत्र दिसून येत नसली तरी मुद्रणकलेची ही उन्नतावस्थाच आहे. म्हणून तर एकसारख्या अक्षरांत लाखोंच्या संख्येने दैनिक वर्तमानपत्रे छापली व दररोज देशविदेशांत ती पाठवली जातात. या दृष्टीने विचार केला तर प्रत्येक व्यक्तीला ग्रंथ, पुस्तके मिळू शकतात. त्या काळी पुस्तक लिहिणे, लिहून घेणे फार खर्चीक काम होते. शिवाय, सर्वांनाच ते एवढे सहजसाध्य नव्हते. एखाद्या पुस्तकाची मूळ प्रत मिळवणे तर खूपच कठीण असायचे आणि त्यावरून दुसरी प्रत तयार करणे, हे तर त्याहून अवघड असे. एकेक ग्रंथ लिहायचा तर त्यातील श्लोकसंख्या जेवढी असेल; त्या हिशेबाने दीर्घकाळ लागत असे. आजची कम्पोजपद्धत त्या वेळी कल्पनेच्या पलीकडची गोष्ट होती.

वर फक्त लेखनाच्याच एका कलेवर दृष्टिक्षेप टाकलेला आहे. खरेतर हे केवळ वरवरचे वर्णन आहे. या कलेचे मूळ तर लेख, ग्रंथकार, शास्त्रकार यांच्याशी संबंधित आहे आणि या दृष्टीने विचार करता प्राचीन लेखक व अत्याधुनिक लेखक यांच्यामध्ये एक स्पष्ट अंतर आढळून येते. मुद्रणकलेची सोय झाल्याने आज प्रसिद्धी आणि प्रकाशनाच्या संधी जास्त सुलभ झालेल्या आहेत.

म्हणूनच, जी व्यक्ती छपाईसाठी खर्च करू शकते; ती लेखक या नात्याने सहज प्रसिद्धी मिळवू शकते. याउलट, एखादा उत्तम लिहिणारा असूनही पैशांच्या अभावामुळे आपल्या पुस्तकाचे प्रकाशनही करू शकत नाही व लेखकांच्या श्रेणीतही समाविष्ट होऊ शकत नाही.

आज बाजारात पुस्तकांची जी रंगीबेरंगी उधळण दिसते, ढीग दिसतात; ते केवळ पैशांच्या प्रभुत्वामुळे! रहस्यमय, जादूची, हिंसक घटनांनी भरलेली आणि दैनिक वृत्तपत्राप्रमाणे प्रवासातही वाचता येतील, अशी स्वस्त व सुमार दर्जाची पुस्तके सर्वत्र मोठ्या संख्येने आढळून येतात. अशा अमर्याद पुस्तक समुदायातून एखाद्या उत्तम लेखकाचे साहित्यात अढळ स्थान असणारे, विचारांना चालना देणारे पुस्तक मोठ्या कष्टानेच हुडकून काढावे लागते. साहित्याचा दर्जा खाली आणणाऱ्या अशा व्यावसायिक लेखकांचा त्यात अंतर्भाव असतो. जे रोज एक पुस्तक लिहिणारेसुद्धा असतात. त्यांना पैसा पाहिजे असतो आणि

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रकाशकांना नित्य नवा 'माल' पाहिजे असतो. अशा तऱ्हेने वनस्पती तेलात बनवलेल्या मिठाईप्रमाणे 'घासलेटी' साहित्याची बाजारात तेजी आहे. सिनेगीतांनी रागांवर आधारित गीतांचा आवाज दाबून टाकावा; त्याप्रमाणे स्वस्त म्हणवल्या जाणाऱ्या व या विकल्या जाणाऱ्या साहित्याने उत्तम साहित्याला अडगळीत घालण्यात आपले कौशल्य दाखवले आहे.

आज जे नैतिक अध:पतन झाले आहे, त्याचे ५० टक्के कारण सिनेजगत आहे, तर ५० टक्के अशा स्वस्त पुस्तकांचे बुक स्टॉल आहेत, हे म्हणणे उचित (तर्कसंगत) आहे. जनतेच्या हाती विषाक्त अनैतिक कथानके पोहोचवणारे ते गंभीर अपराधी आहेत. ज्या राष्ट्रातील शिक्षण क्षेत्र एवढे अनियंत्रित असेल तर मग 'रीटा' आणि 'सीता' यांच्या सन्मानाचा प्रश्न उपस्थित झाला तर 'रीटा'लाच समर्थकांची जास्त मते मिळतील, यात नवल ते काय?

खरे पाहता लेखन हे एवढे सरळ-सोपे नाही. वर्षानुवर्षे तप-स्वाध्याय करूनही त्याचे परिणामस्वरूप लेखन करण्याचे धाडस फार थोड्यांना असते. प्राचीन वाङ्मयाचे निरीक्षण केले तर कळते की एकेक ग्रंथ लिहिण्यासाठी ग्रंथकाराने आपले पूर्ण आयुष्य घालवले आहे आणि कधीकधी तर आयुष्य संपून जाई तरी ग्रंथ पूर्ण होऊ शकत नसे. प्रसिद्ध गद्य संस्कृत साहित्यिक भट्टारक बाणभट्ट यांची 'कादंबरी' ही साहित्यकृती अपुरी राहिली, ती बाणाच्या मुलाने पूर्ण केली. आचार्य जिनसेन संपूर्ण 'महापुराण' नाही लिहू शकले, म्हणून त्यांचा शिष्य गुणभद्र याने 'उत्तरपुराण' लिहून ते कार्य पूर्ण केले. आचार्य अकलंक तीनच ग्रंथ लिहू शकले; पण आज? आज अनेक लेखक काही दिवसांतच एक पूर्ण ग्रंथ लिहू शकतात. तसा त्यांना सराव आहे. हा विरोधाभास काय दर्शवितो? कोणत्या गोष्टीकडे लक्ष वेधतो? याचा अर्थ असा घ्यावा का की लेखनाचे कौशल्य, प्राचुर्य आधुनिकांकडे जास्त आहे आणि पूर्वीचे कमी प्रतीचे लिहीत? विचार केल्यानंतर या निष्कर्षाप्रत आपण येतो की, आधुनिक साहित्यिक, लेखक यांचे लेखन पुढील विभागात विभाजित झालेले आहे.

अधिकांश लेखक पूर्वी होऊन गेलेल्या लेखकांच्या संदर्भावरच अवलंबून लेखन करणारे आहेत. जर ते टीकाकार असतील तर त्यांना अगदी सहजपणे पाटी व पेन्सिल या सोयी उपलब्ध आहेत. त्या आधाराने ते लेखन करीत राहतात व स्वत:च्या लेखन-प्रवृत्तीला प्रेरणा देत राहतात. तसे ते स्वतंत्रपणे काहीच लिहीत नाहीत. परंतु, स्वतंत्रपणे लिहिलेल्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कृतींवर आपले मत प्रदर्शित करीत अनेक ग्रंथांचे लेखक होण्याचे सौभाग्य प्राप्त करतात. प्राचीन लेखन-विभागानुसार यांना मल्लिनाथ परिवाराचे म्हटले पाहिजे. मल्लिनाथांनी आपल्या टीकांच्या प्रारंभी साधारणपणे असे लिहिले आहे की, 'नामूलं लिख्यते किंचिन्नानपेक्षितमुच्यते' - जे मुळातच अस्तित्वात नाही, ते मी लिहिणार नाही आणि ज्याची अपेक्षा नाही तेही मी लिहिलेले नाही. आधुनिक लेखकांमध्ये मूळ लेखनापेक्षा प्रतिपादन केलेल्या विषयाशी संबंधित त्या विषयाचे निरूपण करण्याची प्रवृत्ती वाढतांना दिसून येते आणि एवढ्याच फरकाने ते मल्लिनाथ परिवाराच्या पुढचे मानले जातात. जे मान्यवर लेखक आहेत; ते पंडित जगन्नाथांच्या मार्गाने जाणारे आहेत. पंडितराजांनी 'रसगंगाधर'मध्ये प्रतिज्ञापूर्वक लिहिले आहे की ''कस्तुरी ज्याच्या नाभीमध्ये आहे, तो हरीण अन्य कुठला सुवास घेण्याची इच्छा बाळगेलच कशाला? मी माझ्या साहित्यात मौल्यवान विचारांची मांडणी तर केलीच आहे आणि त्याचबरोबर त्यांना साजेशी अशी स्वनिर्मित उदाहरणेही दिली आहेत.'' त्यांची ही घोषणा साहित्यविश्वात नवीन आहे. असे मौलिक विचारवंत जीवनात एकदोनच लेखनकृती वाचकांना देतात, पण, त्या रचनांमध्ये जे गांभीर्य, जे वैशिष्ट्य व जी मूल्ये आढळून येतात, ती अन्यत्र मिळणे दुर्लभ आहे. या दृष्टीने प्राचीन साहित्यिकांनी जेवढे लिहिले; त्याचे परीक्षण आधुनिक लेखक करीत आहेत आणि त्या महत्त्वपूर्ण चिंतनावर पुनश्च अनुचिंतन/फेरविचार/विचारमंथन करणाऱ्यांची लेखनपद्धत आज जास्त दिसून येते.

ही लेखनकला स्वाध्याय, शक्ती आणि चौफेर ज्ञानाने प्राप्त होते. कठोर परिश्रम घेत ज्याने स्वाध्याय केला नाही; त्या साधनेतून प्राप्त झालेले ज्ञान ज्याने पचवले नाही, तो कुशल लेखक होऊ शकत नाही. ज्याने कधी ध्यानस्थ होऊन लेखनाच्या विषयाचे सर्वांगदर्शन स्वत:ला घडवले नाही, तो त्या विषयाचे परिपूर्ण वर्णन करू शकेल काय? या पूर्णत्वाच्या प्राप्तीसाठी प्राचीन काळचे लेखक चिंतन करण्यात युग खर्च करीत. सत्याचा साक्षात्कार झाल्यावरच प्रतिपाद्य विषयाच्या लेखनाचा शुभारंभ करीत. तेव्हासुद्धा ते 'मंगलाचरण' करायला विसरत नसत. असे वाटते की हे सर्व करीत असताना त्यांना जणू 'दिव्यध्वनी' ऐकू येत असावा. लिहितेवेळी भाषा, भाव, शैली व अल्पाक्षरत्व यांचे सौष्ठव सुरक्षित/अबाधित राहावे, म्हणून ते पूर्ण दक्षता बाळगत. या निष्ठेमुळेच सरस्वती त्यांच्यावर प्रसन्न होती.

परिणामी भवभूतीसारखे महाकवी लिहायचे- 'ऋषीनां पुनराद्यानां वाचमर्थोऽनुधावति'। प्राचीन ऋषीमुनींच्या वाणीच्या मागे अर्थ धावत येत असत. आजकाल अर्थाच्या मागे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वाणी क्वचितच अवतरताना दिसते. पूर्वीच्या सिद्ध वक्त्याने 'हिंस'च्या ऐवजी 'सिंह' म्हटले व अर्थ सिंहाला अनुसरून होत गेला. असे सर्व तंत्र-स्वतंत्र वाणीचे धनी लेखनकलेमध्ये नवे प्राण फुंकतात. गंगेचे प्रवाह जसे आपापला मार्ग निवडत, तयार करीत पुढे जात राहतात; तशी त्यांची वाणी अस्खलित प्रवाहाने नवेनवे शब्द बनवत, अक्षरविन्यास करीत पुढे जात राहिली. धवला, जयधवला व महाधवला अशा महान शास्त्रांचे लेखन तप:सिद्धीशिवाय कोण करू शकत होते? महाकवी गुणाढ्य यांनी 'बृहद्‌कथा' ग्रंथ लिहिला आणि तो ऐकवण्यासाठी त्या वेळच्या कोण्या एका राजाच्या सभेत तो गेला. परंतु, ग्रंथ गुणाढ्याने पैशाची भाषेत लिहिला असल्याने राजाने ऐकण्यास नकार दिला. त्यामुळे गुणाढ्याला एवढे दु:ख झाले की, तो वनामध्ये एकान्तात जाऊन बसला. त्याने पाने एकत्रित केली, अग्नी प्रज्वलित केला व ग्रथाचे एकेक पान वाचून तो त्या आगीत टाकू लागला. पाहतापाहता त्या साहित्यकृतीचा दोनतृतीयांश भाग आगीत जळून गेला. फक्त एक भाग तेवढा वाचला. 'महापुराण' लिहिणाऱ्या लेखकाने मोठ्या आदरपूर्वक गुणाढ्याचे स्मरण केले आहे. आज संपूर्ण विश्वात प्रचलित असलेले पंचतंत्र आणि इतरही अशाच विस्तृत कथांचा आधार 'बृहद्‌कथा' हाच आहे. लेखणीचे असे स्वाभिमानी धनी आज आहेत कुठे? ज्यांच्या अंशमात्र शिल्लक रचनेचा आधार घेऊन युगान्तापर्यंत साहित्य लिहिले जात राहील, असे लेखक आज आहेत कुठे? ते सुकीर्ति कलहंस (लेखक) तर फार थोडे पाणी शिल्लक असलेल्या मानस सरोवरातून जवळजवळ अदृश्यच झाले आहेत. त्यांची लेखणी तर सर्व रसांमध्ये जणू न्हाऊनच निघत असे. जर शृंगाररसाचे वर्णन करायचे असेल तर साक्षात रती-कामदेव यांना आपल्या लेखणीच्या टोकावर ते ठेवत असत. जर त्यांची लेखणी वैराग्यधारेत न्हात असेल तर लोक वीतरागी होऊन निर्ग्रंथमुद्रा धारण करण्यास सज्ज होऊन उठत. 'अपि ग्रावा रोदित्यपि दलति वज्रस्य हृदयम्'। - त्यांच्या वाग्धारेने पाषाण रडू लागत व वज्रासारखे हृदयेही विरघळून जात. स्वत:च्या वाङ्मय तपस्येवर त्यांचा पूर्ण विश्वास होता. त्यांच्या प्रतिभेचे पात्र इतके परिपूर्णत: भरलेले असे की, नेहमीच्या बोलण्यातसुद्धा त्यांच्या प्रतिभेच्या आविष्काराचा रस ओसंडत राही. सूक्ते आणि सुभाषितांच्या रूपात लिहिले गेलेले त्यांचे साहित्य आजसुद्धा सहृदय लोकांच्या गळ्यातील ताईत बनून राहिले आहे. ते त्या साहित्यास वाणीचा शृंगार मानतात.

वर्ण्य विषय वाचकाला समजला पाहिजे, हे लेखनकलेचे पहिले वैशिष्ट्य मानले जाते. तो जर प्रांजळ भाषेतून, सुबोध शैलीतून प्रतिपादन केला नसेल तर मग- 'यत् स्वयं

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

लिखति तत् परो न वाचयति' - जे स्वतः लिहितो; ते दुसरा वाचू शकत नाही - हा दोष लागतो. म्हणून, लेखकाने साध्या सहज भाषेतून विषय मांडला पाहिजे. ज्या विषयावर लिहिण्यासाठी त्याने लेखणी उचलली आहे; त्या विषयाचे त्याने गांभीर्याने चिंतन करणे आवश्यक आहे. कुलवधूच्या अंगावर जर फाटके कपडे, चिंध्या असतील तर अब्रू जाते ती कुळाची/घराण्याची! त्याचप्रमाणे, ज्ञान परिपक्व नसेल तर कोणत्याही विषयाचे अपूर्ण विवेचन केल्यास वक्त्याच्या विद्वत्तेचा उपहासच केला जातो. ज्ञानाच्या क्षेत्रात 'हो' किंवा 'नाही' - स्वीकार किंवा निषेध यामध्ये उत्तर देणे अपेक्षित असते. अल्पज्ञतेला इथे जागाच नाही. थोडेसे जाणणे आणि काहीच न जाणणे हानिकारक आहे. अल्पज्ञानापेक्षा अज्ञान बरे. परंतु, ज्या विषयाचे ज्ञान असणे आवश्यक आहे; ते आंशिक स्वरूपाचे नसावे. एकतर, लेखणी हातात घेऊ नका किंवा मग जर ती उचलायचीच असेल तर त्या विषयाचे सर्वांगाने ज्ञान आत्मसात करण्याचा अधिकार मिळवलाच पाहिजे. सर्वांगपूर्ण लेखनकृतीचाच विद्वान मंडळीत आदर होतो. अर्धवट माहिती ही भयावह समजली जाते. 'अल्पयोग्यता भयप्रद आहे-' अशी एक परभाषेतील म्हण आहे. लेखनातील कलात्मकतेची सुरक्षितता एका गोष्टीवर जास्त अवलंबून आहे. ती म्हणजे लेखनकलेला व्यवसायाचे रूप न देणे. कारण, व्यवसाय नेहमी पैसा मिळवण्यासाठीच केला जातो आणि कोणतीही व्यक्ती मग अर्थसाधनेचा विस्तार करू इच्छिते. तो विस्तार असा व्यवसायाच्या तराजूत बसवला की, मग तो संख्येत, मात्रेतच मोजला जातो; तो दर्जात्मक होऊ शकत नाही. संख्या (क्वान्टिटी) तर वाढेल; परंतु स्तर/दर्जा (क्वालिटी) मात्र घसरते.

याउलट, 'स्वान्तसुखाय'- स्वतःच्या आनंदासाठी ज्या व्यक्ती लिहितात; त्यांच्या साहित्याच्या दर्जाचे आपोआपच रक्षण होते. जेवढे म्हणून शास्त्रीय सिद्धान्त-लक्षण ग्रंथ आहेत; त्या ग्रंथांमधील ओळ अन् ओळ उद्देशास अनुसरते आणि त्यातील अनेक पदांवर टीकाकारांनी, व्याख्यात्यांनी आणि आलोचकांनी विचारविमर्श केलेला आहे. 'सम्यग्दर्शनज्ञानचरित्राणि' या पदात 'सम्यक्' का लिहिले. 'चारित्राणि' हा बहुवचनी शब्द का वापरला इत्यादी कीस पाडणाऱ्या टीकाकारांनी त्यांच्या सूत्रांवर, श्लोकांवर/पदांवर, शब्दाब्दावर खूप विचार केला आहे. पण, आज तर एका वाक्यात संपवता येईल, अशा विषयाचा पानभर विस्तार केला जातो आणि त्यालाच रचनाकाराचे कौशल्य म्हटले जाते. जर, त्यासंबंधी बोलायचेच झाले तर अशा कृतींच्या पानांचे ओळींमध्ये व ओळींचे काही शब्दांत रूपांतर करून ती कृती संक्षिप्त करता येते. स्टीफन ज्विंग नावाच्या एका

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पाश्चिमात्य लेखकाने म्हटले आहे की, मी जेव्हा माझ्या पुस्तकाचे परीक्षण करतो तेव्हा त्यातील अर्धीच पाने फक्त आवश्यक वाटतात. त्याच्या पत्नीने एकदा त्याला खूप प्रसन्न असे बघितले व आज प्रसन्न कसे म्हणून विचारले; तेव्हा तो म्हणाला की, आज मी माझ्या ग्रंथातील एक संपूर्ण प्रकरणच काढून टाकले आहे आणि तरीसुद्धा मूळ कथेला काहीच कमतरता वाटत नाही. पूर्वीच्या काळी भारतीयही अशाच प्रकारे लिहीत असत व ते त्याबाबत समाधानी असत. सूत्रशैलीमध्ये लिहिणे, ही विद्वानांची विशेषता होती. याचे एक कारण असे होते की, सूत्रबद्ध लिहिण्यात वेळ कमी खर्च होई. दुसरे कारण असे की, शिष्यवृंदाला ती सूत्रे पाठ करायला सोपी वाटत असत. शिष्य ती सूत्रे फार जलद पाठ करीत. त्यामुळे गुरू आणि शिष्य दोघांचाही वेळ वाचत असे. आज या दृष्टीने पाहता वेळेचे मूल्य कमी झाले आहे. रेल्वेत, प्रवासात, रात्री अंथरुणाजवळ लाइट लावून मोठीमोठी पुस्तके वाचण्याची लोकांना सवय होत चालली आहे.

लेखन म्हणजे चिंतनाची सावली आणि चिंतन हे लेखनाचे शरीर आहे. जशी शरीराशिवाय सावली नाही, तसे चिंतनाशिवाय लेखणी हातात घेता येणार नाही. चिंतनामध्ये विचारांची गुंफण केली जाते आणि लेखणीद्वारे त्यांना अभिव्यक्त केले जाते. जे विचार डोक्यात रुंजी घालत राहतात, तेच लेखणीमुळे कागदावर उतरून आकार ग्रहण करतात. म्हणूनच, लेखन करण्यापूर्वी डोक्यात विचार संग्रहित होणे अत्यंत आवश्यक आहे. विचारांचे संकलन करण्यासाठी मेंदू नवचिंतनामध्ये सदैव निमग्न असला पाहिजे आणि नवचिंतन हे तपाने, स्वाध्यायानेच शक्य होते. जी व्यक्ती उत्तम स्वाध्याय करीत नाही, ती उत्तम लेखक बनू शकत नाही. लेखन आणि स्वाध्याय यांच्यामध्ये कार्यकारणसंबंध आहे. हे जर लक्षात घेतले तर लेखक मंडळींची दिनचर्या सर्वसाधारण लोकांपेक्षा खूप वेगळी असते, याचे आश्चर्य वाटायला नको. गीतेमध्ये म्हटले आहे- 'यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः' - ज्या वेळी (दिवसा) सर्व प्राणी जागे असतात, त्यावेळेला मुनी (मननशील चिंतक) रात्र समजतात. याचा अर्थ असा की ज्यावेळी सगळी दुनिया/सगळे प्राणिमात्र कोलाहलात बुडालेले असतात; तेव्हा झोप घेऊन शरीराची विश्रांतीची गरज पूर्ण केली पाहिजे; आणि रात्री जेव्हा सगळे प्राणिमात्र झोपतात; तेव्हा त्या निःस्तब्ध, प्रशांत वेळी तत्त्वचिंतन केले पाहिजे. याचा दुसराही एक अर्थ असा की, सामान्य संसारी जीव ज्यावेळी आहार-विहार, आमोद-प्रमोद या क्रियांमध्ये गुंतलेला असतो; त्या काळामध्ये मुनी रात्रीच्या वैराग्याचे, अज्ञानाच्या सद्भावांचे चिंतन करतो

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आणि जग ज्या तत्त्वचिंतनाची उपेक्षा करते; तेव्हा मुनी सूक्ष्म दृष्टींने त्याचे संशोधन करीत असतो. अनादिकाळापासून विचारवंत, चिंतक, लेखक व विद्वान यांच्या दिवसरात्रीच्या चर्येमध्ये व सामान्यजनांची दिनचर्या यात फरक आढळून येत आला आहे. अगदी तराजू हातात घेऊन यश मिळवण्याची इच्छा धरणाऱ्यांच्या बाबतीत हा भेद सदैव राहणारच आहे. हे तर एखाद्या दैनिक वृत्तपत्राचा संपादकही सांगू शकतो की दररोज एका दैनिकात जेवढी सारी छपाई होते; त्यापेक्षा श्रेष्ठ लेखन करण्यास अनेक दिवस लागतात. कारण, 'अनुज्झितार्थ सम्बध: प्रबंधो दुरुदाहर:'- शाश्वत, वाचनीय साहित्याच्या क्रमबद्धतेविषयी बोलणे-लिहिणे कठीण आहे. झाडाची नवी पालवी वसंत ऋतूच्या आगमनानंतरच फुटते, त्याप्रमाणे दीर्घकाळपर्यंत साधना केल्यानंतरच श्रेष्ठ, मौल्यवान साहित्य निर्माण होते.

लेखनकला ही विद्वत्तेची कसोटीच आहे. आपलेच विचार जेव्हा कागदावर शब्दांकित करावयाचे असतील तर त्या विचारांची क्रमबद्धता, वाक्यरचना आणि अनुरूप अशी शब्दांची निवड हे अवघड होऊन जाते आणि असेही वाटते की, जसा विचार केला होता, तसे लिहिले गेले नाही. कारण, लेखन ही एक कला आहे. चित्रकलेसारखी आहे ती! तिचे व्याकरण, शैली, मांडणी ह्याचे प्रत्येकाचे वेगळे वैशिष्ट्य आहे. बरेचसे लोक आपले विचार वेगाने/घाईघाईने बोलून दाखवतात, ऐकवतात. पण, लिहिताना मात्र ते विसरून जातात. एखाद्या नव्याने भाषण करणाऱ्याला जसा मंचज्वर (स्टेज-फीव्हर) होतो; तसा जो लेखक नसतो, त्यालाही लिहिताना पेपर फीव्हर होतो. कुशल लेखक व्हायचे असेल तर अनेक वर्षे निबंध लिहिण्याचा सराव केला जातो. संदर्भ-ग्रंथालयात जाऊन हजारो पुस्तकांचा अभ्यास करणे, टिपणे काढणे, हे सगळे करावे लागते. अशा परिपक्व/विकसित लेखणीतून जे साहित्य प्रसवते; ते युगानुयुगे वाचनीय ठरते आणि त्यातून मग अभ्यासकांना विपुल सामग्री मिळत राहते. या सर्व गोष्टी प्राप्त झाल्याशिवाय जे भराभरा लिहीत राहतात; त्यांचे वर्णन 'हर्षचरित'च्या प्रस्तावनेत केलेले पाहावयास मिळते. त्यात त्यांना लहान मूल म्हणत व जननी-राग-हेतू (जन-नीराग-हेतू) असेही म्हटले आहे.

श्रेष्ठ लेखन तर सदासर्वदा आदरणीयच मानले गेले आहे आणि त्यास सरस्वतीचा दुर्लभ प्रसादही मानलेले आहे.

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वक्तृत्वकला

वक्तृत्वावरून वक्त्याची ओळख पटते. वाणी वक्त्याच्या व्यक्तित्वाची अभिव्यक्ती करते. कोण काय आहे, याचा परिचय त्याच्या बोलण्यावरूनच होतो. मनुष्याच्या मनात प्रकटीकरणाची अदम्य इच्छा असते. ज्या संस्कारामध्ये त्याचे पालन-पोषण झालेले असते; तेच संस्कार तो आपल्या व्यवहारातून प्रकट करीत असतो. हा सिद्धान्त केवळ वक्तृत्वापुरताच मर्यादित नाही; तर व्यक्तीच्या सर्वच प्रकारच्या वागण्यातून प्रतिबिंबित होत असतो. वाणीद्वारे त्याची विद्वत्ता, आचरणातून त्याचे संस्कार, व्यवहारातून स्वभाव, खाण्यापिण्यातून धार्मिक विचार आणि संगीताद्वारे त्याचे गुण-दोष सहज प्रतित होतात.

जो विद्वान असतो तो हीन भाषा, अपशब्द, कटुशब्द यांचा वापर कधीच करीत नाही. शब्दांचे विपुल समृद्ध भांडार एखाद्या दुकानासारखे आहे; जिथे खरेदीदार आपल्या पसंतीचे शब्द खरेदी करतात. तिथून तो कोणत्या दर्जाचे शब्द निवडतो तेवढ्यावरून ती व्यक्ती कशी असावी, याचा बोध होतो. कारण, प्रत्येक जण आपल्या आवडीची पूर्ती करीत असतो. आवडीची वस्तू घ्यायला तो तत्पर असतो. एखाद्या जलाशयात राजहंस व डुक्कर दोघेही जेव्हा प्रवेश करतात; तेव्हा राजहंस तळ्याच्या निर्मळ पाण्यावर पोहतो; तर डुक्कर मात्र तळ्याच्या चिखलात शिरून आपले सर्वांग माखून घेते. आपापल्या स्वभावानुसार निर्मळ, स्वच्छ पाणी व चिखल दोघांनाही प्रिय आहे.

हे जाणूनच एका नीतिज्ञाने म्हटले आहे- 'कासारेऽपि प्रविष्टः कोलः कर्दमं गवेषयति।' हा रुचिभेद, आवडीनिवडीतली ही भिन्नताच व्यक्तीव्यक्तीच्या व्यक्तिमत्त्वातील न्यून-अधिक किंवा श्रेष्ठपणा-कनिष्ठपणा ठरवत असते. एका कवीने म्हटले आहे की, उच्च कुळात जन्मलेल्या व्यक्तीच्या तळहातावर कमळाचे फूल नसते की, अनौरस अपत्याच्या शिरावर शिंगेही उगवलेली नसतात. सामान्यतः ती दोघेही सारखेच वाटतात. परंतु, जेव्हाजेव्हा

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्यांच्यापैकी कोणी बोलायला लागतो; तेव्हातेव्हा त्यांच्या जातिकुळाचा पत्ता आपोआप लागतो.[१] शब्दांच्या राशीमधून भाव व्यक्त करण्यासाठी उत्तम शब्दांची निवड करणे, हे वक्त्याच्या उत्तम मनाचे लक्षण आहे.

एका गुरूजवळ दोन शिष्य व्याकरण व साहित्य (काव्य) या विषयांचे अध्ययन करीत होते. त्यांच्या भाषेची परीक्षा घेण्यासाठी एक दिवस गुरूंनी समोरच्याच एका निष्पर्ण वृक्षाकडे निर्देश केला व त्यांना म्हटले- 'इथे हा जो सुकलेला वृक्ष आहे, याचे संस्कृतमधून वर्णन करा.' वैयाकरणाने-व्याकरणकाने म्हटले- 'शुष्को वृक्षस्तिष्ठत्यग्रे' आणि साहित्याच्या अभ्यासकाने कोमलकान्तपदावलीचा, मृदू भाषेचा वापर करीत वर्णन केले- 'नीरसतरुरिह विलसति पुरतः।' व्याकरण जाणणाऱ्याने रसमय शब्दांचा प्रयोग करणे शिकलेलेच नव्हते. म्हणूनच त्याने कठोर, संधियुक्त आणि जोडशब्दांनीयुक्त अशा जड भाषेत वर्णन केले आणि काव्याचा अभ्यास करणाऱ्या शिष्याने मृदू, मोजक्या शब्दांची निवड करीत त्या नीरस/शुष्क वृक्षाला वाणीरसाने चिंब करून टाकले.

वास्तविक पाहता लोकव्यवहार हा वाणीच्या कोमलतेवर अवलंबून असतो. पण, त्या कोमलतेत दयनीयतेचे मिश्रण असू नये. कोमलतेत दयनीयता असेल तर ती कोमलतेला बाधा आणते. दुर्बलतेसहित - केलेली क्षमा जशी भ्याडपणा मानली जाते तद्वत कोमलतेमध्ये दया डोकावली की, ती तिच्या मृदुतेला निष्प्रभ करते. उत्तम वक्ते हा फरक कायम मनात बाळगून असतात. त्यांनी वापरलेले शब्द हे कोमल असू शकतात, पण त्यात भीरूता नसते. त्यांचे अर्थ दुर्बळ नसतात. उलट, ते निर्मळ व अगाध असतात. एक वचन आहे की, राजहंस पक्षी आपल्या सहज स्वरात जसा कर्णमधुर कूजन करतो, तसे १०० वर्षे सराव करूनही बगळा करू शकणार आहे का?[२] खरेतर, मोरपिसाला जशी धूळ लागत नाही, कमलपुष्पाला चिखल स्पर्श करू शकत नाही. तसे उत्तम वक्त्याच्या जिभेला दुष्ट, अपशब्द स्पर्श करू शकत नाही, उलटपक्षी पवित्र, परिपूर्ण तलावाला राजहंस पक्षी जसे घेरून टाकतात; त्याप्रमाणे उत्तम वक्त्याच्या जिव्हा-सरोवराच्या काठी बसण्यासाठी सुसंस्कृत शब्दांच्या राशी अवतीर्ण होत राहतात. मग, वक्ता त्या शब्दविहंगाच्या पंखांवर आपले

---

१. 'कुलप्रसूतस्य न पाणिपद्मं न जारजातस्य शिरोविषाणम्।
यदा यदा मुंचति वाक्यावाणं तदा तदा जातिकुलप्रमाणम्॥'

२. 'हेलया राजहंसेन यत् कृतं कलकूजितम्
तादृग् वर्षशतेनापि जानात्याशिक्षितुं बकः॥'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

समृद्ध विचार, भावना विराजित करतो आणि श्रोत्यांच्या देशात पोहोचतो. त्या शब्दांतून वक्त्याच्या मनाचे प्रतिबिंब दडलेले असते. त्यातून समर्थ वाणीवैभवाचा संकेत मिळतो.

वाणी शब्दात 'वाण' शब्द समाविष्ट आहे. दुःख देणारी गर्वपूर्णवाणी 'बाण' नाहीतर मग काय आहे? भर्तृहरी म्हणतो- 'वाक्शल्यो हि निर्हर्तु न शक्यः स हि हृच्छयः'- शस्त्रास्त्रे घुसली तर ती उपसून काढता येतात; पण वाणीने केलेली जखम थेट हृदयातच प्रवेश करते. त्या शब्दशरांना तेथून बाहेर काढणे कठीणच आहे. कदाचित, हेच कारण असावे की, जिभेची रचना मृदू आहे. उत्तम साधू, वक्ता त्या मृदुजिव्हेत आपल्या अंतःकरणाचे माधुर्य मिसळतात आणि मग श्रोत्यांना त्यांचे बोलणे साखरेत घोळलेले/शर्करावगुंठित असे वाटते. संतांच्या अशा मधुर बोलण्याला महाकवी बाणाने मणिनूपुर असे म्हटले आहे. त्यांचा आवाज ऐकून मनाला आल्हाद वाटतो. 'मनस्तु साधुध्वनिभिः पदे पदे हरन्ति सन्तो मणिनुपूरा इव'

वाणीचा सम्यक्, योग्य, उत्तम प्रयोग समाजात प्रतिष्ठा मिळवून देतो आणि आत्म्याला सुख-शांती देतो. म्हणून, एखाद्या अश्वाप्रमाणे वाणीला बांधून ठेवले पाहिजे आणि जेव्हा बोलणे अत्यावश्यक होईल; तेव्हा एखाद्या उत्तम अश्वारोह्याप्रमाणे त्या वाचारूपी रथाच्या गतीला ताब्यात ठेवून भाषण करणे उपयुक्त आहे. वाणीच्या प्रयोगाने स्वतःला, ती ऐकून श्रोत्यांना आनंद मिळाला नाहीतर बोलण्याचे श्रम केवळ व्यर्थच नाही जाणार तर अहितकारकही ठरतील. याबाबत, हिंदी कवीची पद्यपंक्ती अगदी योग्य आहे, त्यात तो गोड शब्दांत वक्त्याला सल्ला देतो की, मनातील दुरावा दूर ठेवून असे शब्द त्याने बोलावे की, ते ऐकून श्रोत्यांचे मन शीतलतने संतुष्ट व्हावे.

'ऐसी वाणी बोलिए मन का आपा खोय ।
औरन को शीतल करे आपहु शीतल होय ।।'

वाणीचा प्रयोग जेव्हा सार्वजनिक मंचावर करावयाचा असेल; तेव्हा जबाबदारी आणखीनच वाढते. कारण, सभेमध्ये श्रद्धाळू, टीकाकार, दोष दाखवणारे, विरोधी मताचे आणि कुठलाच सिद्धान्त न मानणारे, स्वैर विचारांचे असे सर्व प्रकारचे लोक एकत्रित आलेले असतात. जर तिथे वाणी आणि विचारांचे संतुलन राखता आले नाही; तर दोरीवरून चालणाऱ्या नटासारखी उंचीवरून स्थिर चाल राखत पुढेपुढे जाणे अशक्य होते. म्हणूनच आत्मीय, आपले, परके, विद्वान, दोष काढणारे आणि निरक्षर या सर्वांच्या मनाला आनंदित करू शकणारी, आकर्षित करू शकणारी वाणी जी आहे; तिला 'सभायोग्य' या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विशेषणाने सन्मानित केले जाऊ शकते.[३] सभेचे हे शास्त्र जाणून न घेता वक्त्याने वक्तृत्व केले तर ते अयोग्य, अस्थानी ठरते आणि 'श्रम एव हि केवलम्' - ही केवळ कसरत आहे, असेही म्हटले जाऊ शकते. त्या वाणीचा उद्देश श्रोत्यांचे प्रबोधन करणे हा आहे. जर तो सिद्धीस गेला नाही तर तो श्रममात्रच ठरतो.

ताप दूर करायचा तर दिल्या जाणाऱ्या क्विनाइनच्या गोळीला शर्करावगुंठित करावे लागते. कोणाला उपदेश द्यायचा असेल तेव्हाही भाषेचे सौष्ठव आणि वाणीचे माधुर्य खंडित व्हायला नको. सगळे जग मधुर वाणी ऐकू इच्छिते. चंदनाची शीतलता, मण्यांची तेजस्विता, चंद्राची प्रसन्नता, मालतीपुष्पांच्या माळेचा सुगंध... या सगळ्यांची अपेक्षा जगाला वाणीमध्ये हवी असते. शास्त्रकारांचे तर असे मत आहे की चंदन, मणी/रत्ने, चंद्र, मालतीमाला यांच्यापेक्षाही अधिक सुख देणारी वाणी श्रुतिप्रिय आहे.[४] श्रुती म्हणजे शास्त्र आणि कानांनी जी वाणी ऐकली आहे; ती आप्तप्रणीतही असायला पाहिजे. ती श्रोत्यांसमोर मृदुल, हळुवार शब्दांत मांडली जावी; तरच श्रोत्यांना श्रवणसुख लाभते आणि त्यांना धार्मिकतेकडे वेधून घेण्यास समर्थ ठरते. शीतलजिनस्तोत्रात हाच आशय व्यक्त करणारे पद्य आहे. ते असे की, 'हे मुनिपरमेष्ठिन्!' आपल्या निष्पाप वाणीतून शांततेचे जल आम्हाला मिळते. ती वाणी इतकी शीतल आहे की चंदन, चंद्र, गंगाजल, मोत्यांच्या माळा यामध्येसुद्धा ती शीतलता नाही.[५] पं. दौलतरामजी 'छहढाला'मध्ये 'भाषा समिती' प्रकरणात मुनींची वाणी विश्वहितकर, अहिताचे निवारण करणारी, कर्णप्रिय, संशय दूर करणारी आहे असे सांगत ते पुढे सांगतात की, साधू-वक्त्यांचा चेहरा चंद्रासारखा आहे. त्यांची उपदेशपर वाणी भ्रमरूपी रोग दूर करणारी आणि अमृतरसाने ओथंबलेली आहे.[६] वक्त्यामध्ये जर वाणीचे माधुर्य नसेल तर त्याचे वचन हे तुपाच्या घागरीप्रमाणे आहे. जे विशुद्ध व शक्तिप्रद

---

३. 'तास्तु वाचः सभायोग्या याश्चित्ताकर्षणक्षमाः ।
स्वेषां परेषां विदुषां द्विषामविदुषामपि ।।'

४. 'न तथा चन्दनं चन्द्रो मणयो मालतीस्तजः ।
कुर्वन्ति निर्वृत्तिं पुंसां यथा वाणी श्रुतिप्रिया ।।' -ज्ञानार्णव, ९/२०

५. 'न शीतलाश्चन्दनचन्द्ररश्मयो न गांगमम्भो न च हारयष्टयः ।
यथा मुनेस्तेऽनघवाक्यरश्मयः शमाम्बुगर्भाः शिशिरा विपश्चिताम् ।।'

६. 'जग सुहितकर सब अहितहर श्रुतिसुखद सब संशय हरैं ।
भ्रमरोगहर जिनके वचन मुखचन्द्र तैं अमृत झरैं ।।' - छहढाला

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तर आहेच. परंतु ते प्यायल्यानंतर पचवणे ही बाब प्रत्येकाला सोपी नाही. अंशमात्र/थोडेसे तूप मिष्टान्नरूपात खाण्यास दिले तर ते उपभोग्य ठरते व पदार्थाची रूची वाढवते, म्हणून वक्तृत्वकलेमध्ये जाणकार असलेल्या वक्त्याने श्रोत्यांसमोर माधुर्यासह एवढेच बोलावे की जेवढे ते हृदयात ठेवून घेऊ शकतील आणि पचवू शकतील. शास्त्र-स्वाध्यायाची आन्हिक प्रक्रिया याच दैनंदिन कर्माची सूचक आहे. श्रोत्यांना दररोज नवे पद/काव्य, ज्ञानाचा नवा आविष्कार. मोजक्या प्रमाणात मिळाला पाहिजे. जर अनेक अध्याय एकाच दिवशी सांगितले गेले तर श्रोते ते ग्रहण करू शकत नाहीत. ही लोकशास्त्राची विशेष जाण आगमशास्त्राच्या विद्वान वक्त्यासाठी अत्यंत आवश्यक आहे.

'आत्मानुशासना'मध्ये वक्त्याच्या कार्याला असामान्य म्हटले आहे- धर्मकथा सांगण्यासाठी सभेत उच्चासनावर बसलेल्या व्यक्तीला आपल्या गुणांच्या उच्चतेचा परिचय करून देणे आवश्यक आहे. केवळ विद्वान असून चालणार नाही. श्रोत्यांचे लक्ष उपादेयाकडे प्रवृत्त करण्यासाठी लोकांना रंजक वाटतील अशा उपायांचाही आश्रय घेतला पाहिजे. असा वक्ता विद्वान असावा, विविध शास्त्रांचे मर्म त्यास ठाऊक असावे. लोकमानसाचा जाणकार असावा. निरपेक्ष वृत्तीचा असावा. प्रतिभावान, संयमी आणि संभाव्य प्रश्नचर्चेसंबंधी आधीच माहिती ठेवणारा, प्रश्नकर्त्यांचे समाधान करणारा असावा. त्याचबरोबर तो निर्भय असावा. स्थिरता त्याच्या मनात असावी; जेणेकरून तो प्रश्नांच्या सरबत्तीला घाबरून विचलित होणार नाही.

सभेवर अधिकारपूर्वक नियंत्रण ठेवण्यात तो कुशल असावा. आपल्या मधुर भाषणाने त्याने श्रोत्यांची मने जिंकून घ्यावीत आणि कोणावरही आक्षेप न घेता त्याने आपल्या विषयाचे समर्थन करावे... इतके सारे गुण एका वक्त्यामध्ये अपेक्षित आहेत.[७] अल्पश्रुत वक्त्याला विरोधी श्रोते शंकांनी गोंधळून टाकतात, विचलित करून टाकतात. या वक्तृत्वासंबंधी मार्गदर्शन करणारे एक सूत्र 'सर्वार्थसिद्धी'मध्ये आचार्यांनी दिले आहे- 'वाचना पृच्छनाऽनुप्रेक्षाऽऽम्नाय धर्मोपदेशाः' (९२५). हे सूत्र स्वाध्यायाच्या पाच विविधता सांगते. त्या अशा की, स्वाध्यायशील वक्त्याने सर्वप्रथम वाचना शिकावी. शंकेचे

---

७. 'प्राज्ञः प्राप्तसमस्तशास्त्रहृदयः प्रव्यक्तलोकस्थितिः
प्रास्ताशः प्रतिभापरः प्रशमवान् प्रागेव दृष्टोत्तरः ।।
प्रायः प्रश्नसहः प्रभु परमनोहारी परानिन्दया
ब्रूयाद् धर्मकथां गणी गुणनिधिः प्रस्पष्टमिष्टाक्षरः ।।' - आत्मानुशासन-४

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

निराकरण करण्यासाठी योग्य ते प्रश्न विचारावेत. वाचना आणि प्रश्नांनी परिपक्व झालेल्या पदार्थांच्या ज्ञानाचा मनाशी अभ्यास करावा. त्याचे चिंतन-मनन करावे. आपण लावलेला अर्थ आम्नायाच्या दृष्टीने विशुद्ध आहे ना, याची दक्षता घ्यावी. पदांच्या उच्चारणात अशुद्धपणा असेल तर तो दूर करावा आणि या चार प्रक्रियांमध्ये नैपुण्य मिळवले की, मग धर्मोपदेश द्यावा. अशा प्रकारे धर्मोपदेश शास्त्रमतानुसार स्वाध्यायाचेच एक अंग आहे.

त्याचबरोबर उपदेशकपदापर्यंत पोहोचण्यासाठी तो वक्त्याचा क्रमश: होणारा विकासही आहे. वक्ता होण्याअगोदर त्याने अभ्यास करावा. विविध ग्रंथांचे वाचन करावे. शंका असतील तर योग्य गुरूंकडून त्यांचे समाधान करून घ्यावे. चिंतन-मननाद्वारे अभ्यासिलेल्या विषयाला अधिक सशक्त बनवावे. त्यामध्ये उच्चारण दोष, आम्नायसंबंधी दोष असतील तर त्यांचे निवारण करावे आणि अशा रीतीने सर्वथैव प्रस्तुतीयोग्य बनून, सज्ज होऊन सभामंचाची शोभा वाढवावी. जे बोलण्याची अपेक्षा तर ठेवतात; पण त्यासंदर्भातील नियमांकडे मात्र दुर्लक्षच करतात, असे असिद्ध वक्ते (नवखे) भाषणकलेच्या अभावामुळे वक्तृत्वाच्या प्रांतात क्रांती करू शकत नाहीत. नवीन असे काही देऊ शकत नाहीत.

सामान्यत: असे लोक बोलतेवेळी मध्येमध्ये थांबतात, विषय स्थिरचित्ताने हाताळू शकत नाहीत. विषयांतर करतात. एकच गोष्ट पुन:पुन्हा बोलत राहतात. विषयाची क्रमबद्धता राखू शकत नाहीत. स्वत:च्या असमर्थतेला श्रोत्यांचीच अयोग्यता समजतात आणि मग शेवटी असफल ठरतात. समर्थ वक्ता जेव्हा बोलतो; तेव्हा टाचणी पडली तर ऐकू येईल एवढी शांतता असते. (सूचीपात नि:शब्द). लोकांची आवडनिवड ध्यानात घेऊन ते व्याख्यानासाठी विषयाची निवड करतात. 'किं मे जन:पश्यति भाव-भाषिते' यावर यांची अंतर्दृष्टी असते. 'माझे वक्तव्य ऐकून लोक कोणता विचार करीत आहेत' हे समर्थ वक्त्याला चटकन कळते. म्हणूनच लोखंड जसे चुंबकाकडे खेचले जाते; तसे अशा वक्त्याकडे लोक मनात कुतूहल घेऊन आकर्षिले जातात. त्यांची सगळी इंद्रिये जणू कानांत एकवटलेली असतात. वक्त्याचे अमृतवर्षा करणारे वक्तव्य कितीही वेळा ऐकले तरी त्यांची तृप्ती होत नाही.

अशी आकर्षक, चमत्कारी आणि आपले मत स्पष्टपणे प्रतिपादन करणारी वक्तृत्वशैली, वाणीचे सामर्थ्य एखाद्याला महद्भाग्यानेच लाभते. गंगेच्या प्रवाहासारखी अस्खलित/ प्रवाही, सागरीलाटांप्रमाणे प्रत्येक वेळी मोती घेऊन येणारी, वर्षा ऋतुतील मेघांच्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

गर्जनेप्रमाणे धीर-गंभीर आणि कमलपुष्पाप्रमाणे जलाशयाच्या अंतर्भागात प्रफुल्लित होणारी वाणी एखाद्या भाग्यवंतालाच मिळते.[८]

प्रत्येक वेळी उदार भावांनी युक्त व चमत्कारगर्भित तसेच भावना अभिव्यक्त करणारी निपुण वाणी शंभरातून एखाद्यालाच लाभते.[९] 'वक्ता दशसहस्त्रेषु' - १० हजार लोकांमध्ये एखादाच वक्ता असतो. हे प्रमाण वक्त्याच्या असामान्य स्थितीची ओळख करून देते. तसे पाहता प्रत्येक व्यक्तीजवळ बोलण्याचे सामर्थ्य असतेच; परंतु लोकांचे प्रबोधन करणारी वाणी सर्वांजवळ नसते. कावळ्याचा आवाज/बोलणे व कोकीळ पक्ष्याचे बोलणे यांच्यात जे स्वाभाविक अंतर आहे; तेच अंतर, तोच फरक वक्ता आणि अवक्ता यांच्यात नेहमीच राहणार आहे.[१०] हेच लक्षात घेऊन जुन्या सज्जनांनी वाणीला निर्दोष ठेवण्यासाठी काही उपाय सुचवले आहेत. त्यांनी म्हटले की, एक प्रवक्ता म्हणून सभांमध्ये जाऊ नये आणि जर स्वत:मध्ये शास्त्र, युक्ती, प्रमाण इत्यादींबाबतचे कुशल सामर्थ्य आहे तसेच सभाशास्त्र उत्तमपणे अवगत आहे; तर सभांमध्ये सहभागी होणे उचित आहे. तेथे ज्या एखाद्या विषयावर बोलणे आवश्यक असेल; तर सत्याला अनुसरून व धर्मयुक्तच बोलले पाहिजे. जी व्यक्ती गुरुपाठापासून (सभेमध्ये वक्त्याला व्यास, गुरू आणि त्याच्या आदरणीय स्थानास व्यासपीठ किंवा गुरुपीठ असे म्हणतात.) प्रतिपाद्य विषयाचे सत्य जाणूनही त्यासंबंधी मौन बाळगते किंवा यथार्थाला विकृत रूपात सादर करते, अशी व्यक्ती पापाची धनी होते.[११]

परंतु, या पापपुण्याचे आत्मपरीक्षण कोण करणार? बव्हतांश वक्ते तर वाणीचा वापर अधिकारपूर्वक करू शकत नाहीत. ते साधारणत: सभेत सहभागी होतात; ते आतापर्यंत न मिळवलेल्या यशप्रसिद्धीच्या प्राप्तीसाठी! कोणत्याही विषयाची संपूर्ण

---

८. 'गंगाप्रवाहसदृशी स्खलतिप्रहीणा मुक्तालसद्गतिरपांनिधिभंगिमेव ।
प्रावृट्पयोद इव धीररखाऽम्बुजन्मे-वोद्भेदिनी गुरुगिरा हि जलाशयानाम् ।।' - सुधासूक्ति शतकम्

९. 'शतादेकतमस्यैव सर्वोदारचमत्कृति: ।
ईप्सितार्थार्पणैकान्तदक्षा भवति भारती ।।' - योगवासिष्ठ

१०. 'काक: कृष्ण: पिक: कृष्ण: को भेद: पिककाकयो: ।
वसन्तसमये प्राप्ते काक: काक: पिक: पिक: ।।'

११. 'सभा वा न प्रवेष्टव्या प्रविष्टश्चेद् वदेद् वृषम् ।
अब्रुवन् विब्रुवन् वाऽपि नरो भवति किल्विषी ।।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

माहिती त्यांना नसते; तरीही सभेत बोलण्याची उत्कंठा त्यांना असते. ते जलहीन मेघासारखे असतात. वस्तुतः त्यांना वारिद न म्हणता वातुल म्हणणेच अधिक योग्य होईल. कारण, ते उगीचच आकाशात उंचउंच जाऊ पाहतात. ज्यांचे हृदय सारशून्य असते. जे कातडे ताणलेल्या नगाऱ्यासारखे आतून पोकळ असतात. असे मेघ व वक्ता आवाज तर खूप करतात, परंतु, पाण्याचा एक थेंब, जीवनाचा एक बिंदूसुद्धा देऊ शकत नाहीत. जे विश्वाच्या उद्धाराची क्षमता बाळगून असतात, पाण्याने परिपूर्ण अशा मेघांसारखे असतात; ते उत्तम वक्त्यांच्या पंगतीतले म्हणून गणले जातात. त्यांचा आत्मा आतूनच आर्द्र आहे. ते सर्वत्र आढळून येणे दुर्लभ आहे. त्यांच्या प्रत्येक शब्दात 'जीवन' असते व श्रोते त्यातून संजीवन प्राप्त करतात. त्यांच्या जिभेवर सम्यक्रस करुणेसह उपस्थित असतो आणि आपल्या मुखातून स्रवणाऱ्या पवित्र वाणी-निर्झराने ते श्रोत्यांच्या मनातील मालिन्य क्षणार्धात धुऊन काढतात.[१२] जर श्रोतृवृंदाला काही समजले नसेल आणि वक्ते महाशय आपल्या वाक्शौर्याचे तसेच अखंडपणे प्रदर्शन करीत राहिले तर ते प्रशंसनीय नाही. कारण, 'वक्तुरेव हि तज्जाड्यं यावत् श्रोता न बध्यते'- श्रोत्यांच्या वेळेलासुद्धा किंमत आहे, हे न समजणे म्हणजे विद्वत्तेचा अभाव आहे.

या कलियुगात माणसाचे स्वाध्यायबळ क्षीण झाले आहे आणि प्रकटीकरणाची इच्छा मात्र प्रबळ झाली आहे. अशा अभिव्यक्तीला प्रदर्शन म्हणणेच जास्त उचित होईल. व्यक्ती जशी नाही, तशी स्वतःला आज दाखवू पाहते, सिद्ध करू पाहते आहे. त्याच्या बाह्यवेशावरून (बहिरंगावरून), मिथ्या प्रदर्शित दर्पावरून त्याचा पुरावा मिळतो. पूर्वीच्या काळी लोक आहार-संयम, विहार-संयम, वाक्-संयम इत्यादी अनेक प्रकारच्या संयमाचे पालन करीत असत. संयमात संचय होई व आत्मशक्ती प्राप्त होई. आज व्यय करण्याची प्रवृत्ती जास्त आहे. लोक क्षणाक्षणाला व्यय/खर्च करीत आहेत आणि खिशात खर्चासाठी पैसे नसतील तर ऋणसुद्धा काढत आहेत. याचा अर्थ असा की, संचय तर दूरच परंतु खर्च करताकरता त्यांची व्ययशक्तीसुद्धा अपव्ययाच्या ताब्यात गेली आहे. खर्चासाठी आता तर कर्ज घेतले जाते आणि व्यसनांच्या पूर्तीसाठी माणसाचे प्रयत्न चालूच आहेत. म्हणून, असे चित्र आता समोर आहे की, एकेकाळी जेव्हा संयमामुळे लोकांजवळ त्यांचा पैसा सुरक्षित राहत होता. प्रसंग पडल्यावर ते त्या पैशांचा योग्य उपयोग समर्थपणे करू शकत होते,

---

१२. 'जना घनाश्च वाचालाः सुलभाः स्युर्वृथोत्थिताः ।
दुर्लभा अन्तरार्द्रास्ते जगदभ्युज्जिहीर्षवः ।।' - आत्मानुशासन

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्याचा आनंद घेऊ शकत होते; तेथे आज अगदी विपरीत स्थिती झाली आहे. एका नीतिज्ञाने म्हटले आहे की, जी व्यक्ती एका कवडीचाही अपव्यय करीत नाही; ती वेळ पडली तर लाखो रुपये खर्च करू शकते.[१३] कारण, त्यांच्याजवळ साठा/संचय असतो. संचयातून तर खर्च करू शकते. पण शून्याच्या पोकळीतून शिल्लक रुपये कसे मिळणार? आज लोक शून्याला दोहून दूध मिळवण्याची इच्छा बाळगतात. 'नभ दुह-दुध चहत अज्ञानी'- अशा लोकांच्या अज्ञानाची कीव करावीशी वाटते.

स्वाध्यायाचे विस्मरण म्हणजेच आकाशाचे दोहन करणे होय. सभेत जर काही बोलण्याची इच्छा असेल, तर स्वत:जवळ ते आधी विद्यमान असले पाहिजे. 'न हि शशऽविषाणं खपुष्पं वा दर्शयितुं समर्थः' कोणी सशाची शिंगे आणि आकाशपुष्प दाखवू शकतो का? स्वत:त जे नाही; त्यासंबंधीचे वक्तव्य कसे काय केले जाऊ शकते? संचय करण्याच्या प्रक्रियेची सुरुवात स्वाध्यायाने होते. 'धर्मश्रुतधनानां प्रतिदिनं लवोऽपि संगृह्यमाणो भवति समुद्राधिकः।' दररोज अगदी लवाएवढ्या सूक्ष्म प्रमाणात धर्म, धन आणि श्रुत (स्वाध्याय) यांचा संचय करत राहिला तर तो समुद्रापेक्षाही विशाल होऊन जातो. असा संचय करणारे स्वाध्यायी या कलियुगामध्ये दुर्लभ झाले आहेत. यासंबंधी खंत व्यक्त करतांना पं. आशाधरसुरींनी म्हटले आहे की- हे कलियुग पावसाळ्याप्रमाणे आहे. यात दिशा मिथ्यात्वाच्या मेघांनी झाकोळून गेल्या आहेत. चांगले उपदेशक काजव्याप्रमाणे क्वचित कुठे कुठे चमकतांना दिसतात.[१४] याचा अर्थ असा की, 'औपचारिक वक्तृत्व' वाढले आहे. सभामंचावर येऊन 'दोन शब्द' बोलण्याचा मोह वाढला आहे. श्री. 'अ' काही बोलले तर श्री. 'क' सुद्धा बोलणार आणि ते श्री 'ब' यांना बोलायची संधीच देणार नाहीत, असे धाडस श्री. 'स' संयोजकांजवळ कोठून येणार? परंतु, वाटेल तसे बोलणाऱ्या आणि मोह-अज्ञान यांचाच विस्तार करणाऱ्या अशांमध्ये खरा परमात्मा प्रकाश दाखवणारे साधू-वक्ते मात्र अत्यंत दुर्लभ आहेत.[१५] अल्पज्ञांच्या सभेमध्ये 'अहोरूप-महोध्वनि'

---

१३. 'यः काकिणीमप्यपथप्रपन्नां समाहरेन्निष्कसहस्रतुल्याम् ।
कालेन कोटिष्वपि मुक्तहस्तं तं राजसिंहं न जहाति लक्ष्मीः ।'

१४. 'कलिप्रावृषि मिथ्यादिङ्मेघच्छन्नासु दिक्ष्विह ।
खद्योतवत् सुदेष्टारो ह्युद्योतन्ते क्वचित् क्वचित् ।।' - सागारध

१५. 'वक्तारः प्रतिसद्म सन्ति बहवो व्यामोहविस्तारिणो
येभ्यस्तत् परमात्मतत्त्वविषयं ज्ञानं तु ते दुर्लभाः ।।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असेच चाललेले असते. अशा प्रकारच्या रुची किंवा मोह उत्पन्न करण्याच्या भाषेचा निरर्थक उपयोग साधूंना वर्ज्य आहे.

जैन शास्त्रात वक्ता-साधूसाठीसुद्धा अनेक नियम घालून दिलेले आहेत. प्रापंचिक वादापासून अलग राहत असूनसुद्धा मुनींनी व्याख्यान करू नये असे म्हटले आहे. त्याने विरागी, मौन व ध्यानपरायणच असणे हितावह आहे.[१६] कारण, वाणीद्वारे संपर्क साधला की, मनात चलबिचल होते. म्हणून, परमसमाधीची इच्छा बाळगणारे योगी वचनक्रियेचा/बोलण्याचा त्याग करतात आणि आत्म्याकडे ध्यान देतात. परिणामी, मोक्षगामी बनतात.[१७]

तरीही स्वाध्याय, तत्त्वचर्चा आणि धर्मप्रभावना यानिमित्ताने मुनीसुद्धा संवाद साधतात, संभाषण करतात. आगमाने आदेश यासाठी दिला आहे की त्यांनी भाषणातच गुंतून जाऊ नये. जर, त्यांनी नेहमीसाठी बोलणे निषिद्ध मानले तर लोकांना सन्मार्ग दाखवणाऱ्या सुवचनांचा दुष्काळच पडेल. कारण, अपूर्व आल्हाद देणाऱ्या सर्वोच्च पदावर नेऊन पोहोचवणाऱ्या आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे मोह-मूर्च्छेचा अपहार करणाऱ्या तर फक्त महात्म्यांच्या सूक्तीच आहेत.[१८] जे रागादिपरिग्रहयुक्त आहेत ते तटस्थ, कल्याणमार्गाचा उपदेश देणारे कसे असू शकतात? ज्यांचे स्वतःचे परिणाम विशुद्ध नाहीत; ते लोकपरिणामांचे शास्ते होऊ शकत नाहीत.

म्हणूनच, प्राचीन काळी आचार्य समंतभद्र व अकलंकदेव यासारख्या साधूंना शास्त्रार्थ, वादभिक्षा याकडे वळणे आवश्यक वाटले. धर्मप्रभावना व धर्मरक्षा या हेतूने व्याख्यान देणे, वाणीचा वापर करणे साधूसाठी योग्य आहे. प्रसंगोपात सभ्य/शिष्टाचारयुक्त, मधुर व धर्माचे निरूपण करणाऱ्या वाणीद्वारे राजा, गडाचा रक्षणकर्ता, राजपुरोहित इत्यादींना धार्मिक प्रबोधन करणे उचितच आहे.[१९]

---

१६. 'सर्वद्वन्द्वविनिर्मुक्तो व्याख्यानादि च वर्जयेत् ।
विरक्तो मौनवान् ध्यानी साधुरित्यभिधीयते ।।' - इन्द्रनन्दिनीतिसार, १७

१७. वयणोच्चारणकिरियं परिचत्ता वीयरागभावेण।
जो झायइ अप्पाणं परम समाही हवे तस्स।।

१८. अपूर्वाह्लाददायिन्य उच्चैस्तरपदाश्रयाः।
अतिमोहापहारिण्यः सूक्तयो हि महीयसाम्।। - सुभाषित

१९. 'स्नेहमुत्पादयन् कुर्यात् सुवाग्भिर्धर्मभाषणम् ।
राजरक्षिकतत्प्राये संशुद्धो गणरक्षणात् ।।' - प्रायश्चित्तचूलिका, १११

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्रीयुत एम.एस. रामस्वामी अयंगार यांनी 'स्टडीज इन साऊथ इंडियन जैनिझम' या आपल्या पुस्तकात असे लिहिले आहे की, 'समंतभद्र एक फार मोठे जैन धर्मप्रचारक होते. त्यांनी जैन सिद्धान्ताचा व जैन आचारांचा दूरपर्यंत विस्तार व प्रसार करण्याचे कार्य केले. जिथे कुठे ते गेले; तिथे इतर संप्रदायांकडून त्यांना कुठलाही विरोध झाला नाही. त्यांनी फक्त वादविवादच नाही जिंकले, तर आपल्या दृढ प्रमाण युक्तीच्या व मृदू बोलण्याच्या जोरावर हृदयेसुद्धा जिंकली. प्रतिवक्त्याचा अहंकार शिरापासून पायाच्या टाचेपर्यंत त्यांनी मोडीत तर काढलाच; परंतु ते करतानाही वाणीचे माधुर्य व व्यवहारातील सौष्ठवाला जरासुद्धा धक्का लागू दिला नाही. त्यामुळे प्रतिवादी केवळ शास्त्रवादातच पराभूत झाला, असे नाही तर विरोधी मनोभूमीच्या मोठेपणाच्या/औदार्याच्या स्पर्धेतही त्यास हार पत्करावी लागली. परिणाम हाच की, प्रतिवादीचे स्वरही अनुवादी बनले, सकारात्मक बनले.'

अशा प्रकारे हे केवळ एकच नव्हे तर अनेक आचार्यांनी वक्तृत्वाच्या माध्यमातून धर्माचे संवर्धन केले आहे. परिपक्व विचार विशुद्ध वाणीच्या द्वारे व्यक्ती आणि समाजापर्यंत पोहोचवण्याची निर्दोष पद्धत म्हणजे भाषणकला होय.

जे तत्त्वज्ञानापासून वंचित आहेत त्यांच्या वाणीत अध्यात्माचा सूर निनादत नाही. ते क्लेशांना विसरू शकत नाहीत आणि श्रोत्यांना दुःख दूर करण्याचा मार्गही सांगू शकत नाहीत. परंतु, ज्यांनी आगम-स्वाध्यायात नैपुण्य प्राप्त केले आहे आणि आपल्या समयाला ज्ञानोपयोगात व्यतीत केले आहे, ते आपल्या सिद्धवाणीच्या प्रसादाने श्रोत्यांना उत्तम ज्ञानरूपी संपदा प्रदान करू शकतात.[२०]

वक्त्याजवळ विपुल ज्ञानधन असले पाहिजे आणि सभाशास्त्राचे ज्ञान तर त्यास सर्वप्रथम असायला हवे. वेळेवर सभा सुरू करणे आणि वेळेवर संपवणे, यामुळे श्रोत्यांना शिस्त लागायला मदत होते. हे सभाशास्त्राचे पहिले सूत्र, पहिला नियम आहे. जर, तुम्ही ठरलेल्या वेळेप्रमाणे प्रवचन सुरू करण्याची खात्री दिली तर श्रोते नेहमीच ठरल्या वेळी उपस्थित होतील. परंतु, जर त्यांना असे प्रत्ययास आले की, वक्ता श्रोत्यांची प्रतीक्षा करतो आहे आणि थोडे उशिराने शास्त्र-प्रवचन करणार आहे; तर श्रोतेही आरामात येतील. उशीर होण्याच्या शंकेचा ते फायदा घेतील आणि उशिराच उपस्थित होतील. दुसरीकडे वक्त्याने

---

२०. 'तत्त्वज्ञानविहीनानां दुःखमेव हि शाश्वतम् ।
पक्वज्ञनवयस्येव गुणाः सर्वेऽपि सिद्धिदाः ।।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नियोजित वेळी आपले व्याख्यान संपवले नाही तरीसुद्धा श्रोत्यांना त्यांच्या दैनंदिन कामकाजाची विभागणी करणे गैरसोईचे होईल. त्यामुळे ते दररोज प्रवचनाला येणार नाहीत. म्हणून वक्ता- श्रोता या उभय पक्षांनी नियमितपणाकडे लक्ष दिले तरच यश-प्राप्ती होईल.

वक्त्याला बुद्धिमान नसून चालणार नाही. कोणत्याही प्रश्नासाठी त्याने नित्य सज्ज राहणे आणि रोज स्वाध्यायचिंतन करणे, ही त्याच्या यशाची जणू शिडी आहे. पाण्याच्या खोल तळाशी राहणारे कमळ सुकत नाही आणि नेहमीच ज्ञानसागरात राहणाऱ्या उत्तम वक्त्याला विषयांचे-भावांचे दरिद्र्य कधी अनुभवावे लागत नाही. उत्तम वक्ता लोकांच्या मनाला घेरून टाकणाऱ्या निराशेला आशेत परिवर्तित करतो. त्यांची मरगळ घालवून टाकून त्यांच्यात उत्साह निर्माण करतो. मोह व मिथ्यात्वाच्या जागी सम्यक्त्वाची प्रतिष्ठा करतो. त्याच्या प्रत्येक पदामधून उत्साह निनादतो. आत्मचेतनेचे काव्य तो गुणगुणू लागतो. विवेक आणि धर्माचे भाव उमटू लागतात. श्रेष्ठ वक्त्याची वाणी पापरूपी चिखल धुऊन टाकणाऱ्या धर्मनिर्झरासारखी असते.

भित्र्या लोकांना ओज पुरवणारा भेरीनाद सद्गुरूंच्या कंठातून निघतो. ते मृदू बोलोत की कठोर; त्यांच्या वाक्यामृताचा परिणाम संजीवनी देतो. सूर्यकिरणे प्रखर असली तरी ती कमळाला फुलवतात आणि गुरू कठोर बोलले तरी भव्य जनांचा धर्ममार्ग ओळखण्याचीच संधी त्यामुळे मिळते.[२१] गुरूच्या चेहऱ्यावर अशी शक्ती असते की, तिच्यामुळे संशय, शंका आपोआपच नष्ट होतात. 'गुरोऽस्तुमौनं व्याख्यानं शिष्या 'उच्छिन्नसंशया:' आणि 'मोक्षमार्गवागविसर्गं वपुषा निरूपयन्तम्' - तपस्वी वक्त्यांची मौन व्याख्याने पूजनीय सिद्ध करणारी सूक्ते आहेत.

दिगंबर मुनिचर्येत मौनाला महत्त्वपूर्ण स्थान आहे. भगवान महावीरांनी १२ वर्षे मौन बाळगले होते. त्यांची दिव्यध्वनी ६६ दिवसांपर्यंत खिरली नाही. पात्र पाहून बोलणे योग्य असते. फुटलेल्या भांड्यात दूध ओतणे काय कामाचे? ते भांडे दुधाला स्वत:मध्ये सामावून घेऊ शकत नाही आणि तांब्यापितळेच्या भांड्यात तर ते नासून जाते. अशाच रीतीने पात्रता नसणाऱ्यांना दिलेला उपदेश वाया जातो किंवा विकृत होतो. श्रमण मुनी नेहमीच निर्दोष बोलतात. एका हिंदू कवीने (सर्वज्ञ) कन्नड भाषेत म्हटले आहे की, 'काळाच्या दोषाने मिठाचा खारटपणा नष्ट होऊ शकतो, कापूर कृष्णवर्णी होऊ शकतो

२१. 'विकासयन्ति भव्यस्य मनोमुकुलमंशव: ।
रवेरिवारविन्दस्य कठोराश्च गुरूक्तय: ।।" -आत्मानुशासन, १४२

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आणि सापाचे शेपूट द्विभाजित होऊ शकते. पण, श्रमण मुनींचे वचन कधी द्विधा होत नाही.[२२]

तत्त्वचर्चेचे माध्यम शब्द हे आहे. शब्द रूप, रस, गंध वर्णयुक्त आहेत. त्यास भोग मानले गेले आहे. कारण, जर वीतराग भगवंतांची स्तुती-कवने गात असतांना मनात वैराग्याचा उदय होत असेल तर शृंगारगीते ऐकताना मनात राग-भाव उत्पन्न होणेही आलेच. मंदिरातील घंटानाद व स्त्रीच्या पायातील घुंगरू यांचा आवाज श्रोत्याच्या मनात विविध अनुभूती, भावना यांचे तरंग निर्माण करतात. सिंहाची गर्जना ऐकल्यावर भयाने रोमांच उभे राहतात. म्हणून, शब्दांची चर्चाही गरजेपेक्षा जास्त न करणेच उत्तम आहे. तत्त्वचर्चा आणि स्वाध्याय उद्देशमार्गाची साधने आहेत, साध्य नाहीत. लोकांबद्दलच्या अनुकंपेमुळे, सहानुभूती किंवा आपुलकीमुळे धर्मसमर्पित असे वक्तृत्व गाजवणे धन्य आहे, उपयुक्त आहे. यापेक्षा अधिक वक्तृत्वकलेचे (तिचे) प्रयोजन नाही. मुनीचे हित तर आत्मध्यानातच सामावलेले आहे.

❖❖❖

२२. 'उप्पू सप्पने यक्कु कर्पूर करि दक्कु ।
सर्पनिगे बालर्वेडक्कु श्रमण तातप्पाडिदंते सवज्ञ ।।' - १०१३

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

समाज, संस्कृती आणि सभ्यता

मनुष्याच्या शालीनतेचे तीन छोटे स्तंभ आहेत. ते म्हणजे समाज, संस्कृती आणि सभ्यता! मनुष्य समाजातच वाढतो, संस्कृतीचे दूध पिऊन पुष्ट होतो आणि सभ्यतेच्या अश्वावर स्वार होऊन काळाच्या राजमार्गावरून वेगाने धावत राहतो. समाज त्याला हजारो वर्षांपासून साठलेली गौरवपूर्ण ऐतिहासिक साधने भेट म्हणून देतो. संस्कृती त्याला आत्मधर्माची मेंदी लावते आणि सभ्यता आपल्या सुगंधाने त्याच्या मनाला, प्राणाला उन्नत करते.

प्रत्येक व्यक्ती आपल्या समाजाशी कृतज्ञ व विनयशील असते. आपल्या संस्कृतीची ती जागरूक पहारेकरी असते आणि सभ्यतेचे पालन करीत स्वत:च्या सच्चारित्र्यरूपी दुर्गाला संरक्षणासाठी तटउभारणीही करते. त्याच्या गतीत समाजसत्तेच्या प्रभुत्वसंपन्न शक्तीची चाहूल लागते. त्याच्या स्थैर्यामध्ये संस्कृतीच्या अनादिकाळापासून पुढे जात राहिलेल्या/प्रगतिशील स्वरूपाची अविचल वज्रप्रतिमा अलौकिक सौंदर्य धारण करून स्मितहास्य करते. सभ्यतेच्या कालखंडाच्या क्षितिजाला इंद्रधनुष्याच्या सात रंगांनी सुशोभित करते.

व्यक्तिसत्तांच्या हजारो शाखा-उपशाखांनीयुक्त अशा महान वटवृक्षाप्रमाणे समाज एक देह आहे. संस्कृती त्याचा धमनी-प्रवाहित क्षीर आणि सभ्यता त्याची पाने-फुले आहेत. समाज व्यक्तीचे शरीर आहे. संस्कृती, शील व सभ्यता त्याच्या सामाजिकतेच्या रथावर फडकणारे ध्वज आहेत. प्रत्येक व्यक्तीवर समाज, संस्कृती आणि सभ्यता या तिन्हींचेही ऋण आहे. या तिन्ही आयांच्या कुशीत मानवी जीवन विकसित होत राहते. म्हणून, व्यक्ती त्यांच्या निर्दोष दुधाची ऋणी आहे. तन, मन आणि आपले जीवन देऊन त्याच्या संपन्नतेला जीर्णत्वापासून वाचवणे, हे प्रत्येक माणसाचे कर्तव्य आहे. या तिन्हींच्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

संरक्षणासाठी प्रत्येकाने स्वत:ला समर्पित करावे आणि अशा रीतीने जीवन व्यतीत करावे की, जीवन धन्य होईल. त्याच्या जीवनापासून संस्कृती आणि सभ्यतेला नवे चैतन्य, नवजीवन मिळावे आणि हिमनगाच्या/हिमाच्छादित पर्वताच्या शिखराप्रमाणे सभ्यतेच्याही मस्तकी रत्नकिरिटाचे तेज चमकावे.

सार्थक जीवन जगणाऱ्यांनी हा हितोपदेश लक्षात ठेवावा की हा संसार आहे आणि यात चारही गतींमध्ये असंख्य जीव आपापल्या कर्माप्रमाणे भ्रमण करीत आहेत. अनेक जन्मतात, अनेक मरण पावतात. महासागराप्रमाणे एकीकडे सूर्य आपल्या सहस्र किरणांनी त्यांचे पाणी पीत आहे; तर दुसरीकडे हजारो नद्या त्यात पाण्याची भर टाकत आहेत. म्हणूनच, समुद्राची पातळी वाढलेलीही दिसत नाही की, कधी (तो रिकामाही होत नाही) खालावलेलीही दिसत नाही. त्याचप्रमाणे लोकांच्या जन्ममरणाने संसारातील/जगातील ही अफाट गर्दी क्षीण होताना जाणवत नाही. एखाद्याच्या निधनाने या संसारक्रमात कुठला बदल झालेला दिसत नाही. म्हणून, अज्ञात राहून निद्रिस्तपणे जीवन घालवून स्वत:चे आयुष्य संपवणे, हे पुरुषार्थसंपन्न मानवाला शोभा देत नाही.

वेलीच्या फांदीवर हसणारे नवे फूल जर नवे रूप, नवा गंध पसरवत नसेल तर त्याच्या फुलण्याचा कोणता फायदा? जन्म घेऊन, शिक्षण घेऊन, मोठे होऊन जर एखादी व्यक्ती समाज, संस्कृती व सभ्यतेच्या क्षेत्रात आपल्या विशिष्ट व्यक्तित्वाला प्रभावपूर्ण बनवू शकली नाही तर मग तिने फक्त आपल्या वंशजांमध्ये केवळ संख्येची वृद्धीच केली, असे नाही तर काय म्हणावे?

आईच्या गर्भातून विवशतेने जन्म घेणाऱ्यांची राजमार्गावर निरंतर गर्दी होतच आहे. त्यांना चालणे, बोलणे, बसणे येत नाही. एवढेच काय, पण गप्प बसणेही जमत नाही. यौवनात असलेल्या अविवेकी मातांच्या पोटी जन्मलेल्या व केवळ प्राण धारण केले आहेत म्हणून अशांना मानव म्हटल्यास किंवा पशूपेक्षा श्रेष्ठ मानल्यास आमची निरक्षीरविवेकबुद्धी खरी नसून मिथ्यात्वाच्या कुसंगतीने ती काळवंडून गेली आहे, असे समजावे. कारण, आकाशात चमकणारे अगणित तारे आहेत. त्यांच्यासमान मंद तेज असलेल्या ताऱ्यांना कोण ओळखतो? त्याचप्रमाणे, लोकाकाशातही असे असंख्य तारे आहेत, ज्यांचा प्रकाश पृथ्वीपर्यंत पोहोचतच नाही. त्यांच्यासारखा अल्पजीवी, काजव्याप्रमाणे चमकून नाहीसा होणारा मानव आपल्या समाजावर काय उपकार करू शकतो?

बालपणी आईवर भार बनून राहिले, तारुण्याच्या स्वैरतेत राहून पृथ्वी व समाजाला

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ओझे बनून जगले आणि यमराजाचे पाहुणे म्हणून गेले; तेव्हा आपल्या हातात लोकांसाठी केलेल्या पुरुषार्थाविषयीचे एकही प्रशस्तिपत्रक घेऊन गेले नाहीत. १०० वर्षे जिवंत राहिले; पण 'जगणं' नाही आलं. मृत्यूला स्वीकारावे लागले; पण मृत्यूलासुद्धा गौरव/मोठेपण देऊ शकले नाहीत. रुईच्या फुलासारखे वादळाबरोबर उडाले आणि पाऊस आला की, मातीत दबले गेले. त्यांना एखाद्या कुशल शेतकऱ्याने पेरले नाही. मेघातून कोसळलेल्या पहिल्या सरीनंतर जंगली गवतासारखे ते उगवून आले, केळीच्या फुलासारखे निरुद्देश! अशा पुरुषार्थाला विन्मुख झालेल्या, अकर्मण्य, व्यर्थ जीवन जगणाऱ्या लोकांसाठी धिःक्कारात्मक शब्दही इतिहासात सापडत नाहीत.

म्हणून, मोठ्या उपेक्षेसह नीतिकारांनी म्हटले आहे- 'मृतः को वा न जायते'- असे प्राणी पळसाच्या फुलांसारखे फांद्यांवर फुलले काय किंवा तुटून खाली पडले काय; त्यामुळे काहीच फरक पडत नाही. ज्याच्यामुळे वंश उन्नत/प्रगत झाला, अशाचा जन्म सार्थक झाला, असे म्हटले पाहिजे. चंद्राचे किरण पडल्यानंतरच समुद्र क्षीरसमुद्र बनून जातो. शिंपल्यातील मोती पाणीदार/तेजस्वी असतो; त्यामुळेच त्याची तुलना तेजस्वी वस्तूबरोबर केली जाते. पृथ्वीच्या पोटातून कोळसा निघाला व सोने इत्यादी धातूही! धातूंनी तिला 'रत्नगर्भा' हे नाव प्राप्त करून दिले. आपल्या कुळाला, जातीला आणि समाजाला उन्नतीकडे किंवा अवनतीकडे नेणे, यात त्यात्या कुळात जन्मणाऱ्यांचा महत्त्वपूर्ण सहभाग असतो. मोठेपणीही बालबुद्धीने किंवा बालीशपणे वागणाऱ्यांना पाहून तोंडातून सहजोद्गार बाहेर पडतात- 'मा सीमन्तिनी कास्मिद् जनयेत् पुत्रमीदृशम्'- कोणत्याच आईने अशा पुत्रांना जन्म देऊ नये. म्हणून, अत्यंत उज्ज्वल वंशरूपी हंस जसा कीर्तीच्या क्षीरसागरात क्रीडा करतो त्याच्याप्रमाणे सामर्थ्य असणारा मानवच समाजाला प्रिय वाटतो, तो यशस्वी होतो आणि समाजमनावर आपली मुद्रा अंकितही करतो.

समाजाची रचना एका दिवसात पूर्ण होत नाही. 'रोम एका दिवसात निर्माण झाले नाही,' हे वचन सत्यच आहे. एखादे बी रुजते, अंकुरित होऊन वाढू लागते आणि काही वर्षांनंतर मोठ्या वृक्षाचे रूप धारण करून फळे व सावली देण्यास समर्थ होते. समाज आणि संस्कृतीची निर्मितीही अशाच प्रकारे होते, त्यासाठी युगे लोटतात. कितीतरी विद्वान, पंडित, आचार्य व मुनी आपल्या चिंतनातून सन्मार्ग शोधतात व तो पुढच्या/भावी पिढ्यांसाठी सुरक्षित ठेवतात. त्यांच्या सात्त्विक तपाचा लाभ घेऊन समाज चारित्र्यशील बनतो आणि सांस्कृतिक प्रगती करू शकतो.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

समाजाच्या सर्वांगीण स्थितीचे मूल्यमापन करतेवेळी त्याच्या विराट भव्यतेचे स्वरूप लक्षात घेणे आवश्यक असते. लांब-रुंद रस्ते, इमारती आणि लोकसंख्येचे वाढते प्रमाण हेच केवळ समाजजीवनाची सुदृढ आधारभूमी नाही, तर त्याहीपेक्षा आवश्यक ठरतात ते विचारांचे विशाल राजमार्ग, चिंतनाचे उंच प्रासाद, संस्कारांचे समशील चौक आणि आत्मश्रद्धेची मंदिरे! कारण, त्यांना पाहिले की, भौतिक समृद्धीपेक्षाही उच्च अशा आत्मसंपदेचा आभास हेतो. ज्या समाजाजवळ प्रशस्त राजमार्ग तर आहेत; पण त्यांच्यावर फिरणारे त्या रस्त्यांपेक्षाही जास्त प्रशस्त असे नागरिक नाहीत. त्यागी, मुनी आणि ज्ञानचारित्र्यसंपन्न उत्तम व्यक्ती नाहीत, असा राजपथ म्हणजे पानझडीमुळे भकास झालेल्या उपवनातलाच एक रस्ता होय; ज्यावर सुगंध पसरवणारी फुलेच नाहीत.

धनिक असण्याने समाज धन्य होत नसतो. परंतु, जवळ असलेल्या धनाची प्राप्ती तो कशी करून घेतो व त्या पैशांचा विनियोग तो सार्थ कामासाठी करतो का, यावर समाजाचे श्रेष्ठत्व अवलंबून असते. समाजाचे वास्तविक पाहता हेही वैशिष्ट्य नाही की, तो विरोधी पक्षाचे वस्त्रहरण करणारा व बहुसंख्य दाणे भरलेल्या डाळिंबाप्रमाणे कितीतरी विद्वान बाळगून आहे. उलट, ते विद्वान आपल्या पांडित्याचा उपयोग समाजाला उत्तम मार्गदर्शन किती करतात, सच्चारित्र्याचे पालन कितपत करतात, यामध्ये समाजाचे मोठेपण आहे. एखादे शस्त्र किती चमकते, यापेक्षाही ते शस्त्र किती सत्पुरुषांचे संरक्षण करण्यास समर्थ आहे, हे महत्त्वाचे! तो त्याचा उपयोगगुण मानला पाहिजे. 'वादाय वेदाध्ययनम्' करणाऱ्यांपेक्षा जे प्राप्त ज्ञानाला आत्मचिंतनामध्ये उपयोजितात, तेच उत्तम होत.

एकसारखे रीतिरिवाज, नीती, परंपरा आणि व्यवहार तसेच संस्कृती यांना धारण करणाऱ्यांना समाज असे म्हटले जाई. 'सम+अजति' - समानरीत्या राहत असणारे, सुखदु:खाचाही एकच अनुभव घेणाऱ्यांचे संघटन म्हणजे समाज असा पूर्वी समाज शब्दाचा अर्थ होता. वरवर पाहता रोटीबेटी व्यवहारावरून त्याचे बाह्य स्वरूप कळत असे. तथापि, आपल्या समाजघटकाच्या बंधुतेचे सहज संरक्षण हे समाजाचे खरे आंतरिक स्वरूप मानले जाई. समानशील कुटुंबांसमवेत लोक प्राचीन काळी राहत असत. परस्परांची सुखदु:खे ते वाटून घेत असत. आज नगरांच्या विशाल गर्दीमध्ये त्या सामाजिकतेचे दर्शन घडत नाही. आज धनिक/श्रीमंत समाज वेगळा आहे आणि श्रमिक समाज वेगळा आहे. केवळ प्रांतीय, राष्ट्रीय पातळीवरच हे संघटन होत आहे असे नाही, तर वैश्विक पातळीवरही अशा दोन समाजांची बांधणी होत आहे. जातीयतेच्या आधारामुळे एक कुटुंब असल्याने

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्यांचाही एक वेगळा समाज आहेच. परंतु, आर्थिक आधारावरही तयार झालेल्या या नव्या रचनेमध्ये परस्परविरुद्ध आर्थिक स्थिती असल्याने सख्खे भाऊसुद्धा दोन वेगळ्या समाजांत वाटले जात आहेत. रोटीबेटी व्यवहार जातीचा आधार, हे समाजाचे मुख्य पूर्वघटक आज गौण होत आहेत.

ही नवी समाजरचना विश्वव्यापक आहे. जुन्या समाजरचनेचा जो आधार होता; तोच या नव्या समाजरचनेचा आहे. जुन्या सामाजिकतेमध्ये व्यक्तिवाद, अहंवाद आणि आत्मपोषणवाद कालांतराने महत्त्वाचे बनत गेले आणि त्यामुळे वास्तविकदृष्ट्या त्या सामाजिक रचनेतील आंतरिक एकी खंडित होत गेली. समाजातील व्यक्ती सामाजिक हितासंबंधी विचार न करता स्वतःच्या व्यक्तिगत हिताचा विचार करायला लागली. सहृदय न राहता ती पूर्णतः मुळापासून व्यापारी बनू लागली. एखाद्याचे मूल्यांकन करण्यासाठीचे माणसाचे सगळेच दृष्टिकोन आर्थिक होत गेले आणि आज व्यक्ती वेगवेगळ्या परिस्थितीत जगत अलगअलग होत गेली. आर्थिक विषमता, मोठमोठे उद्योग, महानगरे व परकीय सत्ताधीशांच्या वैयक्तिक, स्वच्छंद जीवनाचा झगमगाट यांनी भारताचे सरळ, साधे, एकत्र कुटुंबपद्धतीचे जीवन पार बदलून टाकले. त्यामुळे भावाभावांतील बंधुत्वभाव लोपला, व्यापारीपणा वाढला आणि स्वतःचीच फसवणूक व्हायला लागली. एकमेकांवरचे विश्वासाचे दीर्घक्षेत्र आकुंचित झाले. आज स्थिती अशी आहे की, एकाच इमारतीत राहणारे दोन शेजारी एकमेकांना ओळखत नाहीत.

ऑफिस/कार्यालयांनी आणि कारखान्यांनी त्यांचे जीवन एवढे बंदिस्त केले आहे की, ते 'व्यक्ती'च्या वर 'समष्टी' (समाज) आहे, याचा साधा विचारही करू शकत नाहीत. त्यांच्या लाभहानीमध्ये समाजाची कोणतीच लाभहानी नाही. समूहाने राहण्याची प्रवृत्ती (समूहात्मकता) तर वाढली आहे; परंतु सामाजिकत्व मात्र रसातळाला जात आहे.

पूर्वीच्या काळी उदरनिर्वाहासाठी मनुष्य इतक्या दूरवरच्या नोकऱ्यांमध्ये अडकलेला नव्हता. त्याचे छोटेछोटे उद्योग राहत्या ठिकाणीच त्यास पोटापुरता पैसा देत असत आणि सामान्यजनांची प्रवृत्ती अधाशीपणाची नव्हती. भाकरी, कपडे व राहायला घर एवढ्या सोयीसुद्धा त्याला पुरेशा वाटत. लोक कठोर परिश्रम करीत. परंतु, नव्या शिक्षणप्रणालीने व वाढत्या महागाईने लोकांना गावापासून दूर फेकले. उद्योगधंदे मोठ्या शहरांत स्थापन झाले. खूप दूर असलेल्या खेड्यांपर्यंत रेल्वेमार्ग टाकण्यात आले आणि दळणवळण यांत्रिक बनले. शहरातून गावात आलेल्या मजुरांनी खेड्यांत अजूनही राहणाऱ्यांच्या मनात

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शहरांविषयी आकर्षण, प्रलोभने निर्माण केली. परिणामी, गावातील छोट्या उद्योगांकडे कोणी लक्ष देईना आणि लोक शहरांमध्ये पोहोचू लागले. अशा तऱ्हेने मजूर व त्यांचे हिशेब यासाठी कारकूनवर्ग सीताफळातील बियांप्रमाणे बहुसंख्येने शहरात स्थायिक होऊ लागला. प्राचीन सामाजिकतेच्या अंताचा हा श्रीगणेशा होता.

संयुक्त कुटुंबपद्धतीचा अंत याच कारणाने आपोआपच झाला.

नवे शिक्षण, नवी भौतिक सभ्यता यांनी साध्या-सरळ खेडुतांवर जणू जादूचेमोहजाल पसरवले. बाह्य थाटमाट, देखाव्याला भुलून जाऊन ते आपला धर्म, आवडनिवड, संस्कार, नीती सगळे काही विसरले. एकदोन पिढ्यांनंतर ती परकी संस्कृती, परकी वेशभूषा त्यांना स्वत:चीच वाटायला लागली आणि आज तर त्यासाठी जीव द्यायला मागेपुढे न पाहणारे खूप मोठ्या संख्येने भारतात विद्यमान आहेत. हिंदी राजभाषा करण्याच्या प्रश्नावरून दक्षिण भारतीयांनी जी भूमिका घेतली; ती याच गोष्टीची साक्ष देते. सारांश एवढाच की, एके काळी ज्या समाजरचनेमुळे आम्ही आदर्शांचा मार्ग ओळखत होतो, धर्ममय जीवन व्यतीत करीत होतो, सुखदु:खे समानतेने वाटून घेत होतो, ती मूलभूत समाजरचना आज दिसेनाशी झाली आहे. आज 'विमा पॉलिसी' काढून मनुष्य निश्चिंत राहू शकतो. पण, आपल्याच कुटुंबावर त्याचा भरवसा नाही. समाजरचनेची आधारशिला जिला मानत होतो, ती रोटीबेटीची प्रथा आज आंतरजातीय होऊ लागली आहे. त्यामुळे प्राचीन सामाजिकतेचे संपूर्ण तेजच लयाला गेले आहे. या नव्या बदलामुळे/क्रांतीमुळे फायदा किती झाला, हे येणारा काळचं सांगेल. परंतु, नुकसानच सांगायचे झाले तर ते कमी नाही.

विशिष्ट जातींचे जे आचार होते, चारित्र्य होते, शुद्धीचे नियम होते, रक्तशुद्धीला महत्त्व देण्यासंबंधी जी प्रथा होती त्या सर्वांची प्रगतीच्या चक्कीत दळून पावडर करून टाकली आहे. अध्यात्माच्या बैठकीवरून उतरून जीवन इंद्रियविलासापर्यंतच मर्यादित झाले आहे. वादळात झाडाची पाने उडावीत; तसे लोक हवेत भिरभिरत आहेत. उडाल्यानंतर कोठे पोहोचू याचा त्यांना स्वत:लाच पत्ता नाही. या दिशाहीन, निरुद्देश्य उड्डाणात जे सामील होत आहेत; त्यांना आपण एखाद्या पर्वतशिखरावर उतरणार आहोत की एखाद्या खाडीत... हेसुद्धा ठाऊक नाही.

आधुनिक समाजाचे हे चित्रण म्हणजे व्यक्तिवादाचे निरूपणच म्हटले जावे. कारण, व्यक्तीवर समाजसत्तेचे नियंत्रण आज जवळजवळ उरलेले नाही. आज मानव समाजातच राहतो; तरीही समाजाचा, त्याच्या चालींचा, नीतिनियमांचा त्याजवर काहीच

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

परिणाम होत नाही. तो त्यामध्ये आपल्या इच्छेप्रमाणे बदलसुद्धा करू लागला आहे. महानगरात आधुनिक वातावरणात राहणारे हिंदू, जैन तसेच अनेक गोंधळलेल्या (संभ्रमात) कुळांमध्ये जन्मदिवस, जयंत्या, वाढदिवस साजरे करण्याची प्रथा सुरू झाली आहे. त्यामध्ये ते एक 'केक' कापतात आणि वाढदिवसाचा शुभारंभ करतात. ही प्रथा खरेतर इंग्रजांची आहे. पण, आपल्याला त्या गोऱ्या लोकांच्या बरोबरीचे समजले जावे म्हणून मोठ्या अभिमानाने ती प्रथा काहींनी स्वीकारली आहे. त्याचा त्यांना गर्वही आहे.

आपापल्या संप्रदायात अशा वर्षप्रवेश (वर्धापन दिन) दिनानिमित्त भगवद्पूजा, देवदर्शन, गुरूंचा आशीर्वाद, स्वयंपाकघरात पक्वान्न बनवणे, वगैरे ज्या रीती होत्या, त्या निर्दोष व श्रेष्ठ असूनही त्या विसरल्या गेल्या. एवढेच नव्हे तर त्या तिरस्करणीयही बनल्या. याच तऱ्हेने समाजाच्या नियमाधीन असलेली विवाहप्रक्रियासुद्धा 'कोर्टशिप'मध्ये बदलून टाकण्यात आली. जीवनामध्ये भारतीय संस्कृती आणि श्रमण परंपरेनुसार ज्याज्या 'आचारसंहिता' परंपरेने चालत आल्या होत्या त्यांचे महत्त्व समजून न घेता त्यांना अर्धचंद्र देऊन त्याऐवजी अत्यंत तुच्छ वृत्ती स्वीकारणे, यातच समाजसत्ता आपल्या पायाखाली घेणाऱ्यांनी गौरव मानला आहे. या परिवर्तनामध्ये बाहेरच्या परिस्थितीचा प्रभाव पडलेला स्पष्टपणे दिसून येतो. या पार्श्वभूमीवर इथे थोडा प्रसंगोचित विचार करणे आवश्यक आहे.

एखाद्या समाजाची रचना त्याच्या आंतरिक आचार संघटनेवर अवलंबून असते. संस्कृतीला त्या समाजाची आचारसंहिता, असे म्हटले जाऊ शकते. कारण, संस्कृतीशिवाय समाजरचनेची कल्पना केली जाऊ शकत नाही. संस्कृती समाजाला मार्गदर्शन करते. स्वच्छंद वागण्याला मर्यादित करते. त्याचप्रमाणे ती आपल्या विशिष्ट वैभवाने समाजाला विभूषित करते. असे म्हणायला पाहिजे की, संस्कृती समाजाला व व्यक्तीला सुधारते, सुशोभित करते व उज्ज्वलता प्रदान करते.

संस्कृतीच्या पवित्र प्रभातकाळीच आत्मधर्माचे जागरण होते. युगानुयुगे ज्या आदर्श, चारित्र्यशील महापुरुषांनी गहन-गंभीर अशा ज्ञानसागराचे मंथन करून शाश्वत, मौल्यवान रत्ने वर काढली आहेत; त्या रत्नांनीच संस्कृतीचा खजिना समृद्ध होत गेला आहे. ती सांस्कृतिक मणिरत्ने समाजाच्या आचारात, व्यवहारात एवढी चिद्रूप/एकरूप होऊन गेली की, त्यांना स्वतंत्ररीत्या ग्रहण करण्याची गरज उरली नाही. कोकीळ पक्षी वसंत ऋतूत बोलू दे की ग्रीष्म ऋतूत, त्याच्या स्वरातील माधुर्यात काहीच फरक पडत नाही. त्याप्रमाणे, श्रमण संस्कृतीने संपन्न असा हा समाज विशेष प्रयत्न न करताही जे कार्य करतो, त्यामध्ये

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

संस्कृतीचा मान, प्रतिष्ठा सुरक्षित राहते. एखाद्या प्रामाणिक वक्त्याचे बोलणे निःशंकपणे स्वीकारण्यास योग्य असते. त्याचप्रमाणे संस्कृतीचे पालन करणाऱ्या व्यक्तीची किंवा समाजाची नैतिकताही शंकारहितच असते. जो समाज संस्कृतीनिष्ठ आहे; तो आपल्या निश्चित केलेल्या मर्यादांपलीकडे विचार करणेसुद्धा अयोग्य समजतो. संस्कृती त्यांचे नैसर्गिक जीवन आहे, श्वासउच्छ्वास आहे.

कोणा एका विदेशी विद्वानाने भारतीयांच्या नित्य व्यवहारातील आचारसंहितेची व्याख्या करताना लिहिले आहे- 'उदार मनाच्या भारतीयांच्या जीवनातील छोट्याछोट्या गोष्टींनी मला खूप प्रभावित केले आहे, त्या गोष्टी कोणते विशेष शास्त्रीय ज्ञान न घेताही ते प्रयोगात आणतात. त्यांचे शील, सौजन्य, शिष्टाचार, पाहुण्यांप्रति आदर-सन्मान (आतिथ्यशीलता) यांचे व्यवहार अत्यंत उच्च प्रतीचे आहेत. ते त्यांच्या रक्तकणांमध्ये इतके मिसळून गेले आहेत की, त्यांच्या व्यक्तिमत्त्वापासून ते पृथक झालेले पाहूच शकत नाही. जाणूनबुजून मुद्दाम ते असे करतात असे नाही. तरीही बोटांची नखे जशी बोटांपासून अभिन्न असतात; तसे ते त्यांच्या व्यक्तित्वात बेमालूम मिसळून गेले आहेत. त्यांच्या संपर्कात येणारा त्यांच्या नैसर्गिक गुणांनी प्रभावित झाल्याशिवाय राहत नाही.

आपल्या प्राचीन संस्कृतीची उदात्त स्तोत्रे अशी विदेशी पर्यटकांनी मुक्तकंठाने गायिली आहेत. स्तुती किंवा प्रशंसा ही नेहमी सद्गुणांचीच केली जाते. जो आपल्यापेक्षा विशेष असतो; त्याच्यासाठी श्लोक आपोआप तयार होतात. भारतीय आचारसंहितेला अनुसरून असलेले संस्कृतीपूर्ण जीवन असेच होते की, इतिहासाच्या पानांवर ते सुवर्णाक्षरांनी शब्दांकित केले गेले आणि अमर झाले.

संस्कृतीचे वैशिष्ट्य कोणते, यावर विचार केला तर भारतीय आणि परकीय विचारधारेतील फरक सहज स्पष्ट होण्यासारखा आहे. पाश्चिमात्य संस्कृती भौतिकताप्रधान आहे; तर भारतीय संस्कृती ही आत्म (अध्यात्म) प्रधान आहे. शरीर, मन व एकूणच जीवनाला भौतिक/लौकिक विलासाच्या अत्युच्च श्रेणीच्या सुखसुविधा देणे हा पाश्चिमात्यांचा दृष्टिकोन आहे. शरीर बलवान करण्यासाठी, मन प्रफुल्लित ठेवण्यासाठी आणि जीवनात निरोगी राहण्यासाठी पश्चिमेकडचे जग जीवाचे रान करीत आहे. 'खा, प्या आणि मजा करा' हे त्यांच्या जीवनाचे सूत्र आहे. त्यांच्या दिवसाची सुरुवात होते की 'बेड-टी'ने! आणि दिवस संपतो तो डीनरने- मध्य रात्रीपर्यंत चालणाऱ्या क्लबमधील मद्य, जुगार, विलास, नृत्य यांच्या संगतीने! 'पुनः प्रभातं पुनरेव शर्वरी' - पुन्हा रात्र व

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

फिरून पुन्हा पहाट; मग पुन्हा 'बेड टी' आणि फिरून पुनश्च... आणि त्यामुळे येणाऱ्या थकव्याने गलितगात्र होऊन अंथरुणावर कोसळणारे शरीर! त्यांचे जीवन अतिभोगवादी आहे. वाटेल त्याचा स्वीकार करणारे आहे. या स्वीकारात्मकतेने पश्चिमेचा माणूस श्वासागणिक भरपूर जीवनानंद लुटेल, निरोगी-बलशाली राहण्यासाठी मांसाहारी, शाकाहारी पदार्थांचाही आग्रही स्वीकार करील. थोडक्यात, त्यांची दिनचर्या किंवा जीवनपद्धती ही भोगप्रधान आहे.

श्रमण संस्कृती लौकिक जीवनामध्ये 'अति'ला मर्यादित करते. शरीर-मन आणि जीवनाला निरोगी-सुंदर ठेवण्यास या भारतीय संस्कृतीचा विरोध नाही; पण फरक आहे तो दृष्टिकोनामधला! देहाला निरोगी ठेवा, पुष्ट करा; परंतु अभक्ष्य भक्षणाने नाही. कारण, फक्त शरीरच पोषण करण्यायोग्य नाही. तन-मन आणि जीवनाच्या वर एक नित्य, अविनाशी आत्मा आहे. त्या आत्मोपयोगात तन-मन-जीवनास लावणे, हे श्रेयस्कर आहे. 'न वित्तेन तर्पणीयो मनुष्यः' - माणूस पैशाने कधी संतुष्ट होऊ शकत नाही. त्याला जर या पृथ्वीचे पूर्ण साम्राज्य दिले तरीही तो तृप्त होऊ शकत नाही.

तन-मन आणि जीवन हीसुद्धा संपत्तीच आहे. या संपदेने-परपदार्थाने कोणाचीच तृप्ती झाली नाही. म्हणून, तिचा जास्त विस्तार होणे नुकसानकारक आहे. जगात युद्ध, वैर, कलह हे सगळे तन-मन-जीवनाला अतिभोग-सुलभ करण्यासाठीच घडून येतात. ज्यांच्याजवळ जेवढे आहे, तेवढ्यात ते समाधानी नाहीत. म्हणूनच हिसकावून घेणे, मायाचार असे प्रकार चालतात. यातच, आयुष्य संपवणे म्हणजे कावळ्याला हाकलण्यासाठी रत्नमणी फेकणे होय. हे भारतीय संस्कृतीचे सार आहे. म्हणून, भारतीय व्यक्ती भोग भोगत असतानाही 'कदा शम्भो! भविष्यामि कर्मनिर्मूलनक्षमः' या वचनाचे मनात चिंतन करीत राहतो. भोगांच्या आंतरिक निरूपणामध्ये/वर्णनामध्ये रोगांचे दर्शन त्यागींनी घडवले आहे. 'भोगे राग भयं' हा त्यांनी काढलेला निष्कर्ष आहे. ज्या क्रियांनी परिग्रह वाढेल, कर्ममलाने त्या आत्म्याला विकृत करतील, त्यांचे निर्मूलन करणे हा या संस्कृतीचा उद्देश आहे. यामुळे परलोकप्राप्ती - मोक्ष तर मिळतोच मिळतो; पण लोकांमध्ये विषमताही येत नाही.

लोक आज साम्यवादाचा उद्घोष करीत आहेत. भांडवलदार त्यामुळे अस्वस्थ होत आहेत. दडवून ठेवलेला पैसा ही श्रीमंतांची व सरकारची 'डोकेदुखी' झाली आहे. परंतु, श्रमण परंपरेत मात्र हे मुळातच विद्यमान आहे. कारण, 'अपरिग्रह' हे त्यांचे व्रतच

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आहे. दिगंबर मुनी तर साम्यवादाच्याही पलीकडे पोहोचलेले आहेत. ते समाजाचे धर्मगुरू आहेत, आदर्श आहेत आणि आदर्श कोणता? तर सगळा पैसा-धनसंपत्ती सोडा आणि मुनिवेश धारण करा. हेच त्यांचे वैभवशाली स्वप्न आहे, तेच गंधर्वनगर आहे आणि विद्युल्लतेचे हास्य आहे. संपत्तीला शाश्वत समजू नका. परपदार्थात रती न करता आत्मध्यानात मग्न रहा इत्यादि, ज्या समाजाच्या आदर्शांचा असा पाया असेल, त्या संस्कृतीत हिंसा, वैर, वाद आणि अनाक्रमणाच्या तहाची चर्चा या गोष्टी संभवतच नाहीत. तिथे समस्त मानवजात एकच आहे आणि सगळे जीव जगोत आणि सगळ्यांना जगू देत, हीच भावना आहे. एकमेकांबद्दल क्षमाभाव कायम ठेवतच या जगात राहोत. कषाय मंद करीत राहोत व वात्सल्यभावासह विश्वमैत्रीसह पुढे पाऊल टाकीत राहोत. रणगाडे, तोफा, लढाऊ विमाने/वायुयाने यांची विनाशकारी उड्डाणे या अहिंसक संस्कृतीत निर्माण होणे शक्यच नाही.

ही उदात्त भावना भारतीय संस्कृतीची देणगी आहे. यात कर्मांना शत्रू म्हटले आहे आणि त्यांना नष्ट करण्यासाठी प्रबळ पुरुषार्थाची गरज असल्याचे सांगितले आहे. 'खा, प्या आणि मजा करा'- या विचारसरणीपेक्षा ही देणगी संपूर्णपणे भिन्न आहे. यात तर उपवास, व्रत, संयम आणि त्याग यांना महत्त्वपूर्ण मानले आहे. अविनाशी आत्म्याच्या सन्निध राहणे श्रेष्ठ, असे सांगितले आहे. या संस्कृतीचे ध्येय आणि भौतिक संस्कृतीचे ध्येय यात जमीनअस्मानाचे अंतर आहे. या संस्कृतीत जीवनन्मुक्तांची निर्मिती होते तर भौतिकतावादी विचारधारेने 'बंधना'ची निर्मिती होते. त्यांच्या जीवनावर तृष्णांची सत्ता असते; तर आत्मजगतात जगणारे भौतिक जगावर आपल्या स्थितप्रज्ञतेचे तीक्ष्ण अंकुश चालवून त्या जगाला आपल्या काबूत ठेवतात. प्रकृती सुदृढ राहावी म्हणून भौतिकवादी भक्ष-अभक्ष, खाद्य-अखाद्य ग्रहण करतो आणि केवळ आपल्या शारीरिक बळावरच लक्ष केंद्रित करतो. पण, आत्म-संस्कृतीजीवी त्यामध्ये हिंसा, दोष, पातक, अतिचार असे मानून ते ग्रहण करीत नाही. मद्य, मांस व मधू खाल्ल्याने १०० वर्षे जगाल, असा विश्वास जरी कोणी त्याला दिला तरीही तो ते स्वीकारणार नाही.

शरीरासाठी आत्मपरिणामांना दूषित करणे, हे श्रमण संस्कृतीचे पालन करणाऱ्यास कधीच ग्राह्य वाटणार नाही. मद्य-मांस सेवन करून पुष्ट होऊन स्वत:ला निरोगी, बलवान समजण्यात अभिमान बाळगणारा या मताशी ठाम असतो की, दुसऱ्या भवात अत्यंत क्लेश/यातनाकारक, दारुण व निकृष्ट योनीत जन्मावे लागेल. पापाच्या बंधामुळे निर्माण

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

होणाऱ्या त्या परिणामांची आठवणसुद्धा भयावह आहे. म्हणूनच 'रागावर' विजय मिळवणे, हे श्रमण परंपरेचे पहिले लक्ष्य आहे.

जगात घडणारी समस्त दुष्कर्मे, राजनैतिक-प्रापंचिक घटना, एक-दुसऱ्याला नष्ट करण्याचे दुष्ट-कपटी डावपेच आणि युद्धाची खुमखुमी इत्यादींचे मूळ टोकाची रागभावना हेच आहे. आज अशा अनिष्ट दुर्घटनांची, दुष्ट योगांची फारच रेलचेल आहे. असे वाटते की सरळ, सात्त्विक आर्य संस्कृतीवर असुर संस्कृतीचे आक्रमण होत आहे. आश्चर्य तर या गोष्टीचे वाटते की, सीमेवर होणाऱ्या आक्रमणांची खबर ताबडतोब मिळते, छोट्यात छोट्या युद्ध कारवाईची जाहिरात करण्यात वृत्तपत्रे फारच जागरूक, तत्पर असतात. परंतु, मर्यादांत राहणाऱ्या भारतीयांच्या मनावर नको त्या भौतिक संस्कृतीने केवढा दुष्परिणाम घडवून आणला आहे, याकडे मात्र कुणाचेच लक्ष नाही. बाजारात विकल्या जाणाऱ्या प्लॅस्टिकच्या किंवा रबराच्या आवाज करणाऱ्या खेळण्यासारखी संस्कृतीपासून दूर जाणाऱ्या आजच्या माणसाची स्थिती आहे. एखादा त्यांना उचलतो, दाबतो तेव्हा ते खेळणे जणू धन्य होऊन आवाज काढते. वस्तुतः जे अंत:सारहीन असतात; त्यांची हीच अवस्था होते. उदात्त संस्कृती हेच मानवी जीवनाचे श्रेष्ठ वरदान आहे. संस्कृतीशिवाय तो आपली ओळख, नाव, गोत्र यांचा परिचय करून देऊ शकत नाही.

एखाद्याचे नाव 'महावीरप्रसाद जैन' असेल तर हे नाव त्याच्या संस्कृतीच्या कीर्तिमालेला अम्लान प्राजक्ताच्या फुलांची माळ असल्याचे सांगते. 'महावीर' त्याच्यासाठी धार्मिक व सांस्कृतिक स्वभावाचे प्रतीक आहे. तर, 'प्रसाद' हा शब्द त्याच्या कुळाच्या भगवंताविषयीच्या भक्तीचे प्रतीक आहे. आजच्या बाहेरील झगमगाटाला फसून जर 'महावीरप्रसाद' याने भक्ष-अभक्षाचा विचार बाजूला सारला असेल तर त्याचे अनुमान हेच म्हणावे लागेल की, त्याच्यावर विदेशी संस्कृतीचा प्रभाव तर पडलाच आहे. परंतु, त्याला आपल्या संस्कृतीचे ज्ञानच मिळाले नाही. पूर्वजांजवळ मौल्यवान हिऱ्यांचा खजिना असूनही शेजाऱ्यांच्या दरवाजांवर जडवलेल्या काचेच्या तुकड्यांचा मोह वाटावा आणि तेच मिळवण्याचा लोभ व्हावा, अशी स्थिती परदेशी संस्कृतीस भुलणाऱ्याची झाली आहे. आपल्या उच्च श्रमण संस्कृतीमध्ये जी रत्ने आहेत; ती संपूर्ण विश्वात दुसरीकडे कोठे शोधूनही सापडणार नाहीत, याबद्दल श्रमण संस्कृतीच्या अनुयायांना सात्त्विक अभिमान वाटायला पाहिजे. फक्त पंचमहाव्रतांची (किंवा अणुव्रतांची) आणि १० धर्मलक्षणांची संपूर्ण व्याख्या केली तर संपूर्ण जगातल्या माणसांना मानवतेची प्राप्ती त्या दशधर्मात

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आढळून येईल. अशा या संस्कृतीला तळागाळापर्यंत पोहोचायचे म्हटले तर, वर्णन करायचे तर शब्दसुद्धा सापडणार नाहीत. देवपूजा, गुरु-उपासना, अतिथी-सत्कार, व्यसनांचा त्याग, सत्याचे पालन, मार्दवपूर्ण वागणे, अहिंसक आचरण, वैरकलहाचा त्याग, क्षमा आणि अतिटोकाला पोहोचलेल्या भौतिक वातावरणाचा स्वत:वर प्रभाव टाकू न देणं, असे सद्‌गुण समूह आहेत की, जे फक्त श्रावकांनीच धारण करावेत; असे नाही... तर ते पूर्ण मानवजातीचेच सन्मित्र आहेत. अशा सर्वगुणसंपन्न संस्कृतीची उपासना करणारा अन्य कोणत्या हीन गुणाच्या संस्कृतीचा अनुयायी होऊ शकत नाही.

मनुष्याच्या लौकिक आणि आत्मिक जीवनालाच संस्कृतीने प्रभावित केले आहे; असे नाही तर शिल्प, कला, स्थापत्य आणि अनुयायांची आचरणशैली यांचासुद्धा तिच्या असीम विस्तारात समावेश झालेला आहे. श्रवणबेळगोळ येथील भगवान बाहुबलीची प्रतिमा पाहून, अजिंठा-वेरूळच्या लेण्यातील उत्कीर्ण मूर्तींची सदृश शैली आणि ते अद्‌भुत शिल्पकौशल्य, मोहनजोदरो व हडप्पाच्या उत्खननात प्राप्त झालेल्या वस्तूंचा पुरातात्त्विक अभ्यास असीम धैर्य ठेऊन करून घेतल्यानंतर आपण त्यांच्या संस्कृतीची ओळख करून घेण्यात चूक करू शकत नाही. मंदिरांचे कळस आणि मशिदींचे मिनार यांच्यातील सांस्कृतिक भिन्नता तर दुरूनही समजते. कुठेकुठे संस्कृती संगमाची मधुर चित्रेही बघायला मिळतात. पुरातत्त्व विभागातील विद्वान संशोधकांनी तर उत्खनात सापडलेल्या अवशेषांवरून त्या कोणत्या काळातील वस्तू असाव्यात, हेसुद्धा माहीत करून घेतले आहे. पर्वत, गुहा आणि खांबांवरील शिलालेख, कोरलेले संक्षिप्त लेखांश यावरून संस्कृतीचा इतिहास जाणून घेणे शक्य आहे. हे पृथ्वीच्या उदरात दडलेले अवशेष इत्यादी साद घालूनघालून आमचे लक्ष स्वत:कडे वेधून घेत आहेत. कारण, त्यांच्या कणाकणांमध्ये सुप्त गौरव लपलेला आहे.

संस्कारांचा पुंज म्हणजेच तर संस्कृती! ही स्वस्तिकाची चतुर्मुख मुद्रा (छापा) आहे. ती चारही दिशांतील गतीचा संकेत देते. संस्कृती ही अरण्यात तप करणाऱ्या मुनींची शांत जीवनचर्या आहे. ही जैनेंद्र-मुद्रांकित साधू-महाराजांची पवित्र गाथा आहे. जास्त लिहून काय होणार? 'संस्कृती' या एकाच शब्दात धर्म, इतिहास आणि ज्ञान-विज्ञानासंबंधीचे लक्षावधी पानांचे लेखन एकवटलेले आहे. हा शब्द म्हणजे समाजाच्या नैतिक आदर्शाच्या व्याख्येत लिहिल्या गेलेल्या सर्वच शब्दांचे कल्पतरूवत उगमस्थान आहे.

जी व्यक्ती सुसंस्कृत आहे, संस्कृतीसंपन्न आहे; ती व्यक्ती स्वत:च आपल्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विश्वसनीयतेचे प्रमाणपत्र आहे. मायाचाररहित असा संस्कृतीसेवकच उदार, सभ्य, धार्मिक व चारित्र्यसंपन्न असू शकतो. संस्कृतीपासून ढळलेली व्यक्ती उत्तम क्षमा, संयम शौच, इंद्रियसंयम वगैरे वृत्तींचे पालन करू शकत नाही. ज्याप्रमाणे बांबूच्या वृक्षाला पाने फुटत नाहीत; त्याप्रमाणे संस्कृतीविरहित मिथ्यादृष्टीला सम्यक्त्वाचा बोध होत नाही. तळून काढलेले बियाणे जसे शेतात पेरण्यास योग्य नसते; तद्वत भ्रष्टाचारी व्यक्ती समाजाला अनुकरणीय ठरू शकत नाही. संस्कृतीला अनुसरून असणारे चारित्र्यच समाजाचा मानबिंदू असतो. तेच समाजाला योग्य दिशा दाखवते. संस्कृती हीच समाजाची निर्माणशाळा आहे. चारित्र्याचे महाविद्यालय आहे. संस्कृती आपल्या स्तनांतून शिशूला उज्ज्वल दूध पाजते. संस्कृतिविहिन व्यक्ती म्हणजे तुटलेला पतंग! तो कुठे पडेल, याचा त्याला स्वत:लाच पत्ता नसतो.

संस्कृती हे आचारशास्त्र आहे. संस्कृती व्यवहाराचा मार्ग आहे. ती पापापासून सुटका करणारे सूक्त आहे. संस्कृती भगवान महावीरांची प्रतिमा आहे. पवित्रतेचे दुसरे नाव म्हणजे संस्कृती! आत्मजीवन साधण्याची प्रक्रिया संस्कृतीमुळेच प्राप्त होते. हे संसाराचे सर्वोत्तम असे द्रव्यभांडार आहे. अभयतेचे प्रशंसापत्र आहे. ज्याला संस्कृतीचा खरा अभिमान आहे; जो संस्कृतीचा खरा भक्त आहे; तो आपल्या विरोधकाला पराजित करताना काही सीमेपर्यंत समर्थ होऊ शकतो. यासंदर्भात सिकंदर व एक भारतीय दिगंबर मुनी यांची ऐतिहासिक घटना सांगणे इथे योग्य ठरेल.

जगज्जेता होण्याचा संकल्प बाळगणाऱ्या सिकंदराने जेव्हा भारताच्या पंजाब प्रांतावर विजय मिळवला; त्या दरम्यान त्याने एका वीतराग दिगंबर मुनींची खूप प्रशंसा ऐकली. आपल्या शाही स्वभावानुसार त्याने एका उच्चपदस्थ अधिकाऱ्याला मुनी महाराजांना बोलवण्यासाठी पाठवले. वीतराग तपस्वी मुनींनी त्याला तसेच परत पाठवले. सरतेशेवटी, स्वत: सिकंदर मुनिराजांच्या चरणापाशी आला. श्रेष्ठ साधूच्या चरणी क्षणभर बसला. मुनींच्या भव्यतेचे त्याने दर्शन घेतले. ती भव्यता त्याने केलेल्या हिंसेपेक्षा, लुटालुटीपेक्षा व देशविजयापेक्षा कितीतरी पटीने उच्च होती. खरेच आहे, संस्कृतीच्या वीरपुत्रांच्या पदश्रेठत्वापेक्षा जास्त उच्च असे कोणतेच पीठ नाही.

संस्कृती ही आत्मिक सौंदर्याची जननी आहे. तिच्याच अनुशासनात सुसंस्कारसंपन्न अशा मानवजातीची निर्मिती होते. बहिरंग आणि अंतरंग धर्मात जो फरक आहे; तोच सभ्यता व संस्कृतीमध्ये आहे. समाजातील परस्पर शिष्टतेला अनुसरून होणारी चर्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

म्हणजे सभ्यता आहे. धर्मशासनापासून अणुमात्र विचलित न होता युगायुगांमध्ये एकरूप शास्त्रानुरूप आचारसंहिता चालत आलेली आहे. आचारसंहितेतही मनुष्य सदरा-धोतर घालून, कोट-पॅण्ट घालून संस्कृतीमान राहू शकतो. परंतु अभक्ष-भक्षण हे आचारमार्गाचे, आचारसंहितेचे उल्लंघन आहे आणि आचारपालन हीच संस्कृती आहे.

म्हणूनच, आचार्य सोमदेव सुरी म्हणतात- जोपर्यंत आपल्या सम्यक्त्वाला हानी पोहोचत नाही व व्रतांना दोष लागत नाही; तोपर्यंत जैनांना लौकिकविधींचा स्वीकार करण्यात कोणतीच अडचण येऊ नये. मूळ उद्देश व्रतांचे रक्षण करणे आहे. प्राणत्याग करण्याचा प्रसंग उद्भवला तरीही व्रतांचा भंगभंजन करता कामा नये. दूरवर पसरलेल्या वाळवंटामध्ये प्रवास करतेवेळी तहानेने व्याकूळ झाल्यावर उंटांचे पोट फाडून पाणी पितात, असे ऐकले आहे. कारण, त्यांना प्राणरक्षा महत्त्वाची आहे. परंतु, एक व्रती अशा परिस्थितीत प्राणत्याग करू शकतो. पण अपेयपान करणार नाही. एकाला प्राण तर दुसऱ्याला व्रत प्रिय आहे.

आज खाणे-पिणे, फिरणे या सगळ्यांत दोष शिरले आहेत. कोणताही सारासार विचार न करता सगळ्या वर्गातले लोक हॉटेलमध्ये खायला-प्यायला जायला लागले आहेत. स्पृश्यास्पृश्यतेचा, खाद्यअखाद्याचा विवेक सर्वांनी सोडून दिला आहे. परंतु, व्रतीला तर नियम हवाच की, जर त्याच्यासाठी पवित्र शुद्ध चौक्याची व्यवस्था होत नसेल तर त्याने फळे, सुका मेवा, दूध (तेही शुद्ध असल्यास) घेऊनच राहावे. परंतु, आज अशी दोन वाक्ये लिहिणारा दोन शतकांपूर्वीच्या, मागासलेल्या विचारांचा आहे, असेच म्हटले जाईल. पण, तरीही निर्भयपणे एखाद्या सत्यवक्त्याने या विकृतींची डॉक्टराप्रमाणे शस्त्रक्रियाच करायला पाहिजे, कारण त्या विकृतींपासून भय आहे. सत्यवक्त्यांची जबाबदारी ती आहे. कठीण पर्वतातूनच तर जगाला जीवन देणाऱ्या नदीच्या प्रवाहाचा उगम होतो. गुरू आणि औषध दोन्ही कडू असतात, खरे! पण, म्हणूनच ती जास्त लाभदायक असतात.

'सभ्य' शब्दाची व्याकरणाला अनुसरून परिभाषा, व्याख्या करायची झाली तर ज्यांना सभेत मान्यता आहे ते सभ्य समजले जातात. 'सभ्य'चा दुसरा अर्थ शिष्ट असाही होतो. आपण सभ्य, शिष्ट, साधू व भद्रजन हे साधारणपणे समानार्थी शब्द मानतो. म्हणून, त्या अर्थाने संस्कृतीसेवक हासुद्धा सभ्यच म्हटला जाईल. केवळ वेशभूषेने काम चालणार नाही. खरा सभ्य माणूस तोच की, जो कोणाचा विरोधी नसणे, हेच आपले वैशिष्ट्य मानतो. सभ्य होण्यासाठी सुसंस्कृत होणे अत्यंत आवश्यक आहे. रस्त्यावरून चालताना

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

थुंकणे, केळे वगैरे फळांची साले बेफिकीरपणे रस्त्यात फेकणे, चतुरपणे मिथ्या भाषण करणे, स्वत:पेक्षा दुसऱ्याला तुच्छ समजणे, सार्वजनिक ठिकाणी धूम्रपान करणे, मादक पदार्थांचे सेवन करून वाटेल ते बोलणे.... या काही गोष्टी आधुनिक सुशिक्षितांमध्येसुद्धा आढळून येतात. धर्मशाळा वगैरे धार्मिक किंवा सार्वजनिक ठिकाणी स्वच्छतेचे भान न ठेवता लोक तेथील फरशी, भिंती, पायऱ्या बहुधा घाण करतात. आपलेपणाचा अभावच त्यांना असे करण्यास प्रवृत्त करतो. कारण, जास्तकरून त्यांना स्वत:च्या घरात अशी घाण करण्याची मुभा नसते. म्हणून, सभ्य कपडे घालणे व सभ्यता निभावणे यात मोठा फरक आहे.

वास्तविक, सभ्य मनुष्य तर चंदनाच्या झाडाप्रमाणे आहे. त्याचा सुगंध जवळच्या वृक्षांनासुद्धा स्वत:सारखा सुवासिक बनवून टाकतो. कुणीतरी योग्यच म्हटले आहे की, पवित्र व्यक्ती एखाद्या बगिच्यासारखी असते. ज्या बागेतील फुलांचा सुगंध जवळच्यांपाशी अलगद जाऊन पोहोचतो. चंद्र आणि सज्जन दोघांनाही पाहून आनंद वाटतो. आनंदाचे प्रवाह मन-प्राणात उतरू लागतात. अशा संस्कृतीने सभ्यता निर्माण होते. जर संस्कृतीत दोष असतील तर तीत उत्तम व्यक्तिमत्त्वे निर्माण होत नाहीत. ज्या दर्जाचे धागे असतील, त्याच दर्जाचे वस्त्र तयार होईल. वज्रलेप दिलेल्या व चिकण/चोपड्या केलेल्या पाषाणावर सुंदर चित्रे काढता येतात. एखाद्या खडबडीत भिंतीवर उत्तम चित्रे निघणे, ही कल्पनाच हास्यास्पद आहे. कपाशीच्या झाडावर गुलाब कसा फुलेल?

उत्तम संस्कृतीने संपन्न असलेला हा भारत जगाचा मार्गदर्शक होता. सम्यक्चारित्र्याचे धडे इथूनच घेतले जात. इथल्या आध्यात्मिक महापुरुषांची विदेशांत चर्चा व्हायची. हा देश महात्म्यांची, गुरूंची, मोक्षार्थींची व विशेष महात्म्यांची जन्मभूमी मानली जायची. परंतु, आज याच देशाचे लोक अनुकरण करण्यात हुशार झाले आहेत. भारतीय अध्यात्मदर्शनाच्या गोष्टी पाश्चात्त्य शैलीत ते करू शकतात. एखाद्या भारतीय संताला ते तोपर्यंत महत्त्व देत नाहीत; जोपर्यंत विदेशी लोकांकडून त्यांना प्रशंसेचे सर्टिफिकेट मिळत नाही. राजेंद्रप्रसाद अमेरिकेचे राष्ट्रपती अब्राहम लिंकन यांच्यासारखे होते, गांधी येशूसारखे होते, असे सांगत ते नेहमीच आपल्या देशातील विभूतींच्या आदर्शाच्या उंचीची तुलना परदेशी व्यक्तींशी करीतच राहणार. संपूर्ण विश्वातील लोक ज्यांचे अनुकरण करीत होते, ते आज विश्वातील लोकांचे अनुकरण करण्यातच अहोभाग्य मानतात. जे अग्रभागी होते, त्यांना अनुगामी होणे आवडू लागले आहे. ज्यांच्या आचरणातून आदर्श व्याख्या निर्माण

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

होत असत; ते दुसऱ्यांच्या आचरणावरून स्वतःच्या आदर्शांच्या ध्वजा उंचावत आहेत.

स्वत्व विसरणाऱ्या लोकांची साधारणपणे अशीच वाईट अवस्था होते. कोण्या एकाने आतून पोकळ नगाऱ्यावर थाप मारली तर तो जणू पुलकित होऊन वाजू लागतो. शंखाला कोणीही हातात घेऊन फुंक मारतो. आज भारतीयही अनुकरणवादाचे शिकार झाले आहेत. हे दुसऱ्याच्या चालीनुसार चालणे स्तुती करण्यासारखे नाही. उलट, शोचनीय आहे. ही आपल्या संस्कृतीच्या स्वाभिमानाची हत्या आहे. जो रत्नाचे मूल्य, श्रेष्ठत्व न जाणता काच तुकड्यांचा आग्रह धरेल, कस्तुरी सोडून चिखलासाठी हात पसरेल, त्याच्या शंका करण्यास योग्य, शंकास्पद अशा बुद्धीबद्दल कोणालाही खेद वाटणार नाही?

भारतीय श्रमण संस्कृतीच्या उदात्त तत्त्वांबद्दलची असीम आस्थाच आजच्या जगाला संकटमुक्त करू शकते. मानवी जगातली 'मत्स्यन्याय' प्रवृत्ती यामुळेच दूर होऊ शकेल. ज्यांनी मनुष्यजातीच्या कल्याणासाठी मार्गदर्शन केले; त्या जगद्वंद्य वीतराग तीर्थंकरांचीच ही देणगी आहे. कारण ते स्थान, जात, प्रांत आणि राष्ट्र यांच्या मोहाच्या पलीकडे जाऊन मानवाचा विचार करीत होते. त्यांच्या चरणाशी बसणाऱ्या आचार्यांनी 'क्षेमं सर्व प्रजानां' असे लिहिले. कोण्या एका विशिष्ट जातीला समोर ठेवून हितोपदेश दिला नाही. 'जैन' हा शब्द जातिवाचक नसून धर्मवाचक आहे; जो भगवान वीतराग 'जिना'चा भक्त आहे. तो जैन आहे.

मनुष्यजात अहिंसेवर निरंतर प्रेम करीत आली आहे. युद्ध, हिंसा त्याला कधी चांगली वाटलीच नाही. मी तर असे म्हणेन की, सीमेवर सैनिक सशस्त्र होऊन रांगांमध्ये उभे आहेत; तेसुद्धा हिंसेच्या उद्देशाने नव्हेत तर हिंसेला विरोध करण्यासाठी उभे आहेत. आक्रमण करून जे लोक राष्ट्राचा धर्म, संस्कृती, चांगुलपणा, मंदिर, शेती, आबालवृद्धजनांना दुःखी करू पाहतात; त्यांना रोखण्यासाठी जे उभे ठाकलेले आहेत, ते तर बलिदान देण्यासाठी आणि उपरोक्त समूहाचे रक्षण करण्यास कटिबद्द आहेत. अशा प्रकारे सैनिकांबद्दलसुद्धा अहिंसक दृष्टिकोनातून विचार केला जाऊ शकतो. येथे हेच म्हणणे सुसंगत ठरेल की, माणसाचा उत्तम धर्म अहिंसा हाच आहे आणि अहिंसेमळेच तो परस्परांशी विचार, व्यवहार यांची देवाणघेवाण करीत सुखाने जगत आहे. अशा प्रकारे 'अहिंसा' विश्वधर्म आहे. अहिंसाच या जगाची सर्वश्रेष्ठ संस्कृती आहे. जिथे उडणाऱ्या अत्यंत छोट्याछोट्या किड्यांविषयीही हा क्षमाभाव आहे; त्या संस्कृतीपेक्षा आणखी उत्तम संस्कृती कोणती असू शकेल?

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

म्हणूनच विश्वातील अत्यंत उच्च, गुणयुक्त अशा प्रामाणिकतेला तसेच उच्च तमगुणयुक्त ठेवण्यासाठी उत्तम संस्कृती टिकवून ठेवणे मनुष्यमात्रांसाठी लाभदायक आहे. एक शीतल जलाशय हजारो लोकांना थंड पाणी देईल, एक डेरेदार वृक्ष गार सावली देत उन्हापासून रक्षण करील आणि एक सद्‌धर्म प्राणिमात्राला निराकुल, धर्ममय असा आत्ममार्ग दाखवून त्याची दोन्ही लोकांची यात्रा पुण्यफळे देऊन पूर्ण करील.

एक संस्कृतिमान व्यक्ती नित्य-नियमित स्वाध्यायामुळे संसाराचे खरे स्वरूप जाणून घेते आणि त्याकडे विशेष दृष्टीने पाहते. मग, ती आनंदाने, सुखाने हुरळून जात नाही की, दुःखाने विचलित होत नाही. वादळ-पाऊस स्थिरचित्ताने सहन करते. सुख-दुःखे म्हणजे आपल्या कर्माची फळे, असे जाणून कषाय मंद करीत राहते. स्थितप्रज्ञतेने वागते. अज्ञानी मूल मातीचे खेळणे फुटले-तुटले तर रडू लागते, पाण्यामध्ये चंद्रबिंब पाहिले की, आनंदित होऊन किंचाळू लागते. परंतु, ज्ञानी मात्र 'न मुह्यति न हृष्यति' या न्यायाने दुःखाने व्याकूळही होत नाही आणि अत्यानंदाने नाचतही नाही.

ज्ञान आणि वैराग्य या दोन किनाऱ्यांमधून आपल्या जीवनसरितेला वाहते ठेवत मोक्षसिंधूपर्यंत तिला पोहोचवण्यासाठी ती व्यक्ती प्रयत्नशील राहते. त्या जीवननदीच्या शुद्ध पाण्यात संस्कृतीची कमळे उमलतात. त्यांना स्पर्श करीत जो वारा वाहत जातो; तो शीतलतेने भरून जातो. तिच्या काठांवर जी बीजे पडतात, त्यांचे डेरेदार वृक्ष होतात आणि तहान भागवण्यासाठी जो तृषार्त पाण्याकडे ओंजळ नेतो; त्याला तर अमृतच प्यायला मिळते.

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जैन धर्मातील स्त्रीचे स्थान

नारीच नराची जननी आहे. ती या जगातले एक अतुलनीय असे स्नेहभांडार आहे. गळ्यात मंगळसूत्र घालून ती पुरुषाची अर्धांगिनी बनते खरी; पण सर्वांगानेच त्याचे क्षेमकुशल ती इच्छित असते. धैर्यवान, पराक्रमी, ज्ञानी, ध्यानी, धर्मात्मा आणि चारित्र्यसंपन्न अशा अपत्यांना जन्म देते आणि कुलतारिणी हे नाव सार्थ करते. तीर्थंकर, सिद्ध आणि केवली स्त्रीच्या पवित्र कुशीत जन्मलेली नररत्ने आहेत. स्त्रीचे ओजपूर्ण दूध म्हणजे मनुष्याच्या यशस्वी गाथा लिहिण्याची श्वेत शाईच! नवप्रसवा स्त्रीने आपल्या बाळासाठी आधीच दुधाची सोय आपल्या स्तनांमध्ये करून ठेवलेली असते. दुधाची ही पहिली धार जणू क्षीरसागरातून शुचिर्भूत होऊन येते आणि नवजात बालकाच्या मुखात पडते. बाळाला स्तनपान करीत असतानाच आईच्या इच्छासुद्धा मुलाच्या शरीरात प्रवेश करतात. 'माझा पुत्र विश्वविख्यात व्हावा' ही आईची इच्छा दुधाबरोबरच बालकात पाझरत जाते. क्षीरसमुद्राच्या आश्रयाने जशी अनेक रत्ने राहतात; त्याप्रमाणे या बालकात श्रेष्ठ गुण विकसावेत, यासाठी तिच्या अंत:करणातले अपार वात्सल्य आणि पावित्र्याच्या अनंत धारा त्या दुधाच्या प्रत्येक बिंदूबिंदूतून उसळत असतात.

तिच्या विश्वमातृत्वरूपाचे सर्वार्थाने वर्णन करता येणार नाही. तिचे शील अगाध आहे. त्याचे श्रेष्ठत्व सुमेरू पर्वताच्या शिखरांपेक्षाही उच्च आहे. संस्कृती, नीतिमत्ता, आदर्श आणि चारित्र्य स्त्रीमुळेच सुरक्षित राहिले आहेत. भारतीय संस्कृतीची स्तुती गाणाऱ्यांनी स्त्रीची तुलना पृथ्वीशी करीत आणि तिला क्षमाशील म्हणत तिच्या सहनशीलतेबद्दल आदर व्यक्त केला आहे. तिला 'माँ' असे संबोधून 'मान' शब्दातले पहिले अक्षर तिला भेट दिले आहे. ही पृथ्वी जशी असंख्य फळे-फुले, किडे-भुंगे, पिके-धनधान्य उत्पन्न करते. तशीच स्त्रीसुद्धा सृष्टीच्या सृजनात्मक धरातलाचा केंद्रबिंदू आहे. म्हणून तर अनेक विद्वान,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दार्शनिक, ऋषी-मुनी, सरागी-विरागी इत्यादी विविध गुणमंडित माणसे या पृथ्वीवर जन्माला आली आणि येत राहतील. या नैसर्गिक महतेची धनी स्त्रीच आहे. म्हणूनच संस्कारी समाजावर, धार्मिक लोकांवर, चारित्र्यशुद्ध व्यक्तींवर स्त्रीजातीचे अपरिमित ऋण आहे.

घर हेच स्त्रीचे बव्हतांशी कार्यक्षेत्र राहिले आहे. स्त्री स्वत: मूक, मौन, अव्यक्तच राहिली. चारचौघांसमोर तिने स्वत:ला येऊ दिले नाही. तरीही, तिच्या मांडीवर खेळणारी बालके प्रतिक्षण सुसंस्कारित होत गेली. मनुष्य असूनही सिद्धालयाच्या अत्युच्चतेला तो स्पर्श करू शकला, केवळ मातेच्या संस्कारांमुळेच! स्त्री ब्राह्ममुहूर्तावर उषेप्रमाणे उठते आणि घराला आलेली मरगळ, शिळेपणा घालवून टाकते. शरीराने व शुद्ध मनाने संसारातील नित्यकर्मे करण्यात ती अहोरात्र गुंतलेली असते. असे अन्न ती आपल्या कुटुंबीयांना देते की, ज्यामुळे ते निरोगी, दीर्घायू व शुद्ध मनाचे बनतील. देवदर्शनासाठी ती पुरुषांच्याही आधी मंदिरात पोहोचते. आचार्य, उपाध्याय, साधूंना आहारदान करून वैयावृत्याचे पालन करते. व्यवसायाच्या निमित्ताने व्यापारपेठेत बसणाऱ्या आपल्या पतीची कामे, त्याचा राग-संताप सगळे काही आपल्यावर घेऊन त्याचे मन निर्मळ ठेवते आणि त्याला बाहेरची कामे शांतपणे करण्यास मदत करते.

खरे पाहता, स्त्री हे माणसाच्या गौरवग्रंथाचे पहिले सुवर्णपान आहे, असेच म्हणायला हवे. पुरुषापेक्षा अधिक सहनशील, धर्माचे पालन करणारी, व्रताचार-परायण, पूजादीपाप्रमाणे सर्वदा स्थिर-अकंप राहणारी, देवोन्मुख असणारी आणि मर्यादांच्या अम्लान फुलांना ओंजळीत धरणारी, स्थिरपणे चालणारी स्त्री म्हणजे पुरुषजातीचा सर्वश्रेष्ठ शृंगार आहे. आई, बहीण, पत्नी आणि मुलगी यांच्या रूपात मिळालेला माणसाचा परममित्र आहे ती ! युगानुयुगे ती मानवजातीचा नैतिक आधार बनून राहिली आहे आणि व्यसनात बुडालेल्या माणसावर जेव्हा संकटे येतात; तेव्हा त्याचा ती मित्र झाली आहे.

उंबरठ्यावर लावलेला दिवा घरात आणि बाहेर प्रकाश पसरवतो तद्वत पवित्र विवाहबंधनातील स्त्री माहेर आणि सासर दोन्ही कुळांना पवित्र, सफल आणि यशस्वी करते. स्त्रीला भूमी-जमीन मानतात व पुरुषाला बीज! म्हणूनच स्त्रीच्या क्षेत्रविशुद्धीला, चारित्र्याला जास्त महत्त्वपूर्ण मानणे, ही भारतीय समाजशास्त्राची दूरदृष्टी आहे. विधवाविवाहाचा निषेध, एकपतिव्रताचे पालन इत्यादी नियम हे स्त्रीच्या निरंतर सहयोगाने पालन केले जात आहेत. अशा प्रकारे स्त्री चार वर्गांचे संरक्षण करणारी आहे. रजोवीर्याच्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

संप्लवातून उत्पन्न होणाऱ्या संकरदोषावर नियंत्रण ठेवणारी आहे. भगवान ऋषभदेव, श्रीरामचंद्र, महावीर इत्यादी याच मातेच्या कुशीत वाढले आणि मोठे-महान झाले आहेत. एक अत्यंत सतशील, सच्चरित्र स्त्री जी शिकवण आपल्या मुलांना देऊ शकते, त्या शिकवणीची तोंडओळखसुद्धा जगातल्या मोठ्यामोठ्या पाठशाळा, विश्वविद्यालयांना नाही. स्त्रीच्या जीवनाचा प्रत्येक टप्पा त्याग, संतोष, बलिदान आणि मनस्वीपणाने भारलेला आहे.

जैन साहित्यात स्त्रीचा सन्मान धार्मिक, सामाजिक आणि सांस्कृतिक पातळीवरून समान रूपात केला गेला आहे. 'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवता:' हे वचन फक्त शाब्दिक नाही तर जैन संस्कृतीमध्ये ते व्यावहारिकदृष्ट्यासुद्धा स्त्रीला पूर्ण लागू पडते. वैश्विक साहित्यात सामान्यत: स्त्रीवर अनेक आरोप केलेले आढळतात. तिला नरकातली नीच श्रेणी, पापांची खाण, अपवित्र, विषयवल्ली आणि मोहलता असे संबोधून हिणवण्यात आले आहे. परंतु, स्त्रीला दुर्गती म्हणणाऱ्यांच्या स्वत:च्या मनाची ती दुर्बलता आहे. पराभूतांचा तो आक्रोश आहे. स्त्रीकडे सदैव वासनेच्या दृष्टीने पाहणाऱ्यांचा तो अस्वस्थ दृष्टिकोन आहे. स्वत:च्याच कामुकतेचा चिखल वर उडविणे आहे.

माणसाच्या अहंकाराने आणि शक्तीच्या दर्पाने स्त्रीला फक्त 'शरीर'च मानले. दागिन्यांप्रमाणे तिला आपली संपत्ती मानले. वासनेची भूक शमवणारे खाद्य मानले. याच दृष्टिकोनातून मोठमोठ्या दार्शनिकांनीही स्त्रीच्या संदर्भात कठोर शब्द वापरले. जर पुरुष आपल्या मनातला हा चिखल स्त्रीजातीवर उडवू लागला, तर त्यात स्त्रीचा काय दोष? 'मुखमस्तीति वक्तव्यं दशहस्ता हरीतकी' - जर हरीतकीला कोणी १० हातांएवढे म्हणत असेल तर कोण काय करू शकतो? बोलणाऱ्याच्या तोंडात जीभ आहे. हां! ऐकणारा जास्तीतजास्त काय करू शकतो? तर, त्या बोलण्यातले सत्य नाकारू शकतो पण, 'जनानने क: करमर्पयिष्यति' बोलणाऱ्याचे तोंड कोण धरेल? आणि तरीही याला पुरुषाचा 'स्वैरवाद' म्हटले जाऊ शकते आणि असत्य म्हटले जाऊ शकते.

आचार्य शुभचंद्र म्हणतात की, स्त्री आपल्या सतीत्वाने, महत्तेने, आचरणाच्या पावित्र्याने, विनयशीलतेने आणि विवेकाने या पृथ्वीला विभूषित करते[१] म्हणून विद्यमान स्त्रीच्या उत्तम गुणांचे उदात्तीकरण करण्याची व तिच्या आध्यात्मिक विचारधनाला सुरक्षित

---

१. 'सतीत्वेन महत्वेन वृत्तेन विनयेन च ।
विवेकेन स्त्रिय: काश्चिद् भूषयन्ति धरातलम्।' - ज्ञानार्णव, १२-५८

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ठेवण्याची आवश्यकता आहे. कारण, एकीकडे शास्त्रात स्त्रीची निंदा करणारी वाक्ये आहेत, तर दुसरीकडे स्त्रियांनीच संस्कारांच्या पाठशाळा आजपर्यंत अखंड चालू ठेवलेल्या दिसतात. मान्य आहे की, आजच्या काळाची नको तेवढी भौतिक सुखाची प्रवृत्ती व पाश्चिमात्य जगातला विज्ञानप्रसार यांनी स्त्री आणि पुरुष दोघांनाही संभ्रमात टाकलेले आहे. पूर्वेकडचा मार्ग योग्य की पश्चिमेकडचा, हे त्यांना समजेनासे झाले आहे. ऋषिमुनींनी संयम आणि सदाचाराचा मार्ग अवलंबण्यास सांगितले आहे; तर वासनेच्या सहज तरल धारेत 'हजार किलोवॅट'च्या विजेच्या तारा आणखी समाविष्ट केल्या आहेत.

स्त्री जेव्हा भारतीय वेशभूषेत घराच्या भोवताली, अंगणात वावरायची; तेव्हा ती साक्षात अन्नपूर्णा, लक्ष्मी, सरस्वती, देवी वाटायची. आईच्या रूपात, बहिणीच्या रूपात ती दिसायची. परंतु, जेव्हापासून तिने इंग्रजी शिक्षणप्रणाली स्वीकारली; तेव्हापासून तिचा वेश, विचारआचार यांची भारतात वजाबाकीच सुरू झाली. भारतीय शालीनतेचे भांडवल दिवसेंदिवस कमी होऊ लागले आणि परकीयांसारखा वेश, आचारविचार चक्रवाढव्याजाप्रमाणे वाढत आहेत. या बाह्यआचारग्रहणाच्या स्वातंत्र्याचा उदय होण्याचे परिणाम म्हणजे भारतीय संस्कार मुळापासून उपटून फेकून देणे होय. त्यामुळेच हे शक्य झाले.

रस्त्याने जाणाऱ्या एखाद्या वाटसरूने रिकाम्या धर्मशाळेवर आपला हक्क स्थापन करावा; त्या प्रकारे गेल्या दोन हजार वर्षांतील सांस्कृतिक ऱ्हासामुळे भारतातील सद्गृहस्थांची आचारपद्धती क्रमशः शिथिल होत गेली, जवळजवळ विस्मृतीत गेली. भारतीय शरीर भौतिकतेमुळे जरी नेत्रसुखद वाटत असले तरी अध्यात्मावर पोसला गेलेला भारतीय माणसाचा प्राण अपवित्र गल्लीबोळात सापडून सैरभैर झाला आहे, संभ्रमित झाला आहे. आज नारीचेतना, स्त्री जागृती, प्रगतिशीलता यांच्या समर्थनार्थ आणि सनातनी विचारांच्या विरोधात स्त्रियांचे सशक्त मोर्चे निघत आहेत. वरील नावांच्या घोषणा आकाश दणाणून सोडत आहेत. या सर्वांच्या मागे एक विकृतजीवनदर्शन आहे. स्त्री आपल्या नवजागृतीच्या भ्रमात अशा एका 'गटाकडून' घेरली गेली आहे की, जो प्राचीन ऋषींप्रमाणे स्त्रीची निंदा तर करीत नाही; तिला 'पापबीज शुचांकंदः श्वभ्रभूमिर्नितंबिनी' पापाचे बीज, चिंतांचे मूळ कारण आणि स्त्री म्हणजे नरकस्थान असेही म्हणत नाही. परंतु, अप्सरांची समस्त विशेषणे लावून संपूर्णपणे तिला कामुकतेकडे खेचत आहे.

यावरून स्पष्ट होते की, स्त्री पहिल्यांदा निंदकांनी घेरलेली होती. आता प्रशंसकांनी तिला घेरलेले आहे. पहिले जे होते ते निंदक असूनही उदार होते आणि 'जल तू जलाल तू,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आयी बला टाल तू' असे म्हणून स्त्रीपासून दूर पळून जाऊ पहात होते. त्यामुळे स्त्रीचे यात कुठले नुकसान नव्हते. परंतु, आज स्त्री पुरतेपणी लुटली जात आहे. तिचे तप, तेज, साधना सारे काही पायदळी तुडवले जात आहे. पाण्याचा अभाव असलेल्या वाळवंटातील मृगजळात आपली तहान शमवण्यासाठी एखादी हरिणी जशी आपले तोंड खुपसते, तशीच पाण्याअभावी मरून जाते; तसे स्त्रीने प्राचीन काळापासून मिळवत आलेल्या ऐश्वर्यसंपन्न, मौल्यवान अलंकारांना वासनेचे मद्य विकणाऱ्या गरीब कलालांना विकून टाकले आहे. त्यामुळे तिला तृप्ती लाभणार आहे का? आग प्राशन करून कुठे तहान शमणार आहे का?

आत्मवंचनेच्या अशा एका चक्रव्यूहात ती फसली आहे; जिथे सात व्यसने सप्त महारथींच्या रूपात उपस्थित आहेत. परंतु व्यसनांमुळे तिच्यावर जे प्रहार होत आहेत; त्यांना ती उपहार समजू लागली आहे आणि त्या भविष्यातील भयाबद्दल ती अज्ञात आहे की, जे भय तिच्याजवळच्या अनादिकाळापासून साठवलेल्या रत्नभांडारातील एकही रत्न शिल्लक ठेवणार नाही. अकिंचन स्त्रीचे ते स्वरूप कसे असेल? पारध्यांनी आधीच निश्चित करून ठेवलेल्या एका मार्गावरून हरीण धावत चालले आहे. ते सापळ्यात अडकणारच, हे दूरदर्शी जाणतात.

भारतीय संस्कृतीत (श्रमण संस्कृतीत) स्त्रीपुरुष संबंधांमध्ये एक मर्यादा निश्चित केली गेली होती आणि 'मातृवत परदारेषु' परस्त्री मातेसमान मानण्याचा उपदेश दिला गेला होता. त्या उपदेशात संपूर्ण राष्ट्राच्या जीवनाचे माधुर्य व संस्कारशीलता दडलेली होती. युवकांना पूर्ण ब्रह्मचर्याचे पालन केल्यानंतरच गृहस्थाश्रमात प्रवेश करण्याची परवानगी मिळत असे. मुली घरातील आचारविचार, गृहिणीची सारी कर्तव्ये घरात राहूनच मोठ्या कौशल्याने शिकून घेत असत आणि परंपरेनेच आपल्या आईकडून शीलरक्षणाचे धडेही घेत असत. अशा तऱ्हेने संयमाचे शिक्षण तिला मिळत असे. घर, जात, कुळ आणि सामाजिक व्यवहार एवढे सशक्त होते की, अपरिपक्व अवस्थेतही विकार उत्पन्न होण्याची शक्यता नसे. परंतु काळाच्या गतीने शिक्षण, भोजन, व्यवहार, रीती-नीती, संस्कार सारे काही बदलून टाकले. भारतीय रोपट्यांना विदेशी खत घालून त्यांना असे काही बनवले की, जन्म तर भारतातला पण त्यांचे स्वरूप, आचरण, विकास हे सगळे पाश्चिमात्य विचारधारेत मिसळणारे असे झाले.

याला देशसंकर म्हटले जाऊ शकते. आजचे युवकयुवती याच विचारप्रवाहातून पुढे जात आहेत आणि टोकाच्या भौतिक सुखाच्या जाळ्यात त्यांनी स्वतःला झोकून दिले

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आहे. हे पतन आहे. जरी धर्म, विचार बाजूला ठेवून तटस्थ राहून यावर चिंतन केले तरी ही एक अस्वस्थता आहे, घोर मानसिक अध:पतनच आहे. आज परिधान केले जाणारे पोशाख, आहारातील स्वच्छंदता आणि मनोरंजनाच्या नावाखाली उसळणारी चित्रपटगृहातील गर्दी ही युवा पिढीकडून प्रतिक्षण होणाऱ्या मानसिक व्यभिचाराची साक्ष देते. हे कठोर सत्य आहे. आई-वडील, भाऊ-बहीण एकत्रितरीत्या बसून रेडिओ व सिनेगीते ऐकतात, चित्रपटही पाहतात. त्या वेळी त्यांच्या मनात थोडासुद्धा विचार येत नाही की, असे एकत्रित बसून चित्रपट पाहणे, सिनेसंगीत ऐकणे म्हणजे फार मोठ्या अप्रशस्ततेचे लक्षण आहे. शरीरावर जिथे कुष्ठरोग होतो; तेथील त्वचा संवेदनहीन होते; तसेच काहीसे होत आहे, हे नक्की! समाजाचा जणू नैतिक मृत्यू झाला आहे. एकाच वेळी खुर्च्यांवर बसून अश्लीलातील अश्लील दृश्ये बरोबर पाहणारे वडीलच आपल्या कन्येला उन्मुक्त, स्वैर आचरण करण्याची मुभाच देत असतात आणि मग परिणामस्वरूप 'प्रेमविवाह' अथवा निषिद्ध संपर्क युवकयुवतींमध्ये सुरू होतात.

या अनियंत्रणामुळे धर्म उद्ध्वस्त होतो. शिष्टाचार रसातळास जातो. काळ जणू जहाल विष पिऊन मरून जातो. तपाचा झेंडा उलटा होतो. (पत) पतन होते. राग, त्यागाला दडपून टाकतो. शील/चारित्र्य नष्ट होऊ लागते आणि सर्वच बाजूंनी होणाऱ्या भ्रष्टाचाराचा, अश्लीलता व निर्लज्जतेबरोबर द्विभार्यायोग घडून येतो. तेव्हा, राष्ट्राच्या बौद्धिक व शारीरिक चेतना आणि शक्ती यांना उतरती कळा लागते. वृषभासारखे उंच व पुष्ट खांदे असणारे तरुण दिसून येत नाहीत आणि वृद्धत्वाची ज्यांना लाज वाटते आहे, अशा स्त्रिया-तरुणींना शोभणाऱ्या प्रसाधनांच्या, अलंकारांच्या, केस काळे करण्याचे प्रयत्न करणाऱ्या साधनांच्या मागे लागल्याचे दिसून येते. मातृत्वाचे सन्मानित पद त्यांना वयस्करपणाकडे नेणारे वाटते. आज मोठ्यामोठ्या शहरात बससाठी ज्या रांगा लागलेल्या असतात; त्यातील अनेक चेहरे या गोष्टींची साक्ष देतात. स्वत:च्या सभ्यतेचे दर्शन घडवण्यासाठी शब्दसुद्धा मोजके बोलले जात आहेत. स्पष्टपणे विचार बोलून दाखवले जात नाहीत. उगाचच बोलणे त्यांना पंकस्नानासारखे वाटते. ते शिष्टसंमत मानले जात नाही.

'घृतकुंभसमानारी तप्तांगारसम पुमान' असे म्हणत पुराणकालीन पुरुषांनी-पूर्वजांनी स्त्री-पुरुषांमध्ये एक लक्ष्मणरेषा आखून दिली होती; ती स्त्रियांच्या दृष्टीने वरदानच होती. त्यामुळे जीवन सुरळीतपणे चालत होते. पतन, पाय घसरणे यांची भीतीच नव्हती. पण आज? आज तर लोकांना जाणूनबुजून घसरायचे आहे. संयमाला व संयमी व्यक्तीला नावे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ठेवली जातात. विवेकाला अविवेक म्हणतात, पशुत्वाला देवत्व देऊन महान करतात. अल्पजीवी अशा या उपक्रमांमध्ये आंधळा स्वार्थच त्यांचा मित्र आहे. कुटिलता हाच त्यांचा सिद्धमार्ग आहे. दीनता-दुबळेपणा हेच त्यांचे व्यक्तित्व आहे आणि उदारतेला अर्धचंद्र दिला जात आहे. प्रगतीच्या नावाखाली उन्नती मानून विकासाच्या मार्गावर हे सारे घडत आहे. जे दिवंगत झाले आहेत किंवा ज्यांना त्यांच्या खरेपणामुळे सुळावर लटकवले गेले आहे; त्या अनुभवी लोकांच्या विचारांच्या शवपेटिकेवर खिळे ठोकण्यासाठीच हे केले जात आहे.

म्हणून, या दारुण वास्तवाचा अंत केला पाहिजे; नाहीतर मग ही दारुणता विश्वाचा अंत करणारी ठरेल आणि मग तेव्हा स्त्रीलासुद्धा आपले पूर्वीचे वर्चस्व प्राप्त करून घेण्यास खूप वेळ लागेल. कारण, एकदा चढून उंची गाठली व तेथून दरीत कोसळलो तर पुन्हा वर चढून जाणे अवघड असते. दरीत उभ्या असलेल्या व्यक्तीला ते तितके भयावह वाटणार नाही; जितके उंचीवरून घसरून दरीत पडलेल्या माणसाला वाटेल. ज्यांचे जीवन गर्तेतच गेले आहे, जे गर्तेतच जगत आहेत. ते कदाचित संधी मिळताच वर उठण्याचा प्रयत्न करण्यासाठी निदान जिवंत तरी आहेत. पण, उंच शिखरावरून पडणाऱ्यांचा तर मृत्यू निश्चितच असतो. हे तेवढेच खरे आहे की, काळ्या वस्त्राला डाग लागत नाही आणि पांढऱ्याशुभ्र वस्त्रावरचा डाग कधी जात नाही.

भारतीय स्त्रीचा इतिहास एक उज्ज्वलतेचे शुभ्र पान आहे. त्या उज्ज्वलतेची परंपरा महासतींनी सुरक्षित ठेवली आहे. ब्राह्मी, सुंदरी, अंजना, अनंतमती, दमयंती, चंदना आणि सीता यांच्याविषयी समाज-संस्कृतीला अभिमान आहे. धनिक स्त्रियांना प्रतिष्ठेचे सिंहासन कधीच लाभले नाही. स्तोत्रकारांनी जेव्हा स्त्रियांचे स्मरण केले; तेव्हा तीर्थंकरांचे मातृत्व धन्य होऊन गेले. 'भक्तामर' स्तोत्रातीलच ओळी बघू या. त्यामध्ये श्री मानतुंगाचार्य लिहितात, ''हे माता मरुदेवी! आपण धन्य आहात. आपण भगवान ऋषभनाथांना!''- 'आदि तीर्थंकरांना' जन्म दिलात; जशी पूर्व दिशा सूर्याला जन्म देते.[२] त्याप्रमाणे श्री शुभचंद्राचार्य लिहितात- ''क्षमा, शील, संयमानेयुक्त अशा आपल्या वंशात तिलकाप्रमाणे

---

२. 'स्त्रीणां शतानि शतशो जनयन्ति पुत्रान्,
नान्या सुतं त्वदुपमं जननी प्रसूता ।
सर्वा दिशो दधति भानि, सहस्ररश्मिं,
प्राच्येव दिग् जनयति स्फुरदंशुजालम् ।।' - भक्तामर, २२

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्रुत आणि सत्याने समन्वित स्त्रिया धन्य आहेत.''[३] आचार्यांच्या या शब्दांतून भारतभूची संस्कृती प्रतिबिंबित होते. हा शब्दध्वनी या राष्ट्राची संपत्ती आहे. स्त्रीसाठी उपयोगात आणली गेलेली ही विशेषणे ललकार देत सांगतात की क्षमा, शील, संयम, सत्य आणि श्रुत (ज्ञान) हेच इथल्या स्त्रीचे स्वरूप आहे. ज्यांनी आपल्या पदराने शील, शरीर झाकून ठेवले; त्यांचाच यशसुगंध कस्तुरीसमान दिशादिशांतून दरवळतो आहे. कुशीतून नररत्ने प्रसवणारी शीलवान स्त्री म्हणजे समाजाची संपत्तीच! स्त्री ही अशी चेतना आहे की, जिची स्वत:ची अंत:चेतना सदैव जागृत असते. त्यामुळेच ती षट् आवश्यक क्रियांचे पालन करीत राहते.

तीच महासती सीता आहे, जिचा श्रीरामचंद्रांनी त्याग केला होता आणि तरीही मनात पतीबद्दल कोणतीही वाईट बुद्धी न ठेवता, पतीविरोधी भावांना आश्रय न देता सेनापती कृतांतवक्त्रास म्हणते- ''श्रीरामांना सांगा की, माझा त्याग केलात पण; तुम्ही लोकनिंदेच्या भीतीने धर्मास सोडू नका.'' अहो, सती स्त्रीचे मन स्वप्नातही धर्मापासून विचलित होत नाही. त्या धर्मासाठी शारीरिक, मानसिक व आत्मिक वेदनांना तप समजून सहन करत आल्या आहेत. त्यांची तितिक्षा/सहनशीलता पवित्र आहे, अमल आहे. त्यांची समर्पण भावना पतीच्या विरोधात कणभरही चिंतन करू शकत नाही, एवढ्या त्या पतीशी एकरूप होतात.

स्त्री मूर्तिमंत क्षमा आहे. तिच्याच स्तन्यधारेच्या रूपात मनुष्यलोकाला संजीवन औषध प्राप्त होते. पुरुषाच्या रोषाला, दोषाला ती पचवते व त्याला निर्मलता प्रदान करते. चंदनाच्या लाकडासारखे जळूनसुद्धा सुगंध देते, कळीप्रमाणे तुडवले गेल्यावरही सुवासच उत्पन्न करते. जे स्त्रीच्या या उदात्त-उज्ज्वल रूपाचे प्रशंसक आहेत; त्यांनाच स्त्रीजातीच्या सच्चारित्र्याच्या सुरक्षिततेची खरी चिंता आहे. समर्पण-आहुती, त्याग आणि सहनशीलता यांनी व्यापलेले स्त्री-जीवन समाजाचे महत्त्व नेहमीच समुन्नत राखते. ती स्वत:साठीसुद्धा अमृतदायिनी आहे. भ्रमजालात फसून जर स्त्री आपल्याच प्राचीन इतिहासाकडे पाठ फिरवणार असेल तर तो दिवस मानवजातीसाठी मोठा दुर्भाग्याचा दिवस ठरेल. त्या दिवशी 'स्वेच्छाचार' उत्सव साजरा करील, पाप प्रसन्नतेने पुलकीत होईल. अन्याय-अनीतीसाठी अष्टदिशा मोकळ्या होतील.

---

३. 'ननु सन्ति जीवलोके काश्चिच्छमशीलसंयमोपेताः ।
निजवशतिलकभूताः श्रुतसत्यसमन्विता नार्यः ।।' - ज्ञानार्णव, १२/५७

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

म्हणून, मनुष्य मातृजातीला हातांची ओंजळ जोडून याचना करतो आहे की, तिने अग्निपरीक्षा देणारी सीता व्हावे, समाजाला वाममार्गाला लावण्यास साहाय्यभूत ठरणारी अलंकारप्रिया (कांचनी), रूपसुंदरी बनू नये. तिने उषेसमान असावे व लोकव्यापी अंधारावर वज्र होऊन बरसणाऱ्या सूर्यपुत्रांना जन्म द्यावा. ज्यामुळे आपली मुले श्रेष्ठ त्यागी किंवा उत्तम श्रावक बनून जीवनाचे सार्थक करतील, असेच संस्कार तिने मुलांवर करावेत. कारण, आईच मुलांना धैर्यशील, सुसंस्कारी, वीर किंवा चारित्र्य-शिरोमणी आजवर बनवू शकली आहे; पुढेही तीच तसे बनवू शकणार आहे. एक आई तिच्या मुलांसाठी १०० शिक्षकांपेक्षा श्रेष्ठ ठरते. तीच त्यांचा पहिला आदर्श गुरू आहे, शिक्षिका आहे.

लहान मुलांचा जास्तीतजास्त वेळ हा आईभोवतीच जातो. म्हणूनच प्रारंभिक संस्कार त्यांना आईकडून मिळतात. त्यामुळे देश, धर्म, जात आणि सगळ्याच प्रकारच्या कल्याणासाठी आईच बालकाला संस्काराद्वारे समृद्ध करते. मुलाला केवळ जन्म दिल्याने आईचे मातृत्व सार्थ होत नाही; तर तिने त्याला एखाद्या कुंभाराप्रमाणे संस्कारचाकावर बसवून एखाद्या सुरईचा, एखाद्या कुंभाचा वगैरे आकार देऊन घडवायचे असते. आचार्य कुंदकुंद, आचार्य समंतभद्र, श्री अकलंकदेव, समाधिसम्राट, श्री शांतिसागर महाराज आणि श्री गणेशप्रसादजी वर्णी ही महान व्यक्तिमत्त्वे त्यांच्या आईच्या संस्कार-पाठशाळेतले पहिले विद्यार्थी होत; नंतर अन्य शाळांचे! आज या संक्रमणकाळात अशा तप-त्याग-तेजोमयी मातांची ती पवित्र संस्कारी स्वरूपाची झलक दुर्लभतेच्या अंधारात विलीन होत चालली आहे. ही स्थिती गंभीर आहे. त्यामुळे संस्कृतीचा ऱ्हास होत आहे. उदात्त संस्कारांच्या पाठशाळांना कुलूप लागले की काय, असे वाटत आहे.

महावीरांच्या मातेचे नाव 'प्रियकारिणी' होते. भगवंतांना जन्म देण्यापेक्षा दुसरे लोकप्रिय काम कोणते असू शकते? म्हणून तर ती नक्कीच 'प्रियकारिणी' होती आणि म्हणूनच राजा सिद्धार्थही सिद्धार्थ (सिद्ध प्रयोजन) होते. आजसुद्धा स्त्रियांची कूस प्रियकारिणीदेवीची उत्तराधिकारी व्हावी आणि स्त्रीने आपले स्त्रीत्व धन्य करावे. जेव्हा एखादी सौभाग्यवती वधू सासुच्या किंवा अन्य मोठ्या व्यक्तीच्या पाया पडते, तेव्हा 'सीतेसारखी हो.' असाच आशीर्वाद तिला देतात. 'सीतेसारखी हो' हा आशीर्वाद युगानुयुगे सासू आपल्या सुनेला देत आली आहे. सुनेने स्वैराचारी व्हावे, असा आशीर्वाद द्यायची वेळ कधीच येणार नाही. स्त्रीच्या सांसारिक जीवनाच्या इतिहासाची एक झलक 'अमरकोशा'च्या शब्दावलीत अशी आढळते... 'प्रथम पाणिग्रहण करून ती 'पत्नी' बनते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मग, पतीची अर्धांगिनी झाल्याने 'द्वितीया' होते. गृहस्थाश्रमात पतीबरोबर आचरण करते म्हणून 'सहधर्मचारिणी' बनते. ती जेव्हा कुटुंबाचे पालनपोषण करते आणि उत्तमोत्तम पदार्थ स्वयंपाकघरात किंवा सिद्धान्न-सदनात बनवून कुटुंबीयांना वाढून पुष्ट करते, तेव्हा ती 'भार्या' असते. यथावकाश तिला जेव्हा अपत्यप्राप्ती होते; तेव्हा तिला 'जाया' म्हटले जाते आणि पुढे संयुक्त/एकत्र कुटुंबात ती ज्येष्ठ असल्याने 'कुटुंबिनी'पद भूषवते.[४] या रूपामध्ये स्त्री ही कुटुंबाची एक अशी संस्था आहे; जिचे महत्त्व सुप्रतिष्ठित आहे.

आज नव्या शब्दात तिला 'वाइफ' म्हटले जात आहे आणि आईला ममी म्हटले जाते. 'ममी' शब्द जतन केलेल्या व पेटीत ठेवलेल्या मृत शरीरासाठी वापरला जातो आणि 'डॅडी' शब्दाला 'डेथ'चे भाव येतात. 'वाइफ' शब्दात पतिप्रिया 'पत्नी'चे भाव येत नाहीत. वनवास दिल्यानंतर सीतेसारखी एखाद्या रामाला 'अग्रतस्ते गमिष्यामि मृद्नंती कुशकंटकान्' (मी तुमच्या पुढेपुढे मार्गातले काटे उचलतउचलत चालत जाईन.) असे म्हणणार नाही. कारण, ती 'पर्स'वर प्रेम करते. वनातील काट्यांनी भरलेल्या जमिनीवर नाही. ती तर म्हणेल- 'विच्छेदाय गमिष्यामि न्यायालयमहं त्वरा'- 'मी तर घटस्फोट घेण्यासाठी न्यायालयात जाईन' त्याचप्रमाणे 'पती-पत्नी' जेवढे सुखी होऊ शकतात, एकमेकांवर जन्मभर विश्वास करू शकतात. तेवढा 'वाइफ-हजबंड' नाहीत करू शकत!

भारतीय स्त्रीची शालीनता, सौंदर्य सगळे काही तिच्या राष्ट्रीय परंपरेच्या वेशात आहे आणि तिचा सन्मान माता, भगिनी व पत्नी या नावांमध्येच आहे. शब्द भलेही पुद्गल द्रव्य असतील; तरीपण त्या शब्दांमध्ये जी परंपरा आहे, जो अर्थ आहे, आत्मीयतेचे माधुर्य आहे; त्या शब्दांचे स्थान दुसऱ्या शब्दांना मिळणे शक्यच नाही. वडिलांनी दुसरी पत्नी घरात आणली तरी पहिल्या पत्नीपासून झालेल्या मुलांचे मातृपद लाभत नाही. तिला 'सावत्र' आईच म्हटले जाते. मग, जे शब्द हजारो वर्षांपासून उसातील साखरेप्रमाणे आमच्या मनात, प्राणात एकाकार झाले आहे, एखाद्या अभ्यागताला-पाहुण्या शब्दाला घराच्या स्वामिनीचे पद आमची आत्मीयता कशी देऊ शकेल? कारण ते शब्द भारतीय भूमीतले नाहीत. पत्नी शब्दात भारतभूमीचे आध्यात्मिक सत्त्व मिसळले गेले आहे. ते सत्त्व वाईक किंवा भोगिनी शब्दात कधीच असू शकत नाही. ज्यांनी भारतात स्त्रीवर्गाची निंदा केली ते सुद्धा तिचे मित्रच आहेत, असे म्हटले जाऊ शकते. कारण, त्यांनी स्त्रीच्या

---

४. 'पत्नी पाणिगृहीती च द्वितीया सहधर्मिणी ।
भार्या जायाथ पंभूम्नि दाराः स्यात्तु कुटुम्बिनी ।।' - अमरकोश, द्वि. कांड

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्त्रीत्वाला, तिच्या आत्मिक सौंदर्याला नष्ट होऊ दिले नाही. आचार्य शुभचंद्र 'ज्ञानार्णव'मध्ये लिहितात की, 'शास्त्राला अनुसरणारे अभ्यासू आणि संसारभ्रमणातून विरक्त, निःस्पृह, उपशमाने श्रीमंत असे ब्रह्मव्रती स्त्रियांची निंदा करीत असतील तर त्याचा अर्थ असा नाही की, ते स्त्रियांचे शत्रू आहेत. उलट, अपेक्षाभेदाने त्याग मार्गाकडे प्रवृत्त जीवाच्या रागचेतनेला पराभूत करण्याच्या उद्देशाने स्व-पर-पर्याय-परिज्ञानाच्या उद्‌बोधासाठी ते तसे म्हणतात. परंतु ज्या स्त्रिया यम-नियम-स्वाध्याय-शील-चारित्र्य यांनी विभूषित आहेत, वैराग्य, उपशमादीमुळे पवित्र आहेत आणि साध्वी होऊन स्त्रीपर्यायाच्या उद्धारासाठी प्रयत्नशील आहेत; त्यांना निंदनीय म्हटलेले नाहीच. मुळात निंदा ही दोषांची आहे, गुणांची नाही. म्हणून, जास्त स्पष्ट होते की आत्म्याला स्वतःमध्ये स्थिर करण्यासाठी आणि परपर्यायांप्रति उदासिन ठेवण्यासाठी, निःसंग राहण्यासाठीच 'स्तनौ मांसग्रंथी वदनमपि लालागृहमिदम्' वगैरे लिहिले गेले आहे. हा उल्लेख सापेक्ष असल्याने क्षम्य आहे आणि संसाराच्या असारतेचे निरूपण असल्याने वास्तविकही आहे.[५]

या जगात त्यागी आणि दार्शनिक वगळले तर हजारो लेखक-कवींनी आणि शृंगारप्रिय रचनाकारांनी काव्याद्वारे व शिल्पकृतींच्या माध्यमातून स्त्रीच्या अंग-प्रत्यंगांचे वर्णन केले आहे. परंतु, संसारातील आजपर्यंतच्या पदार्थांना राग आणि तदर्थी बंधन मानणाऱ्या विरक्त-उपशमवृत्तिप्रधान ज्ञानमार्गींनी आत्मसाधनेसाठी स्त्रीच्या मोहपाशात अडकवणाऱ्या अंगांची निंदा केली आहे.[६] ते त्यांच्याबाबतीत योग्यच आहे. मातृत्वाव्यतिरिक्त स्त्रीचे 'मोहिनी' हेसुद्धा एक रूप आहे आणि त्या रूपाविषयी वीतराग-भाव प्रखररीत्या निर्माण करण्यासाठी वैराग्य-शतक लिहिणाऱ्या अनेक भर्तृहरींनी हातात लेखणी घेतली आहे. त्यांना स्त्रीचे निंदक म्हणणे म्हणजे शब्दशक्तीच्या अमर्याद सीमा ठाऊक नसणेच म्हणावे लागेल. कारण, ज्या आचार्यांनी नारी-निंदेच्या विषयी पद्य लिहिले आहे; त्यांनी त्याचबरोबर स्त्रीचे श्रेष्ठत्व दर्शविणारी सूक्तेही लिहिली आहेत. तिच्या मातृत्वाची नेहमीच प्रशंसा केलेली आहे आणि यौनस्वरूपाची निंदा केली आहे. आचार्य जिनसेन लिहितात की,

---

५. 'निर्विण्णैर्भवसंक्रमच्छ्रु तधरैरेकान्ततो निःस्पृहै-
नार्यो यद्यपि दूषिताः शमघनैर्ब्रह्मव्रतालंबिभिः ।
निन्द्यन्ते न तथापि निर्मलयमस्वाध्यायवत्तांकिता
निर्वेदप्रशमादिपुण्यचरितैर्याः शुद्धिभूता भुवि ।।' - ज्ञानार्णव, १२/५९

६. 'नैसर्गिकं हि नारीणां चेतः सम्मोहि चेष्टितम् ।' - क्षत्रचूडामणी, ८/४

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

'विदुषी स्त्री स्त्रीजातीत अग्रगण्य आहे.'[७] याच प्रकारे 'हरिवंश पुराणात' अकराव्या सर्गात जयकुमार व सुलोचना यांच्या एका प्रसंगात सुलोचनेला ११ अंगांना धारण करणारी आर्यिका असे म्हटले आहे.[८] प्रसिद्ध नीतिकाव्य 'क्षत्रचूडामणि'मध्ये पद्मा नामक एका मुख्य साध्वीची चर्चा करतांना असे लिहिले आहे की, तिने जीवंधर नावाच्या राजाच्या मातेला साध्वीची दीक्षा दिलेली होती.[९] भगवंतांच्या समवशरण-सभेत आर्यिकांचे विशेष स्थान असते. त्यामध्ये क्रमशः ऋषिगण, स्वर्गवासिनीदेवी, साध्वी, आर्यिका, ज्योतिषदेवता, व्यंतरदेवी, भवनवासीदेवी, व्यंतरदेव, ज्योतिषीदेव, स्वर्गवासीदेव, मनुष्य आणि तिर्यंच विराजमान असतात.[१०] यावरून, स्त्रीजातीबद्दलची श्रमण विचारधारेतील पुरेशा सन्मानभावाची प्रचीती येते. ज्या स्त्रिया व्रतनियमादी ग्रहण करून पवित्र जीवन व्यतीत करतात; त्यांच्याबद्दल फक्त उदात्त भावच असतो असे नाहीतर त्या साध्वीच्या रूपात त्यागचर्येचे पालन करीत असल्याने त्यांना महाव्रतींच्याप्रमाणे सन्मान/आदर/मान्यता मिळत राहते. औपचारिकदृष्ट्या ती महाव्रतमती मानली गेली आहे. सागरधर्मामृतात याची पुष्टी करताना लिहिले आहे की, एक कौपिनधारी ऐलक महाव्रती नाही; परंतु दोन भागांचे वस्त्र परिधान करूनसुद्धा आर्यिकांना महाव्रत-अधिकारिणी म्हटलेले आहे.[११] स्त्रीच्या योग्य स्तुतिगीतांची जैन संस्कृतीत कमतरता नाही आणि स्त्रीच्या विकासाचा निषेधही नाही. गरज आहे ती फक्त स्त्रीने सतीत्वाच्या मार्गानेच पुढे जात राहावे याची.

स्त्रीचे 'असणे' हे घर, समाज, धर्म आणि राष्ट्र यांच्यासाठी उपकारक ठरावे. ज्योतिषशास्त्रात एक पद आहे - 'पश्यन्ति सप्तम् सर्वे शनिजीवकुजादय:' म्हणजे, शनी, गुरू, मंगळ सगळे सातवे स्थान पाहतात आणि सप्तमस्थानाला 'स्त्रीभवन' म्हटले जाते.

---

७. 'विद्यावान् पुरुषो लोके सम्मतिं याति कोविदैः ।
नारी च तद्वती धत्ते स्त्रीसृष्टेरग्रिमं पदम् ।।' - महापुराणं ९८

८. 'द्वादशांगधरो जातः क्षिप्रं मेघेश्वरो गणी ।
एकादशांगभुज्जाताऽर्यिकापि च सुलोचना ।।' - हरिवंशपुराण, ११/५२

९. 'पद्मारव्या श्रमणीमुख्या विश्राण्य श्रमणीपदम् ।
तन्मातृभ्यां ततस्तं च महीनाथमबोधयत् ।।' - क्षत्रचूडामणी ११/१६

१०. 'ऋषि कल्पजवनितायी ज्योतिर्वनभवनयुवतिभावनजाः ।
ज्योतिष्ककल्पदेवा नरतिर्यचो वसंति तेष्वनुपूर्वम् ।।'

११. 'कौपीनेऽपि समूर्च्छत्वान् नाहत्यार्यो महाव्रतम् ।
अपि भक्तममुर्च्छत्वात् साटकेऽप्यार्यिकाऽर्हति ।।' - सागार ३६

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कुंडलीत जे ग्रह असतात; ते सातवे स्थान किंवा 'स्त्रीभवन'च बघतात. कारण, सगळे पावित्र्य हे 'स्त्रीभवना'वरच अवलंबून असते. जर पुरुष भाग्य, संतान, ऐश्वर्य इत्यादीबाबत सुखी-समृद्ध असेल; पण त्याचे स्त्रीभवन जर दुर्बल असेल तर जन्मकुंडलीत दर्शवलेले फलादेश त्याला ५० टक्केच मिळतात. म्हणून तर साऱ्या ग्रहांची नजर सप्तम स्थानावरच असते. स्त्रीच्या संरक्षणासाठी समाज विशेष सावध राहिलेला आहे आणि याच दक्षतेने स्त्रीजातीला अध:पतनापासून वाचवलेले आहे तसेच समाजात, धार्मिकक्षेत्रात तिला सन्मानाचे पद दिलेले आहे, याची साक्ष इतिहास देत आहे.

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

निर्ग्रंथ मुनी

रात्रंदिवस आत्म्याचे मनन करणारे म्हणजे मुनी! हा संसार अनंतानंत जीवांनी भरलेला आहे. जीवांचे समूह आपल्या स्वतःच्याच अनंतानुबंधांनी उत्पन्न होत आहेत आणि त्यांचा लयसुद्धा होत आहे. अनादिकाळापासून असे होत आले आहे आणि पुढेही अनंतकाळापर्यंत असेच होत राहणार आहे. जीवाची, त्याची स्वतःची कर्मे विविध परिणतींमध्ये त्याला घेऊन जातात आणि तो त्या कर्मरज्जूंकडे आकर्षित होऊन या भवातून त्या भवात सारखा फिरत राहिला आहे. या भवभवांतराच्या जन्ममृत्यूच्या गाथांमध्ये काट्याच्या तीक्ष्णतेप्रमाणे, विषाच्या मारकत्व गुणाप्रमाणे आणि फुलातील सुवासाप्रमाणे अनेकविध प्रकारचे दुःखसुख, कायक्लेश, पीडा, रोग, भय इत्यादी गुंफल्यासारखे स्थित आहेत. जन्माची प्रक्रिया तर मुळातच पाप व दुःखपूर्ण आहे. ज्या जीवनाचा आरंभच मुळी अशुभकर्मातून होतो; त्या जीवनाचा मध्यकाळ आणि शेवट शुभ किंवा सुखद कसा असू शकेल? याच विषम व विषासारख्या लोकवृत्तींना पाहून भव्यात्म्यांना विषयवासनेविषयी विरक्ती वाटू लागते. विरागातून चिंतनाचा उदय होतो आणि तत्त्वज्ञानाची प्राप्ती झाली की, हे चिंतन आत्मचिंतनात परिवर्तित होते.

आत्मचिंतनामुळे जीवाला स्व-पर विवेक प्राप्त होतो आणि त्यामुळे मोहाचा क्षय होऊन परमात्मपदाचा लाभ होतो. जे लोक मोहाला आपला मित्र मानतात, त्यांना वास्तविक तथ्य अपरिचित असते. ते पापमय अशुभ कर्मातच आनंद मानतात. अनेक प्रकारच्या योनींमध्ये परिभ्रमण करीत राहतात. जसेजसे शरीर थकत जाते, विषयवासनांबाबत असमर्थ होत जाते, तसातसा मनुष्य चिंतनासाठी विवश होत जातो. मग, कुठे तो शरीरापासून भिन्न अशा आत्म्याचे अस्तित्व मानू लागतो. परंतु अवेळी, उशिरा झालेल्या या ज्ञानाचा उपयोग होत नाही.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

योग्य वेळी एखाद्या कामाचा शुभारंभ करणे, हा यशप्राप्तीचा शुभसंकेतच आहे. शेतकरी उचित वेळी शेत नांगरतो, पेरतो. पिकांची मशागत करून तयार लोंब्यांमधून धान्याच्या राशी मिळवतो. दुसरे शेतकरी जेव्हा शेतात तयार झालेले धान्य दळायला नेत असतील आणि त्याच वेळी जर एखाद्याने शेत नांगरायला सुरुवात केली तर ते त्याचे श्रम फुकटच जाणार ना? म्हणून, तत्त्वचिंतनाचे हे क्षण आपल्या शारीरिक, मानसिक उन्नतावस्थेतच प्राप्त करून घेतले तरच ते लाभदायक ठरू शकतात. याच विचाराने त्यागाला सर्वोच्च सुख आणि भवाच्या आगमन-निर्गमन शृंखलेला संपवणारा (समापक) असे मानणारे कर्मक्षयासाठी मुनिव्रत धारण करतात.

मुनित्व ग्रहण करणे म्हणजे संसारबीज जाळून टाकणे आहे. मुनिचर्येसाठी ठरवून दिलेले धर्मशासन (नियम) इतके समर्थ आणि नि:संदिग्ध आहेत की, मुक्तीपरिणाम तळहातावर ठेवलेल्या आवळ्यासारखा वाटतो. संपत्तीमान, पुत्रवान किंवा छत्रचामरविभूषित ही मुनीची विशेषणे नाहीत. त्यांचे विशेषण तर 'निर्ग्रंथ' हे आहे. ग्रंथ शब्द संचयाचा बोध करून देतो. तो परिग्रहवाचक आहे. संसार हेसुद्धा परिग्रहाचेच दुसरे नाव आहे. जगातले सगळेच भौतिक पदार्थ परिग्रह आहेत आणि म्हणून परिग्रहाला सीमा नाही. परिग्रहाने मोह वाढत जातो आणि अहंकाराचा उदय होतो. मनुष्य मूर्च्छावस्थेतच जीवन जगतो आणि स्वत:ला सुखी समजतो. वास्तविक, रात्रंदिवस त्या परिग्रहामुळे; त्यांचे संवर्धन, संरक्षण, नियोजन या कारणांनी त्याला घोर चिंता लागलेली असते. त्यामुळे सुखाची झोपही त्याला मिळत नाही. आर्त-रौद्र ध्यान हा संपत्तीचाच अटळ परिणाम आहे.

एका नीतिशास्त्रज्ञाने म्हटले आहे- ''धन वगैरे मिळवण्यासाठी खूप कष्ट घ्यावे लागतात. ते मिळवले की, मग नंतर त्याच्या सुरक्षिततेची मोठीच काळजी लागते. जर ते धन खर्च झाले, हरवले तर फार दु:ख होते. धन मिळवणे, त्याचे रक्षण करणे व ते खर्च करणे, या सगळ्या प्रक्रियांमध्ये उद्विग्नता, चिंता, आशंका आणि नाशाचे भय, चोरांची भीती या सगळ्यांना तोंड द्यावे लागते. अशा अनर्थांना जन्म देणाऱ्या अर्थाचा धिक्कार असो.''[१]

जगात जेवढे जास्त धनाढ्य आहेत; त्यांची मोहासक्तीही तेवढीच मोठी आहे. ते इतके व्यस्त आहेत की, ना धड त्यांना जेवायला वेळ आहे ना आराम करायला! वाढत्या

१. 'अर्थानामर्जने दु:खमर्जितानां च रक्षणे ।
आये दु:खं व्यये दु:खं धिगर्थान् कष्टसंश्रयान् ।' - नीती

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

धनराशीच्या ओझ्याखाली कासवाच्या कातडीची ढाल बनून ते अहोरात्र चिरडून घेत आहेत, स्वतःला! मूठभर अन्नासाठी व साडेतीन हात शरीराला झोपण्यास जागा मिळावी, यासाठी ते अनेक कष्टांना आमंत्रण देत राहतात. यालाच सम्यग्ज्ञानींनी 'मिथ्यात्व' आणि 'परपरणती' म्हटले आहे. 'पर को अपना मान बैठा, निजको पहचाना नहीं।' संपत्ती वगैरेसाठी अपार कष्ट दररोज व जास्तीतजास्त सहन करणे, भौतिक समृद्धी व तिची विपुलता यातच आनंद मानणे हा मिथ्यात्वामुळे लाभलेल्या कर्मशक्तीचा चमत्कार आहे. 'परमात्मप्रकाश'मध्ये म्हटले आहे- ही कर्मे दृढ आहेत, घट्ट चिकटून बसणारी आहेत, भारी व वज्रासमान आहेत. त्यांच्यापुढे सामान्यजनांची काय कथा? ही तर ज्ञानी, विचक्षण जीवालासुद्धा सन्मार्गावरून कुमार्गाकडे नेतात.[२] या मिथ्यात्वाने ग्रासित जीव विपरीत श्रद्धान करू लागतो आणि स्वकर्मामुळे निर्माण केलेल्या शरीर, धन, पत्नी, पुत्र, घर, पशू, नोकरचाकर इत्यादी परभावांना आपले म्हणतो.[३] ही स्थिती बंधनकारक आहे. कर्मरज्जूंना बळ देत अधिक दृढ करणारी आहे. यास मूर्च्छा म्हणतात, परिग्रह म्हणतात आणि ग्रंथ, ग्रंथी किंवा गाठ असेही म्हणतात. मुनी मिथ्यात्वरूपी गजावर सम्यक्त्वाचे सिंहपाद ठेवतात. जर ते अशा ग्रंथींनीयुक्त असतील तर त्यांनाही परपरणतिपरायण समजावे लागेल. पण, मग मुनित्वाच्या नावाने एका अन्य द्रव्यलिंगाची जी स्थापना केली आहे ती अहेतुक, निष्प्रयोजक ठरेल. म्हणून, मुनींना निर्ग्रंथ विशेषण दिले गेले आहे. दीक्षेच्या वेळी मुनिव्रती संपूर्णतः नग्न दिगंबर होऊन आपल्या परिग्रहशून्यतेचा परिचय देतात. ते आंतरिक विषय-कषायाचीही ग्रंथी बाळगत नाहीत ना बाह्य वस्त्रादींची! इंद्रियसंयम व प्राणसंयमाच्या बळावर ते शुद्धात्मस्वरूपात स्थित होऊन कर्मनिर्मूलन करतात. दिगंबरत्व हे अतिशय कठीण आहे, असे मानणारे आपले मत असे मांडतात की, 'भावैः शुदधैः मनः शुदधम्'- मनाची शुद्धता ही भावशुद्धीवर अवलंबून आहे आणि विशुद्ध चारित्र्य हे भावांवर अवलंबून आहे. म्हणून, दिगंबरत्व अनिवार्य नाही. परंतु, असे म्हणणे हे आगमविरुद्ध आणि सयुक्तिक नसल्याने अमान्य आहे. 'मूलाराधना'चा असा अभिप्राय आहे की- 'बाह्यचेलादिग्रन्थत्यागोऽभ्यन्तर परिग्रहत्यागमल':- बाह्य वस्त्रादी परिग्रहाचा त्याग करणे,

---

२. 'कम्मइँ दिढ घणचिक्कणइँ गरुवइँ वज्जसमाइँ ।
णाणवियक्खणु जीवडउ उप्पहि पाडहिं ताइँ ।।' - १/७८

३. 'जिउ मिच्छतें परिणमिउ विवरीउ तच्चु मुणेइ ।
कम्म विणिम्मिय भावडा ते अप्पाणु भणेइ ।' - १/७९

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

हे आंतरिक त्यागाचे मूळ आहे. जोपर्यंत तांदळाच्या दाण्यांवर टरफले असतात तोपर्यंत ते भात करण्यासाठी उपयोगी होऊ शकत नाही. भात करण्यायोग्य बनवण्यासाठी साळी उखळात कुटाव्या लागतात. नंतर, सुपाने टरफले पाखडून स्वच्छ कराव्या लागतात. टरफले तांदळाच्या आंतरिक भावांना बाहेर पडू देत नाही. वस्त्रादी धारण करणे, हे मुनित्वाच्या नि:संग असण्याच्या विरुद्ध आहे. दिगंबर मुनी हे संसारबीजाचा नाश करण्यासाठी दिगंबर मुद्रा धारण करतात आणि आपल्या ज्ञान-ध्यानाने भवबीज अंकुरण्याच्या अनुकूलतेला पूर्णपणे नष्ट करतात. साळी (टरफलसहित तांदूळ) ला भाजले तर त्यांच्यावरचे टरफले आपोआप स्वत: निघून वेगळे होते तसे! दिगंबरत्वाद्वारे संसाररूपी भवबीज निस्तुष (टरफलरहित) केले जाते. त्याचा परिचय निर्ग्रंथव्रती देताना म्हणतात- 'न हि सतुषस्य तण्डुलस्य शोध शक्य: - टरफलासहित तांदळाचा शोध अशक्य आहे. वस्त्रत्यागानंतरच परिणाम अप्रमत्त गुणस्थानाला प्राप्त होतात. 'मूलाराधनाच्या टीकेच्या ७४ व्या पानावर लिहिले आहे की संगाचा त्याग, कषायांचा निग्रह, व्रते धारण करणे आणि मनावर व इंद्रियांवर विजय मिळविणे हीच ध्यानजन्मा मुनीची सामग्री आहे.[४] तोच त्याचा परिग्रह आहे असेही म्हणता येईल.

दिगंबर मुनिचर्या सोपी नाही. ते महाव्रतीचे जीवन आहे. बाहेर चालताना मुंगीकडेही लक्ष देत सांभाळून चालावे लागते. त्याचबरोबर अंतरातील आत्मप्रदेश कर्मबंधापासून पूर्णपणे मुक्त राहील, याकडेही ध्यान देणे अत्यंत आवश्यक आहे. विषयकषायाचा अणुमात्र अंश मुनीच्या मनात उदित झाला तरी तो कर्मबंध उत्पन्न करतो. म्हणून, मुनी नेहमीच अप्रमत्त राहतात.

त्यांना जी विशेषणे दिली गेली आहेत; ती काव्यमय, अतिशयोक्तीपूर्ण किंवा केवळ प्रशंसा करणारी अशी नाहीत. प्रत्यक्षात त्यांचे पालन ते अहोरात्र करतात आणि अतिचाराला ते क्षम्य मानत नाहीत. अहिंसा, सत्य, अचौर्य, ब्रह्मचर्य आणि अपरिग्रह ही त्यांची महाव्रते आहेत. ईर्या, भाषा, एषणा, उत्सर्ग, आदाननिक्षेपण या पाच समित्या आहेत. स्पर्श, रस, घ्राण, चक्षू, श्रोत्र यांचा निरोध पंचेंद्रिय निरोध आहे. सामायिक, स्तुती, वंदना, प्रतिक्रमण, प्रत्याख्यान आणि कायोत्सर्ग या दैनिक षट् आवश्यक क्रिया आहेत. केशलोच, अचैलक्य, अस्नान, भूशयन, अदंतधावन, स्थितिभोजन आणि एकाहार हे

४. 'संगत्याग:' कषायाणां निग्रहो व्रतधारणम् ।
मनोक्षाणां जयश्चेति सामग्री ध्यानजन्मन: ।।' - मूलाराधना टीका, पृष्ठ-७४

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रकीर्ण गुण मिळून २८ मूलगुण होतात. त्यांचे पालन निर्ग्रंथ मुनी करतात. सर्वसावद्य विरत, परहितनिरत, सर्वस्वत्यागी, परमविरागी, मोहममताजयी, कामविजयी, तपस्त्यागसंयमादर्श, विश्ववंद्य वगैरे विशेषणेच त्यांच्या स्वरूपाचे खरे अलंकरण आहेत. मुनी मन-वचन-काया या त्रियोगाचे सदैव ध्यान ठेवतात. मन आणि वचन यांच्यात भिन्नता राखून ते कधीच भाषण करीत नाहीत/बोलत नाहीत. त्याचे वचन/बोलणे म्हणजे मन आणि शरीराच्या एकत्वाचा निर्णय असतो. जर मन दुसरे काही म्हणत असेल आणि वाणीने दुसरेच काही शब्दोच्चारण होत असेल तर ते सुद्धा असत्य भाषण होईल. म्हणून, त्रियोग सांभाळूनच मुनी महाव्रताचे पालन करण्यासाठी अप्रमत्त राहतात. हाच आशय 'नीती'मध्ये असा सांगितला आहे- 'मनस्येकं वचस्येकं, कर्मण्येकं महात्मनाम्' - जो महान आत्मा आहे; त्याच्या मनात व कर्मात एकवाक्यता असते. संसारातील कल्याणमार्गी, अभ्युदयकांक्षी यांनी या त्रिकरणशुद्धीचा एकत्रित प्रयोग करावा, असे शिक्षण मुनी आपल्या चारित्र्यातून देतात. दिगंबर वेश ही अकिंचनाची पराकाष्ठा आहे आणि अहिंसेची आधारशिला आहे. कषाय आणि वासनांमुळे हिंसक परिणती होते तसेच अकिंचनत्व स्वीकारले नाही, तरीही अहंकाराचा उदय होतो व अहिंसा धर्माच्या उच्चकोटीच्या पालनात बाधा उत्पन्न होते. या हेतूने पाहता निर्ग्रंथमुद्रा खरोखर स्वत:मध्ये निराकुलता प्राप्त करण्याचा एक उपाय आहे. त्यामुळेच त्यास निर्वाणमुद्रा असे म्हणतात. दक्षिण भारतात निर्ग्रंथ मुनीला निर्वाणस्वामी म्हणतात. आगमातही जिनेंद्रांचे विशेषण 'मुक्तिश्रीवल्लभ' आहे. बंधनांच्या सर्वस्व त्यागाचा परिणामच मोक्ष हा आहे. पण, तो सर्वस्व त्याग बाह्य उपकरणांच्या हानीमुळेच केवळ सिद्ध होत नाही तर त्यासाठी अंत:परिग्रहाचा त्याग करणेही अत्यंत आवश्यक आहे. श्रमण संस्कृतीमध्ये अस्नान, स्थितिभोजन, भूमिशयन, केशलोच इत्यादी गुणसंदर्भांमधून स्पष्ट सूचना दिलेली कळते की, मुनींनी शरीरासही परिग्रह मानावे आणि त्याची उपेक्षा करीत शृंगार-संस्काराचा सर्वथैव परित्याग करावा. हा वेश पूर्ण विश्वात फक्त श्रमणांचाच आहे आणि मोक्षप्राप्ती विषयाच्या संदर्भात त्यांचा या परपदार्थरतिविच्छेदक गुणसंदर्भाच्या कारणावरून निषेध केला जाऊ शकत नाही. कुणीतरी म्हटले आहे की, तिळात तेल आहे, दह्यात तूप आहे आणि उसात साखर आहे. परंतु, त्या पदार्थांना मिळवण्यासाठी कुटणे, घुसळणे, पिळणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, या देहात आत्मा आहे आणि तपत्यागसंयमाने त्याची प्राप्ती करून घेतली जाऊ शकते. शास्त्राने दर्शविलेल्या मार्गावरून जे चालतात, संयमाचे पालन करतात; तेच खरे जैन साधू/श्रमण आहेत. असंयमी कधी श्रमण होऊच

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शकत नाही.[५] आचार्यांचा असा विश्वास आहे की, अचल म्हटले जाणारे पर्वत दैववशात कंपायमान होतील; परंतु कामिनी-कंचनासहित सगळ्याच वस्तूंचा त्याग करणाऱ्या मुनींचे समताभावावर अधिष्ठित असलेले मन कधी विचलित/चलायमान होत नाही.[६] वास्तविक मनाची चंचलता नष्ट करण्यासाठी, मोहाच्या अंधाराने व्याप्त रात्रीला नष्ट करण्यासाठी आणि आत्मप्राप्तीसाठी मुनी होणे आवश्यक आहे. मुनी होणे म्हणजे महाव्रती होणे, म्हणजेच मूलगुणांचे पालन करणे आणि संपूर्ण कर्मांचा क्षय करून अनंत आत्मसुख मिळवणे.

गृहस्थही मोहरहित होऊ शकतो. परंतु, जोपर्यंत व्रतपालनाची शपथ घेतली जात नाही, तोपर्यंत विशिष्ट प्रसंगी व्रतविहीन मानसिक अतिचार करू शकतो किंवा व्यावहारिक पातळीवर धर्ममर्यादेचे उल्लंघन करू शकतो. या उलट ज्याने व्रत घेतले आहे तो सल्लेखनेने आपल्या प्राणांचे विसर्जन तर करू शकतो. पण, प्राणांच्या भयाने व्रतभंग करीत नाही. हीच दृढ आस्था मुनित्वाची भक्कम बैठक आहे. अव्रतीचे मन मोहाच्या भूमीतच संचार करीत राहते; कारण त्याने मनावर ताबा ठेवला नाही आणि मन तर मोठे शक्तिमान आहे. एखादे मोठे तुफान मोठमोठ्या वृक्षांना मुळापासून उपटून फेकते; त्याचप्रमाणे मनही वैराग्य व ज्ञानाला क्षणात उद्ध्वस्त करून टाकते. पवित्र स्वभावाच्या आत्म्यावर मलिनता पसरवणारे हे मनच तर आहे.

या दृष्टीनेही मनावर नियंत्रण ठेवणारे मुनि व्रत घेतात. महर्षी पुष्पदंतांनी म्हटले आहे की, आपल्या कर्मांचा क्षय करण्यासाठी दीक्षा घेतली जाते. काही व्यक्ती पुण्य संवर्धन करण्यासाठी तर काही या संसारातून मुक्त होण्यासाठी दीक्षा घेतात.[७] अशा प्रकारे कर्मक्षयाच्या हेतूने पुण्य संचित करण्यासाठी किंवा मोक्षरूपी सर्वोच्च सिद्धी प्राप्त करण्याची इच्छा मनात बाळगून मुनी दीक्षा घेतात. कर्मांची भक्कम दोरी कापण्यासाठी मुनिव्रतरूपाची तीक्ष्ण तलवारच समर्थ आहे. संसारात मग्न असणारी व्यक्ती कर्मांचा

---

५. 'आगमपुव्वा दिट्ठी ण भवदि जस्सेह संजमो तस्स-
णत्थीति भणदि सुत्तं असंजदो होदि किध समणो ।।' - 'प्रवचनसार, ३६

६. 'चलत्यचलमालेयं कदाचित् दैवयोगतः ।
नोपसर्गैरपि स्वान्तं मुनेः, साम्यप्रतिष्ठितम् ।।' - ज्ञानार्णव, २४/३०

७. 'दीक्षां गृह्णन्ति मनुजाः स्वकर्महरणाय च ।
स्वपुण्यवृद्धये केचित् संसृतिमुक्तये ।' - पुष्पदंत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विस्तारच करीत राहते आणि क्षणिक सुखाच्या प्राप्तीसाठी दीर्घकालीन अनर्थांची परंपरा निर्माण करणाऱ्या मिथ्यात्वामध्ये रुतून बसते. वाटते की, कावळा हाकलण्यासाठी अमूल्य रत्नच फेकून मारते आहे. सम्यक्ज्ञानाच्या अभावी हे मिथ्यात्व समजून येत नाही. जसे मृगजळाचे ज्ञान होण्याआधी हरीण त्याला जलाशय समजून त्याच्यामागे धावत सुटते, तसे यथार्थ ज्ञानाच्या अभावात मनुष्य मोहाच्या मरुस्थळाला/वाळवंटाला चिंतामणीची भूमी मानत राहतो.

परंतु, वाळूमध्ये तोंड खुपसून हरणाला पाणी मिळत नाही. तद्वत, जन्मभर मिथ्यात्वाच्या संगतीत राहणाऱ्याला खऱ्या सुखाची प्राप्ती होत नाही. सम्यक्त्वाची प्राप्ती झाली की, आत्म्याला जणू नेत्र/डोळे/दृष्टी लाभते. दर्शन, ज्ञान आणि चारित्र्य हे त्रिसम्यक्त्वच मिथ्यात्वाचा विनाश करणारे आहे. त्यांना त्रिरत्न म्हणतात. ही तिन्ही रत्ने सर्व जगातल्या रत्नांपेक्षाही जास्त मौल्यवान व वैशिष्ट्यपूर्ण आहेत. मुनी या तीन रत्नांना धारण करतात. त्रिरत्नकुशल होणे ही मुनिपदाची शोभा आहे. सगळ्या विश्वावर संकट कोसळले, भूकंप झाला, ज्वालामुखीचा उद्रेक झाला तरी मुनींनी आपल्या त्रिरत्नाची रक्षा करावी. जर ते सम्यग्ज्ञान-चारित्र्य-दर्शनाने श्रीमंत असतील तर परपदार्थाची अधोगती किंवा विकास होण्यात कोणताच आनंद वा दुःख नसते.

हे मुनिव्रत पुरुषार्थमार्गाचे समर्थक आहे. मुनी स्वतः परमपुरुषार्थ करण्यासाठीच निर्ग्रंथ होतात. कर्मफळाचा भोक्ता हा कर्ताच आहे, असे श्रमण संस्कृती सांगते. कोणी दुसरा अन्य व्यक्तीच्या कर्माचे फळ भोगू शकत नाही. जो पाणी पितो, त्याचीच तहान भागते. जो निखाऱ्यावरून चालेल, त्याचेच पाय भाजतील. जर देवदत्ताचे नाव धारण करून यज्ञदत्त विस्तवावर पाय ठेवेल; तर काय देवदत्ताचे पाय भाजणार आहेत काय? याप्रमाणे शुभ-अशुभ कर्मे करणाराच त्यात्या कर्मांचे परिणाम भोगतो.

सम्यक्चारित्र्याचे पालन करणे म्हणजे श्रेष्ठ पुरुषार्थ करणे. भगवंतांच्या चरणयुगलाच्या कृपाप्रसादाच्या प्राप्तीविना हा मार्ग प्राप्त होत नाही; 'शांतिभक्ति'चा नित्य पाठ करणाऱ्यांना ठाऊक आहे की 'अव्याबाध, अनुपम, अचिंत्य आणि शाश्वत सुखाची प्राप्ती परमदेव तीर्थंकरांच्या चरणद्वयाच्या भक्तीनेच होऊ शकते.'[८] जोपर्यंत भगवंतांच्या चरणांचा कृपाप्रसाद मिळत नाही; तोपर्यंत जीव-समुदायाच्या पापांना अंत नाही आणि शुभाची प्राप्तीही

---

८. 'अव्याबाधमचिन्त्यसारमतुलं त्यक्तोपमं शाश्वतं
सौख्यं त्वच्चरणारविन्दयुगलस्तुत्यैव सम्प्राप्यते ।' - शान्तिभक्तिः ६

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नाहीच.[९] जोपर्यंत मनुष्य असातावेदनीय कर्मांमध्ये बुडालेला असतो; तोपर्यंत तो सम्यग्ज्ञान व सम्यग्दर्शनाने पुष्पान्वित होऊन सम्यक्चारित्र्याच्या मार्गावर चालू शकत नाही. कुठले तरी अपुण्य त्याला प्रतिबंध करीत राहते. जसे की, हिवाळ्यामध्ये सूर्योदय होऊनसुद्धा कमलवन फुलू शकत नाही. कारण, त्यांच्या पानांवर हिम/बर्फ जमलेले असते. ते हिम सूर्यप्रकाश प्राप्त होऊनही प्रतिबंधक अपुण्यासारखे कमळांच्या विकासाला/फुलण्याला रोखून धरते. याच कारणाने सम्यक्चारित्र्यमार्गी लोक अगदी कमी आढळतात. सम्यक् चारित्र्यवानांच्या संबंधी 'योग-सार'मध्ये वर्णन आहे की, 'हे जीव! जेव्हा मन निर्ग्रंथ होऊन जाते; तेव्हा तूसुद्धा वास्तविक निर्ग्रंथ होतोस आणि जसे तू निर्ग्रंथत्व प्राप्त केले, तसा तुला शिवमार्ग (मुक्तिमार्ग) प्राप्त होईल.[१०] तू सदैव स्वतः जिनेंद्र भगवंतांशी एकरूप राहा. जो जिन आहे, तोच तर तू आहेस. हीच भावना मोक्ष देणारी आहे. दुसरा कुठला तंत्र-मंत्र मोक्षाचे कारण नाही. शुभ व अशुभ या लोखंडाच्या व सोन्याच्या बेड्या आहेत.

ज्ञानींसाठी या दोहोंचाही त्याग उचित आहे.[११] रागद्वेषाचा त्याग करून जो सम्यग्ज्ञान-दर्शन गुणांना आत्मसात करतो आणि आपल्या आत्म्यामध्ये रत होतो; तो लवकरच निर्वाणपदाला पोहोचतो[१२] असे भगवान जिनेंद्राचे वचन आहे. या निर्वाणपथावर चालणारा साधू विषयांपासून दूर, आशांविषयी अज्ञानी, आरंभपरित्यागी, परिग्रहवर्जित असतो आणि फक्त आपल्या ज्ञानध्यानात चूर झालेला असतो.[१३] त्याच्या मनाला राजमहाल, स्मशान, स्तुती, निंदा, चिखल, केशर-कुंकू, पलंग-काटे, दगड आणि चंद्रकांत मणी, कातडे व

---

९. 'याबत्त्वच्चरणद्वयस्य भगवन् ! न स्यात् प्रसादोदयः
तावज्जीवनिकाय एष वहति प्रायेण पापं महत् ।।' - शान्तिभक्तिः ७

१०. 'यदा मनो निर्ग्रन्थो जीव ! तदा त्वं निर्ग्रन्थः । यदा त्वं निर्ग्रन्थो जीव! ततो लभ्यते शिवपन्थाः।।
'यो जिनः सोऽहं स एवाहं' एतद् भावय निर्भ्रान्तम् ।
मोक्षस्य कारणं योगिन् ! अन्यो न तंत्रो न मंत्रः ।।' - योगसार, ७३/७५

११. 'द्वौ त्यक्त्वा द्विगुणसहितो य आत्मनि वसति ।
जिनः स्वामी एवं भणति लघु निर्वाणं लभते ।।' - योगसार, ७७

१२. 'विषयाशावशीतीतो निरारम्भोऽपरिग्रहः ।
ज्ञानध्यानतपोरक्तस्तपस्वी सः प्रशस्यते ।।' - रत्नकरण्डश्रावकाचार, १०

१३. 'सौधोत्संगे श्मशाने स्तुतिशपनविधौ कर्दमे कुंकुमे वा, पल्यंके कण्टकाग्रे दृषदि शशिमणौ चर्मचीनांशुकेषु।
शीर्णांगे दिव्यनार्यामसमशमवशाद् यस्य चित्तं विकल्पै-
र्नालीढं सोऽयमेकः कलयति कुशतः साम्यलीलाविलासम् ।' - ज्ञानार्णव, २४/२९

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

रेशमी वस्त्र विकलांग आणि सुंदर स्त्री आणि कोणत्याही सुंदर-कुरूप गोष्टींबद्दल आकर्षण किंवा तिरस्कार/किळस नसते. तो समताभावात स्थित राहून आत्मलीन झालेला असतो.[१३] ही आत्मरतीच मनुष्याची स्वपरिणती आहे. असे म्हणतात की, परिसाच्या स्पर्शाने लोखंडाचे सोने होते; परंतु लोखंड आणि तो स्पर्शमणी/परिस या दोघांच्या मध्ये कागदाचा पातळ तुकडा जरी असला तरी मग लोह सुवर्णात परिवर्तित होत नाही.

आत्म्याच्या बरोबर जर अगदी सूक्ष्म, अणूएवढे जरी कर्म शिल्लक असेल; तर शिवपदाची प्राप्ती होत नाही. ऋणशेष असेल, शारीरिक रोग असतील तर जशी मोक्षप्राप्ती नाही; तशीच ती कर्मशेषानेही होत नाही. आग पूर्णपणे विझवली पाहिजे. एक छोटी ठिणगी जरी शिल्लक राहिली तरी ती विक्राळ रूप धारण करेल व मग लागलेली मोठी आग विझवताच येणार नाही. ही लौकिक तृष्णाही अशीच आहे. ती सुईच्या अग्रावर मावेल एवढी जरी शिल्लक राहिली तरी कालांतराने विराट रूप धारण करून समुद्राच्या पार पृथ्वीला संपूर्णत: घेरून टाकते. म्हणूनच, संपूर्ण/परिपूर्ण कर्मक्षय केल्यानंतर शिवपदाकडे वाटचाल केली जाऊ शकते.

बाहुबली उग्र तपश्चर्या करीत होते; पण पाय जमिनीवर टिकून होते. ते विचार करू लागले- 'मी भरत चक्रवर्तीच्या भूमीवर उभा आहे.' हे शल्य त्यांच्या मनात जोपर्यंत होते; तोपर्यंत त्यांना मोक्ष नाही मिळू शकला. कुठल्याच शल्याचा अंशही मनात न ठेवता त्यागी आपल्या महाव्रताचे पालन करतात. आत्महित साधना करणे हेच त्यांच्यासाठी सर्वोत्कृष्ट आहे.[१४] 'अंधवत पश्य रूपाणि शृणु शब्दमकर्णवत्'- आंधळ्याप्रमाणे रूपाची दुनिया बघा आणि बहिऱ्यासारखे शब्द (स्त्रीच्या पैंजणांचा आवाज वगैरे) ऐका... ही उक्ती बहुधा त्यागमार्गावर चालणाऱ्यांना उद्देशून सांगितलेली आहे. हे तर संसारी गृहस्थसुद्धा अनुभवाने जाणतो की, विषयोपभोगाने कामनांची तृप्ती होत नाही. खिशातले पैसे खर्च केले की, पैसा संपतो तसे कामभावनांचे नाही. कामनांचा भोग घेतल्यावर त्या आणखी आणखी वाढतात. तुपाची धार जशी अग्नीला शांत करू शकत नाही, तसे कामनांची पूर्ती केली तरी त्या कामनांना पूर्णत: दग्ध (नि:शेष) करू शकत नाही.[१५] अभ्यास, प्रखर वैराग्य आणि

---

१४. 'आदिहिदं का दव्वं जदि सक्कइ परहिदं च का दव्वम्
आदिहिदपरहिदादो आदि हिदं सुट्ठु का दव्वम् ।।'

१५. 'न जातु काम: कामानामुपभोगेन शाम्यति ।
हविषा कृष्णवर्त्मेव भूय एवाभिवर्धते ।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पंचेद्रिय संयमाचे व्रत, उपवास, तत्त्व, शरीर इत्यादींच्या साहाय्यानेच वासनांचा क्षय करता येतो. याचा अभ्यास केला की, दृढता येते. दररोज दंडबैठका काढून नित्य सरावाने मल्ल आपल्या अवयवांना मजबूत करतात आणि योगी १२ अनुप्रेक्षांचे चिंतन करीत वैराग्याचा अभ्यास सातत्यपूर्वक करीत राहतात. त्यांचे त्यागमय जीवन पाहून भर्तृहरी लिहितात की, ज्यांनी हातांना पात्र बनवले आहे, पायांना वाहन केले आहे, अन्नपूर्तीसाठी भिक्षावृत्ती स्वीकारली आहे, दिशांचे वस्त्र पांघरले आहे, पृथ्वीला शय्या मानले आहे, ते धन्य होत. जे आपल्या आत्म्यात निमग्न आहेत, दैन्यास जन्म देणाऱ्या परिणतींचा ज्यांनी संन्यास घेतला आहे आणि जे आपल्या कर्मांचे निर्मूलन करीत आहेत.[१६] ते धन्य आहेत. उपसर्गावर विजय मिळवणे, परिषह सहन करणे, अपकार करणाऱ्याचाही राग न करणे, स्तुती करणाऱ्याला जास्त प्रेम, जास्त स्नेह न देणे... ही साधूंची सहज स्वभाववैशिष्ट्ये आहेत. एकाने म्हटले आहे- एखादी व्यक्ती मुनिराजांची पारिजातकाच्या फुलांनी पूजा करते; तर कोणी नग्न साधू म्हणून त्यांचा राग करतो, गळ्यात साप टाकतो आणि हातात काठी घेऊन मारायला लागतो. परंतु, या उपकारक व अपकारक व्यक्तींना जो समतोल वृत्तीने वागणूक देतो, तोच योगी आहे, तोच योगी परमज्ञानी आहे, समता-भावी आहे.[१७] जेव्हा राजा श्रेणिकाने दिगंबर मुनींच्या गळ्यात मेलेला साप घातला; त्यानंतर तीन दिवसांनी राणी चेलनेने श्रेणिक राजाबरोबर येऊन तो साप काढून टाकला, तेव्हा उपसर्गमुक्त मुनिराजांनी म्हटले- 'युवयोर्धर्मवृद्धीरस्तु'- 'तुम्हा दोघांची धर्मवृद्धी होवो.' ते ऐकून श्रेणिक राजाने जाणले की, मुनी अत्यंत समभावी आहेत. त्यांनी ना चेलनेला विशेष असा आशीर्वाद दिला; ना मला कुठला अभिशाप! दोघांनाही एकदमच त्यांनी 'युवयो:' म्हणून धर्मवृद्धीचा आशीर्वाद दिला. हे समत्वच मुनींचे भूषण आहे. जर, हे समत्व त्यांच्याजवळ नसेल तर त्यांचा वेश खरा म्हटला जाणार नाही. केशलोच, वस्त्रत्याग, साधूचे नेपथ्य हे अभ्यंतर

---

१६. 'पाणि पात्रं पवित्रं भ्रमणपरिगतं भैक्षमक्षय्यमन्नं
विस्तीर्णं वस्त्रमाशादशकममलिनं तल्पमस्वल्पमुर्वी ।
येषां नि:संगतांगीकरणपरिणति: स्वात्मसन्तोषिणस्ते
धन्या: संन्यस्तदैन्यव्यतिकरनिकरा: कर्म निर्मूलयन्ति ।' - वैराग्य शतक, ५७

१७. 'एक: पूजां रचयति नर: पारिजातप्रसूनै:
क्रुद्ध: कण्ठे क्षिपति भुजंगं हन्तुकामस्ततोऽन्य: ।
तुल्या वृत्तिर्भवति च तयोर्यस्य नित्यं स योगी
साम्यारामं विशति परमज्ञानदत्तावकाशम् ।' - ज्ञानार्णव, २७

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शुद्धीविना अपुरे आहे. 'परमात्मप्रकाश'मध्येही हेच मत दर्शवले आहे.[१८] शास्त्र-स्वाध्याय आणि जिनभक्तीत रत असलेला साधू प्रशंसनीय आहे.

निर्ग्रंथ होण्याची इच्छा बाळगणाऱ्या त्यागीला पूर्ण ब्रह्मचर्याचे पालन करणे आवश्यक असते. ब्रह्मचर्याच्या भूमीवरच त्यागाची स्थापना होते. राग नष्ट करणे आणि त्यागाचा अंगीकार करणे, ही या मार्गावरची पहिली पायरी आहे. ब्रह्मचर्यावस्थेत शास्त्रांचा स्वाध्याय करणे, गुरूमुखातून आगमाचे अध्ययन करून त्याचे जाणकार होणे, आचार्य-मुनिसंघ यांच्यासमवेत राहून त्यागमय जीवनाच्या आचरणाचा जवळून अभ्यास करणे, या गोष्टी ब्रह्मचारीसाठी आवश्यक आहेत. ब्रह्मचारी झाल्यानंतर त्यास क्षुल्लक व त्यानंतर ऐलक दीक्षा दिली जाते. या सर्व अवस्था पदव्युत्तर परीक्षेच्या पूर्वतयारीप्रमाणे आहेत. या काळात उत्तरोत्तर आहार, पान, परिधान, परिग्रह यांच्या संयमाचा अभ्यास करीत मोक्षाची इच्छा करणाऱ्याने, त्या भव्य जीवाने स्वतःमध्ये निराकुलता, शांती, वैराग्य आणि समता यांचा अनुभव घ्यावा. हेय-उपादानाचे विज्ञानरूपी चक्षू लावून संसारातील विषयांपासून पूर्णतः विरक्त व्हावे. तेव्हा मग संपूर्ण मुनिव्रत पालनासाठी 'निर्ग्रंथ' मुद्रा धारण करण्याचा उपक्रम करावा.[१९] ज्याला मुनिदीक्षा दिली जाते, तो एकतर अनेक वर्षांपासून संघात असणारा; ज्याने ब्रह्मचर्य, क्षुल्लक व ऐलक दीक्षेचे पालन केले आहे असा ब्रह्मचारी असावा. त्याची परीक्षाही घेतली जाते. मग, तो पात्र ठरतो. किंवा एखादा भव्यात्मा गृहस्थ तरुण अथवा वृद्ध सुद्धा असू शकतो. दीक्षापात्राच्या विषयी त्याला दीक्षा देण्याआधी आचार्य किंवा गुरु यांनी त्यांची संपूर्ण माहिती घेतली पाहिजे. तो जर सर्वच दृष्टीने निर्दोष असेल तर चतुःसंघासमोर दीक्षाविधी करून त्यास निर्ग्रंथ-मुनित्व प्रदान करावे. याच्याही आधी दीक्षा घेऊ इच्छिणाऱ्याने संसारावस्थेतील आपल्या कुटुंबाची तशी परवानगी घेतली पाहिजे. पत्नी, आईवडील, मुलगामुलगी आणि इतर कोणी पृच्छा करणारे असतील, त्यांनाही दीक्षा घेणाऱ्याने विचारले पाहिजे. जर, त्यांना त्याच्या मुनी होण्यामुळे अडचण, आर्थिक संकट किंवा इतर आपत्ती येणार असेल तर स्नेहाने, वात्सल्याने त्या परिस्थितीचे समाधान त्याला करता आले पाहिजे. नंतर, मग सर्वांच्या अविरोधात दीक्षा

---

१८. 'केण वि अप्पउ वंचियउ सिस लुंचिवि छारेण ।
सयल वि संगं ण परिहरिय जिणवरलिंगधरेण ।।' - परमात्मप्रकाश, ९०

१९. 'प्रथमं ब्रह्मचारी संघार्यानन्तरं क्षुल्लकदीक्षाम् ।
ऐलकदीक्षां धृत्वाऽनन्तरमपि वर्ततेऽत्र निर्ग्रन्थः ।।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

याचनेच्या हेतूने त्याने गुरूपुढे यावे. गुरूनेसुद्धा दीक्षार्थीच्या संदर्भात अद्ययावत माहिती प्राप्त करून घ्यावी. जर तो आठ वर्षांपेक्षाही कमी वयाचा बालक असेल, अशक्त वृद्ध असेल, नपुंसक असेल, विकलांग, लठ्ठ, रोगी, चोर, राजाचा अपराधी, उन्मत्त, आंधळा, दास, दुष्ट, मूर्ख, कर्जबाजारी, तुरुंगात शिक्षा झालेला, कोठून तरी पळून आलेला आणि दुसऱ्या एखाद्या अशाच अपराधात अडकलेला असेल तर त्याला मुनिदीक्षा दिली जाऊ नये. कारण तो स्वतः दोषी आहे. धर्मप्रभावनेच्या निर्दोष मार्गावरून चालण्याचा त्याला अधिकार नाही. 'तेऽपि न दीक्षाही, लोके अवर्णवाद सम्भवात्।' लोकांमध्ये निंदाचर्चा सुरू होईल म्हणून निंदाप्राप्त व्यक्तीला पूज्य असे मुनिपद दिले जाऊ शकत नाही. परंतु, जो लोकांमध्ये प्रशंसनीय आहे, इंद्रियसंयमी आहे, कुळाने, रूपाने, वयाने, गुणांनी योग्य आहें, मनोज्ञ आहे, विद्वान आहे, शास्त्र जाणणारा व सम्यक्चारित्र्यपालन करण्यास समर्थ आहे; त्यानेच ज्ञान-दर्शन-चारित्र्य-तप आणि वीर्य या पाच आचारांनी युक्त असलेल्या आचार्य महाराजांच्या सेवेत उपस्थित व्हावे आणि त्यांना सविनय निवेदन करावे की, हे भगवन्! आपण मला मुनित्व (श्रामण्य) प्रदान करावे. तेव्हा आचार्य शुभमुहूर्त पाहून स्थिर लग्नात शास्त्रानुसार त्याला दिगंबरत्वाची दीक्षा देतात.

'आचारसार'मध्ये वर्णन आहे की, दीक्षार्थीला जेव्हा आचार्य मुनित्व देण्याची मान्यता देतात; तेव्हा प्रसन्नतेला पारावार उरत नाही. केवळ स्वीकृती मिळाली तरी अमृतपानाचा अनुभव घेतल्यासारखी त्याची स्थिती होते. गंडस्थळातून मद पाझरणाऱ्या हत्तीसारखा तो प्रसन्न होतो. बाह्य आणि अंतरंग याच्या संगतीला तो एखाद्या प्रशस्त मुहूर्तावर नेहमीकरिता/कायमचा निरोप देतो. या दीक्षेमुळे दीक्षा ग्रहण केलेल्याचे पशुबंधन क्षीण होऊन जाते. ज्ञानाचा सद्भाव होतो. असे वाटते की, याच आशयाला प्रकट करण्यासाठी दीक्षा शब्दात 'दी-क्षा' ही दोन अक्षरे योजिली गेली आहेत. तंत्रवार्तिककारांनी असे लिहिले आहे, त्याचा अर्थ असा की, शुभाच्या उदयामुळे दीक्षेची स्थिती एखाद्याला त्याच्या जीवनात प्राप्त होते. एखादा जर निर्विघ्नपणे दीक्षाधारी झाला असेल तर समजावे की तो पुण्यवान आहे. पुण्याशिवाय भगवान जिनेंद्राची मुद्रा लोकात अत्यंत दुर्लभ आहे. 'अन्यैवगतिरश्वस्य गतिरन्यैव दंतिनः' घोड्याची चाल वेगळी आणि हत्तीची चाल वेगळी! ज्यांचे पुण्य फळास येते; त्यांना तीर्थंकर प्रकृतीचा बंध होतो आणि ज्यांचे कर्मबंध अशुभ परिणामी असतात; ते हेमसेनाप्रमाणे

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दगडात कृमी म्हणूनही जन्मतात. या मुनिदीक्षेनंतर ती व्यक्ती महत्त्वपूर्ण चरित्र्यश्रेणीमध्ये येते. एखाद्या उत्फुल्ल कमलपुष्पाने सूर्यकिरणांकडे पाहावे तसेच लोक दिगंबर मुनीचर्येकडे पाहतात.

दिगंबर मुनींचे संपूर्ण जीवन अपरोक्ष असते. त्यात कुठलाच आडपडदा नसतो. कोणत्याही वाहनातून ते प्रवास करीत नाहीत. केवळ पायी विहार करतात आणि त्यातही पुन्हा देशव्रत पाळतात. तसेच वाटेल तिथे, वाटेल तेवढे दूर प्रयोजनाशिवाय चालत नाहीत. आहार, जल एकाच वेळी घेतात, तेही ओंजळीतून! 'अंतराय' आला तर हर्ष-शोक करीत नाहीत, धर्मप्रभावनेसाठी शास्त्रप्रवचन करतात. नि:संगव्रताचे पालन करण्यासाठी एकाच स्थानी जास्त दिवस राहत नाहीत. पावसाळ्यात जंतूंची, कीटकांची उत्पत्ती होते, नदी-नाल्यांना पूर येतो. वाईट परिस्थिती असते म्हणून एकाच ठिकाणी राहण्याची शास्त्राची अनुमती आहे. 'वर्षायोग' (चातुर्मास) साधत मुनी धर्मध्यान करतात, श्रावकांना प्रवचन देतात आणि भगवान जिनेंद्रांचे शासन प्रभावशाली करण्यासाठी लोकसंपर्क साधतात. क्षत्रचूडामणीकारांनी जीवांच्या भवपरिवर्तनाचा मार्ग सांगताना श्रमण संस्कृतीच्या हेयोपादेय विज्ञानाचा निष्कर्ष एका ओळीत मांडला आहे- जैनी दीक्षा मुपादत्तं स्यां कायेऽपिहेयता (१०/२) त्याच जिनेंद्र भगवंतांच्या धर्माची दीक्षा घ्या ज्यामध्ये शरीराला परद्रव्य म्हणूनच हेय सांगितलेले आहे. खरेतर उत्तमोत्तम पंचपक्वान्न दिवसा जे अनेक वेळा खातात आणि तरीही काहीजण स्वत:ला साधू, त्यागी, संन्यासी असे गर्वाने म्हणवून घेतात, असे शरीराला पोसणारे जीव जे देहासक्त आहेत, ते मोक्षाचे सुख मिळवू शकतील का? खूप लोकांनी तर देहाला सतत अन्न खाणारा किडा बनवून टाकले आहे. रात्रंदिवस खात राहतात व अनेकांनी तर शरीराला शृंगार-प्रसाधनांचे दुकान बनवले आहे. सगळ्या शरीरावर पावडर, स्नो, क्रीम, व्हॅसलिन, तेल, विविध प्रकारचे रंग आणि न जाणे कायकाय लावून ते आकर्षित करण्यासाठी पैसा व वेळ नष्ट करीत आहेत. दररोज, प्रतिक्षण आतूनबाहेरून भुकेने वखवखलेले हे संसारात मग्न झालेले जीव आंबट-करपट ढेकरा आल्यावरही खातच राहतात. तहान लागली नसली तरी पाणी पितच आहेत. अशा काळात अन्नसंयमाचे मोठ्या धीराने जन्मभर पालन करणारे जैन मुनी धन्य आहेत. केवळ शरीरात प्राण राहावेत म्हणून ते २४ तासातून सूर्योदयानंतर तीन तासांनी किंवा सूर्यास्त होण्याच्या तीन तास आधी जे मिळेल, त्यावरच संतुष्ट राहून एकदाच आहार घेतात. जसे रथ वेगाने चालावा म्हणून त्याच्या चाकांना थोडेसे तेल दिले जाते, रथ चमकदार (तुकतुकीत) दिसावा म्हणून काही

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तुपाने त्याला अंघोळ घालत नाहीत; त्याचप्रमाणे केवळ प्राणसंयमाच्या हेतूने मुनी आहार घेतात.[२०]

या विषयासंबंधी मूलाचार, रयणसार, परमात्मप्रकाश, आचारसार या ग्रंथांतील वचने वाचनीय आहेत. वास्तविक, अस्वाद हे मुनींचे पहिले व्रत आहे. त्याच्या पालनाने दुसरी महाव्रते, समिती, गुप्ती आणि मूलगुणांचेही पालन सोपे होऊन जाते. जिभेला वश करणे, हा अन्य सगळ्याच इंद्रियांच्या वशीकरणाचा मार्ग आहे. जीभ स्वादप्रिय/रसप्रिय आहे. तिला वेगवेगळ्या स्वादांनी तृप्त करणारा व्रत, संयम, उपवास करू शकत नाही व रूक्ष बेचव आहारही घेऊ शकत नाही. स्थितप्रज्ञ बनण्यासाठी इंद्रियांनाच वश करणे आवश्यक आहे. प्राचीन काळी त्यागींची संहननशक्ती खूप मोठी होती. म्हणून, ते दीर्घकाळपर्यंत उपवास करू शकत असत. परंतु, आधुनिक काळात, कालाच्या प्रभावामुळे वज्रसंहननधारी अस्तित्वात नाहीत. म्हणूनच त्यागी जनांनी आपले शरीर एवढेही कृश करू नये की चर्याशक्तीच शिल्लक राहणार नाही आणि त्यांनी आपल्या शरीराला एवढेही धष्टपुष्ट बनवू नये की उठणे-बसणे क्लेशदायक ठरेल. मध्यम प्रमाणात आहार घ्यावा. तेणेकरून इंद्रिये उन्मार्गाकडे प्रवृत्त होणार नाहीत आणि ती नियंत्रणात राहतील.[२१] आचार्यांचे अनुभव-आधारित मत असे आहे की, प्राचीन मुनींशी तुलना करता असे दिसते की, या

---

२०. 'अक्खोमक्खणिमित्तं भुंजति मुणी पाणधारणणिमित्तं।
पाणं धम्मणिमित्तं धम्ममपि चरंति मोक्खट्ठं ।।' - मूलाचार, ५०
'भुंजेइ जहालाहं जइ लदेइ णाण संजमणिमित्तं ।
झाणज्झयणणिमित्तं अणियारो मोक्खमग्गरओ' । - रयणसार, ११३
'जे सरसिं संतुट्ठमण विरसि कसाय वहंति ।
ते मुणि भोयणधार गणि णवि परमत्थ मुणंति ।' - परमात्मप्रकाश, १११
'भृंगः पुष्पासवं यद्वद् गृहणात्येकगृहेऽशनम्
गृहिबाधां विना तद्वद् भुंजीत भ्रमराशनः ।।' - आचारसार, १२७
'उदराग्निसमणमक्खमक्खणगोयारसब्भपूरणभमरं ।
ण उण तप्पयारे णिच्चेवं भुजरा भिक्खु ।।' - रयणसार, ११४

२१. 'न केवलमयं कायः कर्शनीयो मुमुक्षुभिः ।
नाप्युत्कटरसैः पोष्यो मृष्टैरिष्टैश्च व्यंजनैः ।।
वशे यथा स्युरक्षाणि नोत धावन्त्यनूत्पथम् ।
तथा प्रयतितव्यं स्याद् वृत्तिमाश्रित्य मध्यमाम् ।।' - महापुराण, ५/६

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सद्यःकाळातले त्यागी दीर्घ उपवास सहन करू शकत नाहीत.[२२] सोमदेव सुरी यांना आश्चर्य वाटते की, आजही निग्रंथ मुनिचर्येचे पालन करणारे मुनी विद्यमान आहेत.[२३] आजच्या परिस्थितीचा अभ्यास केला तर या आश्चर्यामागचे कारण समजणे सोपे जाईल. आजच्या एवढी परिग्रहावरची आसक्ती पूर्वी कधी ऐकू येत नव्हती आणि धर्माचरणही इतके दुर्बल झाल्याचा अनुभव येत नसे. आजचा मानव अत्यंत आत्मकेंद्री झाला आहे आणि देवपूजा, गुरुपासना, स्वाध्याय, उपवास, तप आणि पवित्र आचरण ही क्षेत्रे वांझ बनत चालली आहेत. आहाराचे पावित्र्य तर हाताच्या बोटांवर मोजता येईल इतक्या लोकांपर्यंत सीमित झालेले आहे आणि इंद्रियसंयमाची तर थट्टाच उडवली जात आहे. अशा प्रतिकूल काळात इंद्रियभोगांपासून विरक्त, अस्वादव्रती, वस्त्रत्यागी, कषायावर विजय मिळवणे, मुनित्व निभावणे, दीक्षा घेणे आणि हजारो वर्षांपासून चालत आलेली प्राचीन परंपरेची शृंखला भंग होऊ न देणे, ही अत्यंत कठीण गोष्ट आहे. आचार्यांनी आपल्या ज्ञानाद्वारे हे जाणून घेतले होते की, धर्म हाच ज्याचा प्राण आहे, भारत देशात भौतिकतेचे फार मोठे संकट निर्माण होईल आणि धर्माचरण लुप्त होणार नाही तरी पूर्वीइतके संपन्नही राहणार नाही. तोच काळ आता चालू आहे. दीक्षान्त/पदवीदान समारोहाच्या वेळी तरुण पदवीधर दरवर्षी एखादा नाही, शेकडोंच्या संख्येने बाहेर पडतात. राष्ट्राच्या अनेक स्वतंत्र विविध मार्गावरुन चालू लागतात. त्यांच्यामध्ये बहुतांश तरुण आपल्या सवयी, खर्च, मौज-मजा, शौक या साधनांच्या परिघातच रमतात; त्या दृष्टीनेच आपण कसे 'फिट'/ समर्थ बनू शकू याचाच विचार करीत ते जीवनाची वाटचाल करतात. त्यांना धर्माच्या वर्णमालेतील पहिल्या क पासून शेवटपर्यंत धार्मिक ज्ञान कधी दिले गेले नाही. शील-शौच धर्म शिकवण्याची आवश्यकता समजूनच घेतली गेली नाही. आणि अशा प्रकारे धर्मनिरपेक्ष, अतिभौतिकतेच्या आहारी गेलेल्या पिढीचा योजनाबद्ध नवा समाज तयार होत गेला, तयार केला गेला. 'आत्मा आणि शरीर' या विषयावर शेधनिबंध/प्रबंध (थिसिस) लिहिणारे तर खूप सापडतील. पण. त्या विषयांशी आपली जवळीक निर्माण करणारे कदाचित शोधूनच सापडतील. अभ्यास करायचा आणि ते सगळे पेपरात/परीक्षेत लिहून काढायचे. हे

---

२२. तद्धैर्यं यमिनां मन्ये, न सम्प्रति पुरातनम् ।
अथ स्वप्नेऽपि नामास्थां प्राचीनां कर्तुमक्षमाः ।।' - ज्ञानार्णव २८/१७

२३. 'काले कलौ चले चित्ते देहे चान्नादिकीटके ।
एतच्चित्रं यदद्यापि जिनरूपधरा नराः ।।'- - सोमदेव २८

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आजच्या शिक्षणकलेमुळे सर्वांनाच ठाऊक झाले आहे. परंतु, शिकवलेले गिळून पचवणे आणि शरीरातील रक्तासारखे त्याला स्वत:त प्रवाहित करणे, आत्मसात करणे, हे खूप कमी जण जाणतात. याच कारणामुळे एखादी गोष्ट खूप रंगवून सांगावी लागते. तरीही, खरी गोष्ट, अंतरंग त्यातून प्रकट होत नाही. आजच्या जीवनाला केवळ बाह्यरूपांनी वेढलेले आहे.

बाह्य आवरणांचे सौंदर्य तर वाढले आहे. परंतु ते आवरण काढलेल्या स्थितीत जर माणूस स्वत:ला पाहू शकला तर अंतरंग सुखाची खूपच कमी अनुभूती त्याला येईल आणि तो व्याकूळच राहील. यालाच म्हणतात, 'बाह्यग्रन्थिविहीना दरिद्रमनुजा: परंतु, ज्याने आत्मसाक्षात्काराने आपल्या अपार महत्तेला, संपन्नतेला जाणून घेतले आहे; तो स्वत:त परिपूर्ण आहे. असे पूर्ण व्यक्तित्वच अत्यंत अकल्याणकारी, पार ओलांडून न जाऊ शकणाऱ्या दऱ्यांना पार करू शकते. आजच्या गुंतागुंतीने युक्त अशा काळातही सोमदेवसुरींच्या आश्चर्याला जिवंत ठेवणारे पुण्यवान, पवित्र कार्य करणारे धन्य महापुरुष आहेत. विश्वातल्या सगळ्या भोगांची वाईट परिणती जाणून विरक्त होऊन ते संन्यास घेतात आणि आत्मकल्याणासाठीच आपले जीवन सुरक्षित राखून ठेवतात. या निर्ग्रंथ संन्यासाला आकाशातून बरसणाऱ्या रत्नावलीची उपमा क्षत्रचूडामणीकारांनी दिली आहे.[२४] वादीभसिंह म्हणतात की, जी व्यक्ती जीवनाच्या सुरुवातीला, मध्यात किंवा उत्तरार्धातही संन्यास घेते; तिला आपल्या मनुष्यभवाचे सार्थक करणारी म्हणून मानले जाते. परंतु, सांसारिक आणि विषयोपभोगात जीवन खर्च करून पुढे जाणारा मनुष्य म्हणजे भस्मासाठी रत्नहार जाळणारा मनुष्य होय.[२५] सम्यक्ज्ञानपूर्वक वीतरागभाव धारण करणाऱ्या मुनींना ज्या सुखाची प्राप्ती होते; तिचा अनंताचा भागही स्वर्गातील देवेंद्रांना प्राप्त होत नाही.[२६] कारण, आत्मस्थित होण्यातच खऱ्या सुखाचे स्थान आहे. ज्ञानाच्या मजबूत रज्जूंनी इकडे तिकडे धावणाऱ्या मनाच्या उन्मत्त हत्तीला तेच सुख बांधून टाकू शकते.[२७] मनामध्ये वासनेच्या चंचल तरंगाचा उठणारा कल्लोळ शांत करून त्या जलाशयात आत्ममणीला न्याहाळायचे आहे. उपशम भावाने अनुष्ठित व्रते आणि तपाने संयमाला प्राप्त करून घ्यावयाचे आहे.[२८] या सगळ्यांची विधिपूर्वक संगती ही त्यागमय जीवनातच सामावलेली आहे.

❖❖❖

२४. 'प्रव्रज्या जातुचित् प्राज्ञै: प्रतिषेद्धुं न युज्यते ।
न हि खादापतन्ती चेद् रत्नवृष्टिर्निवार्यते ।' - क्षत्रचूड़ामणी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

२५. 'वयस्यन्तेऽपि वा दीक्षा प्रेक्षावद्भिरपेक्ष्यताम् ।
भस्मने रत्नहारोऽयं पण्डितैर्न हि दह्यते :।' - क्षत्रचूडामणी

२६. 'यत् सुखं वीतरागस्य मुनेः प्रशमपूर्वकम् ।
न तस्यानन्तभागोऽपि प्राप्यते त्रिदशेश्वरैः ।'

२७. 'मण करहो धावंतो णाणवरत्ताइ जेहिं णहु बद्धो ।
ते पुरिसा संसारे हिंडंति दुहाइं भुंजंता ।।' - योगसार, १

२८. 'उपसम तव भावजुदो णाणी सो भावसंजुदो होइ ।
णाणी कसायवसगो असंजदो होइ सो ताव ।' - आ. कुंदकुंद

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पिंछी-कमंडलू

णिप्पिच्छे णत्थि निव्वाणं

- आचार्य कुंदकुंद, मूलाचार - १०/२५

संयम आणि शुद्धतेची उपकरणे म्हणून दिगंबर मुनींजवळ पिंछी व कमंडलू असतात. संपूर्णत: नग्न आणि अपरिग्रहाचे महाव्रत पाळणाऱ्या मुनिचर्येच्या निर्दोषत्वाच्या रक्षणार्थ ही दोन्ही उपकरणे जवळ बाळगण्याची त्यांना शास्त्राज्ञा आहे. पिंछी आणि कमंडलू हे मुनीच्या स्वावलंबनाचे जणू दोन हातच आहेत. सर्व प्रकारच्या दैनंदिन शुद्धीसाठी पिंछीची नितांत आवश्यकता आहे आणि हातपाय धुण्यासाठी, शुद्धीसाठी कमंडलू अपेक्षित आहे. पिंछी मोराच्या पिसांपासून बनवली जाते. दुसरे कुठले पंख पिंछीसाठी योग्य समजले जात नाहीत. कारण मुनींना हिंसा, चौर्य, परिग्रह इत्यादी सर्वथैव निषिद्ध आहेत आणि मोरपिसे इतकी सहजसुलभ आहेत की, ती वरील दोष टाळून मुनींना ग्रहण करता येतात.

त्याचे असे आहे की, मोर वर्षातून एकदा आपली जीर्ण/जुनी पिसे स्वत:हूनच त्यागतो. कालांतराने त्यास नवीन पिसे मिळतात. म्हणूनच, कुठल्याही प्रकारची हिंसा न करता निश्चित काळात ती पिसे प्राप्त होऊ शकतात. वनात विहार करणाऱ्या मुनींना झाडाखाली मोठ्या प्रमाणात असे स्वत:हून गळून पडलेले पंख सहजपणे मिळून जातात. हे पंख मोर स्वत:च गाळतो. त्याने टाकलेले पंख जमिनीवर पडतात. म्हणून हे पंख ग्रहण केल्यास कोणताच चौर्यदोषही लागत नाही. तिसरी गोष्ट ही पण आहे की दरवर्षी विपुल प्रमाणात असे स्वयंपतित पंख सहज उपलब्ध होत असल्याकारणाने ते गोळा करून साठवूनसुद्धा ठेवावे लागत नाहीत. पुढील वर्षासाठी त्याचा संचयही करून ठेवावा लागत नाही. त्यामुळे परिग्रहदोषही लागत नाही. याशिवाय, मयूरपंखांनी बनवलेल्या पिंछीचा लव

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असलेला कोवळा अग्रभाग एवढा कोमल असतो की, त्याचा शुद्धतेसाठी वापर केला तर कोणत्या सूक्ष्म जीवाचीसुद्धा हिंसा होत नाही.

लांडोरीचे पंखसुद्धा पिंछीसाठी उपयोगी पडत नाहीत. एकाच जातीच्या पक्षी-युगुलातही सारखे, कोवळे पंख निर्माण करण्याची क्षमता नाही; मग इतर पक्ष्यांच्या बाबतीत काय सांगावे? म्हणूनच, दिगंबर साधूची मुद्रा मयूरपिच्छीधारक अशी आहे. ही पिंछी बाळगत असल्याने ती त्यांची नग्नमुद्रा एखाद्या प्रमादीची वाटत नाही. ती त्यागी वृत्तीचा परिचय करून देते. 'मुद्रा सर्वत्र मान्या स्यात् निर्मुद्रा नैव मन्यते!' नीतिसारची ही उक्ती सार सांगणारी आहे. सरकारी क्षेत्र असो, धार्मिक क्षेत्र असो की, व्यापारीवर्ग मुद्रा सर्वत्र अपेक्षित असते. मुद्रारहित जे असेल, त्यास मान्यता नाहीच. वैष्णव, शाक्त पंथाचे अनुयायी शैव, राधास्वामी संप्रदायाचे अनुयायी इत्यादींमध्ये कपाळावर गंध लावण्याची वेगवेगळी पद्धत आहे. राजसेवकांच्या खांद्यावर किंवा समोर छातीवर कापडाने बनवलेली किंवा धातूची मुद्रा (चिन्ह) असते. त्यामुळे त्या राजसेवकांच्या सेवेबद्दलची प्रामाणिकता स्पष्ट होते. कागदी नोटा मुद्रांकित असतात म्हणून त्यांना मूल्य आहे. डाक-तार खातेही मुद्रात्मक आहे. एका राष्ट्रातून दुसऱ्या राष्ट्रात प्रवेश करायचा असेल तर पारपत्र किंवा पासपोर्टची आवश्यकता असते आणि रेल्वे प्रवासासाठीही तिकीट घेणे आवश्यक असते. त्याच प्रकारे श्रमण परंपरेतही आदिकाळापासून अधिकृत चिन्हाच्या रूपात पिंछी-कमंडलू बाळगण्याची पद्धत चालत आलेली आहे.

पिंछी बाळगणे आवश्यक आहे हे सांगतांना 'भद्रबाहू क्रियासार'मध्ये म्हटले आहे की, जो श्रमण पिंछी बाळगत नाही आणि तिची निंदा करतो, तो 'मूढचारित्र' आहे.[१] कारण चारित्र्यपालनात, कायोत्सर्गात, जाण्यायेण्यात, बसण्याउठण्यात पिंछीची जी मदत होते; ती सर्वविदित आहे. अपेक्षासंयमी मुनीने अवधिज्ञान प्राप्त होण्यापूर्वी पिंछी धारण करणे शास्त्रसंमत आहे.[२] मराठी कवी जनार्दन यांनी त्यागींसाठी ओळी लिहिल्या आहेत...

करोनी परिग्रहत्याग, तीन राखावे काये संग ।
पुस्तक पीछी ठेवी अभंग कमण्डलभृंग शौचासी ।। १३० ।।

---

१. 'जो सवणो णहि पिच्छं गिण्हदि णिदेदि मूढचारित्तो ।
सो सवण संघवज्जो अवंदणिज्जो सदा होदि ।।' - भ.बा. क्रियासार, ७९

२. 'अवधेः प्राक् प्रगृह्णन्ति मृदुपिच्छं यथागतम् ।
यत् स्वयं पतितं भूमौ प्रतिलेखनशुद्धये ।' - भावसंग्रह, २७६

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

म्हणतात.[९] मंत्रलक्षणशास्त्र असे सांगते की, आवश्यक वाटेल तेव्हा पिंछी हे छत्रपण आहे, चामरपण आहे. मंत्रांच्या सिद्धीसाठीही ती उपयोगात आणली जाते आणि सर्व प्राणिमात्रांच्या रक्षणासाठी तर ती आहेच आहे.[१०] अशा प्रकारे पिंछी ही पंचगुणविभूषित आहे. 'मूलाराधना'मध्ये पिंछीचे इतर पाच गुण सांगितले आहेत. ते असे- धूळ आणि घाम ती ग्रहण करीत नाही. मृदुता, सुकुमारता व लघुत्व (म्हणजे हलकेपणा). ज्या पिंछीत हे पाच गुण असतात, ती प्रतिलेखनासाठी निःसंदिग्धपणे प्रशंसनीय असते.[११] 'सकलकीर्ती-धर्मप्रश्नोत्तरा'त मूलाराधनेत सांगितल्यानुसार पाच गुणांचे कीर्तन केल्यानंतर यामध्ये निर्भयता वगैरे अतिरिक्त गुणांसंबंधी निर्देश केला आहे.[१२] नीतिसारात म्हटले आहे की सावलीतून, उन्हातून किंवा एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जातयेत असतांना मोरपिंछीने आलेखन करूनच मुनींनी आचरण केले पाहिजे.[१३] 'चारित्र्यसार' मध्ये कोणत्याही प्रकारची क्रिया करण्यास असमर्थ असा रोग वगैरे झाला तर 'मुनीने पिंछीसह अंजलीबद्ध होऊन ती ओंजळ वक्षस्थळाच्या मध्यभागी धरून पर्यंकासन, वीरासन, सुखासनात बसून, एकाग्र मनाने स्वाध्याय, वंदना करावी.[१४] उभे राहण्याची शारीरिक ताकद नसेल तरच ही पद्धत अंगीकारावी.

मयूरपिंछीमध्ये असलेला एक दुसरा विशेष गुण 'मूलाराधना पृष्ठ २१५' वर सांगितलेला आहे. तो असा की, जे सवस्त्रलिंग धारण करतात; त्यांना वस्त्राबाबतचे निकष पाळावे

---

९. 'सन्ति मयूरपिच्छेऽत्र प्रतिलेखनमूर्जितम् ।
तं प्रशंसन्ति तीर्थेशा दयायै योगिना परम् ।' - मूलाचार, ३२

१०. छत्रार्थं चामरार्थं च रक्षार्थं सर्वदेहिनाम् ।
यंत्रमंत्रप्रसिद्धयर्थं पंचैते पिच्छिलक्षणम् ।।' - मंत्रलक्षणाशास्त्र

११. 'रजसेदाणमगहणं मद्दवसुकुमालदा लघुत्त च ।
जत्थेदे पंचगुणा तं पडिलिहणं पसंसंति ।।' - मूलाराधना, ९८

१२. 'अथ पिच्छिकागुणा रजःस्वेदाग्रहणद्वय ।
मार्दवं सुकुमारत्वं लघुत्वं सद्गुणा इमे ।।
पंच ज्ञेयास्तथा ज्ञेया निर्भयादिगुणोत्तमाः ।
मयूरपिच्छजातायाःपिच्छिकाया जिनोदिताः ।।' - सकलकीती धर्मप्रश्नोत्तर, २९-३०

१३. 'पिच्छेन मृदुनाऽलिख्य वपुर्धर्माद् विशेन् मुनिः ।
छायां तथैव धर्म च भूमिभेदेऽपि चान्वहम् ।।' - नीतिसार ४३

१४. 'सप्रतिलेखनमुकुलितवत्सोत्संगतिकरः सपर्यंकः ।
कुर्यादेकाग्रमनाः स्वाध्यायं वन्दनां पुनरशक्त्या ।।' - चारित्र्यसार ४३

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

लागतात, ते शुद्ध करावे लागतात. परंतु, अपरिग्रहीला (निर्ग्रंथ), मोरपिंछीचा फार शोध घ्यावा लागत नाही. तसेच मयूरपिंछी फार शुद्ध करून घ्यावी लागत नाही. कारण, त्यांना स्वतःला अप्रतिलेखन गुण प्राप्त असतो.[१५]

'तत्त्वार्थश्लोकवार्तिक'मध्ये असे प्रतिपादन केलेले आहे की, श्रमणशास्त्रात कोणी एखादी वस्तू दिली नाही (अदत्त) आणि ती जर साधुने घेतली तर ते स्तेय (चौर्य) ठरते. एखादी वस्तू मग ती लहान असो की मोठी ती जर स्वतःची नसून दुसऱ्याची असेल तर त्या वस्तूच्या मालकाकडे याचना करूनच साधूने ती प्राप्त करून घेतली पाहिजे. जाणूनबुजून, चुकून, नकळत ग्रहण केलेली वस्तू चौर्यलब्धच मानली जाईल. या अर्थाने सामान्यतः कोणतीही अदत्त वस्तू ग्रहण करण्याचे विधान मुनींसाठी नाही. मग, मोरपिंछी (व कमंडलू) जे पंख अरण्यात पडलेले असतात, मुनींनी ते ग्रहण करू नयेत का? तेही तर अदत्तच आहेत. त्यांचे आदान कसे व्हावे, या शंकेचे समाधान करताना पुढे म्हटले आहे- नद्या, झरे यांचे पाणी, सुकलेल्या गोवऱ्या किंवा भस्म इ. आपणहून गळलेली मोराची पिसे, भोपळा (यात माती, समुद्राकाठी उत्पन्न होणारी नारळे यांचाही समावेश होतो) हे ग्रहण करताना स्तेयदोष लागत नाही. हे सगळे प्रासूक/शुद्ध असते. यात स्तेयदोष नाही व त्यांचे ग्रहण अहंकाराच्या नाशासाठी अपेक्षित आहे.[१६]

कषायसहित मन, वचन आणि कायेच्या प्रवृत्तीला प्रमत्तयोग म्हटलेले आहे. परंतु, धर्मपरिग्रहाच्या रूपात आवश्यक पिंछी आणि कुंडीचे ग्रहण करणे कषायनिमित्तक नाही. याउलट, वीतराग मुनिचर्येला उपकारकच सिद्ध होते. तसेच जीवरहित अचित्त असल्याने ते दोन्ही म्हणजे पिंछी कमंडलु प्रासूक आहेत.[१७] 'भद्रबाहु क्रियासार'मध्ये पिंछी हे मोक्षाचे

---

१५. 'अप्पडिलिहणं वसनसहितलिंगधारिणो हि वस्त्रखण्डादिकं शोधनींय
महत् । इतरस्य पिच्छादिमात्रम् ।' - मूलाराधना

१६. 'प्रमत्तयोगतो यत् स्याददत्तादानमात्मनः ।
स्तेयं तत् सूत्रितं दानादानयोग्यार्थगोचरम् ।।
तेन सामान्यतोऽदत्तमाददानस्य सन्मुनेः ।
सरिन्निर्झरणाद्यम्भः शुष्कगोमयखण्डकम् ।।
भस्मादि वा स्वयं मुक्तं पिच्छालांबुफलादिकम् ।
प्रासुक न भवेत् स्तेयं प्रमत्तत्वस्य हानितः ।। - तत्त्वार्थशलोकवार्तिक, ७/१५

१७. प्रासुकस्यार्थः -'सुक्कं पक्कं पत्तं अम्मिलिलवणेण मिस्सयं दव्वम् ।
जं जंत्रेण हि छिन्नं तं सव्वं पासुयं भणियं ।।' - गृहस्थधर्म, ११

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दुसरे प्रमुख कारण सांगताना म्हटले आहे की, जो मुनी आपल्याजवळ पिंछी बाळगत नाही, तो कायोत्सर्गाच्या वेळी बसताना, उठताना, जा-ये करताना आपल्या शारीरिक क्रियांच्या द्वारे सूक्ष्म जीवांचा नाश करतो. परिणामी त्यास हिंसादोष लागत राहतो आणि मोक्षास प्रतिबंध करणाऱ्या या कर्मांमुळे त्यास मुक्तिश्रीही मिळत नाही.[१८]

वरील समर्थनात्मक मुद्दे विचारात घेता हेच सिद्ध होते की, मोरपिंछी धारण करणे त्यागीजनासाठी अत्यंत आवश्यक आहे. निर्वाणभूमीला म्हणजेच मोक्षाप्रत पोहोचण्यासाठी जसे सम्यग्दर्शनज्ञानासह सम्यक्चारित्र्य हे प्रत्यक्ष कारण तसेच पिंछी-कमंडलूसुद्धा चारित्र्यचर्येची सहायक साधने आहेत. म्हणूनच ती परंपरेने चालत आलेली उपकारक कारणे आहेत. अत्यंत कोमल, नेत्रसुखद व सुंदर असूनही मोर आपल्या मोरपिसांचा यथावकाश त्याग करतो. त्यांचा मोह करीत नाही. तो जणू निर्मोहाची शिकवणच देतो. पिंछीला पाहताच मुनीच्या मनात वीतराग भाव जागे झाले पाहिजेत. अहो! तिर्यंचयोनीत जन्मलेल्या मोरालासुद्धा आपले एकमात्र अलंकरण असलेल्या मनोहर पिसाऱ्याबद्दल मोह उत्पन्न होत नाही. मुनी तर मनुष्य पर्यायधारी आहेत, बुद्धिमान आहेत, विवेकसंपन्न आहेत. जर ते रागाने आंधळे झाले तर धर्म रसातळालाच जायला पाहिजे.

मयूरपंख पाहिले की, संयमभावात वृद्धी नक्कीच होते आणि म्हणूनच पिंछीला संयमाचे उपकरण म्हणणे अगदी समर्पक आहे. पिंछीधारण हे निर्मळ व शुद्ध जिनलिंग आहे. हेच सत्य 'षट्प्राभृत' ग्रंथाच्या 'भावप्राभृत' प्रकरणाच्या ७९ व्या गाथेत चौथ्या चरणात 'जिनलिंगं णिम्मलंसुद्धं'च्या टीकेत स्पष्ट करताना म्हटले आहे-

'जिनलिंग' नग्नरूप-मर्हन्मुद्रामयूरपिच्छिकमण्डलुसहितं निर्मलं कथ्यते ।
तद्द्वयरहितं लिंगं कश्मलमित्युच्यते ।
तीर्थंकरपरमदेवात्तप्तर्द्धेर्विना अवधिज्ञानाद् ऋते चेत्यर्थः।'

अर्थ असा की, मयूरपिंछी आणि कमंडलूसहित नग्नरूप हीच अर्हंत भगवंतांची मुद्रा आहे. ती निर्दोष व निर्मळ आहे. जो या दोन्हींरहित नग्नरूप आहे; तो मलिन म्हटला जातो. परंतु तीर्थंकर, परमदेव, तप्तर्द्धिधारक आणि अवधिज्ञानी यांना हे धारण करणे आवश्यक नाही. हे (उपरोक्त) पिंछीकमंडलूरहित असलेलेसुद्धा अर्हन् मुद्राधारी मानले जातात. भावसंग्रहातही अवधिज्ञान प्राप्त होण्याच्या आधीपर्यंत प्रतिलेखनशुद्धीसाठी

---

१८. 'ठाणणिसिज्जागमणे जीवाणं हंति अप्पणो देहं ।
दसकत्त रिठाण गदं णिपिच्छे णत्थि णिव्वाणं ।।' - भद्रबाहुक्रि., २५

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पिंछीधारण आवश्यक म्हणून सांगितले आहे.[१९] परंतु, अवधिज्ञानानंतर पिंछी धारण करणे आवश्यक नाही. उपेक्षासंयमीला पिंछीची आवश्यकता नाही; पण अपेक्षासंयमीने ती धारण केलीच पाहिजे. आदानसमिती आणि निक्षेपसमिती यांचा उल्लेख करताना श्रीमद्कुंदकुंदाचार्य म्हणतात की, 'अपहृतसंयमधारी मुनींना आगमाच्या अर्थाच्या प्रत्यभिज्ञानासाठी वारंवार ज्ञानोपकरणाची (शास्त्राची) गरज भासते. विशुद्धीसाठी शौचोपकरणाची म्हणजे कमंडलुची व संयमोपकरणरूपात पिंछीची आवश्यकता असते. या शौचसंयम-ज्ञानोपकरणांना वेळोवेळी ग्रहण करणे, त्यांचा विसर्ग करणे यामधील प्रयत्नपरिणामांना आदानसमिती आणि निक्षेपणसमिती म्हटले आहे.[२०] अकरा प्रतिमाधारी उत्कृष्ट श्रावकाचे दोन प्रकार आहेत. पहिला एकल वस्त्रधारी व दुसरा वस्त्ररहित लंगोटीधारी हे दोघेही तप, व्रत नियमादींचे पालन करतात. कौपीन (लंगोट) धारण करणारे 'ऐलक' केशलोच करतात. पिंछीधारण दोघेही म्हणजे ऐलक, क्षुल्लक करतात. अनुप्रेक्षा (द्वादशानुप्रेक्षा) धर्मध्यान तसेच कोणत्या एका ठिकाणी करपात्रात (हातात) उभे राहून आणि आसन घेऊनही आहार ग्रहण करतात.[२१]

मोरपिंछीच्या महत्त्वाला सीमा नाहीच. त्यागींसाठी पिंछी किती उपयुक्त आहे; हे पुरेसे सांगितलेलेच आहे. पिंछीला मिथ्यात्वनाशक आणि मदरूपी हत्तीलाही अडचणीत आणणारा सिंह असे म्हटले आहे. 'मिथ्यात्वनाशं मदसिंहराजम्' - पिंछीसाठी जी प्रशंसावचने लिहिली गेली; त्यातील हे एक आहे. वसुनन्दि श्रावकाचार, चारित्रसार, भगवती-आराधना, वट्टकेर मूलाचार इत्यादींमध्ये पिंछीधारणेचे महत्त्व प्रतिपादित केले आहे. जो त्यागी पिंछी धारण करूनही आपल्या भावलिंगी, वीतराग, त्यागप्रधान, लोकगुरु स्वरूपाचे रक्षण करीत नाही तो मुनिवेषाचा अपमानच करतो. मुनी आणि गृहस्थधर्मांमध्ये जर सम्यक्चारित्र आणि अपरिग्रहादिमुळे प्रतीत होणाऱ्या वैशिष्ट्याचा बोध करून देणारी भेदरेषा नसेल तर

---

१९. 'अवधेः प्राक् प्रगृह्णन्ति मृदुपिच्छं यथागतम् ।
यत् स्वयं पतितं भूमौ प्रतिलेखनशुद्धये ।।' - भावसंग्रह, २७६

२०. 'पुस्तककमण्डल्वादिग्रहणविसर्गयोः प्रयत्नपरिणामः ।
आदाननिक्षेपणसमितिर्भवतीति निर्दिष्टा ।।' (छाया) - नियमसार

२१. 'एकादशस्थाने उत्कृष्टश्रावको द्विविधः । वस्त्रैकधरः प्रथमः कौपीनपरिग्रहो द्वितीयः ।।
तपोव्रतनियमावश्यकलोचं करोति पिच्छं गृह्णार्ति ।
अनुप्रेक्षा धर्मध्यानं करपात्रे एकस्थाने ।।' - आलोचना

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मग पर्वताचे शिखर आणि दऱ्यांमधली सर्वोच्चता व खोली ह्यांनाही समानच समजायला हवे.

पिंछी ग्रहण केली की, मुनी प्रवृत्तिमार्गाचा त्याग करून निवृत्तीमार्गावर चालू लागतो. कोट्यवधी लोक ज्या दिगंबरत्वाला आपले आराध्य मानतात, वंदनीय मानतात; त्या वर्गाची ती मग महानुभाव व्यक्ती बनून जाते. अशा स्थितीत तप, त्याग, चारित्र्य व आत्मकल्याणाचा अरुंद मार्ग अधिक प्रशस्त करणाऱ्या व्यवहार आणि निश्चयाच्या कठीण-कठोर मार्गावर त्यागीने अधिकाधिक सशक्त, अकंप पावले टाकायला हवीत.

ज्या आस्थेने त्याने पिंछी-कमंडलू धारण केले आहेत; त्या आस्थेच्या लोकवंदनीय रूपाचे संवर्धन करण्याचा प्रयत्न करणे, हा मुनीचा धर्म आहे. पिंछी घेऊनही त्यागीच्या मनात अकिंचन्याचा उदय नाही झाला आणि परिग्रहाची तहान कायम राहिली तर पिंछीतल्या मोरपिसांवरचे डोळे त्या स्वत:लाच फसवणाऱ्या त्यागीकडे बघून हसतील. यापेक्षा तर रागाचा मार्ग चांगला होता. त्यावर चालत राहिला असता तर एक निश्चित मार्ग समोर राहिला असता. आता पाय खडकावर आहेत आणि मन फुलाच्या नाजूक पाकळ्यांमध्ये... अशी द्विधा स्थिती प्रशंसनीय नाही. ज्या भूमीवर उभे आहात; तिचेच होऊन राहा. केवळ, पिंछी-कमंडलू धारण केल्याने मोक्ष मिळाला, असे मानणे मिथ्यात्व आहे. जर असे असते तर पिंछी सर्वप्रथम धारण करणाऱ्या मोरालाच आधी मोक्ष मिळाला असता. जे गरीब धातुपात्राच्या अभावामुळे कमंडलू बाळगतात. त्यांना कधीच प्रतिष्ठा प्राप्त झाली असती. परंतु, वास्तवात असे घडत नाही. हे तर अनिवार्य, आवश्यकता असेल तरच योग्य आहे आणि ते बंधनही आहे. त्यागीसाठी परपदार्थ म्हणजे मोक्षमार्गातील अडथळेच आहेत. फार कशाला, शरीर हेसुद्धा बंधन मानले गेले आहे. पिंछी कमंडलु तर शरीर नाही. उलट, ती बाह्य वस्तू आहे. कदाचित, याच शंकेमुळे मुनींना सावधान करण्याची आवश्यकता शास्त्रकारांनी अनुभवली.

एकीकडे ते म्हणतात की, 'पिंछीशिवाय सात पावले जरी चालले तरी कायोत्सर्ग करावा लागेल आणि दोन कोस अंतर रस्त्यावरून चालत गेलात, तर शुद्धी आणि उपवास असे दोनदोन प्रायश्चित्त घेणे आवश्यक आहे.[२२] दुसरीकडे म्हणतात की, जो त्यागी पिंछी आणि चटई वगैरेसंबंधी ममत्व करतो आणि ममत्व परिणामामुळे आर्त-रौद्रध्यानपरायण

२२. 'सप्तपादेषु नि:पिच्छः कायोत्सर्गेण शुद्ध्यति ।
गव्यूतिगमने शुद्धिमुपवासं समश्नुते ।।' - चारित्र्यसार, ४४.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

होतो; त्याला काय मोक्षसुखाची प्राप्ती होणार आहे? 'सरहपाद'मध्येही पिंछीचा मोह बाळगणाऱ्यांना उद्देशून म्हटले आहे की, केवळ पिंछी ग्रहण केल्याने मोक्ष प्राप्त होत असेल तर मग तो अधिकार सर्वांत पहिल्यांदा मोराचा आहे आणि जर नीरस भोजनाने मुक्ती मिळत असेल तर जंगलात वृक्षाची गळून पडलेली पाने खाऊन जे आपले पोट भरतात; त्या पशूंना ती मिळायला हवी. परंतु, चामर जिच्या शेपटाच्या केसापासून तयार करतात; ती चमरी गाय, पंखांचा पिसारा धारण करणारा मोर, धान्याचे कण वेचूनवेचून खाणारे वन्यजीव यांना उद्दिष्ट उपकरणांनी मोक्ष मिळणे शक्य नाही.

मोक्षप्राप्ती सम्यक्चारित्र्यानेच होते. पिंछी व कमंडलू ही मुनिचर्येला सहायक अशी फक्त उपकरणे आहेत आणि उपेक्षासंयम अवस्थेत, अवधिज्ञान प्राप्त झाल्यावर किंवा तत्त्वज्ञी झाल्यावर तर त्यांची आवश्यकताही उरत नाही. पिंछीमुळे होणाऱ्या योग्य चर्यासुविधा मात्र ग्राह्य आहेत. मनाप्रमाणे, वाटेल तसा उपयोग पिंछीद्वारे करता येत नाही आणि असा यथेच्छ व्यवहार प्रायश्चित्ताचे कारण बनते. निरोगी अवस्थेत जर मुनी पिंछीला सावलीच्या उद्देशाने डोक्यावर धरत असेल, छाती झाकत असेल आणि मस्तकावरचे आवरण म्हणून तिचा उपयोग करीत असेल तर त्यास प्रायश्चित्त कल्याणक द्यावे लागते. रुग्णावस्थेत मात्र दोष लागत नाही; पण तरीही तो अपवादात्मकच मार्ग आहे.[२३]

शक्यतोवर मुनीने अपवाद आणि प्रायश्चित्त मार्गांचा अवलंब करू नये. पिंछी अप्रतिलेखन गुणाने युक्त आहे. परंतु, कमंडलूत मात्र सम्मूर्च्छन (अतिसूक्ष्म) जीवांची उत्पत्ती होत राहते. म्हणून, त्यांच्या निराकरणासाठी १५ दिवसांतून एकदा कमंडलू आतूनबाहेरून स्वच्छ धूत राहिले पाहिजे. १५ दिवसांनंतरही जर कमंडलू धुतला गेला नाही तर प्रतिक्रमण व उपवास केला पाहिजे.[२४] पिंछी ग्रहणासंबंधीच्या मर्यादा स्पष्ट करणारी अशी अनेक उदाहरणे आहेत आणि अशीही उदाहरणे आहेत की, जी अवधिज्ञानादी विशेष स्थितीत त्याच्या आवश्यकतेचे सर्वथा निराकरण करतात. पिंछीसंबंधी उत्पन्न झालेल्या मोहाची 'यावच्च आर्तरौद्र तावन्न मुंचति' असे म्हणत निंदाही करतात. कारण, जे पिंछी-कमंडलू ग्रहण करण्याच्या आवश्यकतेचे निरूपण करतात; ती मुनिचर्येची विधिवत सूत्रेच

---

२३. 'उच्छीर्षस्य विधानेऽपि प्रतिलेखस्य हृच्छदे ।
मस्तकावरणाद् देवं कल्याणं वा न दुष्यति ।।' - प्रायश्चित्त, ७५

२४. शश्वद विशोधयत साधुः पक्षपक्षे कमंडलुम्।
तदशोधयतो देयं सोपस्थानोपवास्।। - प्रा. समुच्चय, ८८

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आहेत. ती सम्यक् जिनलिंगास प्रमाणित करतात; परंतु, फक्त पिंछी धारण करण्यानेच मोक्ष प्राप्त होत नाही. हे लक्षात घेतले पाहिजे किंवा पिंछी-कमंडलूविषयी आसक्तीही मनात ठेवू नये- इत्यादी प्रतिपादन करणारी सूत्रे आहेत. ती मुनींचा मोह दूर करतात. असे होऊ शकते की, मोहाच्या व अज्ञानाच्या प्रभावाने मुनीस आपण बाळगत असलेल्या पिंछी-कमंडलूबद्दल मोह उत्पन्न होईल किंवा शास्त्रज्ञानाच्या अभावाने किंवा मूढ आग्रहामुळे तो पिंछीला एवढे महत्त्व देऊ लागेल की, 'बस्स! पिंछी मिळाली, जणू मोक्षच मिळाला.' आणि मग असे समजून सम्यक्चारित्रपालनात शिथिलता आणेल. अशा परिस्थितीत या विशिष्ट गाथांतून, श्लोक आणि सूत्रांमधून त्याला हे ज्ञान मिळणे आवश्यक आहे की, केवळ पिंछी ग्रहण केल्याने कोणी सम्यक्त्वी बनत नाही.[२५] सर्वस्वत्यागी त्यागींच्या व्रताचे निर्दोष रक्षण करण्यासाठीच निषेधसूत्रांची रचना केली गेली आहे. कारण, परिग्रहाचा अर्थ विशाल संपत्ती असा नसून एक सुईसुद्धा मूर्च्छा किंवा व्यामोहाचे (व्याकूळतेचे) कारण होऊ शकते. तिचे टोकसुद्धा मूर्च्छाकारक असल्याने परिग्रह संज्ञेतच जमा होईल- 'मूर्च्छा: परिग्रहः' - हे सूत्र उपादानांच्या विपुलतेलाच फक्त परिग्रह मानत नाही; तर ज्या वस्तुच्या अंशमात्र ग्रहणाने मोहाचा उदय होईल, तो परिग्रहच आहे. तेव्हा व्यामोह झाल्यामुळे पिंछीसुद्धा मुनिचर्येचे साधन न बनता प्रत्यवाय (अडथळा) आणणारीच ठरू शकते.

परमात्मप्रकाशमधील उक्ती सांगते- शिष्य-शिष्यिणींचा परिवार वाढवल्याने, पुस्तकांचा मोठा संग्रह करून अज्ञानीला आनंद होतो. परंतु, जो ज्ञानी आहे; त्याला मात्र या परिग्रहाची लाज वाटते. तो यास राग आणि बंधाचे कारण मानतो. जर, त्यागीचे मन शिष्यिणी-शिष्यांमध्ये, पुस्तके, पिंछी-कमंडलू, श्रावक-श्राविका, अर्जिका-क्षुल्लक-ऐलक यांच्या परिवारामध्ये तसेच चौके, पाट, चटया इत्यादींमध्ये गुंतून पडले तर तेच विषय डोक्यात घोळत राहिल्याने त्यांना अहोरात्र आर्त-रौद्र-ध्यानातच अडकून पडावे लागेल. मग, ना निराकुलचर्या होऊ शकणार, ना स्वाध्याय, ना सामायिक! ज्या आत्मकल्याणासाठी त्यांनी मुनिदीक्षा घेतली; ते उद्देश मूर्च्छांमध्ये हरवून जातील.[२६] हे परिग्रह त्यागीस

---

२५. पिच्छेण हु सम्मतं करगडिए चमरमोरं उंबर ए।
समभावे जिणदिढु रायाई दोस चत्तेण।। ७/७ गाथा २८

२६. चेल्ला चेल्ली पुत्थियहि तूसइ मूढ णिभंतू। येएहिं लज्जइ णाणियड बंधइ रेड मुणंतु।।
चंद्दश्यट्टर कुंडियहि चेल्लेचेल्ली यराहि। मोह जणेविषु मुणिवरहं उप्पहि पाडियेतेहिं
- परमात्मप्रकाश ८८-८९

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पतनाच्या वाटेकडे नेतात आणि आत्ममार्ग विसरायला लावू शकतात.

त्यागी आणि रागी यांचे मार्ग वेगवेगळे आहेत. एक गोष्ट इथे सांगणे प्रसंगोचित होईल की, त्यागीकडे श्रीमंत, गरीब, विशिष्ट अथवा सामान्य श्रावक, लोक कोणीही आले तरी त्याने आपण त्यांच्यापेक्षा उच्च गौरवाच्या शिखरावर आरूढ आहोत, असे मानता कामा नये. त्यांचा समभावच लोककल्याणकारक आहे. उच्चासन, खालचे आसन अशी व्यवस्था राजसभेतच खूप कटाक्षाने केलेली असते. परंतु, स्वतः जमिनीवर, पाषाणावर किंवा चटईवर बसणाऱ्या मुनींकडे जो येतो; त्यांना गादी-तक्के किंवा मऊ मखमली गालीच्यांची अपेक्षा नसते. तो तर मुनींच्या चरणाजवळ बसतो आणि त्यागींच्या चरणांची धूळ माथ्यावर लावून प्रसन्न होतो. त्याच्यासाठी संभ्रम उत्पन्न करणारी उपकरणे ठेवून त्याच्या आगमनाला नको तेवढे महत्त्व देणे (अतिरंजित करणे); हे वीतराग मुनिचर्येशी विसंगत आहे. श्रमणांचे आराध्य असलेल्या भगवंतांसाठी स्तुति-स्तोत्र लिहिताना 'इन्द्रःसेवां तव सुतनुतां'- असे म्हटलेले आहे. स्वतःच्या गौरवाचा दोष जाणूनबुजून न घेणे, हेच उत्तम आहे. यासंदर्भातील सिकंदर आणि दिगंबर मुनीच्या साक्षात्काराचा एक प्रसंग इतिहासात प्रसिद्धच आहे. त्यागीने त्या अरण्यातील नदीसारखे असायला हवे. तिच्या काठावर जेव्हा हत्ती पाणी प्यायला येतात; तेव्हा ती आनंदित होऊन किनाऱ्याकडे उसळत जात नाही की, हरीण आले तर आपले मन (पात्र) संकुचित करीत नाही. तिच्या दोन्ही तीरांच्या ओंजळीतले पाणी सर्वांसाठी सारखेच आहे. मुनींचे, त्यागींचे स्थान सम्राटापेक्षाही उच्च आहे. सम्राटही त्यागींच्या आशीर्वादाची अपेक्षा करतो आणि त्यांच्याकडून ऐश्वर्य, वैभव, कृपाप्रसाद मिळावा, अशी इच्छा करतो.

परंतु, मुनी निरपेक्ष असतो. संसार जर आशेचा दास असेल तर त्यागींनी आशेलाच दासी बनवले आहे. ते मुनी मनुष्यपर्यायी असूनही मनुष्यकोटीच्या वरचे आहेत. चिंतेला त्यांनी वश केलेले असल्याने त्यांना 'सिद्ध' (तपस्वी) म्हटले जाते. 'जे नर चिन्ता बस करहिं ते माणस नहि सिद्ध'- असे म्हणत त्यांची स्तुती गायिली जाते आणि त्यावर पुन्हा ते केवळ 'बाह्यग्रन्थिविहीनाः'च असतील तर मग काय म्हणावे? निखाऱ्यांमध्ये पोवळ्याचे झाड असल्याचा तो एक भास आहे, असेच म्हणता येईल.

'पिंछी-कमंडलू' हा निबंध मुनींनी धारण करावयाच्या शौचसंयमोपकरण विषयावरील आहे. ज्ञानोपकरणाच्या रूपात शास्त्र कायम राखण्याचा, स्वाध्यायतत्पर राहण्याचा आदेश शास्त्रात दिला गेलेला आहे. म्हणून, लेख समाप्त करण्यापूर्वी 'मूलाराधना'मधील काही

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

विशिष्ट पंक्तींचे स्मरण केले पाहिजे. त्या ओळींमधून स्वाध्यायाचा आग्रह धरण्यास सांगताना आचार्य म्हणतात- 'प्राण अगदी दुःखी कष्टी झाले असतांनासुद्धा मुनी, तपस्वी यांनी प्रयत्नपूर्वक आगमस्वाध्याय केला पाहिजे.' आचार्य कुंदकुंद स्वामी म्हणतात की, 'आगमचक्खू साहू' आणि 'अज्झयणमेव झाणं'। म्हणजे साधूचे डोळे त्याचे शास्त्र आहे. जेव्हा चर्येमध्ये शंका-विकल्प येतो तेव्हा साधूने ताबडतोब शास्त्राला शरण जावे. शास्त्र सांगतीलच की, त्याने काय करावे व काय करू नये. त्यागीचे ध्यान हाच त्याचा अभ्यास आहे. त्या अभ्यासातूनच तो सम्यक्त्वासंबंधी माहिती-ज्ञान प्राप्त करून घेतो. शास्त्ररूपी शिंपल्यातच सम्यक्त्वाचे मोती मिळतात. तन्मयता वाढते. ज्ञानसंपन्न झाल्याने स्व-पराचा बोध होतो. अशा रीतीने ध्यानाच्या द्वारे जी परिणामविशुद्धी होते; तीच शास्त्रस्वाध्यायानेही प्राप्त होते. याच विचारानुसार आचार्य म्हणतात- 'अध्ययनम् एव ध्यानम्' - इथे 'एव' हा शब्द निश्चयपरक आहे. वस्तुतः जिन सरस्वतीचे दर्शन घेणाऱ्यांनी तन्मय होऊन अध्ययनातच ध्यान व समाधी प्राप्त केली आहे. हा पोहून जाण्यास कठीण असा संसारसागर तरून जाण्यासाठी पिंछी-कमंडलू आणि शास्त्र ही तीन उपकरणे व सम्यक्त्वपूर्वक दर्शनज्ञानचारित्ररूपी तीन रत्ने ज्यांनी धारण केलेली आहेत; त्यांनी जन्म-पुनर्जन्माचे चक्र रोखण्यासाठी वज्रासारख्या कठीण तिहेरी अजस्र भिंतींचा परकोटच निर्माण केला आहे. पिंछी शिवमार्गाची स्वच्छता करणारी आहे. कमंडलू त्यावर सिंचन करणारे आहे आणि शास्त्र शिवमार्गाची दिशा दर्शवत राहणारी अढळ सुई-ध्रुवसूची आहे. त्या दुर्गम पथावर पोहोचणार तर फक्त कर्मरजविमुक्त असा आत्माच आहे. इति शुभम्।

उपसंहार-

'पिच्छे संथरणे इच्छासु लोहेण कुणदि ममयारं ।
यावच्च अट्टरुद्दं ताव ण मुंचेदि ण हु सोक्खं ।।

- आचार्य कुंदकुंद, रयणसार

जो साधू पिंछी, संथारा, संथरण आणि विविध प्रकारच्या इच्छांच्या लोभामुळे ममत्व करतो आणि जोपर्यंत या प्रकारच्या आर्तरौद्र ध्यानात रुतलेला असतो; त्याला निराकुलतेचे सुखही मिळत नाही आणि त्याला मुक्तीही मिळत नाही.

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दीक्षा-ग्रहण-विधी

दिगंबर मुनिदीक्षेत केशलोच, मुनी अवस्थेतील नामकरण, नग्नत्व प्रदान करणे आणि पिंछीग्रहण हे प्रमुख विधी आहेत. दीक्षा घेऊ इच्छिणाऱ्यास २८ मूलगुणांचे निष्ठापूर्वक पालन करण्याचे व्रत घ्यावे लागते. चतु:संघासमोर शुभ दिवशी आणि शुभ मुहूर्तावर, स्थिर लग्नात दिगंबरत्वाचा हा दीक्षाविधी संपन्न केला जातो. 'मुनिचर्या' विषयावर अनेक ज्ञातव्य माहिती 'निर्ग्रंथ मुनी' या शीर्षकाखालील निबंधात दिली गेली आहे. इथे दीक्षाविधीची माहिती देत आहोत.

सिद्धयोगिवृहद्भक्तिपूर्वकं लिंगमर्प्यताम् ।
लुंचाख्यानाग्न्यपिच्छात्म क्षम्यतां सिद्धभक्तित:[१] ।।

अथ दीक्षाग्रहणक्रियायां सिद्धभक्तिकायोत्सर्गं करोमि 'सिद्धानुद्धूत'-इत्यादि। अथ दीक्षाग्रहणक्रियायां योगिभक्तिकायोत्सर्गं करोमि। 'थोस्सामि गुणधराणा'-मित्यादि। 'जातिजरोरुरोग' इत्यादि वा । अनन्तरं लोचकरणं, नामकरणं, नाग्न्यप्रदानं, पिच्छप्रदानं च। अथ दीक्षानिष्ठापनक्रियायां सिद्धभक्तिकार्यात्सर्गं करोमि दीक्षादानोत्तरकर्त्तव्यनिरूपणम्-

---

१. लिंग :- म्हणजेच मुनिमुद्रा! ती प्रदान करण्याच्या विधीमध्ये सिद्धभक्ती, योगभक्ती व बृहद्भक्ती यांचे पठण करावे. सर्वप्रथम सिद्धभक्ती म्हणत या विधीचा शुभारंभ केला जातो. यामध्ये केशलोच, नामकरण आणि आचरणात आणावयाची व्रते, गुणाख्यान, नग्नत्व आणि पिंछीग्रहणाच्या विधीचे मंत्रपूर्वक संपादन केले जाते. 'नीतिसार'मध्ये या अर्थाचा श्लोक आहे.-

अचेलत्वं शिर:कूर्चलोचोऽध: केशधारणम्
निराभरणताऽच्छिन्नदेहता पिच्छधारणम् ।।७५।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

पंच य महव्वयायि समिदीवो पंच जिणवरुद्दिट्ठा ।
पंचे विंदियरोहा छब्बी आवासया लोचो ।
अच्चेलकमणहाणं खिदिसयनमदंतघंसण चैव ।
ठितिभोयणेय भत्तं मूलगुणा अट्ठवी साधुः [२] ।। (मूलाचार, ४-५)

मुनेरष्टाविंशतिमूलगुणा-

१. पंचमहाव्रतानि : अहिंसा, सत्यं, अचौर्यम्, ब्रह्मचर्यम् अपरिग्रहश्च ।
२. पंचसमितयः : ईर्याभाषैषणोत्सर्गादाननिक्षेपणाख्या ।
३. पंचेन्द्रियनिरोध : स्पर्शरसघ्राणचक्षुःश्रोत्राणि पंचेन्द्रियाणि ।
४. षडावश्यकक्रिया : सामायिकस्तुतिवन्दनप्रतिक्रमणप्रत्याख्यान कायोत्सर्गः।
५. सप्त प्रकीर्णकानि : केशोत्पाटनम्, अचैलक्यम्, अस्नानम्, क्षितिशयनम्, अदन्तधावनम्, स्थितिभोजनम्, एकभुक्तिश्चेति,

इत्यष्टाविंशतिमूलगुणान् निक्षिप्य दीक्षिते ।
संक्षेपेण सशीलादीन् गणी कुर्यात् प्रतिक्रमम् ।।

लोचक्रिया : लोचो द्वित्रिचतुर्मासैर्वरो मध्योऽधमः क्रमात ।
लघुप्राग्भक्तिभिः कार्यः सोपवासप्रतिक्रमः[३] ।

अथ लोचप्रतिष्ठापनक्रियायां सिद्धभक्तिकायोत्सर्गं करोमि । 'तवसिद्धे' इत्यादि ।

अथ लोचप्रतिष्ठापनक्रियायां योगभक्तिकायोत्सर्गं करोमि (अनन्तरं स्वहस्तेन परहस्तेन वापि लोचः कार्यः।)

अथ लोचनिष्ठापनक्रियायां सिद्धभक्तिकायोत्सर्गं करोमि। 'तवसिद्धे' इत्यादि । अतोऽनन्तरं प्रतिक्रमणं कर्त्तव्यम्।

---

२. मुनीचे २८ मूलगुण मूलाचारमध्ये या प्रकारे सांगितले आहेत. पाच (अहिंसा, सत्य, अचौर्य, ब्रह्मचर्य व अपरिग्रह) महाव्रते, पाच (इर्या, भाषा, एषणा, उत्सर्ग, आदान आणि निक्षेपण) समिती, पाच (त्वचा, जीभ, नाक, नेत्र व कान) इंद्रिय-निरोध, सहा (सामायिक, स्तुती, वंदना, प्रतिक्रमण, प्रत्याख्यान व कायोत्सर्ग) आवश्यक क्रिया, केशलोच, अस्नान, भूशयन, अदंतघर्षण, स्थितिभोजन, एक भुक्ती व अचैलक्य (हे मुनीचे मूलगुण आहेत).

३. केशलोच क्रिया दोन महिन्यांतून एकदा करणे उत्तम, तीन महिन्यांतून करणे मध्यम व चार महिन्यांतून करणे अधम मानले जाते. केशलोच क्रिया ही लघुभक्तीच्या पठण करतेवेळीच केली जावी. तसेच उपवास आणि प्रतिक्रमणही आवश्यक आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बृहद् मुनिदीक्षाविधिः

दीक्षकः पूर्वदिने भोजनसमये भाजनादितिरस्कारविधिं विधाय आहारं गृहीत्वा चैत्यालये आगच्छेत्। ततो वृहत्प्रत्याख्यान - प्रतिष्ठापने सिद्धयोगभक्ती पठित्वा गुरुपार्श्वे सोंपवासं प्रत्याख्यानं गृहीत्वा, आचार्यशांतिंसमाधिभक्तीः पठित्वा गुरुं प्रणमेत[४]।

अथ दीक्षादिने - दीक्षादातृजनः शांतिंकगणधरवलयपूजादिकं यथाशक्ति कारयेत्। अथ दाता दीक्षाभिलषुकं स्नानादी कारयित्वा यथायोग्यालंकारयुक्तं महामहोत्सवेन चैत्यालये समानयेत्। स च देवशास्त्रगुरूणां पूजां विधाय वैराग्यभावनापरः सर्वे सह क्षमां कृत्वा गुरोः समक्षं तिष्ठेत्। ततो गुरोरग्रे संघस्याग्रे च दीक्षायै याञ्चां कृत्वा तदाज्ञया सौभाग्यवती स्त्री विहितस्वस्तिकोपरि सितसिचयं प्रच्छाद्य तत्र पूर्वदिशाभिमुखः पर्यकासनं कृत्वा आसीत्। गुरुश्चोत्तराभिमुखो भूत्वा संघं परिपृच्छ्य लोचं कुर्यात्।[५] सिद्धभक्तिं योगभक्तिं च पठेत्। यदि पर्याप्त समयो नाधिगम्यः स्यात् तदा निम्नांकितममुं पाठं ब्रूयात्-

'बृहद्दीक्षायां लोचस्वीकारक्रियायां पूर्वाचार्यानुक्रमेण सकलकर्मक्षयार्थं भावपूजावन्दनास्तवसमेतं श्रीमद्योगभक्तिकायोत्सर्गं करोम्यहम्।' इति पठित्वा 'णमोकार' मन्त्रस्य नव वारान् जपं कुर्वीत। केशलोचसमये सिद्धभक्ति च वदेत्।

शान्तिमन्त्रः

ॐ नमोऽर्हते भगवते प्रक्षीणाशेषकल्मषाय दिव्यतेजोमूर्तये श्रीशान्तिनाथाय सर्वविघ्नप्रणाशनाय सर्वरोगापमृत्युविनाशनाय सर्वपरकृतक्षुद्रोपद्रवविनाशनाय

---

४. दीक्षार्थी व्यक्तीने दीक्षेच्या आदल्या दिवशी भोजनाच्या वेळी जेवणासाठी लागणाऱ्या भांड्याचा त्याग करावा व हाताच्या ओंजळीतच आहार घेऊन चैत्यालयात प्रवेश करावा. त्यानंतर, बृहत्प्रत्याख्यान प्रतिष्ठापनेत सिद्धभक्ती आणि योगभक्तीचे पठण करून गुरूजवळ उपवासासह प्रत्याख्यान ग्रहण करावे. त्यानंतर, आचार्यशान्तिसमाधिभक्ती वाचून गुरूंना वंदन करावे.

५. दीक्षाविधीच्या दिवशी दीक्षाविधी यथाविधी संपन्न करणाऱ्या श्रावकांनी शक्तीनुसार शांतिक आणि गणधरवलय इत्यादींचे पूजन करावे. त्यानंतर, दीक्षार्थीला स्नान वगैरे करवून योग्य ते अलंकार व वस्त्र घालण्यास देऊन समारंभपूर्वक चैत्यालयात घेऊन यावे. तेथे दीक्षार्थीने देव, शास्त्र, गुरु यांची भक्ती करून पूर्णपणे वैराग्यभाव मनात धारण करून सगळे गृहस्थ व कुटुंबीय यांच्याकडे क्षमायाचना करावी आणि स्वतः सर्वांना क्षमा करावी. त्यानंतर, गुरूंजवळ येऊन बसावे. गुरूंपुढे व संघासमोर दीक्षेची याचना करावी. (अनुमती मिळाल्यावर) गुरूंच्या आज्ञेनुसार सौभाग्यवती स्त्रीने काढलेल्या तांदळाच्या स्वस्तिकावर शुभ वस्त्र अंथरावे व पूर्वेकडे तोंड करावे. पर्यंकासनात बसावे. त्याच वेळी संघाची अनुमती घेऊन उत्तरेकडे सन्मुख होऊन गुरूंनी दीक्षार्थीचा केशलोच करावा.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सर्वक्षामडामरविनाशाय ॐ ह्रां ह्रीं ह्रूं ह्रौं ह्रः असिआउसा अमुकस्य (दीक्षाग्रहीतुः) सर्वशान्ति कुरु[६] स्वाहा।'

'इत्यनेन मंत्रेण गन्धोदकादिकं वारत्रयं मंत्रयित्वा शिरसि निक्षिपेत्।

शान्तिमंत्रेण गन्धोदकं त्रिः परिषिच्य मस्तकं वामपाणिना स्पृशेत्।'

वर्द्धमानमन्त्रः

ॐणमो भयवदो बड्ढमाणस्स रिसहस्सचक्कं जलंतं गच्छई आयासं लोयाणं जये वा विवादे वा थंभणे वा रणांगणे वा रायंगणे वा मोहेण वा सव्वजीव सत्ताणं अपराजिदो भवदु रक्ख-रक्ख स्वाहा।' इति वर्द्धमानमन्त्रः

ततो दध्यक्षतगोमयभस्मदूर्वांकुरान् वर्द्धमानमंत्रेण मस्तके निक्षिपेत्।[७]

मंत्र - ॐ णमो अरहंताणं रत्नत्रयपवित्रीकृतोत्त मांगाय ज्योति-र्मयायं मतिश्रुतावधिमनः पर्ययकेवलज्ञानाय असिआउसा स्वाहा।'

इमं मंत्रमुच्चार्य भस्मपात्रं गृहीत्वा कर्पूरमिश्रितं भस्म शिरसि निक्षिप्य निन्मांकितम् मंत्रमुदीर्य प्रथमं केशोत्पाटनं कुर्यात्।'[८]

मंत्र - ॐ ह्रीं श्रीं क्लीं ऐ अर्हं असिआउसा स्वाहा।

ॐ ह्रां अर्हद्भ्यो नमः।

ॐ ह्रीं सिद्धेभ्यो नमः।

ॐ ह्रूं पाठकेभ्यो नमः।

ॐ ह्रः सर्वसाधुभ्यो नमः :

इति समुच्चारयन् गुरुः स्वहस्तेन पंचवारान् केशानुत्पाटयेत्। पश्चात् निम्नांकितं पाठं पटेत्।[९]

'वृहद्दीक्षायां लोचनिष्ठापनक्रियायां पूर्वाचार्यानुक्रमेण सकलकर्मक्षयार्थं भाव-पूजा

---

६. या शांतिमंत्राचा पाठ करीत गंधोदक तीन वेळा अभिमंत्रित करून आचार्यांनी ते दीक्षकाच्या मस्तकावर शिंपडावे. त्यानंतर, दीक्षकाच्या मस्तकावर आपल्या डाव्या हाताने स्पर्श करावा.

७. या वर्धमान मंत्राचे पठण करून आचार्यांनी दीक्षकाच्या मस्तकावर दही, अक्षत, गायीच्या शेणाची राख आणि दूर्वांकुर टाकावेत.

८. वरील मंत्र म्हणून भस्मपात्र हातात घेऊन कापूरमिश्रित अशी ती राख दीक्षकाच्या डोक्यावर टाकावी व (खालील) मंत्र म्हणत केशलोच करावा.

९. असे मंत्रोच्चारण करीत गुरूंनी स्वहस्ते दीक्षकाचे केस पाच वेळा काढावेत.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वन्दनास्तवसमेतं श्रीमत्सिद्धभक्तिं कायोत्सर्गं करोम्यहम्।' इति नव वारान् महामन्त्रं जपेत्।[१०]

लघुसिद्धभक्तिः - इच्छामि भन्ते! सिद्धभक्ति काउस्सग्गो कओ तस्स लोचेउं सम्मणाण सम्मदंसण सम्मचारित्तजुत्ताणं अट्ठविहकम्मविप्पमुक्काणं अट्ठगुणसंपण्णाणं उड्ढलोयमयाच्छमि पयट्टियाणं तवसिद्धाणं संजमसिद्धाणं णय सिद्धाणं अतीताणा - गदट्टमावणकालत्तयसिद्धाणं सव्वसिद्धाणं सया णिच्च कालं अंचेमि पूजेमि वंदामि णमंस्सामि दुक्खक्खओ कम्मक्खओ बोहिलाहो सुगइगमणं समाहिमरणं जिणगुण-संपत्ति होउ मज्झं। इति।

ततः शीर्षं प्रक्षाल्य गुरुभक्तिं दत्वा वस्त्राभरणयज्ञोपवीतादिकं परित्यज्य तत्रैवावस्थाय दीक्षां याचेत। गुरुश्च शिरसि श्रीकारं लिखित्वा 'ॐ ह्रीं अर्हं असिआउसा इति स्वाहा' - ह्रीं मन्त्रस्याष्टोत्तरशत (१०८) जाप्यमादिशेत्। जपानन्तरं च गुरुः शिष्यस्याञ्जलौ केसरकर्पूरश्रीखण्डसाधितद्रव्येणं श्रीकारं कुर्यात्। श्रीकारस्य चतुर्दिक्षु

'रयणत्तयं च वंदे चउवीसजिण तहा वंदे।
पंच गुरूणं वंदे चारण जुगलं तहा वंदे।'

इति पठन् पूर्वस्यां ३ दक्षिणदिशि २४ पश्चिमायां ५ उत्तरस्यां २ अंकान् लिखित्वा 'सम्यग्दर्शनाय नमः, सम्यग्ज्ञानाय नमः, सम्यक्चारित्राय नमः इति पठन् तन्दुलैरंजलिं पूरयेत्। तदुपरि नारिकेलं पूगीफलं च धृत्वा सिद्धचारित्रयोगभक्तीः पठित्वा व्रतादिकं दद्यात्।'[११]

अथ सिद्धभक्तिचारित्र्यभक्तियोगभक्तिपाठ :-
'वद समिदियं रोधो लोचो आवासयमचेलमणहाणं।
खिदिसयणमदंतधवणंठिदिभोयणमेयभत्तं च।।

---

१०. अशा रीतीने नऊ वेळा महामंत्राचा जाप करावा.

११. यानंतर, दीक्षा घेणाऱ्याने आपले डोके धुवावे. गुरुभक्ती म्हणावी व मग वस्त्रालंकार, यज्ञोपवित वगैरेंचा त्याग करून तेथेच राहून गुरुमहाराजांकडे दीक्षेसाठी प्रार्थना करावी. तेव्हा, आचार्यांनी (गुरूंनी) दीक्षकाच्या मस्तकावर 'श्री' शब्द लिहावा. 'ॐ ह्रीं अर्हं असिआउसा ह्रीं स्वाहा' या मंत्राचे १०८ जाप्य द्यावेत. जाप्य दिल्यानंतर दीक्षकाच्या ओंजळीत केशर, कापूर आणि श्रीखंडाने 'श्री' अक्षर लिहावे. 'श्री'च्या चोहोबाजूस 'रत्नत्रयं वन्दे' हा श्लोक म्हणत पूर्वेला ३, दक्षिणेला २४, पश्चिमेला ५ व उत्तरेला २ असे अंक लिहावेत. पुन्हा 'सम्यग्दर्शनायः नमः' इत्यादी म्हणत गुरूंनी दीक्षाग्रहीताची ओंजळ तांदळाने भरावी व वर नारळ, सुपारी ठेवून 'सिद्धभक्तिचारित्रभक्तियोगभक्ति' म्हणून व्रत वगैरे द्यावे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

'पंचमहाव्रतपंचसमितिपंचेन्द्रियनिरोधलोचषडावश्यकक्रियादयोऽष्टाविंशतिमूलगुणा, उत्तमक्षमामार्दवार्जवसत्यशौचसंयमतपस्त्यागाकिंचन्यब्रह्मचर्याणि दशलाक्षणिको धर्मः, अष्टादश शीलंसहस्राणि, चतुरशीतिलक्षगुणास्त्रयोदशविधं चारित्रं, द्वादशविधं तपश्चेति सकलसम्पूर्ण मर्हत्सिद्धाचार्योपाध्यायसर्वसाधुसाक्षिकं सम्यक्त्वपूर्वकं दृढ़व्रतं समारूढं ते मे भवतु।' इत्यमु पाठं वारत्रयमुच्चार्य व्रतव्याख्यां शिष्याय सम्यग् विज्ञाप्य व्रतादि दद्यात् शान्तिभक्तिं च पठेत्। ततश्चाधोलिखितमाशीः श्लोकं पठित्वा अंजलिस्थ-तण्डु लादिकं दात्रे प्रदेयम्[१२]

आशीः श्लोकः-

'धर्मः सर्वसुखाकरो हितकरो धर्मं बुधाश्चिन्वते
धर्मेणैव समाप्यते शिवसुखं धर्माय तस्मै नमः।
धर्मान्नास्त्यपरः सुहृद् भवभृतां धर्मस्य मूलं दया।
धर्मे चित्तमहं दधे प्रतिदिनं हे धर्मं! मां पालय।'

अथ षोडशसंस्कारारोपणम्

१. अयं सम्यग्दर्शनसंस्कार इह मुनौ स्फुरतु।
२. अयं सम्यग्ज्ञानसंस्कार इह मुनौ स्फुरतु।
३. अयं सम्यक्चारित्रसंस्कार इह मुनौ स्फुरतु।
४. अयं बाह्याभ्यन्तरतपः संस्कार इह मुनौ स्फुरतु।
५. अयं चतुरंगवीर्यसंस्कार इह मुनौ स्फुरतु।
६. अयं अष्टमातृमण्डलसंस्कार इह मुनौ स्फुरतु।
७. अयं शुद्ध्यष्टकोष्टसंस्कार इह मुनौ स्फुरतु।
८. अयं अशेषपरीषजयसंस्कारं इह मुनौ स्फुरतु।
९. अयं त्रियोगासंयमनिवृत्तिशीलतासंस्कार इह मुनौ स्फुरतु।
१०. अयं त्रिकरणासंयमनिवृत्तिशीलता संस्कार इह मुनौ स्फुरतु।
११. अयं दशासंयमनिवृत्तिशीलतासंस्कार इह मुनौ स्फुरतु।

---

१२. (वर दिलेल्या) 'सिद्धभक्तिचारित्रभक्तियोगभक्ति' पाठाचे तीन वेळा पठण करून शिष्याला व्रताची उचित व्याख्या समजावून देऊन व्रत द्यावे व शान्तिभक्तीचा पाठ करावा. तद्नंतर, आशीर्वाद श्लोक म्हणून दीक्षा घेतलेल्याच्या ओंजळीत जे तांदूळ वगैरे होते; ते दाताश्रावकाला द्यावेत.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

१२. अयं चतु:संज्ञानिग्रहशीलतासंस्कार इह मुनौ स्फुरतु।
१३. अयं पंचेन्द्रियजयशीलतासंस्कार इह मुनौ स्फुरतु।
१४. अयं दशधर्मधारणशीलतासंस्कार इह मुनौ स्फुरतु।
१५. अयं अष्टादशसहस्रशीलतासंस्कार इह मुनौ स्फुरतु।
१६. अयं चतुरशीतिलक्षगुणसंस्कार इह मुनौ स्फुरतु।

(इति प्रत्येकमुच्चार्य शिरसि लवंगपुष्पाणि निक्षिपेत्)। ततो वक्ष्यमाणं मंत्रेण शिरसि पुनः पुष्पाणि विकिरेत्। मन्त्रः-

ॐ णमो अरहंताणं णमो सिद्धाणं णमो आयरियाणं णमो उवज्झायाणं णमो लोए सव्वसाहूणं। ॐ परमहंसाय परमेष्ठिने हंस हं स हं ह्रां ह्रं ह्रीं ह्रौं ह्रः जिनाय नमः जिनं स्थापयामि संवौषट्।

अथ गुर्वावलिः

स्वस्ति श्रीमहावीरनिर्वाणाब्दे तमे २५०२ मासानामुत्तमे मासे-पक्षे-तिथौ- वासरे मूलसंघे सरस्वतीगच्छे सेनगणे श्रीमत्कुन्दकुन्दाचार्यपरम्परायां गुरुश्रीतच्छिष्यश्री - शिष्यस्य शिष्य'........ नामधेयस्त्वमसि।

अथ पिच्छोपकरणप्रदानम्

ॐ णमो अरहंताणं। भो अन्तेवासिन्! षड्जीवनिकायरक्षणाय मार्दवसौकुमार्यरजः स्वेदा-ग्रहलघुत्वपंचगुणोपेतमिदं पिच्छोपकरणं गृहाय-गृहाय। इति पिच्छिकादानम्।

अथ शास्त्रदानम्

ॐ णमो अरहंताणं। मतिश्रुतावधिमनःपर्ययकेवलज्ञानाय द्वादशांगश्रुताय नमः भो अन्तेवासिन्! इदं ज्ञानोपकरणं गृहाण गृहाण। इति शास्त्रदानम्।

अथ शौचोपकरणदानम्

ॐ णमो अरहंताणं। रत्नत्रयपवित्रीकरणांगाय बाह्याभ्यन्तरमलशुद्धाय नमः। भो अन्तेवासिन्! इदं शौचोपकरणं गृहाण गृहाण। इति गुरुः वामहस्तेन कमण्डलुं दद्यात्।

लघुसमाधिभक्तिः

इच्छामि भन्ते। समाहिभत्ति काउस्सग्गो कओ। तस्सा लोचेउं रयणत्तयरूवपरमप्पज्झाणलक्खणं समाहिभत्तीये णिच्चकालं अंचेमि पूजेमि वंदामि णमस्सामि। दुक्खक्खओ कम्मक्खओ बोहिलाहो सुगइगमणं समाहिमरणं जिणगुणसंपत्ति होउ मज्झं।

ततो नवदीक्षितो मुनिर्गुरुभक्त्या गुरुं प्रणम्य अन्यान् मुनीन् प्रणम्योपविशति। यावद्

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

व्रतारोपणं न भवति तावदन्ये मुनयः प्रतिवन्दनां न ददति।[१३]

ततो दातृप्रमुखा जना उत्तमफलानि अग्रे निधाय तस्मै 'नमोऽस्तु' इति प्रणामं कुर्वन्ति।[१४]

ततस्तमस्मिन् पक्षे द्वितीयपक्षे वा सुमूहूर्ते व्रतारोपणं कुर्यात्। तदानीं रत्नत्रयपूजां निर्वर्त्य पाक्षिकप्रतिक्रमणपाठः पठनीयः। ततः पाक्षिकनियमग्रहणात् पूर्वं यदा 'वदसमिदीत्यादि' पठ्यते तदा पूर्ववत् व्रतादि दद्यात्। नियमग्रहणसमये यथायोग्यमेकं तपो दद्यात्। (पल्यविधानादिकै) दातृप्रभृतिश्रावकेभ्योऽपि एकमेकं तपो दद्यात्। ततोऽन्ये मुनयः प्रतिवन्दनां ददति।[१५]

मुखशुद्धिमुक्तकरणविधिः

त्रयोदशसु पंचसु तिसृसु वा कच्चोलिकासु लवंगैलापूगीफलादिकं निक्षिप्य ताः कच्चोलिका गुरोरग्रे स्थापयेत्। 'मुखशुद्धिमुक्तकरणपाठक्रियायाया' - मित्याद्युच्चार्य सिद्धयोगाचार्यशान्तिसमाधिभक्तीर्विधाय ततः पश्चात् मुखशुद्धिं गृहणीयात्।[१६]

अथ क्षुल्लकदीक्षाविधिः

अथ लघुदीक्षायां सिद्धयोगाशान्तिसमाधिक्ती: पठेतः। तत्र 'ॐ ह्रीं श्री क्लीं ऐ अर्हंनमः' इत्यनेन मन्त्रेण एकविंशतिवारान् अष्टोत्तरशतवारान् वा जाप्यं दीयते।

अन्यच्च विस्तरेण लघुदीक्षाविधिः

अथ लघुदीक्षाग्रहीता (ग्रहीत्री वा) दातारं संस्थापयति। ततो दाता यथायोग्यमलंकृतं

---

१३. समाधिभक्तीचा पाठ झाल्यावर नवदीक्षाप्राप्त मुनीने गुरुभक्तीद्वारे गुरूंना वंदन करावे. तसेच तिथे उपस्थित असलेल्या सर्व मुनींनाही नमस्कार करून बसावे. जोपर्यंत व्रते दिली जात नाहीत; तोपर्यंत इतर मुनींनी नवदीक्षित मुनीला प्रतिवंदन करू नये. त्यानंतर, दातारांमधील मुख्य श्रावकाने उत्तमोत्तम फळे नवदीक्षित मुनीसमोर ठेवावीत. 'नमोस्तु' असे म्हणत त्यांना नमस्कार करावा.

१४. त्यानंतर, त्याच पक्षात किंवा दुसऱ्या पक्षात शुभमुहूर्तावर व्रते द्यावीत, त्या वेळी रत्नत्रयाच्या पूजेनंतर पाक्षिक प्रतिक्रमण पाठ-पठण करावे. पाक्षिक नियम ग्रहण करण्याच्या वेळेआधी जेव्हा 'व्रतसमिती' इत्यादि पाठाचे वाचन होते; तेव्हा पूर्ववत व्रते वगैरे द्यावीत. नियमग्रहणाच्या वेळी योग्य ते एक तप दिले पाहिजे. दाताश्रावकांनासुद्धा एकेक तप दिले पाहिजे. यानंतर, मुनी प्रतिवंदन करतात.

१५. तेरा, पाच किंवा तीन वाट्यांमध्ये लवंग, विलायची, सुपारी वगैरे ठेवून त्या वाट्या गुरूसमोर ठेवाव्यात. नवदीक्षित मुनीने मुखशुद्धिमुक्तकरणपाठ क्रियायाम्' वगैरे पाठाचे उच्चारण करीत 'सिद्धयोग आचार्य शांती-समाधि-भक्ती म्हणून त्यानंतर मुखशुद्धी ग्रहण करावी.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कृत्वा चैत्यालये समानयेत्। देवं वन्दित्वा सर्वे सह क्षमाविधिं समाप्य गुरोः समक्षं दीक्षां याचित्वा तदाज्ञया सौभाग्यवतीःस्त्रीविरचितस्वस्तिकोपरि श्वेतवस्त्रं प्रच्छाद्य तत्र पूर्वाभिमुखः पर्यङ्कासंनो गुरुचोत्तराभिमुखः संघं परिपृच्छ्य लोचं कुर्यात्। 'ॐनमोऽर्हते भगवते प्रक्षीणाशेषकल्पषाय दिव्यतेजोमूर्तये शान्तिकराय सर्वविघ्नप्रणाशनाय सर्वरोगापमृत्युविनाशनाय सर्वपरकृतक्षुद्रोपद्रवविनाशनाय सर्वक्षामडामरविनाशनाय ॐ ह्रां ह्रीं ह्रें ह्रौं ह्रः असिआउसा अमुकस्य सर्वशान्ति कुरु-कुरु स्वाहा।' अनेन मन्त्रेण गन्धोदकादिकं त्रिवारं शिरसि निर्षिंचेत्। शान्तिमंत्रेण गन्धोदकं त्रिः परिषिच्य वामहस्तेन मस्तकं स्पृशेत्। ततो दध्यक्षतगोमयभस्मदूर्वांकुरान् मस्तके वर्द्धमानमंत्रेण निक्षिपेत्। ॐ णमो भयवदो नड्ढमाणस्से' त्यादि वर्द्धमानमन्त्रः पूर्वं लिखितः। लोचादिविधिं महाव्रतं च निर्वर्त्य, प्रदाय सिद्धभक्तिं योगभक्तिं च पठित्वा व्रतं दद्यात्।

ततः - दंसणवयसामाइयपोसहसच्चित्तरायभत्तेय।
वंभारंभपरिग्गह अणुमणमुद्दिट्ठ देसविरदेदे ।। - (गोम्मटसार, ४७७)

इत्यादि वारत्रयं पठित्वा व्याख्याय गुर्वावलिं पठेत्। ततः संयमाद्युपकरणानि दद्यात्।

ॐ णमो अरहंताणं। भो क्षुल्लक! (क्षुल्लिके! वा) षडजीवनिकायरक्षणाय मार्दवादिगुणोपेतमिदं पिच्छोपकरणं गृहाण गृहाण इत्यादि पूर्ववत् ज्ञानोपकरणं शौचोपकरणं च मंत्रपूर्वकं दद्यात्।

इति लघुदीक्षाविधानं समाप्तम्

दीक्षानक्षत्राणि

प्रणम्य शिरसा वीरं जिनेन्द्रममलव्रतम्।
दीक्षा-ऋक्षाणि वक्ष्यन्ते सतां शुभफलाप्तये ।।१।।
भरण्युत्तरफाल्गुन्यो मघाचित्राविशाखिकाः।
पूर्वाभाद्रपदाभानि रेवती मुनिदीक्षणे ।।२।।
रोहिणी चोत्तराषाढ़ा उत्तराभाद्रपत्तथा ।
स्वातिः कृत्तिकया सार्धं वर्ज्यंते मुनिदीक्षणे ।।३।।
अश्विनीपूर्वफाल्गुन्यौ हस्तस्वात्यनुराधिकाः।
मूलं तथोत्तराषाढ़ा श्रवणः शतभिषा तथा ।।४।।
उत्तराभाद्रपच्चापि दशेति विशदाशयाः।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आर्यिकाणां व्रते योग्यान्युशन्ति शुभहेतवे ।।५।।
भरण्यां कृतिकायां च पुष्ये श्लेषार्द्रयोस्तथा।
पुनर्वसौ च नो दद्युरार्यिकाव्रतमुत्तमाः ।।६।।
पूर्वाभाद्रपदा मूलं घनिष्ठा च विशाखिका ।
श्रवणश्चैषु दीक्ष्यन्ते क्षुल्लकाः शल्यवर्जिताः ।।७।।
इतिदीक्षानक्षत्रपटलम् ।

दीक्षा का?

जगात सामान्य आणि विशेष असे दोन वर्ग कायमच दिसून येतात. 'सामान्य' जातीचा बोध करून देतो; तर विशेष हा व्यक्तिबोधक आहे. जे विद्यार्थी विश्वविद्यालयाकडून उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र मिळवतात; ते शिक्षण क्षेत्रात असे प्रमाणपत्र न मिळवणाऱ्यांपेक्षा विशेष ठरतात. ही प्रक्रिया उत्तम आणि कनिष्ठ (मागे राहणारा) यांना विभाजित करणारी एक रेषा आहे. मंदिरामध्ये देवाच्या मूर्तीसमोर आपण भक्ती, विनय, श्रद्धा, स्तुती, आराधना जी करतो ती सामान्य, तत्सम विकायला ठेवलेल्या मूर्तींची केली जात नाही. कारण, मंदिरातील प्रतिमेवर शास्त्रातील विधीप्रमाणे संस्कार केलेले असतात व मंत्रांच्या अनंत शक्तीसह तिची प्रतिष्ठा झालेली असते. दीक्षासुद्धा सामान्य दर्जाच्या व्यक्तीला उच्च स्तर प्राप्त करून देण्यासाठी शास्त्राने संमत केलेली आहे. दीक्षा ग्रहण करण्याचे भाव/प्रेरणा जेव्हा एखाद्याच्या मनात निर्माण होतात; तेव्हा तो भव्यात्मा दीक्षायोग्य होण्यासाठी सातत्याने प्रयत्न करतो. तो स्वतःच आत्मपरीक्षण करतो व मन वैराग्यमय झालेले जाणून योग्य गुरूंकडे जातो व त्यांना दीक्षा देण्याची याचना करतो. जेव्हा तो परीक्षेत उत्तीर्ण होतो, दीक्षा विधीद्वारे त्यागी बनतो. तेव्हा त्याला तीन प्रामाणिक अनुमोदने मिळतात – शास्त्रानुमोदन, परंपरानुमोदन व लोकानुमोदन! शास्त्र त्या अवस्थेतील विरागी व्यक्तीला त्यागी होण्याची परवानगी/अनुमोदन देते आणि दीक्षाविधीच्या द्वारे परंपरेनुसार संघाच्या समक्ष त्यास दिगंबरत्व दिले जाते.

या विधीनंतर लोक त्याला आपला गुरू मानतात. सामान्य लोकांपेक्षा विशिष्ट म्हणून त्याची मान्यता, मर्यादा व त्याच्या वेगळेपणाची/वैशिष्ट्यांची अभिनंदनीय दखल लोकांमध्ये घेतली जाते. हे सारे लोकप्रचलित होते. म्हणूनच, साधारणतः पवित्र आचरण असणारीच व्यक्ती दीक्षा घेते. दीक्षा घेण्याच्या आधीही त्यांचे चारित्र्य साधूसारखेच

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असते; म्हणून तर त्यांना या मार्गासाठी स्वीकृती मिळते. तरीही, शास्त्राने ज्या व्यावहारिक पद्धतीचे पालन करण्यास सांगितले आहे; ते पालन केल्याने संस्कृतीची हजारो वर्षांपासून चालत आलेली जी परंपरा आहे, तिच्याशी ते एकरूप होतात. 'मुद्रा सर्वत्र मान्यास्यात् निमुद्रोनैव मन्यते' हे वचन प्रसिद्धच आहे. ही मुद्रा परंपरेला अनुसरणाऱ्या शास्त्रपद्धतीनेच प्राप्त होऊ शकते. जर हे साधन ठेवले नाहीतर कोणीही स्वच्छंदपणे दिगंबर वेश धारण करून त्याच्या मूळ मर्यादांबरोबर स्वैर वर्तन करू शकतो. म्हणूनच, विधिवत ग्रहण केलेले दिगंबरत्व हेच सिद्ध करते की तो जिनेंद्र भगवंतांच्या मूळ धर्माप्रमाणे वागणारा आहे आणि या शास्त्रबंधनांचे नियंत्रणही त्यावर आहे.

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

वर्षायोग

भारतीय दर्शनशास्त्रात 'योग' हा शब्द बहुचर्चित व अतिस्तुत्य असा आहे. 'योग'चा अर्थ आहे जोड! एक आणि एक यांची बेरीज दोन होते - हा त्याचा व्यावहारिक अर्थ आहे. योगशास्त्रात आत्म्याचे आत्म्याशी मिलन होणे, यास योग म्हटले आहे. 'युजिर योगे' या धातूपासून हा शब्द बनला आहे. कर्मपरिणामांनी कषायांमध्ये आत्मा मग्न होतो आणि परद्रव्याची आसक्ती करतो. आत्मस्वरूपाचे भान विसरून जातो. द्रव्यमन या परपदार्थरतीचे माध्यम होते. या पररतीचा परिणाम म्हणजेच चार गतींचा बंध! ज्यांना कर्मनिर्जरा करायची इच्छा असते; ते आत्मस्वरूपात मग्न होण्यासाठी योगसाधना करतात. सांसारिक द्रव्यमात्राच्या दृष्टीने योग म्हणजे संयोग आणि योगाची अप्राप्ती म्हणजे वियोग होय.

संयोग आणि वियोग या दोहोंत क्षणिक हर्ष व क्षणिक शोक अशी स्थिती असते. एका नीतिकाराचे म्हणणे असे- 'संयोगा विप्रयोगान्ताः पतनान्ताः समुच्छ्रयाः' जगातील सर्व संयोगांचा शेवट वियोग हाच आहे आणि सर्व वैभवांचे पर्यवसान पतन हेच आहे. एखादा मनुष्य जितका स्नेहाच्या, प्रेमाच्या बंधनात फसतो; तितके त्याला संतप्त व्हावे लागते.[१] म्हणूनच, संयोग-वियोग यांच्या पलीकडे असलेल्या शाश्वत सुखाच्या प्राप्तीसाठी ज्ञानी, मुनी, महात्मा योगसाधना करून आत्मकल्याणाचा मार्ग स्वीकारतात.

योगाचा आणखी एक अर्थ म्हणजे चित्तवृत्तींचा निरोध! मन नेहमीच चंचल असते. त्याला फक्त अवकाश क्षेत्र हवे असते. मग ते भौतिक असू दे की आत्मिक! भौतिक क्षेत्रात-जगात तर हे मन गुंतलेलेच आहे. सगळा संसारच या द्रव्यमनाच्या भौतिक

---

१. यावत्ः कुकते जन्तुः सम्बधान मनसः प्रियान्।
तावन्तोऽस्य निखन्यन्ते हृदये शोक-शंकवः।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

परिग्रहाने जखडून गेला आहे. हां, आवश्यकता आहे ती त्यास आत्मोन्मुख करण्याची! असे आत्मोन्मुख करणे... ती प्रक्रिया म्हणजेच योग होय. जे योगसाधना करतात; त्यांना आत्मस्वरूपाची प्राप्ती होते. 'सामायिक' हे योगाचेच दुसरे नाव आहे. योग स्थितीशिवाय आत्मसाक्षात्कार अशक्य आहे.

योग करतेवेळी इंद्रियांच्या वृत्ती बाह्य व्यापारापासून रहित होतात. जसे एखादा अनेक दारे असलेल्या आपल्या घराला आतून बंद करीतकरीत अगदी आतल्या खोलीत जातो. तसे भावात्मक मन गहन आत्मप्रदेशात प्रवेश करते. तिथे पोहोचल्यावर मन स्थिर होऊन जाते. वारा नसलेल्या ठिकाणी दिव्याची ज्योत शांत, अकंप राहावी तशी ती आत्मस्थिती असते आणि ती योगयुक्त असते. या योगामुळे आत्मरूपात स्थैर्य व परपदार्थाबद्दलची विरती प्राप्त होते. अनंतानुबंधी कायक्लेश नष्ट होऊन जातात, शाश्वत आरोग्यप्राप्तीची दारे खुली होतात. योगामुळेच आत्म्याची अनंत शक्ती प्रकट होते. गणितातही योग म्हणजे वृद्धी-वाढ असा अर्थ आहे आणि न्यूनता म्हणजे ऋण म्हटले जाते. जो संसाराच्या योगवियोगात रमला आहे तो ऋणभोक्ता आहे आणि जो ऋणीप्रमाणे दुःखाने व्याकूळ आहे; परंतु ज्याने विशुद्ध योग-मार्ग जाणला आहे. तो अनंतानुबंधी कर्मांचा क्षय करतो.

प्रस्तुत विषय- 'वर्षायोग'सुद्धा मुनिचर्येचे एक योगपूर्ण अंगच आहे. वर्षा ऋतुत हा धारण केला जातो म्हणून यास वर्षायोग म्हटले जाते. व्यवहारदृष्ट्या या काळात मुनी चातुर्मास करतात आणि एखाद्या श्रावकवस्तीत चार महिने व्यतीत करतात. शास्त्रानुसार हा कालावधी आषाढ शुक्ल चतुर्दशीच्या पूर्वरात्री सुरू होतो आणि कार्तिक कृष्ण एकादशीच्या रात्रीच्या शेवटच्या प्रहरी तो समाप्त होतो.

वर्षातील तीन मुख्य ऋतू म्हणजे उन्हाळा, पावसाळा व हिवाळा; म्हणजेच ग्रीष्म, वर्षा आणि शीत! वसंत, शरद व हेमंत हे ऋतू तेवढे उग्र, प्रखर नसतात. त्यांच्या असह्यतेचा अनुभव येत नाही. मुनींच्या तपाविषयी चर्चा करताना कवी भूधरदासांनी म्हटले आहे की, त्यागी दशलक्षण धर्म धारण करतात आणि १२ अनुप्रेक्षांचे पालन करतात ते २२ परिषह सहन करतात. चारित्र्यरत्नांचे भांडार असतात. त्या वर्णनानंतर त्यांनी पुढे लिहिले आहे-

'जेठ तपे रवि आकरो, सूखे सरवर नीर ।
शैलशिखर मुनि तप तपे, दाहे नगन शरीर ।।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

'पावस रैन डरावनी, बरसे जलधर-धार ।
तरुतल निवसे तब यती, बाजे झंझावार ।।'
'शीत पड़ै, कपि मद गले, दाझे सब वनराय ।
ताल तरंगिनी के तटे, ठाडे ध्यान लगाय ।।'
'इह विधि दुर्धर तप तपें, तीनों काल मँझार ।
लागे सहज सरूप में, तनसों ममत निवार ।।'

अशा प्रकारे ग्रीष्म, वर्षा आणि शीत ऋतूंमधील कठीण परिषह सहन करीत मुनी शरीराविषयीच्या ममत्वाचा त्याग करतात. वर्षा ऋतूत फक्त मुसळधार बरसणाऱ्या मेघांचाच परिषह त्यांना सहन करावा लागतो; असे नाही तर विहार करणेही स्थगित ठेवावे लागते. कारण, नद्यांना पूर येतो, मार्ग बंद होतात, अगणित स्थूल, सूक्ष्म कृमी-कीटक उत्पन्न होतात. जमीन हिरवळीने, गवताने झाकली जाते आणि तोंडात अंडी घेऊन कितीतरी मुंग्या बिळाबाहेर निघतात. हा काळ एका सम्यग्दृष्टीधारी व सम्यक्चारित्र्यधारी मुनींना विहार करण्यासाठी गैरसोयीचा असतो.

या नैसर्गिक बाधांव्यतिरिक्त चातुर्मासात अनेक दिवस व पूर्ण भाद्रपद महिना हा पवित्र व्रत-पर्वांचा व सांस्कृतिक आयोजनांचा असतो. या दिवसांत विशिष्ट ठिकाणी मुनी, आचार्य आणि अभ्यासू त्यागीजनांच्या नियमित उपस्थितीमुळे धार्मिक उत्सवांचे वातावरण अधिकच महत्त्वपूर्ण बनते. ठिकठिकाणी शास्त्र-प्रवचनांचे आयोजन होते, त्यामुळे एकत्रित आलेल्या श्रावकांना धर्मप्रभावनेचा विशेष लाभ होतो. एक गोष्ट इथे आठवण करण्याजोगी आहे; ती म्हणजे भारतवर्षाच्या अगदी पुरातन काळी पावसाळ्याच्या चार महिन्यांमध्ये बहुधा परदेशगमन स्थगित करीत असत. (अपवाद- विशेष आवश्यक आयोजनांचे). राजांच्या युद्धमोहिमा, व्यापाऱ्याचा व्यवसायाच्या निमित्ताने विविध दिशांकडे होणारा प्रवास हे वर्षा ऋतु संपण्याच्या काळातच होत असत. तपस्वीसुद्धा या काळात एकाच ठिकाणी राहत असत.

जैन परंपरेत जी चतुःसंघ व्यवस्था केलेली आहे; त्यांना याच काळात परस्परांच्या सहवासात येण्याची संधी लाभे. निराकुल धर्मध्यान करण्याचा व मुनी-परमेष्ठींकडून अधिकाधिक धर्मोपदेश प्राप्त करण्याचा सुयोग याच काळात प्राप्त होई. आज दळणवळणाची साधने अत्याधुनिक आहेत. तरीही, श्रावकगण चातुर्मासामध्ये जसा वेळ मिळेल तसे आपल्या वैयावृत्याचे पालन करताना दिसतात. पायी चालणाऱ्या मुनींसाठी मात्र आजही

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मार्गात नद्या आडव्या येतात. जीवजंतु आहेत आणि पथावर त्याच जुन्या अडचणीही आहेत. श्रावक उडू शकतो (विमानप्रवास), पोहू शकतो किंवा मग वाफेवर चालणाऱ्या आगगाड्यांची, बाष्पयानांची मदत घेऊन पूर्वीपेक्षाही सहजतेने येऊजाऊ शकतो.

आता शास्त्रोक्त-विधिपूर्वक वर्षायोग ग्रहण करण्याच्या व त्याच्या विसर्जनाच्या प्रक्रियेचे निरूपण केले जात आहे - ते खालीलप्रमाणे :

वर्षायोगाच्या प्रतिष्ठापनेदिवशी मध्यान्ह वेळी त्यागींनी निराकुल होऊन पवित्र स्थानी अत्यंत शुद्धिपूर्वक स्थित व्हावे. बृहद्भक्ती, सिद्धभक्ती, चैत्यभक्ती, पंचगुरुभक्ती आणि शांतिभक्तीचे पठण करावे. त्यानंतर, मध्यान्हवंदना करावी. तिला शास्त्राच्या परिभाषेत 'मंगलगोचरमध्यान्हं वंदना' असे म्हणतात. 'नंदीश्वरभक्ती'च्या ६४ व्या श्लोकात योगग्रहण व योगमोक्षण अशा दोन्ही वेळी 'मंगलगोचरवंदना' करण्यास सांगितले आहे. 'मंगलगोचर-मध्यान्हवन्दना योगयोजनोज्झनयो:।' त्यानंतर, बृहद् सिद्धयोगीभक्ती म्हणून प्रत्याख्यान ग्रहण करावे. त्यानंतर, बृहद-आचार्यभक्ती व शांतिभक्तीचे पठण करावे. ही क्रिया त्रयोदशीच्या दिवशी होते. या प्रक्रियेच्या दुसऱ्या दिवशी (आषाढ शुक्ल चतुर्दशीच्या पूर्वरात्रीला) सिद्धभक्ती, योगिभक्ती म्हणून चारही दिशांना प्रदक्षिणा घालावी म्हणजे प्रत्येक दिशेकडे तोंड करून लघुचैतन्यभक्तीचा पाठ म्हणावा. अशा प्रकारे चारही दिशांच्या चैत्यालयांची वंदना करावी. जी ज्येष्ठ मंडळी त्यावेळी तिथे उपस्थित असतील; त्यांनी योगतांदूळ-प्रक्षेपण करावे. असा परंपरेने आलेला व्यवहार आहे. पुनश्च पंचगुरूभक्ती व शांतिभक्तीचे पठण करून 'वर्षायोग' ग्रहण करावा. असा शास्त्रविधी आहे.[२]

वर्षायोगाची स्थापना करतेसमयी पुढील उच्चारण करावे.

'वर्षायोग प्रतिष्ठापन-क्रियायां सिद्धभक्तिकायोत्सर्गं करोम्यहम्।'

'णमो अरहंताणम्, णमो सिद्धाणम्, णमो आयरियाणम्, णमो उवज्झायाणम्

णमो लोए सव्व साहूणम्' आदी दंडक पाठ व कायोत्सर्गानंतर

'थोस्सामि' स्तवनपाठ म्हणून पुन्हा 'सिद्धानुद्धूतकर्मप्रकृतिसमुदायान्

साधितात्मस्वभावान्' सिद्धभक्ती वाचावी.

सिद्धभक्तीनंतर योगभक्ती वाचावी. त्याआधी, 'वर्षायोग-प्रतिष्ठापन क्रियायां

---

२. लात्वा बृहत् सिद्धयोगिस्तुत्या मंगलगोचरे। प्रत्याख्यानं बृहत्सूरिशान्तिभक्तीः प्रयुंजताम्।।
ततश्चतुर्दशीपूर्वरात्रौ सिद्धमुनिस्तुती। चतुर्दिक्षु परीत्याल्पाश्चैत्यभक्तिं गुरुस्तुतिम्।।
शान्तिभक्तिं च कुर्वाणैर्वर्षायोगस्तु गृह्यताम्। ऊर्जकृष्ण चतुर्दश्यां पश्चाद् रात्रौ च मुच्यताम्।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

योगभक्ति-कार्योत्सर्गं करोम्यहम्।' त्याचप्रमाणे, जसाच्या तसा 'णमो अरहंताणम्' इत्यादी दंडकपाठ म्हणावा. योगभक्तीसाठी 'जातिजरोरूरोगमरणातुर शोकसहस्त्र-दीपिता:।' इत्यादीचे उच्चारण करावे.

या सगळ्यानंतर क्रमाप्रमाणे पूर्वादी दिशांकडे मुख करून किंवा त्या दिशांना मन:चक्षूंसमोर आणून सर्व दिशांत विद्यमान असलेल्या चैत्यालयांची वंदना करावी. प्रत्येक दिशेला स्थित चैत्यालयाला नमस्कार करण्यासाठी पहिला श्लोक पाठ असा म्हणावा.

'यावन्ति जिनचैत्यानि विद्यन्ते भुवनत्रये ।
तावन्ति सततं भक्त्या त्रि:परीत्य नमाम्यहम् ।।'

यानंतर, पूर्वेकडे तोंड करून पठणास खालीलप्रमाणे प्रारंभ करावा-

'स्वयम्भुवा भूतहितेन भूतले समञ्जसज्ञानविभूतिचक्षुषा ।
विराजितं येन विधुन्वता तमः क्षपाकरेणेव गुणोत्करैः करैः ।।
प्रजापतिर्यः प्रथमं जिजीविषुः शशास कृष्यादिषु कर्मसु प्रजाः ।
प्रबुद्धतत्वः पुनरद्भुतोदयो ममत्वतो निर्विविदे विदांवरः ।।
विहाय यः सागरवारिवाससं वधूमिवेमां वसुधावधूं सतीम् ।
मुमुक्षुरिक्ष्वाकुकुलादिरात्मवान् प्रभुः प्रवव्राज सहिष्णुरच्युतः ।
स्वदोषमूलं स्वसमाधितेजसा निनाय यो निर्दयभस्मसात् क्रियाम् ।
जगाद तत्वं जगतेऽर्थिनेञ्जसा बभूव च ब्रह्मपदामृतेश्वरः ।।
स विश्वचक्षुर्वृषभोऽर्चितः सतां समग्रविद्यात्मवपुर्निरञ्जनः।
पुनातु चेतो मम नाभिनन्दनो जिनो जितक्षुल्लकवादिशासनः ।। १-५
इति श्रीवृषभजिनस्तवनं पठित्वा श्री अजितजिनस्तवनं पूर्वाभिमुख एव पठेत्-

यस्त्र प्रभावात् त्रिदिवच्युतस्य क्रीडास्वपि क्षीबमुखारविन्दः ।
अजेयशक्तिर्भुवि बन्धुवर्गश्चकार नामाऽजित इत्यवन्ध्यम् ।।
अद्यापि यस्याजितशासनस्य सतशां प्रणेतुः प्रतिमङ्गलार्थम् ।
प्रगृह्यते नाम परं पवित्रं स्वसिद्धिकामेन जनेन लोके ।।
यः प्रादुरासीत् प्रभुशक्तिभूम्ना भव्याशयालीनकलंकशान्त्यै ।
महामुनिर्मुक्तघनोपदेहो यथारविन्दाभ्युदया भास्वान् ।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

येन प्रणीतं पृथु धर्मतीर्थं ज्येष्ठं जनाः प्राप्य जयन्ति दुःखम् ।
गांगं ह्रदं चन्दनपङ्कीशीतं गजप्रवेशा इव घर्मतप्ताः ।।
स ब्रह्मनिष्ठः सममित्रशत्रुर्विद्या-विनिर्वान्तकषायदोषः ।
लब्धात्मलक्ष्मीरजितोऽजितात्मा जिनश्रियं मे भगवान् विधत्ताम् ।। १-५

अथ वर्षायोगप्रतिष्ठापनक्रियायां चैत्यभक्तिकायोत्सर्गं करोम्यहम्। त्यापुढे, 'णमो अरहंताणमित्यादी' दंडक पाठ पूर्ण केल्यावर खालील पाठ वाचावा.

वर्षेषु वर्षान्तरपर्वतेषु नन्दीश्वरे यानिं च मन्दिरेषु ।
यावन्ति चैत्यायतनानि लोके सर्वाणि वन्दे जिन पुंगवानाम् ।।१।।

अवनितलगतानां कृत्रिमाकृत्रिमाणां
वनभवनगतानां दिव्यवैमानिकानाम् ।
इह मनुजकृतानां देवराजार्चितानां
जिनवरनिलयानां भावतोऽहं स्मरामि ।।२।।

जम्बूधातकिपुष्करार्धवसुधाक्षेत्रत्रये ये भवा-
श्चन्द्राम्भोजशिखण्डिकण्ठकनक-प्रावृड्घनाभा जिनाः ।
सम्यग्ज्ञानचरित्रलक्षणधरा दग्धाष्टकर्मेन्धना
भूतानागतवर्तमानसमये तेभ्यो निजेभ्यो नमः ।।३।।
श्रीमन्मेरौ कुलाद्रौ रजतगिरिवरे शाल्मलौ जम्बुवृक्षे
वक्षारे चैत्यवृक्षे रतिकररुचके कुण्डले मानुषाङ्के ।
इष्वाकारेऽञ्जनाद्रौ दधिमुख-शिखरे व्यंतरे स्वर्गलोके
ज्योतिर्लोकेऽभिवन्दे भुवनमहितले यानि चैत्यालयानि ।।४।।

द्वौ कुन्देन्दुतुषारहारधवलौ द्वाविन्द्रनीलप्रभौ
द्वौ बन्धूकसमप्रभौ जिनवृषौ द्वौ च प्रियंगुप्रभौ।
शेषाः षोडशजन्ममृत्युरहिताः सन्तप्तहेमप्रभा-
स्ते सज्ज्ञानदिवाकराः सुरनुताः सिद्धिं प्रयच्छन्तु नः ।।५।।
अञ्चलिका-इच्छामि भन्ते! चेइयभत्ति काओसग्गो कओ तस्सा लोचेउं अहलोय-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तिरिलोय-उड्ढलोयम्मि किट्टिमाकिट्टिमाणि जाणि जिणचेइयाणि ताणि सव्वाणि तीसुवि लोएसु भवणवासिय वाण विंतर - जोइसिय-कप्पवासियत्ति चउविहा देवा सपरिवारा दिव्वेण गंधेण दिव्वेण पुप्फेण दिव्वेण धूवेण दिव्वेण चुण्णेण दिव्वेण वासेण दिव्वेण ण्हाणेण णिच्चकालं अंचंति पुज्जंति वंदंति णमंस्संतिं अहमवि इह संतो तत्थ संताइं णिच्चकालं अंचेमि पूजेमि वंदामि णमस्सामि दुक्खक्खओ कम्मक्खओ वोहिलाहो सुगइ-गमणं समाहिमरणं जिणगुण संपत्ति होउ मज्झं। इतिपूर्वदिग्वन्दना ।

ततो दक्षिणसुखस्तद्दिश्य-चैत्यालयवन्दनमधस्तनप्रार्थनाश्लोकैः समाचरेत्-

यावन्ति जिनचैत्यानि विद्यते भुवनत्रये ।
तावन्ति सततं भक्त्या त्रिःपरीत्य नमाम्यहम् ।।१।।

त्वं शम्भवः सम्भवतर्ष-रौगैः सन्तप्यमानस्य जनस्य लोके ।
आसीदिहाकस्मिक एव वैद्यो वैद्यो यथा नाथ । रुजां प्रशान्त्यै ।।१।।
अनित्यमत्राणमहं क्रियाभिः प्रसक्त-मिथ्याध्यवसायदोषम् ।
इदं जगज्जन्मजरान्तकार्तं निरञ्जनां शान्तिमजीगमस्त्वम् ।।२।।
शतह्लदोन्मेषचलं हि सौख्यं तृष्णाऽमयाप्यायनमात्रहेतुः ।
तृष्णाभिवृद्धिश्च तपत्यजस्रं तापस्तदायासयतीत्यवादीः ।।३।।
बन्धश्च मोक्षश्च तयोश्च हेतुर्बद्धश्च मुक्तश्च फलं च मुक्तेः ।
स्याद्वादिनो नाथ! तवैव युक्तं नैकान्तदृष्टेस्त्वमतोऽसि शास्ता ।।४।।
शक्रोऽप्यसक्तस्तव पुण्यकीर्तेः स्तुत्यां प्रवृत्तः किमु मादृशोऽज्ञः ।
तथापि भक्त्या स्तुतपादपद्मो ममार्य ! देयाः शिवतातिरुच्चैः ।।५।।

इति सम्भवजिनस्तोत्रं पठित्वाऽ भिनन्दनजिनस्तोत्रं दक्षिणमुख एव पठितमुपक्रमेत्। यथा हि-

गुणाभिनन्दभिनन्दनो भवान् दयावधूं क्षान्तिसखीमशिश्रियत् ।
समाधितन्त्रस्तदुपोपत्तये द्वयेन नैर्ग्रन्थ्यगुणेन चायुजत् ।।१।।
अचेतने तत्कृतबन्धनेऽपि च ममेदमित्याभिनिवेशिकग्रहात् ।
प्रभंगुरे स्थावरनिश्चयेन च क्षतं जगत्तत्वमजिग्रहद् भवान् ।।२।।
क्षुधादिदुःखप्रतिकारतः स्थितिर्न चेन्द्रियार्थप्रभवाल्पसौख्यतः ।
ततो गुणो नास्ति च देहदेहिनोरितीदमित्थं भगवान् व्यजिज्ञपत् ।।३।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जनोऽ तिलोलोऽप्यनुबन्धदोषतो भयादकार्येष्विह न प्रवर्तते ।
इहाप्यमुत्राप्यनुबन्धदोषवित् कथं सुखे संसजतीति चाब्रवीत् ।।४।।
स चानुबन्धोऽस्य जनस्य तापकृत् तृषोऽभिवृद्धिः सुखतो न च स्थितिः ।
इति प्रभो! लोकहितं यतो मतं ततो भवानेव गतिः सतां मतः ।।५।।

एतदनन्तरं वर्षायोगप्रतिष्ठापनक्रियायां चैत्यभक्तिकायोत्सर्गं करोम्यहमित्यादि पूर्ववत् दण्डकादि सम्पाद्य कार्योत्सर्गं कुर्यात् 'थोस्सामि हं जिणवरे तित्थयरे केवलि अणंतजिणे' स्तवपाठं च विदधीत। ततःपश्चाद् 'वर्षेषु वर्षान्तरपर्वतेषु' प्रभृति पूर्ववत् आवर्तयेत् । तदनु पश्चिमदिगभिमुखो मनसि वा पश्चिमाशां कल्पमानोऽध-स्तवनवन्दनादिपाठं पठेत्-

यावन्ति जिनचैत्यानि विद्यन्ते भुवनत्रये ।
तावन्ति सततं भक्त्या त्रिःपरीत्य नमाम्यहम् ।।१।।
अन्वर्यसंज्ञः सुमतिर्मुनिस्त्वं स्वयं मतं येन सुयुक्तिनीतम् ।
यतश्च शेषेषु मतेषु नास्ति सर्वक्रियाकारकतत्वसिद्धिः ।।१।।
अनेकमेकं च तदेव तत्वं भेदान्वयज्ञानमिदं हि सत्यम् ।
मषोपचारोऽन्यतरस्य लोपे तच्छेषलोपोऽपि ततोऽनुपाख्यम् ।।२।।
सतः कथञ्चित्तदसत्वशक्तिः खे नास्ति पुष्पं तरुषु प्रसिद्धम् ।
सर्वस्वभावच्युतमप्रमाणं स्ववाग्-विरुद्धं तव दृष्टितोऽन्यत् ।।३।।
न सर्वथा नित्यमुदेत्यपैति न च क्रियाकारकमंत्र युक्तम् ।
नेवासतो जन्म सतो न नाशो; दीपस्तमः पुद्गलभावतोऽस्ति ।।४।।
विधिनिषेधश्च कथंचिदिष्टौ विवक्षया मुख्यगुणव्यवस्था ।
इति प्रणीतिः सुमतेस्तवेयं मति-प्रवेकः स्तुवतोऽस्तुनाथ ।।५।।

इत्थं 'सुमतिजिनस्तोत्र'मधीत्य श्री पद्मप्रभजिनस्तोत्रमस्ताशाभिमुख एवोच्चरेत्। यथा हि-

पद्मप्रभः पद्मपलाशलेश्यः पद्मालयालिङ्गितचारुमूर्तिः।
बभौ भवान् भव्यपयोरुहाणां पद्माकराणामिव पद्मबन्धुः ।।११।।
बभार पद्मां च सरस्वतीं च भवान् पुरस्तात् प्रतिमुक्तिलक्ष्म्याः ।
सरस्वतीमेव समग्रशोभां सर्वज्ञलक्ष्मीज्वलितां विमुक्तः ।।२।।
शरीररश्मिप्रसरः प्रभोस्ते बालार्करश्मिच्छविरालिलेप ।
नराऽमराऽकीर्णसभां प्रभा वा शैलस्य पद्माभमणेः स्वसानुम् ।।३।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नभस्तलं पल्लवयन्निव त्वं सहस्रपत्राम्बुजगर्भचारैः ।
पादाम्बुजैः पातितमारदर्पो भूमौ प्रजानां विजहर्थ भूत्यै ।।४।।
गुणाम्बुधेर्विप्रुषमप्यजस्य नाखण्डलः स्तोतुमलं तवर्षेः ।
प्रागेवमादृक्किमुतातिभक्तिर्मां बालमालापयतीदमित्थम् ।।५।।

अतः पश्चात् पूर्ववत् 'वर्षायोगप्रतिष्ठापनक्रियाया' मित्याद्यारभ्य समग्रमुच्चारयेत्।

उत्तरदिक्चैत्यवन्दनां च कुर्वीत । यथा हि-
यावन्ति जिनचैत्यानि विद्यन्ते भुवनत्रये ।
तावन्ति सततं भक्त्या त्रिःपरीत्य नमाम्यहम् ।।१।।
स्वास्थ्यं यदात्यन्तिकमेष पुंसां स्वार्थो न भोगः परिभंगुरात्मा ।
तृषोऽनुषंगान्न च तापशान्तिरितीदमाख्यद् भगवान् सुपार्श्वः ।।१।।
अजंगमं जंगमनेय-यंत्रं यथा तथा जीवधृतं शरीरम् ।
बीभत्सु पूति क्षयि तापकं च स्नेहो वृथाऽत्रेति हितं त्वमाख्यः ।।२।।
अलंघ्यशक्तिर्भवितव्यतेयं हेतुद्वयाविष्कृतकार्यलिङ्गता ।
अनीश्वरो जन्तुरहंक्रियार्तः संहत्य कार्येष्विति साध्ववादीः ।।३।।
बिभेमि मृत्योर्न ततोऽस्ति मोक्षो नित्यं शिवं वाञ्छति नास्य लाभः ।
तथापि बालो भयकामवश्यो वृथा स्वयं तप्यत इत्यवादीः ।।४।।
सर्वस्य तत्वस्य भवान् प्रमाता मातेव बालस्य हितानुशास्ता ।
गुणावलोकस्य जनस्य नेता मयाऽपि भक्त्या परिणूयऽतेद्य ।।५।।

इति सुपार्श्वजिनस्तुतिं विधाय श्रीचन्द्रप्रभजिनं स्तुवीत-
चन्द्रप्रभं चन्द्रमरीचिगौरं चन्द्रं द्वितीयं जगतीव कान्तम् ।
वन्देभिऽवन्द्यं महतामृषीन्द्रं जिनं जितस्वान्तकषायबन्धम् ।।११।।
यस्यांगलक्ष्मीपरिवेषभिन्नं तमस्तमोऽरेरिव रश्मिभिन्नम् ।
ननाश बाह्यं बहु मानसं च ध्यानप्रदीपातिशयेन भिन्नम् ।।२।।
स्वपक्षसौस्थित्यमदावलिप्ता वाक्सिंहनादैर्विमदा बभुवुः ।
प्रवादिनो यस्य मदार्द्रगण्डा गजा यथा केसरिणो निनादैः ।।३।।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

यः सर्वलोके परमेष्ठितायाः पदं बभूवाद्भुतकर्मतेजाः ।
अनन्तधामाऽक्षर-विश्वचक्षुः समन्तदुःखक्षय-शासनश्च ।।४।।
स चन्द्रमा भव्यकुमुद्वतीनां विपन्नदोषाऽभ्रकलंकलेपः
व्याकोशवाङ्न्यायमयूखमालः पूयात् पवित्रों भगवान् मनो में ।।५।।

इति श्रीचंद्रप्रभजिनस्तवनं पठित्वा 'अथ वर्षायोगप्रतिष्ठापन-क्रियायां चैत्यभक्तिकार्योत्सर्गं करोम्यंहम्' इत्याद्युच्चार्य पूर्ववद् दण्डकादि विधाय 'वर्षेषु वर्षान्तरे' त्यादि भक्तिं अधीयीत। इति चतुर्दिग्वन्दनम् ।

अथ वर्षायोगप्रतिष्ठापनक्रियायां पंचगुरुभक्तिकार्योत्सर्गं करोम्यहम् । पूर्ववद् दण्डकादिविधिं समाप्य 'श्रीमदमरेन्द्रमुकुटप्रघटितमणि-किरणवारिधाराभिः' इत्यादि पंचगुरुभक्तिं पठेत्। पुनः 'वर्षायोगप्रतिष्ठापने'त्यादि पठित्वा शान्तिभक्तिकायोत्सर्गविधिं निवर्तयेत्। पश्चात् पुनरपि दण्डकं कृत्वा 'न स्नेहाच्छरणं प्रयान्ति' इत्यादि शान्ति-भक्तिं सर्वदोषविशुद्धायर्थ समाधिभक्तिं च पठेत् । एष वर्षायोगप्रतिष्ठापन- विधिः।

वर्षायोगाची सांगता करतानाही याच विधीचे पालन करावे. समाप्तीच्या वेळी 'अथ वर्षायोगनिष्ठापनक्रियायां' वाचावे.

वर्षायोगाशिवाय विशेष ज्ञानी असणाऱ्या मुनींना इतर नगरात प्रदीर्घ काळापर्यंत राहता येत नाही. पण, धर्मप्रभावनेसाठी आवश्यक वाटल्यास ते एक महिन्यापर्यंत राहू शकतात. तीर्थक्षेत्री ते जास्त काळापर्यंत धर्मध्यानासाठी राहू शकतात. जेथे वर्षायोग स्थापित करायचा आहे; त्या ठिकाणी आषाढ महिन्यातच त्यांनी पोहोचणे योग्य आहे. जर काही कारणामुळे ते आषाढ महिन्यात पोहोचू शकले नाहीत तर श्रावण कृष्ण चतुर्थीपर्यंत पोहोचणे अत्यंत आवश्यक आहे. कार्तिक कृष्ण एकादशीला जरी वर्षायोग-चातुर्मास संपत असला तरी कार्तिक शुक्ल पंचमीच्या आधी ते ठिकाण त्यांनी सोडू नये. जर निवारण न करता येण्याजोगे उपसर्ग झाले आणि ते स्थान अगदी सोडावेच लागले तर प्रायश्चित घेतले पाहिजे. 'वर्षायोगा'च्या स्थानापासून १२ योजने (४८ कोस) अंतरापर्यंत एखाद्या साधूच्या समाधिमरणाचा प्रसंग आला तर तेवढे दूरपर्यंत ते जाऊ शकतात.

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सल्लेखना

या जगात जन्मदिन-जयंती साजरी करण्याची प्रथा आहे. काशाची ताटे वाजवून नव्याने जन्मलेल्या बाळाचे स्वागत केले जाते आणि मग दरवर्षी त्याचा जन्मोत्सव/वाढदिवस समारंभही आयोजित केला जातो. कारण हेच की सर्वच जण जीवनावर प्रेम करतात. प्रत्येक प्राणी जास्तीतजास्त जगू इच्छितो. 'शतं जीवं' असे म्हणत वृद्ध मंडळी आशीर्वाद देतात. सामान्य रोग झाला की, लगेच त्यावर उपचार केले जातात. जास्त काय सांगावे, जगात जेवढे म्हणून व्यापार चालतात; ते जगण्यासाठीच चाललेले असतात. औषधांचे, रसांचे-रसायनांचे (अर्कांचे) सेवन जीवनासाठीच असते. आमोद-प्रमोदाची साधनेही जीवनाला सुखमय बनवण्यासाठी आहेत. नगर, गल्ली, बाजार व घर जीवनाच्या संचाराची ठिकाणे आहेत. मनोरंजनाची, प्रसाधनाची आणि उपभोगाची विविध व अनेक उपादानेही जीवनासाठीच आहेत. जिवंत व्यक्ती आपल्या विलासासाठी अनेकविध सुखसोयींनी युक्त अशा वस्तू शोधून काढतो आणि त्या सुखविलासातच रममाण होतो.

जीवनात मृत्यू अटळ आहे. तो जीवनाचा अंतिम परिणाम आहे, हे जाणूनसुद्धा त्यापासून दूर राहण्याचे प्रयत्न करतो. त्या प्रयत्नाद्वारे मनाला मिथ्या आश्वासने देत राहतो की, 'मी कधी मरणारच नाही.' परंतु, उमललेले फूल आणि पिकलेले फळ झाडाच्या फांदीवर फार काळ टिकून राहत नाही. सूर्यालासुद्धा अस्तंगत व्हावेच लागते. चंद्राला अमावस्येच्या कालमुखात विलीन व्हावेच लागते. जन्म आणि मृत्युरूपी कालचक्रापासून वाचणेही अशक्यच आहे. 'जातस्य हि ध्रुवो मृत्युः'-जे उत्पन्न होते. त्याचा मृत्यू निश्चित आहे. मृत्यूच्या कचाट्यातून सुटण्यासाठी कुठलाच धनिक भारी लाच देऊ शकला नाही. हातात दंड धारण करणाऱ्या यमराजाचा निर्णय अटळ आहे. त्याबद्दल कबीराने म्हटले आहे-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

"माली आवत देख करि कलियाँ करी पुकार ।
फूले-फूले चुन लिये काल्हि हमारी बार ।।"

आयुकर्म संपले की, एक क्षणसुद्धा जिवंत राहणे अशक्य आहे. अर्धा श्वासही मिळू शकत नाही. कुठलेच औषध, कितीही पैसा त्या बदल्यात घेतला जात नाही. निसर्गाच्या या नियमानेच तर श्रीमंत, शूरवीर, सम्राट आणि सामान्यजन, विशेष व्यक्ती या सर्वांचे गर्वहरण केले आहे. "आसपास जोधा खडे, बहुरि बजावें गाल । मंझ महल से ले चला ऐसा काल कराल ।" एका मोठ्या राजाचा मृत्यू जवळ आला होता. मोठमोठे पराक्रमी योद्धे, चिकित्सक बढाया मारीत होते. आपली स्वामिभक्ती दर्शवत योद्धे म्हणत होते- 'आम्ही इथे हजर असताना काय बिशाद आहे काळाची राजाला घेऊन जाण्याची?' तर चिकित्सक म्हणत होते, 'महाराज, ही संजीवनी आहे.' परंतु, काही उपयोग नाही. बघताबघता यमाने राजाचे प्राण हरण केले. काळाबरोबर कोणीही लढू शकत नाही. उलट, एकटा काळच अनादिकाळापासून संपूर्ण जीवमात्रांबरोबर लढत आहे. काळाला पराभूत करण्यासाठी जेवढे म्हणून प्रयत्न झाले; ते सगळे व्यर्थ ठरले. काळाच्या या अजिंक्य सत्तेचे वर्णन श्रीरामचंद्राच्या राज्याभिषेक प्रकरणात करतेवेळी भर्तृहरीने म्हटले आहे- 'जे हमखास शक्य होईल असे वाटत होते, ते दूर जात आहे आणि ज्याची कल्पनाही केली नव्हती ते जवळ येत आहे. सकाळी मी चक्रवर्ती राजा होणार होतो; परंतु आता जटा बांधून अरण्यात निघालो आहे.[१] काळाचा हा कटाक्ष किती विलक्षण किती क्रूर आहे! खरे आहे, काळ अघटितलाही घडवतो आणि उत्तम तऱ्हेने जे नक्कीच घडू शकेल ते जर्जर करून टाकतो. ज्या गोष्टीची माणूस कल्पनाही करू शकत नाही; ती काळ प्रत्यक्षात करून दाखवतो. अहो! 'बडा बिकट यमघाट...' यमाचा घाट मोठा कठीण आहे.

येथे सर्वांनाच यावे लागते. आयुष्य संपले की, काळ (मृत्यू) अगदी तेथे येऊन पोहोचतोच. 'रज्जुच्छेदे कः घटं धारयति?' बांधलेल्या घागरीचा दोर विहिरीत सोडल्यावर मध्येच तुटला तर त्या घागरीस कोण थांबवू शकणार आहे? मृत्युपंथाला लागलेल्या माणसाच्या श्वासाची दोरी यमराज तटकन् तोडून टाकतो. जे जन्माच्या प्रसंगी काशाची ताटे किंवा वाजंत्री वाजवतात; त्यांना मृत्यूप्रसंगी वाजवण्यासाठी तेव्हा कुठलेच वाद्य मिळत नाही.

---

१. 'यच्चिन्तितं तदिह दूरतरं प्रयाति यच्चेतसापि न कृतं । तदिहाभ्युपैति ।
प्रातर्भवामि वसुधाधिपचक्रवर्ती सोऽहंव्रजामि विपिने जटिलस्तपस्वी ।।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मृत्यूच्या केवळ कल्पनेनेही भयभीत होणारे समोर मृत्यू उभा ठाकला की, खूप व्याकूळ होऊन जातात. मरायच्या आधीच मरून जातात आणि छाती पिटतपिटत रडू लागतात. या संसारातल्या सुखद आठवणी त्यांना बेचैन करून सोडतात. हाय, मी काही दिवस आणखी जगू शकलो तर!' हा विचार त्याची पाठ काही केल्या सोडत नाही. मृत्युशय्येशेजारी उभ्या असलेल्या नातेवाइकात, आप्तस्वकीयांत त्याचे मन काटेरी झुडुपांत पक्के अडकून बसलेल्या पदरात अडकून राहते. तो मनाशी म्हणतो- डॉक्टरचे इंजेक्शन, वैद्यराजाचे औषध मला रोगमुक्त करेल. परंतु, या लोकातील जन्ममरणाचा निश्चित क्रम लक्षात घेऊन त्याचा अंतरात्मा त्याला म्हणतो, 'मूर्ख! का स्वतःला फसवतोस? हे वैद्य, हे डॉक्टर काय करतील? भिऊन कोणी मृत्यु टाळू शकला आहे काय? मृत्युपासून स्वतःला वाचवण्याचा एकच मार्ग आहे; तो जन्मच होऊ न देणे. जन्मच जर झाला नाही; तर मग मरण कोणाला येणार?[२]

नित्य मरणारे व जन्म घेणारे संसारी लोक विचार करतात की, खरेच जन्ममरण आपल्या हातात आहे? या विचाराने ते अचंबित होतात. अध्यात्मशास्त्र म्हणते की, 'हो! जन्म न घेणे आपल्या हातात आहे.' या पुन्हा जन्म न घेण्याविषयीचे (अपुनर्भवाचे) निरूपण संपूर्ण जैनशास्त्र भरभरून करते. हे शास्त्र आत्मदर्शनाद्वारे संसाराच्या अस्थिर भोगांच्या त्यागाची शिकवण देते. शाश्वत परमात्मपदाचा मार्ग दाखवते. त्या मार्गाचा अवलंब केला तर प्राणी मृत्यूवर मात करून मोक्षगामी बनतो. व्याकरणशास्त्रात मृत्यूचा अर्थ प्राणांचा त्याग असा आहे; तर मोक्षाचा अर्थ आहे मुक्ती! 'प्राणत्याग' या शब्दातून शरीरापासून प्राण वेगळे होणे असा अर्थ ध्वनित होतो तर 'मुक्ती' शब्दातून सुटका हा आशय व्यक्त होतो. म्हणून प्राणवियोग वाचक मृत्युचा परिणाम पुनर्जन्म व पुनर्जन्माचा अंत म्हणजे पुनर्मृत्यू होय. मोक्षप्राप्तीच्या आधीपर्यंत पुनर्जन्माचे हे चक्र चालूच राहते. जिनेंद्र भगवंतांच्या वाणीनुसार सम्यक आचरण केले तर हे येणेजाणे थांबते. शरीररूपाने तो मग त्याचा शेवटचा मृत्यू असतो आणि मग त्याला मृत्यू न म्हणता मुक्ती म्हणणेच श्रेयस्कर आहे.

'मी शरीर नाही, मी आत्मा आहे' हे तत्त्वार्थसंधानाने जाणून कर्मांचा क्षय करून जो समाधिमरण स्वीकारतो; तो जन्ममृत्यूच्या बंधनातून मुक्त होतो. यमराजाच्या मृत्युपाशाला

---

२. 'मृत्योर्बिभेषि किं मूढ़! न स भीतं विमुंचति ।
अजातं नेव गृह्णाति कुरु यत्नमजन्मनि ।।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

तोच तोडू शकतो. या समाधिमरणालाच आगमाच्या भाषेत 'सल्लेखना' म्हणतात. भावसंग्रहात लिहिलेले आहे की, जेव्हा शरीररूप परपदार्थाचा त्याग करण्याची इच्छा ठेवून जीव आत्मनिष्ठ होतो; मित्र, पत्नी, मुले, धन-वैभव, भौतिक सुखाचा मोह सोडून पंचपद (णमोकार) स्मरण करीत मरणव्रत धारण करतो, त्यास महामुनींनी 'सल्लेखना' म्हटले आहे.[३]

'स्वेच्छामृत्यू' असे दुसरेही नाव आपण सल्लेखनेस देऊ शकतो. जेव्हा वीतरागतेचा चरम उदय होतो आणि शरीररूप परपदार्थसुद्धा बंधनासारखा वाटू लागतो; तेव्हा निर्ग्रंथ मुनी व त्यागीजन 'सल्लेखना' घेऊन संसाराच्या बंधनांना कायमचे तोडून टाकतात. एका मराठी कवीने म्हटले आहे-

'आपुले मरण पाहिले म्यां डोळा
तो जाहला सोहळा अनुपम।'

अहो! मी माझ्या डोळ्यांनी आपला मृत्यू पाहिला आणि तो खरेच एक अनुपम सोहळा होता. असे मृत्यूला कवेत घेणारे मोक्षगामी मरतानासुद्धा वाद्ये वाजवावीत, अशा महोत्सवाचे वातावरण निर्माण करतात. जन्माच्या वेळी जी वाद्ये वाजवली जातात; त्यांचा ध्वनी हा वाजवणाऱ्यांच्या प्रसन्नतेचे प्रतीक असते. परंतु, समाधिमरण घेणारा तर आपल्या ऐहिक त्यागाच्या व तपोमय जीवनाच्या संध्यासमयी आपल्या आचरणाद्वारे एवढी पवित्र, लोकमंगलकारण कृती सर्वांसमोर ठेवतो की, वाद्यांच्या आवाजाचे सार्थक होऊन जाते.

आपल्या मृत्यूला आमंत्रित करणे, त्याला बघू शकणे ही एक असामान्य गोष्ट आहे. लोक फक्त जीवनाकडेच बघतात. आपल्यावर मांजर झडप घालणार आहे, हे दिसू नये म्हणून कबूतर डोळे झाकून घेते. त्याप्रमाणे लोकही मृत्यूकडे डोळेझाक करतात; पण डोळे झाकून घेणाऱ्या कबुतरास मांजर सोडते काय? किंवा मृत्यूला विसरू पाहणाऱ्यांना यमराज थोडेच विसरतो? म्हणूनच, महावीराचे सेवक मृत्यूला वीरतेने आव्हान देतात. व्वा! त्यांना मरणाचे कोणतेच भय नसते. उलट, स्वतः मृत्यूच त्यांना स्पर्श करताना भयभीत होतो. संसारी जीवांना मृत्यू भलेही त्रस्त करीत असेल; परंतु श्रमण मुनींना मात्र मृत्यूमध्येच आपली जीवनभराची तपस्या, त्याग फलीभूत होताना दिसते.

---

३. 'मित्रे कलत्रे विभवे तनूजे सौख्ये गृहे यत्र विहाय मोहम् ।
संस्मर्यते पंचपदे स्वचित्ते सल्लेखना साऽभिहिता मुनीन्द्रैः' - भावसंग्रह

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सल्लेखना म्हणजे वीतरागतेची कसोटी! ती मुनिधर्माची सिंहवृत्ती आहे. दुर्बलांना हा मार्ग पार करणे शक्य नाही. ज्यांनी मदनाचे गर्वहरण केले, परिग्रहाच्या विविधरंगी प्रलोभनांना पायांनी तुडवले, अब्रह्मास जन्मभर आव्हान दिले आणि हाताच्या ओंजळीत भिक्षा घेऊन आत्मचिंतनास सर्वश्रेष्ठ मानले; तेच अनासक्ती योगाचे पालन करतात आणि समाधिमरणाचे व्रत घेतात. विषयलंपट, इंद्रियाचे दास असलेले व परिग्रहाला परलोकापर्यंत बरोबर घेऊन जाण्याची कल्पना करणारे तर फुलांच्या मारानेही कोमेजून जातात. संसाराची असारता व नाशवंतपणा यांचे पं. दौलतरामजी यांनी अत्यंत कसदार आणि सरळ-सोप्या शब्दांत वर्णन केले आहे. ते म्हणतात-

'सुर, असुर, खगाधिप जेते मृग ज्यों, हरि काल दलेते । मणि, मंत्र, तंत्र बहु होई मरते न बचावे कोई ।'

श्रमण मुनी नेहमीच ही अशरण भावना मनात जागी ठेवतात. जोपर्यंत त्यांचे धर्मध्यान, गुणांचे पालन, महाव्रतांचे संरक्षण निर्विघ्नपणे होते; तोपर्यंत ते मुनिव्रताचे पालन करीत राहतात आणि त्यांना ज्या क्षणी प्रतीत होते की, आपल्या शरीराला आता रोगांनी ग्रासले आहे; त्या वेळी ते सल्लेखना घेऊन देहत्याग करतात. आचार्य समंतभद्रांचे वचन आहे- उपसर्ग झाल्यावर, दुष्काळ पडला असता, वृद्धावस्थेत, प्रतिकार करता येणार नाही अशी रोग-अवस्था यामध्ये धर्माचे रक्षण करीत शरीराचा त्याग करण्यास आर्यांनी 'सल्लेखना' नाव दिले आहे.[४]

'सल्लेखने'च्या आध्यात्मिक स्वरूपाला जे जाणत नाहीत; ते 'आत्महत्या' या निकृष्ट अपशब्दात तिची संभावना करतात. असे मानण्यात त्या आत्मवंचितांचा दोष नाही. त्यांच्या स्थूल जीवनदर्शनाचाच तो दोष मानावा लागेल.

आत्मवादींचे जीवनदर्शन तपोमय आहे आणि व्रत, उपवास, संयम-नियम त्याची प्रमुख अंगे आहेत.

परंतु, या जगात केवळ आहार-विहारासाठीच जे जगत आहेत; त्यांच्या दृष्टीने नश्वर उपादानांविषयी आत्यंतिक प्रेम/मोह ठेवणे, हेच प्रशंसनीय आहे. नखाग्राला मार लागला तरी ते विव्हळतात आणि छोटी-मोठी दुर्घटना घडली तर लगेच त्यांच्या नातेवाइकांपर्यंत ती तार-टेलिफोनद्वारे पोहोचते. त्यांचा संसार म्हणजे एक भयस्थानच आहे. भयकारक

४. 'उपसर्गे दुर्भिक्षे जरसि रुजायां च निष्प्रतीकारे ।
धर्माय तनुविमोचनमाहुः सल्लेखनामार्याः ।।' - आ. समंतभद्र

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असे शेकडो प्रसंग दिवसभरात त्यांच्या जीवनात उद्भवतात व तेवढेच शोकप्रसंगही! परंतु, तत्त्वाप्रमाणे चालणारा विवेकी मनुष्य या सगळ्यांच्या पलीकडचा असतो. सात प्रकारच्या भयाने रहित असल्यामुळे त्यांना सम्यग्दृष्टी म्हटले जाते. इहलोक, परलोक, आकस्मिक अनुरक्षा, अचानक असुरक्षितता, वेदना, मरण आणि अगुप्ती असे सात प्रकारचे भय माणसाच्या मागे लागलेले असते. सर्वात मोठे भय मरणाचेच आहे. म्हणूनच, जो त्यागी शरीराचा त्याग करू इच्छितो, त्याचे उदात्त व आत्मिक मर्म मृत्यूला घाबरणाऱ्या सामान्य लोकांना समजण्यापलीकडचे आहे, ते मर्म सर्वसाधारण लोक समजून घेऊच शकत नाहीत.

एकाच जागी खुंटे गाडून तंबू ठोकण्याची सवय भटक्या लोकांना नसते. कारण, जमिनीत ठोकलेले खुंट देशस्थिती बंधाचा मोह उत्पन्न करतात. एखादी धर्मशाळा सोडणाऱ्या यात्रेकरूला, फांदीवरून दुसरीकडे उडणाऱ्या चिमणीला, पानगळीच्या मोसमात झाडावरून गळून पडणाऱ्या पानांना वियोगाचा अनुभव होत नाही. सूर्याला पूर्व-पश्चिम दिशेबद्दल कोणतीच राग-विरागाची भावना नसते. वीतराग मुनीसुद्धा मोह-मूर्च्छेच्या परिवारापासून कोसो दूर असतात. संसारातील सर्व बंधने त्यांनी तोडून टाकलेली असतात आणि शेवटचे 'शरीर'बंधन तोडून टाकण्यासाठी ते समाधिमरणाचे व्रत घेतात. परम-वैराग्यधारी तपस्वींना हे व्रत शोभाच देते.

रहाटाची गाडगी जशी पर्यायानुसार रिकामी होत जातात, पुन्हा भरत राहातात; त्याप्रमाणेच हा जीव कर्मरूपी विहिरीत बुडत जातो आणि पुनश्च रिकामा होत राहतो. या शृंखलेला त्यागी वैराग्याच्या खड्गाने तोडून टाकतात आणि स्वत: मृत्यूच्या पालखीवर स्वार होतात. दार्शनिकांनी यासंबंधीचे मोठे हृदयस्पर्शी वर्णन केले आहे. जशी एखादी नववधू डोलीत बसून सासरी जावी; तसे मुक्त होणाऱ्या आत्म्याचे वर्णन केले आहे. ते म्हणतात- 'सजनि! डोले पर हो जा सवार । लेने आ पहुँचे है कहार।' इथे आत्म्याला सजनी, तिरडीला डोली आणि मृत्यूला डोलीचे/पालखीचे भोई असे रूपक योजून नवविवाहिता वधूच्या वरातीचा आनंद मरणाशी जोडला आहे.

वस्तुत: ज्यांनी कर्मबंध परिणामासह सशरीरी असतानाही या जीवनाचा अर्थ जाणून घेतला आहे; त्यांना मोहाच्या अंधारात घुसमटत राहून जीवन व्यतीत करणे कसे बरे आवडेल? वीतराग मुनींची चर्या दिगंबरत्वापासून प्रारंभ होते आणि ती समाधिमरणात पर्यवसित होते आणि मगच ती पूर्णत्वास प्राप्त होते. विधिपूर्वक मरणान्तक सल्लेखना

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

घेण्याचा साधू निश्चय करतात.[५] अशा या वीरमरणाला आत्महत्या संबोधणारे हत्या आणि स्वेच्छामृत्यू यातील भेद समजत नाहीत, दुसरे काय? जो परिस्थितीने गांजला आहे, वैतागलेला आहे, जीवनासाठी आवश्यक तो संघर्ष करण्याची क्षमता न बाळगणारा आहे किंवा भांडणात-वादात सापडला आहे; लोकनिंदेने पीडलेला आहे, तोच आत्महत्येस प्रवृत्त होतो. अशी व्यक्ती विहिरीत उडी घेऊन, उंच पर्वतावरून उडी घेऊन, फास घेऊन, विष पिऊन किंवा एखाद्या शस्त्राने वार करून घेऊन आपले जीवन संपवते.

परंतु, समाधिमरणास प्रवृत्त झालेली व्यक्ती अशा दुष्ट/क्रूर दोषांना विवश होऊन मरणव्रत घेत नाही. ती प्रसन्न मनाने कर्मजालातून मुक्त होण्यासाठी, आत्म्याला मोक्षावस्था देण्यासाठी आणि अविनाशी आनंदसागरात मनमुराद पोहण्यासाठी शरीरत्यागाची निश्चयपूर्वक घोषणा करते. कोणाच्या कर्जात बुडाल्याने, वादविवादाकडे प्रवृत्त झाल्याने किंवा कोणत्याही प्रकारच्या रागद्वेषाच्या आहारी जाऊन वैतागाने मरणाला प्रवृत्त होत नाही. ना ती शस्त्राने वार करून घेते ना विषपान!

आत्महत्या करणारा शांतचित्ताने स्वत:च्या मृत्यूची योजना बनवू शकत नाही. तो तर आवेशात अशा मन:स्थितीत असतो की, त्याला ताबडतोब मरण हवे असते. उंचावरून उडी मारणे किंवा कपड्यांना आग लावून घेणे (जाळून घेणे). ही सगळी अविवेकाची लक्षणे आहेत. जर त्याला काही वेळापूर्वी आत्महत्येच्या प्रयत्नापासून मागे ओढण्याची शिकस्त केली तर शांतचित्त होऊन तो आत्महत्येचे उपाय स्वीकारू शकणार नाही. परंतु, समाधीद्वारेच देहत्याग करणारा तर स्थिर मनानेच, शांततेनेच त्या व्रताचा आरंभ करतो. आत्मवध करणाऱ्याचे आत्मबल क्षीण झालेले असते. उलट, समाधिमरणास प्रवृत्त असणाऱ्याचे मनोबल/आत्मबल वाढलेले असते. आत्महत्या करतेवेळी कषाय तीव्र झालेले असतात तर समाधीच्या वेळी मंद, क्षीण! कधी यौन संबंधांमुळे तर कधी वासना-प्रेरित होऊन लोक आत्महत्या करताना आढळून आले आहेत. परंतु, समाधिमरणात सांसारिक विषय अंशमात्रही नसतात.

सारांश असा की, आत्मघाती नरकायूचा बंध करतो आणि समाधिव्रतीची सर्व शुभाशुभ बंधने नष्ट होऊन जातात. आत्महत्येत कोणा ना कोणाप्रति मरणाऱ्याचा आक्रोश असतो; परंतु वीरमरण स्वीकारणाऱ्याचे मन सगळ्यांबद्दलच्या क्षमाभावाने ओथंबलेले

---

५. 'सल्लेखनां करिष्येऽहं विधिना मरणान्तिकीम् ।
अवश्यमित्यद: शीलं सनिदध्यात् सदा हृदि ।।'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

असते. तसेच ते आत्मलीन असते. समाधिमृत्यूस अंगीकारणारा म्हणतो- 'रागद्वेषमोहरहितोऽहम्' इत्यादी!

श्री माघनंदी आचार्यांनी रचलेले एकेक पद वीतरागभावाची वृद्धी करणारे व शरीर-मोह नाश करणारे आहे. समाधिमरणाच्या वेळी दर्शन, ज्ञान, चारित्र्य आणि तप या चार आराधनांचे श्रवण करण्यास सांगितले आहे. दर्शन-आराधनेद्वारे सल्लेखना घेणाऱ्यास सांगितले जाते की, समस्त कर्मबंध हे असम्यग्दर्शनाने उत्पन्न होतात. देहाला आत्मा मानणे हेसुद्धा असम्यग्दर्शन आहे. खरे पाहता, हरभरा व त्याचे साल दोन्ही वेगवेगळे आहेत. असम्यग्दर्शनाने परपदार्थाविषयी रती उत्पन्न होते. ज्ञानाराधनेमुळे मोहनीय कर्मांचा क्षय केला जातो. आत्म्याचा महत्त्वाचा गुण म्हणजे ज्ञान! त्याद्वारेच समस्त लोक, अलोक प्रकट होतात. केवलज्ञान हे आत्म्याच्या परमविशुद्ध स्वरूपात प्रकट होते. आत्मज्ञानाशिवाय मोक्ष प्राप्त होत नाही. आत्म्याच्या या ज्ञानगुणाचे चिंतन केले की, पुनर्जन्मावर विजय मिळवता येतो. अशा प्रकारे चारित्र्याराधनेद्वारे समाधिमरण घेणाऱ्यास वेळोवेळी सांगितले जाते की, सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञानाचे प्रयोगक्षेत्र म्हणजे सम्यक्चारित्र्य हे आहे. आत्म्याची विशुद्धी चारित्र्यानेच होते.

चारित्र्यपालन केल्याशिवाय दर्शन आणि ज्ञानाच्या गोष्टी करीत राहिल्याने सार्थकता लाभत नाही. संयमाचे फक्त शास्त्रीय ज्ञानसुद्धा अपेक्षित नाही तर व्यवहारामध्येही त्याप्रमाणे आचरण झाले पाहिजे. पंचमहाव्रत, पंचसमिती आणि तीन गुप्ती चारित्र्याचेच प्रकार आहेत. सम्यग्दर्शन, ज्ञान व चारित्र्य यामुळे जीवनात तप प्रकटते. वाळलेल्या शुष्क समिधांनी जसा यज्ञाचा अग्नी प्रज्वलित केला जातो; त्याप्रमाणे त्रिरत्नांनी तपोमय जीवन उज्ज्वल केले जाते. बहिरंग आणि अंतरंग तपांमुळे तप्त सुवर्णासारखी आत्मशुद्धी होते आणि दिव्यत्वाची प्राप्ती होते. ध्यान, सामायिक, उपवास, प्रायश्चित्त, स्वाध्याय, व्युत्सर्ग, विनय इत्यादी तपांनी परिणामांमध्ये सांगता येणार नाही, एवढी विशुद्धी येते. या चारही आराधनांमुळे आत्मस्थिती शांत व ध्यानमग्न राहते. कोणत्याही सांसारिक पदार्थाविषयी आसक्ती वाटत नाही.

'जर सल्लेखनाकाळात एखाद्या प्रकारची सांसारिक विषयवासना किंवा तपोभंग करणारे विचार उत्पन्न होत असतील तर त्या व्रतीला त्या दुर्विकल्प चिंतनाचे दुःखद परिणाम भोगावे लागतात. कारण, 'यथा मतिस्तथा गतिः' -जशी मती तशी गती! 'मदनपराजय'मध्ये लिहिले आहे की, मृत्यूच्या वेळी असणारे परिणाम दुसऱ्या भवातही

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बरोबर येतात. 'हेमसेन' पिकलेल्या काकडीतील किडा झाला, तर आपल्या स्त्रीचे आर्तरौद्रध्यान केल्याने 'जिनदत्त' बेडूक म्हणून पुढच्या भवात जन्मला.[६] म्हणून, समाधिमरणाच्या वेळी पूर्ण आत्मनिष्ठेने काळ व्यतीत करावा. आयुष्यभराचे संचित पुण्य, तप, चारित्र्य या काळात होणाऱ्या छोट्याशा चुकीनेही नष्ट होऊ शकते. शांत, स्वस्थ आणि धीरगंभीर चित्त ठेवून साधलेले समाधिमरण अनंतवेळी सामोरे जाव्या लागणाऱ्या जन्म-मृत्यूच्या दुःखवेदनांतून मुक्ती द्यायला समर्थ आहे.

निराकुल भावाने समाधिमरण पूर्ण करणे म्हणजे जीवनाच्या संपूर्ण संचित साधनांना सफल बनवणे होय. मुनित्वाला जर सूर्याची उपमा द्यायची म्हटले तर दीक्षाग्रहण हा त्याचा उषःकाल आहे, सम्यक्चारित्र्याचे पालन तपोमय माध्यान्ह आहे आणि सल्लेखना म्हणजे संध्याकाळ! सूर्याचे बिंब उषःकाली जसे लाल व प्रसन्न असते; तसे ते सायंकाळच्या वेळीही असते. जीवन आणि मृत्युची स्थिती यामध्ये साम्यभाव ठेवणे मुनींचे आभूषण आहे. वर्षभर संपूर्ण अभ्यास करणारा विद्यार्थी वार्षिक परीक्षेत उत्तम गुण प्राप्त करून उत्तीर्ण होतो; त्याप्रमाणे जीवनात मुनिव्रताचे अप्रमत्त - निर्दोष पालन करणारे 'समाधि'परीक्षेत विचलित होत नाहीत. तो अगदी सहजतेने ती 'समाधिपरीक्षा' उत्तीर्ण होतो; समाधिमरण म्हणजे व्रतांच्या संरक्षणासाठी सावध राहण्याबद्दल घेतलेल्या प्रतिज्ञेचे पालन होय. जो व्रतांचा भंग करून जिवंत राहतो; त्याचे जीवन काय अनंतकाळासाठी सुरक्षित राहते? मृत्यू त्यालाही गाठून त्याचा समाचार घेतोच. तेव्हा व्रतांचे पालन करीतकरीत ऊर्ध्वगतीस प्राप्त करणे, हे सर्वोत्तम आहे. शाश्वत धर्मपालन नश्वर देहासाठी नष्ट करायला नको. कारण, देह तर पुन्हा मिळेल, पण धर्म प्राप्त होणे मात्र दुर्लभ आहे.[७]

'समाधिमरण' ग्रहण करणाऱ्याने चेतनेच्या शेवटच्या क्षणापर्यंत स्वरूपस्थिती आणि परिणामविशुद्धीसाठी खालील 'समाधिसप्तदर्शी'चे अर्थपूर्ण मनन-चिंतन केले पाहिजे.

---

६. 'मरणे या मतिर्यस्य सा गतिर्भवति ध्रुवम् ।
यथाऽभूद्धेमसेनाख्यः पक्वे विर्भटके कृमिः ।।
मरणे या मतिर्यस्य सा गतिर्भवति ध्रुवम् ।
यथाऽभूजिन्नदत्ताख्य स्वांगनार्तेन दर्दुरः ।।' - मदनपराजय

७. 'नावश्यं नाशिने हिंस्यो धर्मो देहाय कामदः ।
देहो नष्ट पुनर्लभ्यो धर्मस्त्वत्यन्तदुर्लभः ।।' - सागार. ७/८

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मृत्युमार्गे प्रवृत्तस्य वीतरागो ददातु मे ।
समाधिबोधिपाथेयं यावन् मुक्तिपुरी पुरः[८] ।।१।।
कृमिजालशताकीर्णे जर्जरे देहपंजरे ।
भज्यमाने न भेतव्यं यतस्त्वं ज्ञानविग्रहः[९] ।।२।।
ज्ञानिन्! भयं भवेत्कस्मात् प्राप्ते मृत्युमहोत्सवे ।
स्वरूपस्थः पुरं यादि देही देहान्त-स्थितिः[१०]।।३।।
सुदत्तं प्राप्यते यस्माद् दृश्यते पूर्वसत्तमैः ।
भुज्यते स्वर्भवं सौख्यं मृत्योर्भीतिः कुतः सताम्[११] ।।४।।
आगर्भाद् दुःखसन्तप्तः प्रक्षिप्तो देहपंजरे ।
नात्मा विमुच्यतेऽन्येन मृत्युभूमिपतिं विना[११] ।।५।।
सर्वदुःखप्रदं पिण्डं दूरीकृत्यात्मदर्शिभिः
मृत्युमित्रप्रसादेन प्राप्यन्ते सुखसम्पदः[१२] ।।६।।
मृत्युकल्पद्रुमे प्राप्ते येनात्मार्थो न साधितः ।
नमग्नो जन्मजम्बाले स पश्चात् किं करिष्यति[१३] ।।७।।

---

८. समाधिमरणाद्वारे मी मृत्यूकडे प्रवृत्त झालो आहे. या मार्गावरून मला निरंतराय पार होता यावे, यासाठी भगवान वीतराग देव समाधी (स्वरूपाच्या चिंतनात योगपूर्ण स्थिती) आणि बोधी (रत्नत्रयलाभ) आणि परलोकपथासाठी उपकारक शिदोरी मला प्रदान करोत की, जेणेकरून मी मुक्तिपुरीस पोहोचू शकेन.

९. हे आत्मन! शेकडो कीटकांनी भरलेला हा जर्जर शरीरपंजर तुटत आहे. परंतु त्यामुळे तू भयभीत होऊ नकोस. कारण, तू ज्ञानशरीरधारी आहेस. हे पौद्गलिक शरीर म्हणजे तू नाहीस.

१०. हे ज्ञानी आत्मन! मृत्यूमहोत्सवात सहभागी होताना तुला कसले भय वाटते आहे? आपल्या आत्मस्वरूपात स्थित राहत एका शरीरातून दुसऱ्या शरीरात हा आत्मा जातो. यात दुःखी होण्यासारखे काय आहे?

११. पूर्वीचे ऋषी आणि गणधर इत्यादी सत्पुरुष असे म्हणतात की, आपण केलेल्या कर्मांचे फळ आणि चारित्र्याचे फळ तर मरणानंतरच प्राप्त होते. स्वर्गसुख जरी म्हटले तरी तेही मृत्यूनंतरच मिळते. या तपःपरिणामदायक मरणाचे भय कशाला?

१२. ज्ञानी पुरुष म्हणतो की, या कर्मरूपी शत्रूने माझ्या आत्म्याला देहपिंजऱ्यात बंदिस्त केले आहे. ज्या क्षणी हा गर्भात प्रवेशता झाला; त्या क्षणापासून क्षुधा, तृषा, रोग, संयोग-वियोग इ. दुःखांनी त्याला घेरून टाकले आहे. या बंधनग्रस्त आत्म्याला मृत्यूराजाव्यतिरिक्त कोण मुक्त करू शकणार आहे?

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जीर्णं देहादिकं सर्वं नूतनं जायते यतः ।
स मृत्युः किं न मोदाय सतां सातोत्थितिर्यथा[१४] ॥८॥
सुखं दुःखं सदा वेत्ति देहस्थश्च स्वयं व्रजेत् ।
मृत्युभीतिस्तदा कस्य जायते परमार्थतः[१५] ॥९॥
संसारासक्तचित्तानां मृत्युर्भीत्यै भवेन्नृणाम् ।
मोदायते पुनः सोऽपि ज्ञानवैराग्यवासिनाम्[१६] ॥१०॥
पुराधीशो यदा याति सुकृतस्य बुभुत्सया ।
तदासौ वार्यते केन प्रपंचैः पंचभौतिकैः[१७] ॥११॥
मृत्युकाले सतां दुःखं यद् भवेद् व्याधिसम्भवम् ।
देहमोहविनाशाय मन्ये शिवसुखाय च[१८] ॥१२॥
ज्ञानिनोऽमृतसंगाय मृत्युस्तापकरोऽपि सन् ।
आमकुम्भस्य लोकेऽस्मिन् भवेत् पाकविधिर्यथा[१९] ॥१३॥
यत् फलं प्राप्यते सद्भिर्व्रतायासडिम्बनात्।
तत् फलं सुखसाध्यं स्यात् मृत्यूकाले समाधिना[२०] ॥१४॥

---

१३. आत्मदर्शी लोक संपूर्ण दुःख देणाऱ्या या देहपिंडाला दूर करून मृत्यूरूपी मित्राच्या कृपेने सुखसंपदा प्राप्त करतात. ज्ञानी पुरुष मृत्यूला साता कर्मांचा उदय समजतात. त्याच्या कृपेने जीर्ण-शीर्ण शरीरापासून सुटका होऊन नवीन शरीर मिळते.

१४. मृत्यूसारखा कल्पवृक्ष लाभूनसुद्धा ज्याने आपले कल्याण करून घेतले नाही; तो जीव संसारसमुद्रात बुडाल्यावर काय करू शकतो?

१५. हा आत्मा शरीरात राहून सुखदुःखाचा सदैव अनुभव घेत असतो आणि स्वतःच परलोकी-गमन करतो. मग, पारमार्थिकदृष्ट्या मृत्यूचे भय कोणाला वाटावे?

१६. ज्या जीवांचे मन संसाराच्या आसक्तीत गुंतलेले आहे; ते आपल्या आत्मस्वरूपास जाणत नाहीत. म्हणूनच, त्यांना मृत्यू भयावह वाटतो. परंतु, जे महान आत्मे आत्मस्वरूपास जाणतात आणि वैराग्य धारण करतात, त्यांच्यासाठी तर मृत्यू आनंददायीच असतो.

१७. या जीवाचे आयुष्य पूर्ण झाले आणि परलोकातील आयुचा उदय होत असेल तर शरीर इत्यादी पंचमहाभुतांच्या समूहांतून परलोकगमन करताना कोण त्यांना प्रतिबंध करू शकतो?

१८. मृत्यू कर्माच्या समयाच्या उदयाने रोगादी दुःख उत्पन्न होतात. ती शारीरिक दुःखे ज्ञानवान व्यक्तीसाठी शरीरावरील मोहापासून निवृत्त होण्यास कारणीभूत ठरतात आणि त्यांना निर्वाणसुखाची प्राप्ती होते.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आनर्तः शान्तिमान् मर्त्यो न तिर्यक् नापि नारकः।
धर्मध्यानपरो मर्त्योऽनशनीत्वमरेश्वरः[२१] ॥१५॥
तप्तस्य तपसश्चापि पालितस्य व्रतस्य च।
पठितस्य श्रुतस्यापि फलं मृत्यूः समाधिना[२२] ॥१६॥
अतिपरिचितेष्ववज्ञा नवे भवेत् प्रीतिरिति हि जनवादः।
चिरतरशरीरनाशे नवतरलाभे च किं भीरु[२३] ॥१७॥

उपसंहार

अन्तः क्रियाधिकरणं तपः फलं सकलदर्शिनः स्तुवते ।
तस्माद्यावद्विभवं समाधिमरणे प्रयतितव्यम् ।[२४] -रत्नक श्रा.१२३

❖❖❖

---

१९. जरी मृत्यू तापदायक क्लेशकारक असला तरीही ज्ञानी त्यास अमृताच्या (मोक्षाच्या) संगतीचे कारण मानतात. मातीचे कच्चे मडके भट्टीतल्या अग्नीत भाजले की ते पक्के होते अमृताच्या (जलाच्या) संगतीस ते पात्र बनते.

२०. उत्तम व्रतांचे कष्ट सहन केल्यानंतर फळाची प्राप्ती होत. समाधिमरण घेतलेल्यांना मात्र तेच फळ विनासायास मिळते.

२१. मृत्यू जवळ आला असता जो सत्पुरुष आर्त परिणामांनी रहित असतो, शांत राहतो; तो जीव तिर्यंक किंवा नारक गतीत जात नाही. त्या वेळी जो धर्मध्यानापरायण अनशतव्रत घेऊन शरीराचा त्याग करतो, तो इंद्र किंवा महद्धिक देव होतो.

२२. शास्त्रानुसार तप करण्याचे, व्रतांचे पालन करण्याचे आणि शास्त्रस्वाध्याचे फळ समाधिमरणानेच मिळते.

२३. 'अतिपरिचयात् अवज्ञा' ही लोकोक्ती प्रसिद्धच आहे. आणि ते स्वाभाविक आहे तसेच जे नवीन आहे, त्याविषयी प्रेम उत्पन्न होणेही स्वाभाविक आहे. म्हणूनच हा देह जो खूप जर्जर, शिथिल, जुना झाला आहे; त्याचा नाश झाल्यावर नवीन देह मिळेल. मग, भीती कशाची? अर्थात जीर्णाचा त्याग व नव्याच्या प्राप्तीसाठी उत्साहपूर्वक प्रवृत्त व्हायला हवे. सल्लेखनेच्या या शुभवेळेत अशुभ व दुर्गतीला नेणारे कर्मबंध निर्माण करू नयेत.

२४. आयुष्यभर केलेल्या तपाचे फल म्हणजे अंत्यसमयी होणारे समाधिमरण होय. म्हणून, आपली संपूर्ण शक्ती पणाला लावून समाधिमरण साधण्याचे परम प्रयत्न केले पाहिजेत. कारण, वेगवेगळी, मते धारण करणाऱ्या सगळ्याच विचारवंतांनी अंत्यसमयी येणाऱ्या शांतिपूर्वक मरणाची मुक्तकंठाने तारीफ केली आहे.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

-: परिशिष्ट :-



पिंछी-कमंडलू



Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

।। विद्यानंद वाणी ।।

'जैनांनी 'अनेकान्त'द्वारे परस्परविरोधी समस्त धर्मांचा समन्वय करण्याची एक रचनात्मक परिपाठी दिली. सर्वांचा चांगुलपणा आत्मसात करण्याची आपली परंपरा आहे.'

८ जुलै १९७३! लाल किल्ल्यासमोरचे परेड ग्राउंड : दिल्ली. पाय ठेवण्याइतकीही तिथं जागा राहिली नव्हती. विशाल मंडप, भव्य व्यासपीठावर जैन धर्मातील सर्व संप्रदायांचे आचार्य, मुनी, आर्यिका, साध्वी एका बाजूला; तर दुसऱ्या बाजूला पंडित, विद्वान, श्रेष्ठी बसलेले होते. आंतरराष्ट्रीय स्तरावर १९७४-७५ मधील भगवान महावीरांच्या निर्वाण महोत्सव समितीची ही पहिलीच बैठक! लक्षणीय गोष्ट म्हणजे या महोत्सवाच्या राष्ट्रीय समितीच्या प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी या अध्यक्षा होत्या. त्यांचे प्रतिनिधी म्हणून केंद्रीय शिक्षणमंत्री श्री. डी.पी. यादव मंचावर उपस्थित होते.

मुख्य अतिथींचं स्वागत, मंगलाचरण या प्रारंभिक विधीनंतर श्री. यादव बोलावयास उठले. शासकीय योजनांची माहिती देताना 'जैन समाज तर भामा शहांचा, धनाढ्यांचा समाज आहे. सक्षम आहे. त्याला कुणाकडे मदतीसाठी याचना करावी लागत नाही...' त्यांचा सूर थोडासा उपहासाचा, टीकेचा होता. यामुळे व्यासपीठावरील सर्व जण अस्वस्थ झालेच; पण श्रोतृवर्गातही खळबळ माजली. एक श्रोता ओरडला, 'जैन समाजातही गरीब लोक आहेत, याची शासनाला माहिती असू नये काय?'

व्यासपीठावर प्रवचनसम्राट आचार्य तुलसी, आचार्य सुशीलकुमार, मुनिवर नथमलजी, हेच पुढे आचार्य महाप्रज्ञ या नावाने प्रसिद्ध झाले, असे दिग्गज बसले होते. त्यांनी चिठ्ठी पाठवून जैन साधूंचे प्रतिनिधी म्हणून मुनिश्री विद्यानंद यांचेच नाव निवेदनासाठी सुचवलं. संचालक महोदयांनी सर्व सूचना लक्षात घेऊन मुनिरत्न विद्यानंद यांना प्रवचनासाठी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

निमंत्रित केले. मुनिश्री थोडेसे चकितच झाले होते. त्यांनी मंचावरील सर्वांवरून दृष्टी फिरवली. सर्वांनी डोळ्यांनीच अनुमती दिली.

त्यांचे त्या वेळचे प्रवचन म्हणजे ओजस्वी भाषणाचा तेजस्वी आविष्कार होता. जैन समाज, इतिहास यांची महती पटवून देणारे ते व्याख्यान होते.

आचार्यश्रींचे ऐतिहासिक भाषण सुरू झाले. ।। ॐ नमः । ॐ नमः ।। आपण महावीरांचे गीत गात आहोत; परंतु त्यांनी प्रवर्तिलेल्या जैनत्वाची महत्ता आपण चालू युगापासून अनभिज्ञ ठेवली आहे. जैन धर्म सर्वात प्राचीन धर्म आहे. या देशाचे प्रथम तीर्थंकर वृषभदेव यांची दोन प्राचीनतम चिन्हे मोहन-जो-दडो आणि हडप्पा येथील उत्खननात सापडली आहेत. ही चिन्हे प्रामाणिक असून त्यावर सखोल संशोधन झाले आहे. मोहन-जो-दडो येथील उत्खननात सापडलेल्या अवशेषांत तीर्थंकर वृषभदेव दिगंबर मुद्रेत योगमग्न आहेत. जवळ नतमस्तक सम्राट भरत आणि वृषभदेवाचे चरणचिन्ह 'वृषभ' आहेत.

खालच्या ओळीत चक्रवर्ती भरताची सप्तांग प्रतीके आहेत. (सात मंत्री आहेत.) यासंबंधी हडप्पा उत्खननाचे निर्देशक श्री. डॉ. रामप्रसाद यांनी सविस्तर लिहिले आहे.

हे सांगताना वृषभ-भरत यांचे ज्यात ससंदर्भ उल्लेख आले आहेत, असे प्राचीन वेद विशेषतः ऋग्वेद, तसेच भागवत, विष्णुपुराण, शिवपुराण, गरुडपुराण, स्कंध, मार्कंडेय इत्यादी वैदिक, दीघनिकाव, दर्शनसार, त्रिपाटिका व जैन ग्रंथ तद्वत पुराणे यातील उपोद्बलकप्रमाणे, इ. बौद्ध जॉन मार्शल तद्वत डॉ. वासुदेव शरण अग्रवाल, इरावती महादेवन, एम.सी. जोशी इ. संशोधकांची नावे त्यांच्या अंतर्मनाच्या पटलावर वेगाने उमटून गेली. कालापव्यय टाळण्यासाठी त्यांनी ती मनातच दाबली.

ते पुढे म्हणाले, याप्रमाणे जैन समाजाचा इतिहास हा देशाच्या दृष्टीने महत्त्वाचा व मूलतः अनादिकालापासूनचा आहे. 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' मध्ये पं. जवाहरलाल नेहरूंनी म्हटले आहे की, जैन लोक या देशाचे १०० टक्के मूळ निवासी असून बाकी सगळे बाहेरून आलेले आहेत. तीर्थंकर वृषभदेवांचा पुत्र चक्रवती भरत याच्या कार्यकर्तृत्वामुळे या देशाचे नाव 'भारत' पडले आहे. ही सत्य घटना वेद-पुराणे, समस्त जैन शास्त्रे सांगत आहेत. आज देशाला, सरकारला, समाजाला, जनतेला सर्वांनाच या मोठ्या सत्याचा विसर पडला आहे. तो का?

जो तो येतो, आम्हाला अपरिग्रहवादाची शिकवण देतो. परंतु, जगाला अपरिग्रहवाद

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आमच्याकडून शिकायचा आहे. मी कन्याकुमारीपासून हिमालयापर्यंत पायी प्रवास केला व प्रत्येक गाव-शहर पाहिले. जैनांनी या देशाची किती सेवा केली, हे आपण जाणत नाही. त्यांनी गरिबांना मोफत औषध देणारी अनेक औषधालये उघडली आहेत. परंतु, समाजाने किंवा शासनाने कोणीही या सेवेचे मूल्यांकन केले नाही. अनेक वैद्यांनी आरोग्यसेवेच्या क्षेत्रात जीवदान केले आहे. याचे निष्पक्ष मूल्यांकन का झाले नाही? आपण वाटेल त्याला पद्मश्री हा किताब बहाल करतो; तर जैन गुरुकुलांमध्ये, जैन संस्थामध्ये, औषधालयांमध्ये २०-२५, वर्षे सेवा देणाऱ्या वैद्यांना का नाही देऊ शकत?

'जैन पाठशाळांनी देशाला अनेक उद्‌भट विद्वान दिले. बाबू गुलाबराव यांनी आपल्या आत्मचरित्रात लिहिले आहे, 'मी एका छोट्या पाठशाळेत शिकून तयार झालो.' अशा शेकडो-हजारो शिक्षण संस्था, पाठशाळा आहेत व त्यातून चांगले नागरिक तयार होतात. म. गांधींचे नाव आपण नेहमी घेतो. त्यांच्यावर कोणाच्या शिकवणुकीचा प्रभाव पडला? श्रीमद् रायचंद्र वाचा. त्यांनी सुमारे दोन वर्षांपर्यंत गांधीजींना जैन धर्म शिकविला. याचा उल्लेख गांधीजींनी श्रीमद्रायचंद्र यांच्या एका पुस्तकात केला आहे.

जैन समाज धनवान/श्रीमंत समाज आहे, असे वारंवार म्हटले जाते. परंतु हा समाज श्रीमंत का आहे, याचे कारण कोणीही जाणत नाही. याचा शोध मुळातून घेतला पाहिजे. याचे कारण हा समाज निर्व्यसनी आहे. जैन समाजात ९०-९५ टक्के लोक संयमी आहेत. संसार कसा करावा, कसा चालवावा, याची शिकवण आपल्याला भ. वृषभनाथांनी दिली आहे. त्याग कसा करावा, हे भ. महावीरांनी आपल्याला शिकवले आहे. ही संयमाची अशी वृत्ती आहे की, जी जगाने शिकावी आणि सुखी बनावे.

जैनांचा इतिहास मला विचारा. ज्याने ४८ हजार पुस्तके वाचली आहेत. ज्याने कोलकाता येथील लायब्ररी पालथी घातली आहे. त्यातील पुस्तकांचे संशोधकाच्या दृष्टीने वाचन केले आहे. माझे तर आपणाला सांगणे आहे की, आपण अपरिग्रहवाद घरोघरी पोहोचवावा. त्याला आपल्या हृदयात दिव्याप्रमाणे पेटवावे आणि ज्या निष्ठेने त्याचे पालन करीत आला आहात, त्याच निष्ठेने पुढेही पालन करत राहावे. अशा तऱ्हेने जगासमोर आपण कोण होतो, याचा आदर्श घालून द्यावा.

गेल्या १०० वर्षांत पुस्तकांमध्ये काय लिहिले गेले आहे, हे आपण जाणता. काका कालेकरांनी लिहिले आहे. पार्श्वनाथाचा चातुर्याम धर्म प्रथम श्रेणीचा होता. या विशाल जगात मांसाहाराच्या त्यागाची शिकवण कोणी दिली तर असे सांगितले जाईल की, जैनांनी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दिली आणि ती शिकवण उत्तम रीतीने पालन करून व आचरणात प्रतिबिंबित करून जगासमोर आदर्श निर्माण केला जैनांनी! संत विनोबाजींनी लिहिले आहे - जैनांनी अनेकान्ताद्वारे परस्परविरोधी समस्त धर्मांचा समन्वय करण्याची एक रचनात्मक परिपाठी दिली. सर्वांचा चांगुलपणा आत्मसात करण्याची आपली परंपरा आहे; म्हणून आम्ही कुणाचा तिरस्कार केला नाही. इतिहास आमच्या या कथनाला साक्षी आहे.

आपला इतिहास अतिप्राचीन आहे. या भूमीवर २४ तीर्थंकर होऊन गेले आहेत. त्यांचे स्वत:चे असे स्थान आहे आणि एक विराट रचनात्मक भूमिका आहे. अलिकडच्या काळात मोठमोठ्या विद्वानांनी संशोधन करून काही आश्चर्यजनक तथ्ये प्रगट केली आहेत. वाचस्पती गैरोला यांनी सारनाथ हे अकरावे तीर्थंकर श्रेयांसनाथ यांचे जन्मस्थान व तपोभूमी आहे, असे लिहिले आहे. जैन धर्माला सर्वांचाच जबरदस्त सहयोग लाभला आहे.

आपल्याला कार्यकर्त्यांना संघटित केले पाहिजे. आपण या देशाचे नागरिक आहोत. हा आपला देश आहे. महावीर या देशाचे होते; दुसऱ्या कोणत्या देशाचे नव्हे.

'मी पायी प्रवास करीत भारतात हिंडलो. आपले आद्य शंकराचार्य यशस्वी झाले; कारण ते गरिबांच्या झोपडीपर्यंत पायी चालत गेले. मुनिचर्या आपण जाणताच. ईर्या (गमन, गती) शुद्धिपूर्वक मुनिचर्येचा निर्वाह करावयाचा असतो. म्हणून, पायी चालत जनतेला मी प्रबुद्ध करत आहे. त्यांची चेतना जागवीत आहे. हे माझे कर्तव्य समजतो. चातुर्मासानंतर हरियाणा आणि उत्तर प्रदेशातील लहानलहान गावांत हिंडण्याची इच्छा आहे माझी! जैनांची १० घरे तिथे असतील - नसतील. इतर धर्मीयांच्याही घरी जाऊन मी सांगेन, महावीर या देशाचे होते. त्यांनी अहिंसेची शिकवण दिली होती व आमचे रक्षण केले. त्या महान विभूतीचा निर्वाणोत्सव साजरा करणे, हा एक उपचार आहे. प्रत्यक्षात त्यांनी दाखविलेल्या मार्गावरून चालणे हाच खरा उत्सव. आपणास पावापुरी माहीत आहे. तिथे एक तलाव आहे. तिथून महावीर मोक्षाला गेले. जिथे महावीर जन्मले, ती वैशाली! परंतु, वस्तुत: वैशाली आपल्या हृदयात असायला हवी. पावापुरीचे निर्मल सरोवर. तसे आपले मन निर्मल बनावे - खरा निर्वाणोत्सव आपल्याला मनाने साजरा करायचा आहे आणि महावीरांचा उपदेश आणि कार्य आपणाला इतरांच्या जीवनात उतरावयाचे आहे. आपण भगवान रामाचे अनुयायी आहोत, इक्ष्वाकू वंशाच्या - मनूचे वंशज आहोत. या वंशांना अनुरुप आचरण करीत आलो आहोत. करत आहोत, करत राहू.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

स्वत: तो संदेश आचरणात आणू. आज हजारो जैन पाठशाळा आहेत. परंतु, जवळजवळ त्या सगळ्या निष्प्राण, रूक्ष आणि निष्प्रभ वातावरणात तग धरून आहेत. या ढासळत्या संस्थांची प्राणप्रतिष्ठा करता येणार नाही का? आपल्या अभ्यासक्रमाची पुनर्रचना करून मानवी मूल्ये आणि आधुनिकता यांची जोड देता येणार नाही का?

२ ऑक्टोबर १९६६ चा दिवस! भल्या पहाटेपासून परेड ग्राउंडवर युवकांची परेड सुरू झाली होती. सकाळी ७ वाजल्यापासून मंडपाला भरती येऊ लागली. ८ ला १० मिनिटे कमी आहेत; तोच मंडपाच्या प्रवेशद्वाराजवळ एक कार येऊन थांबली अन् तीमधून श्रीमती ललिता शास्त्री खाली उतरल्या. पदाधिकाऱ्यांनी नवलपूर्ण अगत्याने त्यांचे स्वागत केले. त्यांना आदरपूर्वक व्यासपीठावर नेऊन योग्य ठिकाणी बसवले.

एवढ्यात, मंडपाच्या दुसऱ्या बाजूचे प्रवेशद्वार मुनिश्रींच्या जयजयकाराने खाडकन् उघडले. सर्व सभामंडप उठून उभा राहिला नि जयजयकाराचा घोष आसमंतात निनादला. जयजयकाराचा आवाज ऐकून श्रीमती ललिता शास्त्री उठून उभ्या राहिल्या. मुनिश्री स्थानापन्न होताच त्यांनी चरणी नारळ अर्पण केला. आशीर्वाद देऊन मुनिश्रींनी त्यांना बसण्याची विनंती केली.

आगतांचे स्वागत, मंगलाचरण, भजन या औपचारिक कार्यक्रमानंतर जे ऐकायला श्रोते उत्सुक होते; ते मुनिश्रींचे उद्बोधन सरू झाले

उत्तम गायक जसा पहिल्या सुरावटीनेच श्रोत्यांना मंत्रमुग्ध करतो किंवा महत्त्वाच्या सामन्यात पहिल्या चेंडूवर षटकार ठोकला; तर दर्शकांना जसा हर्षोल्हास होतो. प्रवचन हे करमणूकप्रधान विषयावरचं भाषण नसूनही हा परिणाम साधला जात होता, हेच मुनिश्रींचे वैशिष्ट्य!

'गांधीदर्शनाचे मंगलाचरण झाडून होते अन् त्याची परिणती, सांगता चरख्याने होते. खरे गांधीजी समजून घ्यायचे असतील तर स्वच्छता, स्वावलंबन या प्रतीकांतून समजून घ्यावे लागतील. जीवनातील गरजा कमीतकमी ठेवण्याचा मार्ग त्यांनी दाखवला. गरजा वाढवणे म्हणजे प्रगतीची गती असे आपण समजतो; परंतु, अशा प्रगतीची गती हळूहळू भोवंडून टाकते. साधेपणा आणि आत्मसंयम यांचा मार्ग त्यांनी सांगितला. त्याचा स्वीकार केला तर देशातील अनेक समस्या आपोआप सुटतील.

'प्रेम आणि अहिंसा या सिद्धान्ताचा त्यांनी स्वत: अंगीकार करून प्रचार आणि प्रसार केला. द्वेषभावनेला थारा मिळू नये म्हणून, प्रेमात फसवणूक होऊ नये, यासाठी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

त्यांनी सत्याला प्रेमापेक्षा वरिष्ठ स्थान दिले. अहिंसा आणि सत्य यावर त्यांची निष्ठा होती. त्यामुळेच ते अमर बनले. 'अहिंसा-व्रत' ग्रहण करून महात्मा बनले. ते धीर, गंभीर, पुरुषार्थी होते. त्यांच्या अहिंसेचा अर्थ हा भेकडपणा नव्हता. उपवास व मौन ही त्यांची बलशाली शस्त्रे होती. सहनशीलता त्यांच्यात ओतप्रोत भरली होती. ते केवळ धर्मनिष्ठही नव्हते तर आत्मनिष्ठही होते.'

गांधीजींविषयी मुनींना आदर होता. त्यांच्या जीवनकर्तृत्वावर त्यांनी स्वतंत्र चिंतन केलेले दिसून येते.

गांधीजींनी मानवतेला स्वतंत्र व नवीन दिशाबोध दिला. गांधीजी एखाद्या लेखाचा अगर व्याख्यानाचा विषय नाहीत. एखाददुसऱ्या पुस्तकातून ते बंदिस्त केले जाऊ शकत नाहीत. एका राष्ट्राला त्यांनी संजीवनी पाजली नि अनेक राष्ट्रांनाही त्यांनी नवी ऊर्जा दिली. मानवतेला नवदिशा दाखवणारे ते रडार आहेत.

त्यांची माता जैन होती. तिच्या प्रेरणेनेच त्यांनी अहिंसा, सत्य, अपरिग्रह, अचौर्य नि ब्रह्मचर्य या श्रमण संस्कृतीचा अंगीकार केला व जीवनभर निष्ठेने प्रचार केला. प्राचीनता आणि नवता यांचा अपूर्व संगम म्हणजे त्यांचे जीवन आहे. त्यातूनच अभिनव चरित्राचे सृजन, प्राचीनतेचा पुनरुद्धार त्यांनी केला. त्यांनी जी कृती केली नि विचार मांडले; त्यालाच गांधीदर्शन म्हटले जाते व तेच त्यांच्या बहुमुखी जीवनव्यवहाराचे सूत्र आहे. चरख्याचे सूत्र त्यांनी जीवनव्यवहाराशी जोडले. आश्रमपद्धती, चरखा, स्वदेशी वस्तूंचा वापर, स्वावलंबन, श्रमदान, निराभिमानी सेवा, समता, अपरिग्रह इ.चे सतत प्रयोग करून त्यांचे सफल परिणाम घडवून आणले.

रसनेवर नियंत्रण हे गांधीजींच्या व्यक्तिगत साधनेचे वैशिष्ट्य होते. त्यांनी आपल्या वाणीवर आणि आस्वादावर नियंत्रण प्राप्त केले. आस्वादाचा अर्थ केवळ जिभेवर नियंत्रण नाही. जीवनाचे सर्व विषय-कषाय स्वादावर अवलंबून आहेत. जिभेचा कडवटपणा कितीतरी तीव्र असतो. सर्व भोगोपभोगाच्या मुळाशी स्वादभावना असते. स्वाद जिंकणारा इंद्रियविजयी असतो. गांधीजी आपल्या भोजनात कडुनिंबाच्या पानांची चटणी घेत असत. कडवटपणाचे सेवन करून कडवटपणाची तीक्ष्णता कमी करण्याचा त्यांचा प्रयोग जीवनात आणि राजकारणातही त्यांनी कुशलतेने केला. अहिंसेच्या सिद्धीसाठी जिभेच्याच नव्हे तर सर्व इंद्रियांच्या कडवट लोलुपतेवर, लोभावर नियंत्रण असावे लागते. राजकारणात अहिंसेचा अभिनव प्रयोग यशस्वीपणे ते जिव्हानियंत्रण आणि आत्मसंयमन यांच्यामुळेच करू

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

शकले. सर्वसामान्य लोकांत अहिंसक सत्याग्रहाद्वारे त्यांनी जागृती घडवून आणली. अन्यायाचा प्रतिकार करण्याची शक्ती प्रदान केली. मानवी हक्काची जाणीव करून दिली. त्यामुळे जगाचे लक्ष त्यांच्याकडे वेधले. शस्त्रबळावर दडपू पाहणाऱ्या शक्तींनाही आत्मचिंतन करायला लावले. म्हणूनच, आज देशादेशांत त्यांचा प्रभाव वाढत चालला आहे. गांधीजींनी ब्रिटिशांच्या म्हणजे शत्रूच्या कायद्याचे पालन करून असहकार, सत्याग्रह अशा नाममात्र साधनांनी देशाला स्वतंत्र केले.

जिव्हानियंत्रणाचे महत्त्व गांधीजी जाणत होते. जिव्हा स्वादप्रिय असते. सर्व इंद्रियांना वश करण्याचे सामर्थ्य तिच्यात असते. उपवास म्हणजे आहार टाळणे नसून स्थितप्रज्ञ होण्याचा मार्ग आहे. आत्मजागृतीचा मार्ग आहे. गांधीजींनी त्याचाही राजकारणात लोकनियंत्रणासाठी समर्थपणे व कुशलतेने उपयोग केला. याद्वारे सर्व देशाला संयम शिकविण्याचा त्यांचा हा प्रयोग होता.

'ते ईश्वरवादी होते. परंतु, भारतातील भिन्नभिन्न धर्माला, जातींना, संप्रदायांना एकत्र आणण्याचा सर्व-समताभावी असा त्यांचा दृष्टिकोन होता. ते तटस्थ कार्यकर्ता होते. पण, राष्ट्राला त्यांनी कार्यप्रवण केले. ते अहिंसक होते; परंतु दुबळेपणा, भेकडपणाचा संदेश राष्ट्राला त्यांनी कधीही दिला नाही. कारण, 'अहिंसा' हा शब्द हिंसेपासून विरत होण्याची (भित्रेपणाची नव्हे) शिकवण देतो.

गांधीजींना बहुजनाला, ग्रामीण शेतकरी, कामकरी, मजुरांना जागृत करायचे होते. त्यांच्या मनातली गुलामी दूर करून आत्मविश्वास जागृत करायचा होता. त्यांच्या कष्टाला मोल प्राप्त करून द्यायचे होते. म्हणून, त्यांनी चरख्याद्वारे सूत्रयज्ञ सुरू केला. चरखा केवळ सूत्रयज्ञ नसून स्वावलंबनाचा पाया आहे. यंत्रयुगामुळे ग्रामीणांचे जीवन ढवळून निघत होते. म्हणून, त्यांनी स्वदेशीचा, खादीचा पुरस्कार केला. स्वत: खादी वापरून लोकांपुढे साधेपणाचा आदर्श उभा केला. जर गांधीजींचा स्वदेशी व्यवहार विसरला गेला नसता, तर देश आज कर्जबाजारी झाला नसता. आर्थिक सुबत्ता खेड्यांकडून शहरांकडे जावी, हीच त्यांची भावना होती. परंतु, राष्ट्राने त्यांच्या सूत्रयथांचे मनापासून समर्थन केले नाही. गांधीजी आपल्या खादी वेशातच गोलमेज परिषदेला इंग्लंडमध्ये जाऊन आले. मात्र, आपल्या लोकसभेत सामान्यांनी निवडून दिलेल्या असामान्य प्रतिनिधींना आपली राष्ट्रीय वेशभूषा धारण करायला लाज वाटते. गांधीजी टाचणी, सुई, कागदाचा तुकडा अशा वस्तू काळजीने जतन करीत व वापरत. टाकाऊमधून टिकाऊ शोधत आणि आज आलिशान

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बंगल्यात देशाच्या पैशांवर टिकाऊही टाकून देत आहेत. ते लाखांच्या आलिशान बंगल्यात राहतात. सर्व सुविधा प्राप्त करून घेतात. गावात राहणाऱ्या भारतमातेचे कोणत्या कोटीचे ते प्रतिनिधी आहेत?

माजी पंतप्रधान स्व. लालबहादूर शास्त्रीजी जीवनभर गांधी विचारसरणीचे अनुवादी बनून राहिले. पंतप्रधानपदावर असतानाही त्यांनी मानवीय गुण आणि भारतीय संस्कृती सोडली नाही. श्रीमती ललिता शास्त्री यांना माझे मंगल आशीर्वाद आहेत.

मुनिश्रींच्या प्रवचनाने सर्व वातावरण गांधीमय झाले होते. मुनिश्रींनी गांधीजींचे सर्व जीवनकार्य चलचित्रपटाप्रमाणे प्रभावी भाषेत दिग्दर्शित केले होते. मुनिश्रींच्या प्रवचनाची दखल दिल्लीतील सर्व वृत्तपत्रांनी तर घेतलीच; पण दिल्ली आकाशवाणीने प्रस्तुत प्रवचनाचा कार्यक्रम दि. ४ ऑक्टोबर १९६६ रोजी प्रसारित केला.

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

ॐ



प.पू. आचार्यश्री विद्यानन्दजी दिगम्बर जैन समाज में मान्य मनोज्ञ आचार्य परमेष्ठी हैं। सन् १९४५ में प.पू. आचार्यश्री महावीर कार्तिजी से क्षुल्लक दीक्षा लेकर आपने सुदीर्घ काल तक जैनदर्शन और अन्य भारतीय दर्शनों का मंथन-आड़ोलन कर अपनी प्रज्ञा को परिष्कृत किया। पश्चात सन् १९६३ में आचार्यरत्न श्री देशभूषणजी से मुनिदीक्षा ग्रहण की है। कन्नड़भाषी आचार्यश्री ने अनेक भाषायी ग्रन्थों के स्वाध्याय के साथ ही हिन्दी भाषा में साधिकार प्रवेश करके उच्च कोटि का साहित्य समाज को प्रदान किया हैं। आपकी चिन्तना ने जैनधर्म की प्रभावना हेतु राष्ट्रव्यापी अनेक कार्यो की प्रेरणा और उत्साह जागृति से जैन समाज को संलग्न किया है। भगवान महावीर का २५०० वाँ निर्वाण महोत्सव, भगवान वाहुवली सहस्राद्वी महोत्सव, कुन्दकुन्दाचार्य द्विसहस्राद्वि, महोत्सवों की श्रृंखला के कुछ नाम हैं, जो जिनधर्म प्रभावना के उत्प्रेरक रहे हैं। आचार्यश्री ने विद्वद् सम्मान भी कैसे करना इसकी शिक्षा समाज को दी। साहित्य के क्षेत्र में भी आपका योगदान स्फूर्तिदायक हैं। २५०० वें निर्वाण महोत्सव में आपकी गंभीर कार्यपद्धति को निकट से देखने का अवसर हमें भी प्राप्त हुआ है।

यद्यपि आचार्यश्री के कार्य ही उनके बहु आयामी व्यक्तित्व के परिचायक हैं तथापि उनके जीवनवृत्त, कार्यशैली, साहित्यिक योगदान आदि को एक साथ समझने की प्रस्तुति कर आचार्यश्री के अनन्य भक्त 'श्री सतीश जैन' ने उनके जीवन के बहु आयामी व्यक्तित्व को जैसा निकट से देखा-जाना उसी को अपने श्रद्धामय भावों की अञ्जली समर्पित कर भक्ति का एक पुष्प आचार्यश्री को समर्पित किया है। आचार्यश्री के जीवन और बहुआयामी व्यक्तित्व की सुरभि से आप्लावित यह ग्रन्थ श्री सतीशचन्द्र का लघु किन्तु सार्थक प्रयास है। आचार्य श्री के चरणों में शत-शत नमन एवं श्री सतीशजी को मंगल आशीर्वाद।

- आचार्यश्री वर्धमानसागर

('श्वेत पिच्छाचार्य का आध्यात्मिक क्षितिज' इस पुस्तक मे लिखी भावांजली)

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri



तस्मै श्री गुरवे नमः

"शैले-शैले न माणिक्यं मौक्तिकं न गजे गजे।
साधवो न हि सर्वत्र चंदनं न वने वने।।"

अर्थात् हर पर्वत में माणिक्य नहीं होते, हर हाथी में गज मोती नहीं होते और न ही हर वन में चंदन के वृक्ष हाते हैं, उसी प्रकार विद्वान् साधु भी सभी जगह नहीं पाये जाते हैं।

परमपूज्य गुरुदेव श्वेतपिच्छाचार्य आचार्यश्री विद्यानन्द जी मुनिराज के सान्निध्य में रहकर ज्ञानार्जन का अनुभव मुझे जो यहाँ मिला वो अविस्मरणीय है। मैंने अनेक संघों, मुनि-आचार्यों के पास एवं वयोवृद्ध आर्यिकाओं के पास विद्याध्ययन किया किन्तु जो ज्ञान का लाभ आचार्यश्री की सन्निधि में २१ वर्षों से अनवरत प्राप्त हो रहा है, उसे मैं पौद्गलिक शब्दों से व्याख्यान नहीं कर सकता हूँ क्योंकि अक्षर से अनुभव महान् होता है। कहा भी है-

"अनुभव चिंतामणि रतन, अनुभव है रसकूप।
अनुभव मारग मोख को, अनुभव मोखस्वरूप।।"

(समयसार नाटक)

आचार्यश्री अभीक्ष्ण ज्ञानोपयोगी एवं इस युग के महान् संत हैं। ८७ वर्ष की उम्र में भी हजारो श्लोक, गाथाएँ, कारिकायें, सूत्रादि अभी भी कण्ठस्थ हैं। आचार्यश्री की सबसे बड़ी विशेषता यह है कि वे ज्ञानसंबंधी बातों को छोड़कर अन्य विषयों में कभी भी चर्चा नहीं करते हैं। प्रत्येक समय उनकी वाणी से जिनवाणी का रसास्वादन अनवरत होता है। वाणी में जिनवाणी, हृदय में जिनदेव के प्रति अगाध श्रद्धा, चरणकमलों में मोक्षमार्ग को प्राप्त करने का प्रबल पुरुषार्थ प्रत्येक समय झलकता है। ऐसे अनेक गुणों से समृद्ध एवं सम्पन्न पूज्यश्री के दर्शनों के लिए देश-विदेश के सभी दर्शनार्थी लालायित रहते हैं। मैं परम सौभाग्य कहूँ या पूर्वजन्म का सातिशय पुण्य जिसके कारण ऐसे परम निःस्पृही, आत्मानुशासक, समाज एवं धर्म के परम हितैषी गुरुदेव के चरणकमलों में रहकर ज्ञानामृत का पान करने का अवसर मुझे मिला।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

जब गुरुवर ने अपने वरद् हस्त से १९ अप्रैल, १९९८ में मुझे उपाध्याय दीक्षा प्रदान कर अपना शिष्यत्व और निकटतम बनाकर विद्यारूपी आनन्द के सरिता में स्नान कराया तब वह क्षण मेरे जीवन का अनमोल क्षण था। कहा भी है-

"आत्मानं स्नापयेन्नित्यं ज्ञाननीरेण चारुणा।
येन निर्मलतां याति, जीवो जन्मान्तरेष्वपि।।"

-(सारसमुच्चय), ३१४)

पवित्र ज्ञानरूपी जल से आत्मा को नित्य स्नान कराना चाहिये, जिससे यह आत्मा भवान्तरों में भी कर्मरूपी मैल से छूटकर निर्मल हो जाता है। जिनेन्द्र भगवान की ज्ञान गंगा में स्नान करने का परम सौभाग्य गुरुदेव के पावन चरणों में सम्भव हो सका। किसी ज्ञान पिपासु को क्षीरसागर समान सरोवर मिल जाए तो उसके आनन्द का पार नहीं रहेगा। ऐसा ही कुछ मेरे जीवन में हुआ। पूज्य गुरुदेव ने ८ दिसम्बर २००६ को अपने पावन करकमलों द्वारा अनुभव का अमृत पिलाते हुए मुझे एलाचार्य दीक्षा प्रदान की। गुरुदेव की मुझ पर असीम कृपा है जिसे मैं जन्म-जन्मान्तर में भूला नहीं सकता हूँ। पूज्य गुरुवर का आशीर्वाद अपने इस शिष्य पर सदा बना रहे इसी भावना के साथ त्रयभक्ति सहित त्रिवार नमोस्तु कर धर्मानुरागी श्री सतीश जैन द्वारा आचार्यश्री के जीवन पर आधारित 'श्वेतपिच्छाचार्य का आध्यात्मिक क्षितिज' कृति प्रकाशित की जा रही है, श्री सतीश जैन द्वारा लिखित जो सभी के लिए प्रेरणादायक है।

-एलाचार्य श्रुतसागर मुनि

('श्वेत पिच्छाचार्य का आध्यात्मिक क्षितिज' इस पुस्तक मे लिखी भावांजली)

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

बहुजनहितकरचर्या

भगवान महावीर स्वामी की आचार्यत्व परम्परा अविरल रूप से प्रवहमान है। धरसेनाचार्य, कुन्दकुन्दाचार्य, जिनसेनाचार्य, वीरसेनाचार्य, उमास्वामी, अकलंकदेव, समन्तभद्र स्वामी, यतिवृषभाचार्य, गुणभद्राचार्य, अमितगति आचार्य आदि अनेक महान आचार्य हुए, जिन्होंने भगवान आदिनाथ से भगवान महावीर तक के तीर्थंकरों के द्वारा रखी हुई नींव को महल का सुन्दर शिखर रूप दिया। जैनमत को एक अच्छा नेतृत्व देने की भूमिका में जो आचार्यों का योगदान रहा, वह एक अद्वितीय एवं चिरस्मरणीय है। वर्तमान में इसी निर्ग्रंन्थ परम्परा में आचार्यश्री विद्यानन्द जी मुनिराज हैं जो जगविख्यात हैं।

उगता हुआ सूरज, बहता हुआ पानी, फैलती हुई चाँदनी, खिलता हुआ फूल परिचय के मोहताज नहीं होते हैं, उसी प्रकार परमपूज्य श्वेतपिच्छाचार्य आचार्यश्री विद्यानन्द जी मुनिराज को किसी परिचय की आवश्यकता नहीं है। उनका आदर्श जीवन ही एक पुराण है। ऐसे पुराणपुरुष के सान्निध्य में निरन्तर विगत् पाँच वर्षों से ज्ञानाराधना की अनुभूति निराली है। जिसका सहस्र जिह्वाओं से भी वर्णन नहीं किया जा सकता है। गुरुदेव की वात्सल्यमयी ज्ञानदान की शैली अन्यत्र कहीं भी दिखाई नहीं देती है।

"ते गुरु मेरे बन बसो, जे भव जलधि जिहाज।
आप तिरे पर तार ही ऐसे सिरी ऋषिराज।।"

अर्थात् वे गुरु मेरे मन में विराजमान हो जायें जो संसार रूपी सागर में जहाज की तरह स्वयं पार हो जायें और अन्य संसारी प्राणियों को भी पार लगाने में समर्थ हैं। ऐसे श्री ऋषिराज आचार्यश्री पर यह उक्ति चरितार्थ होती है। आचार्यश्री जीवन्त तीर्थ स्वरूप हैं। सम्पूर्ण त्यागी वर्गों के लिए आपका जीवन आदर्श स्वरूप है। पूज्य गुरुदेव के पास प्रतिक्षण आध्यात्मिक अमृत का रसास्वादन एवं उनके अनुभव मेरे जीवन को कृतार्थ करने के लिए पर्याप्त है। सभी द्वन्दों से मुक्त कुन्दकुन्द भारती में गुरुदेव के सन्निधि में ज्ञानामृत का पान करना सर्वार्थसिद्धि के देवों के अनुभव से भी महान है। कहा भी है-

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

''सर्वद्वन्दं परित्यज्य निवृत्तेनान्तरात्मना।
ज्ञानामृतं सदा पेयं चित्ताह्लादनमुत्तमम्।।''

-(सारसमुच्चय, १२)

अन्तरात्मा सम्यग्दृष्टि को निश्चित होकर, सर्व सांसारिक उपाधियों को त्यागकर चित्त को आनन्दकारक उत्तम आत्मध्यान से उत्पन्न ज्ञानामृत का पान करना चाहिये।

इसके लिए पूज्य गुरुदेव ही पर्याप्त है। आचार्यश्री 'चलते फिरते विश्वविद्यालय' हैं ऐसा मैंने अब तक सुना था किन्तु अब अनुभव किया है। आचार्यश्री आध्यात्मिक, धार्मिक, सैद्धान्तिक, न्याय, व्याकरण आदि अनेक विषयों में परांगत तथा प्राकृत, अपभ्रंश, संस्कृत, हिन्दी, कन्नड़, मराठी आदि अनेक भाषाओं के ज्ञाता भी हैं। आचार्यश्री का चिंतन, स्व-परकल्याण कारक है। आज वर्तमान में जो जैनधर्म एवं दिगम्बर जैन समाज का देश-विदेश में प्रचार-प्रसार हुआ या हो रहा है उस सबका श्रेय पूज्य गुरुदेव को ही जाता है। मेरा प्रबल पुण्य का उदय है कि ऐसे अद्वितीय आचार्यश्री के चरणों में रहकर अध्ययन एवं वैय्यावृत्ति करने का अवसर प्राप्त हो रहा हैं। मैं उनका अन्तेवासी शिष्य बनकर रहूँ ऐसी परम असीम कृपा पूज्य गुरुदेव हमेशा बनाए रखें, यही मेरी अंतरंग भावना है।

धर्मानुरागी सतीश जैन जो आचार्यश्री के परम अनन्य भक्त हैं। इन्होंने बहुत अथक प्रयास से 'श्वेतापिच्छाचार्य का आध्यात्मिक क्षितिज' नामक अनमोल कृति की रचना की है। सिन्धु को एक बिन्दु में समेटने का जो यह सफल प्रयास किया वह सुधी पाठकों के लिए विद्या के आनन्द का स्रोत रहेगा।

-उपाध्याय प्रज्ञसागर मुनि

('श्वेत पिच्छाचार्य का आध्यात्मिक क्षितिज' इस पुस्तक मे लिखी भावांजली)

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

मोरपंख प्रतिबंध विधेयक के मसौदे में फेरबदल होगा

इ.स. २०१० मध्ये वन्य जीवांचे रक्षण करण्याच्या हेतूने केंद्र सरकारच्या पर्यावरण मंत्रालयाने मयूरपंख-मोरपंखांच्या वापरावर बंदी आणणारे विधायक आणले होते. त्यामुळे मोरपंखाची पिंछीवरच गदा येणार होती. तथापि, आचार्य विद्यानंदांसह सर्व दिगंबर जैन साधूसंघांनी त्याला विरोध केला. केंद्र सरकारने त्याचा विचार करून विधेयकाच्या मसुद्यातील काही मुद्यांचा पुनर्विचार करण्याचे ठरविले. त्या संदर्भातील प्रस्तुत लेख. या संदर्भात मयूरपंखाच्या मोरांनी स्वयंस्फूर्तीने सोडून दिलेल्या पंखापासून बनविलेल्या पिंछी (कमंडलू) संदर्भात एक पुस्तिकाही प्रकाशित केली होती. भ. श्रीकृष्णही हे मोरपंख वापरीत, त्याचेही संदर्भ दिलेत.

नई दिल्ली, ४ जुलाई, २०१० वार्ता। मयूर पंख विधेयक को लेकर उत्पन्न धार्मिक विवाद और जन असंतोष को देखते हुए सरकार ने इस विधेयक के कुछ प्रावधानों में फेरबदल करने का फैसला किया है ताकि किसी समुदाय की धार्मिक परम्पराएँ एवं भावनाएँ आहत नहीं हों।

उच्च पदस्थ सूत्रों के अनुसार इस प्रस्ताविक विधेयक के कुछ प्रावधानों को लेकर विशेष तौर पर जैन समाज से उन्होंने आपत्तियाँ दर्ज की थी। उनमें से अनेक आपत्तियों को तर्कसंगत मानते हुए अब इस विधेयक के कुछ प्रावधानों में केन्द्रीय पर्यावरण मंत्रालय ने उचित फेरबदल करने का मन बना लिया है। इस दिशा में सरकार ने विचार-विमर्श भी शुरू कर दिया है।

सूत्रों के अनुसार विधेयक राष्ट्रीय पक्षी मोर के संरक्षण की मंशा से लाया जा रहा है लेकिन सरकार यह पूरी तरह से सुनिश्चित करेगी कि प्रस्तावित कानून से किसी भी धार्मिक समुदाय की भावना आहत नहीं हो और उनकी परम्पराएँ बाधित नहीं हों।

विधेयक के मसौदे पर विभिन्न वर्गों से मांगे गये सुझावों के बाद अब मंत्रालय ने मसौदे के उस प्रावधान से भी साधु-संतों को छूट देने का मन बना लिया है, जिसके तहत कानून बनाने के छह माह के अंदर मयूर पंख या उससे बने उत्पाद रखने वाले व्यक्तियों को उनकी घोषणा मुख्य वन संरक्षक के

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सम्मुख करनी होगी।

सूत्रों के अनुसार निश्चय ही मंत्रालय इस पूरे मामले में अतिसंवेदनशीलता बरत कर आगे बढ़ रहा है तथा सभी सही सुझावों का वह सम्मान करेगा।

विधेयक के मसौदे पर जनता के सुझाव मांगे गये थे, इसके बाद जैन समाज ने बड़े पैमाने पर यह मामला उठाया और मंत्रालय ने अब उनकी धार्मिक भावनाओं का संग्यान लेने का आश्वासन दिया है।

दिल्ली जैन श्रावक व उद्यमी सुनील कुमार जैन के अनुसार जैन साधु-साध्वी प्राचीन काल से मयूर पंख से बनी पिच्छियों का इस्तेमाल अपने तप साधना में करते रहे है।

आचार्य विद्यानन्द, आचार्य विद्यासागर सरीखे तपस्वी साधु-संत कठोर तप साधना करके समाज का पथ-प्रदर्शन कर रहे हैं, उनकी तपश्चर्या निर्बाध रूप से चलती रहे यह सुनिश्चित किया जाना चाहिए, उन्हें उम्मीद है कि सरकार इस पहलू पर जैन समाज की चिन्ताओं को समझेगी।

वन्य जीव संरक्षण, अधिनियम १९७२ में संशोधन कर प्रस्तावित वन्य जीव संरक्षण संशोधन अध्यादेश २०१० में इस संबंध में उचित प्रावधान शामिल करने का प्रस्ताव है, इसके तहत मयूर पंखों अथवा उससे बने उत्पाद के इस्तेमाल पर बिक्री पर रोक लगाने का प्रस्ताव है लेकिन मसौदे पर धार्मिक भावनाओं का संग्यान लेते हुए मंत्रालय ने पहले चरण में धार्मिक उपयोग के लिये मयूर पंखों के इस्तेमाल पर छूट देने का फैसला किया था, जिस संबंध में केन्द्रीय विधि मंत्रालय को नोट भजने वाला था।

सूत्रों के अनुसार विधेयक में जैन समाज की धार्मिक परम्पराओं के बाधित होने की आशंका से चिंतित जैन समाज की तरफ से मंत्रालय को बड़ी तादाद में ज्ञापन मिल रहे है। जैन समाज के एक प्रवक्ता के अनुसार मयूर पंख प्रतिबंध लगाये जाने के इस विधेयक को लेकर सरकार ने हालाँकि उनकी अनेक चिंताओं का निराकरण करने का आवासन दिया है लेकिन काफी चिंताओं का निराकरण अभी बाकी है। एक प्रवक्ता के अनुसार दरअसल जैन साधु-साध्वियों कि मयूर पंखों से बनी पिच्छिकायें उन मयूर पंखों से बनती है जिन्हें मोर स्वतः ही छोड़ता है या विसर्जित करता है। अहिंसा प्रेमी जैन समाज भी केवल मोरों के संरक्षण का पक्षधर ही नहीं अपितु सूक्ष्म से सूक्ष्म जीव के संरक्षण का पक्षधर है लेकिन सरकार की इस संरक्षण नीति में धार्मिक परम्पराएँ बाधित नहीं हो यह भी सुनिश्चित करें।

जैन समाज छरतपूर के प्रवक्ता राजेश बडकुल के अनुसार पवित्र जैनधर्म के आचरण प्रतिपादक धर्मशास्त्रों के अनुसार दिगम्बर जैन श्रमण परम्परा मान्य साधु गण एवं साध्वीगण भी उठते-बैठते वस्तुओं को ग्रहण करते या उन्हें रखते समय अनादिकाल से मयूर के द्वारा स्वयं ही छोडे गये पूंछ के पंखों से निर्मित उपकरण पिच्छिका का उपयोग करते हैं। इसका उल्लेख जैन ग्रन्थों के साथ हिंन्दू ग्रन्थों में भी पाया जाता है।

दिगम्बर जैन लाल मन्दिर प्रबन्ध समिति के अध्यक्ष चक्रेश जैन के अनुसार दिगम्बर जैन श्रमण परम्परा के साधकों को दीक्षा प्रदान करते समय उपकरण रूप में मयूर पिच्छिका एवं कमण्डल जैन श्रावकों द्वारा उपलब्ध कराया जाता है तथा प्रतिवर्ष वर्षायोग चातुर्मास के समापन के समय मयूर पंख से

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

निर्मित नूतन पिच्छिका को श्रावकगण देश में विराजित लगभग २-३ हजार साधुओ-साध्वीओ आदि को समर्पित करते हैं और वे साधक अपनी पुरानी पिंच्छिका को संयम आदि को ग्रहण करनेवाले गृहस्थों आदिको आशीर्वाद के रूप में प्रदान कर देते है। अखिल भारतीय दिगम्बर जैन महासमिति के अध्यक्ष निर्मल कुमार सेठी के अनुसार इस प्रस्तावित अध्यादेश के अनुसार जब मयूर की पूंछ के पंखों को विक्रय प्रतिबंधित किया जाता है तो जैन श्रमण परम्परा के साधकों के उपयोग में आने वाले मयूर पंखों की उपलब्धता कैसे एवं कहाँ से हो सकेगी अतएव पंखो को उपलब्ध कराने का कार्य केन्द्रीय सरकार पर्यावरण एवं वन मंत्रालय के द्वारा अधिकृत कोई व्यक्ति, संस्था, एजेंसी या अन्य किसी माध्यम से देश के प्रत्येक राज्यों में मयूर पंखों को प्राप्त कराने की सुगम व्यवस्था भी प्रस्तावित विधेयक में सुनिश्चित कराई जानी चाहिए।

(साभार-न्यूज एजेन्सी, यूनीवार्ता)

- शोभना जैन

प्रेषक - सतीश जैन (आकाशवाणी)

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

नारायण श्रीकृष्ण और मयूरपिच्छ

- आचार्य विद्यानन्द मुनि

मंगलाचरण

'मयूरपिच्छचूडं च, मालतीमाल्यमंडितम्।
सूनसं सस्मितं कान्तं, भक्तानुग्रह कारणेम्।।' (देवी भागवत, ९/२/१९)

भावार्थ :- मोर पंख को सिर के बालों में लगाने वाले, मालती की मालाओं से सुशोभित, सुन्दर नासिका वाले, मधुर मुस्कान से युक्त, मनोहर, भक्तों पर अनुग्रह करने वाले नारायण श्रीकृष्ण की हम वन्दना करते हैं।

स्वयंपतित मयूरपिच्छ अपने स्वामी मयूर से कहते हैं-

हे मयूर मित्र ! तुम अपने पंखों को गिरा रहे हो, निस्सन्देह अपने को शोभा से वंचित कर रहे हो। जैसे तारांगण आकाश के सौन्दर्यवर्धक हैं वैसे हम तुम्हारे सौन्दर्य को सम्पन्न करने वाले हैं। अस्तु, तुमने हमें छोड़ दिया तो क्या! देखो, हम आज भी यदुवंशमणि श्रीकृष्ण के मुकुट की छवि है और जिन्होंने सम्पूर्ण राजपरिग्रह का परित्याग कर दिया है, उन मुनियों के हाथ में शोभा पाते हो। मयूरपिच्छि के लोम वायु के अल्प स्पर्श से भी आन्दोलित हो उठते हैं और मन भी लोकसम्पर्क से चलायमान होने लगता है। अत: मन स्थैर्य के लिए लोकसम्पर्क निषेध का पाठ पिच्छि से प्राप्त होता रहता है।

'फलप्रवालस्तबकसुमनः पिच्छधातुभिः।
काचगुञ्जामणिस्वर्णभूविता अप्यभूषयन्।।'

(भागवत महापुराण, १०/१२/०४)

अर्थ :- यद्यपि वे सभी गोप बालक काच, गुंजामणि तथा सुवर्ण के आभूषणों से आभूषित थे तथापि उन्होंने अपने आपको विविध प्रकार के फल-पत्ते, पुष्पगुच्छ, मयूरपिच्छ और गेरु आदि धातुओं से अलङ्कृत कर रखा था।

'बर्हापीडं नटवरवपुं कर्णयोः कर्णिकारं। बिभ्रद् वासः कनककपिशं वैजयन्ती च मालाम्।
रन्ध्रान् वेणोरधरसुधया पूरयन् गोपवृन्दैर्वृन्दारण्यं स्वपरमणं प्राविशद् गीतकीर्तिः।।'

-(वही, १०/२१/०५)

अर्थ :- मोर पंख का मुकुट धारण किए, कानों में कनेर का फूल लगाए, सुवर्ण के समान दीप्त पीताम्बर पहने, गले में वैजयन्ती माला धारण किए नटवर श्रीकृष्ण ने बांसुरी के छिद्रों को अपने अधरामृत से पूर्ण करते हुए ग्वाल बालों के साथ अपने चरणचिन्हों से सुशोभित वृन्दावन में प्रवेश किया।

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

'चूतप्रवालबर्हस्तबकोत्पलाब्जमालानुपृक्तपरिधानविचित्रवेषौ।
मध्येविरेजतुरलं पशुपालगोष्ठ्यां, रङ्गेथा नटवरौ क्व च गायमानौ।।'

(वही, १०/२१/०८)

अर्थ :- अहो नूतन आम्र पल्लव, मयूरपिच्छ, पुष्प गुच्छ तथा स्थल जल में उत्पन्न होने वाले कमलों की मालाओं का धारण किए हुए बलराम और श्रीकृष्ण जब कभी गोपबालों के बीच गान करते तब यही प्रतीत होता है, कि कोई दो श्रेष्ठ नट रंगभूमि में गा रहे हैं।

'श्यामं हिरण्यपरिधिं वनमाल्यबर्हधातुप्रवालनटवेषमनुव्रतांसे
विन्यस्तहस्तमितरेण धुनानमब्जं, कर्णोत्पलालककपोलमुखाब्जहासम्।।'

(वही, १०/२३/२२)

अर्थ :- नारायण का श्याम शरीर था, वे स्वर्ण वर्ण का पीताम्बर पहने थे, नवीन पुष्पों की माला, मयूरपिच्छ, चित्र-विचित्र धातुओं एवं नव पल्लवों से अपना नटवर वेष बनाए हुए थे।

'बर्हिणस्तबकधातुपलाशैः, बद्धमल्लपरिबर्हविडम्बः
कर्हिचित् सबल आलि स गोपैर्गाः, समाह्वयति यत्र मुकुन्दः।।'

(वही, १०/३५/०६)

अर्थ :- हे सखी! जब कभी मयूरपिच्छ, पुष्पगुच्छ, गेरु आदि धातुओं और कोमल पल्लवों से पहलवानों का वेष बनाए हमारे श्रीकृष्ण, बलरामजी एवं अन्य ग्वाल-बालों के साथ गउवों को पुकारते हैं तब वायु से उड़ाए गए उनके चरणरज को पाने की लालसा से यमुना जी की गति तक रुक जाती है।

जनसमूह को यह विदित है कि नारायण श्रीकृष्ण के जन्म के सुअवसर पर जन्माष्टमी पर्व मनाया जाता है, जिसमें बच्चों के माथे पर मयूर पंख लगाकर उनके संस्कार किये जाते हैं एवं निर्ग्रन्थ साधु भी मयूरपिच्छी को जीव रक्षा हेतु उपयोग में लाते है। यह परम्परा प्राचीन काल से चली आ रही है। जिसे अब परिवर्तन नहीं किया जा सकता है। इसस बात पर सरकार के मंत्री व उच्चधिकारियों को गहराई से चिन्तन करना चाहिये और हमारे देश की संस्कृति की रक्षा करनी चाहिये। इसलिये मयूरपंख पर अनुचित रूप से प्रतिबन्ध न लगाया जाये और इस सम्प्रदाय-निरपेक्ष राज्य में वैष्णव धर्म की परम्परा में हस्तक्षेप न किया जाये। सारांश यह है कि मुद्रा चाहे शासन वर्ग का हो या धार्मिक वर्ग का हो, उसमें सरकार को किसी प्रकार से हस्तक्षेप नहीं करना चाहिए-

मुद्रा सर्वत्र मान्यास्यान्निर्मुद्रो नैव मन्यते।
राजमुद्राधरोऽत्यंतहीनवच्छास्त्रनिर्णयः ।। (नीतिसार, ७७)

अर्थ :- मुद्रा की सर्वत्र मान्यता होती है, मुद्राहीन की नहीं। राजा की राजमुद्रा को धारण करने वाला अत्यन्त हीन भी राजा माना जाता है, यह नीति शास्त्र का निर्णय है।

प्रेषक - सतीश जैन (आकाशवाणी)

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दिगम्बर जैन समाज ने भारत सरकार के प्रति कृतज्ञता ज्ञापित की।

११ जुलाई, २०१०, दिल्ली। केन्द्रीय पर्यावरण एवं वन मंत्रालय ने विगत दिनों मयूर पंखों के व्यापार पर प्रतिबंध लगाने हेतु एक सर्कुलर जारी किया था, जिसका कुन्दकुन्द भारती में विराजमान सिद्धान्तचक्रवर्ती परमपूज्य आचार्यश्री विद्यानन्द जी मुनिराज ने सख्त विरोध करते हुए मंत्रालय को पत्र लिखा था, जिस पर मंत्रालय ने उक्त सर्कुलर रद्द करने की घोषणा कर दी है। इस उपलक्ष्य में कुन्दकुन्द भारती में आयोजित समस्त दिगम्बर जैन समाज की बैठक में प्रस्ताव पारित कर भारत सरकार का आभार व्यक्त किया गया।

इस अवसर पर आचार्यश्री ने मयूर पंखों से निर्मित पिच्छि के महत्त्व पर प्रकाश डालते हुए कहा कि यह संयम एवं करुणा का श्रेष्ठ उपकरण है। प्रथम तीर्थंकर ऋषभदेव ने मुनि मार्ग को बाधा से बचाने के लिए इसे धारण किया था। प्राचीन काल से निर्ग्रन्थ साधु जीव रक्षा हेतु इसे उपयोग में लाते हैं। इसका उल्लेख वैदिक पुराण साहित्य सहित पद्मपुराण, विष्णुपुराण, स्कन्दपुराण, शिवपुराण में भी है। महादेव (शिव) व नारायण श्रीकृष्ण ने भी इसे धारण किया था। अहिंसा ही सबसे बड़ा धर्म है।

न्यासी श्री एस.के. जैन ने धन्यवाद प्रस्ताव पारित किया, श्री सुरेश चन्द्र जैन (अध्यक्ष) एवं श्री मुकेश कुमार जैन (मन्त्री) एवं उपस्थित जनसमुदाय से इसकी अनुमोदना की।

श्री प्रदीप जैन के भजनों द्वारा सभा का शुभारम्भ हुआ। पूज्य आचार्यश्री जी द्वारा समाज, धर्म, तीर्थ और साधु समुदाय पर समय-समय पर आई अनेक समस्याओं का अपनी योजनाबद्ध कार्य पद्धति, ज्ञान, तप और त्याग के बल पर समाधान निकाला। इस सम्बन्ध में सभा संचालन करते हुए श्री सतीश जैन (आकाशवाणी) ने संक्षिप्त प्रकाश डाला। कुमारी कपिला (पूर्वी) जैन ने सरकार द्वारा प्रसारित नये सर्कुलर को पढ़ कर सुनाया।

प्रेषक - सतीश जैन (आकाशवाणी)

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

श्वेतपिच्छाचार्य विद्यानंद ज्ञानप्रभावक प्रज्ञाशिरोमणी साधू

- डॉ. महावीर अक्कोळे, कोल्हापूर

माझे वडील डॉ. सुभाषचंद्र अक्कोळे यांना रविवार, दि. २५ जुलै २००४ रोजी नवी दिल्ली येथील कुंदकुंद भारती येथे विसाव्या शतकातील प्रथमाचार्य चारित्र्यचक्रवर्ती प.पू. आचार्यश्री शांतिसागर महाराजांच्या १३१ व्या जन्मजयंती महोत्सव 'संयमवर्ष' समारोहात सिद्धान्त चक्रवर्ती एलाचार्य प.पू. विद्यानंद महाराजांच्या पावन सान्निध्यात प्रतिष्ठेचा 'चारित्रचक्रवर्ती ' पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.

त्या वेळी केंद्रीय मंत्रिगण, महाराष्ट्र, कर्नाटक व उत्तरेतील, नवी दिल्ली येथील जैन समाजाचे बरेच विद्वान, विचारवंत, संशोधक, धर्मप्रेमी उपस्थित होते. तो पुरस्कार स्वीकारण्यासाठी माझे वडील व आई दोघे जायचे ठरले; तेव्हा त्या दोघांबरोबर त्यांची काळजी घेण्यासाठी आणि त्या दोघांच्या प्रकृतीवर लक्ष ठेवून फारसा त्रास न होऊ देण्यासाठी मलाही कुंदकुंद भारतीला जाण्याचा योग आला. त्याआधी जयसिंगपूर, सांगली, कोल्हापूर, इचलकरंजी आदी ठिकाणी विद्यानंद मुनिमहाराजांना मी लांबूनच बघत आलो होते आणि कधीतरी गर्दीतून त्यांच्यापुढे जाऊन नतमस्तक होऊन दर्शनही घेतले होते. पण, २००४ च्या दिल्ली यात्रेत मला स्वतःला झालेला सर्वांत मोठा मौल्यवान आणि अलौकिक लाभ म्हणजे प.पू. आचार्य विद्यानंद महाराजांसोबत तब्बल चार दिवस राहण्याची संधी मिळाली. तोपर्यंत मला न घडलेले एक नवेच चैतन्यदायी दर्शन या काळात घडले. जगाकडे, समाजाकडे, इतरांकडे नि स्वतःकडे पाहण्याची एक नवीच दृष्टी महाराजांनी मला दिली. त्यानंतर, बऱ्याचदा ठरवूनही कुंदकुंद भारतीला जाण्याचा योग आला नाही. पण, त्या वेळचे ते सारे सुवर्णक्षण मी मनाच्या कप्प्यात तसेच जपून ठेवले आहेत. ताजे, टवटवीत नि आठवण काढली की मन प्रसन्न करणारे ते क्षण!

त्या वेळी महाराजांकडून मला एवढे सगळे मिळाले, याचा अर्थ मी महाराजांसोबत

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

धर्मतत्त्वांसंबंधी प्रदीर्घ अशी क्लिष्ट चर्चा केली वा त्यांच्या मुखातून ऐकली, असा मुळीच नाही. दिल्लीस गेल्यापासून ते कुंदकुंद भारतीचा निरोप घेण्याच्या क्षणापर्यंतचे ते चार दिवस मी फक्त आचार्यश्री विद्यानंद नावाच्या एका 'आगम चक्खू साहू'च्या सकाळपासून संध्याकाळपर्यंतच्या विहार-आहाराचे, आचार-विचारांचे निरीक्षण, दर्शन, मनन, चिंतन करीत होतो. मध्येच कधी त्यांच्यासोबत फिरण्याचे, बसण्याउठण्याचे, गप्पागोष्टी करण्याचे, त्यांच्या विवेचन-प्रवचनाचे शब्द ऐकण्याचे-ते मनात साठवून ठेवण्याचे जेजे क्षण लाभले; त्यातून विद्यानंद महाराज मला अधिकाधिक भावत गेले, समजत गेले. हृदयात त्यांचे, त्यांच्या खास शैलीतले सहज, सोपे धर्मतत्त्वज्ञान मनात खोलवर रुजत गेले.

'आचार्यश्री विद्यानंद मुनी' हे माझ्या वडिलांच्या मनात परमश्रद्धेचे स्थान का बनून राहिले होते, याचेही रहस्य मला त्या काळात उलगडले. खरेतर, त्या काळात मी धार्मिक पर्यावरणात फारसा रमणारा माणूस नव्हतो पण महाराजांजवळ राहून धर्म समजून घेताना...

"जैन तत्त्वांचा, परंपरांचा खऱ्या अर्थाने स्वीकार करून, त्या संचिताचे संदर्भ घेऊन त्याच्यातून समाजासाठी एक वेगळेच सम्यक्संस्कार उपलब्ध करून ते नावीन्यपूर्ण पद्धतीने बोलण्यात, प्रवचनात व आचरणात आणणारा एक प्रतिभावंत क्रांतिकारक मुनी मला त्यांच्या व्यक्तित्वात स्पष्टपणे जाणवला."

अद्भूत जीवनप्रवास :

२२ एप्रिल १९२५ रोजी कर्नाटकातील शेडबाळ येथे माता सरस्वती उपाध्ये आणि पिता कल्लाप्पाणा यांच्या पोटी 'सुरेंद्र' या बालकाने जन्म घेतला. आपल्या पुढच्या आयुष्यात अविरत विद्याध्ययन, तत्त्वचिंतन नि संयम यांची अद्भूत साधना करीत सुरेंद्रने १५ एप्रिल १९४६ रोजी तमदड्डी (कर्नाटक) येथे आचार्यश्री महावीरकीर्ती महाराजांकडून जिनेश्वरी क्षुल्लकदीक्षा घेऊन क्षुल्लकश्री पार्श्वकीर्ती नाव धारण केले. त्यानंतरही महाराजांचा प्रवास ज्ञानाभ्यास, संयम साधना नि आत्मचिंतनाच्या वाटेवरून अखंड चालूच राहिला. दि. २५ जुलै १९६३ रोजी क्षु. पार्श्वकीर्तींनी दिल्ली येथे प.पू. आचार्यश्री देशभूषण महाराजांकडून निर्ग्रंथ मुनिदीक्षा घेतली.

ते मुनिश्री विद्यानंद झाले; त्या ऐतिहासिक गोष्टीला आता ५० वर्षे झाली. आत्मोन्नतीच्या व स्वबरोबर परकल्याणाच्या निरंतर मार्गक्रमणेत विद्यानंद मुनी उपाध्यायपद (१७ नोव्हेंबर १९७४), एलाचार्यपद (१७ नोव्हेंबर १९७८) आणि आचार्यपद (२८ जून १९८७) अशा मुनिसाधनेच्या उन्नत पायऱ्या चढत राहिले; ते धर्मशास्त्रांचा गहन अभ्यास, साहित्य पठण, जैन संस्कृती व इतिहासाचे सखोल अन्वेषण यांच्या अध्ययनात मग्न राहूनच! ६ नोव्हेंबर १९७९ रोजी मध्य प्रदेशातील इंदूर येथे ज्या वेळी मुनिचतु:संघाकडून विद्यानंदमुनी 'सिद्धान्त चक्रवर्ती'

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

या उपाधीने विभूषित झाले; तेव्हाच खऱ्या अर्थाने ते राष्ट्रसंत म्हणून भारतभूमीच्या क्षितिजावर झळकू लागले. सर्वधर्मीय समाजाने त्यांना गुरू म्हणून मान्यता दिली.

ते केवळ जैन श्रमण परंपरेतील एक त्यागी धर्मगुरू नाहीत; तर संन्याशाची स्थितप्रज्ञता, तपस्व्याचं तेजोवलय आणि जीवनभर विद्यार्थिवृत्तीने जपलेली ज्ञानलालसा या तिन्ही गोष्टींचा एक अजब, अचूक आणि अपूर्व असा समतोल महाराजांच्या व्यक्तिमत्त्वात साधला गेला आहे. हे त्यांच्या राष्ट्रसंतत्वातलं वेगळेपण आहे. स्वतः एका प्राचीन धर्मपरंपरेचे पाईक म्हणून विशेष मान्यताप्राप्त असतानादेखील विद्यानंद महाराज सर्व धर्मांकडे आत्यंतिक आदरभावाने बघतात. त्यांच्या प्रवचनात सर्व धर्मांतल्या उत्तमोत्तम वचनांची, उत्तमोत्तम कथांची रेलचेल असते. आचार्यश्री जैन धर्म, दर्शन, साहित्य, इतिहास व परंपरा यांचे गाढे अभ्यासक आहेत; तरीही विशिष्ट अशा धार्मिक आणि सांप्रदायिक मान्यतांपेक्षा त्यांनी स्वतःला एका वेगळ्या उंचीवर नेल्यामुळे ते साऱ्याच समाजाचे गुरू झालेत. त्यांची प्रवचने-उपदेश नेहमी सार्वजनिक आणि सार्वकालिक असतात. त्यांच्या प्रवचनाला सर्वधर्मीयांची मोठी गर्दी होते. प्रत्येकाला असे मनापासून वाटत राहते की, आचार्यश्रींनी माझ्याच धर्मातले सारतत्त्व समाजापुढे मांडले आहे. अर्थात, जैन धर्मामध्ये ही विशेषता आहे म्हणूनच तो 'विश्व धर्म' म्हणून मान्यताप्राप्त आहे. आचार्यश्री विद्यानंदांना असा अतूट विश्वास आहे की, आज जगात मोठ्या प्रमाणावर ज्या विकृती फैलावताना आढळताहेत; त्या दूर करण्याची क्षमता फक्त जैन धर्मातच आहे.

जैन धर्मच संपूर्ण विश्वाचा धर्म होऊ शकतो. भ. महावीरांचा 'जगा व जगू द्या' अहिंसा, अपरिग्रह, अनेकान्तवाद, संयम हे सारे इतके महत्त्वाचे सिद्धान्त आहेत की, त्यांच्याद्वारे सर्वच राजकीय, सामाजिक व आर्थिक वगैरे अन्य समस्यांना प्रत्येकाचा आत्मसन्मान शाबूत राखून सहज सोडवता येतील, असे महाराजश्रींना वाटते.

विद्यानंद मुनींच्या धर्मप्रभावनेची व्यापकता :

आचार्य विद्यानंद महाराजांनी अखिल भारतवर्षात विहार करून जैन धर्मतत्त्वांचा प्रचार-प्रसार आणि साहित्य सृजनाचा आदर सत्कार करून जैन विद्वत्जनांमध्ये जैन धर्म दर्शन-साहित्यात रूची निर्माण करण्याचे खूप मोठे ऐतिहासिक कार्य केले आहे. धर्मचक्रप्रवर्तन, भ. महावीर २५०० वा निर्वाण महोत्सव, श्रवणबेळगोळचा भ. गोमटेश्वर सहस्राब्दी महामस्तकाभिषेक, जनमंगल कलशप्रवर्तन, इंदूरच्या गोमटगिरीची प्रतिष्ठापना, नवी दिल्ली येथील कुंदकुंद भारतीची स्थापना यासारखे भारतवर्षातील समस्त जैन समाजात नवचैतन्य निर्माण करणारे मोठे समारंभ आचार्यश्री विद्यानंदांच्याच प्रेरणेने व मार्गदर्शनाखाली संपन्न झाले. आज सर्वमान्य झालेल्या व भ. महावीरांच्या २५०० व्या निर्वाण महोत्सवावेळी समाजासमोर आलेल्या जैन प्रतीक व जैन ध्वज आणि आचार्य विनोबा भावेंनी अतिशय अभ्यास व

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

कष्टपूर्वक संकलित नि प्रकाशित केलेल्या 'समणसुत्तं' या ग्रंथाची समाजाला उपलब्धी या आचार्यश्री विद्यानंदाच्या महत्त्वपूर्ण योगदानातून जैन समाजाला मिळालेल्या अनुपम अशा भेटी आहेत. त्या कधी विसरताच येणार नाहीत.

विद्यानंद महाराज स्वतः संशोधक वृत्तीने अध्ययन करणारे आहेत. त्यांची चिकित्सक वृत्ती, अफाट वाचनाने आलेली ज्ञानसमृद्धी आणि अलौकिक प्रतिभेचा स्पर्श असलेली सर्जक संवेदनशीलता या सर्व गोष्टींचे अचंबित करणारे निर्मळ-तेजस्वी दर्शन त्यांच्याशी बोलताना सहजच होते. विद्यानंद महाराज हे विद्वानांची आणि विद्वत्तेची कदर करणारे व्यक्तिमत्त्व आहे. समाजातले विद्वान, साहित्यिक, संगीतसाधक, समाजसेवक अशा सर्वांचा त्यांची योग्यता, त्यांचे योगदान लक्षात घेऊन सन्मान व्हावा, या दृष्टीने महाराजांनी मेरठच्या वीरनिर्वाणभारती आणि बडौत येथे योजना राबवल्या व पूर्णत्वास नेल्या. महाराजांच्या कुशल नि द्रष्ट्या मार्गदर्शनाखाली विद्वत्जनांचा गौरव करून उचित धनराशीने त्यांना पुरस्कृत करण्याच्या दृष्टीने अहिंसा पुरस्कार, ब्राह्मी पुरस्कार, चारित्र्य चक्रवर्ती पुरस्कार, गोमटेश प्रशस्ती आदी देशपातळीवरील पुरस्कारांची प्रेरक परंपरा सुरू झाली आहे. महाराजांच्या कल्पक दृष्टिकोनातून जैन समाजाला प्रेरणा देणाऱ्या, समाजात जागृती निर्माण करणाऱ्या अनेक मोठमोठ्या संकल्पना साकार झाल्या. श्रुतपंचमी पर्व समारंभ, ब्राह्मी लिपीची सुरुवात, नवी दिल्लीतील आचार्य कुंदकुंद स्मृती व्याख्यानमाला, पंचदिवसीय समयसार वाचन पीयूष पर्व इ. काही उदाहरणे!

मला स्वतःला सर्वात भावलेले विद्यानंद महाराजांचे काम म्हणजे सम्राट खारवेल स्मृती सत्संग मंदिर व विशाल ग्रंथालयाचे निर्माण होय. जैन तत्त्वज्ञानात रूची असलेला कोणीही संशोधक येथे येऊन संशोधनकार्यात पूर्णपणे रममाण होऊ शकतो. त्याला कुठलीच कमी पडणार नाही, इतक्या प्रचंड संख्येने तेथे संदर्भग्रंथ उपलब्ध आहेत. कुंदकुंद भारतीतले छोटेखानी पण नितांत सुंदर जिन मंदिर महाराज द्रव्यपूजेपेक्षा भावपूजेचे भुकेले आहेत, याची साक्ष देत उभे आहे. हा आदर्श खरेतर सर्व त्यागींनी-सर्व श्रावकांनी घ्यावयास हवा. एखादे मोठे तीर्थस्थळ नव्याने उभारण्यापेक्षा विद्यानंद महाराजांनी बडवानी येथील

भ. आदिनाथांच्या प्राचीन ८४ फुटी महाकाय विशाल प्रतिमेचा जीर्णोद्धार करून प्रतिष्ठापना करण्यावर भर दिला, यातच त्यांच्या मुनिपदाचे मोठेपण दडलेले आहे. महाराजांच्या सशक्त नि कसदार लेखणीतून जवळपास ४० छोटे-मोठे ग्रंथ साकार झाले आहेत. त्यामधील पिंछी-कमंडलू, समयसार, धर्मनिरपेक्ष नही संप्रदायनिरपेक्ष, मोहन-जो-दरो और हडप्पा की संस्कृती, सम्राट खारवेल, सम्राट सिकंदर और कल्याणमुनी, सर्वोदय तीर्थ ही काही महत्त्वपूर्ण पुस्तके आहेत. कमीतकमी शब्दांत अधिकाधिक विस्तृत आणि सूक्ष्मातिसूक्ष्म सम्यक्भाव प्रकट करणे, हे महाराजांच्या लिखाणाचे वैशिष्ट्य म्हणावे लागेल. या लेखनातून महाराजांनी

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

केलेले संशोधन आणि प्रबोधनही युगप्रवर्तक ठरावे, असेच आहे. महाराजांच्या दीक्षेचे हे सुवर्णमहोत्सवी वर्ष 'ज्ञानवर्धनोत्सव वर्ष' म्हणून साजरे करण्याचे ठरले.

आत्मकल्याणाच्या वाटेवरचे विद्यानंद :

आचार्यश्री विद्यानंद महाराजांनी १९९९ मध्ये बडौत येथे नियमसल्लेखना घेतली. जैनाचार्यांचे जीवन खूप कठोर साधनेचे असते. आचार्यश्रींची दिनचर्या अवलोकन करताना माझे मन कितीतरी वेळा रोमांचित होऊन उठले. सकाळी उठल्यापासून रात्री निद्राधीन होईपर्यंत ते आत्मकल्याणाच्या कार्यात मग्न असतात. माझ्या कुंदकुंद भारतीच्या चार दिवसांच्या वास्तव्यात महाराजांनी मला समाजाकडे बघण्याची वेगळी दृष्टी दिली.

भल्या पहाटे खोलीबाहेरून 'महावीर...' अशी त्यांची हाक आली की, मी त्यांच्याबरोबर कुंदकुंद भारतीतल्या जंगलात फेरफटका मारायला जायचो. अनेक विषयांवर अनेक पैलू उलगडणारे त्यांचे भाष्य असायचे. किंचितही संदिग्धता नाही. त्यांच्याबरोबरचे संभाषण म्हणजे मन तृप्त करणारा ज्ञानविज्ञानाचा खजिनाच! एकदा मी ओघात महाराजांना म्हटले, ''महाराज, संपत्तीचे प्रदर्शन करणाऱ्या पंचकल्याणिकांमध्ये विद्वानांची थोडी उपेक्षाच होते. विद्वानांचा गौरव करण्याचे काम सुरू करून तुम्ही खूप महत्त्वाचे पाऊल उचललेय. त्यातून अनेकांना प्रेरणा मिळेल. चारित्र्यचक्रवर्ती पुरस्काराने दादांची (माझे वडील) आपले जीवन अगदी कृतकृत्य झाल्याची भावना झाली. त्यासंबंधात ते आपले ऋण वरचेवर व्यक्त करतात!''

त्यावर, महाराजांनी दिलेले उत्तर आजही माझ्या मनात कायमचे कोरून बसले आहे. महाराज म्हणाले, ''आम्ही नव्याने काही केले नाही. जो ज्ञानसंपन्न आहे, त्याचा नेहमीच आदर करावा. मग त्याचं वय, लिंग, जात कोणतीही असो, असे प्राचीन धर्मग्रंथात आधीच लिहून ठेवले आहे. सुभाषचंद्रांच्या मनात कृतज्ञता आहे नि कृतज्ञता ही सुसंस्कृतपणाची सर्वोच्च पायरी आहे. पण, हे संस्कार कुठल्याही विद्यापीठातून मिळत नाहीत, पुस्तके वाचूनही मिळत नाहीत; ते तुम्हाला अनायासेच मिळाले आहेत.''

आज महाराजांना आमच्यातले हे संभाषण आठवले की नाही माहीत नाही; कारण महाराजांना असे शेकडो-हजारो जण भेटत असतात, बोलत असतात. पण, मला ते सारे आठवते की, पुन्हा एकदा घरच्या साऱ्यांना घेऊन कुंदकुंद भारतीला जावे नि महाराजांचे पावन दर्शन घेऊन तृप्त व्हावे, अशी आस लागते. तो योग कधी येणार, कोणास ठाऊक!

पण, आचार्यश्री विद्यानंद मुनिमहाराजांना आमच्यासाठी खूपखूप दीर्घायुष्य व निरोगी जीवन प्राप्त होवो, अशी मनःकामना व्यक्त करून सविनय नमोस्तु करतो.

(जैन ऐतिहासिक : भाग-३ मधून साभार) भ्रमणध्वनी : ९९२२४४२४८०

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प.पू. सिद्धान्त चक्रवर्ती आचार्यश्री विद्यानंद महाराज

-श्रेणिक अन्नदाते

भारताची राजधानी दिल्लीस्थित कुतुबमिनार परिसरातील कुंदकुंद भारती ही संस्था सर्वश्रुत आणि बहुपरिचित आहे. अनेकांनी ती प्रत्यक्ष पाहिली नसली तरी तिचे छायाचित्र पाहिले असेल. तेथे चालणारे जैन धर्म-तत्त्वज्ञान-संस्कृतीसंबंधीचे उपक्रम यांची माहिती तर अनेकांना नक्कीच आहे. या संस्थेचे कल्पक, निर्माते आणि नियंत्रकही प.पू. आचार्यश्री विद्यानंद महाराज यांचा याच महिन्यात २२ एप्रिल २००९ रोजी जन्मदिन असतो. जैन आचार्यांच्या परंपरेतील या विद्यमान मुनिवर्यांना, आचार्यश्रींना यानिमित्त विनम्र अभिवादन!

कर्नाटक व महाराष्ट्र सीमेवरील शेडबाळ या गावी जन्मलेले आणि बालपणीच मराठी, कन्नड या दोन भाषांचा संस्कार घेऊन वाढलेले आचार्यश्री पुढे अनेक भाषांचे ज्ञाते तर झालेच, तथापि शौरसेनी प्राकृत भाषेला जनमानसात प्रतिष्ठित करून तिच्या अभ्यासासाठी समाजाला ठिकठिकाणी त्यांनी प्रवृत्त केले आणि भारताचा हा भाषिक प्राचीन ठेवा पुनरुज्जीवित केला. गेली पाच दशके आचार्यांनी एवढी बहुविध धर्मप्रभावना केली आहे, एवढ्या मोठ्या प्रमाणात सामाजिक प्रेरणा दिली आहे आणि अगणितांची व्यक्तिगत स्वरूपाची चेतना जागृत केली आहे की, त्यांची मोजदाद करताना दमछाक व्हावी.

भारताच्या विविध राज्यांतून विहार करीत असताना त्यांचे चौफेर सामाजिक निरीक्षण चालू होते. त्याचबरोबर अखंड स्वाध्याय आणि अध्ययनही जारी होते. धर्म, तत्त्वज्ञान, परंपरा, संस्कृती, इतिहास, पुरातत्त्व अशा विविध विषयांत सखोल आणि गंभीर अध्ययनाचे त्यांचे सातत्य अखंडित आणि अबाधित आहे. आज याचाही अनुभव घेता येतो आणि त्यांची नव्यानव्याचा शोध घेणारी नवनवोन्मेषशाली प्रतिभा पाहून अचंबित व्हायला होते. आगमिक संदर्भाशिवाय त्यांचे कोणतेही प्रवचन नसते, विवेचन नसते, लेखनही नसते. स्वाध्यायाबद्दल सांगताना सिद्धान्तसार या ग्रंथातील संदर्भ ते सांगतात :

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

''समस्त व्रतांचे मूळ व्रत स्वाध्याय आहे. स्वाध्याय परमतप आहे. स्वाध्यायाने ज्ञान प्रकट होते. या ज्ञानाने जीवादिक तत्त्वार्थाचे संग्रहण होते आणि याच तत्त्वार्थ परिज्ञानाने तत्त्वविषयक श्रद्धान उत्पन्न होते. रत्नत्रयाच्या मध्यभागी सम्यग्ज्ञान स्थित आहे. (सम्यग्दर्शन, सम्यग्ज्ञान, सम्यक्चारित्र्य) हे सम्यग्ज्ञान स्वाध्यायाचाच परिणाम आहे. या सम्यग्ज्ञानापासूनच सम्यक्चारित्र्य उत्पन्न होते. अशा रीतीने हा स्वाध्यायच सम्यग्दर्शन-ज्ञान आणि चारित्र्याचा मूल स्रोत आहे.''

असे आगमोक्त प्रतिपादन प.पू. आचार्यश्री करतात.

आचार्यश्री विद्यानंद म्हणजे वर्तमानकालीन श्रमण परंपरेतील एक क्रांतिकारी व्यक्तिमत्त्व आहे. अवडंबरांना बाजूला सारून शास्त्रानुसार जैन मुनिचर्या आचरण्याचा त्यांचा प्रघात काही श्रद्धाळूंना धक्कादायकच होता. भगवान महावीरांच्यावर चार भागांची कादंबरी लिहिणारे (अनुत्तरयोगी भगवान महावीर) श्री वीरेंद्रकुमार जैन यांच्याशी चर्चा करताना मुनिश्री एके ठिकाणी म्हणतात-

''हे बघा वीरेंद्रकुमार, मीही तुमच्यासारखाच लहानपणापासून विद्रोही आहे आणि आज ज्या स्थितीत आहे; तो त्याचाच परिणाम आहे. माझ्यावरही काही वर्षांपूर्वी असेच एक संकट आले होते. परंपरागत काही अंधश्रद्धाळू वृत्तीने-या साधूंचा आहार बंद करा, विहार बंद करा- असेही म्हटले जात होते. हे साधू इतर धर्मांबद्दलही बोलतात, प्रवचन करतात. तथापि, मी डगमगलो नाही म्हणूनच मी आज इथपर्यंत पोहोचू शकलो.''

प.पू. आचार्यश्री विद्यानंद महाराज यांनी सामान्यजनांना किंबहुना विद्वानांनाही अपरिचित असणाऱ्या महान जैन परंपरांचा परिचय करून दिला आहे. त्यातीलच एक जैनांची संगीताची परंपरा म्हणता येईल. आमचे निरीक्षण असे आहे की, मराठवाड्यात आणि विशेषतः विदर्भात जैनांचे पूजा, अभिषेक संगीताच्या साथीने होत असतात. हा परिणाम कदाचित जैन मुनींच्या संगीताच्या ज्ञानाभ्यासाचाच असावा. कालौघात तो क्षीण झाला, परिस्थितीने मागे पडला असावा, याची जाणीव देण्यासाठीच जणू प.पू. आचार्यश्रींनी आचार्य पार्श्वदेव यांच्या संगीत समयसार या ग्रंथाचे प्रकाशन करविले. इतकेच नव्हे तर भारतीय ज्ञानपीठाकडून आचार्य बृहस्पती या विद्वानाकरवी तो संपादित-अनुवादित करून एक ३७५ पानांचा बृहद् ग्रंथ त्याच नावाने प्रकाशित करविला. यात जैनांच्या स्वतंत्र राग-मालाही असल्याचा उल्लेख मिळतो. येथे एक संदर्भ आचार्यश्री डॉ. श्रीमती हेम भटनागर यांचा देतात. त्या म्हणतात,

''अनेक ग्रंथांचे अवलोकन केल्यावर असे ज्ञात होते की, जैन मुनींना संगीताचे ज्ञानही विपुल प्रमाणात होते. राग-माला लिहिण्याचा प्रघात जैन मुनी संस्थेमध्ये मोठ्या प्रमाणात होता. जैन मुनी आपल्या तीर्थंकरांच्या यशाचे वर्णन करताना ते राग आणि रागिनीमध्ये रचून

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

आपली काव्यरचना करीत असत. जैन कवींची संगीतप्रियता असंदिग्ध आहे.'' त्यापुढे जाऊन म्हणतात की :

''हिंदी राग-मालांचे मूळ जैन राग-मालांमध्ये मानणे उचितच ठरेल.'' हा निष्कर्ष मोठाच विलक्षण आहे. डॉ. श्रीमती हेम भटनागर यांचे हे प्रतिपादन 'श्रृंगार युग में संगीत काव्य' या ग्रंथातील आहे. आचार्य बृहस्पतींच्या या ग्रंथाला प.पू. विद्यानंद महाराजांनी नितांत अभ्यासपूर्ण आणि विविध शास्त्रांना स्पर्श करणारे 'आद्य मिताक्षर' लिहिले आहे. त्यातीलच हा संदर्भ आहे. तसा, संगीत समयसार या ग्रंथाचा उल्लेख 'मराठवाड्यातील अभिजात संगीत' या सौ. अंजली मालकर (सकाळ-पुणे आवृत्तीचे संपादक श्री. यमाजी मालकर यांची धर्मपत्नी) लिखित ग्रंथामध्येही येतो. हे आचार्य पार्श्वदेव देवगिरीच्या यादवांच्या राज्यातच असल्याचे या ग्रंथावरून कळते. या संगीत समयसार ग्रंथाबद्दल आपल्या आद्यमिताक्षरामध्ये प.पू. आचार्यश्री विद्यानंद महाराज म्हणतात :

''जैनाचार्य पार्श्वदेवकृत हा प्राचीन ग्रंथ भारतीय संगीतशास्त्राच्या इतिहासाची एक महत्त्वपूर्ण कडी/दुवा आहे. प्राचीन काळात जैन साधूंना विविध कलांचे विशिष्ट ज्ञान होते आणि त्यांचे मनन, चिंतन आणि आलोडण केल्यानंतरच त्या कलांचे मौलिक विश्लेषण केले आहे. याचेच प्रमाण म्हणजे 'संगीत समयसार' ग्रंथ होय. हा ग्रंथ संगीतात अभिरुची असणाऱ्या कलाप्रेमींना वरदानच सिद्ध होईल. प्राचीन महत्त्वपूर्ण तथापि लुप्तप्राय ग्रंथांचा शोध घेऊन प्रकाशित करणे, हेच कुंदकुंद भारतीचे लक्ष्य आहे.''

प.पू. आचार्यश्रींच्या प्रवचन शैलीने उत्तरेतील विद्वान आणि सामान्यजन, यच्चयावत सर्वांना हलवून सोडले होते. विविध प्रकारचे दृष्टान्त किंवा विविध प्रकारच्या दृष्टान्त कथा, इतिहासातील प्रसंग, समाजातील विविध विद्यमान घटना यांचे त्यांच्या प्रवचनात बाहुल्य असते. त्याचबरोबर व्यक्तिगत जीवनातही प्रेरणा देणारी उपदेश-सूत्रे त्यांच्या प्रवचनातून आढळून येतात. एके ठिकाणी ऋषभदेवांनी वैराग्य-उपरांत आपल्या पुत्रांना दिलेला उपदेश पाच गोष्टींमधून आचार्यश्रींनी सांगितला आहे, तो असा :

''१) स्वतःला बदला : स्वतःला बदला. दुसऱ्यांना बदलण्याच्या फंदात पडू नका. जर एक भाऊ दुसऱ्या भावाला बदलू इच्छित असेल तर, तू मला कोण वारंवार सांगणारा, असे म्हणून भांडण सुरू होईल. म्हणून, तुम्ही बदला. त्याला त्याच्या मर्जीनुसार वागू द्या.

२) स्वावलंबन : स्वतःचे काम स्वतः करा. जर आपल्या भावाला म्हणाल की, माझे हे काम कर, तर तो उसळून म्हणेल की, तू स्वतःचेच स्वतः कर! मला का सांगतोस!

३) स्वतंत्रता : काय खावे? काय प्यावे? काय वाचावे? या गोष्टींचे स्वातंत्र्य आहे. याचा अर्थ स्वच्छंदता असा मुळीच करू नये. मनमानी करू नये.

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

४) अनुशासन : म्हणजेच प्रत्येक बाबतीत शिस्त, संयम आणि तारतम्य तसेच बंधन पाळले पाहिजे. घरातील एखादी व्यक्ती मनमानी करू लागली की, भांडण सुरू होते.

५) नेहमी प्रसन्न राहा : सभोवती काहीही घडो, तुम्ही हसत राहा. कारण जे काही घडते, ते काहीही शाश्वत नाही. आपल्या आयुकर्मानुसार माणूस येतो आणि आयुकर्मानुसार जातो.''

भगवान आदिनाथांनी आपल्या पुत्रांना सांगितलेल्या या गोष्टी या काळातही उपयोगी आहेत. आपण सर्वांनी या गोष्टी लक्षात ठेवल्या पाहिजेत; म्हणजे घरात कधीही भांडणतंटा होणार नाही, असा व्यवहारही आचार्यश्री शिकवतात. वयाची आठ दशके पार करूनही प.पू. आचार्यश्री विद्यानंद महाराजांचा उत्साह जशाला तसा आणि नितांत प्रेरक आहे. त्यांचे काही काळ सान्निध्यही जीवनाला सामोरे जाण्याची प्रचंड ऊर्जा प्रदान करते. त्यांच्या प्रेरणेने अनेक संस्था स्थापन होऊन त्या निरंतर कार्यरत आहेत. विविध प्रकारची पारितोषिके, पुरस्कार त्यांच्याच योजनेनुसार सुरू झालेले आहेत. त्यांच्या लेखणी आणि वाणीतून विपुल साहित्यनिर्मिती झाली असून वाचकांना सतत ते साहित्यउर्जा प्रदान करीत असतात. समाजाला निरंतर एकत्र बांधून ठेवण्यासाठी अनेकानेक उत्सवांचे आयोजनही निरंतर होत आले आहे.

शेवटी, महाराजांची दोन विचार-सूत्रे उद्धृत करीत आहोत :

''समाजाच्या रचनेमध्ये पुरुष आणि स्त्री ही दोन समान आणि अविभाज्य अंगे आहेत. पुरुषांशिवाय समाज गतिहीन आहे आणि स्त्रीशिवाय समाज स्थितीहीन आहे. रथाचे चाक जेव्हा फिरते; तेव्हा त्यात दोन क्रिया एकाच वेळी घडत असतात. एक गती आणि दुसरी अगती गती क्रियेने चक्र पुढेपुढे जाते आणि अगती क्रियेने ते आपल्या आसाशी - कण्याशी संबद्ध/संलग्न असते. जर, रथचक्राला नियंत्रित करणारा खिळा (खीळ) नसेल; म्हणजेच त्याची केंद्रसत्ता नसेल तर ते चक्र बाहेर निघून जाईल, तुटूनही पडेल, हे ध्यानी घेतले पाहिजे.''

''स्त्री पुरुषाची जन्मदात्री आहे; म्हणून तिला जाया म्हणतात. ती पतीची अर्धांगिनी असते. पतीच्या सुखदु:खाची समभागिनी असते. पती एक असा मित्र आहे की, ज्याच्यावर विश्वास ठेवून जीवन शांतीपूर्ण जगले जाऊ शकते. स्त्रीचा इतिहास त्याग, तप आणि सेवेचा पाठ शिकवतो. विवाह होताना तिला एकाच वेळी पित्याचे घर सोडावे लागते आणि पतीगृही नव्या जीवनाचा आरंभ करावा लागतो. माता-पित्याने, त्यांच्या सान्निध्यात असताना शिकवलेल्या सत्संस्कारांनी ती शीघ्रतेने आपल्या श्वशुरकुलात प्रिय होऊन जाते.''

अशी विपुल जीवनसूत्रे आचार्यश्रींच्या साहित्यातून आपल्यासमोर येतात आणि मन-बुद्धीला ताजेतवाने करतात. पुनश्च एकदा आचार्यश्रींच्या परमउपकारांप्रति विनम्र अभिवादन!

- तीर्थंकर : एप्रिल २००९ (जैन ऐतिहासिक : भाग-३ मधून साभार)

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दूरदर्शी आचार्यश्री विद्यानंदजी मुनिराज

श्वेतपिच्छाचार्यश्री विद्यानंदजी मुनिमहाराज या शतकातील एक महान आध्यात्मिक आचार्य आहेत. त्यांनी आपल्या प्रभावशाली विचाराने संपूर्ण जगतात जैन धर्माला ख्याती मिळवून दिली. भगवान आदिनाथांपासून भगवान महावीरांपर्यंत त्यांनी सर्व तीर्थकरांचा महिमा आपल्या प्रवचनाद्वारे संपूर्ण जगाला पटवून दिला. त्यामुळे जैनेतर लोकही जैन धर्माकडे आकर्षित झाले. त्यामुळेच त्यांच्या धर्मसभेत जैनेतर लोकांचाही मोठा सहभाग असे. कर्नाटकातील शेडबाळ गावात पूज्य महाराजांचा २२ एप्रिल १९२५ रोजी जन्म झाला. बालपणापासूनच ते क्रांतिकारक विचाराचे होते. देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात कार्य करताकरता त्यांनी आत्मोद्धारासाठी मार्गक्रमण केले. क्रमाने क्षुल्लक, ऐलक व मुनिदीक्षा घेतली. आचार्यश्री देशभूषणजी महाराजांकडून आचार्यपद ग्रहण करून समाजात एक नवीन क्रांती घडवून आणली.

'मत ठुकराओ, गले लगाओ, धर्म सिखाओ' या अमूल्य सूत्राद्वारे आचार्यश्रींनी संपूर्ण समाजाला एक नवी दीशा दिली. यामुळे आचार्यश्री एक राष्ट्रीय संत म्हणून विख्यात आहेत. धरसेनाचार्य, कुंदकुंदाचार्य, जिनसेनाचार्य, वीरसेनाचार्य, उमास्वामी अकलंकदेव, समंतभद्रस्वामी, यतिवृषमाचार्य, गुणभद्राचार्य, अमितगती, नेमिचंद्राचार्य अशा अनेक आचार्यांनी तीर्थकरांचा उपदेश ग्रंथांद्वारे, प्रवचनांद्वारे संपूर्ण समाजासमोर मांडून जैन धर्माचे सिद्धान्त, नियम यांचे महत्त्व पटवून दिले. त्यानंतर, आचार्यश्री शांतिसागर यांनी क्रमाने याची धरोहरा सांभाळली. त्यांच्याच परंपरेतील शिष्य आचार्यश्री विद्यानंदजी महाराजांनी जिन धर्माला जगविख्यात केले.

त्यांच्याबद्दल लिहिताना प्राकृत विद्वान डॉ. उदयचंद जैन यांनी लिहिले आहे की,

पण्णा-मणीसि-विदु-विज्ज धामी, अण्णाण-अंध-हणणी गुण सम्म-सामी।
पुज्जो जणेहि जण-गण्ण-पमाण-णाणी, विज्जामुणिंद-चरणेसु णमेमि झाणी ।।१।।

अर्थात, आचार्य विद्यानंद प्रज्ञामनीषी आहेत. ते विविध विद्यांचे स्थान जाणतात. ते अज्ञान, अंधकार नाश करणाऱ्या अनेक गुणांचे स्वामी आहेत व गुणांनी सौम्य आहेत. ते सर्व

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

लोकांद्वारे पूजित आहेत. या जनसमूहासाठी ते ज्ञानी आहेत, त्यांचे आधारभूत आहेत, तसेच ध्यानीही आहेत. म्हणून, अशा आचार्य विद्यानंद मुनींना मी नमन करतो.

आचार्यश्रींनी मनुष्याच्या शालीनतेचे दीपस्तंभ 'समाज, संस्कृती आणि सभ्यता' हे सांगितलेले आहेत. 'समाज व्यक्तीचे शरीर आहे. संस्कृती, शील आणि सभ्यता हे त्याच्या सामाजिकतेच्या रथावर फडफडणारे ध्वज आहेत; म्हणून प्रत्येक व्यक्तीवर समाज, संस्कृती आणि सभ्यतेचे ऋण आहेत.' अशा कर्तव्याची जाणीव महाराजश्री आपल्या प्रवचनाद्वारे करून देत असतात. महाराजश्री तत्त्वचिंतन, मंथन, मनन याद्वारे सदैव धर्माची चर्चा करतात. नैतिक, धार्मिक, आध्यात्मिक अशा राष्ट्रीय स्तरांच्या विचारधारेने त्यांनी केवळ जैन समाजच नाही; तर इतर जैनेतर समाजाचे मनसुद्धा जिंकलेले आहे. आचार्यश्री आपल्या प्रवचनात सर्वधर्मसमभाव आणि विश्वमैत्रीचा सतत उल्लेख करतात.

स्वदेशे पूज्यते राजा, विद्वान सर्वत्र पूज्यते ।

अर्थात, राजाचा आदर फक्त आपल्या देशातच होतो; परंतु विद्वानांचे सारे भूमंडल पूजा करते. याविषयी आचार्यश्रींनी सांगितले आहे की, जोपर्यंत विद्वान विद्यमान आहेत; तोपर्यंत जैन समाज, जैन संस्कृती आणि जैन धर्म जीवित आहे. अर्थात, जैन समाजाने विद्वानांची महत्ता ओळखावी, यासाठी विद्वानांची महत्ता संपूर्ण समाजाला ज्ञात व्हावी म्हणून आचार्यश्रींनी विद्वानांसाठी अनेक पुरस्कारांची प्रथा सुरू केली. आजपर्यंत शेकडो विद्वानांचा गुणगौरव केला आहे.

भगवान महावीरांच्या अहिंसा या वीरवाणीला त्यांनी संपूर्ण समाजास अवगत करविले. जैन धर्म हा विश्वधर्म आहे, असे घोषवाक्य आचार्यश्रींच्या प्रवचनातून सर्व जनसामान्यांना आकर्षित करते. 'भगवान महावीरांनी कोणत्याही विशिष्ट जातीसाठी उपदेश दिलेला नाही; तर त्यांची वाणी ही प्रत्येक जीवमात्राचे कल्याण व्हावे, यासाठी होती. 'अहिंसा, अध्यात्म आणि विश्वमैत्री यांचे ते उद्‌बोधक आहेत.' असा परिचय त्यांनी समाजाला करून दिला.

भगवान आदिनाथांनी आपली कन्या ब्राह्मीला लिपींचे ज्ञान दिले; तर सुंदरीला अंकशास्त्राचे ज्ञान दिले. आचार्यश्रींनी या ब्राह्मी लिपीला जनसामान्यापर्यंत पोहोचवण्याचे अमूल्य कार्य केलेले आहे. त्यासाठी त्यांनी ब्राह्मी लिपीसंबंधी अनेक पुस्तकेदेखील प्रकाशित केलेली आहेत. लुप्तप्राय होत चाललेल्या प्राकृत भाषेचीसुद्धा आचार्यश्रींनी आपल्या प्रवचनांद्वारे संपूर्ण जनसामान्यांना ओळख करून दिली. पूर्वाचार्यांनी लिहिलेल्या ग्रंथांचे, संस्कारांचे ज्ञान व्हावे व ते बीज पुढील पिढीसाठी अंकुरीत व्हावे, असे वाटत असेल तर प्रत्येकाने लिपींचा व प्राकृत भाषेचा अभ्यास करावा, असा संदेश त्यांनी दिला. त्यासाठी त्यांनी १९९५ पासून प्रारंभ केलेले श्रुतपंचमी पर्व हे **'प्राकृत भाषा'** दिवस म्हणून साजरा केला जातो. आचार्यश्रींच्या

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

प्रेरणेनेच प्राकृत भाषेच्या विद्वानांना राष्ट्रपती पुरस्कार मिळण्यास सुरुवात झाली. अनेक विद्यापीठांत जैनविद्या आणि प्राकृत भाषा अभ्यासाकरिता वेगळे विभाग सुरू करविले. शासनस्तरावर विद्यार्थ्यांसाठी व अध्यापकांसाठी पुरस्कार सुरू करविले. चर्चासत्रांचे आयोजन करण्यास प्रोत्साहन दिले. कुंदकुंद भारती, दिल्ली येथे प्राकृत भवनात जैनविद्येच्या संशोधनाकरिता केंद्र व विशाल पुस्तकालय उपलब्ध करून दिले. आचार्य कुंदकुंदांनी आपल्या ग्रंथांत प्राकृत भाषेचा जो प्रचार-प्रसार केला; त्याला आचार्यश्रींनी जिवंत ठेवण्याचा अतोनात प्रयत्न केलेला आहे.

आचार्यश्रींच्या प्रेरणेनेच महावीर जयंतीला संपूर्ण देशात सुटी जाहीर झाली आहे. त्यामुळे भगवान महावीर व जैन धर्म यांचे महत्त्व संपूर्ण समाजासमोर आलेले आहे. १९८१ पासून श्रवणबेळगोळच्या महामस्तकाभिषेकाला आंतरराष्ट्रीय प्रसिद्धी मिळवून दिली. आचार्यश्री भारतीय दर्शनशास्त्र, ज्योतिष, लिपीविज्ञान, मनोविज्ञान, इतिहास, खगोलशास्त्र, संस्कृती अशा विविध विषयांचे गहन अध्यायी आहेत. आचार्यश्रींची मातृभाषा कन्नड आहे. परंतु, त्यांनी मराठी, हिंदी, संस्कृत, प्राकृत, इंग्रजी आदी भाषांवरसुद्धा प्रभुत्व निर्माण केलेले आहे.

'पहले तोलो फिर बोलो' आणि 'मुखशुद्धी' (वाग्दीक्षा) या दोन पुस्तकांत त्यांनी विद्वान वक्त्यांसाठी व साधूंसाठी असलेल्या आवश्यक गुणांची चर्चा केलेली आहे. संशोधकांसाठी अनेक ग्रंथांचा स्वतः अभ्यास करून महत्त्वपूर्ण निष्कर्ष समाजापुढे मांडले आहेत. अनेक पुस्तकांचे लेखन केले आहे. दिगंबर व श्वेतांबर समाजाला मान्य असलेला पंचरंगी ध्वज हा त्यांच्याच प्राचीन ग्रंथांच्या अध्ययनाचा निष्कर्ष आहे.

'गुरुर्विधाता गुरुदेव दाता, गुरुः स्वबन्धुर्गुरुरत्नसिन्धुः।
गुरुर्विनेता गुरुरेव तातो, गुरुर्विमोक्षो हकर्मपक्षः।।'

अर्थात, गुरूच विधाता आहे, गुरूच दाता आहे, गुरूच स्वबंधू आहे, गुरूच रत्नांचा (रत्नत्रय) चा सिंधू आहे, गुरूच विनेता (मोक्षमार्गस्य नेतारं), गुरूच पिता आहे, गुरूच कर्मांचा नाश करण्यासाठी निमित्तमात्र आहे; म्हणून गुरू मोक्षस्वरूप आहे.

अशा गुरूंचा प्रत्यक्ष सहवास मला प्रारंभी शालेय शिक्षणानंतर सहा वर्षे अखंडपणे लाभला व त्यानंतरही आजपर्यंत १६ वर्षे त्यांच्या कृपेची अमृतवर्षा सतत सुरू आहे. आज जे काही मी धर्मकार्य करीत आहे; ते केवळ त्यांच्या प्रेरणेनेच! 'धर्माची कास सोडू नकोस' असे वचनच त्यांनी माझ्याकडून घेतले आहे आणि मी ते शेवटच्या क्षणापर्यंत पालन करण्याचा प्रयत्न करेन.

माझे पूज्य आजोबा स्व.पं. वर्धमान शास्त्री यांनी धार्मिक शिक्षण मोरेना येथे पूर्ण करून संपूर्ण भारतभर धर्मप्रसार केला होता. पूर्वेकडील नागालॅण्डपासून ते पश्चिमेकडील गुजरात,

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

राजस्थानपर्यंत तर उत्तरेकडील बद्रिनाथपासून दक्षिणेकडील तामिळनाडूपर्यंत त्यांची ख्याती होती. त्यांच्या पांडित्याने सारा देश प्रभावित झाला होता. परमपूज्य आचार्यश्री विद्यानंदजींचीही त्यांच्यावर कृपादृष्टी होती. धर्मग्रंथ अध्ययनात पंडितजींनी सहकार्य केल्याचा आचार्यश्री नेहमी उल्लेख करीत असतात.

साधारणतः १९९२ च्या दरम्यान प्रिंटिंग इंजिनीअरिंग करण्याकरिता पुण्यात शिकत होतो. दरम्यान दिल्लीला परमपूज्य आचार्यश्रींच्या दर्शनाचा लाभ घडून आला. आचार्यश्री विद्यानंदजींच्या प्रेरणेनेच गांधी नाथा रंगजी दि. जैन जनमंगल प्रतिष्ठान, सोलापूर या संस्थेने आचार्य कुंदकुंद पुरस्काराची प्रथा सुरू केली होती. १९९३ च्या दरम्यान आचार्यश्रींचा विहार दिल्ली येथे असल्याने तेथेच या पुरस्कार सोहळ्याचे आयोजन केले होते. संस्थेचे तत्कालीन मानद सचिव या नात्याने दादांवर कार्यक्रमाची संपूर्ण जबाबदारी होती. कार्यक्रम व त्यापूर्वीची तयारी यानिमित्ताने दिल्लीच्या वास्तव्यात आठ दिवस आचार्यश्रींनी मला धावपळ करताना पाहिले. अर्थात आचार्यश्रींच्या मार्गदर्शनात साहजिकच पुरस्कार सोहळा भव्यतेत पार पडला. आठ दिवसांच्या सहवासामुळे आचार्यश्रींनाही कसा, कोणास ठाऊक; माझ्यावर विशेष अनुबंध वाटला व माझे भाग्य उजळले. आम्ही परतीच्या प्रवासाला निघताना आचार्यश्रींनी माझ्या दादांना बोलावले व माझ्याकडे खूण करून ते म्हणाले, ''या मुलाला तू माझ्याकडे सहा महिने सोडून जा.'' दादांनी होकार भरला.

नंतर वर्षभरानंतर आचार्यश्रींचा पुन्हा दादांना निरोप आला 'काय झाले, महावीरला पाठविणार होता. त्याचे शिक्षण पूर्ण झाले की नाही?

दादांनी मला सांगितले, 'प्रथम महाराजांच्या आदेशाचे पालन करू. तू दिल्लीला जा व महाराजांच्या सान्निध्यात धार्मिक ज्ञान घे.' खरोखरच, माझ्या जीवनातील तो सोनियाचा क्षण होता. दादांनी फक्त आर्थिक फायदा न पाहता धर्माला प्रथम महत्त्व दिले. तसे ते इतरांप्रमाणे लौकिक फायद्याकडे पाहू शकले असते; पण तसे न करता त्यांनी मला आचार्यश्रींकडे पाठवले. त्यांच्या मनाचा मोठेपणा मला जीवनोपयोगी सिद्ध झाला.

मी दिल्लीला सहा महिन्यांकरिता जे आलो; ते पूर्ण सहा वर्षे राहिलो. पूज्य आचार्यश्रींची चर्या अगदी जवळून पाहण्याचा योग आला. रात्रंदिवस जिनवाणीच्या अमृतरसात न्हाऊन निघणाऱ्या आचार्यश्रींच्या सान्निध्यामुळे त्यातील काही अमृतकण आपोआपच माझ्या जीवनावरही सिंचित झाले. आचार्यश्रींना संगीताचे ज्ञान व आवड, त्यामुळे त्यांच्या सभोवताली राहणाऱ्यांना सहजच त्याची गोडी लागत असे. त्यांच्या प्रेरणेमुळे तंबोरा व हार्मोनियमचे शिक्षण सुरू झाले; तेही ऑल इंडिया रेडिओचे डायरेक्टर श्री. हरिचरण वर्मा यांच्याकडून!

अगदी मंदिराच्या स्वच्छतेपासून पूजा, अभिषेक, स्तोत्र, मंत्र, जैन सिद्धान्त, विविध

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

दर्शनांचे तौलनिक अध्ययन, वास्तू, सामुद्रिकशास्त्र, संस्कृत-प्राकृत भाषा, हळेकन्नड, ब्राह्मी लिपीज्ञान याबरोबरच मुनिचर्या व वैय्यावृत्य, सेवा व आहारदान यांचे धडे अगदी सूक्ष्मपणे अनुभवले. सभासंचालन, मंगलाचरण आदींचे ज्ञान पूज्य आचार्यश्री व मुनिश्री कनकोज्ज्वल (आताचे आचार्य श्रुतसागर) यांच्याकडून प्राप्त झाले.

त्यांच्या प्रेरणेने लालबहादूर शास्त्री दिल्ली युनिव्हर्सिटीतून 'सिद्धान्त ज्योतिष' विषयात शास्त्री पदवी मिळवली; तीही सुवर्णपदकासहित! त्यांच्याच प्रेरणेने कॉम्प्युटरमधील डिप्लोमाही प्राप्त केला.

पूज्य आचार्यश्रींनी हृदयापासून केलेल्या उपकारामुळे व आई, वडिलांच्या प्रेरणेमुळे आज मी एम.ए., पीएच.डी. झालो. याचे सर्व श्रेय त्यांनाच जाते. माझ्याप्रमाणेच पण वेगवेगळ्या पद्धतीने आचार्यश्री विद्यानंदजींनी अनेकांचे जीवन पालटले. धन्य ते गुरू विद्यानंदजी!

।। ते विद्यानंदी मम हितकारी । जग सुखकारी परमगुरुं नमूं।।

- प्रा.डॉ. महावीर प्रभाचंद्र शास्त्री
M.A., Ph.D., NET
प्राकृत-संस्कृत विभागप्रमुख
वालचंद महाविद्यालय, सोलापूर
संपादक - जैनबोधक, जैन गजट
mahaveershastri@yahoo.com
0217-23252111, 9422457582

❖❖❖

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सन्माननीय अर्थसहयोगींची कृतज्ञतापूर्वक नोंद

- पंडिता ब्र. विद्युल्लताभून शहा - सोलापूर
- पद्मश्री, जैनरत्न शरयूताई दफ्तरी, मुंबई
- सेठ अरविंद रावजी दोशी, मुंबई
- डॉ. शरयू शरद शहा - मुंबई
- श्री. तुषार व सौ. स्वप्ना गांधी
- डॉ. सरिता नलिन कोठाडिया यांनी स्व. डॉ. नलिन कोठाडिया यांच्या स्मरणार्थ
- श्री. विक्रम रावजी शहा - इंदापूर
  स्व किशोर हुकूमचंद शहा-गुंजोटीकर हस्ते मृदुला शहा, पुणे
- डॉ. जयश्री अजित खोत - इचलकरंजी
- श्रीमती हेमलता घीवाला - सुरत
- सौ. सरोज रमेशचंद्र जैन - पारोळा
- श्री. अजित शिवलाल शहा - पुणे
- डॉ. महेंद्रकुमार प्रकाश शहा - इचलकरंजी
- श्री. चंद्रनील चंद्रमोहन जदेरिया - सौ. प्रियदर्शनी चंद्रनील जदेरिया, मुंबई/हैदराबाद
- सौ. शोभना चंद्रमोहन शहा - सोलापूर
- श्रीमती शैलजा सुरेशचंद गांधी, हैदराबाद
- सौ. सुजाता विकास मेहता, नाशिक
- सौ. यशोधरा गौर (शहा) कार - पुणे
- श्री. चंद्रमोहन रतनचंद शहा - सोलापूर
- श्रीमती सुरेखा चंद्रगुप्त शहा - सोलापूर
- श्री. ऋषिकेश चंद्रमोहन शहा
- सौ. गौरी ऋषिकेश शहा
- रिधम ऋषिकेश शहा - मिनिया पोलीस, अमेरिका

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

- श्री. संतोष जीवराज मेहता-बोरामणीकर - सोलापूर
- कु. ऋतिका अभिनंदन शहा - सोलापूर
- श्री. तिलोकचंद समीरमल निमाणी - सोलापूर
- श्री. संतोष शांतिलाल भंडारी, सोलापूर
- डॉ. मधुकर लोखंडे - सोलापूर
- श्री. शशांक विनोद शहा-सी.ए., - सोलापूर
- श्री. सत्यजित सुरेश मेहता, कै. सुरेश मेहता स्मृतिप्रीत्यर्थ सोलापूर
- डॉ. श्वेता गौरव शहा, डॉ. अरविंद व कांताबाई शहा (तंबोळी) स्मरणार्थ प्रगती हॉस्पिटल व संशोधन केंद्र, कुंभारी - सोलापूर
- डॉ. हर्षवर्धन मेहता हस्ते डॉ. आदर्श मेहता - सोलापूर
- प्राणिमित्र विलास शहा ट्रस्ट, सौ. विलासिनी विलास शहा यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त
- श्री. नृपेश जैन - लातूर
- श्री. राजाभाऊ बाळासाहेब सोनटक्के - लातूर
- सौ. सुनीता सांगोले - लातूर
- डॉ.प्रा. सदाशिव दंदे - लातूर
- श्री.प्रा. महावीर उदगीरकर - लातूर
- सौ. सुनंदा व डॉ. अरुण शहा - लातूर
- श्री. बाहुबली अण्णासाहेब पाटील - कोल्हापूर
- सौ. नीलम माणगावे, कवयित्री - जयसिंगपूर
- श्री. अभयकुमार हिराचंद शहा-आळंदकर - कुंभोज-बाहुबली
- डॉ. प्राचार्य डी.डी. मगदूम - सांगली
- श्री. गुलाबचंद नेमचंद शहा - अक्कलकोट
- डॉ. विलास मा. शहा - अक्कलकोट
- श्री. राजेंद्र विजयकुमार शहा - निंबर्गीकर - सोलापूर/पुणे
- श्री. शहा ब्रदर्सः श्री निर्मल, चंद्रकांत व सूर्यकांत शहा - सोलापूर
- श्री. शुद्धोहम ज्वेलर्स हस्ते किरण मोतीचंद गांधी - सोलापूर
- श्री. ओनिल अरविंद गांधी, कै. गुलाबचंद सखाराम गांधी यांच्या स्मरणार्थ - हस्ते अरविंद कस्तुरचंद गांधी, सोलापूर
- श्री. राजन अरविंद शहा - सोलापूर
- श्री. अजित गुलाबचंद शहा आणि कंपनी - सोलापूर
- सौ. नयन अजित कोठाडिया - सोलापूर
- श्री. शांतिकुमार माणिकचंद कोठारी - कोल्हापूर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

- डॉ. रोहिणी प्रवीण शहा - सोलापूर
- श्री. अजित जयकुमार कोठारी - हैदराबाद
- सौ. जया सुरेश मेहता - पंदारकर - सोलापूर
- श्री. राजेश हिरालाल गांधी, पुणे यांच्या मातोश्री स्व. विभा हिरालाल गांधी यांच्या स्मरणार्थ
- श्री. जवाहर हिराचंद शहा - बार्शी
- श्री. संतोष अभयकुमार शहा - बार्शी
- श्री. प्रफुल्ल हिराचंद शहा - बार्शी
- स्व. चारुशीला आनंदलाल यांच्या स्मृतिप्रित्यर्थ - दोशी
- श्री. संतोष व वैभव आनंदलाल दोशी बंधू 'मधुबन'वाले - बार्शी
- श्री. रविकिरण आबाराव मैंदर्गे व सौ. मंजूषा रविकिरण मैंदर्गे - सोलापूर
- श्री. सुभाष शांतिदास मैत्रे - नाचणगाव, जि. वर्धा
- श्री. गजेंद्र शांतिदास मैत्रे - बावधन, पुणे
- श्रीमती माधवी हर्षवर्धन शहा - सोलापूर
- श्रीमती रत्नप्रभा रमेशचंद्र मेहता - सोलापूर
- चि. प्रेक्षा प्रतीक एखंडे - सोलापूर
- श्रीमती प्रतिभा अशोक शहा - सोलापूर
- चि. आरव सप्रेम कोठारी - सोलापूर
- स्व. अनंतमती मोतीचंद शहा - स्मरणार्थ वाडीकर कुटुंब, सोलापूर
- श्रीमती शशिकला शांतिकुमार शहा - वाडीकर, बारामती
- सौ. मंजूषा अजित शहा - अक्कलकोट
- श्रीमती विजयाबाई कांतिलाल गांधी. हस्ते राजन कांतिलाल गांधी, सोलापूर
- श्रीमती विमल शिवलाल शहा - सोलापूर
- कै. कुमुदिनी मुक्तागिरी बोपलकर स्मरणार्थ सौ. रत्नमाला भारत बोपलकर
- चि. आस्था आशीष दर्यापूरकर - सोलापूर
- श्रीमती सरोज राजकुमार शहा - सोलापूर
- श्री. सुधीर जैनेंद्रकुमार तुपकर - पुणे
- श्री. निनाद जैनेंद्रकुमार तुपकर - ठाणे
- सौ. उषा जैनेंद्रकुमार तुपकर - सोलापूर
- श्री. जैनेंद्रकुमार तुपकर - सोलापूर
- श्रीमती शुभांगी रतनचंद गांधी - सोलापूर
- श्री. राजीव वर्धमान एखंडे - सोलापूर
- श्री. शशिकांत जयकुमार मोहरे - सोलापूर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

- ❋ श्रीमती कनकप्रभा कस्तुरचंद गांधी ह. नूतन क. गांधी साखरवाले - सोलापूर
- ❋ श्री. किरण कस्तुरचंद शहा - सोलापूर
- ❋ श्री. श्रेयांस सुहास शहा - सोलापूर
- ❋ श्री. अनिल विजयकुमार शहा - करकमकर, अनिल ज्वेलर्स - सोलापूर
- ❋ श्री. शशांक हुकूमचंद शहा गुंजोटीकर - सोलापूर
- ❋ श्री. अरविंद धन्यकुमार शहा - सावळेश्वरकर
- ❋ श्री. मनोज प्रकाशचंद शहा - गुलबर्गा
- ❋ श्री. दिलीप कांतिलाल शहा - गुलबर्गा
- ❋ श्री. केतन व चेतन दोशी - गुलबर्गा
- ❋ श्री. संतोष विद्याचंद्र गांधी - उस्मानाबाद
- ❋ श्री. सुभाषचंद्र मोतीचंद गांधी - उस्मानाबाद
- ❋ श्री. कुणाल शीतल मेहता - उस्मानाबाद
- ❋ कु. अवनी अरुण शहा - सोलापूर
- ❋ सौ. पुष्पा रवींद्र दोशी - पंढरपूर
- ❋ धर्मानुरागी रतनबाई रतनचंद शहा - हस्ते सौ. प्रतिमा व श्री. उदंक शहा-पुणे
- ❋ श्री. नितीन हुकूमचंद मेहता - पुणे
- ❋ श्री. प्रकाश मा. पटवा - सोलापूर
- ❋ श्री. श्रेयांस शशिकांत शहा - पुणे
- ❋ सौ. वैशाली आदिकुमार बंड - नागपूर
- ❋ सौ. सुनंदा उमेशचंद्र सरोदय - नागपूर
- ❋ श्री. सर्वोदय सिनीअर सिटीझन चॅरिटेबल ट्रस्ट - ठाणे ह. श्री सुभाष फुलचंद शहा-सी.ए.
- ❋ श्री. अनिलचंद जिवराज हिराचंद शहा - सोलापूर
- ❋ श्री. संजय विजय शहा, उपप्राचार्य - सोलापूर
- ❋ सौ. संजना संजय शहा - सोलापूर
- ❋ श्री. प्रवीणचंद्र मोहनलाल दोशी अनमोल स्टोअर्स - सोलापूर
- ❋ श्री. तन्मय सुशील शहा - सोलापूर
- ❋ श्री. गिरीश वालचंद शहा - सीए
- ❋ सौ. मंगल नरेंद्र भिसीकर - बारामती
- ❋ श्री. मनोज श्रेयांस गांधी - बारामती
- ❋ सौ. नीला शांतिकुमार गांधी - बारामती
- ❋ सौ. सुलोचना राजकुमार आळंदकर - सोलापूर
- ❋ सौ. शोभना त्रिभुवन शहा - अकलूज

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

- डॉ. जवाहर चॅरिटेबल ट्रस्ट - फलटण
- श्री. शिरीषकुमार शरदकुमार दोशी - फलटण
- श्री. उदय माणिकचंद शहा - फलटण
- श्री. अरविंद रूपचंद शहा - वडुजकर - फलटण
- सौ. प्रिया कैलास दोशी - फलटण
- श्री. बाहुबली मोतीचंद कोठारी - फलटण
- सौ. सरोज निरंजन मेहता - बारामती
- सौ. पायल सिद्धार्थ शहा वडुजकर - बारामती
- श्री. राजकुमार गांधी - बारामती अजिंक्य बझारवाले
- सौ. स्मिता जवाहरलाल दोशी - बारामती
- श्री. चंद्रप्रभू कस्तुरचंद शहा, वैभव प्रेस - सोलापूर
- श्री. संजय सुभाष पटवा - सोलापूर
- श्री. श्रीकांत रतनलाल कोरडे - सोलापूर
- सौ. ललिता क्रांतिकुमार मेहता - सोलापूर
- सौ. प्रतिमा अरुण गांधी - सोलापूर
- डॉ. सशांतकुमार हिरालाल गांधी - वालचंदनगर
- श्री. हुकूमचंद फु. शहा - मैदर्गीकर - वालचंदनगर
- श्री. बाहुबली वालचंद गांधी - वालचंदनगर
- डॉ. विकास विजयकुमार शहा - वालचंदनगर
- श्री. परमेष्ठी गौतमचंद गांधी - नातेपुते
- श्री. विवेक नेमचंद शहा - बारामती
- श्री. जयकुमार नेमचंद शहा - चिंचवड, पुणे
- श्री. शिरीष नेमचंद शहा हडपसर-पुणे
- श्री. प्रदीप नेमचंद शहा हडपसर-पुणे
- श्री. जयप्रकाश नेमचंद शहा - हडपसर, पुणे
- सौ. रेवती प्रफुल्ल शहा - बोराळकर - सोलापूर
- सुश्री. चंदनबाला व सौ. भारती राजेंद्र शहा - डोंबिवली
- सौ. इंदु प्रकाश झव्हेरी - माटुंगा, मुंबई
- श्री. राजाभाऊ डोणगांवकर - कारंजा लाड
- श्री. अभयकुमार व सौ. संजिवनी दोशी ढाकळकर - बारामती
- सौ. जयश्री जयप्रकाश शहा - घाटकोपर, मुंबई
- श्री. धन्यकुमार श्रीवर्मा जैनी - सोलापूर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

- ❋ प्रा. शहा धनंजय विजयकुमार - सोलापूर
- ❋ स्व. कमल प्रकाश शहा आगरखेडकर - ह.. मंगेश शहा सोलापूर
- ❋ श्री. प्रदीप चंदुलाल शहा आळंदकर - सोलापूर
- ❋ स्व. सौ. सुचरिता नेमनाथ पाटील स्मरणार्थ, सौ. पद्मजा केसरी शहा -सोलापूर
- ❋ डॉ.सौ. कालिंदी व डॉ. अमृत हिराचंद गांधी - सोलापूर
- ❋ सौ. कामिनी व सुदर्शन रतिलाल गांधी - सोलापूर
- ❋ सौ. कुंदा सुरेशचंद्र टोपुरे - सोलापूर
- ❋ श्री. चंद्रकांत गुलाबचंद शहा ह. चकोर शहा - सोलापूर
- ❋ श्री. प्रशांत अर्जुन जाधव - मोडनिंब
- ❋ श्री. विशाल बाहुबली मेहता - मोडनिंब
- ❋ श्री. अनिल दोशी, माढा
- ❋ श्री. शीतल रतिलाल प्रेमचंद शहा - मोडनिंब
- ❋ श्री. सुधीर चंद्रकांत शहा - मोडनिंब
- ❋ डॉ. सुहास चंद्रकांत शहा - मोडनिंब
- ❋ श्री सतिश हुकुमचंद रावजी हरिचंद शहा - मोडनिंब
- ❋ श्री. रजनिश कोठाडिया, उद्योगपती - सोलापूर
- ❋ श्री. राजस चंद्रगुप्त शहा - सोलापूर.
- ❋ श्री. किरणकुमार कांतिलाल शहा, पुणे
- ❋ डॉ. श्री. पवनकुमार हिराचंद शहा, ऐट सेडम, गुलबर्गा
- ❋ श्री. दीपक शंकरराव आहेरकर, सोलापूर
- ❋ श्री. विजयकुमार लुंगाडे, पुणे
- ❋ पिताश्री स्व. शांतिनाथ परशराम लुंगाडे यांच्या तृतीय पुण्य स्मृतिनिमित्त, पुणे
- ❋ श्री. जैन श्रावक-श्राविका, सोलापूर
- ❋ श्री. रविकांत प्रेमचंद शहा, मोडनिंब
- ❋ श्री. पद्मकुमार नेमचंद गांधी, मोडनिंब
- ❋ श्री. सुखाचंद वालचंद शहा, मोडनिंब
- ❋ श्री. ॲड. संतोष शांतीनाथ भोसे, अहमदनगर
- ❋ सौ. स्वाती व संतोष शहा, सोलापूर
- ❋ श्री. प्रदीप नानचंद शहा, आळंद
- ❋ श्री. सन्मती मंडळ, वालचंदनगर
- ❋ श्री. ओमकार श्रीधर अन्नदाते, चिंचवड
- ❋ सौ. अंजली ऋषभराज अन्नदाते, डोंबिवली

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

- सौ. सुप्रिया जैनेंद्रकुमार अन्नदाते, डोंबिवली
- सौ. वसंतमाला श्रेणिक अन्नदाते, डोंबिवली
- श्री. समुद्रविजय श्रेणिक अन्नदाते, डोंबिवली
- श्री. चंद्रप्रभू शांतिनाथ सिद्धेश्वर, ठाणे
- सौ. आशा प्रदीप माहुले, पुणे
- श्री. मुकुंद मोहनलाल वालचाळे, वाशिम
- सौ. वासंतीबाई अशोक काळे, औरंगाबाद
- डॉ. सौ. अलका सरोदे - वालचाळे, अंबाजोगाई
- श्री. विलास बन्सीलाल मडकर, गेवराई
- श्री. अशोक त्र्यंबकराव सोनटक्के, औरंगाबाद
- श्री. नेमीचंदजी जगन्नाथराव घोडके, परभणी
- श्री. सतीश नवलचंद शहा, चिंचवड - पुणे
- श्री. जैनेंद्रकुमार चेतनलाल जैन, नासिक
- प्राचार्या सौ. प्रतिभा सनतकुमार अन्नदाते, पुणे
- सौ. मनिषा आणि श्री. प्रेमचंद जिनदास मडकर, बीड
- श्री. सुनिल बन्सिलाल लोणकर, जालना
- सौ. मनिषा कुलभूषण गुमते, मोहोळ
- श्री. मोतीलाल शंकर धोंगडे, टिटवाळा
- सौ. विजया सुरेंद्र धोंगडे, बदलापूर
- श्री. राजीव शंकरराव बुबणे, लातुर
- श्री. अरविंद रामचंद्र जोंधळे, अंबाजोगाई
- प्रा. सुभाष वर्धमान शास्त्री, सोलापूर
- श्री. विवेक नेमीनाथ सोनटक्के, मंठा - जि.परभणी
- श्री. शांतिनाथ दि. जैन मंदिर, सिल्लोड - जि.औरंगाबाद
- श्री. डॉ. विलास मेहता, कुर्डुवाडी
- श्री. सतीश प्रभाकर डेरेकर (दै. समाचार), अहमदनगर
- श्री. संजय कपूरचंद महाजन, अहमदनगर
- प्रा. डॉ. कल्पना संतोष मुळावकर, अंबाजोगाई
- प्रा. सौ. प्रज्ञा यशवंत दिपक, वसमत - जि.परभणी
- श्री. अमित अरविंद जोहरापूरकर, अहमदाबाद
- प्रा. डॉ. आदिनाथ दगडोबा सोनटक्के, औरंगाबाद
- प्रा. प्रवीणकुमार हेमचंद्र वैद्य, जयसिंगपूर

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

❋ श्री. वसंत उर्फ विमलनाथ नारायणराव वायकोस, औरंगाबाद
❋ श्री. श्रीकांत वायकोस गुरुजी, औरंगाबाद
❋ श्री. अतुल अरुण बीडकर, मुलुंड - मुंबई-२. (स्व. अरुण दिगंबर बीडकर यांच्या स्मरणार्थ)
❋ श्रीमती सोनाबाई जयपाल उपाशी हस्ते श्री. राजेंद्र उपाशी, पुणे
❋ सौ. विजयादेवी शरदचंद्र टिकाईत, नांदेड
❋ डॉ. सौ. जयकांता पारिसा बडबडे, इचलकरंजी
❋ श्री. राजकुमार रतनशाह जैन, दमण
❋ श्री. संजय बाहुबली पूर्वत, पुणे
❋ सौ. कमल बाहुबली पूर्वत, सोलापूर
❋ प्रा. प्रदीपकुमार जयकुमार फलटणे, तळेगांव दाभाडे
❋ कु. मीलन मोतीलाल म्हेत्रे (दै. प्रभात), पुणे
❋ श्री. व्ही.एस. कुडचे (चार्टर्ड अकौंटंट), पुणे
❋ श्री. निरंजनकुमार कवडे (पार्श्वनाथ ग्रंथ भांडार), वेरूळ
❋ श्रीमती प्रगती भरमगोंडा पाटील, इचलकरंजी
❋ श्री. उदय पासगोंडा पाटील, इचलकरंजी
❋ श्री. १००८ चंद्रप्रभू दि. जैन मंदिर, माणकापूर
❋ श्री. विजयकुमार आण्णासो बेळंके, निमशिरगाव
❋ ॲड. धनपाल आण्णा बेळंके, जयसिंगपूर
❋ श्री. भरतेश्वर पायगोंडा पाटील, जयसिंगपूर
(स्व. पायगोंडा नरसगोंडा पाटील, निमशिरगाव यांचे स्मरणार्थ)
❋ सौ. पूनम सुहास शेट्टी, आरग - सांगली
❋ श्रीमती प्रेमलता भूपाल शेट्टी (नोटरी), आरग (स्व. भूपाल बळवंत शेट्टी यांचे स्मरणार्थ)
❋ श्री. संदीपकुमार आणि सनतकुमार कंगळे, औरंगाबाद (स्व.ॲड. भा.ना. कंगळे यांचे स्मरणार्थ)
❋ प्रा. डॉ. हुकुमचंद पार्श्वनाथ संगवे, सोलापूर
❋ श्री. श्रीपाल रामचंद्र गडकरी, राजारामपुरी - कोल्हापूर
❋ सौ. प्रतिमा आणि सुरेश शहा, कुर्डूवाडी
❋ कु. कोमल जैनेंद्रकुमार अन्नदाते, ठाणे
❋ कु. सायली ऋषभराज अन्नदाते, डोंबिवली
❋ श्री. रोहन महावीर घोडके, पुणे
❋ श्री. डॉ. सुरेश पाटील (श्री हॉस्पिटल), जयसिंगपूर
❋ डॉ. सौ. चारुशीला वर्धमान उदगीरकर, लातुर
(स्व.सौ. सुवर्णमाला सुरेशचंद उदगीरकर, लातुर यांचे स्मरणार्थ)

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

- प्रा. सौ. विजया महावीर उदगीरकर, लातुर
- श्री. अजित हिरालाल सोनटक्के, बीडकीन
- श्री. महावीर गजकुमार घोडके, माजलगाव - जि.बीड
- श्री. ज्ञानेश्वर कृष्णा जाधव, पुणे
- रवि मसाले, औरंगाबाद
- सौ. सरिला शहा, चिंचवड, पुणे
- सौ. चंद्रकांता रमणलाल कासलीवाल, डोंबिवली
- श्री. बापूसाहेब पाटील, ठाणे
- सौ. शोभा गौतम शहा - गांधी, डोंबिवली (स्व. जानकीबाई हिराचंद शहा यांचे स्मरणार्थ)
- श्री. विजय कासार, ठाणे
- श्री. शशांक जवाहर शहा, मुंबई
- सौ. सुषमा व श्री. प्रदीप सैतवाल, ठाणे (स्व. आई-वडिलांच्या स्मृतिप्रित्यर्थ)
- सौ. प्राजक्ता व श्री. प्रकाश सैतवाल, नवी मुंबई
  (स्व. गंगाधरराव त्र्यंबकराव सैतवाल यांचे स्मृतिप्रित्यर्थ)
- श्री. आर. सी. बांडे, डोंबिवली स्व. (सौ. छाया राजकुमार बांडे यांच्या स्मृतिपित्यर्थ)
- श्री. सुनिल बी. ढोकर, डोंबिवली (स्व. पं. बाहुबली ढोकर यांच्या स्मरणार्थ)
- श्री. विजयकुमार नेमिचंद महिंद्रकर, औरंगाबाद
- स्व. सुंदरलाल सावजी चॅरिटेबल ट्रस्ट, जिंतूर
- श्री. चंद्रकांत नेमचंद शहा, दहिसर
- श्री. बाहुबली पोपटलाल भूमकर, सोलापूर
- डॉ. राजेश रतिलाल फडकुले, सोलापूर
- सौ. शोभा प्रकाश पोकळे, पुणे
- श्री. उदयकुमार लेंगडे, पुणे
- श्री. महेश हिरालाल शहा, मुंबई
  (स्व.सौ. सरोज हिरालाल शहा व स्व. हिरालाल सखाराम शहा यांचे स्मरणार्थ)
- सौ. सुनंदा रतिलाल गांधी, सोलापूर
- डॉ. बाहुबली हिराचंद दोशी, सोलापूर
- महाराष्ट्र जैन इतिहास परिषद - अधिवेशन ६वे (२०१०), सोलापूर
  (हस्ते श्री. चारुकीर्ती शिरसोडे)
- श्रीमती आशा बक्षी, दिल्ली
- श्री. चारुकीर्ती भालचंद्र शिरसोडे, सोलापूर
- डॉ. अशोक व्होरा, नातेपुते

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

- श्री. राजकुमार दोशी, सोलापूर (स्व. अमृतलाल तलकचंद दोशी यांचे स्मरणार्थ)
- श्री. अरिहंत प्र. कोठाडिया, पंढरपूर (स्व. प्रविणचंद्र पोपटलाल कोठाडिया यांचे स्मरणार्थ)
- डॉ. तृप्ती फडे, पंढरपूर
- सौ. प्रगल्भा चंद्रगुप्त दोशी, पंढरपूर
- डॉ. अनुपम अरविंद शहा, सोलापूर
- श्री. किरण कोठाडिया, सोलापूर
- श्रीमती सुजाता शहा, पुणे
- माणिकबाग जैन मंदिर, पुणे
- श्रीमती लक्ष्मीबाई नेमिशा भोकरे, कुंभोज (स्व. नेमिशा अण्णा भोकरे यांचे स्मरणार्थ)
- सौ. कल्पना सतीश होरे, इस्लामपूर (अ‍ॅड. स्व. विवेक सतीश होरे यांचे स्मरणार्थ)
- श्री. जवाहर छगनलाल गांधी, औरंगाबाद
- सौ. तनुजा गांधी, औरंगाबाद
- डॉ. अनुपम अरविंद शहा, सोलापूर
- सौ. सरिता शहा, चिंचवड, पुणे
- सौ. चंद्रकांता रमणलाल कासलीवाल, डोंबिवली
- श्री. रविंद्र शा. जबडे, डोंबिवली (स्व. शांतिसागर दि. जबडे यांच्या स्मृतिप्रित्यर्थ)
- श्री. महावीर अक्कोळे, जयसिंगपूर
- डॉ. सुरेखा प्रदीप गांधी, अकलुज
- श्री. शिरीषजी देवकुमारजी चवरे, कारंजा लाड

✧✦✧

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Nariā, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0 In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

सुमेरू प्रकाशन
मराठीचा पहिला शिलालेख

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0 In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi

CC0.In Public Domain. Digitized by Sarayu Trust/eGangotri

Ganesh Varni Digambar Jain Institute, Naria, Varanasi